मराठी, ग्रंथ संग्रहालय, ठाणें.
(जिल्हा वाचनालय)

मासिकाचे नांव —

संपादक —

मासिक क्रमांक — सन —


अंक —

(महिने)


मराठी ग्रंथ संग्रहालय, ठाणे.

जुनी मासिके (संदर्भ)

ज्योतिर्विद् राजा हरि भट्ट पदे यांचें स्मारक.



वर्ष १५. **आर्यभिषक्** अंक १.



संपादक — शंकर दाजी शास्त्री पदे.

आयुर्वेदमहोपाध्याय.

मुंबई, पोस्ट गिरगांव, आर्यभिषक्कार्यालय.

भिषजां साधुवृत्तानां, भद्रमागमशालिनाम् ।
अभ्यस्तकर्मणां भद्रं, भद्रं भद्राभिलाषिणाम् ॥ **श्रीवाग्भटः**

**कर्कसंक्रांति.**—शके १८२५ आषाढ वद्य ६ गुरुवार. ता. १६ जुलै, सन १९०३

विषयानुक्रम - वनौषधी गुणादर्श भाग ६ वा, पृष्ठें १३-२० (सचित्र.) दीर्घायु कसें व्हावें? २१-४०

---

## नवीन वर्गणीदार होणारांस सूचना.

वनस्पतींचे देखावे ११ व्या अंकापासून येत आहेत. ज्यांना १५ व्या वर्षारंभापासून वर्गणीदार होणें असेल व देखाव्यांसाठीं १४ व्या वर्षाचे अंक ११।१२ पाहिजे असतील, त्यांस ते फक्त ६ आणे घेऊन देण्यांत येतील. वास्तविक रीत ह्मटली ह्मणजे फुटकळ प्रत्येक अंकाची किंमत ४ आणे. टपालखर्च शिवाय.

---

# वर्गणीदारांस अगत्याची सूचना.

परमेश्वरकृपेनें **वनस्पतींचे देखावे** देण्याची व्यवस्था सुरळीत लागली आहे. त्याकरितां मुद्दाम वनस्पति आणविण्याची वगैरे सर्व व्यवस्था, मोठ्या खर्चानें केली आहे.

त्याचप्रमाणें सार्थ **श्रीचरकाचें** शारीरस्थान, येत्या अंकापासून सुरू करणार असून, त्यांत **शारीराचे देखावे** देणार आहों.

चरकसंहितेच्या **चिकित्सास्थानाचा** दुसरा भाग स्वतंत्र पुस्तकरूपानें छापून तयार झाला आहे. ज्यांस घेणें असेल त्यांनीं मागवावा. किंमत २ रुपये. वर्गणीदारांस निम्मे किंमतीस मिळेल. टपालखर्च शिवाय.

**'दीर्घायु कसें व्हावें ?'** या पुस्तकाचीं पहिलीं ३२ पृष्ठें, मागच्या वर्षांत आलीं आहेत. नवीन वर्गणीदारांनां तीं पाहिजे असल्यास ४ आणे किंमतीस मिळतील. टपालखर्चशिवाय.

---

**वनौषधि-गुणादर्श.** याचे **सहा भाग** विक्रीस तयार आहेत. त्यांची किंमत ६॥ रु आहे. परंतु आर्यभिषक्चे वर्गणीदारांस ते ३। रुपयांस मिळतील. टपाल शिवाय.

---



स. वरुण. म. वायवरणा.




अरस.

SOLANUM VERBASOIFOLIUM


चित्रशाळा नेजक प्रेस काळबादेवीरोड मुंबई.




वैद्य बदर्स प्रेस.



सं. कुमारी: म. कोरफड.



सं. पर्पटक. म. पित्तपापडा.

G. V LAD

धैर्य नवर्दी प्रेस.

या वृक्षाचें वर्णन, गुणदोष व औषधि उपयोग वनौषधिगुणादर्शाच्या ६ व्या भागांत विस्तृत रीतीनें दिलेले आहेत ते पहावे. त्याहून जास्त सांगावयाचें इतकेंच कीं, यास पांढऱ्या रंगाच्या फुलांचे घोंस येतात. याचे उपयोगी भाग पानें व साल हे होत.

## ८ अरस.

ही वनस्पति बंगाल्यांतील लोकांस विशेष माहीत आहे. अन्यत्र ठिकाणींही होत असावी असें मिळालेल्या कांहीं माहितीवरून अनुमान होतें. परंतु त्या ठिकाणीं ती अप्रसिद्ध असल्यामुळें तिचीं निरनिराळ्या देशभाषेंतील नांवें, अनुभूत गुणदोष व औषधि प्रयोग वगैऱ्यांची विश्वसनीय माहिती मिळत नाहीं. अरस हें एक झुडूपसारखें आहे. यास शाखा नसतात. यास पानें, एकांत्राड येतात. यांची लांबी रुंदीपेक्षां जास्त असते. तीं बाहेरच्या शेवटाकडे निमुळतीं झालेलीं असतात. यांचे कांठ सबंध असतात. देंठ मध्यम लांबीचे असतात. पानांच्या देंठाच्या मुळास लागून निघालेल्या लांब पुष्पदंडावर ढऱ्या रंगाचीं, पांच किंवा सहा पाकळ्याचीं लहान लहान फुलें येतात. ळें लहान बोरासारखीं असतात.

याचें **गुणदोष** व **औषधि उपयोग** या संबंधानें खात्रीलायक माहिती फक्त इतकीच मिळते कीं, याच्या पानांच्या रसाचा उपयोग ग्रंथिक शोथ व संधिवात यांवर चांगला होतो. यावरून यांत वातनाशक धर्म आहे असा तर्क करितां येतो.

## ९ काजरा, कुचला. ( मराठी )

**संस्कृत नांवें**—कारस्कर, किंपाक, विषतिन्दु, विषद्रुम, गरद्रुम, रम्यफल, कुपाक, कालकूटक, कुलक, कुपीलु, मर्कटातिन्दु, कच्चीर, वर्तुल, चिपिट. **गुजराथी**—झेरकोचला. **बंगाली**—कूंचिला. **कर्णा.** कांजिवार, कासरकानामारा, हेम्मुष्टि, **तै०** मुसिडी, मुष्टिचेट्टु. **ता.** एट्टिमारं, कोकोडी. **तुलु**— कायेरुमारा. **मला.** कन्निराम. **ब्रह्मी**—खाबों. **फारसी**—अझारेकी. **अरबी**—जौझेल-

मधील. इं. Poison nut पॉइझननट. ला. Strychnos nux-vomica रिट्रक्नोस नक्सवॉमिका,

**वर्णन**– याच्या सात जाती हिंदुस्थानांत सांपडतात. इतर द्वीपांत सांपडत नाहींत. एक जाति अलीकडे आफ्रिकाखंडांत सांपडली आहे. कोचीन चिनांत व फिलिपैन बेटांत या वनस्पतिवर्गाची एक जाति सांपडली आहे. तिचें नांव, Strychnos Ignatia amara हें आहे. त्यास चिनी भाषेंत ' होंग नांग ' हें नांव दिलें आहे. यांतून पपीता नांवाचें एक बीं निघत असतें. पपीता हें नांव मले भाषेंतील आहे. पपीता बीज लांबोळें, त्रिकोणाकृति, तांबूस रंगाचें, सरासरी एक इंच लांबीचें असतें. या बीचा औषधि उपयोग पहिल्यानें जेजुइट लोकांनीं युरोपियन लोकांस कळविला व त्यांनीं त्यांस आपला गुरू सेंट इग्नेशस याचें नांव दिलें. या बियांतून काजऱ्याच्या बियांप्रमाणें स्ट्रिकनीन व ब्रूशिया हीं दोन सत्वें निघतात व त्यांच्या काढ्याचा निष्कर्ष काजऱ्याच्या निष्कर्षाप्रमाणें तयार करितां येतो. पक्षाघात रोगांत लुले पडलेल्या भागांस आकुंचन–प्रसारण शक्ति उत्पन्न करण्यांत उपयोग फार चांगला होतो. नुस्तें बीं फार कडू असतें व तें काळ्या खजूर उगाळून महामारीच्या रोगांत तीन वेळां दिलें असतां ढाळ व वांत होऊन शरीरांत उष्णता येते. बडोद्यांतील हल्लींचे डाक्टरी खात्याचे मुख्य अधिकारी डॉ. सुलेमानी काळा खजूर, दर्यायी नारळाचा गर व सफेद आंकड्याच्या मुळाची साल वाळवून केलेली बुकी असे पदार्थ एकत्र करून, पपीत्याच्या, मधांत अथवा जुन्यागुळांत २ गुंज वजनाच्या गोळ्या करून त्या महामारींत रोग्यास उलटी होत असतांना, नाडी हातास लागे पावेतों देत असत व यापासून त्यांस चांगलाच गुण दिसून आला असें डॉ. मंत्री कळवितात.

कुचल्याचा वृक्ष गोंवें प्रांतांत व मलबारांत विपुल वाढतो. बंगाल्यांत क्वचित् आढळतो. मुंबईजवळ साष्टींत ही क्वचित् आढळतो. हा मध्यम उंचीचा ह्मणजे सुमारें ४० पासून ६० फुटीपर्यंत वाढतो. ह्याच्या बुंध्याचा

परिघ १२ फुटींपर्यंत असतो. ह्याच्या डाहळ्या पुष्कळ वाकड्या तिकड्या, व कठिण असून त्यांची साल राखाडी रंगाची, गुळगुळीत व कडू असते. कोंवळ्या डाहळ्या ग्रंथियुक्त व जोडलेल्याशा दिसतात. नवे कोंब चकचकीत, हिरव्या रंगाचे व तांबूस रंगाची छाया मारणारे असे असतात. पानें जोडांवर समोरासमोर लागलेलीं असून कठिण पर्णकलिकेपासून निघतात. यांचे देंठ आंखूड असतात. हीं चकचकीत व गुळगुळीत असून थोडीशीं दडस असतात. यांचे कांठ सबंध असतात ह्मणजे त्यांवर कात्रे, खांचे वगैरे नसतात. हीं पानें रुंद, अंडाकृति, कांहींशीं नागवेलीच्या पानांसारखीं बाहेरच्या शेवटास निमुळतीं तीनपासून ५ इंच लांबीचीं व १॥ पासून ६ इंच रुंदीचीं असतात. त्यांस तीनपासून पांच सडसडीत रेषा असतात. फुलांचे घोंस डाहळीच्या शेवटीं येतात. फुलें अव्यवस्थित मंजरीच्या आकाराचीं हिरवट-पांढरीं असतात. तीं लवंगांसारखीं दिसतात. एका दृष्टीनें घंटेच्या आकाराचीं ह्मटलीं तरी चालतील. फुलांची अंतर्वटिका पांच पाकळ्याची असून पांचवेळां विभागलेली, खालीं एकत्र झालेली असून तिच्या गळ्यापाशीं किंजल्क पांच पाकळीशीं संलग्न असतात. ते प्रत्येक पाकळीसमोर लागलेले असतात. यांतील स्त्रीकेशर अंतर्वटिकेच्या लांबीचा व सलोम ( लवदार ) असतो. त्याच्या शेवटाला दोन भागांचें योनिमुख असतें. याचें फळ कौंडळाच्या आकाराचें गुळगुळीत गोलाकार नारिंगी रंगाचें असतें. हें दिसण्यांत एक प्रकारें सुंदर दिसतें. ह्मणूनच यावृक्षास ‘ रम्यफल ’ असें एक अन्वर्थक नांव आहे. फळाची त्वचा पातळ असते व तें फोडलें असतां आंत सफेद पिंवळ्या रंगाचा गर दिसतो. गराच्या आंत दोन पासून पांचपर्यंत वाटोळ्या, दोन्ही बाजूंनीं चापट, ½ पासून एक इंच व्यासाच्या, चिवट, फिकट किंवा पिवळट उदी रंगाच्या बिया असतात. यांस काजऱ्याच्या बिया ह्मणतात. या अतिशय विषारी असून यांस कोणत्याही प्रकारचा वास नसतो. या वृक्षाचा मुख्य उपयोगी भाग बिया व साल आहे. याचीं पानें ही विषारी आहेत. तीं गुरांनीं चुकून फार खाल्ल्यानें गुरें मेल्याचे दाखलेही वढून येतात. हा वृक्ष

## १० रानगांजा, सालवण ( मराठी )

**संस्कृत नांवें**—शालिपर्णी, स्थिरा, सौम्या, त्रिपर्णी, पीवरी, गुहा, विदारिगन्धा, दीर्घाङ्घ्री, दीर्घपत्रा, अंशुमती, सादला, सुदला, स्थिरा, छालपर्णी, सुपुत्रिका, कुमुदा, सौम्या, ध्रुवा, दीर्घमूला, सुपर्णिला, वातघ्नी, तन्वी, सुधा, सर्वानुकारिणी, शोफघ्नी, सुभगा, देवी, निश्चला, व्रीहिपर्णिका, सुमूला, सुरूपा, सुपत्रा, शुभपत्रिका, शालिदला, पीतनी, अतिगुहा, श्रीपर्णी, महाक्षीतनिका, पर्णी, ध्रुवपर्णी, एकमूला, अस्तमती, शालानी, शालिका, कीटविनाशिनी. **गुजराथी**—समेरवो. **हिंदी**—सरिवन. **बंगाली**—शालपान, शालपानी. **कर्णाटकी**—मुरुलुवोने. मुरेलेहोन्ने, काडगांजि **ते०** शीयाकुपना. **औत्कल**—शारपाणि. **ला.** DesmodiumGangeticum डेस्मोडियम गँजेटिकम्.

वनौषधिगुणादर्शाच्या ६ व्या भागांत सालवण या नांवाखालीं या वनस्पतीचें जें वर्णन केलें आहे तें याठिकाणीं दिलेल्या चित्राहून निराळ्या जातीचें आहे. ती जात दुर्मिळ आहे व याठिकाणीं जी जात दाखविली आहे ती सर्वत्र मिळणारी आहे. रानगांजा व रानभाल यांच्या बऱ्याच जाति उपलब्ध असल्याबद्दलचें विवेचन मागें रानभालेच्या वर्णनांत केलेंच आहे. आतां प्रस्तुत वनस्पतीकडे वळूं.

**वर्णन**—हें एक ३–४ फूट उंचीचें झुडूप आहे. हें कोंकण, बंगाल व मध्य प्रदेशांत आपोआप वाढतें. हें बाराही महिने राहतें. उन्हाळ्यांत याचीं पानें वगैरे जनावरांनीं खाऊन टाकलीं तरी झाड मरत नाहीं. याच्या दांड्याचा घेर सुमारें एक इंचपर्यंत असतो. यांचीं पानें बेलाप्रमाणें त्रिदळ असून तीं सुमारें दोन आंगळें लांबीच्या देंठावर येतात. हीं पानें आकारानें कांहींशीं टाकळ्यासारखींच, दीर्घवर्तुळ परंतु त्याहून जरा मोठीं असतात. दुसरा भेद असा आहे कीं, टाकळ्याचीं पानें पिंवळट असतात व हीं काळसार असतात. दोन त्रिदळ पानांमधील अंतर सुमारें २।३ इंच असतें. पानांची मागील बाजू कांहींशी राखाडी रंगाची असते. प्रत्येक पानाजवळ

पुष्पकोशाप्रमाणें कांहीं तांबडा भाग असून त्याच्या आंतल्या बाजूस पांढरा कोंवासारखा पदार्थ असतो. यास ल्हान ल्हान निळ्या रंगाचीं फुलें बारा महिने येत असतात. याच्या शेंड्याकडे शेंगांचा वोंस लागतो. त्याची लांबी सरासरी १ वीत असते. एका घोंसास एकमेकास चिकटलेल्या बारीक बारीक व चपट्या अशा शेंकडों शेंगा असतात. प्रत्येक शेंगेची लांबी ½ इंचापासून ¾ इंचपर्यंत व रुंदी १–१॥ सूत असते. त्यांत ६ पासून ८ पर्यंत सांधे असतात. याचा उपयोगी भाग मूळ आहे. दशमुळांत व लघुपंचमुळांत रानगांजाचें मूळ येतें. लघुपंचमुळांत रानगांजा, रानभाल, रिंगणी, डोरली व गोखरूं यांचीं मुळें येतात.

याचे गुणदोप व औषधि उपयोग व. गु. ६ व्या भागांत वर्णन केले आहेत ते पहावे. त्याशिवाय जखम लवकर भरून येण्याकरितां याचें ओलें मूळ वाटून व्रणावर बांधावें. याचें मूळ सर्व प्रकारच्या तापांवर व बाळंतिणीच्या तापावर ही गुणकारी आहे. लघुपंचमुळांचा काढा थंडीचा ताप, दमा, व कफदोषानें होणारे सर्व रोग यांवर देण्यास प्रशस्त आहे. बृहत्पञ्चमूळ ह्मणजे बेल, एरण, टेंटू, शिवण, पाडळ यांचीं मुळें, यांचा काढा ताप व दूषित हवेपासून होणारे रोग यांवर द्यावा. आणि वरील दहाही मुळांचा काढा ( दशमूळक्काथ ) वरचेवर राहून राहून येणारा ताप, छांतींतील रोग, मस्तकरोग, व इतर अनेक प्रकारच्या रोगांवर उत्तम गुणकारी आहे.

## ११ कोरफड, कुवारकांडें.

**संस्कृत**—गृहकन्या, कुमारी, कन्यका, दीर्वपत्रिका, स्थलेरुहा, मृदु, बहुपत्रा, अमरा, अजरा, कंटकप्रावृता, वीरा, भृंगेष्टा, विपुलस्त्रवा, ब्रह्मघ्नी, तरुणी, रामा, कपिला, अंबुधिस्त्रवा, सुकंटका, स्थूलदला, माता, मंडला, घृतकुमारी, सहा, अफला, सुरसा, अतिपिच्छिला. **गु.** कुवार **हिं.** घिगुवार,

ग्वारपाठा, कुवारपाठा. **बं.** घृतकुमारी. **क.** लोयिसर, कटालिगिड, कन्येकुमारी. **तै.** कालबांडा. **ता.** कट्टाले. **तु.** नोलिसारा. **मला.** कट्टावाला. **ब्रह्मी**—मॉक. **फा.** दरखते सिन्न. **अ.** मुसब्बर. **इं.** Barbadoes aloes बार्बेडोझ आलोझ. **ला.** Aloe barbadense आलोई बार्बेडेन्स.

**वर्णन**—एलिया अथवा काळाबोळ ज्या पासून बनतो त्या वनस्पतीचें नांव कोरफड आहे. ही इंग्लिश वर्गवारीप्रमाणें 'लिलिएसी' [Liliacea] नांवाच्या उद्भिज्जवर्गांत मोडते. ईस घृतकुमारी नांव कां पडलें तें निश्चयात्मक कळत नाहीं. परंतु तर्क असा आहे कीं, प्राचीनकाळीं कोरफडीचे ताजे तुकडे तुपांत तळून तें तूप औषधांत वापरीत असत ह्मणून हें नांव पडलें असावें. कोरफडीचें मुळासुद्धां घेतलेलें खोड हवेंत टांगून ठेविलें असतां जमीन व पाण्याच्या आश्रयावांचून तें टिकतें व वाढतें ह्मणून तीस गृहकन्या, तरुणी हीं नांवें पडलीं असावीं. अमरा, अजरा, सुकंटका, स्थूलदला, अफला, सुरसा, अतिपिच्छिला हीं सर्व नांवें उघड उघड अन्वर्थक आहेत.

कोरफड हिंदुस्थानांत बहुतेक सर्व ठिकाणीं उत्पन्न होते. याच्या एकंदर तीन जाती युरोपियन उद्भिज्जशास्त्रवेत्त्यांनीं मानल्या आहेत. त्यांपैकीं दोन हिंदुस्थानांत सांपडतात. तिसरी जात जिच्यापासून ब्रिटिश फॉर्माकोपियांतील 'ॲलो सोकट्रिना' नांवाचा बोळ बनवितात, ती हिंदुस्थानांत सांपडत नाहीं. तीन जातींचें वर्णन पुढें लिहिल्याप्रमाणें.—

( १ ) आफ्रिकेच्या दक्षिणेस नेटाल व केपकॉलनी असे दोन प्रांत आहेत त्यांत कोरफड किनाऱ्यानें २००–३०० मैल पावेतों उगवते. तिकडील लोक बकऱ्याच्या किंवा माकडाच्या कातड्यांच्या पिशव्या करून त्यांचीं तोंडें झाडाच्या बुडाशीं लावून ठेवतात व पानांच्या बुडाशीं आडवे कात्रे पाडून तो रस V या आकाराच्या लांकडी घमेल्यांत गळूं देतात. पुढें

(२५२) ज्या आहारांत हाडकांचा भाग अतीशय थोडा असेल असा आहार एखाद्या प्राण्यास पुष्कळ दिवस सेवन करण्यास दिला, तर त्या प्राण्याचे हडकांचे घटक, प्रथमप्रमाणेंच राहतील; मात्र हाडें पहिल्या इतकीं मोठीं राहणार नाहींत; यावरून असें दिसतें कीं, आपल्या शरीराची यंत्ररचना इतकी शहाणपणाची आहे, कीं कोणताही पदार्थ खाण्यास दिला, तरी पण अवश्य असेल तो पदार्थ आपलें शरीर तयार करूं शकतें. सर्व प्रकारच्या हवेंत व देशांत मनुष्यें अपलें जीवन चालवितात त्याचें, हेंच कारण होय.

(२५३) कित्येक मनुष्यांच्या पांचच मिनिटांच्या सहवासानें असें कळून येतें कीं, त्यांनीं प्रवास बराच केला असावा व मंडळींत ऐकूं येईल इतक्या मोठ्यानें भाषण करण्यास अशींच मनुष्यें योग्य समजावींत व त्यांचा हेतुही तोच असतो.

(२५४) गाय जसें खाणें खाते तसें दूध देते, व त्याचें लोणी बनतें. त्याच प्रमाणें आईचें दूध प्याल्यानें तिचे गुणदोष मुलांत उद्भवतात, ह्मणून प्रत्येकीनें आपलें चित्त प्रसन्न ठेऊन व आहार विहार माफक ठेऊन मुलास स्वतःचेंच दूध पाजीत जावें; कारण, एखादी अपरिचित दाई पाहिली तर तिचे दोष मुलांत उद्भवल्याशिवाय रहाणार नाहींत.

(२५५) आपली वाढ संपण्यास जितकीं वर्षें लागतात त्याच्या पांचपट वर्षें आपलें आयुष्य असलें पाहिजे; जन्मल्या दिवशीं जेवढें आपलें वजन होतें त्याच्या वीसपट वजन आपल्या वयाच्या पत्तिसावे वर्षी असलें पाहिजे. जन्मल्या दिवशीं ज्याचें वजन दोन पौंड भरलें आहे असें मूलही वांचलें आहे.

(२५६) मनुष्याचें जास्तींत जास्त वजन ३५ वे वर्षी असतें; या वयांत मनुष्याचे वजनाची सरासरी १५० पौंन्ड असते व स्त्रीची १२० असते. मात्र फरक इतकाच, कीं स्त्रियांचें वजन ५० वर्षांचें वय होईपावेतों वाढत जातें व या वयांत त्यांची सरासरी १५० पौन्ड असते.

(२५७) ज्यांची पचनशक्ति चांगली नाहीं अशा मनुष्यांनाः—एक पौन्ड दूध (१२ औंस=१ पिंट=१ पौन्ड.), तितकेंच पाणी, चांगल्या रीतीनें सिद्ध केलेलें अन्न व थोडें मीठ टाकून तयार केलेलें पेय—हीं, फारच रुचिकर व हितावह होत.

(२५८) शाळेंत बक्षिस मिळविण्यासाठीं होणाऱ्या स्पर्धा व वादविवाद हे हरेक रीतीनें अपायकारक होत. त्यापासून आपले हेतु पार पडत नाहींत, अनीति घडते व परिणामीं शारीरिक व मानसिक व्यथा मात्र उत्पन्न होतात.

(२५९) एखादे मनुष्यास आपण कांहीं कठोर शब्द बोललों, अगर त्याचे इच्छेविरुद्ध एखादें आचारण केलें, तर त्याच्या मरणानंतर व कृतकर्माचा मोबदला फेडण्याचें साधन नाहींसें झाल्यावर—आपल्या गैरवर्तनाबद्दल आपल्यास जेवढा पश्चात्ताप व खेद उत्पन्न होतो, तेवढा दुसरा कशानेंच होत नाहीं.

(२६०) मोठ्यानें गडवड करणारे, मोठ्यानें हसणारे व अतिशय गलवला करणारे जे लोक, ते, असभ्य (Vulgar) असतात.

(२६१) तेवीस वर्षांपूर्वी एका स्त्रीच्या गिळण्यांत तीन टांचण्यां आल्या, व त्यामुळें १५ वर्षेंपावेतों तिला अतिशय वेदना सहन कराव्या लागल्या; शेवटीं डाव्या कुल्ल्याच्या सांध्याजवळ जेव्हां त्या टांचण्या बाहेर निघाल्या, तेव्हां ती त्या दुःखांतून सुटली. ह्मणून तोंडांत (दांत वगैरे कोरण्यास) टांचणी कधींच घालूं नका. कारण, तशा स्थितींत जर एकाएकीं हसें आलें, तर ती एकदम घशांत उतरते अथवा श्वासोच्छ्वासाचे नळींत शिरते.

(२६२) जो मनुष्य हमेषा उगीच कांहींना कांहींतरी करावयास जातो, तो कधींही यशस्वी निवडत नाही.

(२६३) अमेरिकेंतील "हिकरी" नावाच्या झाडाच्या दोरांत अमुक भाग उष्णता १०० दिवस पावेतों टिकते, "पिचपाइन" (देवदारु वृक्षांतून निघणारी राळ) मध्यें ३५ दिवस व एक टन कोळशांत ९१ दिवस राहते.

(२६४) चार पौन्ड कांद्यांत एक पौन्ड "ग्लुटन" असतें. "ग्लुटन" हें एक गव्हांतील अत्यन्त पौष्टिक सत्व आहे; ह्मणून कांदा हा स्वल्पात मिळणारा व शक्तिवर्धक आहे.

(२६५) या संसारांत आपण नाना तऱ्हेच्या चुका करतों; त्याचा आपणास पश्चात्तापहि होतो; त्यांत आपण सुधारणाही करतों. एकच गोष्ट आपण एकाच पद्धतीनें दोन वेळ क्वचितच करतों. विसावें वर्षी ज्या अज्ञपण चुका करतों, त्याचा आपणास पंचविसावे वर्षी पश्चात्ताप होतो. जसजसे आपण मोठे होत जातों. तसतसे आपण चुकाही करीत जातो, व त्याचा आपल्यास पश्चत्तापही होत जातो. संपूर्ण विचार आपण करीत नाहीं, ह्मणून वारंवार असें घडतें.

(२६६) जे खरे विद्वान् असतात, ते दुसऱ्याचें लक्ष्य कोणत्याही रीतीनें आपणाकडे ओढण्याचें टाळण्यास्तव, आंगच्या बुद्धीनें वागतात.

(२६७) वास्तविक रीतीनें पाहिलें तर, स्वदेशांत राहण्यापेक्षां परदेशांत राहणें गैरफायदेशीर आहे. तरीपण पुष्कळांनां परदेशांत राहणें बरें वाटतें. याचें कारण असें, कीं घर सोडण्यापूर्वी **पैशाची आपण चांगली सवड करून ठेवतों,** त्यामुळें पैसा मिळऊन आणून, खर्च चालविण्याची काळजी राहत नाहीं; व आपल्याजवळ पैसा पुष्कळ आहे असें ग्रहित धरून, लोक आपल्यास पूज्य समजतात व आपला फारसा कोणाशीं परिचय नसल्यानें, स्वस्थपणें, कालक्रमण करतां येतें. [ पण हीच स्थिति स्वदेशांत रहाण्याचा प्रयत्न करावा. ]

(२६८) आईबापांचे स्वभाव, अभिरुचि, प्रवृत्ति व हरएक प्रकारचे गुणदोष मुलांत आढळतात ही गोष्ट ठरींव आहे; तरीपण, जर मुलांच्या शिक्षणक्रमाकडे वगैरे

योग्य लक्ष्य पुरवून चांगली काळजी घेतली, तर दुर्गुण नाहींसे होऊन सद्गुणी मुलें निपजूं शकतील.

(२६९) जेव्हां जेव्हां थंड हवेंत आपण झपाट्यानें चालत असतांनां हाताच्या कोपराच्या खिळीवर दुखत आहे असें वाटेल, तेव्हां काळजाच्या रोगाची भावना होण्याचें पूर्वस्वरूप आहे असें समजावें. हरेक प्रकारचा व्यायाम आणि आपलें काम फार काळजीनें व संपूर्ण विचार करून करीत जावें. अतिशय गर्दी ही दुःखदायक आहे इतकेंच नव्हे, तर फार भयंकरही आहे.

(२७०) फार वेळ खाणें असेल, तर हळू हळू खावें. कारण, खाण्याच्या कामीं अति घाई करणारे लौकर मरतात.

(२७१) युनैटेड स्टेट्स पैकीं "टालेडो," "नॉक्सविली," "सेन्टलुइ" व "चिकागो" येथील हवा, फेब्रुवारी महिन्यांत फार उत्कृष्ट व निरोगी असते, ह्मणून त्या महिन्यांत निदान एकतरी आठवडा तेथें काढावा; व चार्लेस टौन, वाशिंग्टन व न्यूयार्क येथील हवा अगदींच वाईट असते. "टालेडो" येथें हजारीं बारा मृत्युसंख्या असते व "चार्लेस टौन" येथें चाळीस असते. (हा मुद्दा स्थलानुरूप ध्यानांत ठेवण्यासारखा आहे.)

(२७२) उंचवट्याचे जमिनीवर व रेताड जमिनीपेक्षां शुद्ध मातीच्या जमिनीवर घर बांधलें तर तें शरीरसंपत्तीस फार सुखावह होतें; कारण, रेती पाणी शोषून घेते व मातीवरून पाणी झपाट्यानें वाहून जातें.

(२७३) एक वेळ आहार केल्यावर थोडक्याच अवधींत पुनः आहार करण्याची संवय ठेवल्यानें, अजीर्णाचा व्याधी होतो. एक वेळ आहार करून, पुनः आहार करण्याचे दरम्यान पांच तासांचें अंतर असावें. पांच वर्षांच्या वयापासून, हा पांच तासांचा नियम जर सक्त रीतीनें पाळला, तर अजीर्णाचा व्याधी कायमचा नाहींसा होईल.

(२७४) अखूड व मंद पाउल टाकणें, हें सर्वत्रांस व मुख्यत्वेंकरून ६० वर्षांच्या व त्या उपरांतच्या वयाच्या सर्व मनुष्यांस अत्यन्त सुरक्षित व हितावह आहे.

(२७५) एखाद्या वस्तूची तसवीर जरी नेत्रदर्पणांत (बुबुळांत) उलटी दिसते, तरी पण चक्षुरिंद्रियतंतु मेंदूस (मगजास) जाऊन मिळण्याच्या पूर्वींच, ती तसवीर जशीच्या तशीच—ह्मणजे सुलटी होते व ह्मणूनच खरी आकृती मेंदूस समजते.

(२७६) घोड्यास जर लहान जागेंत संकोचून राहण्याची वाईट संवय लागली, तर खालपट जागेवर त्याची चंदी ठेऊन, त्याला खाऊं घातल्यानें, त्याची वाईट संवय खात्रीनें जाईल. घोड्यास तर दाणा (चंदी) कोठ्यांतूनच खाऊं घालावा. परंतु मनुष्यानें मात्र ताठ (छाती काढून) बसून आहार करण्याची संवय लावली पाहिजे.

(२७७) स्वयंपाकास व पिण्यास शुद्ध व स्वच्छ पाणी असणें, हें अत्यन्त हितावह आहे. पाणी शुद्ध व स्वच्छ करण्याची रीत खालीं लिहिल्याप्रमाणें:—

जमिनीचे सपाटीवर एक मजबूत टांकी बांधावी; व एक लांब नळ तयार करून, त्यांत वाळू व कंकर, प्रमाणानें घालून, घराचे छपरावर पडणारें पाणी त्या नळांत पाडून, नळावाटे पाणी, सदरील टांक्यांत जावें अशी योजना करावी.

जर सदर टांकें जमिनीचे सपाटीखालीं बांधलें असलें, तर तो नळ फार मजबूत असावा; कीं जेणेंकरून आसपासचें इतर प्रकारचें अशुद्ध पाणी टांकींत येऊं शकणार नाहीं. अर्धा नळ वाळू व कंकरांनीं भरावा म्हणजे त्यामुळें पाणी शुद्ध व निर्मळ होतें. नळ सारखा बसवावा, नाहींतर वाळू व कंकर नळाचे तोंडाशीं जमून द्वार बंद होण्याचा संभव आहे. अथवा असा मोठा नळ जर तयार करणें नसेल, तर छप्परावरील पाणी, एके मोठे पात्रांत वाळू व कंकर घालून, त्यांत पडूं द्यावें. अशा प्रकारचें पाणी फारच शुद्ध, निर्मळ व निरोगी असतें.

(२७८) गव्हांतील रक्तशुद्धी करणाऱ्या व पौष्टिक भागापैकीं $\frac{1}{4}$ भाग कोंड्यांत असतो; व कोंडा जर फेकून दिला तर तो भाग फुकट जातो; म्हणून कोंडा काढल्या-शिवाय गव्हांचा रवा, सांजा व पीठ उपयोगांत आणलें तर तो भाग फुकट जात नाहीं.

(२७९) बटाट्याचा अत्यन्त उपयोगीं भाग, त्यावरील पातळ सालाखालींच असतो. बटाटे सोलले तर तो भाग निघून जातो व तो आपण गुराला घालतों. बटाटे जर शिजविले व त्याची वरील पातळ साल काढून नंतर उपयोगांत आणले तर त्यांतील पौष्टिक भाग फुकट जात नाहीं.

(२८०) लहान मुलांस अथवा नोकरास वरचेवर, त्याची निंदा करून त्याला बोलणें हें चांगलें नाहीं; कारण, असें केल्यानें त्यांचें धैर्य खचून ते आपल्याशीं अगदीं बेपर्वाईनें व निर्भिडपणानें वागतात.

(२८१) मनुष्याप्रमाणेंच, वनस्पतींनाही, त्यांची योग्य व्यवस्था न राहिल्यानें अजीर्ण होत असतें; जर पाणी अथवा खत पाहिजे त्यापेक्षां जास्त झालें तर पानें गळून पडूं लागतात; आपल्या पक्वाशयाप्रमाणें जमीन सुद्धा आंबट होते. अशा-प्रसंगीं वनस्पती त्या जमिनींतून काढून घेऊन दुसऱ्या सुकट व चांगल्या मातीच्या नव्या जमिनींत लावली व योग्य काळजी घेतली तर ती चांगली वाढेल. आणि याप्रमाणेंच शोधक लोक, प्राणीमात्र व वनस्पती यांच्या परस्पर स्वभावधर्मांतील नवीन सादृश्यें (सारखेपणा; तुलना;) शोधून काढतात.

(२८२) भाजलेला बटाटा हें एक रुचिकर पक्वान्न आहे. त्याचें दोन तासांत चांगलें पचन होतें; इतर रीतीनें तयार केल्यास त्याचें पचन होण्यास एक तास जास्त लागतो.

(२८३) ताज्या व तांबड्या मांसापेक्षां डुकराचें सुकट, अथवा धूर देऊन ठेवलेलें मांस दुप्पट पौष्टिक असतें. अजामांस भाजल्यानें त्यांतील पौष्टिक पदार्थ शेंकडा १५ कमी होतो व तेंच उकळल्यानें ११ भाग कमी होतो. उकळलेल्या मेंढ्याच्या सागुतींतून शेंकडा १० भाग पौष्टिक पदार्थ कमी होतो व भाजल्यानें २५ भाग कमी होतो.

(२८३) आपल्या धारल्याप्रमाणें प्रत्येक कामांत यशस्वी निवडून, सर्व मनोरथ पूर्ण झाले, ह्मणजे मग कित्येक लोक धंदा सोडून घरीं स्वस्थ बसण्याचे विचारांत निमग्न असतात. धंदा सोडून घरीं बसणें हें सोपें आहे, पण घरीं बसून काय करणें व वेळ कसा घालविणें याचाही विचार करणें शहाणपणाचें काम आहे. जर घरीं रिकामें बसून स्वस्थ वेळ घालविला व शारीरिक अगर मानसिक कांहींच श्रम न केले तर ही मोठी चूक होईल. धंदा सोडून स्वस्थ बसण्याचा सुरक्षित मार्ग असा आहे, कीं घरीं स्वस्थ बसल्यावर जो धंदा करून आपण कंटाळलों त्याहून अगदीं भिन्न असा एखादा धंदा पाहून काढावा, कीं ज्यांत आपण शारीरिक व मानसिक श्रम करूं शकूं व जेणेंकरून आपला वेळ चांगला आनंदांत जाईल.

(२८५) कित्येकांना तर रात्रीचे पूर्वार्धांत खोकला येतो, व झोंपही येत नाहीं, त्याचीं कारणें:—(१) आपण पचन करूं शकूं, त्यापेक्षां जास्त आहार करणें. (२) रात्रीस उशिरां जेवणें, अथवा (३) व्यायाम करून थकून आल्याबरोबर लागलीच खाणें,—हीं होत.

(२८६) शरीरास अस्वस्थता वाटली अथवा शरीराच्या नेहमींच्या व्यवसायांत कांहीं विपरीत दिसूं लागलें, तर एकदम मागें घडलेल्या हकीगतीचा दूरवर विचार करा, व असें होण्याचें कारण शोधून काढण्याचा प्रयत्न करा. सर्व प्रकारचे रोग निवारण करण्यासाठीं प्रथम त्याचें मूळ कारण पाहून काढून तें दूर केलें पाहिजे. परंतु कारण कोणतें याचा पुरता विचार केल्याशिवाय तें कळणार नाहीं व तें जर न कळलें, तर रोगही निवारण होऊं शकणार नाहीं.

(२८७) कोणताही अपरिचित पदार्थ अवेळीं अगर बाहेर जाण्यास निघते वेळीं कधींही खाऊं नये, कारण त्या पदार्थाची तुह्मांस माहिती नसल्यानें त्याचा परिणाम शरीररचनेवर घडून कदाचित् वाटेंत त्यापासून तुह्मांस अनिवार्य अडचण उत्पन्न होईल.

(२८८) मूळव्याध असलेल्या रोग्यानें गादी गिरदीवर बसूं नये; आणि मूळव्याधीचे मोड दुखूं लागतील, तोंपावेतों सकाळीं व रात्रीं त्यावर थंड पाणी शिंपीत जावें व विशेषेंकरून बद्धकोष्ठ न होऊं देण्यास फार जपावें.

(२८९) पायास जर जोड्याचे कठिण घट्टे पडून टेंगूळ आलें तर पाय ऊन पाण्यांत सकाळीं व रात्रीं चांगले भिजऊन, तें टेंगूळ मृदु झालें, ह्मणजे हळूच नखानें काढून टाकावें. जरूर पडली तर हरहमेश असें करावें, परंतु टेंगूळ कधींही कापवूं नये. कारण, तसें करण फार भयकर आहे, इतकेंच नव्हे, तर तें टेंगूळ कठिण होत जाऊन वाढतही जातें.

(२९०) लचक अथवा उसण भरली असली, तर शरीराच्या त्या भागावर सहन होईल तों पावेतों थंड पाणी सारखें ओतावें; उसण नाहींशी होई पावेतों असें हरहमेश करावें. हाताचे सभोंवतीं उसण भरली असली, तर तो भाग उंच केलेला

टेवावा व पायाचे सभोंवतीं असल्यास आडवा ठेवावा, ह्मणजे गुरुत्वाकर्षणानें रुधिराभिसरण त्या भागांत चांगलें होईल. अशा प्रसंगीं मुख्यत्वेंकरून जाडी भाकर व फळें खाऊन राहावें.

(२९१) कित्येक दारू "शॅम्पॅन्" प्रमाणें लखलखीत असून चमकतात, व कित्येक तशा नसतात. कित्येक 'शेरी" नांवाचे दारुप्रमाणें सुक्या असतात, व कित्येक "हॉक" नांवाचे दारुप्रमाणें आंवट असतात व कित्येक "पोर्ट" नांवाचे दारुप्रमाणें मिष्ट असतात. सुक्या दारूंत "ऑलकॉहोल" (मद्यार्क) अतिशय असतो, व मिष्ठ दारूंत साखरेचा भाग पुष्कळ असतो, आणि त्या फार फिक्क्या असतात. पौष्टिक औषध अथवा "बिटर्स" ह्मणून वर लिहिल्यापैकीं कोणत्याही दारूचा जर उपयोग कराल, तर दारूबाज व्हाल. आपले वाडवडील दारू व तेल यांचा सर्व रोगनिवारणावर रामबाण औषध ह्मणून उपयोग करीत होते. दारूचा उपयोग शक्ति येण्यास्तव करीत होते व तेलाचा उपयोग अवयवांचें पोषण होण्यास व त्यांना बळकटी आणण्याचे कामीं करीत होते. जे उत्तम वैद्य असतात, ते हल्लीं सुद्धां वरील तत्व चांगलें लक्षांत ठेवतात.

(२९२) आगगाडी व तारायंत्रें यामुळें पुष्फळ सुधारणा वाढली आहे, आगगाडीनें अंतर कमी होतें. व तारायंत्रानें वेळ कमी लागतो; मोठमोठालीं राष्ट्रें एकत्र करण्याचे कामीं हीं मोठींच उपयोगी साधनें झालीं आहेत.

(२९३) राज्य चालविणें अगर सत्ता वापरणें हें समजुतीनें जेवढें चांगलें साधतें तेवढें जुलमानें साधत नाहीं.

(२९४) डोळे व कान हीं फार नाजुक अवयव असल्यानें त्यांना वरचेवर छेडणें चांगलें नाहीं; व ह्मणून त्यांना इजा झाल्यास हुषार व अनुभवी वैद्याच्या सल्ल्यानें चांगले उपाय करावे.

(२९५) ज्या वस्तु आपल्या शरीरास अपायकारक आहेत त्यांत जगन्नियंत्यानें मोठ्या शहाणपणानें असा कांहीं दुर्गंध ठेवला आहे, कीं जेणेंकरून आपल्यास त्याची तत्काळ घाण येऊन, ते नाहींसे करण्याचे प्रयत्न आपण करूं लागतों. वाईट हवेंत दोन तत्वें आहेत; पहिलें हें, कीं त्यांतील दुर्गंधीनें आपण लागलीच सावध होतों. व दुसरें तत्व ह्मणजे त्यांत विषारी पदार्थ असतो व तेंच रोगाचें मूळ असतें. ह्मणून दोन्ही तत्वांचा नाश व्हावा असा एक रामबाण उपाय शोधून काढला पाहिजे:—शंभर अंश पाण्यांत दोन अंश कॉरबॉलीक आसीड [अथवा दुप्पठ मीठ] टाकून सर्व ठिकाणीं तें पाणी शिंपडलें तर या दोन्ही तत्वांचा नाश होऊन, हवा चांगली शुद्ध होते.

(२९६) आपण एखादेवेळीं साधारण गोष्टी बोलत बसतों, तेव्हां एकजण ह्मणतो कीं मी अमुक एक गोष्ट अनुभवसिद्ध सांगतों; ह्मणजे ऐकींव गोष्टीपेक्षां अनुभवसिद्ध गोष्टीवर आपली चांगली श्रद्धा बसते. परंतु औषधाचे कामांत मात्र अशा

कोणाच्या अनुभवसिद्ध सांगण्यावर मुद्धां विश्वास ठेऊं नका. कारण, प्रत्येकाचें प्रकृतिमान सारखें नसतें.

(२९७) जो मनुष्य नवीन एखादी खरी गोष्ट सांगतो, त्यापेक्षां जो मनुष्य जुन्या अनुभविक व खात्रीच्या गोष्टी बोलून दाखवितो, त्याचेकडून जगाचें कांहीं कमी कल्याण होत नाहीं.

(२९८) शरीरसंपत्ती व सुख वाढविण्यास पायांची काळजी विशेष घेतली पाहिजे; पायांतील मोजे व जोडे हे काढून ठेवल्यानंतर थोडा वेळ उन्हांत ठेवणे फायदेशीर आहे.

(२९९) आंबट पदार्थांपासून दातांस इजा होते; मिष्ठपदार्थांपासून तसें कधींच होत नाहीं.

(३००) जमिनीवर लाकडी टांकी तयार करून, त्यांत छपरावरून पडणारें पाणी घ्यावें ते अशा रीतीनें, कीं तें पाणी टाक्यांत जाण्यासाठीं एक नळ तयार करावा व त्यांत वाळूचे थर असावेत, व ते थर वर्षांतून जरूर पडल्यास बेळोवेळीं बदलीत जावेत. अशानें निर्मळ पाणी पिण्यास मिळून मळकट पाण्यापासून होणारे विकार होत नाहींत.

(३०१) अजीर्णाच्या रोगापासून मनुष्याचे स्वभावप्रकृतींत हळू हळू कसा पुष्कळ फरक पडत जातो तें पहाः—शांतप्रकृतीचा मनुष्य अतिशय तापट व चिरडखोर होतो; स्वभाव संशयी होतो व प्रफुल्लित वदन असलें तर त्यावर दिलगिरी दिसूं लागते.

(३०२) दंतमंजनानें दातांचें व्हावें तसें संरक्षण होत नाहीं; मंजनापासून जेवढे ते पांढरे दिसतात तेवढ्याच मानानें त्यांना त्यापासून इजाही पोंहचते. मंजनाचा उपयोग न करतां, गार पाण्यानें मृदु दंतधावनानें जर दांत स्वच्छ केले तर कदाचित् ते चांगलें पांढरे होणार नाहींत, परंतु ज्यास्त दिवस पावेतों निःसंशय टिकतील.

(३०३) रुचींत दोन प्रकार आहेत.—(१) स्वाभाविक व (२) कृत्रिम. स्वाभाविकरुची असणें शरीरप्रकृतीस हितावह आहे, परंतु कृत्रिम रुची ही शरीरप्रकृतीस विकार उत्पन्न करणारी समजावी. भाकर, पाणी, वगैरे साधें अन्न व दारु, तंबाकू, वगैरे मादक पदार्थ हीं पहिल्या व दुसऱ्या रुचीचीं अनुक्रमें उदाहरणें होत; स्वाभाविक रुचीचीं पांच लक्षणें आहेत तीं:—

(१) भाकर व लोणी, दररोज नियमितपणानें खाल्ल्यानें आपली भूक पुष्कळ दिवस पावेतों टिकते.

(२) कित्येक वर्षांपूर्वी आपण भाकर व लोणी जेवढ्या अंतरानें खात होतो त्यापेक्षां हल्लीं कमी अंतरानें खावें लागत नाहीं.

(३) पूर्वी अमुक भाग खाल्ल्यानें ज्या मानानें आपण तृप्त होत होतो, त्या मानानें हल्लीं सुद्धां राहूं शकतो.

(४) एक शेर भाकरीनें पूर्व वयांत जेवढा आपणास संतोष होतो, तेवढाच ८० वर्षांच्या वयांत होतो;

(५) आपण भाकरी जरी दिवसांतून तीन वेळां खातों, तरी आपणास कंटाळा येत नाहीं व त्यामुळें प्रकृतीस अपायकारक कांहींच चिन्ह दिसत नाहीं.

वरील पांची मुद्यासंबंधांत दीपक आणि उत्साहवर्धक पेय, वरील बाबतीच्या अगदीं उलट, म्हणजे फायद्याऐवजीं नुकसान मात्र करतात, कारण त्यांची रुची कृत्रिम अथवा अस्वाभाविक असते.

(३०४) मुलांनो धर्म व नीति या दोहोंचा उपदेश करण्याचें सर्वोत्तम साधन असें आहे, कीं त्यांनो उत्तेजन व चांगलीं चांगलीं उदाहरणें देऊन, वेळोवेळीं चांगलें काम केल्याबद्दल शाबास्की द्यावी.

(३०५) रोगातून उठलों म्हणजे :—(१) आपल्या शरीरांत अवश्य तेवढें उष्ण राहण्याची काळजी घेणें; (२) सरदी न होऊं देण्याबद्दल जपणें; (३) वाजवीपेक्षां फाजील व्यायाम न करण्याकडे विशेष लक्ष ठेवणें; (४) साधा व पौष्टिक आहार नियमीत वेळीं खाणें;—या चार बाबती चांगल्याच ध्यानांत ठेवल्या पाहिजेत.

(३०६) आनवाणी व उघडीं भटकणाऱ्या व धुळींत खेळणाऱ्या गरीबांच्या मुलांची शरीरसंपत्ति असते, असें पुष्कळ लोक म्हणतात; परंतु सूक्ष्म दृष्टीनें व वास्तविक पाहिलें, तर असें खात्रीनें हमेश दिसून येईल, कीं—जर गरीब व श्रीमंताच्या अमुक वयाच्या मुलाची सारखी संख्या घेतली तर, व गरीबांच्या मुलांची मृत्युसंख्या शंभर धरली तर, श्रीमंताची फक्त पन्नासच आढळण्यांत येते. उत्तम कपडेलत्ते व चांगलें खाणेंपिणें या कामीं, उत्तम व्यवस्था ठेवण्यांत आणि त्यांनां अव्यवस्थित उघडी पाघडी भटकूं देण्यांत इतकें मोठें अंतर उघड दिसतें.

(३०७) चार्लस लॅम्ब, हा आपल्या दर रोजच्या उद्योगासाठीं बाहेर जात असे. त्याला शाळेंत जाणारी व हुषार आनंदी अशी एक मुलगी हरहमेश भेटत असे. पुढें अकस्मात् ती त्याला दिसेनाशी झाली, व असें एकाएकीं होण्याचें कारण, शोधांतां त्याला असें कळलें कीं ती इहलोक सोडून गेली; याबद्दल त्यांनीं लिहून ठेवलें आहे, तें:—"माझे आनंदी शेजारणी ! तूं माझ्यासमोर आहेस खरी, पण काय आपण पुनः दररोजचे प्रमाणें एखाद्या सकाळीं भेटणार नाहींना ? !!!"

(३०८) जसजशी वस्ती वाढत जाते, तसतसें आडांतलें व नदीनाल्याचें पाणी बिघडत जातें व म्हणून तें स्वयंपाकाचे अगर पिण्याचे उपयोगांत आणूं नये.

(३०९) रात्रीची बाहेरील हवा कांहीं विशेष अपाय करणारी आहे असें कित्येक समजून रात्रीं बाहेर निघत नाहींत, परंतु घराचे आंतील हवा ही तरी बाहेरूनच येणारी आहे, व फरकही इतकाच, कीं ती बाहेरील हवेपेक्षां जास्त अशुद्ध असते.

[३१०] **क्षयरोग** हा बहुधा स्वाभाविक रीतीनेंच जातो. मनुष्याचे हातून क्वचितच बरा होतो.

## ग्रहविहारभुवन व ज्योतिषादर्श मंदिर.

या नांवाची संस्था आह्मीं स्थापन केली आहे व यांत सात वर्षापासून शक्य इतका ज्योतिष-पुस्तकांचा संग्रह द्रव्यबोज स्वतः उचलून केला आहे. अनुभवासाठीं येथें नामांकित स्त्रीपुरुषांच्या व संस्थेच्या कुंडल्यांची आवश्यकता आहे. व अशा कुंडल्या ज्याच्या त्याच्यावाचून मिळणें शक्य नाहीं. यासाठीं देशबांधवांनीं, राजे-रजवाडे, थोर, श्रीमान्, कुशल, कलाभिज्ञ, विद्वान्, वक्ते वगैरे, तशाच संस्था, विद्यालय, मोठमोठ्या इमारतींच्या, मिळतील तितक्या कुंडल्या संपादन करून पाठविल्यास, या मागें पडलेल्या शास्त्रास पुढें आणण्याचें मोठें श्रेय मिळणार आहे. व यापासून देशबांधवांचा आज नाहीं कधींतरी उपयोग होणार आहे. जाहलेले, सध्या आहे ते व पुढें होणाऱ्या कुंडल्या पाठवाव्या; तसेंच आह्मांला ज्योतिष पुस्तकांची आवश्यकता आहे, तरी अप्रसिद्ध ग्रंथ कोणाजवळ असल्यास कळवावें.

**भगवंत गोविंद तोडेवाले, चालक.** पैठण.

---

## फुकट ! फुकट !! फुकट !!!

आमचें 'चन्द्रकला' नांवाचें तापावरील रामबाण औषध, वाटेल त्यास विन किंमतीनें, टपालहंशीलसुद्धां न पाठवितां मिळेल. या औषधापासून रोज येणारा ताप, हिंवताप, एकांत्राड येणारा, अथवा तिसऱ्या किंवा चवथ्या दिवशीं येणारा पाळीचा ताप, क्विनाईन वगैऱ्यांच्या योगानें अडकलेला ताप, किंवा दुसऱ्या कोणत्याही प्रकारचा कसाही ताप असला तरी तो जाईल. याच्या योगानें शरीरांत उष्णता किंवा रूक्षता होणार नाहीं. या ठिकाणीं, फार प्रशंसा न करितां इतकेंच लिहितों कीं, जे नानाप्रकारचीं औषधें करून थकले असतील त्यांनीही एक वेळ या फुकटच्या औषधाचा अनुभव घेऊन पहावा. सर्व लोकांस आमच्या या औषधाचा लाभ मिळावा एवढ्याकरितांच फक्त आह्मीं हें फुकट देत आहों. एका कार्डावर आपलें नांव व पत्ता स्पष्ट लिहून कळविला असतां आपल्या पदरचा टपालखर्च करून आह्मीं औषध पाठवूं. पत्रव्यवहार खालील पत्त्यावर करावा.

काशीपुरतराई (व्हाया मुरादाबाद) जिल्हा नैनीताल. } **मुकुंदराम जोशी,** आयुर्वेदीय औषधालय.

---

# सौभाग्यावलेह.

## स्त्रिया, पुरुष व मुलें यांना सर्वकाल उपयोगी.

### सर्व रोगांवर चालतो. घेण्यास रुचिकर.

१२ तोळ्याच्या डब्यास १ रु.; ४० तोळ्याच्या डब्यास २॥ रु. प्याकिंग २ आणे टपाल सुमारें, रुपयांस ४ आणे प्रमाणें. एकंदर पैशाची मॉनऑर्डर आल्यावर पाठवूं. व्ही. पी. नाहीं.

श्रीसयाजी-औषधशाळा. मुंबई, पोस्ट गिरगांव, माधवबागेजवळ. } **शंकर दाजी शास्त्री पदे.** सम्पादक आर्यभिषक.

यंत्रियक्रकार्या 'लयांतील पुस्तकें किंवा औषधें
घेणारास

प्रख्यात चित्रकार राजा रविवर्मा
यांच्या छापखान्यांतील

# सर्व सुंदर चित्रें

दर रुपयास दोन आणेप्रमाणें सूट देऊन विकत मिळतील. पुस्तकें, औ-
षधें व चित्रें यांची यादी आणि 'आरोग्याचा मार्ग' हें पुस्तक.

## सर्वांस फुकट मिळेल.

**निरनिराळ्या**— वनस्पतींचे, शरीराचे वगैरे हुबेहुब देखावे देऊन, वैद्यकाची माहिती देण्यांत प्रख्यात आलेलें

**आयाभेषक्**— मासिकपुस्तक सन १८८९ जुलैपासून निघतें. मागील सजकूरांची पुस्तकें विक्रीस तयार आहेत याचे बरोबर—

**भारतधर्म**— नीतीचें धार्मिक विषयांचें सचित्र मासिकपुस्तक असतें. दोन्ही घेणारांस वर्षाची वर्गणी टपालसह १ रु. १० आणे. फक्त

आयभिषक् घेतल्यास १॥ रु. व भारतधर्म [illegible] १ रु. इतर पुस्तकांची यादी खाली दिली आहे. श्री० गायकवाड सरकारांच्या उदार आश्रयानें हीं [illegible]स्तकें—

### निम्मे किंमतीस देण्यांत येतात.


| | | |
|---|---|---|
| [illegible] | आ[illegible]नर्ण भा. १॥आ. | सार्थ श्रीचरकसंहिता, |
| ,, भा २ रा १ रु. | गा[illegible]क... ... २ आ. | सूत्रस्थान, पूर्वा. २ रु. |
| [illegible] ॥ रु. | प्राणिज औषधी. २ आ. | ,,सूत्र.उत्त.-भा.१ ला १॥ रु |
| भा. [illegible] १॥ रु | [illegible]गपरिज्ञान पाऊणआ | ,, ,, भा. २ रा २ रु. |
| भा. ५ वा ॥ रु. | त्रिदोषविचार, भा.१:४आ. | ,, निदानस्थान १४ आ. |
| ,, भा. ६वा [illegible] | ,, भा.२रा४आ. | ,, विमानस्थान १॥ रु. |
| [illegible] १॥ रु | ग्रंथिकसा[illegible]वात... ६ आ. | ,, इंद्रियस्थान १२ [illegible] |
| [illegible] ... ... १२ [illegible] | सा[illegible]हा[illegible]नसं.भा.१ला१ रु | ,, कल्पस्थान १४ आ. |
| [illegible] ... ... १॥ रु | [illegible]र्थयोगशतक .. ४ आ. | ,, सिद्धिस्थान १॥ रु. |
| [illegible] १॥ रु. | सार्थ वैद्यक्रम .. ४ आ. | ,,चिकित्सा भा १ला.१॥ रु |
| [illegible] १ रु. | [illegible] ... १॥ रु. | ,,चिकित्सा भा २ रा २ रु. |
| [illegible] | नाडीपरीक्षेचे हस्त ३ आ. | नपुंसकमीमांसा का[illegible]॥ रु. |
| [illegible] | औ[illegible]चा... ... २ रु. | निघंटशिरोमणि. २। रु. |
| [illegible] १ [illegible] | सार्थ ज्वरपराजय २ रु. | आयुर्वेदरहस्य भा१ला१ रु. |

[illegible] ⎫ **शंकर दाजी शास्त्री पदे.**

[illegible] ⎭ (आयुर्वेदोपाध्याय.)

[illegible]

वार्षिक मूल्य डाकसमेत २॥ रु. भारतवर्षं ६ आणे.



वर्ष १५. 

# आर्यभिषक्

अंक २.



सम्पादक वै. शंकर दाजी शास्त्री पदे.

आयुर्वेदमहोपाध्याय.

मुंबई, पोस्ट गिरगांव, श्रीसयाजी औषधशाला.

हिताहित सुखं दुःखमायुस्तस्य हिताहितम् ।
म. । च त. । यत्रोक्तमायुर्वेदः स उच्यते ॥—श्रीचर[illegible]

[illegible] प्रकाशित शके १[illegible] [illegible] ८ [illegible]वार ता. १ [illegible]

**विषयानुक्रम**.—सार्थ चरकसंहिता शारीरस्थान. पृष्ठें १–८ वनौषधि गुणादर्श भाग ७ वा, पृष्ठें २१–२८ (सचित्र.) दीर्घायु कसें व्हावें? ४१–४८

## नवीन वर्गणीदार होणारांस सूचना.

वनस्पतींचे देखावे ११ व्या अंकापासून येत आहेत. ज्यांना १५ व्या वर्षारंभापासून वर्गणीदार होणें असेल व देखाव्यांसाठीं १४ व्या वर्षाचे अंक ११।१२ पाहिजे असतील, त्यांस ते फक्त ६ आणे घेऊन देण्यांत येतील. वास्तविक रीत म्हटली म्हणजे फुटकळ प्रत्येक अंकाची किंमत ४ आणे. टपालखर्च शिवाय.

---

## वर्गणीदारांस अगत्याची सूचना.

(१) येत्या अंकापासून तीन चार रंगांचीं चित्रेंही दिलीं जातील.

(२) मागील अंकीं आश्वासन दिल्याप्रमाणें सार्थ श्रीचरकसंहितेचें शारीरस्थान या अंकापासून सुरू केलें आहे. आमच्या बऱ्याच ग्राहकांनीं गेल्या कांहीं अंकांत चरकसंहिता न आल्यामुळें खेद प्रदर्शक पत्रें पाठविलीं होतीं. त्यांच्या सन्तोषार्थ पुन्हां हा ग्रंथ मासिक-पुस्तकांतून सुरू केला आहे. आम्ही आशा करितों कीं ग्राहकगणांहि सन्तुष्ट होऊन आर्यभिषकाच्या प्रचुर प्रसाराच्या कामीं यथाशक्ति प्रयत्न करतील.

चरकसंहितेच्या 'चिकित्सास्थानाचा दुसरा भाग स्वतंत्र पुस्तक-रूपानें छापून लवकरच विक्रीस तयार होईल

'दीर्घायु कसें व्हावें?' या पुस्तकाचीं पहिलीं ३२ पृष्ठें, मागच्या वर्षांत आलीं आहेत' नवीन वर्गणीदारांना तीं पाहिजे असल्यास ४ आणे किंमतीस मिळतील. टपालखर्चाशिवाय.

---

**वनौषधि–गुणादर्श.** याचे सहा भाग विक्रीस तयार आहेत. त्याची किंमत ६॥ रु. आहे. परंतु आर्यभिषक्‌च्या वर्गणीदारांस ते ३॥ रुपयांस मिळतील. टपाल निराळें.

श्रीशंकर.

# सार्थ श्रीचरकसंहिता.

## शारीरस्थानम्.

### प्रथमोऽध्यायः

अथातः कतिधापुरुषीयं शारीरं व्याख्यास्यामः ।
इति हस्माह भगवानात्रेयः ॥ १ ॥

आतां आपण कतिधापुरुषीयशारीर नांवाच्या अध्यायाची व्याख्या करूं. आत्रेय ऋषि असेंच सांगते झाले.

कतिधा पुरुषो धीमन् धातुभेदेन भिद्यते ।
पुरुषः कारणं कस्मात्प्रभवः पुरुषस्य कः ॥ २ ॥
किमज्ञोऽज्ञः स नित्यः किं किमनित्यो निदर्शितः ।
प्रकृतिः का विकाराः के किं लिङ्गं पुरुषस्य च ॥ ३ ॥
निष्क्रियञ्च स्वतन्त्रञ्च वशिनं सर्वगं विभुम् ।
वदन्त्यात्मानमात्मज्ञाः क्षेत्रज्ञं साक्षिणं तथा ॥ ४ ॥
निष्क्रियस्य क्रिया तस्य भगवन्विद्यते कथम् ।
स्वतन्त्रश्चेदनिष्टासु कथं योनिषु जायते ॥ ५ ॥
वशी यद्यसुखैः कस्माद्भावैराक्रम्यते बलात् ।
सर्वाः सर्वगतत्वाच्च वेदनाः किं न वेत्ति सः ॥ ६ ॥
न पश्यति विभुः कस्माच्छैलकुड्यतिरस्कृतः ।
क्षेत्रज्ञः क्षेत्रमथवा किं पूर्वमिति संशयः ॥ ७ ॥
ज्ञेयं क्षेत्रं विना पूर्वं क्षेत्रज्ञो हि न युज्यते ।
क्षेत्रञ्च यदि पूर्वं स्यात्क्षेत्रज्ञः स्यादशाश्वतः ॥ ८ ॥

साक्षिभूतश्च कस्यायं कर्ता ह्यन्यो न विद्यते ।
स्यात्कथश्चाविकारस्य विशेषो वेदनाकृतः ॥ ९ ॥

हे बुद्धिमन्, धातुभेदेंकरून पुरुषांचे किती भेद आहेत ? पुरुषास कारण कां ह्मणतात ? पुरुषास उत्पन्न करणारा कोण आहे ? पुरुष अज्ञानी आहे किंवा ज्ञानी ? तो नित्य आहे किंवा अनित्य ? प्रकृति ह्मणजे काय ? विकार कोणकोणते आहेत ? पुरुषाचें चिन्ह कोणतें ? आत्मज्ञानी मनुष्य पुरुष निष्क्रिय, स्वतन्त्र, वशी, सर्वव्यापी, विभु, ( सर्वांशीं मिळालेला ) क्षेत्रज्ञ व सर्वसाक्षी आहे असें वर्णन करितात. तर हे भगवन् ! निष्क्रिय ह्मणजे क्रिया-शून्य पुरुष क्रिया कशी करतो ? जर तो स्वतंत्र आहे तर त्याचा जन्म, वाईट—त्यास न आवडणाऱ्या अशा योनींत, कां होतो ? जर तो वशी आहे अर्थात् कोणाचा ताबा त्याच्यावर नाहीं तर दुःखकारक गोष्टी त्याच्यावर बळेंच कसें आक्रमण करूं शकतात ? जर तो सर्वग ह्मणजे सर्वव्यापी आहे तर जगतांतील एकंदर वेदना त्यास कां समजत नाहींत ? जर तो विभु ह्मणजे विश्वव्यापी व महान् आहे तर पर्वत किंवा भिंतीच्या पलीकडील पदार्थही त्यास कां दिसत नाहींत ! पुरुषास क्षेत्रज्ञ असें जें विशेषण दिलें आहे त्यावरून अशी शंका उत्पन्न होते कीं क्षेत्र पूर्वीं किंवा क्षेत्रज्ञ पूर्वीं ! क्षेत्र जर ज्ञेय ह्मणजे जाणावयाची वस्तु आहे तर तिच्या पूर्वीं क्षेत्रज्ञ अर्थात्

---

१ पुरुष शब्दाचा सर्वसामान्य अर्थ मनुष्य असा करितां येईल. याचा वाच्यार्थ ' पुर ' ह्मणजे शरीराचा सांगाडा (फ्रेम) यांत राहणारा जो आत्मा तो—असा आहे. दर्शनशास्त्रांत पुरुषशब्द याच अर्थी योजला जातो. शरीराच्या अवयव समूहाचें नांव पुरुष नव्हे तर या अवयवांचा जो मालक—चालक, त्यांच्या आंत राहणारा जो अव्यक्त पदार्थ, तो पुरुष होय. अग्निवेशांनीं वरील प्रश्नांत पुरुष शब्दाचा उपयोग कांहीं स्थळीं सामान्य अर्थी व कांहीं जागीं सदरहू विशेष अर्थी केला आहे.

२ सांख्य शास्त्रांत, ज्या एका मूळतत्वापासून एकंदर सृष्टीची उत्पत्ति झाली त्यास प्रकृति ह्मणतात.

३ विकार ह्मणजे बदल, रूपांतर. जगांतील प्रत्येक वस्तु पुरुषसंयोगानें झालेला प्रकृतीचा विकार ( बदल ) आहे.

क्षेत्र जाणणारा असूं शकत नाहीं. अर्थात् असें असणें समंजस नाहीं. कारण जें जाणावयाचें तें अगोदर उपस्थित असेल तरच पुढें जाणणाराची आवश्यकता पडते. बरें, जर क्षेत्र पूर्वी असें मानावें तर क्षेत्रज्ञ जो आत्मा तो अनित्य ठरतो. तसेंच जर पुरुषाशिवाय दुसरा कोणीच कर्ता नाहीं तर तो ( पुरुष ) साक्षि कशाचा व कोणाचा; आणि निर्विकार पुरुषाच्या स्थितींत वेदनांमुळें विकार अर्थात् फरक कां होतो ?

**अथ कर्तास्य भगवँस्तिसृणां काञ्चिकित्सति ।**
**अतीतां वेदनां वैद्यो वर्तमानां भविष्यतीम् ॥ १० ॥**
**भविष्यन्त्या असम्प्राप्तिरतीताया अनागमः ।**
**साम्प्रतिक्या अपि स्थानं नास्त्यार्तेः संशयो ह्यतः ॥ ११ ॥**
**कारणं वेदनानां किं किमधिष्ठानमुच्यते ।**
**क्वचैता वेदनाः सर्वा निवृत्तिं यान्त्यशेषतः ॥ १२ ॥**
**सर्ववित्सर्वविन्यासी सर्वसंयोगनिस्सृतः ।**
**एकः प्रशान्तो भूतात्मा कैर्लिङ्गैरुपलभ्यते ॥ १३ ॥**
**इत्यग्निवेशस्य वचः श्रुत्वा मतिमतां वरः ।**
**सर्वं यथावत्प्रोवाच प्रशान्तात्मा पुनर्वसुः ॥ १४ ॥**

हे भगवन्, रोग्याच्या भूत, भविष्यत् व वर्तमान अशा तीन प्रकारच्या वेदनांपैकीं वैद्य कोणत्या वेदनांची चिकित्सा करतो? हें विचारण्याचें कारण असें आहे कीं, भविष्यत् ह्मणजे पुढें होणाऱ्या वेदनांची सध्यां प्राप्तिच नसते; अतीत ह्मणजे पूर्वी होऊन गेलेल्या वेदना पुन्हां परत येत नाहींत, व वर्तमानकाळच्या वेदना कायम नसतात; तर अशा स्थितींत वैद्य चिकित्सा कशाची करतो ? वेदनांचें कारण काय? त्यांचें अधिष्ठान कोणतें ? या सर्व वेदना कोणत्या ठिकाणीं, कोणत्या स्थितींत, समूळ नाहींशा होतात ? जो सर्वज्ञ, सर्वार्थत्यागी, सर्व गोष्टीहून वेगळा, शान्त, आणि एकाकी असा जो भूतात्मा अर्थात् प्रत्येकाचे हृदयांत राहणारा आत्मा त्याचें ज्ञान कोणत्या लक्षणांनीं होतें—तो कसा जाणला जातो ?

अग्निवेशाचे हे सर्व प्रश्न ऐकून घेऊन, महाबुद्धिवान् असे जे आत्रेय महर्षि त्यांनीं शांतवृत्तीनें त्यांचें यथावत् उत्तर दिलें.

खादयश्चेतना षष्ठा धातवः पुरुषः स्मृतः ।
चेतना धातुरप्येकः स्मृतः पुरुषसंज्ञकः ॥ १५ ॥
पुनश्च धातुभेदेन चतुर्विंशतिकः स्मृतः ।
मनो दशेन्द्रियाण्यर्थाः प्रकृतिश्चाष्टधातुकी ॥ १६ ॥

पृथ्वी, जल, अग्नि, वायु व आकाश हीं पंचमहाभूतें व सहावी चेतना या सहा धातूंच्या एक समुदायास पुरुष ह्मणतात. कित्येक केवल एका चेतनाधातूसच पुरुष मानतात. धातुभेदेंकरून पुरुष चोवीस तत्वांच्या समुदायापासून बनलेला आहे असें मानलें जातें. तीं तत्वें किंवा ते धातु येणेंप्रमाणें. १ मन १० कर्म व ज्ञानेन्द्रियें ( कान, त्वचा, डोळे, जीभ, नाक, वाणी, हात पाय, गुह्येन्द्रिय व गुद ) ५ ज्ञानेन्द्रियांचे शब्दस्पर्शादि विषय आणि ८ आठ प्रकृति ( मूलप्रकृति, महत्तत्व, अहङ्कार व पञ्चतन्मात्रा ह्मणजे शब्दतन्मात्रा, स्पर्शतन्मात्रा, रूपतन्मात्रा, रसतन्मात्रा आणि गंधतन्मात्रा ) हीं सर्व एकत्र केलीं असतां पुरुष चोवीस तत्वांचा बनलेला पुतळा आहे हें सिद्ध होतें.

लक्षणं मनसो ज्ञानस्याभावो भाव एव वा ।
सति ह्यात्मेन्द्रियार्थानां सन्निकर्षेण वर्तते ॥ १७ ॥
वैवृत्त्यान्मनसो ज्ञानं सान्निध्यात्तच्च वर्तते ।
अणुत्वमथ चैकत्वं द्वौ गुणौ मनसः स्मृतौ ॥ १८ ॥
चिन्त्यं विचार्यमूह्यञ्च ध्येयं सङ्कल्प्यमेव च ।
यत्किंचिन्मनसो ज्ञेयं तत्सर्वं ह्यर्थसंज्ञकम् ॥ १९ ॥
इन्द्रियाभिग्रहः कर्म मनसः स्वस्य निग्रहः ।
ऊहो विचारश्च यतः परं बुद्धिः प्रवर्तते ॥ २० ॥

ज्ञान होणें[1] किंवा न होणें हे मनाचे धर्म आहेत. आत्मा, इन्द्रियें व

१ मनाच्या संबंधानें दोन प्रकारचीं लक्षणें सांगितलीं आहेत. एक ज्ञान होणें व दुसरें, तें न होणें. हीं दोन लक्षणें परस्पर विरुद्ध दिसतात, परंतु तत्वतः तीं तशीं

त्यांचे शब्दस्पर्शादि विषय या। सर्वांचा सहवास होऊन त्यांच्याशीं मनाचेंही सान्निध्य झालें तरच ज्ञान होतें व तें न झालें तर होत नाहीं. अणुत्व ह्मणजे सूक्ष्मता व एकत्व हे दोन मनाचे गुण आहेत. चिन्तनीय, विचारणीय,

---

नाहींत. आत्मा इंद्रियें व पदार्थ हीं एकत्र झाल्यानें कोणत्याही पदार्थाचें ज्ञान होतें. आत्मादिकांचा जो संबंध तो संयोगसंबंध नव्हे तो केवळ सान्निकर्ष ह्मणजे सान्निध्य निकटपणा होय. आत्मा, इंद्रियें व पदार्थ या तिहींचें सान्निध्य आहे. परंतु त्या ठिकाणीं जर मन अर्थात् लक्ष्य नसेल तर ज्ञान उत्पन्न होणार नाहीं. उदाहरणार्थ. आत्मा, डोळ, पहावयाचा एखादा पदार्थ व मन हीं सान्निध्यांत आहेत. यांपासून दृश्य पदार्थांचें ज्ञान झालें. ज्या वेळीं हें दृश्य ज्ञान झालें त्यावेळीं कान, नाक वगैरे इंद्रियांच्या शब्द-गंध वगैरे विषयांचें ज्ञान मनांत नव्हतें. परंतु मन डोळ्यांचें सान्निध्य सोडून कानाशीं मिळालें तेव्हां शाब्दिक ज्ञान होऊं लागलें. सारांश एक प्रकारच्या ज्ञानाच्या भावकालीं वेळीं दुसऱ्या प्रकारच्या ज्ञानाचा अभाव असतो. ह्मणून ज्ञानाचा भाव व अभाव हीं दोन्हीं लक्षणें मनाचीं सांगितलीं. नुस्तें भावात्मक लक्षण सांगितलें असतें तर एक प्रकारच्या ज्ञानाच्या भावकाळीं दुसऱ्या प्रकारच्या ज्ञानाचा अभाव असतो ह्मणून त्या दुसऱ्या प्रकारच्या ज्ञानासंबंधानें मनाचाच अभाव ठरवावा लागेल ह्मणून असें लक्षण केलें.

( २ ) कांहीं लोक इंग्रजींत मनाचें भाषांतर mind असें करितात. परंतु तें बरोबर नाहीं मनांम बुद्धीचा समावेश होत नाहीं, बुद्धीसह मन mind होऊं शकेल. इंग्रजी दर्शनशास्त्रज्ञ क्यांट यानें मानसिक क्रियांचे जे विभाग केले आहेत त्यांपैकीं तर्कशक्ति किंवा तुलना करून पाहण्याची शक्ति खेरीज करून बाकी सर्व विचार शक्तीचा समावेश ‘ मनांत ’ होतो. त्याशिवाय सुख– दुःखानुभव व इच्छा यांचाही मनांतच अन्तर्भाव होतो. असें जें मन तें सूक्ष्म आहे. स्थूल असतें तर सर्व इंद्रियांशीं त्याचा एककालावच्छेदेन संबंध होऊन सर्वदा सर्व विषयांचें ज्ञान झालें असतें. परंतु तसें होत नाहीं. मनाचा भिन्न भिन्न इंद्रियांशीं एकदम संबंध घडत नाहीं. नैयायिकांचें मत असें आहे कीं वस्तुतः कोणत्याही दोन क्रिया एककालीन होत नाहींत. ज्या क्रिया एककालीन दिसतात त्या क्रमशःच होत असतात. परंतु तो क्रम इतका जलद असतो कीं आपणांस कदापि उमजत नाहीं. एखादी कोलती पेटवून ती भराभर फिरवूं लागलें असतां, जणूं काय प्रकाशाचें एक वर्तुलच आहे असा भास होतो. परंतु वास्तविक तें वर्तुळ स्थायी नसतें. त्याचप्रमाणें एका-कालीन दिसणाऱ्या क्रियांची दशा समजावी. हें नैयायिकांचें मत आहे. कित्येकांचें मत याच्या उलट आहे व त्याच्या पुष्ट्यर्थ ते भाकरीचा दृष्टान्त देतात. एक मोठें

तर्क्य, ध्येय, संकल्प्य व ज्ञेय ह्मणजे स्मरण करण्याजोगे, विचार करण्याजोगे, कल्पना करण्याजोगे, ध्यान करण्याजोगे, संकल्प करण्याजोगे व जाणण्याजोगे जितके पदार्थ आहेत ते सर्व मनाचे विषय होत. इंद्रियांच्या द्वारा पदार्थांचें ग्रहण करणें, त्यांस ताब्यांत ठेवणें, तर्क व विचार करणें हीं मनाचीं कर्मे आहेत. यानंतर पुढें बुद्धीची प्रवृत्ति होते.

इन्द्रियेणेन्द्रियार्थो हि समनस्केन गृह्यते ।
कल्प्यते मनसाऽप्यूर्द्ध्वं गुणतो दोषतो यथा ॥ २१ ॥
जायते विषये तत्र या बुद्धिर्निश्चयात्मिका ।
व्यवस्यति तया वक्तुं कर्तुं वा बुद्धिपूर्वकम् ॥ २२ ॥

इन्द्रियें मनाच्या संयोगांत आपापले विषय ग्रहण करतात. नंतर मन त्या त्या विषयांसंबंधानें गुणदोष कल्पना करूं लागतें. बुद्धि त्याविषयांत प्रविष्ट होऊन बऱ्यावाइटाचा निकाल लावतें व तदनुसार मन सर्व कांहीं बोलतें व करितें.

एकैकाधिकयुक्तानि खादीनामिन्द्रियाणि तु ।
पञ्चकर्मानुमेयानि येभ्यो बुद्धिः प्रवर्तते ॥ २३ ॥

---

भाकरी आहे ती हातांत घेतली अर्थात् शब्दज्ञान झालें, डोळ्यांनीं पाहिलें ह्मणजे दृश्यज्ञान झालें. भाकरी दांतांनीं तोडून खातांना होणारा आवाज कानांनीं ऐकूं येतो. व खात असतांना वास व रुचि कळत असतेंच. या सर्व क्रिया एकाकाळीं होत असतात. यावर पुन्हां नैयायिक दुसरें उदाहरण देतात, कीं एक शंभर पाकळ्यांचें कमळ आहे, त्या सर्व पाकळ्यांतून जोरानें घसकन् सुई खुपसली तर ती एकदम सर्व पाकळ्यांतून पार गेली असें दिसतें. परंतु वास्तविक ती क्रमानेंच पार होते. मात्र दिसत नाहीं. मनाचें एकत्व अशा अर्थानें सांगितलें आहे कीं निरनिराळ्या वेळीं वास घेणारें, पाहणारें, ऐकणारें मन तेंच असतें. तेंच मन इंद्रियांशीं निरनिराळ्या-वेळीं मिळतें.

( २ ) मनाचा इंद्रियांशीं संबंध झाल्यावांचून ज्ञान होत नाहीं हें ठरलेंच आहे. कोणत्याही गोष्टीचें ज्ञान मनास झालें ह्मणजे मग तें त्यासंबंधांत विचार करूं लागतें. परंतु निश्चय करणें हा धर्म मनाचा नाहीं. मनास शंका होते कीं " अमुक एक गोष्ट अशी आहे किंवा कशी, असें करावें कीं नाहीं " इत्यादि. अशा वेळीं सद्-सद्विवेक करणारी बुद्धि " ही गोष्ट अशी आहे असें व असें करावें " असा निकाल लावते. ह्मणून बुद्धीस निश्चयात्मिका हें विशेषण लावलें आहे. बुद्धी जो निश्चय लावते त्याप्रमाणें मन काम करितें.

आकाश, वायु, अग्नि, जल व पृथ्वी हीं पंचमहाभूतें आहेत आणि कान, त्वचा, नेत्र, जीभ व नाक हीं त्यांचें ग्रहण करणारीं पांच इन्द्रियें आहेत. हीं पांच इंद्रियें क्रमानें एका एका अधिक महाभूताचें ग्रहण करितात. याचा स्पष्टार्थ असा आहे, कीं कानाचा संयोग फक्त आकाशाशीं आहे. कारण आकाशाचा धर्म शब्द आहे व कान शब्दाशिवाय इतर कोणत्याही पदार्थाचें ग्रहण करूं शकत नाहीं. त्वचेचा आकाश व वायुशीं; डोळ्याचा आकाश, वायु, व अग्निशीं; जिभेचा आकाश, वायु, अग्नि व जल यांच्याशीं; आणि नाकाचा सर्व महाभूतांशीं संयोग होतो. उक्त इन्द्रियांचें अस्तित्व त्यांच्या त्यांच्या श्रवणादि कर्मांवरून जाणलें जातें आणि या इंद्रियांपासून बुद्धीची प्रवृत्ति होते.

**हस्तपादगुदोपस्थं जिह्वेन्द्रियमथापि वा ।**
**कर्मेन्द्रियाणि पञ्चैव पादौ गमनकर्मणि ॥ २४ ॥**
**पायूपस्थौ विसर्गार्थौ हस्तौ ग्रहणधारणे ।**
**जिव्हा वागिन्द्रियं वाक्च सत्या ज्योतिस्तमोवृता ॥ २५ ॥**

हात, पाय, गुद, शिश्न व जीभ हीं पांच कर्मेन्द्रियें आहेत. पाय चालण्याकरितां आहेत. गुद व शिश्न हीं मलमूत्रादि त्यागण्याकरितां आहेत. हात पदार्थ घेण्याकरितां व धरण्याकरितां आहेत आणि जीभ बोलण्याकरितां आहे. बोलण्यांत सत्य भाषण ज्योतिःस्वरूप आहे व असत्य तामस आहे.

**महाभूतानि खं वायुरग्निरापः क्षितिस्तथा ।**
**शब्दः स्पर्शश्च रूपञ्च रसो गन्धश्च तद्गुणाः ॥ २६ ॥**
**तेषामेको गुणः पूर्वे गुणवृद्धिः परे परे ।**
**पूर्वः पूर्वो गुणश्चैव क्रमशो गुणिषु स्मृतः ॥ २७ ॥**

आकाश, वायु, अग्नि, पाणी व पृथ्वी हीं पंचमहाभूतें आहेत. आणि शब्द, स्पर्श, रूप, रस व गन्ध हे त्यांचे क्रमशः गुण आहेत. पहिल्या महाभूतांत एक गुण आहे व उत्तरोत्तर प्रत्येकांत एक एक गुण अधिक झाला

आहे. ह्मणजे पुढील महाभूत मागील भूतांचा गुण घेऊन आपला क्रमशः येणारा गुणही घेतें. जसें आकाशांत केवळ शब्द, वायूंत शब्द-स्पर्श, अग्नींत शब्दस्पर्शरूप इत्यादि. परंतु प्रत्येक भूतांत एक एक गुण मुख्य आहे. जसें आकाशांत शब्दगुण प्रधान आहे, वायूंत स्पर्शगुण प्रधान आहे. याचप्रमाणें सर्वांचें जाणावें.

**खरद्रवचलोष्णत्वं भूजलानिलतैजसाम् ।**
**आकाशस्याप्रतीघातो दृष्टं लिङ्गं यथाक्रमम् ॥ २८ ॥**
**लक्षणं सर्वमेवैतत्स्पर्शनेन्द्रियगोचरः ।**
**स्पर्शनेन्द्रियविज्ञेयः स्पर्शो हि सविपर्ययः ॥ २९ ॥**


खरखरीतपणा, पातळपणा, चलायमानता—गतिमत्ता, आणि उष्णता हे अनुक्रमें पृथिवी, जल, वायु व अग्नि यांचे धर्म आहेत. आकाशाचा धर्म अप्रतिघात ह्मणजे आघात केला असतां,—फटका मारला असतां त्यास प्रतिबंध करण्याची—उलट आघात करण्याची शक्ति नसणें हा आहे. (Non-resistibility) कोणत्या द्रव्यांत कोणतीं महाभूतें आहेत हें त्याच्या वरील लक्षणांवरून जाणलें जातें. उदाहरणार्थ—ज्या द्रव्यांत खडदडीतपणा आहे तें पार्थिव द्रव्य समजावें. हीं सर्व लक्षणें स्पर्शनेन्द्रिय जी त्वचा तिच्या द्वारें जाणलीं जातात. त्वचेच्या योगानें फक्त स्पर्शच जाणला जातो असें नाहीं; तर स्पर्शाचा अभावही त्वचेनें जाणला जातो.[1]

---

१ तत्वतः सर्व इंद्रियांचा एका स्पर्शनेन्द्रियांतच अन्तर्भाव होतो. कानांनीं ऐकणें हा तरी स्पर्शच आहे. ज्या वेळीं बाहेरच्या आवाजाचा कानांतील मज्जतंतूंस स्पर्श होतो त्याचवेळीं ऐकूं येतें. तसेंच डोळ्यांचें आहे. पहावयाच्या पदार्थांच्या योगानें प्रतिबिंबित झालेल्या प्रकाशकिरणांचा नेत्रांतरपटल व आंतील मज्जातंतूंस ज्या वेळीं स्पर्श होतो, त्या वेळीं त्या पदार्थांचें दर्शन होतें. अशाच तऱ्हेनें जीभही स्पर्शच आहे. जिव्हास्थ मज्जातंतूंस पदार्थांचा स्पर्श झाल्यानेंच रसज्ञान होतें. त्याचप्रमाणें पदार्थांचा वास घ्राणेन्द्रियाच्या मज्जातंतूंस स्पर्श करितो त्यावेळीं गंधज्ञान होतें. वरील श्लोकांत आचार्यांनीं



सं. पाठा. म. पहाडवेल.




सं. अपामार्ग. म. अघाडा.

धेव नरगी प्रेस.

तो हवेनें सुकतो. ही कृति जितक्या कोरफडीच्या जाति आहेत त्या सर्वांस लागू आहे. पश्चिम हिंदी महासागरांतील बेटांत व काठेवाडाच्या पश्चिम किनाऱ्यावर हबशी राजाचें जाफराबाद संस्थान आहे त्यांत ही पिंवळ्या फुलांची कोरफड उत्पन्न होते. झिंजुवाडा, पात्री, व वढवाणच्या माळ जमिनीवरही ही पाहण्यांत आली आहे. त्या प्रांतांतल्या कोरफडीस पहिला युरोपियन उद्भिज्जशास्त्रज्ञ मिलर यानें aloes Barbadensis ॲलोज बारबाडेन्सिस हेंच नांव दिलें आहे. इचीं पानें १½ पासून २½ फूट लांबीचीं असून दलदार राहतात. त्यांची जाडी ⅓ पासून ½ इंच असते. ( २ ) **जाफराबादी** ( aloes littorale ) कोरफडीचीं पानें तलवारीच्या आकाराचीं हिरव्या रंगाचीं असून त्यांवर पांढरे ठिपके असतात. फुलांचा बाह्यकोश पिंवळ्या रंगाचा १४–१६ इंच लांबीच्या पुष्पदंडावर असतो. त्यांपैकीं खालचीं फुलें नारंगी रंगाचीं, मधलीं फिक्या रंगाचीं, व शेंड्याकडील हिरवीं असतात. त्यांजमधील परागकोश लाल जरदरंगाचा असतो. फुलांचा दंड मार्गशीर्षांत येतो व पौषाच्या अखेरीस झडून जातो. ( ३ ) **हबशी** कोरफड ( aloes vulgaris ) ही जात खंबायतेंत व काठेवाडाच्या किनाऱ्यावर आपोआप उगवलेली आढळते. इचा बुंधा टणक असून १–२ फूट उंचीचा व २–३ इंच व्यासाचा राहतो. पानें दुसऱ्या जातीच्या कोरफडीसारखीं खड्गाकार असून १½ पासून २½ फूट लांबीचीं पसरट असतात. तीं टोंकाकडे निमुळतीं हिरव्या रंगाचीं असून त्यांच्या पाठीवर सफेद रंगाचे ठिपके असतात. पुष्पदंड बराच लांब असून उपपत्रें अरुंद भाल्यासारखीं असतात. फुलें पिंवळीं असून बुडाशीं हिरवीं असतात त्यांची अन्तर्वेटिका आंखूड गळ्याची असून तिचे दांते लांब असतात व नरकेसर बरेच वटिकेच्या बाहेर आलेले असतात.

मोक्याकडील जो बोळ मुंबईस येतो व इकडून यूरोपाकडे निर्गत होतो. त्यांतील बराच भाग हबशी कोरफडीच्या रसाचा होतो; व खरा यमानी Aloes perryii जातीपासून तयार केला जातो.

**एळिया अथवा काळयाबोळाची रचना व त्याचें बाह्यस्वरूप**—दोन प्रकारचा एळया दुकानांतून सांपडतो. हा कोरफडीचा सुकविलेला अंगरस अथवा तिचीं पानें उकळून तयार केलेल्या काढ्याचा निष्कर्ष होय. त्यांपैकीं सोकोट्रीन बोळ उत्तम मानला गेला आहे. तो वरून कठिण व काळसर रंगाचा असतो. फोडला असतां छेदाकडील अंग गुळगुळीत असून राळेसारखा चकाकतो; सुगंधि असून रुचीनें फार कडू असतो. हा जंगबाराकडून मुंबईस येऊन विलायतेस रवाना होतो. ( २ ) जाफराबादी एळया जाफराबाद संस्थानांत तयार होतो. त्याच्या मोठ्या गोल आकाराच्या व वरखालीं चापट वड्या असतात. याचा खप हिंदुस्थानांत होतो. अशाच प्रकारचा एळया बार्बाडोस, क्युरेशो, इ. पश्चिम हिंदीमहासागरांतील बेटांतून सौथम्पटन्कडे जातो. तो रंगानें फार लाल अथवा काळा असून फोडला असतां गुळगुळीत बुकणीदार असतो. त्याची बुकी केली असतां पिंवळट रंगाची दिसते. तीस उग्र आंबुस वास येतो, व ती रुचीनें कांहीं कमी कडू लागते. दोन्ही जाती दारूच्या मंदार्कांत विरघळतात. थंड पाण्यांत तो थोडासा विरघळतो. दारूंत भिजवून सूक्ष्मदर्शकाच्या मदतीनें त्याचा पातळ थर पहिला असतां त्याचे लांब सूच्याकार स्फटिक नजरेस पडतात. औषधी उपयोगासाठीं एळया पसंत करावयाचा तो पुन्हां पाण्यांत शिजवून त्यांतील गाळ काढून तो पुन्हां दाट करावा लागतो. अशारीतीनें तयार केलेल्या निष्कर्षाचा उपयोग इंग्लिश रसायनज्ञ व औषधि विकणारे करितात. ते त्याचा कस पहाण्याकरितां नेहमीं तपासणी करितात.

**कोरफडीचे ( एळ्याचे ) रासायनिक धर्म**—सोकोट्रीनकडील एळयांत कडू सत्व, गोंद, वनस्पतींत असणारें अलबुमेन, व नांव न ठरलेलें एक अम्ल व थोडें सुगंधी तेल अशीं राहतात. या तेलाचा कढण्याचा बिन्दू फ्लुकिगर साहेबानें २७० सेंटिग्रेड उष्णमापकाच्या अंशावर असतो असें ठरविलें आहे. त्याचें विशिष्टगुरुत्व ०८६३ असतें. एळया थंड पाण्यांत विरघळत नाहीं. परंतु पाणी ऊन्ह केलें ह्मणजे बराच विरघळतो. त्याचा द्राव कांहीं

वेळ राहू दिला ह्मणजे त्याच्या तळाशीं राळेसारखा सांका बसतो. त्याच्यावरचें पाणी अम्लधर्मी (Acid in Chemical reaction) असतें. त्याचा क्षारोदकानें गहिरा तांबूस रंग होतो. ब्रोमीनयुक्त पाणी मिश्र केलें तर बराच जर्द पिवळा सांका पडतो. (ह्याच अलोईनचा सांका) दारूच्या मंदार्कांत (Proof spirit) एळ्या विरघळल्यानंतर जो सांका बुडाशीं राहतो तो चौपदरी मलमलीच्या घडींतून दाबून काढल्यावर जें द्रव्य राहतें त्यासच ' इंग्रजींत अलोइन् ' ह्मणतात. हें स्फटिकरूपी आहे. व पाण्यांत विरघळतें. हेंच प्रकृत वनस्पतींतील कार्यकारीसत्व ठरलें आहे.

काळ्या बोळांत कोरफडीच्या जातीच्या मानानें जें सत्व आढळतें त्यास इंग्रजी रसायनज्ञांनीं Nataloine व Barbaloine (नॅटेलाइन् व बार्बेलाइन्,) अशीं नांवें दिलीं आहेत. हीं नांवें, ज्या रसायनज्ञांनीं (फ्लुकिगर व शेनस्टोन) ' अलोइन ' सत्व शोधून काढलें त्यांनींच प्रत्येक बोळाच्या जातींतून सत्व काढून त्यांची अंतिम रचना ठरविली. त्यांत प्रत्येक तत्वाचें प्रमाण कमी जास्त सांपडलें. एकंदरींत स्टेनहौस् साहेबानें (सन १८५७ सालीं) बार्बडोस बोळाची तत्वरचना $C_{17} H_{18} O_7$ अशी ठरविली आहे व तीच त्यांच्या नंतरच्या परीक्षकानीं ही कबूल केली. सोकोट्राकडील बोळ, बार्बडोस बोळ व नेटालकडील बोळ या तिन्ही जातींत थोडा फरक आढळतो. तो फरक प्रत्येकांत अलोइनसत्वाचें (राळेसारखें दिसणाऱ्या) गोंदाचें व पाण्याचें प्रमाण कमी जास्त असते यामुळें असतो. यांपैकीं ' अलोइन् अजमासें शेंकडा २८ टक्के सांपडतें. हें शुद्ध अलोइनच फक्त रेचक आहे. तें फार अल्पप्रमाणानें ($\frac{१}{२}$ पासून २ ग्रेनपर्यंत कोणत्याही अनुपानाशीं (वाहकाबरोबर) दिलें असतां पोटांत मुरडा न होतां रेचक कार्य होतें.

**कोरफडीच्या रसाचे औषधि उपयोग**--फार दिवसांपासून कोरफडीचा बलक साखरेंत मिश्र करून तापाचा दाह कमी करण्याकरितां ताप कऱ्यांस देण्याची प्रथा आहे. कोरफडीचा ताजा रस रेचक व योनिदाह (गर्भाशयाचें शैथिल्य) कमी करणारा आहे. डोळे आले असतां (पित्ताभिष्यन्द-

विकारांत ज्यास इंग्रजींत Catarrhal Conjunctivitis) ह्मणतात तुरटीची लाही कोरफडीच्या रसांत मिळवून त्याचा पापणीवर लेप केला असतां डोळ्याच्या अन्तस्त्वचेची खरव कमी पडून रक्त फांकून जातें. ह्मैसूर प्रांतांत स्त्रियांनां विटाळ सुटत नसला ह्मणजे कित्येक दिवसपर्यंत कोरफडीचा रस देतात. गार्सिआ डि ओर्टा Garcia de orta हे गृहस्थ इ. सन १५३४ त गोंव्याच्या गव्हर्नराचे डॉक्टर असतां त्यांनीं कोरफडीचा एक कल्प लिहिला आहे. तो असा—पानांचे तुकडे ८ तोळे, साधें मीठ एक तोळा हीं अर्धपात्र ह्मणजे १० तोळे पाण्यांत उकळून तयार झालेला काढा गाळून त्यांत २– २॥ तोळे साखर घालून तो पांहाटेस घ्यावा. अमृतसर व सुरतेकडे कोरफडीचे तुकडे मिठांत घालून त्याचें लोणचें करितात व तें ज्याची क्षुधा मंद झाली असेल त्यास खावयास देतात. जनावरांच्या औषधांत तर एळ्याचा फार उपयोग होतो. सॉक्ट्रीना कोरफडीचा रस ( अथवा बोळ ) गरम पाण्यांत मिळवून जखमेवर लावला असतां त्यांतील पीडा बंद होते. स्त्रियांचे योनिरोग, त्वग्रोग, प्लीहसंबंधीं रोग, नेत्ररोग, अग्निदग्धव्रण, इत्यादि अनेक रोगांवर कोरफडीचा ताजा रस व बोळ यांचा उपयोग होतो. याचे विस्तृत **गुणदोष** व **औषधि उपयोग** आमच्या **वनौषधिगुणदर्शाच्या २ ऱ्या भागांत** पहावे.

बोळाचा उपयोग अलीकडे डॉक्टरी औषधांत फार होतो. Pil aloes et myrrha, pil colocynth Co, pil Rhei Co, Decoti aloes Co, vinum aloes या इंग्रजी औषधांत बोळ असतो.

## १२ पित्तपापडा.

**संस्कृत नांवें**—पर्पट, चरक, रेणु, तृष्णारि, खरक, रज, शीत, शीतप्रिय, पांशु, कल्याण, वर्मकंटक, कुशशाख, पर्पटक, पित्तारि, रक्तपुष्पक, सुतिक्त, कटुपत्र, कवच, वरतिक्त, वर्मकंट, वरक, अतिसारहा, शिवबल्लभ, चर्माह्व य, सूक्ष्मपत्र, चर्मकंटक, यवकंट, सृष्टिक, फलकंटक, धर्मखेटक. **गुजराथी**—खडसळियो, पीतपापडो, **हिं.** पितपापडा, दवनपापडा. **बं.** क्षेतपाप ( व ) डा. **क.** पर्पाटक, कलुल्सब्बसिगे. **तै.** पार्पाटकमु, **फा.** शाहतरा-

अ. शाहतरज, बकलतलमलीक. औत्कल—जडपांपुडा. ला. Glossocardia boswellia ग्लोसोकार्डिया बोसवेलिया.

**वर्णन**—हें एक तीन चार हात सरळ वाढणारें झाडोर आहे. यावर बारीक २ कांटे किंवा कुसें असतात. हें पावसाळ्याच्या आरंभीं उगवतें व हिंवाळ्यांत मरतें. याचीं पानें लांब व अरुंद असून टोंकाकडे निमुळतीं झालेलीं असतात. यावर पांढऱ्या रंगाचीं फुलें येतात. झाड सुकलें ह्मणजे त्याचा रंग काळसर होतो. पित्तपापडा हा आपोआप उगवतो. कोरोमांडल किनाऱ्यावर व त्यांतही मुख्यत्वें करून नेलूर, मछलीपटन वगैरे भागांत रेताड जमिनींत याची बरीच लागवडही करितात.

याचीं पानें छातींतील कफ काढून टाकण्याच्या कामीं चांगलीं उपयोगी आहेत. तीं सुकवून कुटून त्यांचें चूर्ण कणकींत मिळवून त्याच्या पोळ्या करून त्या दमेकऱ्यास व क्षयरोग्यास देण्याचा प्रवात कांहीं ठिकाणीं पाहिला आहे. याचीं मुळें लांब व नारंगी रंगाचीं असतात. तीं सुती कपड्यास उत्तम प्रकारचा पक्का रंग देण्याच्या उपयोगी. पडतात. यांपासून जांभळा व भुरा नारंगी रंगही तयार करितां येतो. हिंदुस्थानांतील चिटांचा पक्का लाल रंग पित्तपापड्याच्या मुळांच्या वरच्या सालींपासून बनवितात. सिलोनांतून याचीं मुळें मोठ्या प्रमाणांत परदेशांत पाठविलीं जातात. लागवडीच्या झाडापेक्षां आपोआप जंगलांत उगवलेलें झाड अधिक पसंत केलें जातें. ही मुळें आंखूड असून त्यांतून चौथा हिस्सा रंग निघतो. समुद्रकिनाऱ्यावरच्या हलक्या, सुक्या व रेताड जमिनींत हीं झुडपें आपोआप उगवतात. लावलेल्या झाडांचीं मुळें बारीक, एक पासून दोन फूट लांब असून त्यांच्या बाजूवर रेषा असतात. यांतील लाल रंग मंजिष्ठांच्या रंगाशीं मिळतो. दक्षिण हिंदुस्थानतील रंगारी हा फार वापरतात. याचा नमुना मद्रासच्या प्रदर्शनांत ठेवला होता. त्यावर परीक्षकांनीं पुढील अभिप्राय दिला होता.—“ रंग फक्त मुळाच्या सालींत असतो. आंतील भाग सफेद निरुपयोगी असतो. मद्रास इलाख्यांतील मदुरा शहरांतील रंगारी. तेथील प्रसिद्ध लाल पागोटीं या मुळांच्या रंगानेंच रंगवितात.

लावलेल्या झाडांपेक्षां जंगली झाडांच्या मुळांतून १/३ अधिक रंग निघतो व त्याचें कारण हें आहे कीं जशा जास्त पावसानें मुळ्या बिघडून जातात, तशाच त्या लावलेल्या झाडांस अधिक पाणी दिल्यानें हीनसत्व होतात. दोन वर्षांच्या झाडांच्या मुळ्या मिळाल्यास त्या अधिक गुणकारी असतात. काळोखाच्या जागेंत ठेवल्यानें त्या बिघडतात असें ह्मणतात. " मद्रासी रुमाल रंगविण्यांत शिरडोळीच्या मुळांबरोबर या मुळांचा उपयोग करितात. आणि रंग पक्का करण्याकरितां तुरटी घालतात. हिराकस मिळविल्यानें काळा रंग होतो आणि कुसुंबा, लिंबाचा रस व सोडा मिळविल्यानें कच्चा लाल रंग होतो.

**पित्तज्वरावर**–( १ ) पित्तपापडा, चन्दन, वाळा, व सुंठ यांचा काढा द्यावा. ( २ ) **दूषितवायुजन्यज्वरावर**–पित्तपापडा, ब्राह्मी व हंसराज यांचा काढा द्यावा. हा गोव्याकडे देतात. विस्तृत **गुणदोष** व औषधि उपयोग व. गु. ४ थ्या भागांत पहावे.

## १३ पहाड.

**संस्कृत नांवें**.–पाठा, अंबष्ठा, अंबष्ठिका, प्राचीना, पापचेलिका, पाठिका, स्थापनी, श्रेयसी, वृद्धकर्णिका, एकाष्ठीला, कुचैली, दीपनी, वरतिक्तका, तिक्तपुष्पा, बृहत्तिक्ता, दीपनी, शिशिरा, वृकी, वृत्तपर्णी, वरा, मालवी, देवी, वृकदंती, रसा, यूथा, एकैषी, विद्धकर्णिका, तपनी, त्रिशिरा, वीरा, वल्लिका, छिन्नवेशिका, सुस्थिरा, प्रतानिनी, वत्सादनी, रक्तघ्नी, विषहन्त्री, महौजसी, रुचिष्या, दीपनी. **गुज०** काळीपाड, करेंढियु. **हिं.** पाढ. **बं.** आकनादि, आखँादि. **क.** पाठा, अगरुसुटि, अगळुशुटि. **तै.** पाढचेट्टु. **ता.** पाडा. **तु.** तिपले. **मला.** पाटक्किटणु. **ला.** Stephania hernandifolia. स्टेफानिया हरनाण्डिफोलिया.

**वर्णन**—ही एक चंद्राकर बीजजातीची वेल आहे. ही दोनपासून पांच हजार फुटीच्या उंचीवर सिमल्याच्या दरींत सांपडते. बंगाल, बिहार, सिंगापूर, कोंकण या प्रांतांत ही पुष्कळ होते. डोंगराळ प्रदेशांत हिची उत्पत्ति विशेष

होते. हिचीं पानें कांहीं अंशीं पिंपळाच्या पानांसारखीं किंचित् दीर्घ—वर्तुल व गुळगुळीत असून तीं लांब देंटांवर एकांत्राड येतात. यास बारीक पिंवळ्या फुलांचे घोंस जुन्या डाहळ्यांच्या कांखेंतून येतात. यावर वाटाण्या एवढीं लाल रंगाचीं फळें येतात. डॉक्टर्स डिमक व ट्रायमेन साहेबानें या वेलीस भूनिर्विपी अथवा वेणीवेल हें नांव दिलें आहे. गोवें प्रांतांत हिला पाखेल ह्मणतात.

पाठावल्ली या नांवानें, कांहीं वर्षेंपावेतों, जिला सिंहलद्वीपांत वेणीवेल ह्मणतात तिचें मूळ वैद्य वापरीत असें बंगल्यांतील कविराजांपासून एन्सली साहेबानें जी माहिती मिळविली तिजवरून उघड झालें आहे. डॉक्टर मंत्री सांगतात, की,—“ मुंबईंत खरें पहाडमूळ मीं एका विश्वसनीय मनुष्यापासून मिळवून त्याचा उभा व आडवा छेद करून पाहिला तेव्हां तें गुळवेल जातीच्या एका निराळ्या वेलीपासून काढून घेतलें असावें असें ठरलें.” पहाडमूळ एन्सली साहेबाच्या वेळेपासून शंभरवर्षेंपर्यंत ह्मणजे सुमारें १८७३. सालापर्यंत लंडनमधील पसारी लोकांकडे व युरोपांतील इतर ठिकाणींही ‘ परायरा ’ वनस्पतीच्या मुळाऐवजीं जात असे असें डिकांडोल साहेबानें लिहिल्यावरून सन १८४७ सालच्या फार्माकोपिया इंडिका नांवाच्या औषधि—संग्रह ग्रंथांत उतरून घेतलें आहे. परंतु १८७३ सालीं ड्यानियल हॅन्वेरी साहेबांनीं परायराचें मूळ पहाडमूळ नव्हे असें सूक्ष्मदर्शक यंत्रानें चांगली तपासणी करून व खऱ्या पहाडमुळाची रासायनिक परीक्षा करून ठरविलें आहे. दोन्ही वनस्पतींचे गुण मात्र जवळ २ मिळतात.

पहाडीची दुसरी एक वनतिक्तिका नांवाची जात आहे तिला इंग्रजींत eissampelos hex andra हें नांव आहे. मराठींत हिलाही पहाडमुळाचीच वेल ह्मणतात. हें दुसऱ्या जातीचें पहाडमूळ कडू, तिक्तोष्ण व कषाय असून अतिसार जिंकणारें, रक्तपित्तनाशक, त्वग्दोष व मूळव्याध बरी करणारें आहे. हिच्या मुळांत ‘ बर्बरीन ’ द्रव्य शेंकडा अर्धा टक्काप्रमाणानें सांपडतें. याची उत्पत्ति निराळ्या वनस्पतीकडे लावून पाठा ही निराळीच वनस्पति असून परा

पत्राच्या गुणाशीं मिळती आहे असें अलीकडच्या वनस्पतिशास्त्रज्ञांचें मत आहे. पूर्वी डॉक्टर एन्सलीसाहेबांनीं व अलीकडे डॉ. ओशॉनेसी यांनीं आर्यवैद्यकांत सांगितलेले पहाडमुळाचे गुण अनुभवास जुळतात कीं नाहीं हें पाहण्याकरितां याचे कांहीं प्रयोग करून पाहिले. त्यांवरून पहाडमुळांतील मूत्ररेचक अथवा मूत्रशोधक गुणांविषयीं त्यांची निर्विवाद खात्री झाली. डॉक्टर जॉर्ज वॉट लिहितात कीं, सोंथल ( खोंड ) लोकांत परिणामशूल ( पोटदुखी ), विदग्ध अजीर्ण व हगवण यांत पहाडमुळांचा उपयोग करितात. स्त्रियांच्या गर्भाशयाच्या विकारांतही तें देतात.

पहाडमुळाचे गुणदोष व **औषधि उपयोग** वनौषधिगुणादर्शाच्या चवथ्या भागांत विस्तारपूर्वक सांगितलेच आहेत. त्याशिवाय आणखीं कांहीं माहिती व प्रयोग येथें देतों. ( १ ) **विलंबी रक्तातिसारावर**--पहाडमुळाचा काढा द्यावा. ( २ ) **मूत्राश्मरी** ( मूत्राश्यांत लहान रेंव जेमतेती ) रोग पहाडमूळाचा काढा घेतल्यानें बरा होतो. ( ३ ) **ताप, अरुचि, अपचन,** व **तोंडाचा स्वादबिघडणें** याविकारांवर-- पहाडमूळ वाळा व काळावाळा यांचा काढा द्यावा. ( ४ ) **आमातिसारावर**--पहाडमूळ इंद्रजव, किराईत, नागरमोथा, पित्तपापडा व गुळवेल यांचा काढा द्यावा. ( ५ ) **पाठादिचूर्ण, संग्रहणीवर**-- पहाडमूळ, कोंवळीं वेलफळें, चित्रकमूळ, त्रिकटु, जांभळांच्या बियांची साल, डाळिंबाची साल, धायटीचीं फुलें, कुटकी, अतिविष, नागरमोथा, दारुहळद, किराईत, इन्द्रजव या जिनसा समभाग घेऊन या सर्वांच्या बरोबरीनें कुड्याच्या सालीचें चूर्ण मिळवून तांदळाचें धुवण व मधांतून द्यावें. ( ६ ) **पाठासप्तक, पित्त-कफज्वरावर**--पहाडमूळ, सुंठ, किराईत, नागरमोथा, गुळवेल, काळावाळा, व सुगंधि वाळा यांचा काढा द्यावा. ( ७ ) **घावलागल्या** ठिकाणीं याचीं पानें बांधलीं असतां ठणका कमी होते.

( ८ ) **सांद्रमेह** अथवा ज्या मूत्रांतून कफ धातु ( म्यूकस ) अथवा सफेद क्षार ( Phosphates ) जात असतील त्यांत--लिंबाची साल, गोमूत्र व मध मिश्र करून पहाड मुळांचा काढा द्यावा.

(३११) एखादें प्रेमाचें मनुष्य मरणानंतर जर आपणास भेटत नाहीं, तर मग मरणानंतर त्या प्रिय मनुष्याचे शेजारींच स्मशानवास करण्याची स्वाभाविक इच्छा व आशा कां उत्पन्न होते. ?

"प्राणोत्क्रमणाचे वेळीं फक्त ती एकच शब्द बोलली"

"प्रियमातोश्री! माझेजवळ नीज, व शेवटीं मजबरोबरच उठ.!"

(३१२) वृद्ध मनुष्याचें जसजसें ज्यास्त वय होईल तसतसें त्यानें ज्यास्त दुःखी व चिरडखोर राहणें, ही अत्यन्त दिलगिरीची गोष्ट होय. दया, क्षमा आणि शांति हे तीन्ही गुण त्याच्यांतून हळू हळू नाहींसे होतात. दुसऱ्याचे कृतीवर तो उद्वेग उत्पन्न होईल, अशी टीका करूं लागतो. सत्य, निष्कापट्य, औदार्य, प्रीति वगैरे, यांपैकीं जगांत कांहींएक राहिलें नाहीं. खरोखर ! असा मनुष्य जन्मास न येता तर फार उत्तम झालें असतें. कारण चांगुलपणा, औदार्य व आनंद यांपैकीं एकही त्याच्यांत वास्तव्य करीत नाहीं.

(३१३) लोकप्रिय वर्तमानपत्राचा एक विद्वान् लेखक, दहा वर्षांपूर्वी, एके दिवशीं सकाळीं न्याहारी करून, नंतर कांहींएक खाल्ल्याशिवाय दिवसभर घोड्यावर बसून, यथेच्छ फिरून रात्रीं घरीं आल्यावर, अतिशय थकून गेला, व त्याला भूक लागल्यामुळें यथेच्छ जेवला व नंतर लागलीच निजला तो अद्याप उठला नाहीं; सकाळीं जर तुह्मांस उत्तम स्थितींत उठणें असेल, तर रात्रीं फार थकवा लागला असल्यास, यथेच्छ कधींही जेऊं नका.

(३१४) क्षयरोगी मनुष्याचे शरीराच्या कोणत्याही भागावर पू वाहणारें असें, गळूं, जर आपोआप उत्पन्न झालें, तर क्षयरोग ज्यास्त वाढत नाहीं व कधीं कधीं तर समूळ नाहींसाही होतो. यावरून असें अनुमान निघतें, कीं जर **कृतीनें** मुद्दाम गळूं उत्पन्न केलें, तरीही क्षयरोग मिटला पाहिजे. परंतु तशीं उदाहरणें आढळलीं नाहींत.

[३१५] आपलें जेवण थर्मामिटरनें नियमीत केलें जाईल, अशीही वेळ लौकरच येईल; आपण घराचे बाहेर फिरावयास जातों, त्यावेळीं घरांतील हवेपेक्षां जर बाहेरील हवा ज्यास्त थंड असली, तर आपण त्या मानानें कपडेलत्ते चांगले उबदार घालून जातों. जो आहार आपण खातों त्यामुळेंच आपल्या शरीरांत उष्णता उत्पन्न होते. आहार हें एका प्रकारचें आपलें शरीरपोषणार्थ सर्पणच झटलें तरी चालेल. जेवढे हिंवाळ्यांत आपण कपडे घालतों, तेवढें उन्हाळ्यांत घालीत नाहीं, तद्वतच हिंवाळ्या इतका खुराकही आपण उन्हाळ्यांत खात नाहीं.

(३१६) शरीरसंपत्ती वाढविण्यासाठीं आपण कांहीं काम अगर व्यायाम करतों, तर तें काम अगर तो व्यायाम एक तासांत किती ज्यास्त झाला, हें पाहण्यापेक्षां एक तासांत कमी किती झाला, हेंच पाहणे परिणामीं शहाणपणाचें आहे.

(३१७) खिडक्या व दारें बंदकरून आपण खोलींत निजतों, त्यावेळीं आपल्या निश्वासाबरोबर फुप्फुसांतून बाहेर निघणारा **"कार्बॉनिक आसीड ग्यास"**

इतर अशुद्ध ग्यासाशीं मिळून, हवेपेक्षां जड होतो व मुख्यत्वेंकरून जर ती खोली थंड असली तर जमीनीचे अगदीं सपाटीबरोबर राहतो; ह्मणून थंडहवेंत जमीनीचे सपाटीवर निजल्यानें अशुद्ध हवेचा संसर्ग होतो; थंडींत तोंड मिटून नाका वाटे हवा घेणें विशेष फायदेशीर आहे; ही हवा मस्तकांतून फुफ्फुसांत जातांना उष्ण होत असते, व जास्त घेण्यांत आली, तर छाती रुंद व बळकट होते, शिवाय नाकांतून हवा घेण्याचा क्रम ठेविल्यानें नाकांतील केंसाचे अंगीं अशुद्ध हवा शुद्ध करण्याचा धर्म असल्यानें अशुद्ध हवेचा आंत प्रवेश होऊं शकत नाहीं.

(३१८) विद्याविषयक तसेंच इतर व्यवसायांत उंच पदवीला चढणारे फारच थोडे असतात; परंतु सर्वांत उंच पदवीला चढणारे फारच थोडे असतात. परंतु सर्वांत श्रेष्ट पदवीला चढण्याची ईर्षा ठेवणाऱ्यास ज्याचे त्याचे मानाप्रमाणें यश मिळाल्यावांचून राहत नाहीं.

(३१९) पोळण्याचे अगर जळून मरण्याचे अनेक प्रसंग आपल्यावर येतात, ह्मणून त्यावर रामबाण उपायाची माहिती असणें फारच आवश्यक आहे. पोळलेल्या जागेवर पिपरमिंटाचें तेल लावलें तर लौकरच गुण येतो व डागही राहत नाहीं. हें औषध मिळेतोंपावेतों पोळलेला भाग पाण्यांत धरावा ह्मणजे दाह वगैरे सर्व दुःख तात्काळ कमी होईल.

(३२०) कित्येक मनुष्यांनीं जे दुःखाचे प्रसंग वेठले आहेत त्यामुळेंच त्यांचीं नांवें अमर झालीं आहेत; दुःखमुक्त होण्यास त्यांनीं अपार श्रम केले. श्रम करण्याचा जर असा प्रसंग आला नसता तर **सरवेन्टीस, ओटवे, जान्सन, गोल्डस्मिथ, कॅम्बेल, ड्रायडन**, वगैरेंचीं नांवें इतिहासांत आलींच नसतीं. यापैकीं पुष्कळांनीं उपासमारासारखीं दुःखें सहन केलीं व एक तर भुकेनें-व्याकुळ होऊन इहलोक सोडून गेला.

वरील हकीकत प्रत्येक दुःखी मनुष्यानें लक्ष्यांत ठेवून यत्न करावा. कसेंही महत्कृत्य असो! यत्न करण्यांत मृत्यु आला तरी बेहत्तर आहे; परंतु यत्न सोडूं नये.

(३२१) अत्युत्साहपूर्वक दृढाग्रहानें झटाल तरच तुह्मांस उत्तम यश संपादन करतां येईल.

(३२२) आजारी अथवा चांगल्या मनुष्यास, ज्याप्रमाणें सतत वर्षभर एकच प्रकारचे कपडे घालणें सुखावह होणार नाहीं, त्याचप्रमाणें अगदीं मोजून आहार घेणें फायदेशीर होणार नाहीं. साधारण चांगली प्रकृति असली ह्मणजे स्वाभाविक भूक असेल त्या मानानेंच खावें. नियमाप्रमाणेंच अगदीं मोजून कधींच खाऊं नये.

(३२३) मोकळ्या हवेंत, थकवा लागणार नाहीं, अशाच बेतानें, सतत व्यायाम केल्यानें शरीर-संपत्ति चांगली वाढते.

(३२४) जर एखाद्या मनुष्यास पहांटेस आंथरुणांतून उठतांना कित्येक तासपावेतों थोडा खोकला येऊं लागला व चढ उतर करतांना दम लागूं लागला व नाडीचे एका मिनिटांत ९० ठोके लागूं लागले तर क्षयाचे भावनेस आरंभ झाला असें समजावें.

(३२५) खाल्ल्यानंतर कोणतेही प्रकारची जरा अस्वस्थता वाटली तर समजावें कीं खाल्लेलें अन्न प्रकृतीस मानवलें नाहीं; एक तर एखादा पदार्थ पचन न होण्या-सारखा असतो अगर ज्यास्त आहार घेतल्यानें असें होतें. बहुधा आहाराचे प्रकारा-पेक्षां आहाराचे प्रमाणांत जर चूक झाली तर अजीर्ण होण्याचा ज्यास्त संभव असतो.

(३२६) कित्येक वेळीं मनुष्यास अमुक एक प्रकारच्या आहारावर विशेष भक्ती असते; परंतु तो आहार घेतल्यावर त्यास लागलीच अस्वस्थता वाटूं लागते; अशा स्थितींत, प्रकृतीस अस्वस्थता, तो आहार घेतल्यानें बिलकुल वाटणार नाहीं इतक्या बेतानें व तोंपावतों तो आहार कमी कमी करीत जावें; त्याच आहारावर तुमची विशेष भक्ति असण्याचें कारण हें कीं, त्या आहारांत जीं तत्वें असतात त्यांपैकीं कांहींची तुमच्या शरीरप्रकृतीस अवश्यकता आहे.

( ३२७ ) अमुक एक पदार्थ आज तुह्मांस मानवला तर एकदोन महिन्यानंतर अगर अमुक एका ऋतूंत तो कदाचित् तुह्मांस मानवेलही; परंतु अमुक एक पदार्थ खाल्लाच पाहिजे असा हरहमेश विचार करण्याची संवय लाऊन घेऊं नका. खाण्याची वेळ येईल तेव्हांच काय खावें याचा विचार करावा हें उत्तम. उदरंभरी ( अती आहार करणारे ) जे असतात ते या नियमाविरुद्ध वागतात पण विचारी मनुष्य या विरुद्ध कधींच वागणार नाहींत.

( ३२८ ) अमुकच प्रकारचें पक्वान्न खाण्याची संवय [ चट ] लागल्यानें शेंकडो लाडक्या तरुणींनीं आपल्या प्रियकरांस औषधासाठीं शेंकडो रुपये डाक्टरास देण्याची वेळ आणली आहे; व अशा चैनींत पुष्कळांची प्राणहानि झाली आहे.

( ३२९ ) वास्तविक पाहिलें तर घराबाहेरील हवेंत फिरल्यानें सरदी उत्पन्न होत नाहीं; परंतु घरांतच खालीं लिहिल्याप्रमाणें वागणूक झाली तर सरदी ( पडसें वगैरे ) उत्पन्न होते. [१] बाहेरून फिरून आल्यावर लागलीच कपडे काढून उघडें बसणें. ( २ ) हवा कितीही उष्ण असली तरी अंगवस्त्राशिवाय उघडें पलंगावर वगैरे निजणें.

( ३३० ) आपल्या बायका एकदां कामाला लागल्या ह्मणजे अतीशयच व पुष्कळ वेळपावेतों एकसारख्या काम करतात; अती श्रमानें थकून गेल्या ह्मणजे कांहींएक पांघरूण घेतल्याशिवाय निजतात व त्याच कारणानें सरदी वगैरे होऊन आजारी पडतात.

( ३३१ ) आपल्या शरीररचनेंत जीं तत्वें आहेत त्यांना ज्या पदार्थांची विशेष अवश्यकता असेल त्याच पदार्थावर आपली भक्ती बसून तोच पदार्थ विशेषेंकरून खाण्याची आपल्यास स्वाभाविक प्रेरणा उत्पन्न होते; ह्मणून शास्त्ररीतीनें खाण्यापेक्षां स्वाभाविक प्रेरणेनेंच मानवेल त्याचप्रमाणें आंहार घेतल्यानें शरीरसंपत्ती उत्तम राहते.

( ३३२ ) ज्याची साधारण प्रकृती चांगली आहे अशा मनुष्यांनीं रात्रौ उशाशीं घेणें तें अशा बेतानें घ्यावें कीं शरीराचे सपाटीपासून डोकें तीन इंचांपेक्षां जास्त उंच राहतां कामा नये. तीन इंचपावेतों उंच राहिल्यानें स्वाभाविक रुधिराभिसरण ( रक्त

वाहण्याची क्रिया ) चांगलें होऊन फुफ्फुस व अंतःकरण हीं विशेष दबलीं जात नाहींत डोकें जर प्रमाणापेक्षां जास्त उंच राहिलें तर पाठ वांकडी होते व दाढीचा भाग छातीपावेतों येतो व हात आंत गेल्यानें छाती दबली जाते.

( ३३३ ) प्रश्नः—या भूमंडळावर स्वर्गतुल्य घर कोणतें ?

उत्तरः—ज्या घरांत आई, बाप, मुलें व कुटुंबांतील सर्व माणसें **घर सुखी करण्याकडे** अहोरात्र झटत असतात; तें घर लहानशा स्वर्गाप्रमाणें समजावें.

( ३३४ ) खाण्याचा अमुक एक पदार्थ एखाद्यास आवडला अगर न आवडला ह्मणून दुसऱ्यासही आवडेल अगर आवडणार नाहीं असा कांहीं नियम नाहीं.

( ३३५ ) साधारण मनुष्याचे फुफ्फुसांत ५० कोटीपेक्षां जास्त हवेचीं छिद्रें असतात; हीं जर मोकळीं करून भिंतीवर लावलीं तर ६ फुट समचौरस जागा अडली जाईल; व प्रत्येक श्वासोच्छ्वासांत किती भागास हवेचा स्पर्श होतो हें सहज कळून येण्याजोगें आहे. थंड हवा असल्यास सर्व शरीरांत ती भिनून "**न्युमोनिया**" ( क्लोमपाक ) व्याधी उत्पन्न करील व अशुद्ध हवा असल्यास सर्व भागांत झटकन पसरून रोगोद्भव करील यांत आश्चर्य नाहीं.

( ३३६ ) सर्वसाधारणपणें पाहिलें तर, जर मनुष्य अशक्त, भूक लागलेला व सरदी झालेला नसला तर त्याचे प्रकृतीस रात्रीची व दिवसाची हवा सारख्या रीतीनेंच मानवते.

( ३३७ ) जितकीं वर्षें ज्याची वाढ त्याचे पांचपट वर्षें त्याचें आयुष्य असा या सृष्टीचा नियम दरेक प्राणीमात्रास लागू आहे. कसें ह्मणाल तर कित्येक जीवजंतु एकच तासांत संपूर्ण वाढतात व अस्तमानापूर्वीं नाश पावतात; कुत्र्याची वाढ दोनच वर्षांत संपते ह्मणून तें दहा वर्षें वांचतें; बैल ४ वर्षें वाढतो व २० व्या वर्षीं मरतो; घोडा ५ वर्षपावेतों वाढतो व २५ वर्षें वांचतो; उंटाची वाढ ८ वे वर्षीं संपते व तो ४० वर्षें वांचतो; याच सादृश्यानें मनुष्याची वाढ जर २० वे वर्षीं संपते तर तो अर्थात् १०० वर्षें वांचला पाहिजे.

( ३३८ ) ज्या मुलाची वाढ संपूर्ण व्हावयास जास्त दिवस लागतात तें मूल जास्त दिवस वांचेल; असा सर्वेंद्रियशास्त्राचा सिद्धांत आहे:—

"**जें लौकर पिकतें तें लौकर सडतें**" अशी एक ह्मण आहे. ( Early ripe early rot ); जीं मुलें लौकर वाढतात तीं हमेष क्षीण असतात.

( ३३९ ) असा एक सरसगट अंदाज़ काढला आहे कीं फ्रान्समध्यें गरीबांपेक्षां श्रीमंतलोक १२ वर्षें जास्त वांचतात.

( ३४० ) सुधारलेल्या सर्व देशांत अवलोकनान्तीं असें दिसून आलें आहे कीं ज्यांना आपला चरितार्थ चालविण्यास दररोज श्रम करावे लागतात त्यांपेक्षां [ सधनलोक २१ वर्षें ज्यास्त वांचतात; ज्यांना बाहेर अतिशय श्रम करावे लागतात त्यांपेक्षां] घरांत

स्वस्थपणें बसून कामकाज करतात ते १० अगर १५ वर्षें जास्त वांचतात. चर रविवारचे दिवशीं ( विश्रान्तींचे दिवशीं ) रजा न पाळतां काम करावें लागलें असतें तर गरीब लोक हल्लीं जितके दिवस वांचतात तितके दिवस सुद्धां वांचू न शकते.

( ३४१ ) मानवीसत्तेनें अथवा रोगाच्या सत्तेनें मनुष्य कारागृहवासाप्रमाणें, अगदीं बांधला जातो; परंतु त्या बद्धमनुष्याची मानसिक स्थिति कांहीं बद्ध नसते. ती आपलें काम अशाश्वतच करीत असते. जसें :—**बनियन** यानें कारागृहवासांत **"विलियम्स प्रोग्रेस"** हा ग्रंथ रचला; तसेंच **रेल्हे** यांनीं **"जगाचा इतिहास"** हा ग्रंथ तयार केला; व त्याचप्रमाणें अंध, वृद्ध, गरीब व बायकोनें टाकलेला असा जो **मिल्टन** त्यानें सुद्धां एकांतवासांत, अनेक प्रकारचे उपयुक्त ग्रंथ करून ठेवले आहेत.

(३४२)"आपल्या आईबापांकडे थोडें जरी लक्ष दिलें तरीपण त्यायोगानें आपल्यास केवढी शांती व समाधान वाटतें!" हें प्रत्येकास स्वतः आईबाप झाल्या शिवाय (आईबाप होण्यास जेवढें वय हवें तेवढें झाल्याशिवाय) चांगलें अवगत नाहीं.

(३४३) कोणाची विनंतीं मान्य करणेंच असेल तर ती मात्र खऱ्या अंतःकरणानें मान्य करावी; असें केल्यानें दुप्पट किंमत वाढते.

(३४४) विचारपूर्वक, नियमित, व हमेषचे श्रम केल्यानें शरीर–संपत्ती व शक्ती वाढते व पचनाक्रिया चांगली राहते.

(३४५) मुलें आईबापांची आज्ञापाळीत नाहींत त्यामुळें आईबापांनां जेवढें दुःख होतें तेवढें दुसरें कोणतेही कारणानें क्वचित्‌च होतें.

(३४६) चांगल्या प्रकृतिच्या मनुष्यास कोणीं असें ह्मणेल कीं "अमुक पदार्थ पौष्टिक व शक्तिवर्धक आहे सबब तो अवश्य तुह्मीं खावा अगर अमुक पदार्थ तसा नाहीं ह्मणून तुह्मीं खाऊं नका;" ह्याकडे कोणीही लक्ष न देतां, आहाराचे कामीं कोणाचें कोणी ऐकतां कामां नये; प्रत्येकानें आपापल्या प्रकृतिमानाच्या नियमाला अनुसरूनच व अनुभवाप्रमाणेंच वर्तन ठेवावें.

(३४७) ज्याचे मस्तकांत रक्त ज्यास्त चढत असेल त्या मनुष्यानें मस्तक उंच ठेऊन निजावें; स्नायुविकार ज्यांनां असेल त्यांनीं, ज्यांची प्रकृति हमेश अस्वस्थ राहून ज्यांना चैन पडत नाहीं त्यांनीं, अथवा मस्तकांत ज्यास्त रक्त चढल्यानें ज्यांना चांगली झोंप येत नाहीं त्यांनीं सुद्धां मस्तक उंच ठेऊनच निजावें; ह्मणजे गुरुत्वाकर्षणामुळें रक्त खालीं उतरतें.

(३४८) हिंवाळ्यांत तोंडांतून वाफ निघते हें सर्वांना माहीत आहेच; ती वाफ बाहेर निघालीकीं वर आकाशाकडे जातेशी दिसते. त्या वाफेंत **"कारबॉनिक आसिड ग्यास"** (विषारी वाफ) असतो; अशी कल्पना कराकीं ती वाफ हवेपेक्षां जड झाली तर ती तळाशीं बसेल व आपण एका दिवसांत प्राणास मुकूं.

(३४९) बाजारांत जो शिळा भाजीपाला असतो तो घेण्यापेक्षां–ताजा जेथून मिळेल तोच घ्यावा हें उत्तम.

(३५०) एक तासांत चार मैल जाववेल येवढ्याच गतीनें चालण्याची संवय असावी. घोडा ४० सेकन्डांत अर्धा मैल त्वरेनें जाऊं शकेल. **वाष्पप्रचलीतरथ** ( आगगाडी ) दर मिनिटास एक मैल जाते. परंतु वाफेची गति दर मिनिटास ८६००० फूट ह्मणजे तासांत सुमारें एक मैल असते.

(३५१) प्रमाणापेक्षां ज्यास्त व्यायाम करणें मोठें अपायकारक आहे; जर तुह्मांस गालांवर गुलाबी छटा, गाढ झोंप व चांगली भूक लागून उत्तम रुची यावी अशी इच्छा असेल तर प्रकृतीस मानवेल इतकाच सतत व्यायाम करा.

(३५२) क्षयरोग्यांची बरीच संख्या तीशींचे आंत मृत्युमुखीं पडते. रोग संपूर्ण होण्यास, कफास आरंभ झाल्यापासून सुमारें दोन वर्षे लागतात. तरुणमंडळीस, त्यांच्या अदूरदर्शिपणामुळें, अज्ञानामुळें व अविचारीपणामुळेंच, क्षयरोग बहुधा विशीचे आंतच जडतो.

(३५३) भिन्न भिन्न प्रकारचे जमिनिस जसें सुपिक होण्यास भिन्नभिन्न प्रकारचें खत लागतें तद्वत भिन्न भिन्न प्रकृतिचे मनुष्यास भिन्न भिन्न प्रकाराच्या आहाराची अवश्यकता लागते ह्मणून भिन्न प्रकृतिच्या मनुष्याची **रुची व आवड** भिन्न असते; जर एकच पदार्थ सर्वजनास सारखा आवडला, तर, सर्वांस पुरेल इतका तोच पदार्थ जगांत उत्पन होणें अशक्य आहे.

(३५४) शरीरसंपत्ति चांगली राहण्यास औषधापेक्षां घराबाहेरील मोकळ्या हवेंत व्यायाम करणें फार हितावह आहे. पाऊस जरी पडत असला तरी व्यायामाची जरूर कमी आहे असें नाहीं; अशावेळीं छत्री घेऊन वाहेर निघावें व पाऊस खुशाल पडूं द्यावा. जर थंडी फार असली तर त्वरेनें चालावें व काम करावें. जर वारा सोसाट्यानें वाहत असला तर ज्या दिशेकडे वारा वाहत असेल त्या दिशेनेंच जावें पाऊस पडत असला, विजेचा गडगडाट होत असला, गारा पडत असल्या, व बर्फ पडत असला तर, घरांत रहावें पण भाकरी व फळें खाऊन रहावें ह्मणजे व्यायामाची जरूर पडणार नाहीं.

(३५५) कोणत्याही मनुष्याचा कोणतेंही काम करण्यांत वाईट हेतु असेल असें अनुमान करणें हें औदार्याचें लक्षण नव्हे.

(३५६) कित्येक मंडळी आपली शरीर प्रकृती चांगली राखण्याच्या नादांत दररोज सकाळीं आपलें शरीर पुष्कळ चोळून घेतात, वीस माइल घोड्यावर फिरून येतात, कित्येक तास आखाड्यांत माकडाप्रमाणें उड्या मारण्यांत व गुलांट्या खाण्यांत घालवितात, मल्लखांबावर चढतात व दररोज दोन हत्ति येवढें वजन उचलतात. जास्त आहार खाऊन तो आपण पचऊ शकूं याच हेतूनें हें सर्व करतात. परंतु वस्तुतः दररोज ही सर्व उठाठेव न करतां साधें व नियमीत अन्न खाणें हेंच उत्तम.

(३५७) हल्लींचा काळ (युग) व मनुष्यजाती ह्यांचा, शारीरिक प्रमाण, सहनशीलता व मानसीक शक्ति ह्या तत्वांच्या मानानें पाहिलें तर दिवसानुदिवस ऱ्हास

होत जात आहे असें नाहीं. **पामरस्टन** आणि **वांडरबिल्ट, रोथचील्ड** आणि **ड्रयु, थर्लोवीड** आणि **विल्यम ब्रे. ऑस्टर,** हे सर्व ८० वर्षांचे वयांत जेवढे वृद्ध दिसत होते त्याहून **डेवीडराजा** दहा वर्षें कमी वयाचा असतां जास्त वृद्ध दिसत होता. **नेपोलियनाचे** वेळीं पांच फुट तीन इंचाचीं मनुष्यें लष्करी खात्यास लायक गणलीं जात होतीं. हल्लीं त्यापेक्षां कांहीं फुट जास्त उंचीची आवश्यकता विशेषमोजली जाते.

( ३५८ ) हल्लींच्या काळांत मनुष्यास जास्त काम करावें लागतें, असें पुष्कळ लोकांचें ह्मणणें आहे. परंतु हल्लीं काम करणें इतकें सोपें झालें आहे कीं पूर्वींचे काळांत जेवढें काम होत असे त्याच्या दुप्पट काम करण्यास हल्लीं तेवढा वेळ लागत नाहीं; मनुष्यांनीं केलेल्या कामाच्या मानानें विश्रांतीही घेणें इष्ट आहे; व असें झालें ह्मणजे चांगल्या शरीरसंपत्तीच्या व दीर्घायु लोकांची संख्या वाढेल यांत संशय नाहीं.

( ३५९ ) (१) "**कर्ज**" ही एक अग्निरूपी देवता आहे, व ती तुमच्या शरीरांतील तत्वांस जाळीत जाते;

(२) "**कर्ज**" हा एक विषारी सर्प आहे व त्यामुळें तुमचें सर्व जीवित विषतुल्य होतें.

(३) "**कर्ज**" हें एक **हीना** (Hyena) नांवाचें जनावर आहे व तें सर्व तुमचीं आंतडीं फाडून खाईल;

(४) "**कर्ज**" हें ज्यांतून **आनंद** नाहींसा झाला असें एक अंतःकरण होय.

(५) "**कर्ज**" हें एक हास्यरहित मुख आहे.

(६) "**कर्ज**" ही, ज्यांत सूर्योदय कधींच होत नाहीं अशी एक सृष्टी होय.

( ३६० ) नीच मनुष्य दुसऱ्याचे कामाचा जो उद्देश दाखवितो त्याच उद्देशावर त्याची स्वतःची किंमत अवलंबून असते.

( ३६१ ) कोणास मदत करण्याचें आपले मनांत नसून त्याला फुकट आशा मात्र लावणें ह्यासारखी दुसरी निष्ठुरता नाहीं.

( ३६२ ) शारीरिक व नितिसंबंधीं कायदा जसा सर्वत्र आहे तसा दैविक अकस्मातासंबंधींही कायदा आहे; तो अशा रीतीनें कीं वस्तीचे प्रमाणांनीं अमुक मुकरर वेळीं आत्महत्या व अशाच प्रकारचे दुसऱ्या दैविक अकस्माताची संख्या सारखी रहावी. आपल्या हमेशच्या राहणीचे कायदे व नियम, यांचा जे अभ्यास करतील तेच शहाणे समजावेत.

( ३६३ ) Coperas (**कॉपरॅस**) आणि **कॉरब्रॉलिक आसीड** या दोहोंचें मिश्रण खर्चाचे मानानें फारच स्वस्त व हवा उत्तम प्रकारची शुद्ध करणारें ( disinfectant ) आहे.

(३६४) बहुतेक सर्व साधारण प्रकारचे आजारीपणांत आणि—अकस्मात प्रहार वगैरे इजा होतात अशावेळीं रोग्यास विश्रांती, उष्णता. व शांत जागा यांची फारच आवश्यकता आहे. एखाद्या प्राण्यास तुह्मी प्रहार करा ह्मणजे लागलीच तो शांत व उष्ण

अशा स्थळीं जाऊन स्वस्थ बसतो. यावरून असें ही होतें कीं प्रकृतीसिद्ध (स्वाभाविक) ज्ञानानें तर्क अथवा विचारणाशक्ती चांगली चालते.

( ३६५ ) मनुष्याच्या राहत्या घराचे खालीं भुयार अथवा तळघर कधींही करूं नये; कारण त्या भुयारांत बहुतकरून किरकोळ लोखंडी निरुपयोगी सामान, फाटके जोडे व कपडे, चिंध्या, अशीच सर्व निरुपयोगी अडगळ आपण ठेवतों. कालेंकरून तें सर्व कुजतें व भुयारांतील हवा बिघडून तिची वाफ वरल्या अंगीं असलेल्या राहत्या घरांतील शुद्ध हवेस बिघडविते.

(३६६) थिजलेल्या स्थितींतल्या **ऑक्सीजना** (Oxygen) सच **ओझोन** (Ozone) असें ह्मणतात, व ह्मणून यांत **आक्सिजन** (Oxygen=प्राणवायु) पुष्कळ असतो व त्यामुळें हवेंतील अपायकारक असा विषारी भाग नाश पावतो. शहारांतल्या हवेपेक्षां खेड्यांतली हवा ज्यास्त शुद्ध असते, हें बहुतेकांस माहित आहे. हिरवीं रोपें व फुलें उन्हांत पुष्कळ **ओझोन** बाहेर काढतात हें सिद्ध झालें आहे; ह्मणून प्रत्येकानें आपल्या राहत्या घराच्या सभोंवतीं जागेच्या प्रमाणांनें हिरवीं रोपें व फुलझाडें लावावींत ह्मणजे त्यायोगें शरीरसंपत्ति चांगली राहून आयुष्य वाढेल. ज्ञाते असतात ते याप्रमाणें व्यवस्था ठेवण्यास कधींच विसरत नाहींत.

[३६७] जमिनींत पाणी मुरल्यानें अनेक प्रकारचे ज्वरादी रोग उत्पन्न होतात ह्मणून पाण्याचा चांगला निकाल काढून जमीन कोरडी राहील अशी तजवीज ठेवली तर वरील रोग बहुतकरून कधींच उद्भवणार नाहींत.

[ ३६८ ) फार काम केल्यानें शरीर जेवढें क्षीण होतें त्यापेक्षां फार विचार केल्यानें तें ज्यास्त क्षीण होतें.

[ ३६९ ] विशेष अनुभवास असें येत चाललें आहे कीं ज्या शहरांत आडाचें पाणी पिण्यांत येतें त्यापेक्षां ज्या शहरांत तलाव, नद्या वगैरेंचें पाणी पिण्यांत येतें त्या शहरांत रोगोद्भव कमी असतो. शौचकूप, मोऱ्या, वगैरेचें अशुद्ध पाणी जमीनींत मुरत असल्यामुळें आडाचें पाणी बिघडतें, व त्यामुळें रोगराई उत्पन्न होते.

[ ३७० ] असें ह्मणतात कीं ज्या मनुष्याची जशी स्थिति असेल त्याप्रमाणें तो निवडतो परंतु खरा प्रकार असा आहे कीं जसा मनुष्य निवडला असेल तशी त्याला स्थिति प्राप्त होते. तात्पर्य:–गुणी मनुष्यास चांगलीच स्थिति व अवगुणी मनुष्यास वाईट स्थिति प्राप्त होते.

[३७१] मनुष्यानें, स्वतःची अवस्था व वृत्ति यांच्या आधीन कधींही राहतां कामा नये; परंतु अवस्था व वृत्ति यांनां आपल्या आधीन ठेवणें हेंच प्रत्येक कामांत मनुष्यास यशस्वी होण्यास उत्तम साधन होय.

[३७२] आपल्या चालू स्थितिच्या आधीन आपण राहण्यापेक्षां आपण अशी प्रतिज्ञेनें उमेद बाळगावी कीं जेणेंकरून आपली चालू स्थिति आपल्याच इच्छेप्रमाणें राहील.

## ग्रहविहारभुवन व ज्योतिषादर्श मंदिर.

या नांवाची संस्था आह्मी स्थापन केली आहे व यांत सात वर्षांपासून शक्य तितका ज्योतिष पुस्तकांचा संग्रह द्रव्यबोज स्वतः उचलून केला आहे. अनुभवासाठीं येथें नामांकित स्त्रीपुरुषांच्या व संस्थेच्या कुंडल्यांची आवश्यकता आहे. व अशा कुंडल्या ज्यांच्या त्यांच्यावाचून मिळणें शक्य नाहीं. यासाठीं देशबांधवांनीं, राजे-रजवाडे, थोर, श्रीमान्, कुशल, कलाभिज्ञ, विद्वान, वक्ते वगैरे, तशाच संस्था, विद्यालय मोठमोठ्या इमारतींच्या, मिळतील तितक्या कुंडल्या संपादन करून पाठविल्यास या मागें पडलेल्या शास्त्रास पुढें आणण्याचें मोठें श्रेय मिळणार आहे व यापासून देशबांधवांचा आज नाहीं कधातरी उपयोग होणार आहे. जाहलेले, सध्या आहे ते व पुढें होणाऱ्या कुंडल्या पाठवाव्या; तसेंच आम्हांला ज्योतिष पुस्तकांची आवश्यकता आहे, तरी अप्रसिद्ध ग्रंथ कोणाजवळ असल्यास कळवावें.

**भगवंत गोविंद तोडेवाले. चालक. पैठण.**

---

# सौभाग्यावलेह.

### स्त्रिया, पुरुष व मुलें यांना सर्वकाल उपयोगी.

### सर्व रोगांवर चालतो. घेण्यास रुचिकर.

१२ तोळ्याच्या डब्यास १ रु.; ४० तोळ्याच्या डब्यास २॥ रु. प्याकिंग २ आणे टपाल सुमारें, रुपयांस ४ आणे प्रमाणें. एकंदर पैशाची मानआर्डर आल्यास पाठवूं व्ही. पी. नाहीं.

---

# सद्वैद्यकौस्तुभ.

### वैद्यराज आयुर्वेदमहोपाध्याय शंकर दाजी शास्त्री पदे द्वारा सम्पादित

यह अपूर्व सचित्र मासिकपत्र जुलै १९०३ से निकलने लगा है. इसमें वैद्यकके विविध अंगोंका निरूपण होता है. वनस्पतियोंके हूबहू रंगीन चित्र और भिन्न भिन्न देशभाषाओंके नाम, उनका स्वरूपवर्णन, गुण-दोष, नानाप्रकारके रोगोंपर उपयोग, इत्यादि विषयोंका विस्तृत विवेचन होता है. शारीरशास्त्रका (Anatomy) सचित्र वर्णन होगा. दुर्मिल प्राचीन ग्रंथोंके अनुवाद इसकेद्वारा प्रकाशित होंगे नाडीपरीक्षा, धात्रीशिक्षा, स्त्रीरोगचिकित्सा, बालरोगचिकित्सा रसायनक्रिया अनुभूत औषधिप्रयोगसंग्रह, औषधिप्रयोगसंग्रह, औषधोपयोगी पाक--अवलेह --मुरब्बे आदि बनानेकी विधि, इत्यादि अनेक विषय इसमें होंगे. अधिक क्या कहें, सद्वैद्यकौस्तुभ पढनेवाले, वैद्यकके गूढसे गूढ आशयको समझ सकेंगे और थोडेही दिनोंमें घर बैठे उत्तम शास्त्रीय वैद्य बन सकेंगे.

अग्रिम वार्षिक मूल्य डाकव्ययसहित २॥ रु.

इसीके साथ 'भारतधर्म' नामक हिंदी मराठी गुजराथी त्रिभाषिक सचित्र धार्मिक मासिकपत्र, केवल ६ आने वार्षिक मूल्यमें मिलता है, भारतधर्मका स्वतंत्र मूल्य १ रुपया है.




'आर्यभिषक्' कार्यालयांतील पुस्तकें किंवा औषधें
घेणारास

प्रख्यात चित्रकार राजा रविवर्मा
यांच्या छापखान्यांतील

## सर्व सुंदर चित्रें

दर रुपयास दोन आणेप्रमाणें सूट देऊन विकत मिळतील. पुस्तकें, औषधें व चित्रें यांची यादी आणि 'आरोग्याचा मार्ग' हें पुस्तक,

## सर्वांस फुकट मिळेल.

---

# मराठी पुस्तकें.

**निरनिराळ्या**— वनस्पतींचे, शरीराचे वगैरे हुबेहुब देखावे देऊन, वैद्यकाची माहिती देण्यांत प्रख्यात झालेलें

**आर्यभिषक्**— मासिकपुस्तक सन १८८९ जुलैपासून निघतें. मागील मजकुराचीं पुस्तकें विक्रीस तयार आहेत. याचे बरोबर—

**भारतधर्म**— नांवाचें धार्मिक विषयांचें सचित्र मासिकपुस्तक असतें. दोन्ही घेणारांस वर्षाची वर्गणी टपालसह १ रु. १० आणे. **फक्त आर्यभिषक्** घेतल्यास १॥ रु. व **भारतधर्म** घेतल्यास १ रु. इतर पुस्तकांची यादी मागवावी म्हणजे पाठवूं. **श्री० गायकवाड सरकारांच्या** उदार आश्रयानें हीं सर्व पुस्तकें—

## निम्मे किंमतीस देण्यांत येतात.

आर्यभिषक्–औषधशाला.
मुंबई, पोस्ट गिरगांव, माधवबाग.

**शंकर दाजी शास्त्री पदे,**
आयुर्वेदमहोपाध्याय.

मुंबई निर्णयसागर छा० त छापिलें.

ज्योतिर्विद् राजा हरि भट्ट पदे यांचे स्मारक



वर्ष १५

# आर्यभिषक्

संख्या ३.



सम्पादक वै० शंकर दाजी शास्त्री पदे.

आयुर्वेदमहोपाध्याय.

मुंबई, पोस्ट गिरगांव, श्रीसयाजी-औषधशाला.

भिषजां साधुवृत्तानां भद्रमागमशालिनाम् ।
अभ्यस्तकर्मणां भद्रं, भद्रं भद्राभिलाषिणाम् ॥ श्रीवाग्भटः

**विषयानुक्रम** — सार्थ चरकसंहिता शारीरस्थान पृष्ठें २०-१६; वनौषधि-गुणादर्श (सचित्र) २१-२८; दीर्घायु कसें व्हावें? ४९-५६.

**पिसाळलेलें कुत्रें चावल्यास उपाय.**—कानपुराहून आमचे एक वर्गणीदार कळवितात कीं-पिसाळलेलें कुत्रें चावल्यास चावलेल्या जागीं लाल मिरच्या वाटून भराव्या, म्हणजे तेव्हांच विषाचा जोर बंद होऊन जखम भरून येते.

# आर्यभिषक्च्या वर्गणीदारांस विशेष अगत्याच्या सूचना.

(१) आर्यभिषक् मासिक पुस्तक चालू राहील तोंपर्यंत **फुकट मिळावें** अशी ज्यांची इच्छा असेल, त्यांनीं एकदम २५ रुपये किंवा दर वर्षास ५ रु. प्रमाणें ६ वर्षें रुपये द्यावे. सदर रुपयांत, या वर्षाची वर्गणी भरलेली जमा धरण्यांत येईल. **यामुळें, या लोकोपयोगी** कामांत सहाय्य केल्यानें श्रेय मिळून, त्याबद्दल, स्वतःस व पुढें वारसांस, पुस्तक चालू असेल तोंपर्यंत फुकट मिळेल. टपालखर्चही भरावा लागणार नाहीं.

(२) **सार्थ श्रीचरकसंहितेचे** दहा भाग छापून तयार झाले आहेत. पुस्तकांच्या मार्गील पहा. ज्यांना जे भाग मिळाले नसतील, ते त्यांनीं व्ही. पी. नें मागवावे.

मुंबई नं. ४, गिरगांव. मानेजर आर्यभिषक्.

गुणाः शरीरे गुणिनां निर्दिष्टाश्चिन्हमेव च ।
अर्थाः शब्दादयो ज्ञेया गोचरा विषया गुणाः ॥ ३० ॥
या यदिन्द्रियमाश्रित्य जन्तोर्बुद्धिः प्रवर्तते ।
याति सा तेन निर्देशं मनसा च मनोभवा ॥ ३१ ॥

ज्याच्या शरीरांत गुण असतात त्यास गुणी ह्मणतात. इन्द्रियांचे जे शब्दादि विषय त्यांस अर्थ ह्मणतात. त्यांसच गोचर, विषय व गुणही ह्मणतात. जी बुद्धि ज्या ज्या इंद्रियाचा आश्रय धरून प्रवृत्त होते तीस त्या त्या इंद्रियाचें नांव दिलें जातें. जसें जी बुद्धि मनापासून उत्पन्न होते तीस मनोभवा ह्मणतात.+

भेदात्कार्येन्द्रियार्थानां बह्वयो वै बुद्धयः स्मृताः ।
आत्मेन्द्रियमनोर्थानामेकैका सन्निकर्षजा ॥ ३२ ॥
अंगुल्यंगुष्ठतलजास्तन्त्रीवीणानखोद्भवः ।
दृष्टः शब्दो यथा बुद्धिर्दृष्टा संयोगजा तथा ॥ ३३ ॥
बुद्धीन्द्रियमनोर्थानां विद्याद्योगधरं परम् ।
चतुर्विंशक इत्येष राशिः पुरुषसंज्ञकः ॥ ३४ ॥

---

हेंच रहस्य प्रतिपादन केलें आहे. आकाशाचा धर्म अप्रतिघात आहे अर्थात् त्याचा स्पर्श होऊं शकत नाहीं. परंतु आकाशही स्पर्शनेन्द्रियज्ञेयच आहे. कारण स्पर्शच नव्हे तर स्पर्शाचा अभावही स्पर्शनेन्द्रियास कळतो असें वर सांगितलेंच आहे. एतावता पांचही महाभूतें व त्यांचे गुण हे सर्व स्पर्शनेंद्रिय-त्वचेनें जाणतां येतात.

+ ज्या पदार्थांत गुण असतात त्यास गुणी ह्मणतात. असे गुणी ह्मणजे आकाशादि पंचमहाभूतें होत. या पंचमहाभूतांचें हें शरीर बनलेलें आहे. या शरीरस्थ पंचमहाभूतांचे गुण सूत्रस्थानाच्या आत्रेयभद्रकाप्यीय अध्यायांत सांगितले आहेत. त्या ठिकाणीं हे गुण शरीरांत त्या पंचमहाभूतांचें आस्तित्व द्योतन करणारे आहेत असें वर्णन केलें आहे. गुण दोन प्रकारचे सांगितले आहेत. शब्दस्पर्शादि व गुरु-खरत्वादि. शब्दस्पर्शादि गुणांत पुन्हां दोन प्रकार आहेत. एक कारणगुण व दुसरा कर्मगुण. कारणस्थितींत त्यांपासून इंद्रियांची उत्पत्ति आहे व कर्मस्थितींत इंद्रियें त्यांचें ग्रहण करितात. सर्व पदार्थ पंचमहाभौतिक आहेत. त्यांचें ग्रहण करणारीं इंद्रियेंही स्वयं पंचमहाभौतिकच आहेत पंचमहाभूतांची कर्तृदशा व कर्मदशा सिद्ध आहे. बुद्धि

कर्मेंद्रियें व त्यांचे विषय यांच्या अनेकतेमुळें ज्ञान ( विचार ) हीं अनेक प्रकारचें होतें. आत्मा, इन्द्रियें, मन व इन्द्रियांचे विषय यांपैकीं प्रत्येकाच्या सान्निध्यापासून निरनिराळें ज्ञान उत्पन्न होतें. ज्याप्रमाणें बोटें, आंगठा, तार, वीणा व नखें यांच्या संयोगापासून अनेक भिन्न भिन्न शब्द उत्पन्न होतात, त्याचप्रमाणें आत्मा, मन, इंद्रियें व त्यांचे अर्थ यांच्या संयोगापासून अनेक प्रकारचें ज्ञान उत्पन्न होतें.* वर सांगितल्याप्रमाणें धातुभेदें करून झालेल्या चोवीस प्रकारच्या वस्तुसमुदायाचें नांव पुरुष असें आहे.

**रजस्तमोभ्यां युक्तस्य संयोगोऽयमनन्तवान् ।**
**ताभ्यां निराकृताभ्यान्तु सत्ववृद्ध्या निवर्तते ॥ ३५ ॥**
**अत्र कर्मफलं चात्र ज्ञानं चात्र प्रतिष्ठितम् ।**
**अत्र मोहः सुखं दुःखं जीवितं मरणं स्वता ॥ ३६ ॥**
**एवं यो वेद तत्वेन स वेद प्रलयोदयौ ।**

---

शब्द या ठिकाणीं फार व्यापक अर्थानें वापरला आहे. त्याचा उद्दिष्टार्थ विचार—कल्पना असावा असें दिसतें. या पंक्तीचें तात्पर्य असें कीं, जो विचार किंवा जी कल्पना ज्या इंद्रियाच्या द्वारा उत्पन्न होते त्यास त्या इंद्रियाचें नांव दिलें जातें. उदाहरणार्थ—कांहीं हिरवा पदार्थ पाहिला, तर हिरवेपणाच्या कल्पनेस चाक्षुष्य बुद्धि ह्मणावयाचें. नुस्तें गवत पाहिलें हीही चाक्षुष्यच बुद्धि. परंतु गवत हिरवें आहे ही मनोभवा किंवा मानसिक बुद्धि ( विचार ) होय. एक बरा वाईट सूर कानानें ऐकला त्यावरून गाण्याची कल्पना झाली ती श्रोतबुद्धि. पुढें हे सूर अमुक रागाचे आहेत, मृदु आहेत, अमुक श्रेणीचे आहेत इत्यादि भेद करणें ही मानसिकबुद्धि होय—ज्या ठिकाणीं तर्काचें काम असतें ती मानसिक बुद्धि समजावी.

* हा सतारीचा दृष्टान्त फार रमणीय आहे. सतारींत नाद ह्मणून जो पदार्थ आहे तो समष्टिदृष्टया एकच आहे. परंतु जसजसा निरनिराळ्या पडद्यांवर हात ठेवला जातो तसतसे निरनिराळे नाद अर्थात् ज्यांस आपण स्वर ह्मणतों ते उत्पन्न होतात. त्याचप्रमाणें ज्ञान हें तत्वतः सतारीच्या नादाप्रमाणें एकच पदार्थ आहे. परंतु सृष्टींतील पदार्थ व त्यांस ग्रहण करणारीं इंद्रियें हीं अनेक निरनिराळीं

यांच्याशीं रजोगुण व तमोगुणाचा संयोग झाल्यानें त्याचे असंख्य भेद होतात; आणि सत्ववृद्धीच्या योगेंकरून ते राजस व तामस गुण दूर झाले ह्मणजे त्याबरोबर सहजच तो असंख्य भेद करणारा संयोगही नाहींसा होतो. ज्ञान, मोह, सुख, दुःख, जीवन, मरण व अहंभाव ही सर्व पुरुषासच आहेत. याप्रमाणें तात्विक ज्ञान ज्यास झालें असेल तो सृष्टीची उत्पत्ति व प्रलय हीं देखील जाणूं शकतो.

**पारम्पर्यं चिकित्सा च ज्ञातव्यं यच्च किञ्चन ॥ ३७ ॥**
**भास्तमः सत्यमनृतं वेदाः कर्म शुभाशुभम् ।**
**न स्युः कर्ता वेदिता च पुरुषो न भवेद्यदि ॥ ३८ ॥**
**नाश्रयो नासुखं नार्तिर्न गतिर्नागतिर्न वाक् ।**
**न विज्ञानं न शास्त्राणि न जन्म मरणं न च ॥ ३९ ॥**
**न वन्धो न च मोक्षः स्यात्पुरुषो न भवेद्यदि ।**
**कारणं पुरुषस्तस्मात्कारणज्ञैरुदाहृतः ॥ ४० ॥**
**न चेत्कारणमात्मा स्यात्खादयः स्युरहेतुकाः ।**
**न चैषु सम्भवेज्ज्ञानं न च तैः स्यात्प्रयोजनम् ॥ ४१ ॥**

जर पुरुष नसता तर सृष्टीची परम्परा, चिकित्सा, ज्ञेय पदार्थ, प्रकाश, अंधकार, सत्यासत्य, वेद, शुभाशुभ कर्म, कर्ता, वेत्ता, पदार्थांचा परस्पर आश्रय, दुःख, गति, शांति, वाणी, विज्ञान, शास्त्र, जन्म, मरण, बंध, मोक्ष यापैकीं कांहीं एक नसतें. ह्मणूनच कारणज्ञ लोकांनीं पुरुषास कारण

---

असत्यामुळें सतारीच्या अनेक सुरांप्रमाणें ज्ञानाचेही अनेक प्रकार होतात. सतारींत निरनिराळे सूर उत्पन्न होण्यास—एका बाजूस तारांसह भोपळा व पडदे आणि दुसऱ्या बाजूस हाताचीं बोटें हीं कारण होतात, त्याचप्रमाणें निरनिराळें ज्ञान उत्पन्न होण्यास आत्मा व मन एका बाजूस आणि इंद्रियें व त्यांचे ग्राह्य पदार्थ हे दुसऱ्या बाजूस असतात. या ठिकाणीं ज्ञान शब्दाचा विचार अथवा कल्पना असा अर्थ घेतला पाहिजे. निरनिराळें ज्ञान ह्मणजे निरनिराळे विचार, निरनिराळ्या कल्पना होत.

ठरविलें आहे. जर पुरुषास ह्मणजे आत्म्यास कारण मानलें नाहीं तर आकाशादिकांचें कारणच मिळणार नाहीं, त्यांचें ज्ञान होणार नाहीं व झालें तरी त्याचा उपयोग नाहीं.

मृद्दण्डचक्रैश्च कृतं कुंभकारादृते घटम् ।
कृतं मृत्तृणकाष्ठैश्च गृहकाराद्विना गृहम् ॥ ४२ ॥
यो वदेत्स वदेद्देहं सम्भूय करणैः कृतम् ।
विना कर्तारमज्ञानाद्युक्त्यागमबहिष्कृतः ॥ ४३ ॥

जो मनुष्य, केवळ माती, दांडा व कुंभाराचें चाक यांच्यायोगानें कुंभारावांचूनच मडकें बनतें किंवा माती, गवत व लांकडें यांच्यायोगानें गवंड्यावांचून घर बनतें असें ह्मणत असेल तोच मात्र असें ह्मणेल कीं पृथिव्यादि पंचमहाभूतें एके ठिकाणीं मिळाल्यानेंच कर्त्यावांचून शरीर उत्पन्न होतें. अर्थात् वरील दोन्ही पक्ष एकसारखेच युक्ति व शास्त्राच्या विरुद्ध आहेत.

कारणं पुरुषः सर्वैः प्रमाणैरुपलभ्यते ।
येभ्यः प्रमेयं सर्वेभ्य आगमेभ्यः प्रतीयते ॥ ४४ ॥

ज्या सर्व वेदशास्त्रादि–प्रमाणांनीं यावत् प्रमेय जाणलें जातें त्याच सर्व प्रमाणांच्या योगानें पुरुष कारण आहे हें सिद्ध होतें ×

न ते तत्सदृशास्त्वन्ये पारम्पर्यसमुत्थिताः ।
सारूप्याद्यत एवेति निर्दिश्यन्ते नरान्नराः ॥ ४५ ॥
भावास्तेषां समुदयो निरीशः सत्वसंज्ञकः ।
कर्ता भोक्ता न स पुमानिति केचिद्व्यवस्थिताः ॥ ४६ ॥

× प्रमाण ह्मणजे पुरावा. ज्याच्या योगानें कोणती एखादी गोष्ट सिद्ध होते तें प्रमाण. जी वस्तु सिद्ध करावयाची–जाणावयाची–असते तें प्रमेय. पुरुष ह्मणजे परमात्मा, ज्याच्यापासून सृष्टींतील सर्व पदार्थांची मूळ उत्पत्ति होते तो. आतां पुरुष कारण आहे हें जाणावयाचें कसें? यावर सांगतात कीं, ज्या वेद–शास्त्रादिकांच्या प्रमाणांनीं व इतर पुराव्यांनीं आपण इतर सर्व पदार्थ जाणतों किंवा सिद्ध करितों त्याच पुराव्यांनीं आत्मा सर्व सृष्टीचा कारण आहे ही गोष्ट सिद्ध होते.

तेषामन्यैः कृतस्यान्ये भावाभावैर्नराः फलम् ।
भुञ्जते सदृशाः प्राप्तं यैरात्मा नोपदिश्यते ॥ ४७ ॥
करणान्यन्यता दृष्ट्वा कर्तुः कर्ता स एव तु ।
कर्ता हि करणैर्युक्तः कारणं सर्वकर्मणाम् ॥ ४८ ॥
निमेषकालाद्भावानां कालः शीघ्रतरोऽत्यये ।
भग्नानां न पुनर्भावः कृतं नान्यमुपैति च ॥ ४९ ॥
मतं तत्वविदामेतद्यस्मात्तस्मात्स कारणम् ।
क्रियोपभोगे भूतानां नित्यः पुरुषसंज्ञकः ॥ ५० ॥
अहङ्कारः फलं कर्म देहान्तरगतिः स्मृतिः
विद्यते सति भूतानां कारणे देहमन्तरा ॥ ५१ ॥

कांहीं लोकांचें असें मत आहे कीं, मनुष्यें एक दुसऱ्यापासून परंपरेनें उत्पन्न होत जातात. त्यांचें रूप व आकार हीं जरी तशींच असतात तरी वस्तुतः तीं निराळीं आहेत. फक्त एकाच नमुन्याचीं तीं आहेत असें ह्मणतां येईल. पुरुष हा जो समुदायरूप सांगितला आहे त्यांत ईशतत्व अर्थात् आत्मा नाहीं. तो कर्मांचा कर्ताही नाहीं व भोक्ताही नाहीं. जे अशा तऱ्हेनें आत्म्याचें अस्तित्व मानीत नाहींत त्यांच्या मतांत एका मनुष्याच्या कर्माचें फळ दुसऱ्यास भोगावें लागतें. वास्तविक पहातां सर्व कर्मांत साधनें निराळीं असतात परंतु कर्ता एकच असतो. कर्ता कर्मांनीं युक्त होत्साता सर्व कर्में करितो. कर्में निमिषापेक्षांही अल्पकाळांत नाश पावतात. आणि एकदां नष्ट झालेलीं कर्में पुन्हां परत येत नाहींत. एकानें केलेलें कर्म दुसऱ्यास लागत नाहीं असें तत्वज्ञ लोकांचें मत आहे. ह्मणून जो नित्य पुरुष आहे त्यासच सर्व कर्मांचा कर्ता व भोक्ता मानलें पाहिजे. तो कर्ता शरीरावांचूनही स्वतंत्र राहूं शकत असल्यामुळें अहंकार, कर्मफळ, कर्म, देहान्तरप्राप्ति व स्मृति हीं त्यास प्राप्त होतात.×

---

× हे श्लोक अत्यंत क्लिष्ट आहेत. वर जो यांचा उत्तानार्थ दिला आहे त्यावरून कांहीं समजत नाहीं. वास्तविक हे श्लोक ह्मणजे सूत्रें आहेत. यांवर विस्तृत विवेचन

प्रभवो न ह्यनादित्वाद्विद्यते परमात्मनः ।
पुरुषो राशिसंज्ञस्तु मोहेच्छाद्वेषकर्मजः ॥ ५२ ॥
आत्मा ज्ञः करणैर्योगाज्ज्ञानं तस्य प्रवर्तते ।
करणानामवैमल्यादयोगाद्वा न वर्तते ॥ ५३ ॥
पश्यतोऽपि यथाऽऽदर्शे सङ्क्लिष्टे नास्ति दर्शनम् ।
यद्वज्जले वा कलुषे चेतस्युपहते तथा ॥ ५४ ॥

---

केलें तरच यांचा भावार्थ लक्ष्यांत येणार आहे. त्यांतूनही हा विषय सांख्य—वेदांतादि दर्शनशास्त्रांचा आहे; त्या शास्त्रांची सामान्य तरी व्युत्पत्ति असल्यावांचून यांचा भावार्थ हृदयंगम होणें कठिण आहे. तरी यांचें सामान्य स्पष्टीकरण आह्मी पुढें करीत आहों. प्रथम असें सांगितलें कीं, एकापासून दुसरा, दुसऱ्यापासून तिसरा अशा परंपरेनें मनुष्यांची उत्पत्ति होऊन ही सृष्टी बनलेली आहे. ज्यापासून जो उत्पन्न झाला तो तत्वतः त्यापासून निराळा आहे. पूर्वी असें जे सांगितलें आहे कीं मनुष्य २४ तत्वांचा समुदाय आहे तें बरोबर नाहीं. वास्तविक तो २३ तत्वांचाच बनलेला आहे. ईशतत्व ह्मणजे आत्मा ज्याच्या योगानें हें जड शरीर सर्व क्रिया करण्यास समर्थ होतें, जो नित्य, अक्षय आहे आणि जो भूत वर्तमान व भविष्य या तीन्ही काळच्या जन्मांचा संबंध जोडतो, तो यांत नाहीं. हें लोकायतिक ह्मणजे बौद्धांसारखा एक सम्प्रदाय होता त्यांचें मत प्रतिपादन करून यांचें खंडन महर्षि आत्रेयांनीं पुढें केलें आहे. ते ह्मतात कीं तुह्मी आत्म्यास मानीत नाहीं. परंतु स्वर्ग-नरक किंवा पुनर्जन्मांत कर्मांचें बरें वाईट फळ भोगावें लागतें हें कबूल करतां. याचा परिणाम असा होतो कीं एकाचें कर्म दुसऱ्यास भोगावें लागतें. कारण जर आत्माच नाहीं तर मेलेल्या व नवीन जन्मलेल्या मनुष्यांचा संबंध काय ? आमच्या मताप्रमाणें आत्मा हा संबंध जोडतो तो तुमच्यांत नाहीं. अर्थातूच पूर्वी मेलेल्या एका मनुष्याच्या कर्मांचें फळ नवीन जन्मलेल्या निराळ्याच मनुष्यास भोगावें लागणार. उदाहरणार्थ-मनुष्य कानांनीं ऐकतो, डोळ्यांनीं पाहतो, नाकानें वास घेतो; अर्थात् तीं तीं कर्में करण्याचीं साधनें किंवा द्वारें निरनिराळीं आहेत. परंतु ऐकणें, पाहणें व वास घेणें या सर्व कर्मांचें फळ एकटाच मनुष्य भोगतो. यावरून काय सिद्ध झालें कीं शरीर हें कर्म करण्याचें एक साधन आहे. कर्ता आत्माच आहे. शरीर

परमात्मा अनादि असल्यामुळें त्याची उत्पत्तीच नाहीं अर्थात्च त्यास कर्त्याचें कारण राहिलें नाहीं. चौवीस तत्वांनीं बनलेला पुरुष ह्मणजे जीवात्मा, मोह, इच्छा व द्वेष–जनित कर्मांपासून उत्पन्न होतो. आत्मा ज्ञानी आहे व त्यास इंद्रियांच्या संयोगानें ज्ञान प्राप्त होतें. परंतु हीं मनबुद्ध्यादि इंद्रियें मलिन असल्यास किंवा त्यांचा आत्म्याशीं संयोग न झाल्यास ज्ञान उत्पन्न होत नाहीं. जसें आरशामध्यें जरी पारदर्शिता आहे तथापि तो मलिन झाला असतां दिसत नाहीं किंवा गढूळ पाण्यांत जसें प्रतिबिंब पडत नाहीं तद्वत्च मनबुद्ध्यादि ज्ञानसाधनें मलिन झालीं असतां ज्ञान होत नाहीं.

**करणानि मनो बुद्धिर्बुद्धिकर्मेन्द्रियाणि च ।**
**कर्तुः संयोगजं कर्म वेदना बुद्धिरेव च ॥ ५५ ॥**

मन, बुद्धि, ज्ञानेंद्रियें व कर्मेन्द्रियें, या सर्वांस करण ह्मणतात. कर्त्याचा यांच्याशीं संयोग झाला ह्मणजे त्यापासून कर्म, वेदना व ज्ञान यांची निष्पत्ति होते.

---


नाहींसें झालें तरी तो आत्मा ज्या कोणत्याही स्थितींत जाईल त्या स्थितींत आपल्या कर्मांचें फळ भोगतो. या आक्षेपावर जर तुह्मीं कदाचित् असें ह्मणाल कीं, स्वर्ग–नरक पुनर्जन्म या निव्वळ मिथ्या कल्पना आहेत. जें कांहीं कर्मफळ भोगावें लागत असेल तें याच जन्मांत भोगावें लागतें. आणि कर्मफळा करितां कांहीं आत्म्यास मानण्याचें कारण नाहीं. तर आह्मीं ह्मणतों कीं तुमच्या सिद्धान्ताप्रमाणें सर्व पदार्थ क्षणिक आहेत. एक निमिषाच्या आंत त्यांचा नाश होतो. कारण सर्वकालावच्छेदें करून राहणारा जो आत्मा तो तुह्मीं मानीत नाहीं. एक स्थिति गेली, लागलीच दुसरी आली ती गेली तिसरी आली. गेलेली स्थिति परत येत नाहीं. अशा स्थितींत कर्म भोगणार कोण ? आत्मा तुमच्यांत नाहींच, तेव्हां कर्मही गेलें व फळही कोणी भोगणारा नसल्यामुळें गेलें. तेव्हां या कोटीनें ही तुमच्या वरचा पहिला आक्षेप न जातां उलट दुसरा एक उत्पन्न होतो. ह्मणून आह्मीं पुरुषास कर्ता व भोक्ता मानतों. तो पुरुष नित्य आहे. त्यानेंच कालाची व निरनिराळ्या स्थितींची परम्परा शृंखलेंत बद्ध करून टाकिली आहे. तो अक्षय आहे. बाकीचीं जीं २३ तत्वें आहेत तीं निरंतर बदलत असतात. ह्मणून आत्मा न मानल्यास २३ तत्वांच्या समुदायरूपी एका पुरुषानें कर्म करावें व दुसऱ्या समुदायानें त्याचें फळ भोगावें हा विसंगतपणा येतो. तो न यावा ह्मणून एक नित्य, स्वतंत्र व परंपरेचा निरंतर संबंध जोडणारी व्यक्ति मानावी लागते व ती आत्मा होय.

नैकः प्रवर्तते कर्तुं भूतात्मा नाश्नुते फलम् ।
संयोगाद्वर्तते सर्वं तमृते नास्ति किञ्चन ॥ ५६ ॥
न ह्येको वर्तते भावो वर्तते नाप्यहेतुकः ।
शीघ्रगत्वात्स्वभावात्तु भावो न व्यतिवर्तते ॥ ५७ ॥
अनादिः पुरुषो नित्यो विपरीतस्तु हेतुजः
सदा कारणवन्नित्यं दृष्टं हेतुजमन्यथा ॥ ५८ ॥
तदेव भावादग्राह्यं नित्यत्वान्न कुतश्चन ।
भावाज्ज्ञेयं तदव्यक्तमचिन्त्यं व्यक्तमन्यथा ॥ ५९ ॥

भूतात्मा ह्मणजे पुरुष अथवा जीवात्मा कोणतेंही कर्म एकटा करूं शकत नाहीं. तसेंच त्याचें फळही तो एकटा भोगीत नाहीं. सर्व कांहीं संयोगानें होतें. त्यावांचून कांहीं होऊं शकत नाहीं. कोणतीही ×उत्पन्न झालेली वस्तु एकटीही राहू शकत नाहीं. ती अहेतुक ही असत नाहीं ह्मणजे तिचा हेतु अर्थात् कारण असल्यावांचून राहत नाहीं आणि ती आपल्या शीघ्र परिवर्तनशील स्वभावाचें अतिक्रमण हीं करूं शकत नाहीं. अनादि पुरुष जो आहे तो नित्य आहे व जो कारणापासून झालेला असतो तो अनित्य समजावा. कारण, हा पक्का सिद्धांत आहे कीं, जी वस्तु कोणत्याही कारणापासून बनलेली असते ती नेहमीं अनित्य असावयाची व जो पदार्थ स्वतःसिद्ध असा असतो तो नित्य असतो. नित्य अनादि पदार्थाचें दुसऱ्या कोणत्याही उत्पन्न झालेल्या पदार्थाच्याद्वारें ग्रहणही होऊं शकत नाहीं किंवा त्याचें ज्ञानही होऊं शकत नाहीं. असा जो पुरुष तो अव्यक्त, अचिंत्य आहे. आणि याशिवाय सर्व व्यक्त आहे.*

---

× 'भाव' हा शब्द 'भू' ह्मणजे होणें या धातूपासून उत्पन्न झालेला आहे. याचा अर्थ कोणतीही उत्पन्न झालेली, सकारण वस्तु असा होतो. अर्थातूच अनादि परमात्म्याहून तो निराळा आहे. ५६।५७ श्लोकांत तीन सिद्धान्त सांगितले आहेत. एक हा कीं कोणतीही उत्पन्न झालेली वस्तु एकटी राहू शकत नाहीं. दुसरा प्रत्येक उत्पन्न झालेल्या वस्तूचें कारण असतें व तिसरा प्रत्येक पदार्थांत जो बदलण्याचा स्वभाव आहे त्याचें कोणतीही वस्तु उल्लंघन करूं शकत




जगद्दर्शक प्रेस, मुं०

## १४. अघाडा.

**संस्कृत नांवें.**—अपामार्ग, शेखरी, किणिही, खरमंजिरी, अधश्शल्या, दुर्ग्रहा, प्रत्यक्पुष्पी, मयूरिका, काण्डकण्ठ, शैखरिका, मर्कटी, पराक्पुष्पी, वशिरा, कण्टी, मर्कटपिप्पली, कण्टमञ्जरिका, झटा, क्षवक, पङ्क्तिकण्टक, मालाकण्ट, कुब्जक, कर्कटपिप्पली, क्षारमध्या, मार्गदन्ता, धामार्गव. **गु०** अवेडो. **बं०** अपांग. **मा०** सफेद आंधी झाडो. **राज०** अंधी होली. **कर्णा०** उत्तरणे. **तै०** उत्तरेनि, दुच्चीगीके. **ता०** नायुरुवि. **मला०** कडा-लाडी. **फा०** खारवासूगानो. **अ०** अत्कुमाह. **इं०** Rough chaff tree रफ चॅफ ट्री. **ला०** Achyranthes aspera. एकिरेन्थिस एस्पेरा.

**वर्णन.**—हें एक आपोआप वाढणारें जंगली झुडुप आहे. हें वर्षायु आहे. याची उंची ४ पासून ६ फूट पर्यंत असते. पावसाळ्यांत याची उत्पत्ति पुष्कळ होते. अघाडा हिंदुस्थानांत सर्वत्र विपुल होतो. याच्या दांड्यावर रेषा व फार बारीक लव असते. यास पानें समोरासमोर येतात व त्यांचा आकार कांहींसा तुळशीपत्रांसारखा लांबट-वर्तुळ असतो. पानांची वरची बाजू नरम असून, मागची कांहींशी खरबरीत असते व तिजवर फार बारीक लव असते. दांड्याच्या दोन्ही बाजूंनीं दोन दोन देंठ एकास एक लागून निघतात. खालच्या देंठावर बहुतकरून एक पान असतें व वरचा देंठ खांदी सारखा असून त्यावर लहान लहान देंठावर बहुशः ६-६ पानें असतात. तीं पानें सन्मुख असतात. खालच्या देंठापेक्षां वरचा देंठ लांब असतो. अघाड्याच्या शेंड्याकडे पानांच्या मधून एक लांब तुरा निघतो. त्यांत अतिशय बारीक, नरम, कांटेदार व राखाडीसारख्या रंगाचें बीं असतें. हें समग्र झुडुप व याचें बीं औषधाच्या उपयोगीं पडतें. अघाडयाच्या तीन जाति आहेत. पांढरा, तांबडा व पाण अघाडा. तिहींत पांढरा अघाडा गुणांनीं श्रेष्ठ आहे.

अघाडयाचीं बहुतेक संस्कृत नांवें अन्वर्थक आहेत. याच्या क्षारांत अपामार्जन करण्याचा ह्मणजे स्वच्छ करण्याचा गुण आहे; ह्मणून यास

अपामार्ग हें नांव पडलें आहे. याच्या फुलांची मंजिरी खरखरीत असते ह्मणून खरमंजिरी हें नांव पडलें आहे. याचें कुसू खालीं वळलेलें असतें ह्मणून अधश्शल्या नांव दिलें. याच्या पानांत क्षारविशेष असतो ह्मणून यास क्षारमध्या ह्मणतात. हा क्षार कार्बोनेट ऑफ पोटाशरूपाचा आहे. शंभर भार वजनाच्या द्रव्यांत ( पानांत २१.५०; बुंधांत ३८.०१ व मुळांत २८.५८ ) या प्रमाणांत क्षार सांपडतो. अघाडयाची राख जमिनीच्या खताच्या चांगली उपयोगीं पडते. आवाडयांत थोडा बहुत स्तंभक धर्म आहे.

**गुणदोष** व **औषधि उपयोग** व. गु. द. १ ल्या भागांत विस्तारानें दिले आहेत. त्याशिवाय—**जलोदरावर**—अघाडयाच्या पांच तोळे ओल्या कांडया घेऊन, त्यांत ७५ तोळे पाणी घालून ५० तोळे काढा उरवावा आणि गाळून ठेवून दर वेळीं ५ तोळे प्रमाणें घ्यावा. **शर्करा**रोगावर—अघाडयाचा क्षार, गोखरू अथवा पहाडमुळाच्या काढ्यांतून द्यावा. **व्रण भरून येण्यास**-अघाडयाचा क्षार जखमेवर लावावा.

## १५. भुईकोहळा.

**संस्कृत नांवें**—विदारिका, स्वादुकन्दा, सिता, शुक्ला, शृगालिका, वृष्यकन्दा, विडाली, वृष्यवल्लिका, भूकूष्माण्डी, स्वादुलता, गजेष्टा, वारिवल्लभा, कंदफला, इक्षुविदारी, वल्लिशाकफल, श्रेष्ठकन्दा, इक्षुवल्लरी, कंदवल्ली, वृष्यफला, इक्षुकन्दा, इक्षुलता, वृष्पर्णी, क्रोष्टी, गजवाजिप्रिया, पयस्विनी, क्षीरवल्ली, पयःकन्दा, पयोलता, क्षीरकन्दा. **गु०** फगवेलानो कंद, भोकोलुं. **हिं०** बिलाईकंद, विदारीकंद. **बं०** भुंईकूमडा. **क०** नेलकुंबल. **तै०** नेलगुंबुडु. **ता०** मद्रापलतिगु. **मला०** मुतालक्कांता. **औत्कल**—भुइकरवारु. **ला०** Ipomoea Digitata. आयपोमिया डिजिटेटा. ( Batatas-paniculata )

**वर्णन**—ही एक बहुवर्षायु वेल आहे. हिची उत्पत्ति हिंदुस्थानांत बहुतेक ठिकाणीं होते. कुंपण व झाडीतून ही पुष्कळ वाढते. इच्या दोन जाति आहेत. साधा भुइकोहळा व दुसरा पांढरा अथवा दूध भुईकोहळा. संस्कृतांत जीस पयस्या नांव आहे ती पांढऱ्या भुईकोहळ्याची जात होय.

या ठिकाणीं आह्मीं चित्र दिलें आहे तें पांढऱ्या अथवा दूध—भुइकोहळ्याचें आहे. साध्या भुइकोहळ्याचीं पानें त्रिदळ असतात. याचे वेल घोडे खातात; ह्मणून या वेलीस वाजिप्रिया असें संस्कृतांत नांव दिलें आहे व याच अर्थास अनुसरून मराठींत घोडवेल असें ह्मणतात. हत्तीसही हे वेल आवडतात, ह्मणून त्यास गजेष्टा, गजप्रिया हीं नावें पडलीं आहेत. या वेलीचीं बहुतेक नांवें इच्या कंदाच्या गुणांवरून अन्वर्थक अशीं पडलेलीं आहेत. स्वादुकन्दा, सिता, वृष्यकन्दा, स्वादुलता, इक्षुकन्दा इत्यादि सर्व नांवें, भुइकोहळ्याच्या कंदांतील वृष्यत्व व माधुर्य हे दोन प्रधान गुण द्योतन करणारीं आहेत. भुइकोहळ्याचीं पानें एकांत्राड, लांब देंठाचीं, तळहातासारखीं विभागलेलीं पांचखंडाचीं असतात. प्रत्येक खंड ३ पासून ६ इंच लांबीचें असतें व पानाच्या मुख्य भागाकडे बरेंच लांब त्रिभागलेलें राहतें. पानें गुळगुळीत व सबंध कांठांचीं असतात. यास पावसाळ्यांत फुलें येतात. तीं पानांच्या कांखेंतून येतात व मोठीं, झुपकेदार आणि गहिऱ्या तांबूस जांभळ्या रंगाचीं असतात.

भुइकोहळा ( कंद ) बाहेरच्या अंगानें राखाडी अथवा मळकट पिवळ्या रंगाचा असून, त्यावर टेंगळें आल्यासारखीं दिसतात. त्याचा आडवा छेद केला असतां, त्याच्या पृष्ठभागावर वार्षिक वाढीचीं वर्तुलें दिसून येतात. त्याच्या परिघाकडे दुग्धवाहिनीचीं कापलेलीं मुखें नजरेस येतात व त्यांतून चिकट दुधासारखा पदार्थ निघतो. हा खाल्ला असतां त्याची तुरट—गोड रुचि लागते व कांहीं वेळानें जिभेस किंचित् खरख सुटते.

याचे गुणदोष व औषधिप्रयोग व. गु. ४ थ्या भागांत सांगितले आहेत ते पहावे. त्याशिवाय—( १ ) भुइकोहळ्याच्या कंदाचें चूर्ण मद्यांतून घेतलें असतां बाळंतिणीस दूध वाढतें. ( २ ) अशक्त, रोडावलेलीं व ज्यांस बरोबर अन्न पचन होत नाहीं अशा मुलांस भुइकोहळा, गव्हांची कणीक, व जवांचें पीठ हीं समभाग घेऊन त्यांत दूध, तूप, साखर व मध हीं मिळवून खाय बनवून द्यावें. ( ३ ) भुइकोहळ्याच्या चूर्णास त्याच्याच स्वरसाच्या

भावना देऊन, तें तूप व मधांतून घ्यावें ह्मणजे उत्तम प्रकारें धातुपुष्टि होते. (४) मूत्रकृच्छ्रावर—भुइकोहळा, गोखरू, ज्येष्ठमध व नागकेशर हीं औषधें समभाग घेऊन त्यांचा काढा करून तो मध टाकून घ्यावा. याच काढ्यांत रससिन्दूर मिळवून देण्याचा पाठही आढळतो.

## १६. जायफळ.

**संस्कृत नांवें**—जातीफल, जातिसस्य, शालूक, मालतीफल, मज्जासार, जातिसार, पुट, सुमनःफल, कुसुम्भफल, जातिकोश, जातिज, मालती, सुत, मदशौंड, जातिसुत, कोपक. **गुज०** जायफळ. **हिं० बं० क०**—जायफल. **तै०** जाजिकाया. **ता०** जोडिकाय. **तु०** जाजिकायि. **मला०** जातिकामारं. **ब्रह्मी**—जादिक्षु. **फा०** जोझेबुवा. **अ०** जोझउल्तती. **ब० इं०** nutmeg नटमेग. **ला०** Myristica officinalis M. Moschata मिरिस्टिका मोस्केटा.

## जायपत्री.

**संस्कृत**—जातिपत्री, जातिकोशा, सुमनःपत्रिका, मालतीपत्रिका, सौमनशायिनी, जातिपर्णी, सौमनसा. **गु०** जावंत्री. **हिं०** जावित्री. **बं०** जायित्री. **क०** जायपत्री. **तै०** जाजिपत्री. **फा०** जवित्री, बजवार. **अ०** बिसबासा. **इं०** Mace मेस. **ला०** Myristica Fagrans मिरिस्टिका फेग्रन्स.

**वर्णन**—हा एक मोठा वृक्ष आहे. याच्या ८० उपजाति आहेत असें उद्भिज्ज परीक्षक मानतात. त्यापैकीं हिंदुस्थानांत व मलयद्वीपकल्पांत २० जाति आढळतात. याचें मूळ उत्पत्तिस्थान मोलक्का बेटें व बांडा मुलुख होय. परंतु हल्लीं सुमात्रा, सिंहल् द्वीप, जावा, पिनांग आणि पॅसिफिक व हिंदुस्थानच्या महासमुद्रांतील बेटांतही याची उत्पत्ति पुष्कळ होते. बांडा व मोलक्काबेटें, ईस्ट इंडिया कंपनीच्या ताब्यांत १७९६ सालापासून १८०२ पर्यंत होतीं. त्या वेळीं रॉक्सबर्ग साहेबानें जायफळाचीं कांहीं झाडें मागवून कलकत्त्याजवळ हावडा येथील सरकारी बागेंत लावलीं होतीं. त्यांस तेथील हवा इतकी उत्कृष्ट मानवली, कीं सन १८०९ सालीं त्या ठिकाणीं ६६००

झाडें होऊन त्यांवर फळें व पत्रीही उत्कृष्ट प्रकारची झाली. जायफळाचीं झाडें दोन प्रकारचीं असतात. नर व मादी. मादी जातीचीं फुलें एकाकी तोकड्या मंजिरीवर येतात. व त्या जातीच्या झाडावरील पानें रुंद–भाल्याच्या आकाराचीं, गुळगुळीत व दडस असतात. ज्याचीं पानें मोठीं असतात त्याचें नांव Myristica Macrophylla आहे. याचीं पानें कुसकुरलीं असतां किंचित् सुवास येतो. तीं ३ पासून ६ इंच लांब व १॥ इंच रुंद असतात. जायफळाचीं पानें एकांत्राड येतात. यास लहान, पांढऱ्या रंगाचीं, घंटेच्या आकृतीचीं फुलें येतात. त्यांस (पुष्प) कोश नसतो.

जायफळ हें फळांतील एकाकी बी आहे. हें फळ लेंबर्ते, २ इंच व्यासाचे, मध्यम प्रतीच्या पेरूएवढें असतें. त्याची त्वचा सफेत, सुवासिक व $\frac{1}{6}$ इंच जाडीची असते. तिच्या मध्यभागीं उथळ खांचणी असते. फळ पिकलें ह्मणजे ही वरची त्वचा फाटून आंतील त्रियेसभोंवती असलेलें लाल जर्द रंगाचें जाळीदार वेष्टन नजरेस पडतें. या वेष्टनासच जायपत्री ह्मणतात. त्रियेवर ज्या ज्या ठिकाणीं पत्रीचे भाग बसलेले असतात तितक्या जागेवर तिचे ठसे उमटलेले असतात.

जायपत्रींत सुगंधी उडणारें तेल ८ टक्के प्रमाणानें असतें. त्याशिवाय एक चिकट रोगणही असतें. उडणारें तेल वायूच्या कळा बंद करण्यासाठीं त्वचेवर चोळलें असतां चांगला गुण करितें व त्यांतलें घट्ट तेल, दाह उत्पन्न करणाऱ्या इतर पदार्थांबरोबर मिसळतां येतें.

**जायफळाची घटना.**—जायफळांत तवकीर, अलबुमेन सत्व (ओज), घट्ट तेल व सुगंधी अथवा किंचित् उडणारें तेल शेंकडा ३ पासून ८ टक्के प्रमाणांत सांपडतें. तें पातळ व गवती रंगाचें असतें. याची रासायनिक घटना (क ६) व (है १०) सममूल्यांश एकत्र झाल्यानें बनली आहे. हें तेल १६९ सेंटिग्रेडच्या उष्णमापकावर कढतें. चरबी $\frac{1}{4}$ प्रमाणें सांपडते. जें जायफळ भरींव, स्निग्ध व जड असेल तें उत्तम; व वजनांत हल्कें, पोकळ व स्पर्शास खरखरीत असेल तें हल्कें समजावें. उत्तम जायफळें

इकडे फार थोडीं येतात. तीं बहुतेक विलायतेस जातात. त्यांची किंमतही २॥ रु. रतलापर्यंत असते. जायफळाचें वट्ट तेल १०६ अंशांवर वितळतें. जायफळाची चरबी १०५ थंड मद्याकांत व २८ ऊन मद्याकांत विरघळते. ही ईथर, बेंझुलिन, ॲसेटिक ॲसिड व बायसल्फाइड ऑफ कारबन या इंग्रजी मिश्रणांतही विरघळते. जायफळाची चरबी, मेणबत्त्या करण्यास फार उपयोगी पडते. थॉमस क्रिस्टी साहेबाच्या साह्यानें साबण तयार करण्यांतही या चरबीचा उपयोग केला जातो. जायफळाच्या चरबीपासून तयार केलेल्या साबणाचा व मेणबत्त्यांचा उपयोग लंडन व पारिसमध्यें बराच होतो.

जायफळाचे गुणदोष व औषधि उपयोग वनौषधिगुणादर्शाच्या ३ऱ्या भागांत विस्तारानें दिले आहेत. त्याशिवाय कांहीं माहिती येथें देतों. जायफळ दुधांत उगाळून अजीर्णावर द्यावें. अर्धे जायफळ खाल्लें असतां मद चढतो. अजीर्णापासून उन्हाळ्यांत होणाऱ्या हगवणींत तुपाबरोबर अथवा लोण्यांतून -।- तोळा जायफळाची बुकी खावी. डॉक्टरलोक ॲरोमेटिक पावडर नांवाची जी सुवासिक भुकी बनवितात तींत जायपत्रीचा व लवेंडरचा अर्क तयार करण्यांत, जायपत्रीच्या तेलाचा उपयोग करितात. १ भाग जायफळाचें तेल, ९ भाग दारूच्या अर्कांत पचविलें ह्मणजे त्याचा अर्क तयार होतो. जायफळाची पाऊण तोळा बुकी घेतली असतां भ्रम होतो व कांहीं वेळ बेशुद्धि होते असा अनुभव घेतलेला आहे. जायफळाचा फांट, कॉलेऱ्यांत पिण्यास दिला असतां तृषा शमन होते. ज्या बालकास आईचें दूध सोडवितेवेळीं अनेक प्रकारचे विकार होतात त्यांसही हा फांट हितकर आहे. जायपत्री उत्तेजक आहे. संधिवातांत इचें तेल गुणकारी आहे. कॉलऱ्यांतहि घेतली असतां तृषा शमन होते. **जातीफलादिगुटिका**—( महामारीवर ) जायफळ, सैंधव, हिंगुळ, शुद्ध कपर्दिक भस्म, सुंठ, अफू शुद्ध, धोत्र्याचें बीं शुद्ध, व पिंपळी हीं समभाग घेऊन, निंबाचे रसांत, धोत्र्यांचे बियांचे काढ्यांत अथवा भांगेच्या काढ्यांत भावना देऊन, गुंजप्रमाण गोळ्या करून पैसाभर ताक, भाजलेला हिंग हरभऱ्या एवढा व सैंधव मासाभर

एकत्र करून त्यांतून एक गोळी द्यावी; ह्मणजे ढाळ वांति तत्काळ बंद होतात. ही गोळी विड्यांत दिली असतां वीर्यवृद्धि होते. **जातीफलादिवटी** ( अतिसारावर ) जायफळ, खारीक व अफू समभाग घेऊन, विड्याच्या रसांत खलून चण्याप्रमाणें गोळ्या करून ताकाशीं द्याव्या ह्मणजे कसलाही जबरदस्त अतिसार असला तरी बंद होतो.

## १७. चित्रक.

**संस्कृत नांवें**—चित्रक, अग्नि, शार्दूल, चित्रपाली, कुट, शिखी, कृशानु, दहन, व्याल, ज्योतिष्क, पालक, अनल, दारुण, वान्हि, पावक, शवल, पाठी, द्वीपी, चित्रांग, शूर, पाठीन, वल्लरी, हवि, हुताशन, अरुण, ज्योति, हुतभुक्, ज्वलन, शठ, ज्याल, दीपसंज्ञ, उषण. **गु.** चित्रो. **हिं. बं.** चीता. **क.** चित्रमूल. **तै.** चित्रमूलम्. **ता.** कोदिवेल्ल. **तु.** बोलडू चित्रमूल. **म.** टंपकोटुवेलि. **ब्रह्मी**—खेन्-इन्. **फा.** बेखबरंदा. **अ.** शितरज्ञ. **मल्या.** Plumbago Zeylanica प्लंबागो झिलानिका.

**वर्णन**—हें एक तीन चार फूट उंचीचें झुडप आहे. हिंदुस्थानांत सर्वत्र आपोआप होतें. याचीं मोटमोठीं बेटें वाढतात. याच्या पानांचा नियम नसतो. कांहीं ठिकाणीं तीं समोरासमोर असतात, क्वचित् एकांत्राड येतात व कांहीं वेलासारखीं त्रिदळ असतात. पानांचे देंठ अगदीं लहान असतात. चित्रकांत पांढरा व तांबडा अशा दोन जाति आहेत. दोहोंत फरक इतकाच कीं, पांढऱ्याचीं फुलें व पानांचे देंठ पांढरे असतात व तांबड्याचे तांबडे असतात. बाकी, पानें वगैरे सारखींच असतात. चित्रकाच्या पत्रदंडांवर बारीक बारीक रेषा असतात. व त्या योगानें दांडी किंचित् पिळवटलेली दिसते. यास जाईच्या फुलासारख्या फुलांचे झुबके येतात. फुलांचे देंठ लांब असून त्यांस लवदार पुष्पकोण असतो. ग्रंथांतरीं किरमिजी, धूसर, काळ्या, पिंवळ्या रंगाच्या फुलांचाही उल्लेख आढळतो. परंतु त्या जाती दुर्मिळ आहेत. पांढऱ्या व तांबड्या फुलांच्या जाति सर्वत्र मिळतात. या दोहोंपैकीं तांबडी जात गुणांनीं श्रेष्ठ आहे. काळ्या चित्रकाचे असे गुण लिहिले आहेत, कीं त्याच्या

भक्षणानें केंस काळे होतात. गाईनें झाडाचा वास घेतला असतां किंवा त्याची मुळी दुधांत टाकली असतां दुध काळें होतें. इंग्रजींत तांबड्या चित्रकास Plumbago Rosea ह्मणतात व इंग्रजी उद्भिज्जशास्त्रकारांनीं याचें Plumbaginecea प्लंबाजिनेशी नामक वृक्षकुल ठरविलें आहे.

चित्रकाच्या मुळाची ओली साल पाण्यांत वांटून लाविली असतां कातडी जळून जाते अर्थात् याच्या मुळांच्या सालींत 'लास्तरप्रमाणें दाहयुक्त सूज व फोड उत्पन्न करण्याचा धर्म आहे. हे गुण यांत असल्यामुळें यास अनल, वन्हि, पावक वगैरे एकंदर अग्नीचीं पर्यायवाचक नांवें, अन्वर्थकतया दिलीं आहेत. डॉ. ओशॉनेसी, चित्रकाच्या मुळाची सालीची बुकणी करून ती पाण्यांत कालवून त्यांत थोडें तांदुळाचें किंवा गव्हांचें पीठ मिळवून त्याची वडी करून पलिस्तरासारखी वापरीत असत. चित्रकाच्या मुळांतून Plumbagine प्लंबाजीन नांवाचें एक राळेसारखें सत्व निघतें. तें पाण्यांत विरघळतें. चित्रकाच्या मुळाची साल वांटून गळवांवर लावली असतां, गळू लवकर पिकून फुटतें. तांबड्या चित्रकाच्या मुळाच्या आंगीं दाहक गुण असल्यामुळें तें गर्भाशयाच्या तोंडांत प्रविष्ट केलें असतां गर्भपात होतो. डॉ. उदयचन्द्रदत्त यांनीं याचा दुसरा एक महत्वाचा उपयोग पाहिल्याचें लिहिलें आहे. एका विवाहित स्त्रीस एकाएकीं गर्भपात होऊन अतिशय रक्तस्राव होत असतां तीस इस्पितळांत नेण्यांत आलें. त्या वेळीं तिच्या बस्तींत अतिशय वेदना होत होत्या, योनिमार्गांतून पुवाचा स्राव होत होता व अंगांत जोराचा ताप होता. या बाईची तपासणी करितां; तिच्या योनिमार्गांतून लाल चित्रकाच्या मुळीचा तुकडा, त्याच्या सभोंवतीं लहानशीं चिंधी गुंडाळलेला दृष्टीस पडला. चौकशीअंतीं कळून आलें, कीं गर्भपात झाल्यानंतर होणारा रक्तस्राव बंद करण्याकरितां ती मुळी सुइणीनें गर्भाशयांत प्रविष्ट केला होती. तांबड्या चित्रकाच्या मुळीचें चुर्ण पोटांत घेतलें असतां जिवंत किंवा मृत गर्भाचें पतन होते. चित्रकळाची मुळी अधिक प्रमाणांत घेतली असतां विषाप्रमाणें परिणाम करिते; ह्मणून याचा विषारी औषधांत समावेश केला जातो. चित्रक

(३७३) जीं तरुण मनुष्यें, आपण थोडक्याच काळांत श्रीमंत होऊं अशी उमेद बाळगतात, त्यांनीं श्रीमंत झालेल्यांचीं पुष्कळ नांवें कागदावर विचारपूर्वक लिहून काढावींत; ह्मणजे संपूर्ण विचारान्तीं त्यांना असे स्पष्ट कळून येईल, कीं पुष्कळ लोक पन्नास वर्षांनंतर श्रीमंत झाले आहेत.

(३७४) उष्णकाळांत दुपारचेपूर्वी पाणी पिण्याचें मान जेवढें कमी ठेवाल तेवढें तुह्मांस रात्रीं सुखावह जाईल.

(३७५) जो मनुष्य कांहीं एक उद्योग न करितां, केवळ दैवावर भरंवसा ठेवून जरी शंभर वर्षे पावेतों बसला, तरी त्याची इच्छा कधींच पूर्ण होणार नाहीं. तर जो सतत उद्योग करीत असेल, तोच यशस्वी होऊन त्याचेच संपूर्ण मनोरथ पूर्ण होतील.

(३७६) ज्यांचें दैव एक दिवसांत उघडून, जे श्रीमंत झाले आहेत अशा कांहीं लोकांचीं नांवें तुह्मी मनांत आणलींत तर तुह्मांस असें खास कळेल, कीं—त्यांपैकीं कांहीं मरण पावले, कित्येकांना वेड लागलें व पुष्कळ गरीबही झाले आहेत. वास्तविक पाहिलें, तर कोणी श्रीमंत राहिले नाहींत.

(३७७) जगांत यशस्वी होण्यास ह्मणजे पैसा व अन्न मिळण्यास कोणतीही अडचण आली, तरी तिचें निवारण करण्याचें सामर्थ्य, हिंमत व धैर्य, मनुष्यांचे अंगीं असलेंच पाहिजे.

(३७८) खालीं लिहिलेल्या सहा मुख्य बाबती न करण्याजोग्या आहेत व त्या तुह्मीं कधींही करूं नकाः—(१) दारू पिणें. (२) तंबाखू खाणें. (३) तंबाखू ओढणें. (४) शपथ वाहणें. (५) फसविणें. (६) जामिन होणें.

(३७९) चांगली प्रकृति असो अगर बिघडलेली असो, या दोन्हीं स्थितींत, बर्फ खाणें व त्याचे तुकडे गिळुन जाणें, हा तहान भागविण्यास सर्वोत्तम उपाय आहे, मस्तकास अगर शरीराचे कोणतेही भागास सूज आली असल्यास बर्फाचे तुकडे करून, एका पिशवींत घालून, ती पिशवी त्या सुजलेल्या भागावर ठेविली असतां तात्काळ गुण येतो. बर्फाच्या पाण्याचें "अंतःक्षेपण" (Injection) (पिचकारीनें मारणें) केल्यानें हगवण व अतिसारासारखे रोग बरे होतात.

(३८०) धनसंचय करणें अशा दृष्टीनें जो मनुष्य स्वतःचें सर्व आयुष्य केवळ पैसा सांठविण्यांत घालवितो व प्राणोत्क्रमण होईपावेतों पैशाला सोडीत नाहीं, तो स्वहितपराङ्मुख होतो व त्याला स्वर्गप्राप्ति कधींही होणार नाहीं.

(३८१) उन्हाळ्यांत बर्फाचें पाणी प्याल्यानें तें प्रकृतीस मानवणार नाहीं. कारण, जसजसें तुह्मीं बर्फाचें पाणी प्याल तसतसें तें तुह्मांस जास्त प्यावेंसें वाटेल. बर्फाचे पाण्यापेक्षां त्याचा पांचवा हिस्सा, तुकडे करून गिळल्यानें तहान उत्तम भागते. [ नुसतें कढत पाणी प्याल्यानें देखील तहान भागते. ]

(३८२) आपणांस इहलोक सोडून ज्या अन्य लोकीं जावयाचें आहे, त्या लोकीं सुखप्राप्ति होण्याच्या हेतूनें जो इहलोकीं सदाचरणांत आपलें आयुष्य घालवितो, तोच जन्माचें सार्थक करीत आहे व आपलें खरें कर्तव्य बजावीत आहे असें ह्मटलें पाहिजे.

(३८३) परमेश्वरानें मनुष्यास काम करण्यासाठींच उत्पन्न केलें आहे. परंतु (१) दुसऱ्याचे उपयोगीं पडणें, (२) अब्रूनें दिवस घालविणें व (३) स्वधर्मानें चालणें या तीन मुद्याच्या गोष्टी लक्षांत धरूनच प्रत्येकानें काम केलें पाहिजे.

(३८४) एखादा मनुष्य काम करण्याच्या नादांत इतका गढून जातो, कीं वाचनास अभ्यासास व आपली मानसिक स्थिति सुधारून ज्ञान वाढविण्यास त्याला मुळींच वेळ मिळत नाहीं. ह्मणजे असें खास समजावें, कीं त्याची एक प्रकारच्या नीच दास्यवृत्तीकडे ( Degrading Slavery ) प्रवृत्ति झाली आहे व त्यामुळें त्याच्या रीतीभातींत, मनोवृत्तींत, उमेदींत व विचारशक्तींत कधींच सुधारणा होत नाहीं.

(३८५) लोकांस समजलें तर दुःख उत्पन्न होईल असें एखादें अविचारानें केलेलें वाईट कृत्य केल्याशिवाय, आयुष्याच्या मध्यावस्थेस पोंहोंचले आहेत असे लोक फार थोडे असतील. आईबापाला समजलें तर लाजून खालीं पाहण्याची वेळ येईल असें एखादें वाईट कृत्य न करण्याबद्दल लहान मुलास बाल्यावस्थेंतच जर चांगलें शिक्षण दिलें, तर मोठेपणीं वाईट वाटून पश्चात्ताप करण्याची वेळ कधींच येणार नाहीं.

(३८६) खाल्लेलें अन्न जों पावेतों पोटांत चांगलें पचन होत नाहीं, तों पावेतों पोटाला विश्रान्ती नसते. अन्नाचें पचन होऊन, पोटांतून निघून जाण्यास पांच तास लागतात. लहान मुलें मुली वगैरे हमेशा हें खा, तें खा असें करतात, हें चांगलें नव्हे. शरीरांतील अवयवें सवंध दिवस सारखीं काम करीत नाहीं; त्या मानानें पोटास सुद्धां विश्रांती पाहिजे. ह्मणून वारंवार खाण्याची संवय न लावतां, कमींत कमी पांच तासाचे अंतरानेंच नियमित आहार करीत जावा.

(३८७) शेतकरी लोकांस दररोज कांहीं वेळ लिहितां वांचतां शिकविलें तर पुष्कळ सुधारणा होईल. तसेंच त्यांची विचारशक्ति वाढेल असें काम करण्यासही त्यांना कांहीं वेळ दिला पाहिजे. त्यांना केवळ लेखन-वाचनच न शिकवितां, त्या विषयाची त्यांनां चांगली समजून होईल अशाच रीतीनें शिकविलें पाहिजे. वनस्पतिशास्त्र (Botany) त्यांनां शिकविल्यापासून पुष्कळ फायदा आहे. कारण तरूच संवर्धन, त्यांची योग्यायोग्यता व त्याचे उपयोग हीं त्यांनां चांगलीं कळूं लागतील.

(३८८) वास्तविक पाहिलें तर नशिबाचा उदय होणें हें मनुष्याच्या आधीन आहे. मनुष्यानें खाणें पिणें व झोंप घेणें, याशिवाय जर कांहींएक केलें नाहीं, तर मग पशूंत

व अशा मनुष्यांत फार अंतर आहे असें ह्मणतां येणार नाहीं ॥ **उद्योगिनं पुरुषसिंहमुपैति लक्ष्मीः ॥ दैवेन देयमिति कापुरुषाः वदन्ति ॥**

(३८९) शरीराचा कोणताही भाग पोळला असेल, अगर कापला गेला असेल, अगर घसारा लागला असेल, तर अशा भागास हवा न लागू देणें हें मुख्यत्वेंकरून लक्षांत ठेविलें पाहिजे.

(३९०) भोजन झाल्यावर फळें खाल्ल्यानें पचनशक्ति वाढते.

(३९१) ज्या खोलींत वारा फारसा येत नसेल व जेथें उष्णता असेल, अशा ठिकाणीं बसल्यानें व उष्णवस्त्रें वापरल्यानें वृद्ध मनुष्यास सरदी अथवा **न्युमोनिया** ( क्लोमपाक=सन्निपातासारखा रोग ) वगैरे भयंकर रोग उद्भवणार नाहीत.

(३९२) अंड्याचा पांढरा भाग व मोहऱ्या एकत्र केल्यानें एका प्रकारचें उत्तम गुण करणारें प्लास्टर [ लेप ] तयार होतें; तें फार तीव्र असतें, परंतु त्यामुळें त्वचा मुळींच फाटत नाहीं.

(३९३) सूर्य, नक्षत्रें, तारे व ग्रहमंडळ वगैरे ब्रह्मांड निर्माण करण्यांत परमेश्वरानें जें चातुर्य व कौशल्य वापरलें आहे, त्यापेक्षां ज्यास्त कौशल्य व चातुर्य मानवी शरीररचनेंत परमेश्वरानें खर्च केलें आहे.

(३९४) दोन हजार पौंडाचा १ टन, एक फूट वर उचलण्यास जेवढें सामर्थ्य पाहिजे, त्याला एक फूट टन ह्मणतात. शरीराच्या निरनिराळ्या भागांत रुधिराभिसरण होण्यास अंतःकरणास जी शक्ति चोवीस तासांत खर्च करावी लागते, ती एक लक्ष चोवीस हजार फूट टन असते. या सर्व यंत्राचें वजन अर्धा शेर असतें असें असून, नांव ( नौका ) चालविण्यास शरीरांतील सर्व स्नायू काम करतात त्यापेक्षां तें सव्वापट करतें फारच त्वरेनें चढणारा एका तासांत एक हजार फूट चढूं शकतो. बाष्पप्रचलित ( वाफेनें चालणारें ) यंत्र तीन हजार फूट चढऊं शकतें व अंतःकरण वीस हजार फूट चढू शकतें. परमेश्वरी सूत्र, त्याची अगाध लीला व चातुर्य असें आहे.

(३९५) स्वकष्टार्जित रोख पैसे हातांत असल्याशिवाय जो तरुण मनुष्य भोजनखर्चांत व कपडेलत्त्यांत पैसा खर्च करीत नाहीं तोच उत्तर वयांत विख्यात होतो व तोच खरा शूर समजावा.

(३९६) एखाद्या अमेरिकनास, जेथें वस्ती नाहीं अशा एखाद्या बोळांत ज्या रात्रीं ठेवाल, त्याचे दुसरे दिवशीं सकाळीं जो भेटेल त्याला तो वर्तमानपत्र वाटीत आहे अशा स्थितीत तुह्मी त्याला पहाल, या लोकांचा उत्साह, साहस व दीर्घोद्योग असा आहे, कीं त्यामुळें ते मोठमोठ्या अचाट कामांत चांगले यश संपादन करतात.

(३९७) मानसिक श्रम पुष्कळ केल्यानें मस्तकांतल्या मेंदुची शक्ती क्षीण होत नाहीं व तो हलकाही पडत नाहीं; परंतु आहारापेक्षां जास्त यथेच्छ खाणें व व्यायाम अगदीं कमीं करणें यामुळें मात्र शक्ति पुष्कळ क्षीण होते असें वारंवार सांगितल्या-वांचून राहवत नाहीं.

(३९८) वाईट मुलांनां स्वच्छंदानें व स्वतंत्रपणानें वाढूं दिलें, तर ते मोठेपणीं वाईटच निघतात; परंतु त्यांपैकीं पुष्कळांना चांगल्या शिक्षणानें उत्तेजन दिलें, तर ते सुधरतात. अशा प्रकारें त्यांची स्थिति सुधरल्यानंतर जर त्यांना पैसा मिळवावा कसा व काटकसर करावी कशी हें शिकविलें, तर मग अखेरपावेतों त्यांच्या संबंधांत कोणतीच काळजी बाळगण्याचें कारण राहणार नाहीं.

(३९९) दातांत पोकळी राहूं लागली ह्मणजे ते कधी दुखतात, अशा वेळीं मीठ व फटकीचें चूर्ण समभाग घेऊन, त्यानें जर ती पोकळी भरीत गेलें, तर दुखावा बंद होतो.

(४००) विशेष रक्त एके ठिकाणीं जमून राहिल्यानें शरीरास ठणका उत्पन्न होतो. मोहरीचें प्लास्टर ( लेप ) त्या ठिकाणी लाविल्यानें अगर जमलेल्या रक्ताचें अभिसरण अन्य रीतीनें दुसरीकडे केल्यानें तो ठणका तात्काळ मिटतो.

(४०१) जर आपणास लौकिकांत व अब्रूत राहणें आहे, तर जसजसे आपण मोठे होऊं तसतशी स्वतःचे स्वरूपांत व डौलांत कमीपणा न दिसेल याबद्दल विशेष काळजी बाळगली पाहिजे.

(४०२) ध्यानीं-मनींही नाहीं असा एखादा हास्यकारक अकस्मात घडल्यानें, त्याचा शरीरांत औषधाप्रमाणें परिणाम होऊन शरीर शुद्धि होते. कधी कधीं असें किंवा याहूनही उलट होतें.

(४०३) घरांत एखादा मनुष्य अति रागावला असला तर त्याच्यावर आपणही रागावून व चिडून कांहींतरी बोलण्यानें परिणाम चांगला होत नाहीं. त्यावेळीं त्याच्या बोलण्याकडे इतकें दुर्लक्ष करावें, कीं जणुकाय आपणांस कांही माहितच नाहीं; ह्मणजे अतिशय रागावलेला मनुष्य खात्रीनें शांत होईल.

(४०४) आपलें वय साठ वर्षांचें झालें ह्मणजे आपणांस असें दिसून येतें कीं, बाळपणचे आपले लंगोटीमित्र फारसे राहिले नाहींत; कित्येक मरण पावले व कित्येक दूरदेशीं चालते झाले असतील. कित्येक श्रीमंत झाल्यामुळें आतां आपणांस ते ओळखत नाहींत, व कित्येक दारिद्रावस्थेंत असल्यानें आपणही त्यास सोडुन दिलें असेल. अशा कांहीं अनेक कारणांनीं आपली मित्रमंडळी वृद्धावस्थेंत फारच कमी झालेली दिसते, व त्यामुळें एखादा मित्र नाहींसा झाला ह्मणजे आपलें फारच नुकसान होतें

व आपणासही वैराग्य येऊन असें वाटूं लागतें, कीं आपणही लौकरच त्याचे मागून जाणार आहों **दूरवर विचार केल्याशिवाय खऱ्या कारणावांचून मित्रत्वाचें नातें न तोडणें हेंच शहाण्या मनुष्याचें खरें कर्त्तव्यकर्म होय.**

(४०५) आपल्या हमेषाच्या या संसारांतल्या व्यवसायांतून आपण एकदां सुटलों ह्मणजे आपणास असें खास वाटतें, की "आपण सर्वसंग परित्याग करून मोक्षाचे साधनास लागूं!" **काय ? सर्वसंगपरित्याग** ! स्मशानांत लाकडें जाऊन चितेवर आपला देह भस्म होईपावेतों ही तर गोष्ट घडणें कठीण !

(४०६) एकाच जातीचे व वयाचे दोन गृहस्थ आहेत. एक गर्भश्रीमंत असून लक्षाधीश आहे व तो स्वस्थ घरीं बसून असे व त्याची ईश्वरावर श्रद्धाही नाहीं. दुसरा दररोज उद्योगधंदा करून स्वकष्टार्जित मिळकतीवर उपजीविका करीत आहे. वरील दोघांपैकीं जो दुसरा, परमेश्वरावर विश्वास व श्रद्धा ठेऊन दररोज काम करून उपजीविका चालवितो, तोच, त्या लक्षाधीशापेक्षां जास्त सुखी समजावा.

(४०७) मनुष्यास शारीरिक अशक्तता साठ वर्षांचें वय झालें ह्मणजे येईल. परंतु ऐंशी किंवा नव्वद वर्षांचे पूर्वीं मानसिक अशक्तता येतेच असें कांहीं नाही. शरीर-संपत्ति उत्तम असली तर पन्नाशीं उलटल्या नंतर सुद्धां वीस तीस वर्षे पावेतो मनुष्य मानसिक शक्तिनें उत्तम काम करूं शकतो. **पामरस्टन** ऐंशी वर्षांचा झाला, तरीपण त्याच्यांत मानसिक अशक्ततेचें चिन्ह दिसत नव्हतें, व तो दररोज २० मैल घोड्यावर बसून व्यायाम करीत होता. अशीं दुसरीं पुष्कळ उदाहरणें आहेत

(४ ८) पडसें येणें हें बहुधा ज्वराचें पूर्व चिन्हच समजावें; ह्मणून प्रथमच पडशाचा जोर कमी करण्याकडे लक्ष ठेविलें पाहिजे.

(४०९) वास्तविक पाहिलें तर स्वतःचे अंगीं कांही गुण असल्याशिवाय मनुष्य मोठा ह्मणवला जात नाही.

(४१०) इ. स. १८७५ सालीं **जॉनटिंब्स** नांवाचा ग्रंथकर्ता, एकशेंचाळीस ग्रंथ लिहून मरण पावला. तेव्हां त्याचें वय ऐंशीं वर्षांचें होतें. त्यानें अतिशय श्रम घेऊन जसे मौल्यवान ग्रंथ तयार केले तसे कोणीही केले नसतील. परंतु तो इतका गरीब होता, कीं तो इष्टमित्रांवर अवलंबून दिवस काढीत असे यावरून असें दिसतें, की खऱ्या रीतीनें व प्रामाणिकपणानें केलेल्या श्रमाचा योग्य मोबदला या जगात सतत मिळत नाही. परंतु जे स्वतःचें कर्तव्य चांगल्या रीतीनें बजावतात, त्यांचें मन संतुष्ट राहून, त्याचें अंतःकरण चांगलें शुद्ध राहतें, व परमेश्वर त्याचा योग्य मोबदला कोणत्याही रीतीनें दतोच

(४११) मोठेपणाचा मार्ग अडचणींतून निघतो.

(४१२) ताजी हवा व ताजें पाणी हीं दोन्हीं शरीरास अत्यन्त हितावह आहेत. तरीपण ताजें पाणी प्याल्यानें एक तासांत मृत्यु येतो व ताजी हवा घेतल्यानें चित्येक

दिवस आजारी पडावें लागतें अशींही उदाहरणें आहेत. अयोग्य वेळा त्यांस हीं दोन्हीं अत्यन्त अपायकारक आहेत.

(४१३) अतिशय थकवा लागला असेल तेव्हां, अगर अनुशेपोटीं ( भूक असतां रिकाम्यापोटीं ) प्रातःकाळची हवा घेण्यास बाहेर निघूं नये

(४१४) पत्राचें उत्तर पाठविण्यास जितका ज्यास्त वेळ तुह्मी लावाल, तितकें तें तुह्मांस ज्यास्त कंटाळवाणें वाटेल.

(४१५) ज्याचे विरुद्ध तुह्मी कांहीं पत्रांत लिहिलें असेल, त्याचे नांव खासगी पत्रांत कधींही लिहूं नका. कारण,कोणाच्या हातांत तें पत्रप डेल याचें अनुमान तुह्मांस कधींही करतां येणार नाहीं.

(४१६) न्युयार्क येथें श्रीमंत व लोकमार्गानुयायी अशा लोकांत पुष्कळ अशा मोठ्या मनाचे आहेत, कीं लग्न-कार्यांत, सभेंत व भेटींच्या वेळीं मिळणाऱ्या हार, कलग्या वगैरे आपल्या शेजारच्या गरीब आजारी लोकांस अथवा सार्वजनिक संस्थेस वाटून देतात. मिळालेल्या वस्तूचा सदुपयोग करणें हें आपलें कर्तव्य होय.

(४१७) क्षमा मागण्याच्या रीतींत थोडा तरी खोटेपणाचा अंश असतो किंवा कसें? हा एक मोठा प्रश्न आहे.

(४१८) पन्नास वर्षांचे वयाचा एक उद्योगी मनुष्य दररोज दोन्ही वेळ एक एक मैल चालून, आपल्या आइस भेटण्यास जात असे. त्याच्या आईचें वय त्यावेळीं ऐंशी पेक्षां जास्त होतें. पुत्रधर्मास योग्य असें प्रेम व त्याची आठवण प्रत्यक्ष पाहून, त्याचे आईस केवढा आनंद व समाधान वाटत असेल बरें ? शेवटीं स्वर्गीही उभयतः एकत्र वास करणार नाहींत असें कोण ह्मणेल ?

(४१९) कोणी मनुष्य तुमच्याजवळ कांहीं खास कामानिमित्त विनंती करण्यास आला असतां, तुह्मी तें त्याचें काम करण्यास असमर्थ असाल, अगर तुमची इच्छा काम करण्याची नसेल, तर त्याला स्पष्ट " नाही " ह्मणावें हेंच योग्य होय तुह्मी त्याच्याशी वरपंगी बोलून व तुमच्या हातून वास्तविक तें काम होणें नसून तें होईल असें त्या.स मानण्यास व्यर्थ कारण उत्पन्न कराल, तर निव्वळ खोटें बोलण्याच्या दोषास पात्र व्हाल. कारण, तुह्मी त्याला व्यर्थ आशा लाविल्यानें दुसरी कांही तजविज करण्याच कामीं तो आपला उत्साह व उमेद खर्च करणार नाहीं

(४२०) पैसा मिळविण्याच्या हेतूनें, तुह्मी आपलीं घरचीं माणसें सोडून जेव्हां परदेशी जाल, तेव्हां तुह्मी घरच्या माणसास नियमित वेळीं पत्रें पाठविण्याची पद्धत ठेवा तुह्मी अतिशयच आजारी असाल अशाच प्रसंगाशिवाय कधींही पत्रें पाठविण्यात अंतर पडूं देऊं नये. आठवे दिवशीं अगर एक महिन्यानें अगर त्याहीपेक्षां जास्त मुदतीनें पत्रें पाठविलीं तरी चिंता नाहीं. पण तीं नियमित वेळी मात्र पाठवीत जा.

पत्र येण्याची मुदत जवळ येत चालली ह्मणजे त्याची मार्गप्रतीक्षा करणें, पत्र आलें ह्मणजे तें फोडतांना होणारें समाधान, त्यांतील प्रत्येक ओळ व शब्द अत्यन्त लक्ष्यपूर्वक वाचणें, व पुनः दुसरें पत्र येईपर्यंत पुनः पुनः तेंच पत्र वाचण्यानें होणारा आनंद, या सर्वांचा नीट विचार केलात तर तुह्मी नियमित पत्र पाठविण्यास कधीच विसरणार नाहीं.

(४२१) साधारणपणें, पत्र वाचल्यानंतर लागलीच त्याचें उत्तर लिहिणें हें उत्तम होय. कारण, वाचलेल्या पत्रांतील मजकूर त्यावेळीं चांगला लक्ष्यांत असल्यानें, त्याचें उत्तर लिहिणें फार स्वल्प असतें.

(४२२) अल्प काळांत व अल्प वयांत जो यश संपादन करतो, त्याची अशी भरभराटीची स्थिति अल्प काळ पावेतोंच टिकते, व परिणामीं असा मनुष्य कलंकावह जरी झाला नाहीं, तरीपण तो दुर्दैवी होतो. **नेपोलियन, पिट बायरन मालब्रो** हीं वर दर्शविलेल्या स्थितीचीं उदाहरणें होत.

(४२३) एतिहासिक माहितीवरून असें दिसतें, कीं जगांत जे जे विख्यात होऊन गेले, त्यांनां लोकांत प्रसिद्ध होण्यास वर्षें लागलीं आहेत. **क्रॉमवेल** व **कॅण्हराब्रिस्मार्क** आणि **पामरस्टन** व मोठे **ब्रिन्नर** हीं वर दर्शविलेल्या बाबतींचीं उदाहरणें होत. तात्पर्य, नित्य उद्योग करावा ह्मणजे कधींना कधीं तरी भाग्योदय होईल.

(४२४)पिसाळलेलें कुत्रें चावल्यानंतर वीसजणांतून एकास"**आलर्काभिभवव्याधी** (कुत्र्याच्या विषापासून होणारा रोग) होतो. यावरून असें अनुमान होतें, कीं ज्यांना पिसाळलेलें कुत्रें चावलें असेल, त्या सर्वांसच "**आलर्काभि भवरोग**" होतो असें नाहीं.

(४२५) मुशाफरीत खालील गोष्टी लक्षांत ठेविल्या असतां फारच हितावह होईल. [१] पोळलेला भाग पाण्यांत कांहीं वेळ बुडऊन ठेविला असतां, आग कमी कमी होऊं लागते. [२] जर डोळ्यांत केर वगैरे उडून गेले, तर डोळा चोळूं नये. चोळल्यानें आंत पडलेला केर फार खोल जातो. सिसपेन पापण्यानजीक सारखी आडवी अशा रीतीनें धरावी, कीं डोळा मिटला असतां पापण्या पेन्सीलीचे आडव्या दांड्यावर पडतील, असें केल्यानें डोळयांतील केर स्पष्ट दिसतो, व रुमालाचे सहाय्यानें अगर युक्तीनें हळूच फुंक मारून तो डोळ्यांत गेलेला केर काढून टाकतां येतो. [३] अकस्मात एखाद्या ठिकाणीं घाव लागून जखमेंतून रक्ताची धार सारखी पडत असेल. तर त्या खालील भागास रुमालानें बांधावें रक्त कमी कमी पडूं लागलें, ह्मणजे वरील भाग बांधावा, व अगदीं रक्त बंद होईपर्यंत या प्रमाणेंच करीत चलावें. [४] कानांत कांहीं जीवजंतु पडला तर, ऊन पाणी अगर गोडें तेल घालावें, ह्मणजे तो जंतू मरतो कांहीं कठिण पदार्थ पडला असेल, तर घोड्याचा केस दुहेरी करून, तो कानांत फिर-

विला ह्मणजे, तो पदार्थ त्या केसांत अडकतो आणि नंतर हळूच काढून टाकावा. [५] जर कपडे पेटले तर तोंडाच्या संरक्षणार्थ प्रथम जमिनीवर लांब निजून, नंतर घोंगडी गुडाळून घ्यावी.[६]जर ग्यास तेल पेटलें तर लोकरींचे सहाय्यानें विझवावें.पाणी ओतल्यानें भडका होऊन पसरतो. [७] जर खोली पेटली, तर शरीर व मस्तक घोंगडीनें गुंडाळून घ्यावीत. [८] जर धुरानें जीव गुदमरत असेल, तर जमीनीचे सपाटीवर बसून गुडघ्यानें, व हात जमिनीवर टेंकून निघून जावें. [९] जर एखादा विषारी प्राणी चावला असेल तर जखमेस तोंड लावून, शोषून टाकावें. परंतु ओंठ फुटले असतील तर मात्र असें करूं नये. [१०] विष पोटांत गेल्यावर जर घशांत आग होत असेल तर गोडें तेल प्यावें. [११] विषामुळें जर झोंप येत असेल, तर एका प्याल्यांत पाणी घेऊन, लहान चमचाभर मीठ व मोहऱ्या त्यांत टाकून हलवून पिऊन जावें आणि उलटी झाल्यावर कडक [ तीव्र ] कॉफी प्यावी [ किंवा तुळशीचा काढा प्यावा ] व संपूर्ण जागृती येईपावेतों इकडे तिकडे फिरावें. विष चढल्यानंतर हिरवीं [ अपक्व ] अंडी खाणें फार हितावह आहे. [ किंवा सोनें मधांत उगाळून चाटावें. [१२] एकाएकीं बेशुद्धी येऊन घर्घर शब्द होऊं लागला व तोंड लालभडक झालें तर मस्तकांत रक्त चढल्यापासून हा रोग झाला असावा असें समजावें. अशा प्रसंगी मस्तक उच्च ठेवावें, व जर तोंड पांढरवट होऊन दम बंद झाला, तर बेशुद्धी खास झाली असें समजावें अशा माणसास उताणें निजवावें. याशिवाय कांहींएक करूं नये

(४२६) दुसऱ्याचें आपण चांगलें केलें, तर उत्तर वयांत व आपल्या अशक्ततेंत आपणास मोठी शांति व समाधान असतें दुसऱ्याच्या सुखासाठीं जेवढें लौकर झटावें, तेवढें लौकर चांगलें होईल.

(४२७) औदार्य हें श्रीमंताचें कर्तव्यकर्म होय त्याचे घरदार वगैरे मोठ्या किंमतीचें व डौलाचें असलें पाहिजे. कारण अशानें त्यांचा व्यापार उद्योग वाढून दुसऱ्यांचें चांगलें कल्याण होतें.

(४२८) राग आला असेल अशा वेळीं कोणासही पत्र लिहिण्यास आरंभ करूं नये.

(४२९) आपण वर्तमानपत्रें व सचित्र मासिक पुस्तकें फारच काळजीपूर्वक जपून ठेवतों परंतु ज्याअर्थी आपण तीं क्वचितच वारंवार वाचतों, त्याअर्थी अशा रीतीनें सभाळुन ठेवण्यानें त्यांचा कांहींएक सदुपयोग होत नाहीं. करितां गरीब, आजारी वगैरे लोकांस जर तीं आपण वाचण्यास दिलीं, तर त्यांचा सदुपयोग होऊन त्यांना पुष्कळ समाधान वाटेल.

## श्रीसयाजी औषधशाला, पो. गिरगांव, मुंबई.

### तयार औषधांची किंमतीसह यादी.

| औ. नांव. | तोळ्यास कि. रु. |
|---|---|
| अभ्रकभस्म ........ | १५ |
| ताम्रभस्म ........ | ३ |
| त्रिवंगभस्म ... ..... | ३ |
| नागभस्म ........ | ३ |
| मधुमेहर ........ | २ |
| मंडूरभस्म ........ | १ |
| लोहभस्म ........ | ६ |
| वंगभस्म.......... | २ |
| मौक्तिकभस्म ...... | १ |
| सुवर्णमाक्षिकभस्म | २ |
| हरितालभस्म ...... | ५ |
| शंखभस्म ........ | १ |
| कपर्दिकभस्म ...... | १ |
| प्रवाळभस्म (अग्निपुटी) | २ |
| मृगशृंगभस्म ...... | १ |
| व्याधिहरण रसायन | ६ |
| सुवर्णराजवंगेश्वर... | ६ |
| समीरपन्नग ...... | ६ |
| नारदासदूर .. ..... | ६ |
| मल्लसिंदूर .. .. | ६ |
| इच्छाभेदी ....... | १ |
| बृहत् इच्छाभेदी . | २ |
| कर्पूरादि गुटिका ... | ४ |
| गंधकरसायन (शारंगधर) ..... | २ |
| गंधकरसायन (योगरत्नाकर) .... | ६ |
| श्वासकुठार...... . | २ |
| मुखपाकनाशिनीगुटि | १ |
| सूतिकाभरण .. .. | १२ |
| चंद्रकला . ... | ६ |
| रक्तशोधक गुटिका | २ |
| सन्निपातभैरव .... .. | ४ |
| अग्निकुमार .... | १ |
| नित्यानंदरस .... | ३ |
| हेमगर्भ (साधा) .. | १० |

| औ. नांव. | तोळ्यास कि. रु. |
|---|---|
| बृहल्लंखवटी ...... | २ |
| शंखवटी.......... | १॥ |
| अश्वकंचुकी(घोडाचोळी) | ४ |
| चंद्रप्रभागुटिका ... | ३ |
| योगराजगुग्गुळ(साधा) | ॥ |
| योगराजगुग्गुळ (भस्मासह) ........ | १॥ |
| श्वासकालेश्वर...... | ४ |
| भूतभैरव .......... | ४ |
| वातविध्वंस........ | ४ |
| सूतशेखर ... . ... | ४ |
| क्रव्यादरस ........ | २ |
| सुवर्णमालिनी वसंत | १२ |
| लघुमालिनी वसंत | २ |
| लवंगादि गुटिका... | ॥ |
| नागामृतगुटिका ... | ४ |
| कारुण्यसागर ...... | ४ |
| लशुनवटिका ... .. | ॥ |
| महामृत्युंजय ...... | ५ |
| आनंदभैरव (अतिसारावर) .. ... | १॥ |
| आनंदभैरव(कासावर) | १॥ |
| वसंतकुसुमाकर ... | १२ |
| शिलाजतुगुटिका४ | ४ |
| शीतांकुश ....... | २ |
| कफकुठार....... | ६ |
| सन्निपातज्वरांतक | १॥ |
| गुळवेलसत्व ...... | -।- |
| शिंगणीक्षार .. | -॥। |
| वज्रक्षार......... | २ |
| अर्कक्षार... | १ |
| अपामार्गक्षार ... | -॥।- |
| कर्दलीक्षार | -॥। |
| तिलक्षार | १ |
| स्नुहीक्षार | ॥। |

| औ. नांव. | तोळ्यास कि. रु. |
|---|---|
| यवक्षार .......... | -॥- |
| शंखद्राव .......... | ३ |
| ८० तोळ्यांच्या शेरास किंमत. | |
| कुमारीआसव विजयायुक्त | २ |
| ,, (बालकांसाठी) | ३ |
| ,, (गर्भासह) | ४ |
| अमृतासव ....... | ४ |
| उदररोगनाशनासव | ४ |
| भृंगराजासव ...... | ४ |
| द्राक्षासव ........ | ४ |
| ब्राम्ह्यादि-आसव ... | ६ |
| श्वासकासासव ... | ४ |
| ठराविक किंमती- | |
| त्रिफलाचूर्ण१६ तोळ्यास | १ |
| लवंगादिचूर्ण ६ तोळ्यास | १ |
| वृद्धगंगाधरचूर्ण ४ ,, | १ |
| सीतोपलादिचूर्ण ४ तोळ्यांस ८ आ. | |
| महासुदर्शन चूर्ण ४ तो. | ८ आ. |
| कामदेव ,, | १ रु. |
| हिंग्वाष्टक ,, ४ ,, | ८ आ. |
| चित्रकादि ,, ६ ,, | १ रु. |
| महाचंदनादि ते. ४ ,, | १ रु. |
| महानारायणतै. ८ ,, | १ ,, |
| बिल्वतैल ३ ,, | ८ आ. |
| विषगर्भतैल ८ ,, | १ रु. |
| कासीसादितैल. ४ ,, | १ रु. |
| स्वतंत्र अनुभविक औषधें. | |
| सौभाग्यावलेह ४० ,, | २॥ रु. |
| सरजेचे मलम भाग | ४ आ. |
| दंतमंजन. ,, | २ ,, |
| गजकर्णनाशकतैल बाटली ६ | ,, |
| प्रमेहकुठारासव | १॥ रु. |
| शिशुरक्षा दवीस | १॥ रु. |

| नांव. | तोळ्यास कि. रु. आ. | नांव. | तोळ्यास कि. रु. आ. | नांव. | तोळ्यास कि. रु. |
|---|---|---|---|---|---|
| विरेचनगुटिका डबीस | आ. | ज्वरकालांतकवटी | ,, | खोकल्यावर गोळ्या | आ. |
| भामिनीविट गुटिका | २ रु. | आमनाशनवटी | ८ ,, | उपदेशकुठार डबीस | १॥ रु. |
| फणींगजीवनतेल बाटली | १ ,, | कर्णरोगनाशकतेल | १२ ,, | वाताविध्वंसकतेल बा. स | १ ,, |
| मूत्ररेचकवटी डबीस | १ ,, | नयनसुधा बाटलीस | १ रु. | अमृतबिंदुतेल बा. स | ८ आ. १ ,, |
| जीर्णज्वरारिगुटिका | ८ आ. | नेत्रांजन डबीस | १ रु. | | |

# श्रीमियाजी-औषधशाळा.

मुंबई, माधवबागेजवळ. (पोस्ट गिरगांव.)

मालक व संयोजक-वैद्यराज

आयुर्वेदमहोपाध्याय शंकर दाजी शास्त्री पदे.

## आमच्याकडील

शास्त्रोक्त रीतीनें तयार केलेलीं व इतर अनुभविक औषधें

आणि

विक्रीस तयार असलेल्या पुस्तकांची यादी. किंमतीशिवाय टपालखर्च.


| | | |
|---|---|---|
| [illegible] १२ आ | औषधीमानपरिभा. १॥ आ. | सार्थ चरकसंहिता, |
| १ रा १ रु. | गोवैद्यक. आ. | सूत्रस्थान, पूर्वा. २ ० |
| ,, [illegible] १ रु. | प्राणिज औषधी २ आ. | ,, सूत्र. उत्त. भा. १ ला १॥ रु. |
| [illegible] भा. १॥ रु. | अश्वरोगपरिज्ञान. पा३ ा ०आ | ,, ,, भा. २ रा रु. |
| १ भा. ।। रु. | त्रिदोषविचार, १ ४ आ | ,, निदानस्थान १४ आ. |
| [illegible] १२ आ | भा. २ रा ८ आ. | ,, विमानस्थान १॥ रु. |
| [illegible] १ रु. | ग्रंथि सन्निपात... ६ आ. | ,, इंद्रियस्थान १२ आ. |
| [illegible] १२ आ. | सार्थ हारीतसं. भा. १ ला १ रु | ,, कल्पस्थान १४ आ. |
| [illegible] १॥ रु. | सार्थयोगशतक .. ४ आ. | ,, सिद्धिस्थान १॥ रु. |
| [illegible] १॥ रु. | सार्थ वैद्यवल्लभ .. ८ आ. | ,, चिकित्सा भा. १ ला १॥ रु. |
| [illegible] १ | [illegible] .. ॥ | चिकित्सा भा. २ रा २ रु. |
| [illegible] | [illegible] रक्षेचे [illegible] २ | नपुंसकमीमांसा-काम. १॥ रु. |
| [illegible] | [illegible] .. २ रु | निघंटशिरोमणि २। रु. |
| [illegible] १२ आ. | [illegible] ज्वरपरा [illegible] २ रु. | आयुर्वेदरत्न भा. १ ला १ रु. |

याशिवाय उत्तम [illegible] पुस्तक.

योग[illegible] [illegible] ॥. ॥

[illegible] मुद्र.

ज्योतिर्विद् दाजी हरि भट्ट पदे यांचे स्मारक.



वर्ष १५

# आर्यभिषक्

अंक. ४-५



सम्पादक वै० शंकर दाजी शास्त्री पदे.

आयुर्वेदमहोपाध्याय.

मुंबई, पोस्ट गिरगांव, श्रीसयाजी-औषधशाला.

भिषजां साधुवृत्तानां भ[illegible]लिनाम् ।
अभ्यस्तकर्मणां भद्रं, भद्रं भद्राभिलाषिणाम् ॥ -श्रीवाग्भटः।

तूल व वृश्चिक संक्रांति. शके १८२५ कार्तिक वद्य १२ सोमवार. ता. १६ नोवेंबर १९०३.

# आर्यभिषक् मासिकपुस्तकाचा प्रयत्न.

हल्लीं चित्रें वगैरे बाबतींत आर्यभिषकास जो मोठा खर्च होत आहे, त्या मानानें वर्गणी कांहींच नाहीं! त्यांतही लोकांकडून जितका मोठा आश्रय पाहिजे तितका नाहीं. अशा स्थितींत केवळ आपल्या हौसेनें तनु-मन-धन खर्चून हा प्रयत्न करावयाचा आहे.

तशा स्थितींत देखील–आज मित्तीस–या कारखान्यांत **वीस हजार रुपये** गुंतून राहिले आहेत. आणि आणखी पुस्तकें व औषधें यांचा क्रम अव्याहत चालूच आहे. विशेष परिश्रमानें. अनेक योजना करून, लोकांना **स्वस्त किंमतींत उत्तम पुस्तकें आणि औषधें** देण्याचा आमचा प्रयत्न, परमेश्वरकृपेनें पुष्कळ सफळ होत आहे, याबद्दल जगन्नियंत्याचे आह्मीं फार फार आभारी आहों. आणि त्याच्या भरवशावर आह्मीं दिवसेंदिवस एकेक पाऊल पुढें टाकीत आहों.

आर्यभिषक् पंधरा वर्षें चालू आहे, आणि असेंच तें चिरकाल चालू राहील अशी आशा धरण्यास चांगलें साधन आहे. आह्मी –

**हल्लीं आहेत त्या वर्गणीदारांना विनंती**

करितों कीं, खालीं दर्शविलेल्या दोन प्रकारांपैकीं कोणत्याही एका वर्षांत प्रत्येकानें आश्रय दिलाच पाहिजे. होईल तितकें करून पहिल्या वर्गाचा आश्रय देण्यानें–या वेळीं आह्मीं आरंभिलेल्या मोठ्या कार्यास–मोठेंच सहाय्य होऊन, **आर्यभिषकास चिरकालिक स्वरूप** येईल. यासाठीं होईल तितकें करून प्रत्येकानें **पहिल्या वर्गाचा आश्रय** देण्याची कृपा करावी ही विनंती आहे. ज्यांस अगदीं निरुपायच असेल, त्यांनीं निदान दुसऱ्या वर्गाचा तरी आश्रय दिलाच पाहिजे. शिवाय––

**पैसे न खर्च करितां आश्रयदाते**

होण्यासही एक मार्ग आहे. ज्यांना नुस्ती वर्गणी भरणें देखील जड जातें, परंतु केवळ या विषयाच्या गोडीमुळें जे वर्गणीदार झाले आहेत, अशाकरितां **एक सवलत** ठेवली आहे. ह्मणजे त्यांनीं थोडी मेहनत घेऊन, या पुस्तकास आश्रयदाते मिळवून द्यावे. **पंचवीस रुपयांचा एक आश्रयदाता** मिळवून दिल्यास १ रु. व **पांच रुपयांचा** आश्रयदाता मिळवून दिल्यास ८ आणे. याप्रमाणें त्यांचे पैसे जमा धरले जातील. आणि ते पैसे ज्या वर्गापुरते होतील, त्यांस त्या वर्गाचा आश्रयदाता समजला जाईल. ह्मणजे जमा झालेले असे रुपये- वर्षास पांच झाले तर त्यांस **दुसऱ्या वर्गाचा** आश्रयदाता समजलें जाईल, व २५ झाले तर **पहिल्या वर्गाचा** समजला जाईल. मात्र दुसऱ्या वर्गाचा **आश्रयदाता** झालें ह्मणजे पुढें दर वर्षी याचप्रमाणें आश्रयदाते मिळवून देऊन, सहा वर्षांत ३० रुपयांची रक्कम जमा केली पाहिजे; अथवा न जमल्यास, स्वतः रुपये भरले पाहिजेत. यापैकीं कांहीं न घडल्यास, जितकी रक्कम जमा होईल तितके दिवस-मासिकपुस्तकाच्या वर्गणीच्या दराप्रमाणें मासिकपुस्तक दिलें जाईल. ह्मणजे ६ रु. जमले, तर वर्षास १॥ रु. वर्गणी प्रमाणें ४ वर्षें मासिकपुस्तक मिळेल.

कोणत्याही वर्गाचे आश्रयदाते, मासिकपुस्तकाच्या ज्या वर्षी होतील त्या वर्षापासून पुढें त्यांस मासिकपुस्तक मिळेल. व मागच्या वर्षांतील पुस्तकें जर त्यांस घेणें असतील तर तीं निम्मे किंमतींस मिळतील. ह्याशिवाय

अव्यक्त आत्मा क्षेत्रज्ञः शाश्वतो विभुरव्ययः ।
तस्माद्यदन्यत्तव्यक्तं वक्ष्यते चापरं द्वयम् ॥ ६० ॥
व्यक्तं चेन्द्रियकश्चैव गृह्यते तद्यदिन्द्रियैः ।
अतोऽन्यत्पुनरव्यक्तं लिङ्गग्राह्यमतीन्द्रियम् ॥ ६१ ॥

क्षेत्रज्ञ आत्मा अव्यक्त, नित्य, सर्वव्यापी व अव्यय असा आहे. याशिवाय बाकी सर्व पदार्थ व्यक्त समजावे. व्यक्तांतही पुनः व्यक्त व अव्यक्त असे दोन प्रकार आहेत. ज्या पदार्थांचें ग्रहण इंद्रियें करूं शकतात ते व्यक्त व ज्यांचें ज्ञान इन्द्रियांच्या द्वारा न होतां अनुमानानें किंवा लक्षणांवरून ग्रहण केलें

---

नाहीं. कारणावांचून कार्य होत नाहीं हा सर्वतन्त्रसिद्धान्त आहे. अर्थात् प्रत्येक पदार्थ कोणत्यातरी कारणाचें कार्य आहे. जो पदार्थ आतां कार्य आहे तो कालान्तरानें दुसऱ्या कार्याचें कारण होईल. त्यापासून दुसरा पदार्थ उत्पन्न झाला म्हणजे तें स्वतः कार्य बनलें; म्हणजे कार्य कारणांतच राहतें असें म्हणतां येईल. वस्तुतः कार्य हीं कारणाचीच एक निराळी दशा आहे. सारांश कोणतीही वस्तु एकटी राहूं शकत नाहीं. तिचा इतर वस्तूंशीं कोणत्यातरी प्रकारचा संबंध अवश्य असतो. मग तो संयोगसंबंध असो, सहवाससंबंध असो, किंवा विरोधसंबंध असो. वृद्धि व क्षय हा यावत् पदार्थांचा सहज अनिवार्य धर्म आहे हें आपण प्रत्यक्ष पाहतों. वृद्धि-क्षय म्हणजे परिवर्तन किंवा बदल यापेक्षां कांहीं निराळा पदार्थ नाहीं. असे बदल प्रत्येक पदार्थांत निमिषापेक्षाही कमी वेळांत एकसारखे घडत असतात. हीच दशा मनुष्यशरीराची आहे. उदाहरणार्थ दिव्याची जोत घ्या-दिसण्यांत असें दिसतें कीं जोत एकसारखी कोणत्याही प्रकारचा बदल न होतां जळत आहे. परंतु वास्तविक दिव्यांतील तेलाचे परिमाणु आकर्षण शक्तीच्यायोगानें वातीच्याद्वारें वर खेंचले जाऊन जळत असतात अर्थात् जोत, वात व तेल यांच्या समष्टिरूप जो दिवा त्याचा क्षय होत असतो. हीच सर्व पदार्थांची स्थिति आहे. अनादि पुरुष म्हणजे परमात्मा जो जन्मरहित आहे तो नित्य आहे आणि २४ तत्वांचा बनलेला राशिसंज्ञक पुरुष अर्थात् जीवात्मा अनित्य आहे. नित्य पदार्थांचें अनित्य पदार्थांच्या द्वारें ज्ञान होणें शक्य नाहीं. अशा नित्य पदार्थांविषयीं आपण इतकेंच म्हणूं शकूं व म्हणतों कीं तो निर्गुण आहे. असें म्हणणें म्हणजे, त्याच्या विषयीं आम्हांस कांहीं ज्ञान नाहीं हेंच पर्यायानें म्हणणें होय अव्यक्त म्हणजे ज्यास इंद्रियें किंवा मन यांच्याद्वारें ग्रहण होऊं शकत नाहीं तें.

जातें तें अव्यक्त समजावें. अन्यरीतीनें इन्द्रियग्राह्य तत्त्वें व्यक्त व अतीन्द्रिय तें अव्यक्त.[१]

खादीनी बुद्धिरव्यक्तमहङ्कारस्तथाष्टमः ।
भूतप्रकृतिरुद्दिष्टा विकाराश्चैव षोडश ॥ ६२ ॥
बुद्धीन्द्रियाणि पञ्चैव पञ्च कर्मेन्द्रियाणि च ।
समनस्काश्च पञ्चार्था विकारा इति संज्ञिताः ॥ ६३ ॥
इति क्षेत्रं समुद्दिष्टं सर्वमव्यक्तवर्जितम् ।
अव्यक्तमस्य क्षेत्रस्य क्षेत्रज्ञमृषयो विदुः ॥ ६४ ॥

आकाशादि पंच महाभूतें, बुद्धि, अव्यक्त ह्मणजे प्रधान किंवा आत्मा व पंचेन्द्रियांचे शब्दस्पर्शादि ग्राह्य विषय हे सोळा विकार अर्थात् वरील प्रकृतींचीं कार्यें आहेत. यांपैकीं अव्यक्त ह्मणजे जो आत्मा तो खेरीज करून बाकी सर्व तत्वांस क्षेत्र अशी संज्ञा आहे व अव्यक्तास क्षेत्रज्ञ ह्मणतात.[२]

---

१ या श्लोकांप्रमाणें सृष्टीची रचना येणेंप्रमाणें आहे.

अव्यक्त
(अनादि पुरुष स्वतंत्र व उपाधियुक्त; ह्मणजे—परमात्मा व जीव कोटिप्रत प्राप्त झालेला—जीवात्मा.)

व्यक्त
(ज्याज्या वस्तूंस कारण व उत्पत्ति आहे त्या सर्व.)

- ऐन्द्रियक अथवा इन्द्रिय ग्राह्य
  (आकाशादि पंचमहाभूतें व त्यांचे शब्दादि गुण.)
- अतीन्द्रिय.
  (शब्दस्पर्शादि तन्मात्रा व या वत्तर्क्यविषय.)

२ आकाशादिपंचमहाभूतें, बुद्धि, आत्मा व अहंकार हीं आठ तत्वें; आणि दहा कर्म व ज्ञानेन्द्रियें, पांच इंद्रियांचे विषय व मन हीं सोळा तत्वें या एकंदर २४ तत्वांच्या समुदायास पुरुष असें मानलें आहे. यांपैकीं पहिलीं आठ तत्वें प्रकृतिभूत आहेत. म्हणजे तीं स्वतःसिद्ध, स्वयंभू आहेत. तीं दुसऱ्या कोणत्याही वस्तुपासून झालेलीं नाहींत. दुसरीं सोळा तत्वें विकृतिरूप आहेत. म्हणजे वरील आठ स्वयंभू तत्वांपासून त्यांची उत्पत्ति झालेली आहे. या ठिकाणीं शब्दस्पर्शादि विषय कर्तृरूप घ्यावयाचे, कार्यरूप नव्हेत. सर्व ज्ञानाचें बीज पहावयास गेलें असतां शेवटीं शब्दस्पर्शादिकांची कल्पना व मन आणि बुद्धि यांपासून उत्पन्न होणारे विचार हेंच ठरतें. याविषयीं बरेंच विवेचन पूर्वी केलें आहे.

जायते बुद्धिरव्यक्ताद्बुद्ध्याऽहमिति मन्यते ।
परं खादीन्यहङ्कार उपादत्ते यथाक्रमम् ॥ ६५ ॥
ततः संपूर्णसर्वांगो जातोऽभ्युदित उच्यते ।
पुरुषः प्रलये चेष्टैः पुनर्भावैर्वियुज्यते ॥ ६६ ॥
अव्यक्ताव्यक्ततां याति व्यक्तादव्यक्ततां पुनः ।
रजस्तमोभ्यामाविष्टश्चक्रवत्परिवर्तते ॥ ६७ ॥
येषां द्वन्द्वे परा सक्तिरहङ्कारपराश्च ये ।
उदयप्रलयौ तेषां न तेषां ये त्वतोऽन्यथा ॥ ६८

अव्यक्तापासून बुद्धि, बुद्धिपासून अहंकार व अहंकारापासून आकाशादि पंचमहाभूतें, इंद्रियें वगैरे उत्पन्न होतात. असें झालें म्हणजे संपूर्ण व सर्वांग पुरुष उत्पन्न झाला व वाढला असें म्हणतात. पुरुष प्रलयकालाचे ठायीं अभीष्ट वस्तूंपासून पुन्हां निराळा होतो. पुरुष अव्यक्तापासून व्यक्त होतो व व्यक्तापासून पुन्हां अव्यक्त बनतो. अशा तऱ्हेनें रजो व तमोगुणांनीं बद्ध होत्साता तो गाडीच्या चाकाप्रमाणें एकसारखा फिरत असतो. ज्यांची सुखदुःखादि द्वन्द्वांच्या ठायीं अत्यन्त आसक्ति असते, व जे अहंकारानें घेरलेले असतात त्यांसच जन्म व मरण हीं भोगावीं लागतात व जे याच्या उलट असतात ते जन्ममरणाच्या फेऱ्यापासून मुक्त होतात. *

---

* या श्लोकांत पुरुषाचा उत्पत्तिक्रम आणि जन्म व मरण यांचें तात्विक स्वरूप वर्णन केलें आहे. प्रलयकालानन्तर नव्या सृष्टीच्या आरंभीं अव्यक्त म्हणजे एक परमात्मा होता. त्याच्यापासून बुद्धि किंवा जीस महत्तत्व म्हणतात ती उत्पन्न झाली. त्यानतर क्रमानें आकाशादि पंचमहाभूतें, त्यांचे शब्दस्पर्शादि विषय, पांच ज्ञानेन्द्रियें सहावें मन, आणि पांच कर्मेन्द्रियें उत्पन्न झालीं. इतकीं सगळीं ज्या वेळीं उत्पन्न झालीं तेव्हां पुरुष पूर्ण बनला. याचें नांव जन्म. जन्मकालीं संयुक्त झालेल्या पदार्थांचा वियोग झाला म्हणजे त्यास मृत्यु म्हणतात. सदरहू पदार्थांस 'इष्ट' अशा अर्थानें म्हटलें आहे कीं त्यांचा संयोग अविद्याप्रयुक्त जीवात्म्याच्या इच्छेनें होतो. समस्त सृष्टीची उत्पत्तिही इच्छेनेंच झालेली आहे. आरंभीं परमात्मा किंवा ब्रह्म एकटेंच होतें. त्यास "एकोऽहं बहु स्यां प्रजायेय", या श्रुतींत प्रतिपादन केल्याप्रमाणें अनेक

प्राणापानौ निमेषाद्या जीवनं मनसो गतिः ।
इन्द्रियान्तरसञ्चारः प्रेरणं धारणञ्च यत् ॥ ६९ ॥
देशान्तरगतिः स्वप्ने पञ्चत्वग्रहणं तथा ।
दृष्टस्य दक्षिणेनाक्ष्णा सव्येनापगमस्तथा ॥ ७० ॥
इच्छाद्वेषःसुखन्दुःखम्प्रयत्नश्चेतना धृतिः ।
बुद्धिः स्मृतिरहङ्कारो लिङ्गानि परमात्मनः ॥ ७१ ॥
यस्मात्समुपलभ्यन्ते लिङ्गान्येतानि जीवतः।
न मृतस्यात्मलिङ्गानि तस्मादाहुर्महर्षयः ॥ ७२ ॥
शरीरं हि गते तस्मिन् शून्यागारमचेतनम् ।
पञ्चभूतावशेषत्वात्पञ्चत्वं गतमुच्यते ॥ ७३ ॥

प्राण व अपान वायु चालणें (श्वासोच्छ्वास घेणें), डोळे झांपणें व उघडणें, आयु, मनाची गति, त्याचें एका इंद्रियापासून दुसऱ्या इंद्रियाप्रत जाणें, मनास प्रेरणा करणें, व धारण करणें, स्वप्नांत देशान्तर गमन करणें, मृत्यूचें ग्रहण, उजव्या डोळ्यानें पाहिलेल्या पदार्थाचें डाव्या डोळ्यानें ज्ञान होणें, इच्छा, द्वेष, दुःख, प्रयत्न, चेतना, धृति, बुद्धि, स्मरण व अहंकार हीं सर्व परमात्मलक्षणें जिवंत मनुष्यांत सांपडतात. मेलेल्या मनुष्यांत वरील लक्षणें

---

होण्याची इच्छा झाली व तदनुसार समस्त चार प्रकारची प्रजा उत्पन्न झाली. रजो-तमो-गुणाच्या योगानें जन्म-मरण परंपरा चालू राहते व सत्वोद्रेकानें मुक्ति प्राप्त होते. मनुष्यमात्र स्वभावतः सुख-दुख, शीत-उष्ण, इच्छा-द्वेष इत्यादि परस्पर विरुद्ध द्वन्द्वांच्या आधीन असतो. तो ज्या वेळीं सत्ववृद्धीच्या योगानें या द्वन्द्वांचें अतिक्रमण करतो म्हणजे त्यास सुख-दुःख, शीत-उष्ण हीं सर्व समान भासतात त्या वेळीं तो आपल्या मूळ परमात्मस्वरूपाचेठायीं लीन होतो अर्थात मुक्त होतो. म्हणूनच श्रीकृष्णांनीं अर्जुनास गीतेंत निर्द्वन्द्व व्हावयास सांगितलें आहे. "त्रैगुण्यविषया वेदा निस्त्रैगुण्यो भवार्जुन । निर्द्वन्द्वो नित्यसत्वस्थो निर्योगक्षेम आत्मवान् " इ. अव्यक्तानें व्यक्तस्वरूपांत येणें याचें नांव जन्म व व्यक्तानें आपल्या अव्यक्तस्वरूपांत जाऊन पुन्हां मिळणें याचं नांव मृत्यु प्राणिमात्रांचा आदिअन्त अव्यक्तच आहे. मध्य मात्र व्यक्त असतो. भगवद्गीतेंत श्रीकृष्णांनीं सांगितलेंच आहे कीं ,, अव्यक्तादीनि भूतानि व्यक्तमध्यानि भारत । अव्यक्तनिधनान्येव तत्र का परिदेवना "

दिसत नाहींत ह्मणून महर्षींनीं यांस जीवात्म्याचीं अर्थात् जिवंत मनुष्याचीं चिन्हें असें ठरविलें आहे. शरीरांतून आत्मा निघून गेल्यावर तें शरीर चेतनारहित एखाद्या शून्य घराप्रमाणें होतें. मग त्यांत केवळ पंचभूतांचे विकार बाकी राहतात. ह्मणूनच मेलेल्या मनुष्यास संस्कृतांत तो (पञ्चत्वं गतः) पंचत्वास गेला असें ह्मणण्याचा प्रघात आहे.[१]

---

१, आपल्या शरीराचा एकंदर व्यवहार चालविणारे पांच प्रकारचे वायु आहेत. १ प्राण, २ अपान, ३ समान, ४ उदान व ५ व्यान. जी हवा श्वासाबरोबर आंत घेतली जाते तो प्राणवायु; गुदद्वाराकडे जाणारा जो वायु तो अपान वायु; पक्वाशयांत राहून पचन क्रिया चालविणारा तो समान वायु; ढेंकर वगैरे स्वरूपानें वर येणारा किंवा मस्तकांत चढणारा तो उदान वायु; आणि सर्व शरीरांत खालीं, वर, तिरवा फिरणारा तो व्यानवायु. मूळ श्लोकांत प्राण व अपान या दोनच वायूंचा उल्लेख उपलक्षणरूपानें आहे. त्यावरून एकंदर पांचही प्रकारच्या वायूंचें ग्रहण करावें. डोळ्यांची उघड-झांक हेंही उपलक्षणच आहे. यावरून अशाच प्रकारच्या सहज होणाऱ्या एकंदर क्रिया उद्दिष्ट आहेत "मनसो गतिः" व "इन्द्रियान्तरसंचार" या दोन लक्षणांचा परस्पर संबंध आहे. मन सर्व इंद्रियांचा राजा आहे. तें एका इंद्रियापासून दुसऱ्या इंद्रियाप्रत जातें व त्यापासून तिसऱ्याकडे जातें. आतां मन ऐकण्याकडे लागलें आहे, घटकेंत पाहण्याकडे लागतें इत्यादि. प्रेरण व धारण या दोन लक्ष्य किंवा ध्यानाच्या पूर्व व उत्तर अवस्था आहेत. प्रथम मनाची एका पदार्थाकडे प्रेरणा करावयाची ह्मणजे तिकडे मन लावावयाचें आणि नंतर त्यास तेथेंच धरून ठेवावयाचें. स्वप्नांत मनुष्य ( जीवात्मा ) निरनिराळ्या ठिकाणीं संचार करतो हें प्रसिद्धच आहे. जीवन आहे त्यास मृत्युही निश्चित आहे. ज्यास मृत्यु नाहीं त्यास जीवनही नाहीं. याचें नांव पंचत्वग्रहण अथवा मृत्यूचें ग्रहण. कित्येकजण पंचत्व ग्रहण ह्मणजे पंचमहाभूतांचें ग्रहण असा अर्थ करितात. परंतु तो आह्मांस युक्त दिसत नाहीं. कारण वर सांगितलेल्या क्रियांत पंचतत्व ग्रहणाचा अन्तर्भाव सहज होत आहे. ७१ वा श्लोक न्यायशास्त्रांतील आत्म्याच्या लक्षणाशीं जुळतो. "इच्छा-द्वेष-प्रयत्न-सुख-दुःख-ज्ञानान्यात्मनो लिंगानि" हें गौतमकृत लक्षण आहे. कांहींसा क्रम बदलून लावल असतां हें गौतम लक्षण क्यांटच्या मानासिकक्रियाविभागाशींही जुळतें. या श्लोकांत 'परमात्मा' हा शब्द शरीरधारी आत्मा अर्थात् जीवात्मा या अर्थी योजलेला आहे.

**अचेतनं क्रियावच्च मनश्चेतयिता परः ।**
**युक्तस्य मनसा तस्य निर्दिश्यन्ते विभोः क्रियाः ॥ ७४ ॥**
**चेतनावान्यतश्चात्मा ततः कर्ता निरुच्यते ।**
**अचेतनत्वाच्च मनः क्रियावदपि नोच्यते ॥ ७५ ॥**

मन अचेतन असून क्रिया करणारें आहे. त्यास पर जो आत्मा तो चेतना देतो. ज्यावेळीं त्या आत्म्याचा मनाशीं संयोग होतो त्यावेळीं इन्द्रियाधिपति मन क्रिया करण्यास समर्थ होतें. आत्मा चैतन्ययुक्त असल्यामुळें तो कर्ता मानिला जातो आणि मन जरी क्रिया करणारें आहे तरी त्यास चेतना नसल्यामुळें कर्ता मानितां येत नाहीं.[१]

**यथा स्वेनात्मनात्मानं सर्वः सर्वासु योनिषु ।**
**प्राणैस्तन्त्रयते प्राणी न ह्यन्योऽन्यस्य तन्त्रकः ॥ ७६ ॥**

एक मनुष्य दुसऱ्यावर ताबा चालवूं शकत नाहीं, दुसऱ्यास आपल्या तंत्रानें चालवयास भाग पाडूं शकत नाहीं. ह्मणून प्रत्येक प्राणी आपल्या प्राणासहवर्तमान आपल्या आत्म्यास निरनिराळ्या योनींत घेऊन जातो.[२]

---

१. मन हें सहावें इंद्रिय आहे. हें मागें सांगितलेंच आहे हें पांच इंद्रियांस आपल्या कह्यांत वागवितें. कठोपनिषदांत इंद्रियादिकांची श्रेणी येणेंप्रमाणें सांगितली आहे. " इंद्रियाणि पराण्याहुर्दुरीन्द्रियेभ्यः परं मनः। मनसस्तु परा बुद्धिर्बुद्धरात्मा महान्पर " इन्द्रियें आपल्या विषयांपेक्षां श्रेष्ठ आहेत, मन सर्व इंद्रियांत श्रेष्ठ आहे. मनाहून बुद्धि श्रेष्ठतर आहे आणि आत्मा बुद्धीच्या किती तरी पलीकडे आहे. अचेतन पदार्थ क्रिया करूं शकतात यांचीं उदाहरणें वायु, अग्निसंयुक्त दारू, शरीरांतील इन्द्रियें इत्यादि प्रसिद्ध आहेत. दारूसही चेतना नाहीं किंवा अग्नीसही चेतना नाहीं. परंतु दारूंत विस्तवाची ठिणगी पडली कीं ती प्रलयकारी कार्य करिते.

२ या श्लोकांत प्रथम ही गोष्ट गृहीत धरली कीं एक मनुष्य दुसऱ्याचा तंत्रक होऊं शकत नाहीं. यावर सहज असा प्रश्न उठतो कीं असें जर आहे तर कोणाच्या प्रेरणेनें किंवा बलात्कारानें आत्मा एक देह सोडून दुसरा धारण करितो ? याचें उत्तर देतात कीं आत्मा नवीन शरीर किंवा जन्म धारण करण्याच्या बाबतींत स्वतंत्र आहे. स्वतःच्याच आधीन आहे. स्वतःशिवाय अन्य कोणाचाही त्यांत कांहीं

वशी तत्कुरुते कर्म यत्कृत्वा फलमश्नुते ।
वशी चेतः समाधत्ते वशी सर्वं निरस्यति ॥ ७७ ॥
देही सर्वगतो ह्यात्मा स्वे स्वे संस्पर्शनेन्द्रिये ।
सर्वाः सर्वाश्रयस्थास्तु नात्माऽतोवेत्ति वेदनाः ॥ ७८ ॥

ज्यास स्वतः केलेल्या कर्मांचें फळ मिळतें, जो चित्ताचा निग्रह करितो ( इंद्रियांचें दमन करितो ) व जो सर्व पदार्थांचा त्याग करितो तो वशी होय. सर्वव्यापक आत्मा देहधारी झाला म्हणजे त्यास बाह्य पदार्थांचें ज्ञान इंद्रियांच्या द्वारें होत असतें. म्हणून त्यास सर्व ठिकाणच्या गोष्टींचें ज्ञान होत नाहीं.×

---

अधिकार नाहीं. हें खरें आहे कीं एका जन्मांतील कर्मांच्या अनुसार दुसरा जन्म घ्यावा लागतो. परंतु तीं कर्में स्वतःच्या स्वतंत्र इच्छेनेंच केलेलीं असतात. उदाहरणार्थ-एक मनुष्य दुसऱ्याची नोकरी पत्करितो त्या वेळीं असें दिसतें कीं त्यानें आपली इच्छा धन्याच्या हवालीं केली. परंतु वस्तुगत्या तसें नाहीं. नोकरास खाण्यापिण्यास पैसे पाहिजेत म्हणून त्यानें नोकरी पत्करली. ही पैशाची इच्छा त्याची स्वतःची आहे. कोणी त्याच्यावर लादलेली नाहीं, वाटल्यास त्यानें ती इच्छा सोडून द्यावी म्हणजे त्यास नोकरी करण्याचें कारण राहणार नाहीं. इच्छा धरणें किंवा सोडणें ही त्याच्या स्वाधीनची गोष्ट आहे. वस्तुतः नोकरी करण्यांत तो आपली इच्छा धन्याच्या हवालीं करीत नाहीं तर आपली इच्छा पुरी करण्याकरितां तो नोकरी करितो. म्हणजे नोकरी जी एक प्रकारची पराधीनता दिसते ती त्यानें आपल्या स्वतःच्या इच्छेनेंच पत्करिलेली असते. अशाच तऱ्हेनें आत्मा आपल्या स्वतःच्या खुशीनें निरनिराळे जन्म धारण करितो.

× ७७ व्या श्लोकांत 'वशी' कोणास म्हणावयाचें याची व्याख्या केली आहे. साधारणपणें जो दुसऱ्याची नोकरी-ताबेदारी करीत नाहीं त्यास आपण वशी किंवा स्वतंत्र म्हणतों. परंतु स्वतंत्र शब्दाचा इतकाच अर्थ नाहीं. जो मनुष्य अशा तऱ्हेचीं कर्में करितो कीं ज्यांचें फळ त्यास मिळतें तोही नोकरी न करणारा इतकाच स्वतंत्र आहे. मागील टीपेंत जो नोकराचा दृष्टान्त दिला आहे त्यांत दाखविलेंच आहे कीं नोकरी पत्करण्यानें मनुष्य आपली मर्जी घालवीत नाहीं तर ती पूर्ण करून घेतो. याशिवाय मनोनिग्रह करणारा व सर्वसंन्यास करणारा हेही स्वतंत्र आहेत. ७८ व्या श्लोकांत आत्मा सर्व व्यापक आहे तर सृष्टींतील यावत् पदार्थांचें ज्ञान त्यास कां होत नाहीं या प्रथमारंभीं केलेल्या प्रश्नाचें उत्तर दिलें आहे. याचा सारांश असा आहे

विभुत्वमत एवास्य यस्मात्सर्वगतो महान् ।
मनसश्च समाधानात् पश्यत्यात्मातिरस्कृतम् ॥ ७९ ॥
नित्यानुबन्धं मनसा देहकर्मानुपातिना ।
सर्वयोनिगतं विद्यादेक योनावपि स्थितम् ॥ ८० ॥

आत्मा सर्वव्यापक व महान् असल्यामुळें त्यास विभु ह्मटलें आहे. त्यास सृष्टींतील कोणत्याही ठिकाणीं कोणत्याही प्रकारचा प्रतिबंध नाहीं. साधारण पणें जीवात्मा दृष्टीच्या आड ठेवलेली वस्तु पाहूं शकत नाहीं. परंतु योगाभ्यासानें चित्ताची एकाग्रता करून समाधि लावल्यास त्या स्थितींत तेवढ्या पुरता आत्मा आपल्या शुद्ध परमात्मस्वरूपाप्रत प्राप्त होऊन, ज्ञाता-ज्ञान-ज्ञेय या तिहींच्या ऐक्यद्वारा त्यास जगतांतील यावत्पदार्थांचें ज्ञान होऊं शकतें. मनाचा व आत्म्याचा नित्यसंबंध आहे. मन शरीर व कर्माचें अनुयायी आहे. आत्मा एकायोनींत असला तरी तो सर्व योनींत आहे असेंच समजावें.*

---

कीं आत्म्याची सर्वव्यापकता त्याच्या मूळ शुद्धस्वरूपापुरती आहे. ज्या वेळीं अविद्येच्या योगानें जीवरूप ग्रहण करून तो नानाप्रकारचीं शरीरें धारण करितो त्या वेळीं त्यास एकंदर पदार्थांचें ज्ञान त्या त्या शरीराच्या इंद्रियांच्या द्वारा होत असतें, अर्थात्च परमात्म्याची अप्रतिहत ज्ञानशक्ति शरीररूपी उपाधीनें कुंठित होते. मनुष्यास डोळा नसला ह्मणजे दर्शनानें होणारें ज्ञान त्यास कदापि मिळत नाहीं. तसेंच बहिऱ्या मनुष्यास श्रवणलभ्यज्ञान होत नाहीं. याचें कारण शरीराची उपाधि होय. तोच आत्मा उपाधि टाकून आपल्या शुद्ध-बुद्ध-मुक्तस्वभावाप्रत प्राप्त झाला ह्मणजे सर्व व्यापक, सर्वसाक्षी, ज्ञानमय होतो. सारांश उपाधिभेदानें मनुष्याच्या शरीरांतील भाव गाय जाणूं शकत नाहीं, गाईच्या शरीरांतील घोडा जाणूं शकत नाहीं, एका मनुष्याच्या शरीरांतील दुसरा जाणूं शकत नाहीं. ह्मणून आत्म्यास सर्व ठिकाणचें ज्ञान होत नाहीं.

* मन शरीर व कर्म यांचें अनुयायी आहे याचा भावार्थ असा कीं ज्याप्रमाणें पुढें अमुक एक योनींत जन्म मिळावयाचा हें वर्तमान जन्मींच्या कर्मांवरून ठरतें त्याचप्रमाणें त्या योनींत जें शरीर मिळावयाचें त्याची जात-स्वभाव ही त्याच कर्मांवरून ठरलेली असतात. नवीन जन्मींच्या शरीरांत जें मन प्रविष्ट होतें त्याची प्रकृति-स्वभाव

**आदिर्नास्त्यात्मनः क्षेत्रपारम्पर्यमनादिकम् ।**
**अतस्तयोनादित्वात्किं पूर्वमिति नोच्यते ॥ ८१ ॥**

आत्मा अनादि आहे व क्षेत्रपरम्परा ही अनादि आहे अर्थात् क्षेत्र ह्मणजे सर्व जगत्, जें जाणावयाचें आहे तें, व क्षेत्रज्ञ ह्मणजे तें जाणणारा आत्मा, हीं दोन्हीं अनादि आहेत. अशा स्थितींत या दोहोंपैकीं पूर्वीचें कोणतें हें सांगणें शक्य नाहीं. अर्थात् हा प्रश्नच राहत नाहीं.

**ज्ञः साक्षीत्युच्यते नाज्ञः साक्षी ह्यात्मा ह्यतः स्मृतः ।**
**सर्वभावा हि सर्वेषां भूतानामात्मसाक्षिकाः ॥ ८२ ॥**

जो ज्ञाता असतो तोच साक्षी होऊं शकतो. अज्ञ कधीं साक्षी होऊं शकत नाहीं. ह्मणून आत्म्यास साक्षी मानलें आहे. प्राणिमात्रांच्या एकंदर घटनांचा साक्षी आत्मा आहे. घटना क्षणिक असतात. परंतु त्यांचा ज्ञाता किंवा साक्षी जो आत्मा तो नित्य आहे आणि तोच एका मागून एक उत्पन्न व लीन होत असलेल्या नवीन नवीन घटनांची सांगड जुळवीत असतो. घटना स्वरूपतः नाहींशा होतात, परंतु त्या आत्म्याच्या ज्ञानांत सदैव कायम असतात. ज्या वेळीं आत्मा त्यांच्यापासून दूर होतो त्या वेळीं तो परमात्मस्वरूपाप्रत प्राप्त होतो.

---

हीं त्या शरीर व कर्मांवर अवलंबून असतात. उदाहरणार्थ घोड्याचें मन मनुष्याच्या मनाहून निराळ्या स्वभावाचें, भिन्न प्रकृतीचें असतें. यांत ज्या कर्मांनीं घोड्याचा जन्म दिला तीं कर्में व त्या कर्मापासून प्राप्त झालेलें घोडयाचें शरीर हीं दोन कारणें आहेत. फार कशाला, एका मनुष्याचा स्वभाव दुसऱ्याच्या स्वभावाहून अगदीं निराळा आढळतो. यांतही तें विशिष्ट शरीर व तें देणारीं पूर्वार्जित कर्में हीं कारण होत. मनुष्य योनींतही राजकुळांत जन्मलेल्या एका मनुष्याचा स्वभाव, एका दुष्ट दरिद्री वंशांत जन्मलेल्या मनुष्याचा स्वभाव व एखाद्या श्रोत्रिय वंशांत जन्मलेल्या मनुष्याचा स्वभाव यांत केवढें तरी अंतर असतें. यांत कारण मनुष्ययोनि देणारीं तीं कर्में व त्या योनींतही प्राप्त झालेलें ते विशिष्ट शरीर हीं कारण होत. एक योनिगत आत्मा सर्व योनींत आहे असें समजावें या सांगण्याचा अर्थ हा कीं जरी आत्मा प्रत्येक निरनिराळ्या शरीरांत आपण निरनिराळा पाहतों तरी तो वस्तुतः एकच आत्मा सर्वव्यापी आहे. केवळ उपाधिभेदानें निरनिराळा दिसत आहे.

नैकः कदाचिद्भूतात्मा लक्षणैरुपलभ्यते ।
विशेषोऽनुपलभ्यस्य तस्य नैकस्य विद्यते ॥ ८३ ॥
संयोगः पुरुषस्येष्टो विशेषो वेदनाकृतः ।
वेदना यत्र नियता विशेषस्तत्र तत्कृतः ॥ ८४ ॥

प्राणिमात्रांस चैतन्य देणारा जो आत्मा तो ( प्रलयानंतर ) नवीन सृष्टीची उत्पत्ति होण्यापूर्वी एकटा असतो. त्या वेळीं त्यास कोणत्याही लक्षणांनीं जाणतां येत नाहीं. त्या एकाकी आत्म्याच्या संबंधांत कोणत्याहि प्रकारचा भेद किंवा वैशिष्ट्य त्यावेळीं नसतें. कारण मनुष्याचें एकंदर ज्ञान संयोगजन्य आहे. ज्ञाता व ज्ञेय हीं दोन असतील तेव्हां त्यापासून तिसरें ज्ञान उत्पन्न होणार. एकाकी आत्म्यास कोणतीच ज्ञेय वस्तु नसते. तेव्हां अर्थात्च ज्ञान हा शब्दच राहत नाहीं. पुढें ज्या वेळीं तो एकाकी आत्म प्राणिमात्रांचे ठायीं व्यक्त होतो अर्थात् पूर्वोक्त २३ तत्त्वांशीं संयुक्त होतो त्या वेळीं त्या संयोगसंबंधापासून अनेक प्रकारचे भेद उत्पन्न होतात. भेद हा सुखःदुःखादि द्वन्द्वांच्या ज्ञानापासून उत्पन्न होतो. ज्या ठिकाणीं हें ज्ञान नियत असतें त्या ठिकाणीं भेद हा अवश्य असावयाचाच.

चिकित्सति भिषक्सर्वास्त्रिकाला वेदना इति ।
यया युक्त्या वदन्त्येके सा युक्तिरुपधार्यताम् ॥ ८५ ॥
पुनस्तच्छिरसः शूलं ज्वरः स पुनरागतः ।
पुनः स कासो बलवाँश्छर्दिः सा पुनरागता ॥ ८६ ॥
एभिः प्रसन्नैर्वचनैरतीतागमनं मतम् ।
कालश्चायमतीनामर्तीनां पुनरागतः ॥ ८७ ॥
तमार्तिकालमुद्दिश्य भेषजं यत्प्रयुज्यते ।
अतीतानां प्रशमनं वेदनानां तदुच्यते ॥८८ ॥
आपस्ताः पुनरागुर्या याभिः शस्यं पुरा हतम् ।
यथा प्रक्रियते सेतुः प्रतिकर्म तथाश्रयेत् ॥ ८९ ॥

या अध्यायाच्या आरंभीं असा एक प्रश्न केला आहे कीं वैद्य भूत, भविष्यत् व वर्तमान या तीन कालांपैकीं कोणत्या कालच्या रोगांची चिकित्सा करितो? भूतकालचा रोग निघून गेला, त्याच्या चिकित्सेची गरज नाहीं. भविष्य काळीं जो रोग होणार त्याची चिकित्सा आतां कशी करणार? राहिला वर्तमानकाळ; तर तो गणितांतील बिंदुप्रमाणें भूत व भविष्यत् या दोन काळांच्या मधील संधिकाल आहे. तेव्हां त्याची चिकित्सा करण्याचें कारण नाहीं. या आक्षेपांसहित जो प्रश्न केला आहे त्याचें उत्तर असें देतात कीं, वैद्य तीन्ही काळच्या रोगांची चिकित्सा करितो. आतां ती ज्या युक्तीनें करितो ती युक्ति ऐका. पूर्वी एकदां होऊन गेलेला रोग पुन्हां झाला असतां त्यास भूतकालिक रोगाचें पुनरागमन असें मानतात. आपण ह्मणतों कीं हें कालचें डोकें दुखणें फिरून सुरू झालें, हा कालचा ताप पुन्हां आला, हा पुन्हां जबरदस्त खोकला आला, या कालच्या सारख्या वांत्या होऊं लागल्या, इत्यादि. आपण या वाक्यांचा जो प्रयोग करितों तो अतीतागमन सूचकच असतो. ही परवांची ताप भरण्याची वेळ आली, किंवा गेल्या महिन्यासारखा फेंपऱ्याचा झटका येण्याचा आज दिवस आहे असें जाणून त्या त्या रोगाचें औषध देणें यचें नांव गत–रोगांची चिकित्सा करणें होय. ज्या पाण्याच्या पुरानें मागच्या खेपेस आपल्या पिकांची नासाडी केली, तोच पूर आतां आला आहे किंवा येण्याचीं लक्षणें दिसत आहेत असें जाणून ज्याप्रमाणें मनुष्य पूर्वीच्यासारखा बांध घालतो, त्याचप्रमाणें पूर्वीच्या रोगांचीं लक्षणें पाहून पूर्वीसारखी चिकित्सा करावी.

**पूर्वरूपं विकाराणां दृष्ट्वा प्रादुर्भविष्यताम् ।**
**या क्रिया क्रियते सा च वेदना हन्त्यनागताम् ॥ ९० ॥**

पुढें होणाऱ्या रोगांचीं लक्षणें पाहून जी अगोदर चिकित्सा केली जाते ती भविष्यत्कालीन रोगांची चिकित्सा समजावी. उदाहरणार्थ–अंग वळणें डोळे लाल होणें, जांभया येणें, आळस येणें, अंग जड होणें, अंगावर कांटा येणें, इत्यादि लक्षणें होऊं लागलीं ह्मणजे आतां लवकरच पुढें ताप भरणार

आहे असें समजून घेऊन तेव्हांपासूनच पुढें येणाऱ्या तापावरचीं औषधें देऊं लागणें हें भविष्यत् काळच्या रोगांची चिकित्सा करणें स्पष्टच आहे.

**पारम्पर्यानुबन्धस्तु दुःखानां विनिवर्तते ।**
**सुखहेतूपचारेण सुखञ्चापि प्रवर्तते ॥ ९१ ॥**
**न समा यान्ति वैषम्यं विषमाः समतां न च ।**
**हेतुभिः सदृशा नित्यं जायन्ते देहधातवः ॥ ९२ ॥**
**युक्तिमेतां पुरस्कृत्य त्रिकालां वेदनां भिषक् ।**
**हन्तीत्युक्ता चिकित्सा तु नैष्ठिकी या विनोपधा ॥ ९३ ॥**

येथपर्यंत भूत व भविष्यत् काळच्या रोगांच्या चिकित्सेची युक्ति सांगून आतां वर्तमानकाळच्या रोगांविषयीं निरूपण करितात. वर्तमानकाळ हा भूत व भविष्यत् यांच्यामधील संधिकाळ आहे, तेव्हां त्याची चिकित्सा करण्याचें कारण नाहीं असा जो आक्षेप घेतला आहे त्याचें उत्तर देतात कीं, वर्तमान काळच्या रोगाची चिकित्सा केल्यानें तो रोग स्वयं नाहीसा होतोच; परंतु त्याशिवाय त्या रोगापासून पुढें परंपरेनें उद्भवणाऱ्या रोगमालेचाही प्रतिबंध होतो. आतां पडसें आहे त्याचें औषध केल्यानें तें स्वयं बरें होईल व त्यापासून पुढें खोकला, खोकल्यापासून ताप, तापापासून क्षय आदि जी रोगपरंपरा, पडशाचें औषध न केल्यानें उद्भवली असती, तीही टळली. वर्तमानरोगांची चिकित्सा करावयाची म्हणजे शरीरांतील रस—रक्तादि धातूंस समान स्थितीवर आणून ठेवावयाचें. समान स्थितीवर आणून ठेवण्याकरितां त्यांचीं जीं उत्पादक कारणें असतील तीं त्याच्या अनुकूल करावयाचीं. शरीरस्थ धातु नेहमीं त्यांच्या कारणानुसार बनलेले असतात. कारणें विषम झालीं असतां ते विषम होतात व तीं सम असतां ते सम होतात. रोग म्हणजे धातूंची विषमता व त्यांचें साम्य करणें ही त्या रोगांची चिकित्सा, हें रोगचिकित्सेचें तत्व सूत्रस्थानांत अनेक स्थळीं विस्तारपूर्वक सांगितलेंच आहे. उपरोक्त पद्धतीनें वैद्य तिन्हीं काळच्या रोगांची चिकित्सा करितो. कोणत्याही प्रकारच्या लोभावांचून जी चिकित्सा केली जाते तीच खरी नैष्ठिक चिकित्सा होय.

उपधा हि परो हेतुर्दुःखदुःखाश्रयप्रदः ।
त्यागः सर्वोपधानाञ्च सर्वदुःखव्यपोहकः ॥ ९४ ॥
कोषकारो यथा ह्यंशूनुपादत्ते वधप्रदान ।
उपादत्ते तथार्थेभ्यस्तृष्णामज्ञः सदातुरः ॥ ९५ ॥
यस्त्वग्निकल्पानर्थाञ्ज्ञो ज्ञात्वा तेभ्यो निवर्तते ।
अनारभादसंयोगात्तं दुःखं नोपतिष्ठते ॥ ९६ ॥

लोभापासूनच एकंदर दुःखें व दुःखदायक गोष्टी उत्पन्न होतात. आणि लोभ सोडला असतां यावद्दुःखाचा नाश होतो. ज्याप्रमाणें रेशमाचा किडा स्वतःच तंतू विणून त्यांच्या योगानें आपला स्वतःचा नाश करून घेतो, त्याचप्रमाणें अज्ञ मनुष्य सांसारिक विषयांपासून तृष्णा लावून घेऊन सर्व आयुष्य दुःखांत घालवितो. जो ज्ञानी मनुष्य सांसारिक विषयांस अग्नीप्रमाणें अस्पृश्य जाणून त्यांपासून दूर राहतो त्यास कधींही दुःख सोसावें लागत नाहीं. कारण त्यास कोणत्याही विषयाचा लोभ नसल्यामुळें तो त्याकारितां प्रयत्न करीत नाहीं व अर्थात्च त्यांत कदाचित् यश न आल्यानें होणारा जो संताप किंवा दुःख तें सहजीं टळतें.

धीधृतिस्मृतिविभ्रंशः सम्प्राप्तिः कालकर्मणाम् ।
असात्म्यार्थागमश्चेति ज्ञातव्या दुःखहेतवः ॥ ९७ ॥
विषमाभिनिवेशो यो नित्यानित्ये हिताहिते ।
ज्ञेयः स बुद्धिविभ्रंशः समं बुद्धिर्हि पश्यति ॥ ९८ ॥
विषयप्रवणं चित्तं धृतिभ्रंशान्न शक्यते ।
नियन्तुमहितादर्थाद्धृतिर्हि नियमात्मिका ॥ ९९ ॥
तत्वज्ञाने स्मृतिर्यस्य रजोमोहावृतात्मनः ।
भ्रश्यते स स्मृतिभ्रंशः स्मर्तव्यं हि स्मृतौ स्थितम् ॥ १०० ॥

बुद्धि, धैर्य, व स्मृति यांचा भ्रंश; रोगोत्पादक वेळ व कर्में यांची उपस्थिति, आणि इंद्रियांचा प्रतिकूळ पदार्थांशी संयोग हीं एकंदर रोगांची

मुख्य-तात्विक कारणें समजावीं. नित्य व अनित्य किंवा हितकर व अहित-कर पदार्थविषयीं अनुचित अथवा विपरीत भाव बाळगणें म्हणजे अनित्यास नित्य मानून त्याच्याच मागें लागणें, व अनित्यास निरुपयोगी समजून त्याचा तिरस्कार करणें, वाइटास चांगलें व चांगल्यास वाईट मानून तदनुरूप वागणें, यांस बुद्धिभ्रंश ह्मणतात. कारण बुद्धीचा धर्म असद्वस्तूचा त्याग करून सद्वस्तूचें ग्रहण करणें हा आहे. ज्या मनुष्याचें मन विषयांच्या ठायीं आसक्त होतें त्याच्या धैर्याचा भ्रंश होतो. आणि नियमन करण्याची किंवा आवरण्याची शक्ति जी धैर्यांत असते ती याची नाहींशी झाल्यामुळें अहितकारक गोष्टींपासून याचें मन वळवितां येत नाहीं. ज्या मनुष्याची स्मृति, त्याचें मन, रजोगुण व मोहानें व्याप्त झाल्यामुळें, तत्वज्ञानापासून च्युत होते त्यास स्मृति-, विभ्रंश झाला असें म्हणतात. स्मरण करण्याजोगे पदार्थ म्हणजे तत्वज्ञान हें स्मृतींतच राहत असतें.

धीधृतिस्मृतिविभ्रष्टः कर्म यत्कुरुतेऽशुभम् ।
प्रज्ञापराधं तद्विद्यात्सर्वदोषप्रकोपणम् ॥ १०१ ॥
उदीरणं गतिमतामुदीर्णानाञ्च निग्रहः ।
सेवनं साहसानाञ्च नारीणाञ्चातिसेवनम् ॥ १०२ ॥
कर्मकालातिपातश्च मिथ्यारम्भश्च कर्मणाम् ।
विनयाचारलोपश्च पूज्यानाञ्चाभिधर्षणम् ॥ १०३ ॥
ज्ञातानां स्वयमर्थानामहितानान्निषेवणम् ।
परमौन्मादिकानाञ्च प्रत्ययानां निषेवणम् ॥ १०४ ॥
अकालदेशसञ्चारो मैत्री संक्लिष्टकर्मभिः ।
इन्द्रियोपक्रमोक्तस्य सद्वृत्तस्य च वर्जनम् ॥ १०५ ॥
ईर्षामानमदक्रोधलोभ मोहमदभ्रमाः ।
तज्जं वा कर्म यत्क्लिष्टं यद्वा तद्देहकर्म च ॥ १०६ ॥
यच्चान्यदीदृशं कर्म रजोमोहसमुत्थितम् ।
प्रज्ञापराधं तं शिष्टा ब्रुवते व्याधिकारणम् ॥ १०७ ॥

**बुद्ध्या विषमविज्ञानं विषमञ्च प्रवर्तनम् ।**
**प्रज्ञापराधं जानीयान्मनसो गोचरं हि तत् ॥ १०८ ॥**

ज्या मनुष्याची बुद्धि, धैर्य व स्मृति हीं भ्रष्ट झालेलीं आहेत असा मनुष्य जीं जीं अयोग्य कर्में करितो त्या सर्वांस प्रज्ञापराध हें एक विशेष नांव दिलें जातें. प्रज्ञापराधापासून एकंदर दोष प्रकुपित होतात. त्या एकंदर दोषांत शारीरिक वातादि दोष तसेच वर्तणुकींतील कर्तव्याकर्तव्य दोष या सर्वांचा समावेश होतो. मलमूत्रादिकांचे वेग बळेंच प्रवृत्त करणें (ह्मणजे घशांत बोटें घालून उलटी करणें, कुंथून शौचास आणणें इत्यादि, उपस्थित वेग थांबविणें, साहसाचीं कामें करणें, अतिशय स्त्रीसंभोग, आवश्यक कार्यांच्या योग्य वेळेचें उल्लंघन करणें, त्यांचा अनुचित प्रयत्न करणें) विनय व आचार यांचा लोप करणें, पूज्य मनुष्यांस दरडावणें, अहितकर अशा माहीत असलेल्या पदार्थांचें सेवन करणें, उन्मादकारक विषयांचें सेवन करणें, अयोग्य वेळीं व अयोग्य स्थळीं फिरणें, स्वतःस क्लेशदायक कर्मांनीं किंवा क्लेशदायक मनुष्याची मैत्री संपादन करणें, सूत्रस्थानाच्या इन्द्रियोपक्रमणीय अध्यायांत सांगितलेले आरोग्यरक्षणाचे नियम न पाळणें, ईर्षा, मान, भीति, राग, लोभ, मोह, मद, भ्रम व यांपासून उत्पन्न होणाऱ्या क्लेशदायक गोष्टी व शरीरास कष्ट देणाऱ्या गोष्टी, तसेंच रजोगुण व मोह यांपासून उत्पन्न होणाऱ्या एकंदर गोष्टी, या सर्वांचा प्रज्ञापराध या सदराखालीं समावेश होतो. प्रज्ञापराध हें रोग उत्पन्न करणारें एक प्रबल कारण आहे असें ऋषींचें मत आहे. बुद्धीनें विपरीत ग्रहण करणें व तदनुसार विपरीत वर्तन करणें यास प्रज्ञापराध ह्मणतात. प्रज्ञापराध हा वस्तुतः मानसिक दोष आहे.

**निर्दिष्टा कालसम्प्राप्तिर्व्याधीनां हेतुसंग्रहे ॥**
**चयप्रकोपप्रशमाः पित्तादीनां यथा पुरा ॥ १०९ ॥**
**मिथ्यातिहीनलिङ्गाश्च वर्षान्ता रोगहेतवः ।**
**जीर्णभुक्तमजीर्णान्नकालाकालस्थितिश्च या ॥ ११० ॥**
**पूर्वमध्यापराह्णाश्च रात्र्यायामास्त्रयश्च ये ।**

**येषु कालेषु नियता ये रोगास्ते च कालजाः ॥ १२१ ॥**
**अन्येद्युष्को द्व्यहग्राही तृतीयकमचतुर्थकौ ।**
**स्वे स्वे काले मवर्तन्ते काले ह्येषां बलागमः ॥ ११२ ॥**
**एते चान्ये च ये केचित्कालजा विविधा गदाः**
**अनागते चिकित्स्यास्ते बलकालौ विजानता ॥ ११३**
**कालस्य परिणामेन जरामृत्युनिमित्तजाः ।**
**रोगाः स्वाभाविकः दृष्टाः स्वभावो निष्प्रतिक्रियः ॥ ११४ ॥**

मागें एकंदर रोगांचीं तीन तात्विक कारणें सांगितलीं. (१) 'धीधृतिस्मृतिविभ्रंश' (२) 'कालकर्मांची सम्प्राति' व (३) 'असात्म्यार्थागम'. यांपैकीं येथपर्यंत 'धी धृतिस्मृतिविभ्रंश' याचें निरूपण केलें. आतां 'कालकर्मांच्या सम्प्राप्तिपैकीं प्रथम कालसम्प्राप्तीचें वर्णन करितात. त्या त्या दोषाच्या संचय—प्रकोप—व शांतीस अनुकूल अशी जी दिवस—रात्रीपैकीं वेळ किंवा जो विशिष्ट ऋतु त्या वेळ किंवा ऋतूचें येणें यांचें नांव कालसम्प्राप्ति. सामान्यतः सकाळ ही कफाचा संचय होण्याची वेळ आहे, दुपार पित्तसंचयास अनुकूल असते व संध्याकाळ वातसंचयाची वेळ आहे. तसेंच सामान्यतः उन्हाळ्यांत पित्तसंचय होतो, पावसाळ्यांत वात वाढतो आणि हिंवाळ्यांत कफवृद्धि होते. रात्रीं ही दुसरा प्रहर कफाचा, तिसरा पित्ताचा व चवथा वाताचा अशी व्यवस्था आहे. आतां ऋतुसंबंधीं सामान्य लक्षणांत कदाचित कांहीं विशेष फरक होणें संभव आहे. ह्मणजे हिंवाळ्यांत एखाद्या दिवशीं कमी थंडी पडली असतां किंवा थंडीच्या ऐवजीं उलट उन्हाळ्यासारखी उष्णता होऊं लागली असतां त्या भेदानुरूप त्या ऋतूच्या दोषविकारकारी स्वाभाविक गुणधर्मांतही फरक होऊं शकेल; परंतु सामान्यतः हीच व्यवस्था असते. पचलें गेलेलें, नुक्तेंच खाल्लेलें व पचत असलेलें अन्नही त्या त्या कालस्थितीच्या अनुसार दोष सचय—प्रकोपादिक करण्यास कारणभूत होतें. जेवीत असतां कफसंचय होत असतो, पचन होत असतां पित्त वाढतें व पचनानंतर वाताची पाळी असते, ह्मणून सकाळीं जेऊं नये. कारण सकाळची वेळ व जेवण हीं दोन्ही कफसं-

वावाडिंग व नागरमोथा या तीन औषधांच्या समष्टीस त्रिमद अशी संज्ञा आहे. याचा उपयोग अनेक औषधांत भूक लागण्याकरितां व शरीरांत स्फूर्ति येण्याकरितां, अजीर्ण-अपचन आदि दूर करण्याकरितां, केला जातो. मूळव्याधीवरच्या बहुतेक औषधांत याचा उपयोग सांगितला आहे. डॉ. हॉर्सफील्ड लिहितात कीं जावा बेटांतील लोक चित्रकाची मुळी पलिस्तरच्या कामीं वापरतात. दक्षिण हिंदुस्थानांत, गरमीच्या योगानें अंगावर फोड येऊन ते फुटून चट्टे पडले असतां त्यावर व कुष्ठावर चित्रकाच्या मुळांचा उपयोग बराच करितात. याच्या ओल्या मुळांतून दुधासारखा रस निवतो तो अभिष्यन्द नामक नेत्ररोगांत गुणकारी आहे. सतत (Inrermittent) ज्वरांतही याच्या मुळांचा चांगला उपयोग होतो. यांच्या अंगीं वाम आणण्याचाही जोरदार धर्म आहे. डॉक्टर ओसवॉल्डनें स्वतः अनुभव घेऊन यांच्या ज्वरघ्न गुणांची चांगली प्रशंसा केली आहे. अरबी भाषेंत याचें 'शितरज' असें जें नांव आहे तें 'चित्रक' या संस्कृत शब्दाच्या अपभ्रंशानें बनलेलें आहे असें दिसतें. चित्रकाचे जे गुण आर्यवैद्यकांत सांगितले आहेत ते युनानी वैद्यकास (हकीमांस) ही तसेच मान्य आहेत. कफविकार, पानथरी, संधिवात, वगैरे रोगांवर हकीम लोक यास फार गुणकारी मानतात. याचे पाचक व गर्भपातकारी गुणही त्यांस ठाऊक आहेत. कुष्ठ व जुने त्वचेचे रोग यांवर दूध व शिरक्यांतून किंवा पाणी व मिठाबरोबर चित्रकाच्या मुळांचा लेप फोड येईपर्यंत लावून ठेवावा. संधिवात वगैरे वातविकारांवर १५-२० मिनिटपर्यंत सदरहू लेप लावून ठेवावा. हा विधि एका युनानी ग्रंथांत लिहिलेला आहे.

१ चित्रकमूळ, सैंधव, हिरडे व पिंपळी हीं समभाग घेऊन चूर्ण करावें व दरवेळीं सुमारें ३ पासून ६ मासे चूर्ण घेऊन पाण्याबरोबर घ्यावें म्हणजे अजीर्ण नाश होऊन अग्नि प्रदीप्त होतो. (२) चित्रक, इंद्रजव, पहाडमूळ, कुटकी, अतिविष व हिरडे या समभाग जिनसांचें चूर्ण करून तें दरवेळीं ३।४ मासेप्रमाणें घ्यावें. हें वातव्याधीवर फार प्रशस्त आहे. यास सुश्रुतांनी षड्धरणयोग हें नांव दिलें आहे.

याचे गुणदोष व औषधिप्रयोग व. गु. २ ऱ्या भागांत सविस्तर दिले आहेत ते पहावे.

## १८ खसखस.

**संस्कृत**—सूक्ष्मबीज. सुबीज, सूक्ष्मतण्डुल, खसतिल, खसबीज, खाखसतिल, खसखस. **गु. हिं. क.** खसखस **बं.** पोस्तदाना. **तै. ता.** गसगस **तु.** कसकसे **मला.** कशकश. **फा.** तुख्मे कोकनार. **अ.** हबुल्कोकनार **इं.** Poppyseeds पॉपीसीड्सला. Papaver Somniferum पापॅवर सोम्निफेरम्.

( अफूचें बोंड ) **सं.** खाखसफल, उलुसत्फल. **गु.** अफीणना डोडवा. **हिं.** पोस्त, खसखसका फल. **बं** पोस्तटेंडि, खाकसी. **फा.** कोकनार. **अ.** अबुनास. **इं.** Poppy Capsule पॉपी क्यापसुल.

( अफू ) **सं.** अहिफेन, अफेन, निफेन, नागफेन, भुजंगफेन, आफूक, खसफलक्षीर, पोस्तरस, पोस्तोद्भव. **गु.** अफीण **बं.** आफिम्. **क.** अफीम अफेन. **तै.** नालमंडु, **फा.** अफ्यून, तिर्याक्. **अ.** लबनुल् खसखास. **इं.** Opium ओपियम.

**वर्णन.**—ज्या झाडापासून अफू उत्पन्न होते त्यास खसखशीचा रोपा ह्मणतात. हें सरासरी ३।४ फूट उंचीचें झुडुप आहे. याचीं पानें लांब, टोंकाकडे निमुळतीं होत गेलेलीं व कात्रेदार किनारीचीं असतात. खसखशीच्या झुडपाच्या अनेक जाति आहेत. त्यांपैकीं कांहीं महत्वाच्या जातिचें वर्णन पुढें केलें जाईल. या झुडपावर पांढऱ्या, तांबड्या व जांभळ्या रंगाचीं सुंदर फुलें येतात. फुलांचा देंठ लांब असतो व पाकळ्या चार असतात. खसखशीचें प्रफुल्लित शेत फार रमणीय दिसतें. याच्या फळास पोस्त किंवा बोंड ह्मणतात. बोंड चिरल्यावर आंतून रस निघतो तो सुकला ह्मणजे त्यासच अफू ह्मणतात. फाल्गुनाच्या सुमारास हीं बोंडें पिकून तयार झालीं ह्मणजे संध्याकाळीं ३—४ वाजण्याच्या सुमारास, ऊन साधारण कडक आहे अशा वेळीं, साहेब लोक जेवतांना ज्या कांट्याचा उपयोग करितात (Fork)

त्याच्यासारख्या आकृतीचें चार पात्यांचें एक शस्त्र असतें तें बोंडावर खालून वर ओढून त्यास चिरा पाडून ठेवितात. दुसऱ्या दिवशीं सकाळपर्यंत त्या चिरांतून दूध निघत असतें व तें बाहेरच्या बाजूस जमलेलें असतें. मध्य-रात्रीं नंतर पहांटेच्या सुमारास जास्त दूध निवतें. सकाळीं ८।९ वाजतां एका पातळ लोखंडाच्या चमचानें, ज्यास शेतकरी लोक 'सतवा' ह्मणतात. बोंडावर जमलेला रस खरवडून घेतात. या रीतीनें प्रत्येक बोंडांतून दोन दोन तीन तीन दिवसांच्या अंतरानें एकंदर तीन चार वेळां रस काढला जातो. हें सरासरीचें मान आहे. कांहीं बोंडांतून एकवेळेपेक्षां जास्त रस निघत नाहीं. उलटपक्षीं कांहींतून आठ आठ दहा दहा वेळ चिरलें तरी रस निघत असतो. अफूची लागवड बहुतेक देशी संस्थानांतून व हिंदुस्थानांतलि बऱ्याच प्रांतांतून होते. पंजाबांत तर प्रत्येक जिल्ह्यांत अफूची लागवड होते. परंतु तिथली अफू तिथेंच खपते. देशान्तरांत पाठविण्या जोगी जास्त होत नाहीं. अफूचा व्यापार सरकारनें आपल्या हातांत ठेविला आहे व त्याच्या व्यवस्थेकरितां हिंदुस्थानांत तीन मुख्य स्थानें ठराविलीं आहेत, व त्या त्या प्रांतांतील अफू त्या त्या शहराच्या नांवानें प्रसिद्ध आहे, जसें "पटना अफू" "बनारसी अफू," व "माळवी अफू". बनारसी अफूंत शेंकडा ७० भाग शुद्ध अफू व ३० भाग द्रवांशमिश्रण असतें. बनारसी शेतकरी बोंडांवरून अफू काढून आणल्याबरोबर ती एका मातीच्या परळांत घालून तें परळ वांकडें करून कशास तरीं टेंकून ठेवितात. या योगानें अफूंत असलेला द्रवांश खालीं गळून येतो. हा काळा कॉफीसारखा असतो. यास सरकारी परिभाषेंत 'पसेवा' ह्मणतात. हा ३॥ रु. शेराच्या दरानें सरकार विकत घेतें. बिहारी अफूंत ह्मणजे पटना एजन्सीच्या अफूंत शेंकडा ७५ भाग शुद्ध अफू ठेवतात. ह्मणून तिकडचे अफूचे शेतकरी अफू काढून आणल्या-बरोबर एका रुंद तोंडाच्या मातीच्या परळावर फडक्याचा दादरा बांधून त्यावर ती पसरून ठेवतात. त्यांतील द्रवांश तो फडका शोषून घेतो. परंतु त्याबरोबर अफूचाही कांहीं अंश त्यास चिकटून राहतो. या फडक्यास 'कफा' ह्मणतात.

एजन्सीवाले हे फडकेही त्यांस चिकटून राहिलेल्या अफूच्या प्रमाणानुसार कमी जास्त दरानें विकत घेतात. ज्यावेळीं अफू बोंडावरून काढली जाते त्यावेळीं तींत अर्धा हिस्सा द्रवद्रव्याचा असतो. एका झाडांतून एकवेळच्या चिरण्यानें सुमारें १० ग्रेन अफू निघते. चांगला जोरदार व निरोगी रोपा असल्यास ५ पासून ८ वेळांच्या चिरण्यांत सरासरी ७५ ग्रेन अफू निघते.

खसखशीच्या रोप्यापासून ६ प्रकारचीं विक्रीचीं द्रव्यें निघतात. १ अफू. २ पूर्वोक्त 'पसेवा' ३ फुलांच्या पाकळ्या ज्यांस 'पानें' ह्मणतात. ४ सुकवलेल्या कोंवळ्या डाहळ्या व पानांचा कुटलेला भुगा. ज्यास इंग्रजींत Trash ह्मणतात तो. ५ बोंड व ६ खसखस. अफूंत पसेवा राहिल्यानें ती काळी व पातळ दिसते. तसेंच तिच्या गुणांतही फरक पडतो ह्मणून तो काढून टाकितात. अफूंत जीं कित्येक अत्यंत विद्रावणशील द्रव्यें आहेत तीं रात्रीच्या वेळीं पडणाऱ्या दंवाच्या योगानें किंवा वातावरणांतील ओलाव्याच्या योगानें द्रवीभूत होतात. त्यास पसेवा ह्मणतात. या पसेव्यांत एक विशिष्ट गंध, मेकोनिक ॲसिड, एक राळसदृश द्रव्य, मॉर्फिया व नारकोटाइन या डॉक्टरी नांवाचीं औषधि सत्वें असतात. पसेवा अफूंत सदोदित असत नाहीं. तर वातावरणाच्या विशिष्ट स्थितींत उत्पन्न होतो. जोराचा पश्चिम वारा वाहत असतां किंवा दंव नसतां काढलेल्या अफूंत पसेवा मिळत नाहीं.

अर्ध्या जानेवारीपासून किंवा फेब्रुवारीच्या आरंभापासून मार्चच्या सुरवातीपर्यंत खसखसीच्या झाडांचा फुलण्याचा ऋतु असतो. फुलें फुलून गळून पडावयाच्या बेतास आलीं ह्मणजे पुढील रीतीनें तीं काढून घेतात. आंगठा व मधलें बोट हीं जोडून यांच्या दरम्यान खालच्या बाजूनें ( देंटाकडून ) फूल धरून हळूच हात वर उचलतात ह्मणजे त्यांच्या परिपक्व पाकळ्या तुटून हातांत येतात. या पाकळ्या अशा युक्तीनें तोडून घ्याव्या लागतात कीं खालच्या बोंडास कोणत्याही प्रकारें इजा पोंचूं नये. नंतर एका मातीच्या परळावर त्या पसरून त्याच्यावर एक ओला फडका घालतात आणि परळ चुलीवर ठेऊन खालीं मन्दाग्नि लावितात. वरून ओल्या कपड्याची जाडी

घडी करून तिनें दाबून ठेवितात. अग्नीनें, पाकळ्यावर झांकण घातलेल्या ओल्या कपड्यांतील जलांशाची वाफ बनून तिचा, पाकळ्यांत जें एक राळे सारखें द्रव्य असतें त्यावर परिणाम होऊन त्या सर्व पाकळ्या एकत्र सांधून त्यांचें एक मोठें पान बनतें. ह्मणून यांचें परिभाषिक नांव पान असें पडलें आहे. या पानांचा उपयोग अफूच्या वड्या बांधण्याकडे होतो. हीं पानें ताजीं असतांना यांस सुगंध येतो. बंगाली अफूस जो एक प्रकारचा सुवास येतो त्याचें कारण हींच पानें होत. या पानांच्या ऐवजीं सुती व रेशमी कापड तसेंच मेणकापड वगैरे अनेक प्रकारचीं वेष्टनें करून वापरलीं गेलीं. परंतु या पानांचें काम कोणत्याही कापडानें झालें नाहीं. सबब तीं सर्व रद्द ठरलीं. या पानांत तीन प्रति आहेत. बनारस एजन्सीवाल्यांनीं त्यांचीं अनुक्रमें "चंदी, दवन व गथा' हीं नांवें ठरविलीं आहेत. बिहार एजन्सींत, एकाच 'चंदी' च्या १ ली, २ री व तिसरी अशा तीन प्रति केल्या आहेत. प्रत्येक एजन्सींत प्रतिवर्षी सरासरी ७०००० पासून १४०००० रुपये पर्यंत किंमतीचीं पानें विकत घेतलीं जातात.

खसखशीच्या रोप्याच्या कोंवळ्या डाहळ्या व पानें सुकवून कुटतात त्यांस ट्रॅश ( Trash ) ह्मणतात. ट्रॅश ह्मणजे रद्दी निरुपयोगी भाग. हा 'ट्रॅश' बनविण्याकरितां रोपे सुकेपर्यंत शेतांत तसेच ठेवावे लागतात. ते सुकले ह्मणजे वर सांगितल्याप्रमाणें डाहळ्या व पानें कुटून त्यांचा भुगा करितात व तो एकेक मणाच्या कोथळ्यांत भरून सब एजन्सींत विकावयास घेऊन येतात. प्रत्येक एजन्सींत दरसाल १०-१५ हजार रुपयांचा 'ट्रॅश' खरेदी करितात.

उद्भिज्जशास्त्रवेत्त्यांनीं खसखशीच्या पांढरी, तांबडी व जांभळी अशा तीन जाति निर्धारित केल्या आहेत. पांढऱ्या फुलांच्या बोंडांतील ( दाणे ) खसखस पांढरी असते आणि लाल जातीच्या बोंडांतील खसखस काळी असते. हिंदुस्थानांत पांढऱ्या जातीचीच उत्पत्ति विशेष होते. पश्चिमोत्तर प्रांत व बंगाल्यांत तर फक्त पांढऱ्याच जातीची उत्पति होते, त्या प्रांतांतील हवा

पाणी तांबड्या व जांभळ्या रंगाच्या जातीपेक्षां पांढऱ्या जातीस अधिक मानवते असें आढळून आलें आहे. तांबडी व जांभळी जात फक्त माळव्यांत होते असें डॉ. वाट यांचें मत आहे. दुसऱ्या एका ग्रंथकाराचे मतें तांबडी जात हिमालयांतही होते.

स्कॉट साहेबानें खसखशीच्या रोप्याच्या बऱ्याच जाति ठरविल्या आहेत. त्यांपैकीं बंगाल एजन्सीच्या हद्दींतील दहा व माळव्यांतील चार जाति विशेष महत्वाच्या आहेत. त्यांचें संक्षिप्त वर्णन खालीं देत आहों. बंगाल्यांतील जाती.

( १ ) 'सफेद घेरी" याची लागवड सगळ्यांत जास्त होते. याचीं बोंडें पांढऱ्या रंगाचीं, कांहींशीं वर्तुळ, लांबट, असून त्यांवर बारीक पांढऱ्या रंगाची पूड असते. या जातीचे दोन पोटभेद आहेत. एका जातीचीं बोंडें सदरहू बोंडांपेक्षां लहान असतात. बाकी स्वरूप सारखेंच असतें. या जातीच्या बोंडांतून फार थोडी अफू निघते. दुसरी जी जात आहे तिच्या बोंडांचा रंग कांहींसा हिरवा असतो आणि त्यांवर वरील जातीप्रमाणें पांढरी पूड नसते. या बोंडांची साल तीं पिकण्या पूर्वींच सुकून लांकडासारखी टणक होते. यांतून इतकी थोडी अफू निघते कीं बोंडास एका वेळेपेक्षां जास्त चिरावे लागत नाहीं. प्रथम ज्या जातीचें वर्णन केलें आहे त्यांतून इतकी अफू निघते कीं बोंडास ९–१० वेळां चिरा पाडल्या तरी रस निघतच असतो. या जातीची अफूही चांगल्या प्रतीची असते.

( २ ) "कालदन्थी" अथवा "काळ्या देंठाची जात"—याचा रोपा फार लहान असतो. याची खूण ही आहे कीं फूल गळल्या नंतर व बोंड पिकण्यापूर्वी—या दरम्यान—याचा मधला दांडा व पुष्पदंड जांभळ्या—काळ्या रंगाचा होतो. याचीं बोंडें लहान $1\frac{3}{4}$–२ इंच लांब व $1\frac{1}{2}$–२ इंच घेराचीं असतात. यांतून अफू विशेषशी निघत नाहीं आणि जी निघते तींत इतर जातींच्या अफूपेक्षां क्षारधर्मी सत्वें कमी प्रमाणांत सांपडतात.

( ३ ) 'मोनरिया" याचीं बोंडें मोठीं व वाटोळीं असतात. ( २–$2\frac{1}{4}$ इंच लांब व घेर $2\frac{1}{2}$–$2\frac{1}{2}$ इंच ) चांगल्या निवडक बोंडांतून ९ चिरां-

पर्यंत अफू निघते. परंतु अशीं बोंडें थोडीं असतात. विशेष भरणा तिसऱ्या चौथ्यावेळीं सुकणाऱ्या बोंडांचाच असतो.

( ४ ) " तेलिया " अथवा " सब्जधेरी–यांतून सर्वांपेक्षां जास्त अफू निघते. परंतु याची लागवड फार थोडी केली जाते. हा वर सांगितलेल्या 'सफेद धेरीचाच भेद आहे व तिच्याशीं प्राय: सर्वांशीं मिळतो. फक्त याचीं बोंडें हिरवीं असतात. आणि 'सफेद धेरी'च्या बोंडांवर जी सफेद रंगाची पूड असते ती या बोंडांवर नसते. चीनदेशांत या जातीची अफू महाग विकते.

( ५ ) "कुटिल" अथवा "काटपट्टा"-ही एक स्वतंत्र जात आहे. याच्या पानांचे कांठ कात्रेदार असतात. रोपा मोठा व ताठ असतो. मध्य दंडाच्या वरच्या बाजूस कांहीं थोड्याशा डाहळ्या येतात. पानें जाड असतात. रंग फिकट हिरवा असतो. आकार लांबट कांहींसा अंडाकृति, लांबी ५–९ इंच, रुंदी ४–५ इंच असते. बोंडें २–२$\frac{1}{4}$ इंच लांब व १$\frac{1}{2}$–२ इंच रुंद असतात. वर पांढऱ्या रंगाची भुकटी असते. या जातींत दोन अपूर्व गुण आहेत. एक यास रोग लागत नाहीं व दुसरा याच्या पानांची जाडी व आकार विशेषामुळें गारा पडल्या असतां यास इजा पोंचत नाहीं.

( ६ ) "सब्जकुटिल" ही जात दुर्मिळ आहे. परंतु ह्यांतून अफू अधिक निघते. मागच्या ( ५ व्या ) व या जातींत इतकाच फरक आहे कीं याचीं बोंडें फिकट हिरव्या रंगाचीं असतात व त्यांवर पांढऱ्या रंगाची भुकटी नसते.

( ७ ) "दुसरा कुटिल" ही एक स्वतंत्रच जात आहे. ही 'कुटिल' जातीपेक्षां मोठी असते. यास डाहळ्या बऱ्याच येतात. पानें लांबट अंडाकृति, ६–१२ इंच लांब आणि ५–७ इंच रुंद व जाड असून वरच्या अर्ध्या भागांत ४ किंवा ६ रुंद, खरखरीत कात्रेदार, खंडें असतात. यांचा रंग समुद्रासारखा फिकट हिरवा असतो. बोंडें वाटोळीं दोन इंच लांब–रुंद असतात व त्यांवर पांढऱ्या रंगाच्या भुकटीचा थर बसलेला असतो. यांतून अफू बरीच निघते.

( ८ ) "चैारा" अथवा "तिसरा कुटिल" याचें झुडप जोरदार असतें. परंतु यास डाहळ्या फार नसतात. पानांस अनियमित खंड असतात. त्यांचा रंग समुद्राच्या हिरवेपणाशीं मिळता फिकट असतो. पानें १२–२० इंच लांब व ४–७ इंच रुंद असतात; तीं टोंकाकडे निमुळतीं होत जातात. पानांचे कांठ कात्रेदार असतात. याचीं बोंडें दीर्घाकृति २–२½ इंच लांब व १½–२¼ इंच घेराचीं असतात. यांतून अफू साधारण बरीच निघते.

( ९ ) "दरही" अथवा "मुएदरदन्थी" ही एक स्वतंत्र जाति आहे. यांत इतरांहून विलक्षणता ही आहे कीं याच्या पुष्पदंडावर लंव असते. याचीं बोंडें मोटीं असतात. त्यांचा आकार नं. ८ च्या बोंडांसारखाच असतो.

( १० ) "गुनगनपोस्त" अथवा "सफेद पट्टा"–याची विशेष ओळख ही आहे कीं याचीं पानें, डाहळ्या, बोंडें या सर्वांवर पांढऱ्या रेघा व पांढरे ठिपके असतात. याचीं बोंडें मोटीं म्हणजे दोहींकडून २¼ इंच असतात. परंतु त्यामानानें यांतून अफू थोडी निघते. तीन किंवा चार वेळापेक्षां जास्त चिरा पाडाव्या लागत नाहींत.

दहा जाति बंगाल एजन्सीच्या सांगितल्या. आतां पुढें माळव्यांतील चार जातींचें वर्णन करितों.

( ११ ) "लकारिया" याचें झुडप मोटें जोरदार असतें. याची उंची ४।५ फूट असते. यास शाखा दूर दूर येतात. पानें अण्डाकृति १२–१६ इंच लांब व ५–८ इंच रुंद असतात. त्यांचे कांठ वेडेवांकडे व अनियमित खण्डांत विभक्त झालेले असून त्यांस करवतीसारखे खरखरीत दांते असतात. पानें कागदासारखीं पातळ असतात. त्यांचा रंग फिकट हिरवा असतो. फुलें मोटीं पांढऱ्या रंगाचीं असून त्यांच्या पाकळ्यांचे कांठ गुलाबी किंवा शेंदरी रंगाचे व मधून मधून कातरलेले दिसतात. बोंडें लांबट असतात. २–२½ इंच लांब व १½–२ इंच रुंद असतात. रंग हिरव्या कांचेप्रमाणें असतो. या जातीचे बरेच पोटभेदही आहेत.

( १२ ) "लीला–उंची २½–४ फूट, पानें जाड, ९–१२ इंच लांब

व ५–७ इंच रुंद. कांठ किंचित खंडविभक्त व कात्रेदार, फुलें मोठीं, पांढरीं. व समग्र किनारीचीं. बोंडें लांबट व किंचित् वाटोळीं. २½–३ लांब व २¾ २½ रुंद व पांढऱ्या भुकटीनें आच्छादित असतात. याचीच दुसरी एक जात 'सब्गलीला' नांवाची असते. तिचीं बोंडें वाटोळीं २½ इंच लांब–रुंद असून त्यांवर पांढरी भुकटी नसते.

(१३) "गंगाजली" ही जात जवळजवळ "लकरिया" सारखीच असते. क्वचित् याच्या पांढऱ्या फुलांच्या कांठांवर गुलाबी रंगाची रेघ असते. याचीं बोंडें मोठी असून, त्यांवर खांचे व पूर्वोक्त पांढरी भुकटी असते.

(१४) "उगरया" वरील तीन्ही जातींपेक्षां या जातीचें झुडूप लहान व कमजोर असतें. याचीं फुलेंही त्यांच्यापेक्षां लहान असतात. फुलांच्या बैठकीची बाजू फिकट जांभळ्या रंगाची आणि पाकळ्यांचे कांठ किरमिजी व लाल यांच्या मिश्रित रंगाचे असतात. याचीं बोंडें २–२½ इंच लांब आणि १¾–२¾ इंच रुंद असतात. यांतील खसखस फिकट जांभळ्या धूसर रंगाची असते.

बंगाल्यांत अर्ध्या आक्टोबरपासून अर्ध्या नोव्हेंबर पर्यंत खसखशीची पेरणी करितात. पश्चिमोत्तर प्रांतांतील जौनसरच्या पर्वतीय प्रदेशांत फेब्रुवारी पासून जूनपर्यंत अफूचा ऋतु असतो. इतर सर्व ठिकाणीं हा आक्टोबरपासून मार्च अखेरपर्यंत असतो.

खसखशीच्या लागवडीस बकऱ्यांच्या विष्टेचें खत फार चांगलें असतें. सणाचाही उपयोग चांगला होतो. खुद्द खसखशीच्या सुकलेल्या डाहळ्याचेंही चांगलें खत होतें. परंतु लोक त्यांचें सरपण करितात म्हणून त्या खताच्या वांट्यास येत नाहींत. पेंडींत एरंड्यांची पेंड उत्तम. राखेचेंही खत चांगलें होतें. परंतु त्यांतील क्षार निघून जाऊं देतां कामा नये. खनिज पदार्थांत शोरा उत्तम. खसखशीच्या लागवडींत खतासंबंधीं एक विशेषता आहे ती ही कीं, यांत अन्यान्य धान्याप्रमाणें जमिनींत तर खत घालतातच; परंतु वरूनही म्हणजे पानें व फुलें यांसही एक प्रकारचें खत दिलें जातें. याचा

आहे. आतां याचा उल्लेख आमच्या प्राचीन वैद्यक ग्रंथांत नाहीं हा मुद्दा राहिला. तर याच्या संबंधानें आह्मीं ह्मणतों कीं आमच्या शतशः प्राचीन वैद्यक ग्रंथांपैकीं आज मितीस प्राचीन ह्मणण्याजोगे १ चरक व २ सुश्रुत हे दोनच ग्रंथ शिल्लक आहेत. यांतही अफूच्या वृक्षाचा नामनिर्देश नाहीं असें निर्विवादपणें ह्मणतां येत नाहीं. उपर्युक्त ग्रंथांत अशा कित्येक वनस्पतींचें वर्णन आहे ज्यांस आज आह्मीं पुरतेपणीं ओळखूं शकत नाहीं. दुसरा मुद्दा असा आहे कीं कदाचित् चरक सुश्रुतांच्या काळीं या वनस्पतीचा उल्लेख करण्याजोगा उपयोग करीत नसतील. आज मितीसही हिमालयांतील कित्येक प्रदेशांत व पंजाबांतील जालंधर जिल्ह्यांत अफूच्या बोंडांपासून एक प्रकारची दारू बनविण्याशिवाय या वनस्पतीचा उपयोग करीत नाहींत. तेथील लोक अफू काढीत नाहींत. यावरून तेथील बोंडांत अफूच नाहीं किंवा तिकडच्या लोकांस ती माहीत नाहीं असें ह्मणतां येईल काय? अशा कित्येक वनस्पती आह्मीं दाखवूं शकतों कीं ज्या हिंदुस्थानांत सर्वत्र व विपुल होतात, परंतु त्यांपैकींचा उपयोग चरकाचार्यांनीं मुळींच कोठें केलेला दिसत नाहीं व कांहींचा क्वचित् एखाद दुसऱ्या ठिकाणींच प्रयोग सांगितला आहे. याचें कारण हें होऊं शकतें कीं त्याचा उपयोग त्यांस तितका प्रशस्त वाटला नसेल. आमच्या लिहिण्याचें तात्पर्य इतकेंच आहे कीं अफूचा वृक्ष मूळ हिंदुस्थानांतील नाहीं हा सिद्धांत निःशंक नाहीं. जर अफूच्या लागवडीचा प्रसार फक्त एका ग्रीस देशांतूनच पूर्वेकडील देशांत झाला असता तर रोमन कालाच्या पूर्वीं मिसर व पॅलेस्टाइन मधील लोकांस याची माहिती असावयास पाहिजे होती. परंतु तशा तऱ्हेचें प्रमाण कोठें मिळत नाहीं. इतकेंच नव्हे तर हिब्रू ग्रंथांत याचा उल्लेखही सांपडत नाहीं. सातव्या शतकांत बनलेल्या "जेरुसलेम तालमूद" नांवाच्या ग्रंथांत अफूचा प्रथम उल्लेख मिळतो. 'प्लिनी' नें पहिल्या शतकांत मिसर देशच्या अफूचा निर्देश केला आहे. डॉक्टर बर्डवुड लिहितात कीं प्रसिद्ध इलियड काव्य रचणारे ग्रीक कवि होमर यांनीं 'तिर्याक्' नांवानें ज्या पदार्थाचें वर्णन केलें आहे, तसेंच इसवीसनाच्या

पहिल्या शतकांत ‘ सेलसस ’ नांवाच्या ग्रीक वैद्यानें “ ल्याक्रिमा पपेव्हरिस ” नांवानें ज्या वस्तूचें वर्णन केलें आहे ती अफूच होय. इसवीसनाच्या ८ व्या शतकांत अफूची लागवड चीनदेशांत होत होती यावद्दलचें प्रमाण मिळतें. “ चेण्ट–सँग -ची” नांवाच्या ग्रंथकारानें अफूच्या वृक्षाचें जें वर्णन केलें आहे तें हिमालयावर होणाऱ्या जातीशीं जुळतें. खालच्या बाजूस पांढरीं व कांठांवर जांभळ्या किंवा तांबड्या रंगाची एक रेघ अशा प्रकारचीं फुलें यांस येतात. त्याचवेळच्या एका चिनी कवीनें लिहिलें आहे कीं, “ खसखशीचें झुडुप लोक शाकभाजी प्रमाणें खातात. त्याचें बीं हिंवाळ्यांत विकणाऱ्या राळे नांवाच्या धान्याप्रमाणें असतें. तें वाटलें असतां त्यांतून गाईच्या दुधासारखा रस निघतो आणि तें उकळतें असतां बुद्धाच्या पिण्याजोगें पेय बनतें ” चीनच्या ‘ ज़ेन ट्–संग ’ नांवाच्या बादशहाच्या आज्ञेनें ‘ सू संग ’ नांवाच्या वैद्यानें इ. स. १०९७ सालीं एक वैद्यक ग्रंथ छापून प्रसिद्ध केला होता त्यांत लिहिलें आहे कीं “ खसखशीचीं झुडपें सर्वत्र होतात पुष्कळ लोक यांच्या सुंदर फुलांसाठीं आपल्या बागांतून यांची लागवड करितात. पांढऱ्या फुलांची व लालफुलांची अशा याच्या दोन जाति आहेत. ” ११ व्या शतकांत तर याची लागवड फार मोठ्या प्रमाणांत होत होती. बोंडांतून अफू काढण्याविषयींचा उल्लेख सर्वांत प्रथम १२ व्या शतकांत ‘ लिन हुंग ’ नांवाच्या ग्रंथकारानें केला आहे. त्याच सुमारास लिहिलेल्या “ सीहको ” नांवाच्या एका काव्यांत खसखशीच्या पांढऱ्या फुलांस बर्फाची उपमा दिली आहे. परंतु त्याचें बीं काळें असतें असें लिहिलें आहे यामुळें कांहीं विरोध येतो. कारण पांढऱ्या फुलांच्या जातीची खसखस पांढरी व लालफुलांच्या जातीची काळी असा भेद पाहण्यांत येतो. चीनच्या वैद्यांनीं व विशेषतः ‘ यँगशी ’ नांवाच्या वैद्यानें आपल्या “ इ–चीन–फँग ” नांवाच्या ग्रंथांत अफूच्या बोंडांचा अतीसार, आंव, व मुरडा या रोगांवर लोकोत्तर गुण वर्णन केला आहे.

संस्कृतांत अफूचीं जीं अहिफेनादि नांवें आहेत तीं अन्वर्थक आहेत. अहिफेन ह्मणजे सर्पाचें विष. सर्पदंशापासून ज्या प्रकारचा परिणाम शरीरावर

होतो तसाच परिणाम अफूची अधिक मात्रा घेतल्यानें होतो. ह्मणूनच तीस आहिफेन, नागफेन, भुजंगफेनादि नांवें दिलीं आहेत.

अफूच्या बोंडांपासून निष्कर्ष, अवलेह व कषाय असे तीन प्रकारचे कल्प होतात. सुकलेल्या बोंडांचा चुरा ४० तोळे, १०० तोळे गाळलेल्या (distilled) उकळी फुटलेल्या पाण्यांत ८ प्रहरपर्यंत भिजत घालून ठेवावा. नंतर 'पर्कोलेटर' नें दुसऱ्या भांड्यांत तें पाणी गाळून घेऊन आटवावें. आटून ५० तोळे पाणी शिल्लक राहिलें ह्मणजे उतरून निववावें व त्यांत ५ तोळे मद्यार्क मिळवून तें मिश्रण कांहीं वेळपर्यंत तसेंच ठेवून द्यावें नंतर गाळून घेऊन पुन्हां अग्नीवर ठेऊन दाट निष्कर्ष होईतों आटवावें. या निष्कर्षापासून अफूसारखा मलावष्टंभ न होतां झोंप येते. युनानी हकीम जुन्या खोंकल्याच्या ठसक्यानें रोगी फार बेजार होत असल्यास या निष्कर्षाचा उपयोग करितात. या निष्कर्षापासून डोकें दुखणें, चक्कर येणें वगैरे अफूचे विकार होत नाहींत.

खसखशीचें तेल निघतें तें खाण्याच्या व जाळण्याच्या कामीं उपयोगी पडतें. याची पेंड गाई-ह्मशींस खाऊं घालतात. खसखस जितकी ताजी असेल तितकें तेल अधिक निघतें. बीं चांगलें असल्यास एक तृतीयांश तेल निघतें. हें तेल उन्हांत ठेविल्यानें सफेद, पारदर्शी व रुचिहीन होतें. हें डोक्यास चोळलें असतां झोंप येते व मेंदू पुष्ट होतो. रंग तयार करण्याकडेही याचा बराच उपयोग होतो. पांढऱ्या रंगांत खसखशीचें तेल मिळविल्यानें सुरेख सफाईदार रंग होतो. अवधप्रांतांत खसखस रुपयास दहा शेर व तेल ३ शेराच्या भावानें मिळतें. ज्या बोंडांतून अफू काढलेली नसते त्यांतील खसखस कडू व मादक असते. आणि तिचें तेल काढलें असतां त्यांतही हे दोष येतात. बंगाली खसखशीचें तेल माळव्यांतील खसखशीच्या तेलापेक्षां चांगलें असतें आणि ह्मणूनच तें खाण्यांत अधिक वापरलें जातें. माळवी तेल विशेषें करून जाळण्यास वापरतात. मेणबत्त्या, साबू वगैरे बनविण्यांतही या तेलाचा उपयोग होतो. युरोपांत तेलाचे रंग ( oil paints )

व विशेषतः चित्रकारीचे रंग ( artist's colours ) बनविण्यांत अळशी व इतर तेलांच्या ऐवजीं या तेलाचा उपयोग करितात. खसखशीची पेंड ताजी असताना फार गोड व गुरांस पुष्टिदायक अशी असते. ती जुनी झाली ह्मणजे तीवर बुरशी जमते व ती कडू लागते. त्या स्थितींत गुरांस खाऊं घातली असतां कांहीं नुकसानही करिते. खसखशीच्या पेंडीची रासायनिक रचना ग्लासगोचे, प्रोफेसर अंडरसन यांनीं पुढील प्रमाणें ठरविली आहे. शंभर भाग पेंडींत पाणी ( ६. ९६ ) तेल ( ११. ०४ ) नैट्रोजनस द्रव्यें ( ३४. ०३ ) गोंद व त्या सारखीं द्रव्यें ( २३. २९ ) राख ( १३. ७९ ) बाकी गाळ ( ११. ३३ ).

अफूची प्राथमिक क्रिया उत्तेजक असते आणि नंतरच्या स्थितींत ती शरीरांतील पीडा शमन करून झोंप आणणारी आहे. हिंवतापाची हुडहुडी बंद करण्याकरितां ही चांगली उपयोगी पडते. ही स्तंभक असल्यामुळें अतिशय घाम बंद करण्यांत, रेच बंद करण्यांत, व साधारण कोणत्याही प्रकारचा स्राव बंद करण्यांत उपयोगी पडते. पोटाच्या अंतरावरणाचा दाह झाला असतां हिचा उत्तम उपयोग होतो. ताप फार वाढलेला असतां त्या स्थितींत अफूचा उपयोग फार हितावह आहे. डॉक्टर लोक ती कर्पूरादि पदार्थांबरोबर मिश्र करून देतात. त्यापासून तळमळ शांत होऊन झोंप येते. पक्काशयांतील व्रण, आंव, अतीसार, कॉलरा वगैरे रोगांत तसेंच अति आर्तव, पीडितार्तव, गर्भाशयप्रदर, स्नायुसंकोचजन्य मूत्रकृच्छ्र आदि स्त्रीपुरुषांच्या मूत्रमार्गाच्या रोगांत, अफू उत्तम गुणकारी आहे. धनुर्वात, आमवात, या विकारांतही अफू चांगली चालते. मस्तकशूल, संधिवात, अभिष्यन्द आदि नेत्ररोग यांत अफूचा बाह्य उपयोग हितावह आहे.

अफूपासून चंडू व मदक हीं दोन ओढण्याचीं मादक द्रव्यें बनवितात.

**( १ ) आमराक्षसी–आमातिसार व कॉलऱ्यावर**—अफू, जायफळ, लवंगा, केशर व कापूर हीं सर्व औषधें समभाग घेऊन त्यांच्या दोन गुंजाप्रमाणाच्या गोळ्या करून दरवेळीं एक गोळी ऊन पाण्याबरोबर द्यावी. या

पासूत कसलाही आमविकार असला तरी तो बरा होतो. ( २ ) **संग्रहणी, आमातिसार, रक्तातिसार वगैऱ्यांवर**—अफू २ भाग आणि जायफळ, टाकणखार, अभ्रकभस्म, धोत्र्याचें बीज शुद्ध केलेलें हीं प्रत्येकीं एकेक भाग या प्रमाणें घेऊन चांदवेलीच्या पानाच्या रसांत खल करून गुंजप्रमाण गोळ्या करून दरवेळीं १ गोळी मधांतून घ्यावी. पथ्य दहीं भात खावा. (३) **दुग्ध-वटी**—अफू व बचनाग प्रत्येकीं १२ गुंजा, लोहभस्म पांच गुंजा, अभ्रकभस्म, सहा गुंजा, सर्वांचा दुधांत खल करून गुंजप्रमाण गोळ्या बांधून दुधाबरोबरच घ्याव्यां. या गोळ्या घेत असतां खाण्यापिण्यांत दुधाशिवाय दुसऱ्या पदार्थांचा उपयोग करूं नये. आणि रोग साफ बरा होईपर्यंत मीठ व पाणी वर्ज्य करावीं. संग्रहणी, विषमज्वर, अनेक प्रकारची सूज, अग्निमांद्य व पांडुरोग हे विकार या दुग्धवटीपासून नाहींसे होतात. ( ४ ) अफू, शुद्ध कुचला व पांढरीं मिरें या तीन जिनसा समभाग घेऊन त्यांचा आल्याच्या रसांत खल करून सुंठ व गुळांत मिळवून १ गोळी द्यावी ह्मणजे कसलाही अतिसार, आमांश किंवा कॉलेरा असला तरी तत्काल बरा होतो. ( ५ ) अफू व जायपत्री प्रत्येकीं ४ भाग, कापूर १ भाग व कस्तूरी १ भाग या प्रमाणें या चार जिनसा खलून दरवेळीं त्याची एक गुंज मात्रा विड्याच्या पानांच्या रसांतून दिली असतां बहुमूत्र रोग बरा होतो. ( ६ ) **दारुणा** नांवाच्या कपाल रोगावर—( Prrigo of the scalp ) खसखस दुधांत वाटून लेप लावावा.

खसखस व अफूचे गुणदोष व औषधिप्रयोग विस्तारपूर्वक व. गु-दुसऱ्या भागांत खसखस या सदराखालीं दिले आहेत ते पहावे.

## १९ पिंपळी.

**सं०** पिप्पली, ऊकरा, शौंडी, चपला, चंचला, मागधी, कणा, कटुबीजा, कोरंगी, वैदेही, तिक्ततण्डुला, श्यामा, दन्तफला, कृष्णा, कोला, मगधोद्भवा, उपणा, उपकुल्या, तीक्ष्णतण्डुला, सूक्ष्मतण्डुला. **गु.** पीपर, लिंडीपीपर. **हिं.** पीपल ( र ) **बं.** पीपुल. **क.** हिप्पली. **तै.** पिप्पली. **ता.** तिप्पिलि. **तु.** इ-प्पलि. **मला.** तिप्पली. **गोमं.** हिपळी **फार.** पिल्पिल्दराज. **अर.** दारे फिल्

(४३०) उत्तरवयांत जे विशेष मोठेपणा मिळऊन ठेवतात, तेंच शहाणे व मोठे समजावेत.

(४३१) ज्यांना खाण्यास मिळत नाहीं अशा गरीब व अनाथ लोकांकडून योग्य काम घेऊन त्यांचें पोषण करणें हें महत्पुण्य होय.

(४३२) ज्या पोटिसांत भिजटपणा जास्त वेळ टिकतो तेंच पोटिस सर्वोत्तम असतें.

(४३३) "मला माहित नाहीं" असें ह्मणण्याची व दुसऱ्याचे मोकळ्या मनाचे विचार गृहित धरण्याची हिंमत बाळगणारे असे लोक थोडे असतात.

(४३४) सशक्त बांध्याचा मनुष्य आपल्या वयाच्या चाळीसावे वर्षापासून अन्वेषण (शोध) करण्याच्या कामीं मन घालीत जाईल तर, ऐशीं वर्षापावेतों त्याची विचारशक्ति व उत्साह (तरतरी) वाढत जातील.

(४३५) ज्यानीं मनुष्य मात्राचें पुष्कळ कल्याण केलें असेल, तोच सर्वांत मोठा समजावा.

(४३६) पावसाचें पाणी (rain) व बर्फ (Frozen rain) यांत नवसागर (hartshorn) असतो त्यामुळें जमीन चांगली सुपीक निवडते. तरूंनां जसा नवसागर अत्यन्त उपयोगी आहे, तसा फास्फरस मनुष्य मात्राच्या मस्तिष्कास (Brain मगज) अत्यन्त हितावह आहे. मच्छ व अंडीं यांत फास्फरस पुष्कळ असतो. ( तसाच तो गायीचें दूध व कित्येक भाजीपाल्यांत पुष्कळ असतो. )

(४३७) कोशाध्यक्ष (Financier) कायदेपंडित अथवा वैद्य या तिघांपेक्षां धर्मोपदेशक स्वतःचे कामास लौकर नालायक होतो असा ज्यांचा समज असेल, तो अगदीं चुकीचा आहे. ऐतिहासिक विषयांत कार्लाइल, भूगर्भशास्त्रांत लियेल, न्यायसभेंत मार्शल आणि मुलकी खात्यांत (Finance) ऑस्टर, स्टुअर्ट आणि वॉन्डर विल्ट, या सर्वांनी ऐंशीं वर्षाचे वयांत मगजाचें काम (Brain-work) चांगलें केलें आहे. धर्मोपदेशकाची सांपत्तिक स्थिति जर चांगली असली तर पन्नास वर्षांचे वयांत तो नालायक होण्यास कांहींएक कारण नाहीं. (हा अनुभव युरोपांतील आहे. पण आमच्या इकडे धर्मोपदेशकाची योग्यता बहुशः मरणापर्यंत ठीक असते आणि त्यांना संपत्तीची विशेषशी अपेक्षा नसते. )

(४३८) एखादें कार्य आपल्या मनाप्रमाणें सिद्ध झालें नसेल तर, त्याच विषयावर एकसारखा अहोरात्र विचार करून पुष्कळ लोक वेडे झाले आहेत. अशा प्रसंगीं त्या विषयांतून संपूर्ण रीतिनें आपलें चित्त काढून घेऊन, दुसरीकडे त्याची प्रवृत्ति होण्याची संवय प्रत्येकानें लावावी.

(४३९) ज्या दारूस फेंस येत नाहीं अशी दारू चांगल्या रीतीनें तयार केली तर तींत ३ भाग पाणी व १ भाग साखर असते; परंतु तीव्र मद्यार्क त्यांत नसतो. ती चांगल्या बाटलीत घालून घट्ट बूच लावून थंड जागेंत ठेवावी.

(४४०) जर मनुष्य पडला, बेशुद्ध झाला व घशाशी घर्घर शब्द होऊं लागला, तर त्यास अंगविकृति झाली आहे असें समजावें. अशा वेळीं त्याला बसवावें, ह्मणजे मस्तकांत चढत असलेलें विशेष रक्त गुरुत्वाकर्षणामुळें जास्त न चढतां खालीं उतरूं लागेल. जर त्याचा चेहरा आरक्त दिसत असेल, शरीराचें चलन वलन होत नसेल, आणि श्वासोश्वासही चालत नाहीं असा प्रकार दिसेल तर कांहीं कारणामुळें फुफुसांतून रक्त मस्तकांत चढूं शकत नाहीं व त्यामुळें मूर्छा आली आहे असें समजावें. अशा प्रसंगी रोग्यास उताणें निजविणे फारच हितावह होईल, व त्याला फारसें बोलूं न देतां एकांत जागेंत ठेवावें. मस्तक व शरीर एकसारख्या ओळींत असल्यानें रुधिराभिसरण सारखें चालतें व त्यामुळें तो लवकरच शुद्धीवर येतो. जर एखादा मनुष्य अंगास कंप सुटून बेशुद्ध झाला आहे व अंग वाकडें तिकडें करीत आहे असें दिसेल तर त्यास अपस्मार झाला आहे असें समजावें अशा रोग्यास तो स्वतःचे शरीरास इजा करून घेणार नाहीं एवढ्या पुरतें जपून त्याला दुसरे कोणतेंही उपचार करूं नयेत, ह्मणजे तो कांहीं वेळानें शुद्धीवर येईल. जर कोणास अति उन्हामुळें बेशुद्धी आली असेल व अंग तापलें असेल, तर त्याला उन्हाची झळ ( लूक ) लागली आहे असें समजावें. अशास सावलींत घेऊन जाऊन, मस्तकावर वेगळे वेगळे ठिकाणीं थंड पाण्याची धार धरावी, ह्मणजे तो शुद्धीवर येतो. इजिप्तचे लोकांत मस्तकावर व कानावर थंड पाणी ओतण्याची पद्धत आहे.

(४४१) काम करणें हें एक प्रकारचें शिक्षण आहे व त्यामुळें मोठमोठाले पराक्रम करण्याची सत्ता प्राप्त होऊन, शारीरिक व मानसिक उन्नति चांगली वाढते.. या रीतिनें जो वर्तन ठेवील तोच हरेक प्रकारें सुखी समजावा.

(४४२) हिवाळ्यांत अशक्त, वृद्ध व आजारी मनुष्यांनी अंगांतली थंडी संपूर्ण नाहींशी होईपावेतों अंगांतून ऊबदार कपडे काढूं नयेत.

(४४३) युनेटेडस्टेटस (अमेरिका) येथें Soothing Syrup (शांतीप्रद सरबत) नांवाचें जें औषध विकलें जातें, त्यांत अफूचा अर्क पुष्कळ असतो व तें औषध वैद्याच्या सल्लयाशिवाय लहान मुलांस देण्यांत येतें. लहान मुलांचें रडणें वगैरे बंद करण्याच्या कामीं, त्यांचे आईबाप ह्या औषधाचा फार निष्काळजीनें उपयोग करतात, व त्यामुळें लहान मुलें मरतात; किंवा रोगिष्ट तरी होतात. ( आमच्या देशांत अफू व बाळगोळ्या यांचा असाच दुरुपयोग होतो. )

(४४४) जगन्नियंत्या परमेश्वरानें आज्ञा केली कीं " तू आपल्या निढळीच्या घामानें पोटास मिळवीत जा. " हे केवढे मोठे त्याचे आपणावर उपकार आहेत बरें ! काम केल्यानें शरीरसंपत्ति शक्ति, झोंप, खाण्यापिण्याची मौज, सुखी घर असल्यानें मिळणारे सर्व फायदे व सौख्य आणि पार लौकिक सुखासाठीं चांगलीं साधनें तयार करून ठेवण्यास मिळणारा वेळ हें सर्व उत्तम रीतीनें घडतें.

(४४५) श्रीमंतींत जे आयुष्याच्या क्रमास आरंभ करितात, ते बहुधा गरीबींत मरतात. आज्याच्या पैशावर नातवानें दिवस काढून चैन भोगली असें क्वचितच आढळतें. जो मुलगा जवळ पैसा नसून आपल्या आयुष्याच्या क्रमास आरंभ करतो तो राजकीय विषयांत व हरएक प्रकारच्या धंद्यांत प्रविण निवडतो.

(४४६) या जगांत जरी संपूर्ण सुख आपल्या वांट्यास येत नाहीं, तरी पण संकट-रूपी क्षणिक ढग आले असतांही चैनींत व मजेंत दिवस काढणारे लोक जगांत आहेत. हेस्टिंग्स बाईनें हंटिंगडन बाईस एकदां असें कळविलें कीं "जेव्हां पासून मीं धर्मग्रंथ समजूं लागलें, तेव्हांपासून मी स्वर्गदूती प्रमाणें सुखी आहे" हा अत्यानन्द हमेशाचा नव्हता, पण शान्त व समाधान वृत्तींत रहावयाचा होता. अशी वृत्ती धारण केल्यानें आयुष्य वाढतें, व रागाचे आवेश, असंतोष,अधीर वृत्ती वगैऱ्यांनीं आयुष्याची हानी होण्याचें वांचतें.

(४४७) स्पष्ट व खुलासेवार भाषणापेक्षां, अश्लील भाषण हें पुष्कळ वेळां सूचक व प्रबोधक असतें, व असें भाषण फार प्रिय व गोड वाटतें, परंतु सुशिक्षित मनुष्यानें जर अश्लिल भाषण केलें, तर लोकांचा त्याबद्दल असलेला उत्तम ग्रह बदलून जातो, व तो स्वत:ची मानहानीही करून घेतो.

(४४८) नवीन घर बांधणें असेल अगर राहण्यासाठीं दुसरें घर पाहणें असेल, तर ज्या आडांतून पिण्यास पाणी घेणें असेल त्या आडांतील पाण्याचें तळ-शेजारील शेतखानें वगैऱ्यांच्या तळापेक्षां विशेष उंच आहे किंवा नाहीं हें प्रथम पाहिलें पाहिजे. वस्तीचें मान वाढत जातें तसतशी घाणही वाढत जाते, व अशा घाणीचे जागेंत पाणी मुरून त्यामुळें आडाचें किंवा तळ्याचें पाणी बिघडतें.

(४४९) चाळीस वर्षाच्या वया पावेतो हवेंत होणारे आकस्मिक फेरफार जेवढे चांगल्या रीतीनें आपण सहन करू शकतों, तेवढे त्यानंतर सहन करूं शकणार नाहीं. बारीक चौकशीं अंती असें सिद्ध झालें आहे, कीं हवेच्या फेरफारामुळें, सारख्या संख्येपैकीं वयाचे ३९ वें वर्षी जर दोन माणसें मरण पावलीं, तर वयाचे ४८ वे वर्षी चार मरतात. ५७ वें वर्षी आठ मरतात ६६ वे वर्षी १६ मरतात. याप्रमाणानें नऊ वर्षानें मरणसंख्या दुप्पट होत जाते असें स्पष्ट दिसून येतें. ह्मणून जसजसे आपण मोठे होऊं तसतसें सरदीपासून व हवेंतील होणारे हरएक प्रकारच्या फेरफारापासून फार जपलें पाहिजे.

(४५०) अहोरात्र एकाच विषयांत जर मन लागून राहिलें असेल, तर मुशाफरी करून अगर हरतऱ्हेनें तें त्या विषयांतून काढून अन्य विषयाकडे वळवणें फार अवश्य आहे.

(४५१) चित्तभ्रम किंवा वेड लागण्याचें मुख्य कारण असें आहे, कीं एकाच विषयावर सारखा विचार करीत बसल्यानें मस्तकांत रुधिराधिक्य (जास्तरक्त) होऊन, रुधिराभिसरणही फार त्वरेनें चालतें. द्रव्यहानी, अपकीर्ती, अकस्मात कोसळणारीं संकटें, प्रणयवैफल्य ( प्रीती विफळ होणें ), विरह, कोणाचें मरण अशा बाबती पुनः पुनः मनांत आणून त्यावर एकसारखा विचार करीत बसल्यानें सुद्धां चित्तभ्रम होतो.

(४५२) दुसऱ्याच्या चंचल प्रकृतीवर व लहरी स्वभावावर केवळ अवलंबून व मिळणाऱ्या दरमहाच्या पगारावर संतोष मानून स्वस्थ बसणारे हलक्या मनाचे समजावेत. असे लोक स्वतःच्या मान सन्मानास मुकतात व त्यांना स्वतंत्रपणें काम करण्याची उमेद न राहतां केवळ आर्जव, आजीजी व ताबेदारी पत्करून दिवस कंठावे लागतात.

(४५३) कोळशाचा जेवढा भाग जाळावा त्याचे पंचवीस पट कॉरबॉनिक आसिड ग्यास ( विषारी हवा ), ते जळत असतांना शोषला जातो ह्मणून कुवे, खड्डे आणि अशा प्रकारच्या हरेक जागेंत, कोळसे जाळल्यानें तेथील विषारी हवा अगदीं नाहींशी होते.

(४५४) शिंगरूं अथवा वासरू यांच्या नाकांत जर कोणी स्वतःचा श्वास फुंकलि, तर तें पुष्कळ दूर पावेतों त्याचे मागें मागें येईल असें ह्मणतात.

(४५५) मोझेस यानीं तेहतीसशें वर्षांपूर्वीं असें निर्दिष्ट केलें होतें, कीं दाढी काढूं नये. लांब दाढी ठेविल्यानें सरदीपासून गळ्याचें संरक्षण चांगलें होतें. ह्मणजे हिवाळ्यांत गळ्यास ऊब राहते व उन्हाळ्यांत गारवा राहतो, आणि प्रत्येक ऋतूंत हवेंत उडणारे विषारी जंतू, धुरळा वगैऱ्यांपासून गळ्याचे उत्तम संरक्षण होतें; दाढीस हवा शुद्ध करणारी गाळणी ह्मटलें तरी चालेल. ( पण ती साफ न राखल्यास तींत मळ सांचून चामडीचे वगैरे अनेक रोग होतात. )

(४५६) घरांत पाणी आणण्यासाठीं शिशाचे नळ नवीनच बसविल्यानंतर कमीतकमी एक महिनापावेतों त्यांतून येणारें पाणी पिण्यास किंवा स्वयंपाकास घेऊं नये. सुमारें एक महिन्यानंतर त्या नळांत रासायणिक क्रियेनें कांहीं फेरफार होऊन, एक वेगळ्या प्रकारचें पूट चढतें व नंतर तें पाणी उपयोगांत आणल्या पासून विकार उत्पन्न होत नाहींत.

(४५७) लहान मुलांस थोपटल्यानें जसें त्यांस बरें वाटतें, तसेंच घोड्याच्या नाकांत अगर नाकावर बोट ठेवल्यानें त्यांस बरें वाटतें.

(४५८) निजण्यापूर्वीं किंचित् खाल्लें तर कित्येकांस लवकर चांगली झोंप येते, याचें कारण असें आहे, कीं पचनक्रिया चालू होण्यास मस्तकांतून पोटाकडेस रक्त ओढले जातें व अशानें मस्तकांतील जास्त रक्त कमी झाल्यानें झोंप चांगली येते.

मस्तकाखालीं दोनतीन उशा घेऊन जर निजलें तर गुरुत्वाकर्षणामुळें रक्त खालीं उतरून झोंप चांगली येते.

(४५९) लोखंड वगैरे धातूंचीं कामें करणारे, दगड फोडणारे, आगगाडी चालविणारे, कांचा तयार करणारे आणि कोळसे विकणार या सर्वांनीं दाढी ठेवणें फार इष्ट आहे. कारण, त्यामुळें हवेंतील विषारी कण फुफ्फुसांत शिरूं शकत नाहींत व बाहेरील हवा श्वासांत घेण्यापूर्वी तींत उष्णता व सरदी बेताची राहते.

(४६०) लांकडाचीं अगर कसलीही फांस (धलपी) हात पाय वगैरे ठिकाणीं शिरली असेल, तर ती तात्काळ काढून, एक काठी अगर चाकूची मूठ घेऊन, ती जागा बहिरी होईपावेतों त्या जागेवर हळू हळू ठोकावें. असें करतांना ती जागा दुखली अगर तींतून रक्त निघालें तरी तें सहन करावें, व नंतर तेल-मेणाच्या पट्टीनें ती जागा बांधून टाकावी; ह्मणजे रक्त निघाल्यानें सूज येत नाहीं व ती जागा लवकर रुझते.

(४६१) पुरुष वर्गांत २५ पासून ५५ वर्षांचे वयापावेतों आत्महत्या करणारांची मोठ्यांत मोठी संख्या दिसून येते. स्त्रीवर्गांत २५ ते ३५ पावेतों आत्महत्या करणाऱ्या स्त्रियांची संख्या मोठी दिसते; व ८० वर्षांचे वयापावेतों ही संख्या कमी होऊन नंतर किंचित् वाढते. वाढत्या वयांत एक, ऐन तारुण्यांत बारा व वृद्धावस्थेंत चार या प्रमाणानें आत्महत्या घडतात.

(४६२) झोंपीं जाण्याच्या क्रियेंत एक प्रकारचें सुख आहे. परिस्थितीचें भान नाहींसें होतें न होतें इतक्यांत आपणास कोणी जागें केलें असतां, त्या सुखाचें तत्व आपणास कळतें. निद्रा व मरण हीं दोन्ही समान आहेत असें जे ह्मणतात त्यांचीं सशास्त्र चांगलीं कारणें पुष्कळ आहेत—अंतर इतकेंच, कीं दररोजच्या अल्प निद्रेंतून आपण जागें होतों व मरणाच्या महानिद्रेंतून आपण जागें होत नाहीं.

(४६३) एक मोठा प्रतिष्ठित मनुष्य मरणोन्मुख झाला होता, परंतु त्याला पूर्ववत् चांगली स्थिति प्राप्त झाली. त्यानें असें प्रतिपादन केलें, कीं अंतकाळचे वेळीं मला सुस्वर गाणें ऐकूं येत होतें. आपणही सर्व आनंदाचे भरांत असा विचार करूं कीं आपल्याही अंतकाळचे वेळीं असेंच मधुर गाणें ऐकूं येईल, तर आपणास किती समाधान वाटेल बरें!

(४६४) काफीस येणारा सुगंध फार चंचल असतो. अमेरिकन लोक काफी उकळतात त्या रीतीनें तो सुगंध उडून जातो, आणि काफींत एक ठरीव तत्व असतें तें फ्रेंच लोक टाकून देतात. गाळणींत काफी ठेऊन त्यावर ऊन पाणी ओतावें, व त्या दिवशीं तशी तयार झालेली काफी प्यावी; परंतु गाळणींत राहिलेली काफी ऊन पाण्यांत दुसऱ्या दिवसापर्यंत भिजत ठेवावी, नंतर दुसरे दिवशीं ती काफी पुन: गाळ-

ण्यांत ठेऊन, त्यावर उकळतें पाणी ओतावें, व मग पहिल्या दिवसाप्रमाणें ताजी काफी गाळण्यांत घालून वर ऊन पाणी ओतून जें पाणी तयार होईल तें व वरील दुसरे दिवशींचें असें एकत्र करून काफी तयार करावी. याप्रमाणें केल्यानें काफीचा सुगंध उडून जाणार नाहीं, व त्यांतील ठरीव तत्वही कायम राहील.

(४६५) मनुष्याच्या शरीरांत रोग उत्पन्न होतात, ते बरे करण्यासाठीं प्रथम रोगाचें मूळ काढून तें नाहींसें केलें पाहिजे. रोगाचें मूळ सूक्ष्म रीतीनें शोधून काढणें व त्यावर दूरवर विचार करणें फार अवश्य आहे.

(४६६) या मृत्युलोकीं आपल्या जीवित्वाचा अखेरचा उद्देश स्वर्गप्राप्ति होण्याचा असला पाहिजे.

(४६७) आपलीं मुलें बाळें आपलीं अत्यन्त ऋणी आहेत; परंतु आपल्यासही त्यांच्यापासून केवढा मोठा फायदा आहे ?—मुलें बाळें असल्यानें या जगांतील आपलें अर्धें दुःख नाहींसें होतें.

(४६८) बाहेरून जे ऐश्वर्यशाली दिसतात, त्यांनां अंतर्यामीं हमेशा सुखशांती नसते. मनुष्य दुर्दैवी जरी असला, परंतु त्याची परमेश्वरावर श्रद्धा असली तर तो सुखशांतींत राहूं शकेल.

(४६९) ज्या कुटुंबांतील माणसांची हमेशची वागणूक प्रीतियुक्त व सभ्यतेची असते, तेंच कुटुंब सर्वांत सुखी समजावें.

(४७०) एका लहान मुलानें एकदा आपल्या आईस ह्मटलें, कीं :—"आई ! तूं ह्मणतेस, कीं देवाची प्रार्थना करणें ह्मणजे त्याच्याशीं बोलल्याप्रमाणें आहे; परंतु मी त्याच्याशीं बोलूं लागलों ह्मणजे त्याची ओळख होऊन मी त्याला आवडूं लागेन व तो मला त्याचे जवळच ठेवील आणि आई ! मग तूं मला खरोखर अंतरशील; ह्मणून त्याची प्रार्थना करणें नको व त्याच्याशीं बोलणेंही नको." आपण परमेश्वराची लौकर व दाट ओळख करून घेतली तर किती सुखी होऊं बरें !

(४७१) आपल्या शरीरांतील यंत्ररचना हळु हळू क्षीण होऊन जो मृत्यु येतो, त्यास स्वाभाविक मरण ह्मणतात; व मांदगीनें, साहसानें अथवा आकस्मिक जें मरण येतें त्यास अस्वाभाविक मरण ह्मणतात.

(४७२) मुलींनो ! प्रथम जें काम तुह्मांस मिळेल, तें तुह्मी चांगल्या रीतीनें व उमेदीनें पत्करा; ह्मणजे जगांत तुह्मी मोठ्या पदवीला चढाल. एका प्रसिद्ध नटीनें प्रथम दाइणीचा धंदा पत्करून, शेवटीं तिनें त्या धंद्यांत चांगलें यश मिळविलें आणि शिल्पशास्त्रांत निपुण अशा एका प्रसिद्ध विदुषीनें पोटासाठीं प्रथम शिवणकाम पत्करून पुढें तिनें उत्तम चित्रें काढण्यांत चांगली कीर्ती संपादन केली.

(४७३) मनुष्य आजारीपणानें अगदीं निजून असला ह्मणजे तो कितीही मोठा असला, तरी तें त्याचें मोठेपण कांहींएक उपयोगीं पडत नाहीं; मग तो मोठा लेखक

असो अथवा मुख्य सभासद असो, अगर कसाही असो. कारण, त्याला अंथरुणावर उठून बसण्याची सुद्धां सत्ता नसते.

(४७४) सडपातळ माणसें सर्वांत जास्त दिवस वांचतात. पुष्ट माणसांचीं शरीर प्रकृति जास्त दिवस चांगली राहत नाहीं कारण चरबी (Fat) हा एक रोग आहे; जसा पाण्यापासून "जलोदर" तसाच चरबीपासून "तैलोदर" (Dropsy of oil) ह्मटलें तरी हरकत नाहीं. इंग्लिश लोक बहुत्करून ढेबरपोटे असतात; दक्षिण आफ्रिकेंतील स्त्रियांच्या मांड्या पुष्ट असतात जर्मन लोकांचे तर सर्वच अवयवें पुष्ट असतात; परंतु खऱ्या अमेरिकनचा मात्र कोणताच भाग पुष्ट नसतो.

(४७५] "समयसूचकता" ही वेळोवेळीं आपलें चांगलें संरक्षण करते.

(४७६) एका प्रसिद्ध चितार्‍यास एकदा त्याच्या चेल्यानें प्रश्न विचारला कीं "गुरूजी !" रंगाचें मिश्रण कसें करावें "? गुरूजी ह्मणाले :—मगजानें (with brains बुद्धीनें)

पुष्कळ बावतीचे नियम आपणास माहित असोत; परंतु अवधारणा, चातुर्य, व युक्तिकौशल्य याशिवाय मुळींच चालत नाहीं; ह्मणून हरेक बावतींत पहिल्यानें जरी संपूर्ण यश न आलें तरी दृढाभ्यासानें परिणामीं चांगलें यश मिळतें.

(४७७) प्रोफेसर "शिवॅलीयर" यानें प्रसिद्ध केलें आहे कीं:—"एक संपली कीं लागलीच दुसरी अशा रीतीनें बारा विड्या मी एकसारखा ओढतों" अशी एका तरुण मनुष्यानें पैज मारली. नववी विडी संपल्यावर त्याचें डोकें भणभणूं लागलें व तो कांपूं लागला; परंतु हट्ट न सोडतां त्यांनीं त्या बारा विड्या तशाच संपविल्या व त्याच रात्रीं तो मरण पावला.

पेनसिल वॅनिआ येथील एक मुलीनें आइसक्रीमाचे बारा प्याले एका बैठकींत खाल्ले व त्याच रात्रीं ती मरण पावली, त्यासारखेंच हें वरील उदाहरण आहे.

यावरून असें मात्र समजूं नये कीं नियमीत प्रमाणानें विडी ओढली व आइसक्रीम खाल्ला तर शरीरास अपाय होईल.

(४७८) तंवाकू व दारूसंबंधीं रुची ही स्वाभाविक नसून कृत्रिम रुची होय व ह्मणून ती शरीरास अपायकारक जाणावी.

(४७९) मानवी शरीरांत २०८ हाडकें आहेत व त्यांत निम्मेपेक्षां जास्त हातांत व पायांत आहेत.

(४८०) हजारों वर्षांपूर्वींच्या लोकांत जें ज्ञान होतें त्यापेक्षां आपण जास्त शहाणे आहोंत असा गर्व कोणीही करूं नये. पाम्पी नजीक एक चांभाराचें दुकान नुकतेंच शोधून काढलें आहे व त्यांत हल्लींप्रमाणेंच त्या धंद्यासंबंधीं पुष्कळ हत्यारें वगैरे असल्याचें समजतें.

(४८१) फराळाचे वेळीं व जेवतेवेळीं टेबलावर स्वच्छ पांढरा रुमाल हांथरलेला असून त्यावर फुलांचे गुच्छ ठेऊन मोठ्या सभ्यतेनें जेवणें—हें किती समाधानकारक व आनंदप्रद आहे बरें ! यामुळें रितीभातींतही पुष्कळ सुधारणा होते.

(४८२) फटींतून कानोसा घेणें, बारीक भोंकांतून मुकाट्यानें पाहणें व दुसऱ्याचें पत्र त्याचे परवानगीशिवाय वाचणें या तिन्ही बाबती अती नीचपणाच्या आहेत.

(४८३) कोणाचीही आपण वाईट टिका ऐकतों व चांगलीही ऐकतों. परंतु वाईट टिका तेवढी मनांत ठेऊन जर चांगली टीका आपण चारचौघांत बोलण्याची पद्धत ठेविली तर सामाजिक सुधारणा पुष्कळ होण्यासारखी आहे.

(४८४) स्त्रियांस पुरुषांपेक्षां जास्त व पुष्ट मनुष्यास सडपातळापेक्षां जास्त झोंपेची आवश्यकता आहे.

(४८५) दिवसांतून तीन वेळ खावें व त्या दरम्यान कांहींएक खाऊं नये म्हणजे अजीर्ण कधींच होणार नाहीं.

(४८६) तरुण लोक आवेशाचे भरांतच कांहींएक पुढला मागला विचार न करितां आतमहत्या करतात. परंतु प्रौढ वयाचीं माणसें या संबंधांत पोक्त विचार करतात असा सर्वसाधारण नियम आहे.

(४८७) रोगाचें वास्तविक कारण आहे तें प्रथम शोधून दूर केल्याशिवाय त्यावर औषधोपचार करणें व्यर्थ होय.

(४८८) उष्ण हवेंत "बॅक्टेरिया" [ विषारी जंतू ] आणि इतर विषारी जंतु असतात ते गळवें आणि जखमा वगैरेंत तात्काळ शिरतात परंतु त्यास कापुरमिश्रित मद्यार्कानें [Camphorated spirits] वरचेवर धूत गेलें असतां ते जंतू नाश पावतात म्हणून गळूं व जखम वरचेवर धुऊन स्वच्छ ठेविल्यास ती लवकर बरी होते.

(४८९) फराळाचे अगर जेवणाचे पूर्वी एक तास स्नान करण्यास उत्तम वेळ समजावी. जेवणानंतर दोन तासांचे आंत स्नान कधींही करूं नये. पाण्यांत नियमीत व्यायाम करावा. थंडी अगर थकवा लागेपर्यंत पाण्यांत राहूं नये. स्नान झाल्यानंतर अंगांत हुपारी असली पाहिजे. अंग स्वच्छ पुसून लागलीच कपडे घालावे. उन्हांत स्नान करणें फार भयंकर होय. अतिशय घाम आला असेल तेव्हां अगर अति उकडत असेल अशा वेळीं सुद्धां पाण्यांत जाणें अपायकारक आहे. होडींत अगर बोटींत बसून ज्यांना भोंड वगैरे येते त्यांनीं हवा चांगली असेल तरच होडीवर मोकळ्या जागेंत फिरावें. नाहींपेक्षां आपल्या खोलींत इकडे तिकडे फिरावें. प्रथम वान्ती होणें हें समुद्रांतील मुशाफरीस फायदेशीर आहे असें समजावें.

४९०) अन्योन्य संबंधापासून होणाऱ्या ज्ञानानें कित्येक वेळ मोठें समाधान वाटतें. आपण एखाद्या देवळाची व आपल्या घरांतील खोलीची तुलना केली तर देऊळ

मोठें आहे असें वाटेल व त्यांत फार तर १००० माणसांचा समावेश होईल. खेड्यांतील देवळांत तर त्याचे अर्धेअर्ध राहूं शकतील परंतु रोम मध्यें सेन्ट पिटरच्या देवळांत तर ५४००० माणसांचा समावेश होतो !

( ४९१ ) आपल्या उत्पन्नाच्या मानानें खर्च करीत जावा. उत्पन्नापेक्षां ज्यास्त खर्च करीत जाऊं नये. जिनसा खरेदी करण्यांत रोखठोक व्यवहार ठेवल्यानें फार फायदा आहे. अशानें दुकानदार तुह्मांस पाहून संतुष्ट राहतील, तुह्मांस त्यांची भीति राहणार नाहीं; सदैव ओशाळेही राहण्याचें कारण राहणार नाहीं आणि तुह्मीं सदैव कर्जमुक्तच राहाल.

( ४९२ ) "कामाला" तुमचे पुढें जाऊं देण्यापेक्षां तुह्मीच कामाचे पुढें असत जा. ( तात्पर्य, शिलकींत काम ठेऊं नका. )

( ४९३ ) आपण ज्या संस्थानांत राहतों त्याचें क्षेत्रफळ आपणास माहीत असलें ह्मणजे, आपण ज्या देशांत जाऊं तेथील क्षेत्रफळाशीं चांगली तुलना करतां येते.

( ४९४ ) आपल्या आजारीपणांत सर्वसत्ताधीश परमेश्वरावर एकनिष्ठा व भरवसा ठेवणें हें सर्व औषधांपेक्षां श्रेष्ठ औषध होय; व यामुळेंच अक्षय्य शुद्धी, सुख व शान्ति प्राप्त होऊन, शारीरिक व मानसिक ताप नाश पावतात.

( ४९५ ) जगांत यशस्वी होण्यास परमेश्वरानें शरीरसंपत्तीचें व शक्तीचें भांडवल प्रत्येकास दिलें आहे, ह्मणून जो कोणी शरीरसंपत्तीची चांगली काळजी घेईल व शक्तीचा यथोचित व्यय करील, तारुण्यांत तर काय परंतु उत्तरवयांतही तारुण्या इतकें सामर्थ्य त्याच्या अंगीं राहील.

( ४९६ ) स्वाभाविक रीतीनें रोगाची उत्पत्ति होत नाहीं, परंतु आपल्या अज्ञानामुळें अथवा आहारविहाराचे पद्धतीकडे दुर्लक्ष केल्यानें रोग उत्पन्न होतात.

( ४९७ ) सर्वेंद्रियशास्त्राचा अभ्यास, तरुणांच्या व मुख्यत्वेंकरून मुलींच्या शिक्षणांत अवश्य असला पाहिजे.

( ४९८ ) जेवणाच्या पूर्वी अर्धा तास फळें खाल्लीं तर त्यांतील पौष्टिक भाग रुधिराभिसरणांत लौकर मिश्र होतो; परंतु जेवणानंतर खाल्लीं तर चांगलें फायदेशीर होत नाहीं.

( ४९९ ) थकवा लागला असेल तर गार पाण्यानें व जेवणानंतर दोन तासाचे आंत कधींही स्नान करूं नये.

( ५०० ) जे लोक श्रीमंतांची निंदा व त्यांचा तिरस्कार करतात ते नीच व मत्सरी समजावेत. त्याच्यांत औदार्य मुळींच नसतें;

श्रीमंत लोकांचे मोठमोठाले वैभवशाली वाडे, त्यांच्या गाड्या घोडे वगैरे परिवार, त्यांचे उत्तमोत्तम पेहराव व डागडागीने वगैरे ऐश्वर्य पाहून आपणास वाटतें कीं आपण

त्यांचे जागीं असतो तर कमी खर्चानें राहून, गोरगरिबांस पुष्कळ दिलें असतें. परंतु आपण हें विसरतों, कीं श्रीमंत लोक गरिबांस या वस्तूंच्या किंमती देतात. फरक इतकाच कीं श्रीमंत लोक गरिबांस श्रमांचा मोबदला संपूर्ण देऊन त्यांना उत्तेजन देतात. व आपण काम घेतल्यावांचून त्यांना पैसे देतों व त्यामुळें ते आळशी खर्चीक होऊन भिक्षांदेहि करतात.

( ५०१ ) कोणाशींही संभाषण करण्याच्या व्यवहारांत तुह्मांस जेव्हां नकारांत उत्तर देण्याची वेळ येईल तेव्हां तुह्मीं बेलाशक मोठ्या हिंमतीनें "नाहीं" ह्मणा; परंतु तो नकार सभ्य व विवेकयुक्त असला पाहिजे.

**भाग १ ला समाप्त.**



आर्यभिषक् पुस्तकावलि. अंक ५१

ॐश्रीशंकर.

# दीर्घायु कसें व्हावें ?

अथवा

## शारीरिक, मानसिक व नैतिक आरोग्यासंबंधीं नियम.

---

( डब्ल्यु. डब्ल्यु. हॉल, ए. एम्., एम्. डी., यांच्या मूळ इंग्रजी ग्रंथाच्या आधारें )

रामराव मार्तंड भांबूरकर,

संगीत गंगालहरी पुस्तकाचे कर्ते

यांनीं तयार केलें.

---

संशोधक व प्रकाशक—शंकर दाजी शास्त्री पदे, मुंबई.

( हक्क प्रकाशकांनीं आपले स्वाधीन ठेविले आहेत )

मुंबई, श्रीसयाजी—औषधशाला.

इ. स. १९०३. शके १८२५.

किंमत १० आणे.

हें पुस्तक विनायक पांडुरंग गोठोस्कर यांच्या "सुवर्ण" प्रिं. प्रेसमध्यें छापविलें.

## उपोद्घात.

॥ आत्मानं सततं रक्षेद्दारैरपि धनैरपि ॥
॥ पुनर्दारा पुनर्वित्तं न शरीरं पुनः पुनः ॥ १ ॥

या जगांत परमेश्वरानें प्रत्येकाच्या कल्याणासाठीं, सुखासाठीं व शरीरसंरक्षणार्थ ज्या वस्तु अत्यावश्य आहेत त्याच पुष्कळ प्रमाणानें निर्माण केल्या आहेत, व ज्यांची आवश्यकता विशेष नाहीं त्या कमी प्रमाणानें उत्पन्न केल्या आहेत हें कोणीहि कबूल करील. पाणी, हवा वगैरे पहिल्याचें, व सुवर्ण, हिरे वगैरे दुसऱ्याचें उदाहरण होय. हे त्या जगन्नियंत्याचे आपणावर केवढे उपकार आहेत बरें ? त्यानें ज्या वस्तु आपल्या सुखासाठीं उत्पन्न केल्या आहेत, त्यांचा यथोचित उपभोग, जर शरीरसंपत्ति चांगली असली तरच घेतां येतो; नाहींपेक्षां सर्व कांहीं व्यर्थ आहे म्हणून शरीरसंपत्तीविषयीं विशेष काळजी घेणें हेंही प्रत्येकाचें कर्तव्य कर्मच होय.

या विषयावर वैद्यक शास्त्राचीं पुष्कळ पुस्तकें आहेत; परंतु डाक्टर हॉल यांनीं याच विषयावर जें एक "How to live long?" (दीर्घायु कसें व्हावें?) या नांवाचें इंग्रजी पुस्तक केलें आहे, तें आबालवृद्धांस विशेष उपयोगी पडण्या जोगें आहे; म्हणून सदर पुस्तकांतील नियम, अक्षरशः भाषांतररूपानें नव्हे परंतु सरळ व सोप्या मराठी भाषेंत योजण्याचा मी यथामति प्रयत्न केला आहे आपल्या देशांतील हवामान, रीतभात आणि व्यवहार वगैरे यानां अनुसरून, मूळांत विशेष फेरफार न करतां सदरहू पुस्तक मराठी भाषेंत लिहितांना कांहीं भाग कमी करावा लागला आहे, व कांहीं ठिकाणीं मजकूर वाढवावा लागला आहे. या पुस्तकांत नियमाला अनुसरून कांहीं कांहीं ठिकाणी प्रयोजक अशीं संस्कृत व मराठी अनुसंधानेंही दिलीं आहेत, व तीं नियमाच्या शेवटीं छापिलीं आहेत. या विषयावर अशा पद्धतीचें पुस्तक मराठी भाषेंत प्रसिद्ध झालेलें आढळत नाहीं. अनुसंधानें देण्याचें कामीं. वै० आ. म. शंकर दाजी शास्त्री पदे यांनीं मदत केली, त्याबद्दल मी त्यांचा अत्यन्त आभारी आहें.

मे० रा. ब वासुदेव गोपाळ भांडारकर साहेब ( नायबदिवाण–बडोदें ) यांनीं आपल्या अभिप्रायांत--नियमांचें वर्गीकरण, विषयवार करण्याबद्दल जी सूचना केली आहे, त्याबद्दल मी त्यांचा अत्यन्त आभारी आहें. आणि ती सूचना, या भागाच्या द्वितीयावृत्तीचे वेळीं व पुढच्या भागाच्या प्रथमावृत्तीचे वेळीं अवश्य अमलांत आणण्याचा माझा निश्चय आहे.

पुष्कळानां अशी सवय असलेली पाहण्यांत येते, कीं साधारणपणें किंचित् जरी प्रकृति अस्वस्थ झाली, कीं डाक्टर अगर वैद्याकडे जावें, बाटलींत अगर पुड्या बांधून औषध आणावें व तें हरहमेश घेत जावें. असें उठतां बसतां औषध घेण्यानं श०

प्रकृतीचें मान ठेविलें, तर त्यापासून चांगला परिणाम कधींच होत नाहीं; म्हणून या विषयावर होत असलेलीं मोठमोठालीं व्याख्यानें वगैरे ऐकण्यापेक्षां डॉक्टर हॉलच्या पुस्तकांतील—मनांत कायमचे ठसणारे, संक्षिप्त असे व्यावहारिक, शारीरिक, मानसिक व नीतिसंबंधीं नियम हरहमेश मननपूर्वक वाचून, ते जर कोणी चांगले लक्ष्यांत ठेवील, तर खात्रीनें त्याला समजेल, कीं—

## दीर्घायु कसें व्हावें ?

आणि जो मनुष्य यांचा आचारांत उपयोग करील, तो दुसऱ्यास प्रत्यक्ष कित्त्यासारखा होईल. असो.

इतर व्यवसायांतून वेळ चांगला मिळत नसल्यामुळें, या पुस्तकाचा तूर्त प्रथम भाग प्रसिद्ध केला आहे; सवडीप्रमाणें याचा दुसरा भागही प्रसिद्ध करण्याचें धारिलें आहे.

बडोदें. सोमवार
ता० १९।१०।१९०३. } रामराव मार्तंड भांबूरकर.

रा. ब. वासुदेव गोपाळ भांडारकर, नायब दिवाणसाहेब राज्य बडोदें, यांचा या पुस्तकावर अभिप्रायः—

From what I have been able to see of Mr. Bhamburker's book "How to live long", I think it is a fair attempt to express in intelligible language some very useful hints for the conduct of life. Being intended for the ordinary reader, such a book can hardly be made too easy to understand. There is also an attempt made to cite parallet maxims from Indian literature. This is likely to add to the authority of the maxims with the ordinary reader. Although the book is a translation from an English work, a fair attempt appeares to have been made to soften the foreign look of the ideas and language of the original in the translation. I have not seen the original, but it would, I think, be an improve-

ment if the maxims are grouped according to subjects which must needs occur when a maxim of spiritnal life is tacked on to one of a purely physiological significance followed probably by a third advising on a point of family life.

September, 14th 1903. } (Sd.) VASUDEV G. BHANDARKER,
Naib Dewan, BARODA State.,

---

# भाषांतर.

"मि० भांबूरकर यांचें "दीर्घायु कसें व्हावें" हें पुस्तक आह्मीं जेवढें पाहूं शकलों त्यावरून असें वाटतें, कीं जीविताचरणासंबंधीं पुष्कळ उपयोगी सूचना स्पष्ट भाषेंत प्रदर्शित करण्याचा त्यांनीं यथोचित प्रयत्न केला आहे. साधारण वाचकांसाठीं उपयुक्त व्हावें या हेतूनें हें पुस्तक, झालें आहे यापेक्षां समजण्यास, जास्त सुलभ होणें कठिण आहे. देशीभाषेंतून अनुरूप वचनेंही या पुस्तकांत घालण्याचा प्रयत्न केला आहे; यामुळें साधारण वाचकांस हे नियम विशेष प्रमाणभूत दिसतील.

हें पुस्तक इंग्रजी ग्रंथाचें भाषांतर आहे तरी पण मूळग्रंथाची भाषा व त्यांतील विचार, याचें विदेशीय रूप, बऱ्याच अंशीं बदलण्याचा योग्य प्रयत्न केलेला दिसत आहे मूळग्रंथ आमचे पाहण्यांत आला नाहीं परंतु आह्मास वाटतें कीं यांतील नियमांचे विषयवार वर्गीकरण केलें असतां विशेष मोहस्कर होईल; कारण आध्यात्मिक नियमाला जोडून पदार्थ—विज्ञानशास्त्रासंबंधीं नियम व प्रायः लागलीच बोधपर असा संसारी नियम आल्यानें मनावर जी स्वाभाविक रीतीनें असंबद्धता उत्पन्न होते ती टाळतां येईल

ता० १४ सपटेंबर १९०३ इ० } ( सही ) वासुदेव जी. भांडारकर.
नायब दिवाण—बडोदा स्टेट.

---

आर्यभिषक्कार्यालयांतील पुस्तकें किंवा औषधें
घेणारास
प्रख्यात चित्रकार राजा रविवर्मा
यांच्या छापखान्यांतील
## सर्व सुंदर चित्रें
दर रुपयास दोन आणेप्रमाणें सूट देऊन विकत मिळतील. पुस्तकें, औषधें व चित्रें यांची यादी आणि **'आरोग्याचा मार्ग'** हें पुस्तक,

## सर्वांस फुकट मिळेल.

## मराठी पुस्तकें

**वर्गणीदारांस निम्मे किंमतीस देण्यांत येतात.**

**निरनिराळ्या**—वनस्पतींचे, शरीराचे वगैरे हुबेहुब देखावे देऊन, वैद्यकाची माहिती देण्यांत प्रख्यात झालेलें

**आर्यभिषक्**—मासिकपुस्तक सन १८८९ जुलैपासून निघतें. मागील मजकुरांची पुस्तकें विक्रीस तयार आहेत. याचे बरोबर—

**भारतधर्म**—नांवाचें धार्मिक विषयांचें सचित्र मासिकपुस्तक असतें. दोन्ही घेणारांस वर्षाची वर्गणी टपालसह १ रु. १० आणे. फक्त आर्यभिषक् घेतल्यास १॥ रु. व **भारतधर्म** घेतल्यास १ रु. इतर पुस्तकांची यादी मागवावी म्हणजे पाठवूं. श्री० **गायकवाड सरकारांच्या** उदार आश्रयानें हीं सर्व पुस्तकें—

**वनौषधि-गुणादर्श.** याचे **सहा भाग** विक्रीस तयार आहेत त्यांची किंमत ६॥ रु. आहे. परंतु आर्यभिषक्‌चे वर्गणीदारांस ते ३। रुपयांस मिळतील. टपाल शिवाय.

मुंबई, पोस्ट गिरगांव, श्रीसयाजी–औषधशाला.

## १५ व्या वर्षाची वर्गणी ज्यांनीं भरली आहे,

त्यांनीं कोणत्याही वर्गाचा आश्रय दिल्यास -त्यांनीं या वर्षाची भरलेली १। (सव्वा) रु. वर्गणी, त्यांनां सदर रकमेंतून वजा दिली जाईल. आर्यभिषक व भारतधर्म दोन्ही घेणारांस हल्लीं वर्गणी १ रु. १० आणे असून. फक्त आर्यभिषक १॥ व फक्त भारत-धर्म १ रु. ह्मणजे-दोन्ही घेणारांस **आर्यभिषक् १। रु. व भारतधर्म ६ आणे**-मिळून १। रु; **तेव्हां आश्रयाच्या रकमेंतून १। रुपया** बाद करून, बाकी रक्कम त्यांनां पाठवावी हें उघड आहे.

# आश्रयदात्यांचे दोन वर्ग.

आर्यभिषकाचे जुने किंवा नवीन वर्गणीदार होणारे--या सर्वांनां खालील नियम सारखेच लागू आहेत.

**वर्ग पहिला**--एकदम **२५ रुपयांची रक्कम** देणारांस किंवा त्याच्या वारसास **आर्यभिषक्** मासिकपुस्तक-जोपर्यंत चालू राहील तोंपर्यंत- फुकट पाठविलें जाईल. त्याबद्दल टपालखर्च देखील पडणार नाहीं.

**वर्ग दुसरा.-दर वर्षास पांच रुपये.**--याप्रमाणें सहा वर्षांत ३० रुपये भरणारांसही वरील प्रमाणें **आर्यभिषक्** मिळेल. तीस रुपयाची रक्कम पुरी भरली गेली नाहीं, तर मात्र जितके रुपये भरले असतील, त्या रुपया इतकेंच दिवस आर्यभिषक् मिळेल. ह्मणजे १५ रु. भरले असतील तर दरवर्षास १॥ रु. वर्गणीप्रमाणें वर्गणी आकारून १० वर्षें मासिकपुस्तक दिलें जाईल. याप्रमाणें कमीजास्त रकमेचा हिशेब समजावा.

### आश्रयदात्यांनां भारतधर्म मासिकपुस्तक

देण्यास आह्मी बांधले जात नाहीं. भारतधर्म मासिकपुस्तक ज्या दरानें आर्यभिषकच्या वर्गणीदारांस दिलें जाईल, ती वर्गणी आश्रयदात्यांनीं दिल्यास मात्र त्यांस तें मिळेल. जसें:-या १५ व्या वर्षी, आर्यभिषकच्या वर्गणीदारांस भारतधर्म सहा आण्यांत मिळतो, तेव्हां वर्गणी किंवा आश्रयाशिवाय ६ आणे देणारांस, या वर्षी भारतधर्म मिळेल. पुढें भारतधर्म, आर्यभिषकच्या वर्गणीदारांस ज्या किमतीनें किंवा जशा सवडीनें देण्याचा ठराव प्रसिद्ध होईल, त्याप्रमाणें तो त्यांस-ती किंमत दिल्यास मिळेल. कारण, या दोन संस्था अगदीं पृथक् आहेत. अणखी कांहीं खुलासा कोणास पाहिजे असेल तर त्यांनीं खालील पत्त्यावर मागवावा.

### सर्व सुज्ञ गृहस्थांना विनंती आहे,

कीं त्यांनीं या कामीं हस्तें परहस्तें अवश्य मदत करावी. भारतीय वैद्यकाचा उत्कर्ष व्हावा ह्मणून हा प्रयत्न आहे; त्यांत सर्वथा पोट बांधून काम होतें आहे असें जरी नाहीं, तरी इतकी गोष्ट स्पष्ट आहे कीं, या कामीं सर्व शक्तीचा व्यय झाला असून, त्यासाठीं इतर व्यावहारिक फायद्यांनां बाजूला सारलेलें असून, ही संस्था चिरकाल चालावी आणि इच्या द्वारें ग्रंथ व औषधें यांचा प्रसार सर्वत्र होऊन. आर्यवैद्यकाची जाज्वल्य मूर्ति सर्वत्र दिसून, लोकांत विद्याप्रसार व्हावा । यांत प्रधान हेतु आहे. या हेतूच्या सिद्ध्यर्थ अनेक प्रयत्न करावयाचे आहेत; पण ते, परमेश्वराच्या प्रसादानें मिळणाऱ्या शक्तित्रयावर अवलंबून आहेत. त्याच्या इच्छेनें व आश्रयदात्यांच्या निमित्तानें ते होतीलच !

आर्यभिषक्कार्यालय.<br>मुंबई, गिरगांव. ता २४ अक्टोबर १९०३ } **शंकर दाजी शास्त्री पदे.**

# वैद्यकविषयाचे जुनें, प्रख्यात व सचित्र मासिकपुस्तक

## आर्यभिषक्— याचे आश्रयदाते होणारांस विशेष सवलत.


निरनिराळ्या रंगांत हुबेहुब वनस्पतींचे देखावे; शारीरशास्त्र आणि इतर सर्व उपयुक्त वैद्यकविषयाचें हें प्रख्यात मासिकपुस्तक १५ वर्षें चालू आहे. वर्षाची वर्गणी टपालसह १॥ रु. सम्पादक—वै. आ. म. शंकर दाजी शास्त्री पदे.

**विशेप सवलत.**—एकदम २५ रु. किंवा दरवर्षास ५ रु. प्रमाणें ६ वर्षांत ३० रुपये देणारांस व पुढें वारसांस हें मासिकपुस्तक नेहमीं निघेल तोंपर्यंत टपालखर्च न घेतां फुकट देण्यांत येईल! **आश्रयदाते यांस**, आमच्या कार्यालयांतील **औषधें**, दररुपयास २ आ. प्रमाणें कमी किंमत आकारून मिळतील. आणि आश्रयदाते व वर्गणीदार यांस **आमचीं वैद्यक पुस्तकें निम्मे किंमतीस** मिळतील. आश्रयदाते ज्या वर्षी पैसे भरतील, त्या वर्षाच्या आरंभापासून मा. पु. त्यांस मिळेल मागील वर्षांच्या अंकांतील पुस्तकें निम्मे किंमतीस मिळतील. **झालेल्या आश्रयदात्यांचीं** नांवें:—

रा. रा. हरिश्चंद्र पांडुरंगजी पितळे, जे. पी.
,, महादेव राजाराम बोडस, एम्. ए., एल्एल्. बी.
रा. रा. यशवंत अण्णा कुंटे.
,, कृष्णाजी बाळाजी मजलीकर, वकील.
वैद्यराज तात्याबुवा बडोदेकर.
वै० नारायण हरि तुळपुळे
रा. रा. सीताराम बाबाजी, ची. का.
,, गणेश रघुनाथ गुप्ते.
वे. सं. काशीनाथ आत्मारामभट्ट सिद्धये.
,, वादिराजाचार्य भीमाचार्य कट्टी.
रा. रा ईश्वरदास लल्लूभाई पटेल.
कुमारी मथुराबाई मो. चिं. जोशी.
डा. नवरत्न.
श्री. स. दि. दादासाहेब पंत प्रतिनिधि.
रा. रा. एम्. आर जयकर, एम्. ए.
रा. ब. शंकर दत्तात्रय खांडेकर.
रा. रा. दामोदर सावळाराम यंदे. स. वि. कर्ते
रा. रा. वामनराव दामोदरजी पितळे. जे. पी.
रा. रा. कृष्णाजी सदाशिव बर्वे.
रा. रा. यमाजी गोपाळ वैद्य.
रा. रा. गजानन बाबाजी देवधर.
सर डा. भालचंद्र कृष्ण भाटवडेकर एल्. एम्.
डा. मोरेश्वर गोपाळ देशमुख, एम्. डी.
ह. बळवंतराव रणभोर बुवा सातारकर.
डा. पोपट प्रभुराम वैद्य, एल्. एम्. ॲंड एस्.
रा. रा. हरि गोविंद बीडकर मोर्तीवाले.
मि. साम्युएल सालेमन.
डा. गोपीनाथ कृष्णाजी क्षत्रिय.
रा. रा. शंकर कानोजी.
,, दत्तात्रय माधव टोकेकर.
रा. रा. गणेश कृष्ण देशपांडे.
श्री. रा. रा. रामचंद्र नरसिंह देशपांडे.
रा. रा. कृष्णराव पांडुरंग गुरव.
,, सदाशिव गोपाळ भागले.
वैद्य० ग. श्री देसाई.
डा० का. ना. गोखले एल. एम्. ॲंड एस्.
डा० व्यंकटराव धोंडो पंडित, चिकित्सक.
रा. रा. बळवंत रावजी पवार.
,, कृष्णराव पुरुषोत्तम कोठारे.
वै० दत्तात्रय गणेश शास्त्री कोडोलीकर.
डा० रामचंद्र वासुदेव जोशी.
वै० रामप्पा सुब्राव वझे, सिरसी.
रा. रा. शंकरराव आनंदराव जगताप, इत्यादि

☞ सर्व पत्रव्यवहार वगैरे पुढील पत्त्यावर करावा:—मुंबई, पोष्ट गिरगांव, खेतवाडी मेनरोड, ८ व्या गल्लीचा नाका, आर्यभिषक्कार्यालय. **व्यवस्थापक आर्यभिषक्.**

ज्योतिर्विद् दाजी हरि भट्ट पदे यांचें स्मारक.



वर्ष १५ **आर्यभिषक्** अंक. ६-७



सम्पादक  दाजी शास्त्री पदे.

आयुर्वेदमहोपाध्याय.

मुंबई, खेतवाडी-मेनरोड, र्यभिषक्कार्यालय.

भिषजां साधुवृत्तानां भद्रमागमशालिनाम् ।
अभ्यस्तकर्मणां भद्रं, भद्रं भद्राभिलाषिणाम् ॥ –श्रीवाग्भटः ।

धन व मकरसंक्रांति. शके १८२५ पौष वद्य १२ गुरुवार. ता. १४ जानेवारी १९०४

**विपयानुक्रम**.–सार्थ चरकसंहिता, शारीरस्थान, पृष्ठें ३३–४०; वनौषधि–गुणादर्श भाग ७ वा (सचित्र) ५३–६०; औषधावांचून कोणताही रोग बरा करण्याची विद्या, पृष्ठें १–२४.

---

## आर्यभिषक् मा. पु. आश्रयदात्यांकडून आश्रयाची पोंच.

(वर्ग १ ला.–मुंबई.)

रा. रा. हरिश्चंद्र पांडुरंगजी पितळे, जे. पी.
,, यशवंत अण्णा कुंटे.
,, ईश्वरदास लल्लूभाई पटेल.
डा. नवरत्न (+)
रा. रा. एम्. आर. जयकर., एम्. ए.
;, दामोदर सावळाराम यंदे, स. वि कर्ते
,,गणपतराव भिवाजी ऊर्फ जी. बी.नाईक(×)
सर डा. भालचंद्र कृष्ण भाटवडेकर, एल् एम्
डा. मोरेश्वर गोपाळ देशमुख, एम्. डी.
डा. पोपट प्रभुराम वैद्य.एल्. एम्. एस्.
रा रा. वामनराव दामोदरजी पितळे. जे पी.
ह प. बळवंतराव रणभोरबुवा सातारकर.
रा रा शांताराम नारायण दाभोळकर.
रा. रा. अंबाजी गंगाराम, कंट्राक्टर.

(वर्ग १ ला.–बाहेरगांव.)

रा. रा. गणेश रघुनाथ गुप्ते, वर्जारिया.
रा. ब. शंकर दत्तात्रय खांडेकर, सं. मुधोळ.
रा. रा. गजानन बाबाजी देवधर, बडोदें.
कुमारी मथुराबाई मो. चिं. जोशी, सातारा
रा. रा. कृष्णाजी सदाशिव वर्वे, पुणें.
वे. सं. काशीनाथ आत्मारामभट्ट सिद्धये, वाई.

(वर्ग २ रा.–मुंबई. पहिला हप्ता.)

डा. गोपीनाथ कृष्णाजी क्षत्रिय.
रा. रा. कृष्णराव पुरुषोत्तम कोठारे.
रा, रा. बळवंत रावजी पवार.
वै. केशवराम हरिदत्त इच्छापोरिया.

(वर्ग २ रा.–बाहेरगांव. पहिला हप्ता)

रा, रा. सीताराम बाबाजी, ची. का. सांगोले
,, दत्तो नारायण वझे, येढूर.
डा० व्यंकटराव धोंडो पंडित, बंगलोर.
वै. नारायण हरि तुळपुळे, बेळगांव
वै. तात्याबुवा बडोदेकर, चोपडे.
रा. रा यमाजी गोपाळ वैद्य, अहमदाबाद.
रा. रा. शंकर कानोजी, सांवतवाडी.
,, लक्ष्मण चिंतामण डिके, सिंगाणा.
,, गणेश शंकर कानिटकर, इसलूर.
,, सदाशिव गोपाळ भोगले, औरंगाबाद

स्थलसंकोचास्तव बाकीची पोंच येत्या अंकीं देऊं.

---

विचारी महाशयांस

# वैद्यक–ग्रंथप्रसाराबद्दल विनंति.

पृथ्वीवर व्यवस्थित वैद्यक्रिया सुरू करण्याचें सर्व श्रेय आपल्या वैद्यकास आहे हें निर्विवाद आहे. परंतु आपल्या दुर्लक्षामुळें आपल्या शास्त्राची हानि होत चालली आहे.

आपल्यांत कोणकोणते शोध आहेत यांविषयीं आपलें अज्ञान असणें किंवा आपल्या शास्त्राची योग्यता, नवीन सुधारणांच्या साह्यानें वाढविण्याचा प्रयत्न न करणें हा आपलाच दोष आहे. हा आपल्या पूर्वजांचा दोष नव्हे किंवा शास्त्राची न्यूनताही नव्हे.

श्रीशंकर.

# सार्थ श्रीचरकसंहिता.

## चिकित्स्थान भाग ३ रा.

### अथ द्वादशोऽध्यायः

अथातो मदात्ययचिकित्सितं व्याख्यास्यामः ।
इति हस्माह भगवानात्रेयः ॥ १ ॥

आतां आपण * मदात्ययचिकित्सा निरूपण करूं. आत्रेय ऋषि असेंच सांगते झाले.

सुरैः सुरेशसहितैर्या सुरा परिपूजिता ।
सौत्रामण्यां हूयते या कर्मभिर्या प्रतिष्ठिता ॥ २ ॥
यज्ञे हि या च शक्रस्य सोमोऽतिपातितो यया ।
नीरुजस्तमसाविष्टस्तस्माद्रोगात्समुद्धृतः ॥ ३ ॥
विधिभिर्वेदविहितैर्या यजद्भिर्महात्मभिः ।
दृश्या स्पृश्या प्रकल्प्या च यज्ञिया यज्ञसिद्धये ॥ ४ ॥
योनिसंस्कारनामाद्यैर्विशेषैर्बहुधा च या ।
भूत्वा भवत्येकविधा सामान्यान्मदलक्षणात् ॥ ५ ॥
या देवानमृतं भूत्वा स्वधा भूत्वा पितॄंश्च या ।
सोमो भूत्वा द्विजातीन्या युङ्क्ते श्रेयोभिरुत्तमैः ॥ ६ ॥
आश्विनं या महत्तेजो वीर्यं सारस्वतश्च या ।
बलमैन्द्रश्च या सोमे सौत्रामण्याश्च या मता ॥ ७ ॥

---

* मदात्ययास Alcoholism नांव देतां येईल.

शोकारतिभयोद्वेगनाशिनी या महाबला ।
या प्रीतिर्या रतिर्या वाक्पुष्टिर्या या च निर्वृतिः ॥ ८ ॥
या सुरा सुरगन्धर्वयक्षराक्षसमानुषैः ।
रतिः सुरेत्यभिहिता तां सुरां विधिना पिबेत् ॥ ९ ॥

ज्या मद्याची देवांनीं इंद्रासहित पूजा केली, ज्याचें सौत्रामणि यज्ञांत हवन केलें जातें, वैदिककर्मद्वारा ज्याची प्रतिष्ठा आहे, इंद्राच्या यज्ञांत ज्याचा उपयोग केला गेला, चंद्र बेशुद्ध अंधकारांत पडला असतां ज्याच्याद्वारा पुन्हां त्याचा उद्धार झाला, यज्ञसिद्धीकरितां वैदिक विधीनें यज्ञयाग करणारे महात्मे ज्याचें विधिपूर्वक दर्शन, स्पर्शन व उपयोग करितात, जें मद्य ज्या निरानिराळ्या पदार्थांपासून ( द्राक्षें, धान्य, ऊंस, माड, ताड इ. ) बनतें त्यांच्या भेदपरत्वें, ज्या निरनिराळ्या क्रियांनीं तें बनविलें जातें, त्यांच्या अनेकत्वामुळें व तदनुरूप त्यांच्या वेगवेगळ्या नांवावरून अनेक प्रकारचें असूनही, सर्व प्रकारच्या मद्याचें जें एक सामान्य लक्षण अंमल येणें त्याच्या एकत्वावरून एकच प्रकारचें आहे, जें अमृतरूपानें देवाचें, स्वधारूपानें पितरांचें व सोमरसरूपानें ब्राह्मणांचें कल्याण करितें, जें मद्य अश्विनीकुमारांचें महत्तेज, सरस्वतीचें सामर्थ्य, इन्द्राची शक्ति धारण करतें, सोमयाग व सौत्रामणियज्ञांत ज्याचा उपयोग केला जातो, जें मद्य शोक, अस्वस्थता, भीति व उद्वेग यांचा नाश करितें, जें मोठें शक्ति देणारें आहे, ज्याची देव–गन्धर्व–यक्ष–राक्षस व मनुष्यांनीं प्रीति, रति ( सुख ), वाणी, पुष्टि व निर्वृति ह्मणजे मोक्ष किंवा आनंद अशा विशेषणांनीं स्तुति केलेली आहे, व विशेषेंकरून ज्यास रतिरूप मानतात तें मद्य पुढील विधीनें * प्यावें.

---

* दारूची ही इतकी प्रशंसा वाचून कोणी मद्यपान मात्र करावयास लागू नये. कारण हा विधि नव्हे. हीं एक प्रकारचीं अर्थवाद वचनें आहेत. व यांचा हेतु लौकिकदृष्ट्या मद्याचे गुण दाखविण्याचा आहे. भक्ष्य–पेयसंबंधानें अलौकिक विधि–निषेध करणें हें धर्मशास्त्राचें कर्तव्य आहे. वैद्यशास्त्राचें नव्हे. वैद्यशास्त्र केवळ

शरीरकृतसंस्कारः शुचिरुत्तमगन्धवान् ।
प्रावृतो निर्मलैर्वस्त्रैर्यथर्तूद्दामगन्धिभिः ॥ १० ॥
विचित्रविविधस्रग्वी रत्नाभरणभूषितः ।
देवाद्विजातीन्सम्पूज्य स्पृष्ट्वा मङ्गलमुत्तमम् ॥ ११ ॥
देशे यथर्तुके शस्ते कुसुमप्रकरीकृते ।
संवाससम्मते मुख्ये धूपसम्मोदबोधिते ॥ १२ ॥
सोपधाने सुसंस्तीर्णे विहिते शयनासने ।
उपविष्टोऽथवा तिर्यक्स्वशरीरे सुखे स्थितः ॥ १३ ॥
सौवर्णे राजतैश्चापि तथामणिमयैरपि ।
भाजनैर्विमलैश्चान्यैः सुकृतैश्च पिबेत्सदा ॥ १४ ॥
स्त्रीभिर्यौवनमत्ताभिः शिक्षिताभिर्यथर्तुकैः ।
वस्त्राभरणमाल्यैश्च भूषिताभिर्विभूषितः ॥ १५ ॥
शौचानुरागयुक्ताभिः प्रमदाभिरितस्ततः ।
संवाह्यमान इष्टाभिः पिबेन्मद्यमनुत्तमम् ॥ १६ ॥

---

लौकिक आरोग्यरक्षणाच्या दृष्टीनें हिताहित भक्ष्य–पेय–कर्तव्य सांगतें. म्हणजे धर्मशास्त्राच्या आज्ञा पाप–पुण्यास अनुलक्षून केलेल्या आहेत आणि वैद्यशास्त्र फक्त आरोग्यरक्षणावर नजर ठेवून कर्तव्याकर्तव्य निरूपण करितें. या ठिकाणीं मद्य विधिपूर्वक प्यावें असें जें सांगितलें आहे त्याच्या पूर्वी " जर धर्मशास्त्राची आज्ञा असेल तर व असल्यास ती ज्यांस असेल त्यांनीं " ( विधिपूर्वक प्यावें ) असा अर्थ अध्याहृत केला पाहिजे व वास्तविक शास्त्रकारांचा अभिप्रायही तोच आहे वाग्भटांत याच प्रकरणांत शेवटीं सांगितलेंच आहे कीं " पानप्रवृत्तौ सत्यां तां सुरान्तु विधिना पिबेत् " जर धर्मशास्त्रानें निषिद्ध नसेल व ज्यांच्याकरितां नसेल. त्यांनीं ती विधीनें प्यावी. वैद्यशास्त्रदृष्ट्या तरी दारूंत गुणापेक्षां अवगुणच किती तरी जास्त आहेत. त्यांचें वर्णन याच अध्यायांत पुढें येणार आहे. " दृष्टं किमपि लोकेऽस्मिन निर्दोषं न निर्गुणम् " या न्यायान प्रत्येक पदार्थांत कांहींना कांहीं गुण असतात तसे मद्यांतही कांहीं आहेत. परंतु तेवढ्यावरून त्याच्यां अनेक मोठमोठ्या लौकिक अवगुणांकडे लक्ष्य न देतां व पाप पुण्याची परवा न करितां त्याचें सेवन करणें हें शहाणपणाचें काम नव्हे.

पिबेन्मद्यानुकूलैर्वा फलैर्हरितकैः शुभैः ।
लवणैर्गन्धपिशुनैरवदंशैर्यथर्तुकैः ॥ १७ ॥
भृष्टैर्मांसैर्बहुविधैर्भूजलाम्बरचारिणाम् ।
पौरोगववर्गविहितैर्भक्ष्यैश्च विविधात्मकैः ॥ १८ ॥
पूजयित्वा सुरान्पूर्वमाशिषः प्राक्प्रयुज्य च ।
प्रदाय सजलं मद्यमादितो वसुधातले ॥ १९ ॥
अभ्यङ्गोत्सादनस्नान वासोधूपानुलेपनैः ।
स्निग्धोष्णैर्भावितश्चान्नैर्वातिको मद्यमाचरेत् ॥ २० ॥
शीतोपचारैर्विविधैर्मधुरस्निग्धशीतलैः ।
पैत्तिको भावितश्चान्नैः पिबेन्मद्यं न सीदति ॥ २१ ॥
उपचारैरशिशिरैर्यवगोधूमभुक्पिबेत् ।
श्लैष्मिकैर्धन्वजैर्मांसैर्मद्यं मरिचकैः सह ॥ २२ ॥
विधिर्वसुमतामेष भविष्यद्विभवाश्च ये ।
यथोपपत्तितैर्मद्यं पातव्यं मात्रया हितम् ॥ २३ ॥

प्रथम शरीराचे संस्कार ह्मणजे स्नान ध्यान वगैरे करून, शुचिर्भूत होऊन अंगास उत्तमोत्तम सुगंधि द्रव्यें व अत्तरें लावावीं, त्या त्या ऋतूंत विशेष खुलणारीं अत्तरें लावलेलीं घमघमाटयुक्त स्वच्छ वस्त्रें धारण करावीं, निरनिराळ्या चित्रविचित्र रंगाच्या फुलांच्या माळा गळ्यांत घालाव्या, रत्न-जडित अलंकार भूषणें अंगावर घालावीं, देव-ब्राह्मणांची पूजा करावी, मंगल द्रव्यांस स्पर्श करावा, ज्या ऋतूंत जी जागा प्रशस्त असेल ह्मणजे उन्हाळ्यांत कुंज, बगीचा, थंड तळघरें वगैरे, हिंवाळ्यांत ज्या ठिकाणीं जोराचा थंडगार वारा वगैरे लागत नसेल अशी जागा पाहून त्यांत मुख्य बैठकीच्या जागीं उत्तम प्रकारचे बिछाने व गालीचे वगैरेंच्यांची शोभिवंत बैठक घालून, त्यावर लोड-तक्के ठेवून, सर्वत्र सुवासिक फुलें पसरून व धूप वगैऱ्यांनीं सर्व जागा सुगन्धमय करून त्या ठिकाणीं सरळ बसून टेंकून, तिरपें पडून किंवा ज्या रीतीनें शरीरास सुख होईल अशा रीतीनें बसून

सोनें, चांदी, किंवा रत्नजडित अशा स्वच्छ प्याल्यांतून मद्य प्यावें. तारुण्याच्या भरानें मस्त झालेल्या शिक्षीत, ऋतूस अनुसरून वस्त्रें-आभूषणें व फुलें यांनीं सुशोभित दिसणाऱ्या, शुचिर्भूत, प्रीतियुक्त व आवडत्या अशा तरुणी जातां येतां अंग दावीत आहेत अशा स्थितींत मद्य प्यावें. मद्यास अनुकूल अशीं त्या त्या ऋतूंतील फळें, आलें, कांदे वगैरे चटण्या कोशिंबिरीचे हिरवे पदार्थ, तिखटा-मिठाचे पदार्थ व सुगंधयुक्त लोणचीं, चटण्या वगैरे तोंडी लावणीं, बकरा, हरण-ससे वगैरे जमिनीवर चरणारीं जनावरें, मासे वगैरे जलचर जीव व तित्तर-बटेर वगैरे पक्ष्यांचें भाजलेलें मांस व मागें सूत्रस्थानांत कृतान्नवर्गांत जे नानाप्रकारचे भक्ष्य पदार्थ सांगितले आहेत ते मद्याबरोबर खावे. मद्य पिण्यापूर्वी देवांस वंदन करून आशीर्वाद प्रयोगानंतर पाण्याबरोबर थोडें मद्य जमिनीवर टाकावें. वात प्रकृतीच्या मनुष्यानें अंगास तेल मर्दन करून, उटणें लावून, स्नान करून, धूप व लेप करून आणि स्निग्ध व उष्ण अन्न खाऊन मद्य प्यावें. नानाप्रकारचे थंड उपचार करून, आणि मधुर-स्निग्ध व थंड पदार्थांचें भोजन करून पित्त प्रकृतीच्या मनुष्यानें मद्य प्यावें; ह्मणजे तो लंघत नाहीं. कफप्रकृतीच्या मनुष्यानें उष्ण उपचार करून जव व गव्हांचें अन्न खाऊन जांगल जनावरांच्या मांसास तूप चोपडून त्यावर मिरपूड घालून तें भट्टींत किंवा अन्य रीतीनें भाजून त्याच्या बरोबर मद्य प्यावें. हा सर्व विधि श्रीमंत लोकांकरिता सांगितला. जे तसे नसतील त्यांनीं आपल्या ऐपतीप्रमाणें यांतील शक्य तितका प्रकार करून बेतानें व हितकर असें मद्य प्यावें.

वातिकेभ्यो हितं मद्यं प्रायो गौडिकपैष्टिकम् ।
कफपित्ताधिकेभ्यस्तु फालमाधवशार्करम् ॥ २४ ॥
बहुद्रव्यं बहुगुणं बहुकर्ममदात्मकम् ।
गुणैर्दोषैश्च तन्मद्यमुभयं चोपदेक्ष्यते ॥ २५ ॥
विधिना मात्रया काले हितैरन्नैर्यथाबलम् ।
प्रहृष्टो यः पिबेन्मद्यं तस्य स्यादमृतं यथा ॥ २६ ॥

यथोपेतं पुनर्मद्यं प्रसङ्गाद्येन पीयते ।
रूक्षव्यायामनित्येन विषवद्याति तस्य तत् ॥ २७ ॥
मद्यं हृदयमाविश्य स्वगुणैरोजसो गुणान् ।
दशभिर्दश सङ्क्षोभ्य चेतो नयति विक्रियाम् ॥ २८ ॥
लघूष्णतीक्ष्णसूक्ष्माम्लव्यवायाशुगमेव च ।
रूक्षं विकासि विशदं मद्यं दशगुणं स्मृतम् ॥ २९ ॥
गुरुत्वं लाघवाच्छैत्यं चोष्णादम्लस्वभावतः ।
माधुर्यं मार्दवं तैक्ष्ण्यात्प्रसादं चाशुभावनात् ॥ ३० ॥
रौक्ष्यात्स्नेहं व्यवायित्वात्स्थिरत्वं श्लक्ष्णतामपि ।
विकासिभावात्पैच्छिल्यं वैशद्यात्सान्द्रतां तथा ॥ ३१ ॥
सौक्ष्म्यान्मद्यं निहन्त्येवमोजसः स्वगुणैर्गुणान् ।
सत्वं तदाश्रयं चाशु सङ्क्षोभ्य जनयेन्मदम् ॥ ३२ ॥
रसधात्वादिमार्गाणां सत्वबुद्धीन्द्रियात्मनाम् ।
प्रधानस्यौजसश्चैव हृदयं स्थानमुच्यते ॥ ३३ ॥
अतिपीतेन मद्येन विहितेनौजसा च तत् ।
हृदयं याति वैकृत्यं तत्रस्था ये च धातवः ॥ ३४ ॥
ओजस्याविहते पूर्वो हृदि च प्रतिबोधिते ।
मध्यमो विहतेऽल्पे च विहते तूत्तमो मदः ॥ ३५ ॥
नैवं विघातं जनयेन्मद्यं पैष्टिकमोजसः ।
विकासरूक्षविशदा गुणास्तत्र हि नोल्बणाः ॥ ३६ ॥
हृदि मद्यगुणाविष्टे हर्षस्तर्षो रतिः सुखम् ।
विकाराश्च यथासत्वं चित्रा राजसतामसाः ॥ ३७ ॥
जायन्ते मोहनिद्रान्ता मद्यस्यातिनिषेवणात् ।
स मद्यविभ्रमो नाम्ना मद इत्यभिधीयते ॥ ३८ ॥

वातप्रकृतीच्या मनुष्यांनीं विशेषेंकरून गुळाची व पिठाची दारू प्यावी. कफ व पित्त प्रकृतीच्या मनुष्यांनीं द्राक्षें, डाळिंब, खजूर, फणस वगैरे

फळांची, मधाची किंवा साखरेची दारू पिणें हितकर होय. मद्य अनेक द्रव्यांपासून बनत असल्यामुळें त्यांत अनेक गुण आहेत व तें पिणारा अनेक प्रकारचीं कर्में करितो. आतां मद्याचे गुण व दोष सांगतों. जो मनुष्य विधिपूर्वक ह्मणजे त्यासंबंधीं सांगितलेले सर्व नियम पाळून योग्य प्रमाणांत, योग्य काळीं, हितकर अन्नांसहित ह्मणजे मागें सांगितल्याप्रमाणें मद्याच्या विपरीत गुणांच्या भक्ष्यपदार्थांसहित आपली शक्ति पाहून व हर्षयुक्त होत्साता मद्यपान करील त्यास तें अमृताप्रमाणें गुण करील. उलटपक्षीं रुखें-सुखें अन्न खाणारा व नेहमीं कसरत वगैरे मेहनत करणारा मनुष्य तेंच मद्य, मिळेल तसें व मिळेल तितकें प्याल्यास त्यास तें विषाप्रमाणें अव-गुण करितें. तात्पर्य मद्य विषाप्रमाणें आहे. विष योग्य रीतीनें व योग्य प्रमा-णांत घेतल्यास तें रसायन होतें आणि कसें तरी व किती तरी घेतल्यास प्राण-घात करितें. तद्वतच मद्याचें आहे. मद्य हृदयांत प्रवेश करून आपल्या अंगच्या दहा गुणांनीं हृदयस्थ ओजाचे दहा गुण दूषित करून चित्तास अव्यवस्थित करितें. मद्य हलकें, उष्ण, तीक्ष्ण, सूक्ष्म, आंबट, सर्वत्र पसरणारें, आपली, क्रिया जलद करणारें, रूक्ष, शरीर ढिलें करणारें व विशद ह्मणजे जें बुळबुळींत नव्हे तें—स्वच्छ, असें दहा गुणांनीं युक्त आहे. जडपणा, शैत्य, मृदुता, श्लक्ष्णता, दाटपणा, मधुरता, स्थिरता, मन्दपणा, (संथपणा) बुळबुळीतपणा, व चिकणाई हे दहा गुण ओजांत आहेत. मद्य आपल्या पूर्वोक्त दहा गुणांनीं ओजांच्या या दहा गुणांस नष्ट करितें. आपल्या हलके-पणानें ओजाचा जडपणा, उष्णतेनें शैत्य, आंबटपणानें मधुरता, तीक्ष्णतेनें मृदुपणा, त्वरित क्रियेनें संथपणा, रूक्षतेनें चिकणाई, व्याप्तिशीलता—सर्वत्र पसरण्याच्या शक्तीनें स्थिरपणा, विकासितेनें श्लक्ष्णत्व, स्वच्छतेनें बुळबुळीतपणा व सूक्ष्मतेनें दाटपणा याप्रमाणें ओजाचे दहा गुण विकृत करितें व तदा-श्रित जें मन त्यास लौकरच क्षुब्ध करून अम्मल आणतें. रस—रक्तादि सप्त-धातूंच्या स्रोतसांचें, मन, बुद्धि, इंद्रियें व आत्मा यांचें आणि सर्वधातूंचा सार भाग असें जें ओज त्याचें अधिष्ठान हृदय आहे. अतिशय मद्य प्याल्यानें

ओजास धक्का बसला ह्मणजे हृदय व त्याच्या ठिकाणीं राहणारे धातु हे विकृत होतत. ज्या मदांत ओजास धक्का न पोंचतां हृदयास उत्तेजन मिळतें त्यास प्रथम मद ऊर्फ अम्मल समजावें. ज्यांत ओजास थोडा धक्का पोंचतो तो मध्यम किंवा द्वितीय मद समजावा. आणि ज्यांत ओजास जबरदस्त आघात होतो तो उत्तम किंवा तृतीय मद जाणावा. अशा प्रकारचा आघात पिठाच्या दारूपासून ओजास होत नाहीं. कारण तींत विकासिता, रूक्षता व विशदता हे हानिकारक गुण विशेष नाहींत. मद्याचा अम्मल हृदयावर झाला ह्मणजे हर्ष होतो, तहान लागते, प्रीती किंवा विषयवासना उत्पन्न होते, सुख वाटतें व त्या त्या माणसाची राजस–तामस ज्या तऱ्हेची प्रकृति असेल त्याप्रमाणें तो नानाप्रकारच्या विकार चेष्टा करितो. ह्मणजे एखाद्या सात्विक प्रकृतीच्या मनुष्याला दारू पाजली व ती चढली तर तो बडबड, शिव्या-गाळी वगैरे प्रकार कांहीं न करितां केवळ निचेष्ट पडून राहील. परंतु एखाद्या तामसी मनुष्याला दारू पाजली असतां तो शिव्यागाळी, मारामारी वगैरे नानाप्रकार करून दाखवितो. तात्पर्य दारूच्या अम्मलांत मनुष्य ज्या ज्या चेष्टा करितो त्या त्या त्याची प्रकृति दर्शवितात असें समजावें. अतिशय दारू प्याल्यानें मनुष्य बेशुद्ध होऊन झोंपीं जातो. यास मद्यविभ्रम अथवा मद ह्मणजे दारूचा अम्मल ह्मणतात. दारू पिण्यापासून येणाऱ्या अम्मलाचे तीन प्रकार आहेत. पहिला, दुसरा व तिसरा. यापुढें त्यांचीं लक्षणें सांगतों.

प्रहर्षणः प्रीतिकरः पानान्नगुणदर्शकः ।
वाद्यगीतप्रहासानां कथानाञ्च प्रवर्तकः ॥ ३९ ॥
न च बुद्धिस्मृतिहरो विषयेषु न चाक्षमः ।
सुखनिद्राप्रबोधश्च प्रथमः सुखदो मदः ॥ ४० ॥
मुहुः स्मृतिर्मुहुर्मोहो व्यक्ता सज्जति वाङ्मुहुः ।
युक्तायुक्तप्रलापश्च प्रपलायनमेव च ॥ ४१ ॥
स्थानपानान्नसाङ्कथ्ये योजना सविपर्यया ।

लिङ्गान्येतानि जानीयादाविष्टे मध्यमे मदे ॥ ४२ ॥
मध्यमं मदमुत्क्रम्य मदमप्राप्य चोत्तमम् ।
न किञ्चिन्नाशुभं कुर्युर्नरा राजसतामसाः ॥ ४३ ॥
को मदं तादृशं विद्वानुन्मादमिव दारुणम् ।
गच्छेदध्वानमस्वन्तं बहुदोषमिवाध्वगः ॥ ४४ ॥
तृतीयन्तु मदं प्राप्य भग्नदार्विव निष्क्रियः ।
मदमोहावृतमना जीवन्नपि मृतैः समः ॥ ४५ ॥
रमणीयान्स विषयान्न वेत्ति न सुहृज्जनम् ।
यदर्थं पीयते मद्यं रतिं तांश्च न विन्दति ॥ ४६ ॥
कार्याकार्यं सुखं दुःखं लोके यच्च हिताहितम् ।
यदवस्थो न जानाति कोऽवस्थां तां व्रजेद्बुधः ॥ ४७ ॥
स दूष्यः सर्वभूतानां निन्द्यश्चाग्राह्य एव च ।
व्यसनित्वादुदर्के च सदुःखं व्याधिमश्नुते ॥ ४८ ॥
प्रेत्य चेह च यच्छ्रेयः श्रेयो मोक्षश्च यत्परम् ।
मनः समाधौ तत्सर्वमायत्तं सर्व देहिनाम् ॥ ४९ ॥
मद्येन मनसश्चास्य सङ्क्षोभः क्रियते महान्
महामरुतवेगेन तटस्थस्येव शाखिनः ॥ ५० ॥
मद्यप्रसङ्गमज्ञात्वा महादोषं महागदम् ।
सुखमित्यधिगच्छन्ति रजोमोहपराजिताः ॥ ५१ ॥
मद्योपहतविज्ञाना वियुक्ताः सात्विकैर्गुणैः ।
श्रेयोभिर्विप्रयुज्यन्ते मदान्धा मदलालसाः ॥ ५२ ॥

मद्याचा पहिला अम्मल सुखदायक असतो. त्यांत चित्तास हर्ष होतो. प्रीति उत्पन्न होते, खाण्यापिण्यास रुचि येते, मनुष्य गाणें वाजवितो, गातो, हास्य-विनोद करितो व गोष्टी सांगतो. यांत बुद्धि व स्मरणशक्ति कायम असते, सर्व व्यवहार बरोबर रीतीनें करितो, सुखानें झोंप लागते व जागाही तावडतोब होऊं शकतो. याप्रमाणें पहिला अम्मल सुखाचा असतो. दुसऱ्या

अमलांत–घटकेंत चांगली आठवण असणें, घटकेंत भ्रम होणें; कांहीं वेळ स्पष्ट बोलणें, कांहीं वेळ बोलतांना अडखळणें, कधीं चांगलें समंजसपणानें बोलणें, कधीं यद्वातद्वा बरळणें; इकडे तिकडे धांवूं पळूं लागणें; स्थान–खाणें पिणें वगैरे गोष्टी विपरीत करणें, हीं लक्षणें होतात. दुसरा अम्मल उलटून तिसरा अम्मल येण्यापूर्वीं* मध्यंतरी एक अमंल येत असतो. त्या अमंलांत राजस व तामस प्रकृतीचे मनुष्य अमुक एक वाईट कृत्य करणार नाहींत असें नाहीं, अर्थात् वाटेल तीं अनन्वित कृत्यें करतील. अशा प्रकारचा उन्मादाप्रमाणें भयंकर अमल कोण विद्वान् करील ? अर्थात् ज्याप्रमाणें हिंस्रक प्राण्यांनीं व्यापलेला व चोर लुटारू लोकांनीं घेरलेला असा भयंकर रस्ता वाटसरू सोडून देतो, त्याप्रमाणें अशा प्रकारचा भयंकर अम्मल येण्याजोगें मद्यपान बुद्धिमानांनीं दुरूनच वर्ज्य करावें. अमलाच्या तिसऱ्या अवस्थेंत तर मनुष्य मोडक्या लांकडाप्रमाणें निश्चेष्ट पडतो. मद्याचा अम्मल व मोह यांच्या योगानें त्याचें मन आच्छादित होऊन जातें. सर्व प्रकारें तो जिवंत असून मेल्याप्रमाणें पडतो. त्यास रमणीय पदार्थ कळत नाहींत. इष्ट–मित्र ओळखतां येत नाहींत व ज्या विषयसुखाकरितां दारू पितो तें सुखही प्राप्त होत नाहीं. ज्या अवस्थेंत कार्याकार्य विचार राहत नाहीं. सुखदुःख

---

* सुश्रुतांनीं मद्याच्या चार अवस्था सांगितल्या आहेत. त्यांचें या ठिकाणीं सांगितलेल्या तीन अवस्थांशीं तत्वतः साम्यच आहे. दुसऱ्या व तिसऱ्या अवस्थेच्या दरम्यान जी ही अवस्था सांगितली आहे तीसच सुश्रुतांनीं तिसरी अवस्था म्हटलें आहे. व चरकांतील तिसरी अवस्था ती सुश्रुतांच्या विभागाप्रमाणें चवथी आहे. वस्तुतः तीनच अवस्था कां याचा खुलासा पुढें येणार आहे. दुसरी व तिसरी यांच्या दरम्यानची अवस्था कांहीं एक निराळी अवस्था नाहीं. तर दुसऱ्या अवस्थेच्या शेवटची व तिसऱ्या अवस्थेच्या आरंभाची जी विशिष्टदशा तिलाच मधली दशा म्हटलें आहे. जसें " कुंभमीनर्क्षयोर्मध्ये यदा चरति चन्द्रमा । नाहरे तृणकाष्ठानि न गच्छेद्दक्षिणां दिशम् " कुंभ व मीन राशीच्या दरम्यान चंद्र असतां गवत–काष्ठ वगैरे आणूं नये असें सांगितलें आहे. या ठिकाणीं कुंभ व मीनराशीचा मध्यभाग म्हणजे कुंभराशीचा शेष अंश व मीनाचा प्रथम अंश हा होय. त्याचप्रमाणें दुसऱ्या अवस्थेची शेवटची दशा व तिसरीचा आरंभ याचें नांव मधली दशा होय.

समजत नाहीं, हित—अहित कळत नाहीं, अशी अवस्था प्राप्त होण्याजोगें मद्य कोण शहाणा मनुष्य पिईल? अशा अवस्थेप्रत प्राप्त झालेल्या मनुष्यास सर्व चांगले लोक दूषण देतात, त्याची निन्दा करितात, त्यास आपल्या संगतीस घेत नाहींत आणि परिणामीं त्यास अत्यंत क्लेश होऊन तो रोगग्रस्त होतो. इहलोकीं व परलोकीं जें जें कल्याण किंवा सुख मिळावयाचें, तसेंच सर्वांत श्रेष्ठ जें मोक्षसुख तेंही सर्व मनाची शांति व एकाग्रता यांवर अवलंबून आहे. मद्य त्या शांति व एकाग्रतेचा भंग करून ज्याप्रमाणें झंझावाऱ्यानें शांत व स्वच्छ असलेलीं झाडें डळमळूं लागतात. त्याप्रमाणें मनास अत्यंत क्षुब्ध करितें. रजोगुण व मोह यांच्या योगानें ज्यांची विवेक शक्ति भ्रष्ट झाली आहे अशा लोकांस मद्यापासून होणारे महा अनर्थ व भयंकर रोग ऐन वेळेपर्यंत दिसत नाहींत; आणि तोंपर्यंत ते यांत मोठें सुख मानीत असतात. मदांध व मद्यलोलुप मनुष्यांची बुद्धि मद्य पिऊन भ्रष्ट झाली, ह्मणजे एकंदर सात्विक गुण व सर्व श्रेयस्कर गोष्टींस ते अंतरतात.

**मद्ये मोहो भयं शोकः क्रोधो मृत्युश्च संश्रितः ।**
**सोन्मादमदमूर्च्छायाः सापस्मारापतानकाः ॥ ५३ ॥**
**यत्रैकः स्मृतिविभ्रंशस्तत्र सर्वमसाधुवत् ।**
**इत्येवं मद्यदोषज्ञा मद्यं गर्हन्ति यत्नतः ॥ ५४ ॥**
**सत्यमेते महादोषा मद्यस्योक्ता न संशयः ।**
**अहितस्यातिमात्रस्य पीतस्य विधिवर्जनम् ॥ ५५ ॥**
**किन्तु मद्यं स्वभावेन यथैवान्नं तथा स्मृतम् ।**
**अयुक्तियुक्तं रोगाय युक्तियुक्तं यथामृतम् ॥ ५६ ॥**
**प्राणाः प्राणभृतामन्नं तदयुक्त्या निहन्त्यसून् ।**
**विषं प्राणहरं तच्च युक्तियुक्तं रसायनम् ॥ ५७ ॥**
**हर्षमूर्जो मदं पुष्टिमारोग्यं पौरुषं परम् ।**
**युक्त्या पीतं करोत्याशु मद्यं मदसुखावहम् ॥ ५८ ॥**

रोचनं दीपनं हृद्यं स्वरवर्णप्रसादनम् ।
प्रीणनं बृंहणं बल्यं भयशोकश्रमापहम् ॥ ५९ ॥
स्वापनं नष्टनिद्राणां मूकानां वाग्विबोधनम् ।
बोधनं चातिनिद्राणां विबद्धानां विबन्धनुत् ॥ ६० ॥
वधबन्धपरिक्लेशदुःखानां चावमोहनम् ।
मद्योत्थानाञ्च रोगाणां मद्यमेव प्रबाधकम् ॥ ६१ ॥
रतिविषयसंयोगप्रीतिसंयोगवर्द्धनम् ।
अतिप्रवयसां मद्यमुत्सवामोदकारकम् ॥ ६२ ॥
पञ्चस्वर्थेषु कान्तेषु या रतिः प्रथमे मदे ।
यूनां वा स्थविराणां वा तस्य नास्त्युपमा भुवि ॥ ६३ ॥
बहुदुःखकृतस्यास्य शोकेनोपहतस्य च ।
विश्रामो जीवलोकस्य मद्यं युक्त्या निषेवितम् ॥ ६४ ॥

मोह, भीति, शोक, राग, मृत्यू, उन्माद, मद, मूर्च्छा, अपस्मार, अपतानक, हे सर्व विकार मद्यांत वास करीत आहेत. फार कशाला; ज्या ठिकाणीं एका स्मृतीचा भ्रंश झाला कीं त्याठिकाणीं जगांतील सर्व अनिष्टें दत्त ह्मणून उभीं असतात व स्मृतिभ्रंश हा तर मद्याचा प्रधान धर्म आहे. ह्मणून मद्याचा दोष जाणणारे लोक आग्रहपूर्वक त्याची निंदा करितात. खरोखर आहे. वर सांगितलेले दोष मद्यांत निःसंशय आहेत. परंतु ते अहितकर, अतिशय व सांगितलेल्या विधीस सोडून तें प्यालें असतां होतात. वास्तविक स्वभावतः पाहिलें तर मद्य अन्नाप्रमाणें आहें.× तें विधिपूर्वक

× हा दृष्टान्त एकदेशीय आहे व यापासून इतकेंच समजावयाचें कीं विधिपूर्वक मद्य प्याल्यानें त्यापासून नुकसान न होतां कांहीं गुण होतात. इतर अंशांत अन्नाशीं मद्याचें मुळींच साम्य नाहीं. अन्न प्राणरक्षणाकरितां जरूरी आहे. मद्याची तशा प्रकारची कांहीं गरज नसते. दुसरें अन्नसेवनासंबंधीं विधि पाळतां येतो. परंतु मद्याच्या बाबतींत तसा नियम पाळणें फार दुर्घट असतें. मद्य पिणारे लोक प्रथम औषधांकरितां ह्मणून थेंबांपासून सुरवात करीत करीत शेवटीं बाटल्याच्या बाटल्या रिकाम्या करून सोळा संस्कार करून घेतात हा अनुभव सर्वांस आहे. अन्ना-

प्यालें असतां अमृताप्रमाणें गुण करितें व मनसोक्त रीतीनें प्याल्यानें रोग उत्पन्न करितें. विधिवत् सेवन केलेलें अन्न मनुष्यांचे प्राण आहे. परंतु तें भलत्याच रीतीनें सेवन केलें असतां प्राणांचा नाश करितें. किंवा विषाचें उदाहरण घ्या. नुस्तें एक पावशेर विष घेऊन जर तसेंच खाल्लें तर मनुष्य मरेल. परंतु तेंच शुद्ध करून योग्य प्रमाणांत सांगितलेल्या पद्धतीनें घेतलें असतां रसायन होतें. याचप्रमाणें मद्याविषयीं समजावें.

मद्य युक्तिपूर्वक प्यालें असतां तत्काल हर्ष होतो, उत्साह येतो, गुंगी चढते, पुष्टि येते, आरोग्य प्राप्त होतें, अंगीं पुरुषार्थ येतो व त्या अम्मलापासून सुख वाटतें; तसेंच त्यापासून रुचि येते, भूक लागते, हृदयास हित होतें, आवाज व कांति खुलते, प्रसन्नता व तृप्ति होते, शक्ति येते, भीति शोक व थकवा नाहींशीं होतात. ज्यांस रात्रींची झोंप येत नसेल त्यांस ती यापासून येते, मुक्यांची वाचा खुलते, अति झोंपाळू मनुष्य लवकर जागा होतो, मलमूत्रादिकांचा अवरोध दूर होतो, आणि मार, बन्धन, कष्ट, दुःख यांचें विस्मरण होतें. मद्यपानापासून उत्पन्न होणाऱ्या रोगाचें औषध मद्यच आहे. मद्य अत्यंत वृद्ध मनुष्यांचाही रतिविषयक संयोग व प्रीतिसंयोग यांस वाढविणारें आणि उत्साह व आनंद देणारें आहे. पञ्चेन्द्रियांच्या शब्दस्पर्शादि इष्ट विषयांचे ठायीं मदाच्या पहिल्या अवस्थेंत म्हातारा असो कीं तरणा असो त्यास जी प्रीति-व मजा उत्पन्न होते तीस या पृथ्वीवर उपमा नाहीं. अत्यंत दुःखानें गांजलेल्या व शोकानें व्याकुळ झालेल्या प्राण्यांस या लोकीं मद्य हें एक विश्राम देणारें आहे. मात्र तें विधियुक्त प्यालें पाहिजे.

**अन्नपानवयोव्याधिबलकालत्रिकाणि षट् ।**
**त्रीन्दोषांस्त्रिविधं सत्वं ज्ञात्वा मद्यं पिबेत्सदा ॥ ६९॥**

---

पेक्षां विषाचें उदाहरण ठीक आहे विष असें कांहीं विशेष प्रसंगीं, प्रकृतरोगनिवृत्त होण्यापुरतेंच औषध रूपानें सेवन केलें असतां त्यापासून गुण होतो तसेंच मद्य कांहीं विशिष्ट प्रसंगीं विशिष्ट गुणाकरितां अल्पप्रमाणें सेवन केल्यानें त्यापासून लाभ होतो. विषाचें कोणी नेहमीं आवडीनें सेवन करीत नाहीं तद्वत्‌च याच्याही आवडीनें बाटल्या खालीं होऊं नयेत.

तेषां त्रिकाणामष्टानां योजना युक्तिरुच्यते ।
यथा युक्त्या पिबेन्मद्यं मद्यदोषैर्न युज्यते ॥ ६६ ॥
मद्यस्य च गुणान्सर्वान्यथोक्तान्स समश्नुते ।
धर्मार्थयोरपीडार्थैर्नरः सत्वगुणोच्छ्रितः ॥ ६७ ॥
सत्वानि तु प्रबुध्यन्ते प्रयाशः प्रथमे मदे ।
द्वितीयेऽव्यक्ततां यान्ति मदे चोत्तमम ध्ययोः ॥ ६८ ॥
सत्वसंबोधकं हर्षं मोहप्रकृतिदर्शकम् ।
हुताशः सर्वसत्वानां मद्यं तूभयकारकम् ॥ ६९ ॥
प्रधानावरमध्यानां रुक्माणां व्यक्तिसाधकः ।
यथाग्निरेवं सत्त्वानां मद्यं प्रकृतिदर्शकम् ॥ ७० ॥
सुगन्धिमाल्यगन्धैर्वा सुप्रगीतमनाकुलम् ।
मिष्टान्नपानविशदं सदा मधुरसङ्कथम् ॥ ७१ ॥
सुखप्रपानं सुपदं हर्षप्रीतिविवर्धनम ।
स्वन्तं सात्विकमापानं न चोत्तममदप्रदम् ॥ ७२ ॥
त्रैगुण्यं सहसा यान्ति मद्यदोषैर्न सात्विकाः।
मद्यं हि बलवत्सत्वं गृण्हाति सहसा न तु ॥ ७३ ॥
सौम्यासौम्यकथाप्रायं विशदाविशदं क्षणात् ।
चित्रं राजसमापानं प्रायेणास्वन्तमाकुलम् ॥ ७४ ॥
हर्षप्रीतिकथोपेतमतुष्टं पानभोजने ।
सम्मोहक्रोधनिद्रान्तमापानं तामसं स्मृतम् ॥ ७५ ॥

मद्य पिणारानें नेहमीं आपलें खाणें, पिणें, वय, शरीरांत रोग असल्यास ते, शक्ति, वेळ, तीन दोष व तीन प्रकारचें ( सात्विक—राजस—तामस ) मन यांचा विचार करून मद्य प्यावें. वर सांगितलेल्या गोष्टींच्या त्रिविध अवस्थांच्या अनुकूल योजनेचें नांव युक्ति. त्या युक्तीनें मद्य प्यालें असतां त्यापासून होणारे पूर्वोक्त अवगुण होत नाहींत. उलट धर्म व अर्थ या दोन्हीं पुरुषार्थांच्या अविरोधानें सत्वगुणाचा उद्रेक होऊन वर सांगितलेले

मद्याचे एकंदर गुण प्राप्त होतात. बहुशः मद्याच्या पहिल्या अवस्थेंत मनास एक प्रकारची जागृति–उत्तेजन मिळतें. आणि दुसऱ्या व तिसऱ्या अवस्थेंत त्याची शुद्धि नाहींशी होते. मद्य हें चित्तोत्तेजक, हर्षोत्पादक, व पिणाराची प्रकृति दाखविणारें असें आहे. ज्याप्रमाणें अग्नि सोन्याची प्रत दाखवितो ह्मणजे जसें विस्तवांत सोनें तापविलें असतां तें उत्तम, मध्यम किंवा कनिष्ठ प्रतीचें आहे हें समजतें, त्याचप्रमाणें मनुष्याची प्रकृति सात्विक, राजस, तामस कशी आहे हें मद्य प्याल्यानें त्याच्या अमलांत तो ज्या तऱ्हेच्या चेष्टा करितो त्यांवरून समजतें. सुगंधिपुष्पांच्या माळा गळ्यांत घालून एकाग्र चित्तानें, गोड खाद्य–पेयपदार्थांबरोबर मधुर गोष्टी बोलून, उत्तम प्रकारचे संस्कार केलेलें, पिण्यास सुखदायक, ज्यापासून किंचित् सुखदायक मद येईल, हर्ष व प्रीति वाढेल, आणि तिसऱ्या स्थितींतील बडबड बेशुद्धि वगैरे लक्षणें होणार नाहींत असें मद्य पिणें हें सात्विक पान होय. सात्विक प्रकृतीच्या मनुष्याच्या स्थितींत मद्यपानापासून सहसा चलबिचल होत नाहीं. तसेंच ज्यांचें मन बळकट आहे त्यांवरही मद्याचा पगडा सहसा बसत नाहीं. ज्या मद्यपानापासून पिणारा कधीं शांततेनें बोलतो कधीं मोठ्या आवेशानें ओरडतो, कांहीं वेळ स्वच्छ शुद्धीवर असल्याप्रमाणें बोलतो, पुनः कांहीं वेळानें कांहीं तरी अबद्ध बोलूं लागतो; सारांश, अशा चित्रविचित्र चेष्टा करूं लागतो व बहुतकरून त्याचें चित्त व्यग्र असतें, तें राजस मद्यपान समजावें. ज्यापासून पिणारा प्रथम हर्ष व प्रीतियुक्त गोष्टी करितो, त्याची खाण्यापिण्यावर रुचि नसते आणि शेवटीं मुग्ध होतो, रागावतो व अखेरीस झोंपीं जातो तें तामस मद्यपान समजावें.

आपाने सात्विकान्बुद्ध्वा तथा राजसतामसान् ।
जह्यात्सहायान्यैः पीत्वा सहदोषानुपाश्नुते ॥ ७६ ॥
सुखशीलाः सुसम्भाषाः सुमुखाः सम्मताः सताम् ।
कलासु वाक्यविशदा विषयप्रवणाश्च ये ॥ ७७ ॥
परस्परविधेया ये येषामैक्यं सुहृत्तया ।
प्रहर्षप्रीतिमाधुर्यैरापानं वर्धयन्ति ये ॥

उत्सवादुत्सवतरं येषामन्योन्यदर्शनम् ।
ते सहायाः सुखाः पानै तैः पिबन्सह मोदते ॥
रूपगन्धरसस्पर्शैः शब्दैश्चापि मनोरमैः ।
पिबन्ति सुसहाया ये ते वै सुकृतिभिः समाः ॥ ८० ॥
पञ्चभिर्विषयैरिष्टैरुपेतैर्मनसः प्रियैः ।
देशे काले पिबेन्मद्यं प्रहृष्टेनान्तरात्मना ॥ ८१ ॥

मद्य प्यावयास बसतांना जी सोबती मंडळी घ्यावयाची त्यांच्या प्रकृतीची परीक्षा करून ज्यांच्या संगतीनें मद्यपानाचे दोष आपल्यांत येणार नाहींत अशाच मनुष्यांस बैठकींत घ्यावें. एखादा तामसी अतिशय पिणारा मनुष्य बैठकींत असला ह्मणजे तो स्वतः हवी तितकी दारू पितोच, परंतु बरोबर इतरांसही आग्रह करून त्यांच्या मर्जीविरुद्ध अधिक पाजतो आणि आपल्या बरोबर त्यांचीही दुर्गति करण्यास कारणीभूत होतो. ह्मणून अशा लोकांस बैठकींत घेऊं नये. सुशील, मधुर भाषण करणारे, पंडित, सज्जनमान्या, गायन—वादनादि निरानिराळ्या कलांत निपुण, स्वच्छ वाणी बोलणारे, विषयप्रवण, परस्पर मर्जीनुरूप वागवणारे, ज्यांची आपसांत एकी व मैत्री आहे असे, ज्यांच्यापासून मंडळींत हर्ष, प्रीति व माधुर्य हीं वाढतील. आणि ज्यांचें परस्परांवर इतकें प्रेम आहे कीं नुस्ती भेट झाली असतां प्रत्येकास एखाद्या मोठ्या उत्सवापेक्षां देखील अधिक आनंद होतो, असे जे लोक असतील त्यांस बैठकींत मद्य पिण्यास घ्यावें. अशांच्या संगतीनें पिणें सुखदायक होतें. उत्तम लावण्ययुक्त स्त्रीपुरुषमंडळी बसली आहे. फुलांचा दमदमाट व अत्तरांचा घमघमाट चालला आहे, खाण्यापिण्यास उत्तमोत्तम स्वादिष्ट पदार्थ हजर आहेत, शीतल--मंद—सुगंध वारा येत आहे, नाच—गाणें वगैऱ्यांचे सुस्वर ध्वनि ऐकूं येत आहेत, आणि वर सांगितलेल्या गुणांची मंडळी आहे अशा तऱ्हेच्या एकंदर मनोहर सामग्रीसहीत जे मद्यपान करितात ते पुण्यवानांसारखेच समजावे. योग्य स्थानीं, योग्य काळीं, मनास आवडत्या अशा पूर्वोक्त शब्दस्पर्शादि विषयांनीं युक्त होत्साता, हर्षयुक्त अंतःकरणानें मद्य प्यावें.

फिल्-फ्रम्हा-पी-र्खान इं Long Pepper लॉंग पेप्पर. ला. Piper Longum पायपर लॉंगम्.

**वर्णन**–ही एक बहुवर्षायु वेल आहे. हिची उत्पत्ति बंगाल, नेपाळ, आसाम, मलबार, पश्चिमोत्तर प्रांतांतील कांहीं भाग या ठिकाणीं विशेष होते. बंगाल व मलबार प्रांतांत तर याची अतिशय लागवड होते. पिंपळीच्या लागवडीस सुपीक व सुकी जमीन लागते. या वेलींचा विस्तार उपशाखांच्या द्वारें करितात. म्हणजे वेलीच्या खालच्या बाजूस ( मुळाजवळ ) ज्या लहान लहान डाहळ्या फुटतात त्या काढून दुसऱ्या जागीं लावितात. म्हणजे त्यांपासून पुढें स्वतंत्र वेली बनतात. पावसाळा सुरू झाला म्हणजे ही रोपणी करितात. प्रत्येक वेलीच्या दरम्यान पांच फुटांचें अंतर सोडतात व या मधल्या जागेंत मुळे वांगीं, जव वगैरे पेरतात. एक बिघा जमिनींत सरासरी १९६ वेली रहातात. एक बिघा जमिनींत पिंपळीची लागवड केली असतां, त्यापासून पहिल्या वर्षीं दोन मण, दुसऱ्या वर्षीं चार मण व तिसऱ्या वर्षीं सहा मण पिंपळी उत्पन्न होते. पुढें दर वर्षीं त्यांची उत्पादक शक्ति कमी होत जाते. म्हणून त्यांचीं मुळें खणून काढून सुकवून ठेवितात. यांस ' पिंपळीमूळ ' म्हणतात. जुनीं मुळें खणून काढल्यावर त्यांच्या जागीं नवीं मुळें किंवा कोंवळ्या डाहळ्या लावतात. नवीन मुळें लावतांना जमिनीस नांगरण्याची किंवा अन्य कोणताही संस्कार करण्याची आवश्यकता नसते. त्यांवर थोडेसें खत घातलें म्हणजे झालें. या वेलींस पाणी घालावें लागत नाहीं. मात्र उन्हाळ्याच्या आरंभीं ऊन्ह लागूं नये म्हणून याचीं मुळें गवतानें झांकून ठेवितात. यास आगस्ट, सेप्टेंबर महिन्यांत फुलें येतात; व फळें म्हणजे पिंपळ्या जानेवारींत पिकून तयार होतात. पिंपळीचीं पानें आकारानें नागवेलीच्या पानांसारखींच असतात. विशेष फरक इतकाच असतो, कीं पिंपळीच्या पानांस देंठांजवळ खांचा असतो, तो नागवेलाच्या पानांस नसतो. पसरणाऱ्या शाखांवरील पानें मोठीं व रुंदट असून त्यांवर सात सडसडीत शिरा असतात व त्यांचे देंठ लांबट

असतात; आणि फळें लागणाऱ्या लहान लहान शाखांवरील पानें लांबट असतात; त्यांवर पांच शिरा असतात व त्यांचे देंठ लांब नसून तीं वेलीस लागूनच येतात. पानें सर्व गुळगुळीत असतात. पिंपळींचें मूळ काष्ठमय असतें. वेलीस पुष्कळ फांटे फुटतात. वेल वाटोळी असून तिच्यावर जागोजागीं उभारलेल्या गांठी असतात. ओल्या पिंपळ्या हिरव्या असतात व सुकल्या म्हणजे काळ्या होतात. पिंपळीचीं फळें व मुळें यांचा औषधींत उपयोग होतो. त्रावणकोर प्रांतांत बाळंतिणीस वार पाडण्याकरितां पिंपळीमुळांचा काढा देतात. छोटा नागपूर प्रांतांत स्त्रियांचा आर्तवदोषसंयुक्त कफविकारांत पिंपळीमुळाचा काढा देतात. तसेंच तापांत तृषा शमन करण्याकरितां ओलें पिंपळमूळ वापरतात. सूज काढण्याकरितां त्याचा लेप लावतात. मोंघीरचे माजी सिव्हिल सर्जन डॉ. थार्नटन् यांनीं बाळंत स्त्रियांचा रक्तस्राव बंद करण्याकरितां व ताप काढण्याकरितां हें देऊन चांगला गुण आल्याबद्दल लिहिलें आहे. बाळंतिणीचा गर्भाशय पूर्वस्थितीवर आणण्याकरितां पिंपळी व पिंपळीमुळाचा उपयोग करण्याचा प्रघात आहे. तो डॉ. भट्टाचार्य यांनीं आपल्या अनुभवानें हितावह ठरविला आहे. छोटा नागपूर प्रांतांत तांदुळांपासून बीर नांवाची एक दारू बनवितात; तीस जोश देण्याकरितां पिंपळमुळाचा उपयोग करितात. पिंपळींत एक उडून जाणारें तेल, एक राळसदृश द्रव्य व पायपरिन नांवाचें एक सत्व सांपडतें.

**अष्टकट्वरतेल**—पिंपळी व सुंठ प्रत्येकीं १६ तोळे, शिरसेल तेल ४ शेर, दहीं ४ शेर आणि ताक ३२ शेर; या सर्व जिनसांनीं विधिपूर्वक तेल तयार करून चोळलें असतां, गृध्रसी ( Sciatica ) व मांड्या आंखडणें हे विकार नाहींसे होतात. पिंपळीचे विस्तृत गुणदोष व औषधिप्रयोग, वनौषधि गुणादर्श ४थ्या भागांत दिले आहेत ते पहावे.

## २०. कापूर.

**संस्कृत**- कर्पूर, घनसार, शीतकर, शशांक, शांभव, चन्द्र, शीतांशु, हिमवालुका,

शिला, हिमकर, गौर, तुषारमिहिका, शतिप्रभ, अभ्रस्तर, ताराभ्र, कुमुद, चन्द्रालोक, इन्दु, शुभ्रांशु, स्फटिक, वेधक, रेणुसार, सिताभ्र, स्फटिकोपम, भस्माह्व, हिमांशु, नक्षत्रेश, निशापति, भस्मवेध, विधु, तरुसार, हिमाह्व, मुक्ताफल, राजार्ह, हिमोपल, शशि, शीताह्व, शीतरश्मि, हिम, शीतरज, सिताभ, शीतल, तुहिन, चन्द्रसंज्ञक, भूतिक, चन्द्रभस्म, हिमाभ्र, चन्द्रनाम, जैवातृक, कुमुदबान्धव, औषधीश, सोमसंज्ञ, यामिनीपति, निशीथिनीनाथ शशधर. **गु. हिं.** कपूर. **बं.** कर्पूर. **क.** कप्पूर. **ते.** कर्पूरमु. **फा. अ.** काफर. **ब्रह्मी.** पारोपराकू. **इं.** Camphor क्यांफर. **ला.** Laurus Camphora लॉरस क्यांफोरा.

## भीमसेनी कापूर.

**सं.** पोतास, भीमसेन, पांशु, सितकर, शंकरावाससंज्ञ, पिज्ञ, हिमयुत, हिम, अब्दसार, वालुका, जूटिका, शीतल, तुषार, पत्रिकाख्य. **हिं.** बरासकपूर. **गु** भीमसेनी, बरास. **इं.** Borneo Camphor बोर्नियो क्यांफर. **ला.** Dryobalanops Camphora ड्रायोबेलानाप्स क्यांफोरा.

**चिनाईकापूर. सं.** चीनक, चीनकर्पूर, कृत्रिम, धवल, पटु, मेघसार, तुषार, द्वीपकर्पूरज. **ला.** Cinnamomum Camphora सिनामोमम् क्यांफोरा.

वर्णन—जपान, चीन, सुमात्रा, फोर्मोसा, बोर्नियो, मले या बेटांत कापराचीं झाडें पुष्कळ होतात. युरोपियन उद्भिज्जशास्त्रवेत्त्यांनीं या झाडाचें Lauracea ( अथवा दालचिनीच्या जातीचें ) वृक्षकुल ठरविलें आहे. कापराचीं झाडें ६० पासून ८० फूट पर्यंत उंच असतात. पानें कांहींशीं दीर्घवर्तुल ( अण्डाकृति ) असून टोंकाकडे निमुळतीं होत जातात. दिसण्यांत भाल्यासारखीं दिसतात. त्यांचे कांठ सबंध असतात. हातास गुळगुळीत लागतात व त्यांवर शिरा असतात. पानांची वरची बाजू हिरव्या रंगाची असून, त्यांत फिकट पिंवळ्या रंगाची किंचित् झांक मारते. खालची बाजू निळसर हिरव्या रंगाची असते. पानांचे देंठ लांब असतात. शाखांची साल वरून खरखरीत असून आंतल्या भागानें गुळगुळीत असते. कापराच्या झाडास लहान लहान फुलें येतात. पुष्पदंड लांब असतो. फळें वाटाण्यासारखीं येतात. झाडाच्या प्रत्येक भागास कापराचा वास येतो.

कापूर, हें सदरील झाडाच्या गर्भांतून निघणारें घन अथवा आपो-आप दाट होणारें नैसर्गिक ( मूळचें ) तेल आहे. राजनिघंटुकारांनीं तीन प्रकारचा कापूर वर्णिला आहे ( १ ) भीमसेनी कापूर ( २ ) पत्री-कापूर ( ३ ) चिनीकापूर. या तिन्ही जातींचा कापर हल्लींपर्यंत बरोबर प्रचारांत आहे. इब्ने खोर्दाद नामक एका प्रवाशानें इसवी सना-च्या नवव्या शतकाच्या शेवटीं लिहिलेल्या एका ग्रंथांत असा उल्लेख केला आहे कीं, त्या वेळीं मॅले बेटांतून चीन व हिंदुस्थान या देशांकडे कापूर जात असे. सदरहू ग्रंथांत त्यानें असेंही म्हटलें आहे कीं, त्या वेळीं फानसूर अथवा कानसूर नांवाच्या बेटांत कापूर फार उत्पन्न होत असे. यूल साहेबांच्या म्हणण्याप्रमाणें कानसूर बेटांस ' बेरांस ' असेंही नांव आहे. हें सुमात्रा बेटाच्या पश्चिम किनाऱ्यावर एक लहानसें शहर आहे. या बेटाच्या नांवावरूनच भीमसेनी कापरास ' बरांस कापूर' ह्मणू लागले असावे असें वाटतें. भीमसेनी कापराच्या झाडांचा शोध इंग्लिश लोकांत प्रथम कोलब्रूक साहेबानें लावला. हीं झाडें ८ वर्षें वाढल्यानंतर तीं पाडून त्यांचे तुकडे करितात. त्यांच्या सालीच्या खालीं व लांकडाच्या ( स्तंभाच्या ) भेगांत कापराचे लहान लहान कण सांपडतात. वैद्यकांत कापराचे ' पक्व ' व ' अपक्व' असे दोन भेद केलेले आहेत. त्यांपैकीं भीमसेनीकापूर अपक्व व बाकी दोन जातींचा पक्व समजावा. जो झाडांत आयता मिळतो तो अपक्व आणि जो बाष्पीभवन क्रियेनें चन्दनी अर्का-प्रमाणें बनविला जातो तो पक्व. पक्व कापरापेक्षां अपक्व कापरांत जास्त गुण आहेत. एका झाडांतून जास्तींत जास्ती ४४० तोळे भीमसेनी कापूर निघतो. हा जमा करण्यास खर्च फार लागतो. म्हणून हा फार महाग विकतो. अस्सल भीमसेनी कापराचा भाव जवळ जवळ ८० रुपये रत्तल असतो. जें झाड फार मोठें व जुनें असून मरण्याच्या बेतावर असतें, त्यांतून निघणारा कापूर सर्वोत्तम असतो. कापूर झाडांतून काढल्यानंतर तो पाण्यानें धुऊन साफ करितात. बोर्नियो बेटांत जो भीमसेनी कापूर

उत्पन्न होतो त्याचा बराच भाग, तेथील राजांच्या मरणक्रियेच्या वेळीं वापरला जातो. आणि बाकी राहिलेला चीन, जपान, सयाम वगैरे देशांत व्यापाराकरितां पाठविला जातो. इतर कापरापेक्षां भीमसेनी कापूर कठिण व वजनांतही कांहीं जड असतो; म्हणून पाण्यांत घातला असतां तळास जातो. हा हवेंत उघडा ठेवला असतां इतर कापराइतका जलद उडत नाहीं. हा विरघळण्यासही इतर कापरापेक्षां जास्त उष्णता लागते. याचा वास फार तीव्र असतो. दिसण्यांत याचे स्फटिकाप्रमाणें सफेत चमकदार, स्वच्छ व पातळ असे लहान लहान तुकडे असतात. भीमसेनी कापरावर सोराखाराचें ॲसिड ( Nitric acid ) घातल्यानें तो साध्या चिनाई कापरासारखा होतो. चिनीलोक शाईस झिलई आणण्याकरितां भीमसेनी कापराचा उपयोग करितात. वैद्यक ग्रंथांत कृत्रिम भीमसेनी कापूर करण्याची कृति याप्रमाणें लिहिली आहेः— साधा 'कापूर ८ तोळे, वेलची २ तोळे; चन्दन, समुद्रफेण, निवळीच्या बिया, रसांजन, भद्रमोथा या पांच जिनसा प्रत्येकीं एकेक तोळा घेवून दुधांत वाटून, त्यांचा गोळा करावा आणि तो एका भांड्यांत ठेवून त्याच्या तोंडावर त्याच्याच जोडीचें दुसरें भांडें उपडें ठेवून दोहोंचा सांधा कापडमातीनें बंद करून टाकावा. नंतर तें भांडें एका लहानशा चुलीवर ठेवून त्याच्या खालीं आंगठ्या एवढ्या जाड वातीचा तुपाचा दिवा, एक प्रहर पर्यंत पेटवून ठेवावा. वरील भांड्याच्या बुडावर ओलें फडकें ठेवून तें सुकूं नये म्हणून त्यावर थोडें थोडें पाणी सोडीत रहावें. याप्रमाणें केल्यानें दिव्याच्या उष्णतेनें वरच्या भांड्याच्या तळाशीं स्फटिकाप्रमाणें स्वच्छ, सफेद व चकाकणारे कापराचे बारीक बारीक कण जमून बसलेसे आढळतील. भांडें निवाल्यावर काढून घ्यावे. या कृत्रिम भीमसेनी कापराचे गुण व सुगंध, अस्सल भीमसेनी कापरासारखेच आहेत. भेद फक्त इतकाच असतो कीं, अस्सल भीमसेनी कापराचे पत्रीखडीसाकरेसारखे बारीक तुकडे असतात व कृत्रिम कापराचे लहान लहान कण असतात.

**२ रा-पत्री कापूर**-हा एक लहान क्षुपाच्या पानांतून निघतो. हें झाड चिनांत तेनासरिम प्रांत व कुमौन पर्वतावर सांपडतें. यास Blumea balsamifera हें नांव दिलें आहे. या झाडांतून ब्रह्मीलोक शिजवून कापूर काढितात. हा भीमसेनी कापरापेक्षांही कांहींसा जड असतो. परंतु हवेंत लौकर उडून जातो. यास दवण्यासारखा वास येतो. चिनांत यास 'नागई' कापूर म्हणतात.

**३ रा चिनई कापूर**-वरील दोन्ही जातींच्या कापरापेक्षां हा स्वस्त असतो. ६०-६९ रुपये हंड्रेडवेट ( ५६ शेर पक्के )च्या भावानें विकतो. या चिनई कापरास पक्क कापूर म्हणतात. Cinnamomum camphora नांवाच्या झाडाच्या बुंधाचे तुकडे करून, जसें चंदना-पासून तेल काढितात त्याप्रमाणें त्यांतून जपान देशांतील लोक कापूर काढितात.

कापूर तयार करण्याच्या भट्ट्या, चिकण मातीच्या ( शाडूच्या ) असतात. फोर्मोसा बेटांत 'टामसुइ' नदीच्या उगमापाशीं पर्वताच्या तळाशीं तिकडील गरीबगुरीब लोक त्या उभारून, आपला निर्वाह, कापूर तयार करून चालवितात. कापूर जसजसा तयार होत जाईल तसतसा तो चिनांतील व्यापारी विकत घेऊन युरोपियन व्यापाऱ्यांस विकतात. कांहीं वर्षांपूर्वीं एकदां कलकत्त्यांत बाहेरून आलेलीं मोठ-मोठी इमारती लांकडें चिरलीं असतां, कित्येकांतून कापूर निघाला होता. कापरांत उडून जाण्याचा धर्म असल्यामुळें त्यावरून एखादा मनुष्य पळून गेला अथवा ऐन प्रसंगावर आपल्या आप्त-इष्टांस टाकून गेला असतां त्यास पार्शी भाषेंत 'कापूर' होणें म्हणतात.

औषधाशिवाय बनावट चामडें, दारूगोळा, फोटोग्राफीसंबंधी कित्येक मिश्रणें तयार करण्यांत देखील कापराची गरज लागते. परंतु याची उत्पत्ति उपयोगाच्या मानानें फार कमी होत असल्यामुळें, हा दिवसेंदिवस जास्तच महाग होत चालला आहे. सर्वांत जास्त कापूर

फोर्मोसा बेटांत उत्पन्न होतो, आणि त्याचा एकंदर व्यापार तेथील जपानी मालक व एक इंग्रज व्यापारी कंपनीच्या सर्वस्वी हातांत असल्यामुळें, ते वाटेल तसा भाव वाढवितात. ही अडचण दूर करण्याकरितां अमेरिकेतील कित्येक नामांकित रसायनशास्त्रवेत्त्यांनीं गेल्या कित्येक वर्षांच्या सतत परिश्रमानें हल्लीं कित्येक पदार्थांच्या रासायनिक संयोगापासून कृत्रिम कापूर करण्याची युक्ति शोधून काढली आहे या कृत्रिम कापराचे गुण व उपयोग खऱ्या कापरासारखेच आहेत असें सदरहु रसायनशास्त्रज्ञांचें म्हणणें आहे. शिवाय हा कापूर फार थोड्या खर्चांत बनतो असेंही त्यांचें म्हणणें आहे. या कापराच्या उद्योगाची वृद्धि करण्याकरितां अमेरिकेंत एक कंपनी स्थापन झाली असून, तिनें न्युयॉर्कपासून २१ मैलाच्या अंतरावरील पोर्टचेस्टर नामक शहरांत एक मोठा थोरला कारखानाही सुरू केला आहे. हिंदुस्थानांत लाखों रुपयांचा कापूर प्रतिवर्षीं देशान्तरांतून येतो. हिंदुस्थानांत अशा प्रकारचा कारखाना कोणी काढल्यास देशाचें मोठें हित होणार आहे. आमच्या इकडील रसायनशास्त्रवेत्त्यानीं इकडे लक्ष्य द्यावें अशी आमची सूचना आहे.

कापूर—कडू, तिखट, किंचित् थंड, कंठदोषनाशक, कफवातहारक व कृमिनाशक आहे. नेत्रविकारांवर लेप करण्याकरितां, मूत्राघातांत शिस्नांत धरण्याकरितां, तसेंच ज्वरातिसारांत हिंगूळ, अफू इत्यादि पित्तविसर्जक व दाहशामक पदार्थांबरोबर कापराचा योग लिहिला आहे. राजनिघंटुकारांनीं वातरोग, दांत हालणें, दांतांची अशक्तता इत्यादि रोगांवर कर्पूरतैलाचा उपयोग सांगितला आहे. हें कर्पूरतैल, भीमसेनी कापराच्या झाडास चिरण्या पाडल्या असतां, त्यांतून जो कापराचा पातळ रस निघतो तें किंवा निराळ्या पाठाप्रमाणें केलेंही उपयोगीं आहे. हृत्कम्प, अपस्मार, कलायखंजवायु रेतनाश अथवा झोंपेंत एकाएकीं वीर्यपात होणें या विकारांत कापूर चांगला गुण करितो. परंतु तो कमी प्रमाणांत दिला पाहिजे. हें कमी प्रमाण

म्हणजे $\frac{1}{2}$ गुंजेपासून १ गुंजेपर्यंत आहे. मध्यम प्रमाण १ पासून ९ गुंजांपर्यंत दिल्यानें आल्हाद व शांतता उत्पन्न होते. दमा, जुनाट संधिवात व योनिशूलांत २–३ गुंजा प्रमाण द्यावें. जास्त प्रमाणानें दिल्यास हत्कम्प होऊन शरीरांत क्लम (थकावट) उत्पन्न होतो. कापूर पोटांत देणें झाल्यास $\frac{1}{3}$ वजनाचा साबण कापराबरोबर खलून, त्याच्या लागतील तितक्या गोळ्या बांधून त्या दिवसांतून दोन तीन वेळां ध्याव्या असें कांहींचें मत आहे. हकीमलोक कापूर थंड आणि मस्तक व हृदय यांस उत्तेजक मानतात. आर्यवैद्यकांत भीमसेनी कापूर कामोत्तेजक व वीर्यस्तंभक मानला आहे. परंतु युनानी हकीमांचें मत याच्या उलट आहे. तसेंच वैद्यकांत भीमसेनी कापूर डोळ्यांस फार हितकर वर्णन केला आहे. पण हकीम लोक तो डोळ्यांत घालण्याचा निषेध करितात. वैद्यकग्रंथांत अनेक वीर्यस्तंभक व डोळ्यांच्या औषधांत भीमसेनी कापराचा उपयोग सांगितला आहे व त्याचा गुणही अनुभवास येतो. वर सांगितलेले कापराचे प्रायः गुण डॉटरासही सम्मत आहेत. कापराची फार जास्त मात्रा घेतल्यानें, कित्येक प्रसंगीं मृत्यु झाल्याचे दाखले घडल्याचें एका अमेरिकन डॉक्टरानें वर्णन केलें आहे.

इ.स. १८९३ सालीं ७९३० हंड्रेडवेट कापूर मुंबईहून विलायतेकडे रवाना झाला. १८९४ सालीं १३९७१ हंड्रेडवेट गेला. १८९४ सालीं चीन व जपानच्या दरम्यान लढाई सुरू असल्यामुळें, कापराच्या व्यापारास बराच धक्का पोंचला; म्हणून हिंदुस्थान सरकारानें कापराच्या झाडांचे रोपे आणवून ते सिंहलद्वीपांत लावले आहेत असें कळतें.

**ज्वर–अतीसारावर कर्पूररस**–कापूर, शुद्ध हिंगूळ, अफू, नागरमोथा, इंद्रजव व जायफळ या सर्व जिनसा समभाग घेऊन, त्यांच्या आल्याच्या रसांत गुंज प्रमाण गोळ्या करून त्या द्याव्या. यांच्या योगानें ज्वरयुक्त अतीसार, नुस्ता अतीसार, सहा प्रकारची संग्रहणी, रक्तातिसार हे विकार शमन पावतात.

श्रीशंकर.

# औषधावांचून कोणताही रोग बरा करण्याची विद्या.

अर्वाचीनं पदमधिवसन् यो गुणग्रामयुक्तः ।
वामांगार्द्धे प्रविशति सदापर्णया बद्धकेलिः ॥
यश्चावेद्यो विगतकरणः केवलं ज्ञानमूर्तिः ।
सोयं शांतं पदमधिगतः पातु वः शूलपाणिः ॥ १ ॥

---

धर्मार्थकाममोक्षाणामारोग्यं मूलमुत्तमम् ॥ १५ ॥
रोगास्तस्यापहर्तारः श्रेयसो जीवितस्य च ॥.........॥
हिताहितं सुखं दुःखमायुस्तस्य हिताहितम् ॥
मानं च तच्च यत्रोक्तमायुर्वेदः स उच्यते ॥ ४१ ॥
शरीरेंद्रियसत्वात्मसंयोगो धारि जीवितम् ॥
नित्यगश्चानुबंधश्च पर्य्यायैरायुरुच्यते ॥ ४२ ॥.........॥
सर्वदा सर्वभावानां सामान्यं वृद्धिकारणम् ॥
र्‍हासहेतुर्विशेषश्च प्रवृत्तिरुभयस्य तु ॥ ४४ ॥
सामान्यमेकत्वकरं विशेषस्तु पृथक्त्वकृत् ॥
तुल्यार्थता हि सामान्यं विशेषस्तु विपर्य्ययः ॥ ४५ ॥
सत्वमात्मा शरीरं च त्रयमेतत् त्रिदंडवत् ॥
लोकास्तिष्ठन्ति संयोगात्तत्र सर्वं प्रतिष्ठितम् ॥ ४६॥......॥
कालबुद्धीन्द्रियार्थानां योगो मिथ्या न चाति च ॥
द्वयाश्रयाणां व्याधीनां त्रिविधो हेतुसंग्रहः ॥ ५४ ॥......॥
वायुः पित्तं कफश्चोक्तः शारीरो दोषसंग्रहः ॥
मानसः पुनरुद्दिष्टं रजश्च तम एव च ॥ ५७ ॥
प्रशाम्यत्यौषधैः पूर्वो दैव-युक्ति-व्यपाश्रयैः ॥
मानसो ज्ञान-विज्ञान-धैर्य-स्मृति-समाधिभिः ॥ ५८ ॥
रूक्षः शीतो लघुः सूक्ष्मश्चलोऽथ विशदः खरः ॥
विपरीतगुणद्रव्यैर्मारुतः सम्प्रशाम्यति ॥ ५९ ॥

सस्नेहमुष्णं तीक्ष्णं च द्रवमम्लं सरं कटु ॥
विपरीतगुणैः पित्तं द्रव्यैराशु प्रशाम्यति ॥ ६० ॥
गुरु-शीत-मृदु-स्निग्ध-मधुर-स्थिर-पिच्छिलाः ॥
श्लेष्मणः प्रशमं यान्ति विपरीतगुणैर्गुणाः ॥ ६१ ॥
विपरीतगुणैर्देश-मात्रा-कालोपपादितैः ॥
भेषजैर्विनिवर्तन्ते विकाराः साध्यसम्मताः ॥ ६२ ॥
साधनं न त्वसाध्यानां व्याधीनामुपदिश्यते ॥—चरके प्रथमेऽध्याये ।

त्रयो रोगा इति–निजागन्तुमानसाः । तत्र निजः शारीरदोषसमुत्थः, आगन्तु—भूतविषवाय्वग्निसंप्रहारादिसमुत्थः, मानसः पुनरिष्टलाभालाभाच्चानिष्टस्योपजायते ॥ ४५ ॥ ................ ...............॥

त्रयो रोगमार्गा इति—शाखा, मर्मास्थिसन्धयः कोष्ठश्च ॥ ४९ ॥ तत्र शाखा रक्तादयो धातवस्त्वक् च, स बाह्यो रोगमार्गः । मर्माणि पुनर्बस्तिहृदयमूर्द्धादीनि, अस्थिसन्धयोऽस्थिसंयोगाः, तत्रोपनिबद्धाश्च स्नायुकण्डराः, स मध्यमो रोगमार्गः । कोष्ठः पुनरुच्यते महास्रोतः शरीरमध्यं महानिम्नमामपक्वाशयश्चेति पर्यायशब्दैस्तंत्रे, स रोगमार्ग आभ्यन्तरः ॥ ५० ॥

तत्र गण्डपीडकालज्यपचीचर्मकीलाधिमांसमशककुष्ठव्यंगादयो विकारा बहिर्मार्गजाश्च । विसर्पश्वयथुगुल्मार्शोविद्रध्यादयः शाखानुसारिणो भवन्ति रोगाः ॥ ५१ ॥

पक्षवधग्रहापतानकार्दितशोषराजयक्ष्मास्थिसन्धिशूलगुदभ्रंशादयः शिरोहृद्बस्तिरोगादयश्च मध्यममार्गानुसारिणो भवन्ति रोगाः ॥ ५२ ॥

ज्वरातीसारछर्द्यलसकविसूचिकाकासश्वासहिक्कानाहोदरप्लीहादयोऽन्तर्मार्गजाश्च विसर्पश्वयथुगुल्मार्शोविद्रध्यादयः कोष्ठानुसारिणो भवन्ति रोगाः ॥ ५३ ॥—चरके एकादशेऽध्याये ॥

स्वधातुवैषम्यनिमित्तजा ये विकारसंघा बहवः शरीरे ।
न ते पृथक्पित्तकफानिलेभ्य आगन्तवस्त्वेव ततो विशिष्टाः ॥ १५ ॥
आगन्तुरन्वेति निजं विकारं निजस्तथागन्तुमपि प्रवृद्धः ।
तत्रानुबन्धं प्रकृतिं च सम्यग्ज्ञात्वा ततः कर्म समारभेत ॥ १६ ॥

—चरके १९ तमेऽध्याये ।

आगन्तुर्हि व्यथापूर्वसमुत्पन्नो जघन्यं वातपित्तश्लेष्मणां वैषम्यमापादयति । निजस्तु वातपित्तश्लेष्माणः पूर्वं वैषम्यमापद्यन्ते जघन्यां व्यथामभिनिर्वर्तयन्ति ॥ ॥ ७ ॥—चरके २० तमेऽध्याये ।

चतुर्णां भिषगादीनां शस्तानां धातुवैकृते ॥
प्रवृत्तिर्धातुसाम्यार्था चिकित्सेत्यभिधीयते ॥ ३ ॥
भिषक् द्रव्याण्यु—पस्थाता रोगी पादचतुष्टयम् ॥
गुणवत्कारणं ज्ञेयं विकारव्युपशांतये ॥ २ ॥
हेतौ लिंगे प्रशमने रोगाणामपुनर्भवे ॥
ज्ञानं चतुर्विधं यस्य स राजार्हो भिषक्तमः ॥ १७ ॥—च० नवमे ।
रोगमादौ परीक्षेत ततोनन्तरमौषधम् ॥
ततः कर्म भिषक्पश्चाज्ज्ञानपूर्वं समाचरेत् ॥ २३ ॥

तं (वातरोगं) मधुराम्ललवणस्निग्धोष्णैरुपक्रमेत स्नेह-स्वेदा-स्थापना-नुवासनं-नस्तःकर्म-भोजना-भ्यंगो-त्सादन-परिषेकादिभिर्वातहरैर्मात्रां कालं च प्रमाणीकृत्यास्थापनानुवासनन्तु खलु सर्वथोपक्रमेभ्यो वाते प्रधानतमं मन्यन्ते भिषजः । तद्यादित एव पक्वाशयमनुप्रविश्य केवलं वैकारिकं वातमूलं छिनत्ति । तत्रावजिते वातेपि शरीरान्तर्गता वातविकाराः प्रशान्तिमापद्यन्ते, यथा वनस्पतेर्मूले छिन्ने स्कन्धशाखावरोहकुसुमफलपलाशादीनां नियतो विनाशस्तद्वत् ॥ १४ ॥........॥
तं ( पित्तरोगं ) मधुरतिक्तकषायशीतैरुपक्रमैरुपक्रमेत स्नेह-विरेक-प्रदेह-परिषेका-भ्यंगादिभिः मात्रां कालं च प्रमाणीकृत्य विरेचनन्तु सर्वोपक्रमेभ्यः पित्ते प्रधानतमं मन्यन्ते भिषजः । तद्ध्यादित एवामाशयं प्रविश्य केवलं वैकारिकं पित्तमूलं चापकर्षति । तत्रावजिते पित्तेपि शरीरान्तर्गताः पित्तविकाराः प्रशान्तिमापद्यन्ते यथाग्नौ व्यपोढे केवलमग्निगृहं च शीतीभवति तद्वत् ॥ १८ ॥......॥
तं (कफरोगं) कटुकतिक्तकषायतीक्ष्णोष्णरूक्षैरुपक्रमैरुपक्रमेत स्वेद-वमन-शिरोविरेचन-व्यायामादिभिः श्लेष्महरैर्मात्राकालं प्रमाणीकृत्य वमनन्तु सर्वोपक्रमेभ्यः श्लेष्मणि प्रधानतमं मन्यन्ते भिषजः । तद्ध्यादित एव माशयमनुप्रविश्य केवलं वैकारिकं श्लेष्ममूलमपकर्षति । तत्रावजिते श्लेष्मण्यपि शरीरान्तर्गताः श्लेष्मविकाराः प्रशान्तिमापद्यन्ते । यथा भिन्ने केदारसेतौ शालियवषष्टिकादीन्यनभिष्यन्द्यमानान्यम्भसा प्रशोषमापद्यन्ते तद्वदिति ॥ २२ ॥—चरके २० तमेध्याये ।

लंघनं बृंहणं काले रूक्षणं स्नेहनं तथा ॥
स्वेदनं स्तंभनं चैव जानीते यः स वै भिषक् ॥ ३ ॥
यत्किंचिल्लाघवकरं देहे तल्लंघनं स्मृतम् ॥
बृहत्वं यच्छरीरस्य जनयेत्तच्च बृंहणम् ॥ ८ ॥

रौक्ष्यं खरत्वं वैशद्यं यत्कुर्यात्तद्धि **रूक्षणम्** ॥
**स्नेहनं** स्नेहविष्यन्दमार्दवक्लेदकारकम् ॥ ९ ॥
स्तम्भ गौरव-शीतघ्नं **स्वेदनं** स्वेदकारकम् ॥
**स्तम्भनं** स्तम्भयति यद्गतिमन्तं चलं ध्रुवम् ॥ १० ॥
लघूष्णतीक्ष्णविशदं रूक्षं सूक्ष्मं खरं सरम् ॥
कठिनं चैव यद्द्रव्यं प्रायस्तल्लं**घनं** स्मृतम् ॥ ११ ॥
गुरुशीतमृदुस्निग्धं बहलं स्थूलपिच्छिलम् ॥
प्रायो मन्दं स्थिरं श्लक्ष्णं द्रव्यं **बृंहणमुच्यते** ॥ १२ ॥
रूक्षं लघु खरं तीक्ष्णमुष्णं स्थिरमपिच्छलम् ॥
प्रायशः कठिनं चैव यद्द्रव्यं तद्धि **रूक्षणम्** ॥
द्रवं सूक्ष्मं सरं स्निग्धं पिच्छिलं गुरु शीतलम् ॥
मन्दं मृदु च प्रायो यद्द्रव्यं त**त्स्नेहनं** मतम् ॥ १४ ॥
उष्णं तीक्ष्णं सरं स्निग्धं रूक्षं सूक्ष्मं द्रवं स्थिरम् ॥
द्रव्यं गुरु च यत्प्रायस्तद्धि **स्वेदनमुच्यते** ॥ १५ ॥
शीतं मन्दं मृदु श्लक्ष्णं रूक्षं सूक्ष्मं द्रवं स्थिरम् ॥
यद्द्रव्यं लघुचोद्दिष्टं प्रायस्तत्स्तम्भनं स्मृतम् ॥ १६ ॥
**चतुष्प्रकाराः** संशुद्धिः **पिपासा मारुतातपौ** ॥
**पाचनान्युपवास**श्च **व्यायाम**श्चेति **लंघनम्** ॥ १७ ॥
प्रभूतश्लेष्मपित्तास्रमलाः संसृष्टमारुताः ॥
बृहच्छरीरो **बलिनो** लंघनीया **विशुद्धिभिः** ॥ १८ ॥
येषां **मध्यबला** रोगाः **कफपित्त**समुत्थिताः ॥
वम्यतीसारहृद्रोगविसूच्यलसकज्वराः ॥ १९ ॥
विबन्धगौरवोद्गारहृल्लासोरोचकादयः ॥
**पाचनै**स्तान्भिषक्प्रायं **प्रायेणा**दावुपाचरेत् ॥ २० ॥
एता एव यथोद्दिष्टा येषा**मल्पबला** गदाः ॥
पिपासानिग्रहैस्तेषा**मुपवासै**श्च तां जयेत् ॥ २१ ॥
रोगाञ्जयेन्**मध्यबलान्व्यायामातपमारुतैः** ॥
**बलिना किं पुन**र्येषां रोगाणामवरं बलम् ॥ २२ ॥......॥
**स्नानमुत्सादनं** स्वप्नो मधुराः स्नेहबस्तयः ॥
शर्करा क्षीरसर्पींषि सर्वेषां विद्धि बृंहणम् ॥ ३७ ॥

---

**वमन, विरेचनं, नस्यं, बस्तिश्च.**

दोषाणां बहुसंसर्गात्संकीर्यन्ते ह्युपक्रमाः ॥
षट्त्वं तु नातिवर्तन्ते त्रित्वं वातादयो यथा ॥ ४२ ॥

—**चरके** २२ तमेध्याये ।

अनेनोपदेशेन नानौषधिभूतं **जगति किंचिद्द्रव्यमुपलभ्यते** तां तां युक्तिमर्थं च तं तमभिप्रेत्य, न तु केवलं गुणप्रभावादेव कार्मुकाणि भवन्ति। द्रव्याणि हि द्रव्यप्रभावाद्गुणप्रभावाद्द्रव्यगुणप्रभावाच्च तस्मिंस्तस्मिन्काले तत्तदधिष्ठानमासाद्य तां तां च युक्तिमर्थं च तन्तमभिप्रेत्य यत्कुर्वन्ति तद्वीर्यं यत्र कुर्वन्ति तदधिकरणं यदा कुर्वन्ति स कालो यथा कुर्वन्ति **स उपायो यत्सन्धयति तत्फलम्** ॥ १० ॥

**चरके** २६ तमेध्याये ।

**शरीरदोषप्रकोपे** शरीरमेवाश्रित्य प्रायशः त्रिविधमौषधमिच्छन्ति–अन्तःपरिमार्जनं, बहिःपरिमार्जनं शस्त्रप्रणिधानं चेति । तत्रान्तः**परिमार्जनं**–यदन्तःशरीरमनुप्रविश्यौषधमाहारजातव्याधीन् प्रमार्ष्टि । यत्पुनर्बहिः स्पर्शमाश्रि**त्याभ्यंग-स्वेद प्रदेह-परिषेको-न्मर्दनाद्यै**रामयान् प्रमार्ष्टि **तद्बहिःपरिमार्जनम्** । **शस्त्रप्रणिधानं** पुनश्छेदन-भेदन-व्यधन-दारण-लेखनो-त्पाटन-प्रच्छन-सीवनै-षण-क्षार-जलौकलसश्चेति ॥ ५१॥

**चरके** एकादशेध्याये ।

**स्नेहपूर्वं प्रयुक्तेन स्वेदना**वर्जितेनिले ॥
पुरीष-मूत्र-रेतांसि न सज्जति कथंचन ॥ २ ॥
शुष्काण्यपि हि काष्ठानि स्नेहस्वेदोपपादनैः ॥
नमयन्ति यथान्यायं **किं पुनर्जीवतो नरान्** ॥ ३ ॥
रोगर्तुव्याधितापेक्षी नात्युष्णोतिमृदुर्न च ॥
द्रव्यवान् कल्पितो देशे **स्वेदः कार्यकरो** मतः ॥ ४ ॥......॥
**वातश्लेष्मणि वाते** वा **कफे** वा **स्वेद** इष्यते ॥
स्निग्धरूक्षतया स्निग्धो रूक्षश्चाप्युपकल्पितः ॥ ६ ॥......॥
वृषणौ हृदयं दृष्टी स्वेदयन्मृदुनैव वा ॥
मध्यमं वंक्षणौ **शेषमंगावयवमिष्टतः** ॥ ८ ॥
सुशुद्धैर्नक्तकैः पिण्ड्या गोधूमानामथापि वा ॥
पद्मोत्पलपलाशैर्वा **स्वेद्य संवृत्य चाक्षुषी** ॥ ९ ॥
मुक्तावलीभिः शीताभिः शीतलैर्भाजनैरपि ॥
जलार्द्रैर्जलजैर्हस्तैः **स्विद्यतो हृदयं स्पृशेत्** ॥ १० ॥

शीतशूलव्युपरमे स्तंभगौरवनिग्रहे ॥
संजाते मार्दवे स्वेदे स्वेदनाद्विरतिर्मता ॥ ११ ॥......॥
व्यायाम उष्णसदनं गुरुप्रावरणं क्षुधा ॥
बहुपानं भयक्रोधावुपनाहा (–) हवातपाः ॥
स्वेदयन्ति दशैतानि नरमग्निगुणादृते ॥ ६९ ॥......॥
स्निग्ध स्वेदैरुपक्रम्यः स्विन्नः पथ्याशनो भवेत् ॥
तदहः खिन्नगात्रस्तु व्यायामं विरमेन्नरः । ६३ ॥

चरके १४ तमेध्याये ।

स्नेहमग्रे प्रयुंजीत ततः स्वेदमनन्तरम् ॥
स्नेहस्वेदोपपन्नस्य संशोधनमथेतरत् ॥८७॥ चरके १३ तमेध्याये ।
तच्च नित्यं प्रयुंजीत स्वास्थ्यं येनानुवर्तते ॥
अजातानां विकाराणामनुत्पत्तिकरं च यत् ॥ १० ॥
यथा हि कनकादीनां मणीनां विविधात्मनाम् ॥
धौतानां निर्मला शुद्धिस्तैलचैलकचादिभिः ॥
एवं नेत्रेषु मर्त्यानामंजनाश्चोतनादिभिः ॥ १६ ॥
दृष्टिर्निराकुला भाति निर्मले नभसीन्दुवत् ॥......॥
स्नात्वा भुक्त्वा समुल्लिख्य क्षुत्वा दंतान्निघृष्य च ॥
नावनांजननिद्रान्ते चात्मवान् धूमपो भवेत् ॥ ३१ ॥......॥
नस्यकर्म यथाकालं यो यथोक्तं निषेवते ॥ ५४ ॥
न तस्य चक्षुर्न घ्राणं न श्रोत्रमुपहन्यते ॥......॥
निष्कृष्य रुचिमाधत्ते सद्यो दंतविशोधनम् ॥......॥
नित्यं स्नेहार्द्रशिरसः शिरःशूलं न जायते ॥ ७८ ॥......॥
स्नेहाभ्यंगाद्यथा कुम्भश्चर्म स्नेहविमर्दनात् ॥ ८२ ॥
भवत्युपांगादक्षश्च दृढः क्लेशसहो यथा ॥
तथा शरीरमभ्यंगाद् दृढं सुत्वक् च जायते ॥ ८३ ॥
प्रशान्तमारुताबाधं क्लेशव्यायामसंसहम् ॥......॥
पवित्रं वृष्यमायुष्यं श्रमस्वेदमलापहम् ॥ ९१ ॥
शरीरबलसन्धानं स्नानमोजस्करं परम् ॥......॥
मेध्यं पवित्रमायुष्यमलक्ष्मीकलिनाशनम् ॥ ९५ ॥
पादयोर्मलमार्गाणां शौचाधानमभीक्ष्णशः ॥......॥
वृत्त्युपायान्निषेवेत ये स्युर्धर्माविरोधिनः ॥ १०१ ॥
शममध्ययनं चैव सुखमेवं समश्नुते ॥–चरके पंचमेध्याये ।

न वेगान्धारयेद्धीमान् जातान्मूत्रपुरीषयोः ॥
न रेतसो न वातस्य न छर्द्याः क्षवथोर्न च ॥ १ ॥
नोद्गारस्य न जृंभाया न वेगान् क्षुत्पिपासयोः ॥
न बाष्पस्य न निद्राया निश्वासस्य श्रमेण च ॥ २ ॥
इमांस्तु धारयेद्वेगान्हितार्थी प्रेत्य चेह च ॥
साहसानामशस्तानां मनोवाक्कायकर्मणाम् ।
पुण्यशब्दो विपापत्वान्मनोवाक्कायकर्मणात् ॥
धर्मार्थकामान्पुरुषः सुखी भुंक्ते चिनोति च ॥ २८ ॥
लाघवं कर्मसामर्थ्यं स्थैर्यं दुःखसहिष्णुता ॥
दोषक्षयोग्निवृद्धिश्च व्यायामादुपजायते ॥ ३० ॥......॥
उचितादहिताद्धीमान्क्रमशो विरमेन्नरः ॥
हितं क्रमेण सेवेत............ ॥ ३४ ॥......॥
समपित्तानिलकफाः केचिद्गर्भादिमानवाः ॥
दृश्यंते वातलाः केचित्पित्तला श्लेष्मलास्तथा ॥ ३७ ॥......॥
विषमस्वस्थवृत्तानामेते रोगास्तथा परे ॥
जायन्ते नातुरस्तस्मात्स्वस्थवृत्तपरो भवेत् ॥ ४२ ॥
माधवप्रथमे मासि नभस्य प्रथमे पुनः ॥
सहस्यप्रथमे चैव हारयेद्दोषसञ्चयम् ॥ ४४ ॥
आहाराचारचेष्टासु सुखार्थी प्रेत्य चेह च ॥
परं प्रयत्नमातिष्ठेद् बुद्धिमान् हितसेवने ॥ ५८ ॥ चरके सप्तमेऽध्याये

तत्राहिंसा प्राणिनां प्राणवर्द्धनानामुत्कृष्टतमं; वीर्यं बलवर्द्धनानां; विद्या बृंहणानां; इंद्रियजयो नन्दनानां; तत्वावबोधो हर्षणानां, ब्रह्मचर्यमयनानां, इत्यायुर्वेदविदो मन्यन्ते ॥ १४ ॥ चरके ३० तमेऽध्याये ।

—शुभं भवतु—परमेश्वरप्रसादाच्छमोपायः प्रसरतु ॥

एतत्सर्वं चरक-सूत्रस्थानादेव मुद्रितम् । विस्तरभयान्नान्यत्स्थानात् ।

# मराठी पुस्तकें

## वर्गणीदारांस निम्मे किंमतीस देण्यांत येतात.

**निरनिराळ्या**— वनस्पतींचे, शरीराचे वगैरे हुबेहुब देखावे देऊन, वैद्यकाची माहिती देण्यांत प्रख्यात झालेलें **आर्यभिषक्**— मासिकपुस्तक सन १८८९ जुलैपासून निघतें. मागील मजकुरांची पुस्तकें विक्रीस तयार आहेत. याचे बरोबर— **भारतधर्म**— नांवाचें धार्मिक विषयांचें सचित्र मासिकपुस्तक असतें. दोन्ही घेणारांस वर्षाची वर्गणी टपालसह १ रु. १० आणे. फक्त **आर्यभिषक्** घेतल्यास १॥ रु. व **भारतधर्म** घेतल्यास १ रु. इतर पुस्तकांची यादी मागवावी ह्मणजे पाठवूं. **श्री० गायकवाड सरकारांच्या** उदार आश्रयानें हीं सर्व पुस्तकें—

**वनौषधि-गुणादर्श.** याचे **सहा भाग** विक्रीस तयार आहेत त्यांची किंमत ६॥ रु. आहे. परंतु आर्यभिषक्चे वर्गणीदारांस ते ३। रुपयांस मिळतील. टपाल शिवाय.

मुंबई, पोस्ट गिरगांव, श्रीसयाजी-औषधशाला.

---

**विक्रीस तयार असलेल्या पुस्तकांची यादी.** किंमतीशिवाय टपालखर्च.

| | | |
|---|---|---|
| वनौषधीगुणा० १ ला १२ आ | औषधीमानपरिभा. १॥ आ. | सार्थ श्रीचरकसंहिता, |
| ,, भा. २ रा. १ रु. | गोवैद्यक.... ... २ आ. | सूत्रस्थान, पूर्वा. २ रु. |
| ,, भा. ३ रा. १। रु. | प्राणिज औषधी. २ आ. | ,, सूत्र.उत्त.-भा. १ ला १॥ रु |
| ,, भा. ४ था. १॥ रु. | अश्वरोगपरिज्ञान. पाऊणआ। | ,, ,, भा. २ रा २ रु. |
| ,, भा. ५ वा. १। रु. | त्रिदोषविचार, भा. १; ४ आ. | ,, निदानस्थान १४ आ. |
| ,, भा. ६ वा १२ आ. | ,, भा. २ रा ४ आ. | ,, विमानस्थान १॥ रु. |
| सुबोध वैद्यक.... १॥ रु. | ग्रंथिकसन्निपात... ६ आ. | ,, इंद्रियस्थान १२ आ. |
| रसवैद्य. ... ... १२ आ. | सार्थ हारीतसं. भा. १ ला १। रु | ,, कल्पस्थान १४ आ. |
| बृहन्निघंटु... ... १॥ रु. | सार्थयोगशतक... ४ आ. | ,, सिद्धिस्थान १॥ रु. |
| औषधिगुणदोष १॥ रु. | सार्थ वैद्यवल्लभ... ४ आ. | ,, चिकित्सा. भा. १ ला. १।॥ रु |
| गर्भारपण-बाळंतपण १ रु. | बृहत्पाकसंग्रह ... १॥ रु. | ,, चिकित्सा. भा. २ रा २ रु. |
| वीर्यनाश व उपाय. ३ आ. | नाडीपरीक्षेचें महत्व ३ आ. | नपुंसकमीमांसा-काम. १॥ रु. |
| औषधीक्रिया. ... ८ आ. | औषधीवाड ... २ रु. | निघंटशिरोमणि. २। रु. |
| राजवैद्य.... ... १२ आ. | सार्थ ज्वरपराजय २ रु. | आयुर्वेदरहस्य भा १ ला १ रु. |

**योगशास्त्राची उत्तम माहिती होण्याचें पुस्तक.**

कि. ४ आणे. **योगविज्ञान.** टपाल ०॥. आ

---

सुवर्ण छा० त छापविलें, मुंबई.

श्रीशंकर.

# औषधावांचून कोणताही रोग बरा करण्याची विद्या.

फार विचार करण्याजोगी ही बाबद आहे. **कोणताही रोग औषधावांचून बरा होणें शक्य** आहे, तर आमचें एवढें मोठें प्राचीन वैद्यशास्त्र प्रचारांत कां आलें ? इतकेंच नव्हे, तर आजपर्यंतचा जगाचा इतिहास पाहिला तरी—मनुष्यप्राण्यांच नव्हे, तर तीर्यक् योनींतही भिन्न भिन्न रीतीनें वैद्यशास्त्र प्रचलित होत आलेंच आहे. रानटी माणसांतही एक प्रकारचें वैद्यशास्त्र असून, हल्लीं सुधारणेचा ध्वजस्तंभ हातीं घेतल्याचा गर्व वहाणारे पाश्चिमात्य तर, वैद्यशास्त्र हें प्रत्यक्ष व्यवहारांत परमेश्वरज्ञानापेक्षांही जास्त महत्वाचें मानीत असून, त्याप्रीत्यर्थ लाखो माणसें, एकसारखा तनु-मन-धनांचा व्यय करीत आहेत व त्यांत यशस्वी झाल्याचा गर्व वहात आहेत !

## प्रस्तुतची शोचनीय स्थिति.

प्रस्तुत वैद्यशास्त्र एकाच प्रकारानें प्रचलित नसून, आल्योप्याथी, होम्योप्याथी, क्रोम्योप्याथी, हैड्रोप्याथी इत्यादि असंख्य विभागांनीं व मतमतांतरांनीं दुमदुमून राहिलें आहे ! त्यांत जसे कांहीं औषधाविषयीं तत्वभेद आहेत तसेच औषधानें रोग बरा करणें; शस्त्रक्रियेनें रोग बरा करणें; केवळ पाण्यानें रोग बरा करणें; एक प्रकारच्या सूर्यतापानें रोग बरा करणें; सूर्यप्रकाशाच्या साह्यानें रोगस्थिति प्रत्यक्ष पाहून प्रतीकार करणें, इत्यादि—उपचाराचे भिन्न भिन्न प्रयोग आहेत. इतकेंच नव्हे, तर जर्मनमध्यें डा० लुई कुन्हे यांनीं—केवळ पाणी, माती वगैरे पंचमहाभूतांपासून—अगदीं सुलभ रीतीनें, औषध किंवा शस्त्रक्रियेवांचून सर्व रोग बरे करण्याचा एक मार्ग काढला असून, ज्याप्रमाणें अमेरिका—यूरोपांतील शोधांचा प्रतिध्वनि आमच्या या हिंदुस्थानांत होतो, त्याप्रमाणें डा. कुन्हे यांच्या शोधांचाही प्रतिध्वनि येथें झाला आहे.

एका दृष्टीनें, हिंदुस्थानचें हल्लीं मोठें भाग्य आहे. कारण, आमची एतद्देशीय विद्या संस्कृतांत आमच्या जवळ भरपूर भरलेली असून, इंग्रजी राज्यकर्त्यांच्या संसर्गानें, जगांतील नवीन नवीन शोधही आह्मांस आयते पहाण्यास सांपडत आहेत. अशा स्थितीमध्यें, हिंदुस्थानांत—दोन्ही बाजूंनीं विद्या वाढत आहे हें एक भाग्यच आहे.

त्यांतून छापण्याची कला, आणि राज्यकर्ते व लोकांची लेखन-वाचनवृद्धीकडे प्रवृत्ति, इत्यादि कारणांनीं हिंदुस्थानांत विद्याप्रसार झपाट्यानें होऊन, हिंदुस्थानाचा उत्कर्ष होणें स्वाभाविक आहे. आणि कांहीं अंशीं तशी स्थिति आहेही खरीच !

पण त्यापासून तात्विक दृष्टीनें पाहिलें तर मोठी खेदास्पद स्थिति आहे! "एक धड ना भाराभर त्या चिंध्या काशाला" या एका साधुपुरुषाच्या वाणीची येथें आठवण होते. कारण, लोकांना स्वतःचें आपलें काय आहे तें आधीं बरोबर कळलेलें नाहीं ! इतकेंच नव्हे, तर त्यासंबंधीं अथवा दुसऱ्या कोणत्याही विषयासंबंधीं लक्ष्यपूर्वक माहिती मिळऊन विचार करण्यास साधनें नसून, उलट अडचणीच फार वाढत आहेत. पोटाची काळजी तर दिवसेंदिवस फारच वाढत चालली आहे. शिवाय नवीन नवीन व्यसनांनीं व मोहांनीं बुद्धींत स्थैर्य राहिलें नाहीं ! अशा स्थितींत, हिंदुस्थानच्या लोकांनीं, या मोठ्या चळवळीच्या विद्याप्रसारांत बुडून जाऊन, प्राण कासावीस करून घेण्यापेक्षां, जास्त कांहीं लाभ तूर्त तरी त्यांना दिसत नाहीं?

घर ना दार; उद्योग ना धंदा; खाण्यास मिळण्याची मारामार; विद्येचा संस्कार नसून इच्छाही तितपतच; अंगांत चालण्याचीही शक्ति नाहीं! अशा साधनसम्पन्न मनुष्यास, गंगेच्या तीरीं राहून, पावसाच्या पुरांत वाहून जाण्यापेक्षां, गंगासान्निध्यानें कोणता फायदा मिळणार ? त्याला त्या पर्जन्यापासून शेती पिकविण्याची आशा नाहीं; चातुर्मासांत गंगाकिनारीं राहून तपश्चर्या करण्याची योग्यता नाहीं; पाणी फार चढलें तर उठून पलीकडे जाण्याचीही शक्ति नाहीं! असा मनुष्य, गंगासान्निध्यानें जसा संकटांत पडतो, तीच स्थिति आमच्या हिंदुस्थानाची झाली आहे.

तूर्त पृथ्वीभर शोधांची धुमश्चक्री चालली आहे, पण ती आमच्या काय उपयोगीं? आह्मांस त्यांची शहानिशा करण्याची शक्ति तर राहोच, परंतु अवधि देखील नाहीं! आमची विद्या कशी आहे हें पाहण्याची आस्था तर राहोच, पण कोणी समजून सांगू लागला तर तें ऐकण्याची क्रिया देखील आमच्याकडून घडत नाहीं! अशा स्थितींत—आमची मूळची योग्यता काय; नवीन शोधांत आमच्यापेक्षां उपयुक्तता कितपत आहे, किंवा हा सर्व घोटाळाच आहे, इत्यादि विचारांकडे आमची बुद्धि वळणें आणि नंतर या शोध कयुगाचा उपयोग आह्मीं करून घेणें हें घडणें ह्मणजे थेट वंध्यापुत्राची स्थिति होय.

सुशिक्षित शब्दाचा अर्थ हल्लीं बदलला आहे. ज्याला दुसऱ्याच्या देशाची बित्तंबातमी आहे, पण आपल्या गांवांतील क्षुल्लकसा इतिहासही माहीत नाहीं; ज्याला परभाषा सहृदयतेनें कळते, पण स्वभाषा नीट बोलतांही येत नाहीं; ज्यांना परदेशांतील शोधांची खडानूखडा माहिती आहे, पण आपल्या देशांत कोणतीं ठळक ठळक शास्त्रें आहेत हेंही माहीत नाहीं; ज्याला परवयास बुद्धिवाद सांगण्याची कला अवगत झाली आहे, पण स्वतःच्या निर्वाहाची पंचाईत पडली आहे; या सर्व गुणांनीं सुसंपन्न असेल तो कोण ? तर सुशिक्षित! आणि सर्व कांहीं देशोद्धाराचें कार्य त्याच्या प्रेरणेनें होणार!

त्यामुळें, ज्यांना शहाण्यांत खपावयाचें असेल, त्यांना वरील ज्ञानाकडे वळावें लागतें; आणि असें असल्यामुळें, यूरोप-अमेरिकेंत होणारे नवे शोध, आमच्या देशांत जितके लौकर फैलावतात व पोसतात, तसे--आमच्या पूर्वजांनीं हजारों वर्षांच्या शोधांनीं केलेले सिद्धांतही समजू शकत नाहींत; मग ते पसरण्याची व पोसण्याची गोष्टच कशाला!

## तथापि शरीररक्षणोपायाचा प्रयत्न.

असलें खडतर दुर्दैव आमच्यापुढें सपशेल उभें असतांना, आमच्या देशाच्या उत्कर्षाची आशा करणें केवळ अशक्य! पण ह्मणतात नाहीं: "यत्ने कृते यदि न सिध्यति कोऽत्र दोषः।" ह्मणून, आणि परमेश्वर करील तर हीही स्थिति उलटेल असा भरंवसा ह्मणून, कांहीं प्रयत्न केला पाहिजे व उत्साह धरला पाहिजे!

अशी स्थिति तूर्त भरतखंडांत झाल्यामुळें, अशा शांततेच्या उत्कृष्ठ वेळेचा उपयोग, खऱ्या विद्यावर्द्धनास होत नाहीं हें जरी दुर्भाग्य आहे, तथापि वरील विचारसरणीस अनुसरून, अशाच प्रकारच्या एका विषयाकडे लोकप्रवृत्ति वळविण्याचा प्रयत्न करीत आहों.

सर्व बाबतींत विद्येसारखी दुसरी बाबत नाहीं! हिच्या चर्चेनें, वादानें किंवा साहचर्यानें कधीं कोणाचेंही नुकसान होत नाहीं! उलट सोन्याप्रमाणें--जों जों इच्यावर संस्कार होतात, तों तों ही आपली योग्यता वाढवीतच जाते! इतकेंच नव्हे, तर सोनें हें अशा संस्कारानें बावनकशी राहून वाढूं शकत नाहीं; पण विद्या ही पाहिजे तितकी वाढूं शकते.

अशा विद्येंत देखील--जें शरीर सर्व कार्यांस साधन, त्या शरीराच्या रक्षण-पोषण--वर्द्धनाची जी वैद्यविद्या, ती सर्वांनां सर्वकाळीं उपयोगीं आहे इतकेंच नव्हे, तर पहिल्यानें समजून घेण्यासारखी महत्वाची आहे.

त्यांतून हल्लीं सर्वत्र रोगप्रसार झपाट्यानें होत आहे. नित्य आणि नैमित्तिक अशा अनेक रोगांनीं आह्मांला ग्रासलें आहे. पण असें असून, त्या रोगांचा प्रतीकार करण्याची मानसिक, शारीरिक किंवा सांपत्तिक शक्तिही आमच्या जवळ उरलेली नाहीं! अशा स्थितींत आमच्या शरीराचें पोषण आणि वर्द्धन तर बाजूसच राहिलें, पण आवीं रक्षणच कसें होतें ही मोठी चिंता येऊन पडली आहे.

अशा वेळीं औषधावांचून कोणताही रोग बरा करण्याची विद्या जर आह्मांस मिळेल, तर--यापेक्षां आणखी आमचें भाग्य कोणतें ह्मणायाचें!

इंग्रजी सत्तेबरोवर इंग्रजी वैद्यविद्या ज्या आह्मांस मिळाल्या, त्यांत प्रथम आल्योप्याथी शस्त्रचिकित्सेसह आह्मांकडे आली.

शस्त्रचिकित्सेचा बोलवाला झपाट्यानें झाला, तितका आल्योप्याथीचा झाला नाहीं. कारण, आमच्या देशांतील शस्त्रचिकित्सा करणारांना आश्रय नसल्यामुळें

व तें काम विशेष जोखमीचें असून, त्यास सरकारी मदत असणें अवश्य असल्या-मुळें, आमच्या हक्काच्या शस्त्रक्रियेचे चालक लोपत गेले हें सहजच घडलें. त्यांतून, औषधक्रियेनें शस्त्रक्रियेची जागाही आमच्या इकडे भरून निघूं लागली होती, ही एक त्यास जोड मिळाली! त्यामुळें अर्थातच, याच्या उलट साधनांनीं सज्ज असलेली परकीय शस्त्रक्रिया आमच्यांत मिरवूं लागली हें कांहीं आश्चर्य नाहीं! परंतु आमची औषधिक्रिया चालतीबोलती असल्यामुळें, परकीय औषधीक्रियेचें तेज जसें पडावें तसें अद्याप पडलें नाहीं! तथापि परकीय औषधिक्रियेला होमियोप्याथी हें एक नवीन वळण मिळाल्यामुळें, पूर्वी इकडे आलेली औषधिक्रिया **आल्योप्याथी** या नांवानें ओळखण्यांत येऊं लागली! "नवं नवं प्रीतिकरं नराणाम्" या न्यायानें, **होमियो-प्याथी** हिंदुस्थानांत बरीच सरसावली. या दोन प्याथींत मुख्य फरक इतकाच दिसतो, कीं औषधाचें प्रमाण आल्योप्याथींत जास्त असतें व होम्योप्याथींत तें अगदीं थोडें असतें. या प्रमाणाच्या न्यूनाधिकत्वाशिवाय आणखी एक सामान्य तत्व यांत असें आहे, कीं आल्योप्याथींत रोगाच्या उलट क्रिया करणाऱ्या औषधांचा प्रयोग होतो; पण होम्योप्याथींत त्या तत्वाचा आधार केला जात नाहीं. यापेक्षां यांत कांहीं विशेष तत्व असल्याबद्दल वाद आहे; पण त्याचा निर्णय करण्याची, प्रस्तुत विषयास आवश्यकता नसल्यामुळें, आपण एवढें स्थूल मानानें पाहूनच आपला विचार करूं.

## सुलभ व गरीबीस लायक उपाय.

या उभय प्याथींशिवायही पुष्कळ प्याथ्या अर्थात् रोग बरे करण्याचे प्रकार, सुधारलेल्या ह्मणविणाऱ्या देशांत निघत आहेत, व त्यांचा प्रसारही थोडाफार हिंदुस्थानांत होत आहे. त्या सर्वांत, आपल्या दैन्य स्थितीला उपयोगीं पडणारी ह्मणून, आणखी एका प्याथीच्या सदरांत घालतां येण्याजोगी विद्या, आपल्या देशांत जर्मनीमधून आली आहे. आणि ती, जर्मन शोधक 'कुन्हे' यांची "औषध किंवा शस्त्र-क्रियेवांचून रोग बरा करण्याची विद्या" होय.

पाश्चिमात्यांच्या एकेका प्याथीची माहिती देऊन, त्या सर्वांचा अंतर्भाव आपल्या वैद्यशास्त्रांत करावयाचा, व त्या **सर्वांस शिस्त लावण्याची शक्ति** आपल्या वैद्यशास्त्रांत आहे हें स्पष्ट करून द्यावयाचें—असा विचार करून हें विवेचन करीत बसल्यास, हा एक मोठाच ग्रंथ होईल; इतकेंच नव्हे, तर त्यासाठीं मोठा जगड्व्याळ प्रयत्न करून, आपल्या प्रस्तुतच्या स्थितींत विशेषसा फायदाही होणार नाहीं; ह्मणून आह्मीं तशा प्रकारचा हेतु धरून हा प्रयत्न न करितां, आपल्याला हल्लीं इष्ट काय आहे तेवढेंच पहात आहों.

आह्मीं वर ह्मटलेंच आहे, कीं हिंदुस्थानच्या प्रस्तुतच्या विचित्र स्थितींत, अगदीं आवश्यक असें असून, तें आपल्याला सहजासहजीं मिळण्याजोगें आहे कीं नाहीं एव-

हेंच आज आपल्याला पाहणें आहे. त्याप्रमाणें पाहातां–विन पैशाचा, सर्व ठिकाणीं सहज होऊं शकणारा, फार उपयोगी आणि पुन्हा औषधांची किंवा शस्त्रक्रियेची भानगड न ठेवणारा असा उपाय, जर्मन शोधक **कुन्हे** यांचा आपल्यापुढें आला आहे; **त्याचा आपण जास्त तपास केला पाहिजे.**

"सर्व रोगांचें कारण एक आणि त्यावर उपायही एक" अशी **कुन्हे** यांची प्रतिज्ञा आहे. यांचें इंग्रजी पुस्तक, सुमारें सहासात वर्षांपूर्वी, आमचे एक विगतपुरीचे मित्र रा. रा. साम्युएल सालोमन यांनीं आह्मांस दिलें होतें. त्यापूर्वी, आह्मी आपल्या वैद्यशास्त्रानुसार—स्नेहन, स्वेदन, स्नान, अभ्यंग, अवगाहन, मार्जन, परिषेक, लेपन, बंधन इत्यादि साधनांनीं चिकित्सा करीत होतोंच. त्यांपैकीं कुन्हे यांनीं स्वेदन, अवगाहन, मार्जन, बंधन या क्रियांचा आश्रय केलेला आहे. त्यांचाही अनुभव पहातां, आमच्या आर्यवैद्यशास्त्रानुसारच त्याचा उपयोग दिसून आला. कुन्हे यांच्या पुस्तकांचीं भाषांतरें, पुणें येथील रा. रा. अप्पाजी विनायक जोशी गारवडेकर यांनीं मराठींत केलीं आहेत, व त्यांनीं या चिकित्सेची एक स्वतंत्र अनुभवशालाही स्थापन केली आहे. त्यांच्या पुस्तकावरून बऱ्याच लोकांनीं अनुभव घेतला आहे, व स्वतः सदर अनुभवशालेंतही पुष्कळ लोकांनीं अनुभव घेतला आहे. त्यांत कांहीं अनुभव प्रतिकूलही आले आहेत असें कळतें. आमचे नासिकचे मित्र रा. रा. रघुनाथ वामन परचुरे यांनीं या पद्धतीचा पुष्कळ अनुभव घेतलेला आह्मांस कळवून, या पद्धतीबद्दल आमच्या देखत, नासिक येथें एक प्रत्यक्ष अनुभवही आणून दिला, या पद्धतीबद्दल या सर्व अनुभवांनीं, आह्मांस विशेष आकर्षित केलें; इतकेंच नव्हे, तर कित्येक वर्षांच्या आमच्या विचारांस मोठा टेकाही दिला.

## वैद्यशास्त्राचा सामान्य हेतु व खरें प्रमेय.

वैद्यशास्त्राचें खरें रहस्य हें आहे, कीं रोगाचें निदान ठरवितांना आंतरिक व बाह्य कारणांचा फार बारीक विचार करावा; आणि योजल्या जाणाऱ्या उपायांपासून कोणत्याही प्रकारें अपाय न होतां, हळुहळु कां होईना, पण खरा उपयोग व्हावा.

हें तत्त्व अंमलांत आणण्याचें, पुष्कळ कारणांनीं, हल्लींच्या सुधारलेल्या वैद्यशास्त्रांत सुटलें आहे. त्यामुळे मोठ्या चुका होतात. लक्षणांवरून चिकित्सा करणें हा वैद्यशास्त्राचा अत्यंत स्थूल मार्ग आहे. त्या लक्षणांतही दोन भेद आहेत. फक्त सामान्य दृष्टीस जीं लक्षणें दिसतात तीं पाहून, त्यांच्या नाशाचा यत्न करणें हा अगदींच **अज्ञ–मार्ग** आहे. आणि तशा लक्षणांत तारतम्य ठरवून, सूक्ष्म कारणें ठरविणें व तदनुरूप चिकित्सा करणें हा **ज्ञान–मार्ग** आहे. त्याहीपेक्षां एक निराळा मार्ग आहे; व तो, पहिल्या अज्ञमार्गापेक्षां दिसण्यांत व कधीं कधीं अनुभवांतही बरा असतो. तो मार्ग ह्मणजे–रोगक्रिया, शरीराच्या ज्या स्थानावर होते असें दिसतें, त्या स्थानापुरतीच चिकित्सा करणें. या चिकित्सेंत जी मोठी चूक होते ती ही, कीं शरी-

राच्या ज्या भागावर रोगाची क्रिया दिसते, तेथेंच त्याचें कारण असतें असें नाहीं; तर कधीं कधीं त्याचीं कारणें फारच दूर असतात. रोगाचें कार्य दिसतें त्या स्थानावर *चिकित्सा केली ह्मणजे फायदा दिसून येतो; परंतु कारण दूर राहिल्यामुळें किंवा ज्या स्थानावर चिकित्सा केली, त्या स्थानापासून कारण दुसरीकडे गेल्यामुळें, तसाच अथवा निराळा व्याधी शरीरांत कायम व गुप्तरीतीनें राहत असल्यामुळें, मोठाच प्रमाद घडतो यांत संशय नाहीं. यासाठीं, स्थानिक निदान ठरवून चिकित्सा करणें फायद्याचें आहे असें जें दिसतें, तसें तें फायद्याचें नसतें. फार तर काय, पण कान-नाक-डोळे इत्यादि स्थानांतील सामान्य रोगांवरील उपचार करतांना, फक्त स्थानिक कारणांचाच विचार केला असतां चालेल असा जो कित्येक शास्त्रीय शोधकांचा समज होत चालला आहे, तो देखील फार घातक आहे. याविषयीं **कुन्हे** यांनीं आपल्या ग्रंथांत उत्तम विवेचन केलें आहे. आणि ह्या भाग, आमच्या वैद्यशास्त्राशीं तंतोतंत जुळत असल्यामुळें, आह्मी त्यांचे फार उपकार मानतों. कारण, दिवसेंदिवस ज्ञानाचा जरी प्रसार होत आहे, तरी सार्वदेहिक कारणांचा शोध लाऊन, **सत्वशील व निरुपद्रवी** उपचारांचा प्रघात पाडण्याचा प्रयत्न फारच क्वचित् होत आहे. उलट मोठमोठ्या शोधकांची वृत्ति, **तीव्र उपायांकडे** आणि **स्थानिक कारणांकडेच** धांव घेत आहे! याबद्दल अत्यंत सखेद भीती वाटते. तीव्र उपायानें गुण लौकर येतो, परंतु शरीरावर वाईट परिणाम होतात. आणि स्थानिक कारणांचाच विचार केल्यानें, खरीं कारणें सुरक्षित राहून व नवीन उद्भवून, शरीरास मोठमोठे व कायमचे रोग उत्पन्न करतात.

आह्मांस कोणत्याही शास्त्रशाखेचा अभिमान धरून विवेचन करणें नाहीं, तर निःपक्षपात बुद्धीनें जी गोष्ट खरी दिसेल, ती विचाराकरितां विद्वानांपुढें मांडणें आहे. त्या दृष्टीनें पाहिलें ह्मणजे, विद्वान् लोकांचें लक्ष्य, वरील मुद्यांकडे अवश्य लागावें अशी विनंती करणें हें सहजच आहे.

दिसणारीं लक्षणें, स्थानिक फेरफार किंवा या पलीकडे गेलें तर—शारीरिकरचना,—याहीपेक्षां, शरीराचें रक्षण, वर्द्धन व नाशन करण्यास, निराळ्या शक्तींची अपेक्षा आहे असें विचारांतीं कोणाही निस्पृह विद्वानांस कबूल करावें लागेल. कधीं कधीं, दिसणाऱ्या शारीरिक लक्षणांचे दृश्य फेरफार, कांहीं भिन्न किंवा विरुद्ध कारणांनींही होत असतात. अति उष्ण पदार्थांच्या सेवनानें पोटांत गुबारा धरणें; किंवा अतिशय थंड पदार्थांच्या सेवनानें, शरीरांतील उपयुक्त उष्णता बिघडून तिनें त्वचेचे विकार उत्पन्न करणें, असले प्रकार पाहिले ह्मणजे—दृश्य शरीररचनेपलीकडे कांहीं

---

***चिकित्सा शब्दाचा ठराविक अर्थ असा आहे**, कीं रोगनाश होण्याकरितां औषध देणें किंवा इतर जी कांहीं व्यवस्था करणें ती! **व्यवहारांत 'चिकित्सा' ह्मणजे बारकाईनें विचार करणें** असा जो अर्थ आहे तो वैद्यकांत धरावयाचा नाहीं!

अदृष्ट व्यवस्थाही आहे असें स्पष्ट दिसतें. तशा अदृष्ट व दृष्ट अशा दोन्हीं शक्तींचा व स्थितींचा विचार करूनच, आयुर्वेदशास्त्रानें त्रिदोषांची व्यवस्था ठरविली आहे. या तिन्ही शक्त्या, अदृष्ट व दृष्ट अशा दोन्ही स्थितींत कार्यकर्त्या आहेत.

**डा. कुन्हे** यांनीं आपल्या पुस्तकांत या तीन शक्तींचें अद्याप अवलंबन केलें नाहीं. त्यांनीं रोगोत्पत्तीचें कारण एकच कल्पिलें आहे. आणि उघडच आहे, कीं अशा एका कारणास, "शरीरास अपायकारक असा एक, बाहेर काढून टाकण्यायोग्य पदार्थ" असें त्यांनीं नांव दिलें आहे. त्यांनीं, अशा रीतीनें रोगाचें कारण जरी एकच मानलें आहे, तरी त्या एका कारणांवर **निरनिराळे उपाय योजले** आहेत.

## शास्त्राच्या कसोटीवर डा. कुन्हे यांचें तत्व.

डा. कुन्हे यांचें मुख्य तत्व हें आहे, कीं सर्व रोगांचें कारण एक आहे, आणि त्यावर उपायही एकच आहे. पण हें तत्व, त्यांनीं आपल्या **उपायांत कायम ठेविलें नाहीं**. शीतोदक किंवा उष्णोदकाची वाफ, असे त्यांनीं उपचारांचे दोनच भेद केले आहेत असें नाहीं; तर कित्येक ठिकाणीं मातीचा, गरम कपड्यांचा, उन्हाचा-वगैरे पुष्कळ निरनिराळे उपाय सांगितले आहेत. त्या मानानें पाहिलें ह्मणजे-डा. कुन्हे यांनीं आपलें तत्व, उपचाराच्या दृष्टीनें **एकच** असें ठरविलें नाहीं हें उघड दिसतें. त्यांचें **एकत्व,** शरीरांत कोणत्याही रोगाची उत्पत्ति होण्यास "**त्याज्य भाग** एक प्रकारचा असतो" हें **एकच कारण**; व तो त्याज्य भाग, निरनिराळ्या योग्य उपायानें शरीराबाहेर काढून देणें **हा त्याचा** एकच **उपाय**-अशा दृष्टीनें कायम आहे असें मानल्यास चालेल. पण असें ह्मटलें तर, डा. कुन्हे यांनीं यांत नवें काय काढलें तें कळत नाहीं!

शरीरांत कोणताही रोग उत्पन्न होणें ह्मणजे-शरीराला उपयुक्त असलेली **व्यवस्था बिघडणें** हें कारण, कोणत्याही मताच्या वैद्यकास कबूल आहेच. आणि बिघडलेली व्यवस्था घालवून पूर्ववत् **व्यवस्था चालू करणें** या उपायाच्या तत्वावरच सर्व वैद्यकें कार्य करतात. व्यवस्था बिघडणें ह्मणजे-कांहीं तरी अयोग्य पदार्थ असणें, व तो काढून टाकणें हा त्याचा उपाय! या दृष्टीनें **डा. कुन्हे** जर आपल्या शास्त्रांत "सर्व रोगांचें कारण एक व उपायही एकच" असें ह्मणत असतील, तर त्यांनीं कांहीं विशेष तत्व सिद्ध केलें असें मुळींच ह्मणतां येणार नाहीं. डा. कुन्हे ह्मणतात, कीं कोणताही रोग होण्यास शरीरांत असा कांहीं पदार्थ उत्पन्न होतो, कीं जो शरीरांतून बाहेर घालवून देणें अवश्य आहे. आह्मीं ह्मणतों: याविरुद्ध असेंही सिद्ध आहे, कीं शरीरास अशा एका पदार्थाची जरूर आहे, कीं ज्यामुळें शरीराबाहेर घालवून देण्याचा पदार्थ आपोआपच बाहेर निघून जाईल. आणि असें ह्मटलें ह्मणजे-**सर्व रोगांचें कारण एक व त्याचा उपायही एक** असें ह्मणण्यापेक्षां, **रोग न होण्याचा व झालेला घालविण्याचा**-अर्थात् रोग कारणाचा व रोगनिवारणाचा **एकच**

**प्रकार** आहे असें ह्मणणें बरें. डा. कुन्हे यांनीं **कारण व उपाय** असे दोन निराळे मानले कशाला? **कारण व उपाय एकच**! हें तत्व कबूल केलें तर पुष्कळच फायदा होईल. हल्लीं 'समोष्णीकरण' ह्मणून एक प्रकारचें नवीन इंग्रजी वैद्यक निघालें आहे तें याच तत्वावर! **शरीरांतील उष्णता कमी** होणें किंवा **जास्त** होणें हेंच सर्व रोगाचें कारण, व **तें प्रमाणांत ठेवणें** हा रोगनाशनाचा **उपाय**! अर्थात् डा. कुन्ह्यांपेक्षां ही प्याथी फारच सुलभ भासते! याच प्याथीसारखी दुसरी एक दिशा आहे. ती अशी, कीं शरीरांत जी निसर्गतःच **रोगनाशक शक्ती आहे,** ती वाढविण्याचा किंवा रक्षण करण्याचा प्रयत्न करावा; अर्थात् रोगाचें कारण व उपाय हें सर्व या एका तत्वांतच आलें! मग ही एवढी, **कारण व उपाय** भिन्न मानण्याची खटपट कशाला? शिवाय, या एक तत्वाला दुसऱ्याही एका तत्वविचारी लोकांचा आधार आहे. त्यांचें ह्मणणें, कीं शरीरांत सर्व रोग उत्पन्न होण्याचीं तत्वें आहेत; आणि परस्पर रोगही एकमेकांचे नाशक आहेत; तेव्हां शरीरांतच अशी व्यवस्था करावी, कीं ज्यामुळें आपोआप रोग नाहींसे होतील!

वास्तविक पहातां, निरनिराळ्या सर्व तत्ववाद्यांची **एकवाक्यताच आहे**. प्रत्येकांत तत्वतः एकच स्थिति आहे. पण ज्यानें त्यानें आपापल्या समजुतीप्रमाणें त्या त्या स्थितीचे भेद कल्पिले आहेत. त्यांची थोडी एकवाक्यता करून पाहूं.

## सर्व पद्धतींची एकवाक्यता.

रोग होण्यास शरीर लायक आहे यांत तर संशयच नाहीं. मग शरीरांत बाहेरून रोग येवोत, किंवा ते शरीरांतच उत्पन्न होवोत. जंतुशास्त्र्यांच्या मतानें-रोगजंतु बाहेरून येतात असें मानलें, तरी शरीर जंतुमय आहे हें त्यांनाही मान्य आहे. तेव्हां बाहेरून जंतु आले तरी त्यांना पोषक पदार्थ शरीरांत मिळाला नाहीं, तर ते वाढणार नाहींत हें उघड आहे. अर्थात् शरीरांत अशी कांहीं रचना असल्याचें उघड आहे, कीं ज्यामुळें अनेक प्रकारचे रोग शरीरांत होऊं शकतात! तेव्हां **शरीर हेंच रोगकारण** मानण्यास हरकत नाहीं. बरें, जर शरीर रोगकारण आहे, व त्यांत रोगजंतु जाण्याचा संभव असून, किंवा परीक्षा करून पाहिलें असतां, जंतु जाऊनही त्यांचा शरीरांत नाश होतो किंवा शरीर रोगमुक्तही असतें, त्या अर्थी **शरीरांत निसर्गतः रोगनाश** करण्याची शक्ति आहे हेंही उघड आहे! आतां हें ठरलें, कीं शरीर, **रोगस्थान व रोगनाशकस्थान असें दोन्ही प्रकारचें** आहे. अर्थात् हीं दोन्ही कारणें शरीरांतच आहेत, किंवा कांहीं कारणांनीं तें दोन्ही प्रकारचें होऊं शकतें असें मानण्यास कोणाचीही हरकत नाहीं. या दोन प्रकारच्या **स्थितींतील प्रकार भिन्न** असले पाहिजेत हेंही उघड आहे. अर्थात् **रोगोत्पत्तीपेक्षां रोगनाशन स्थिती उलट असली पाहिजे.** ह्मणजे **शरीरांत एकाला एक विरुद्ध अशा दोन शक्त्या निसर्गतः** आहेत, किंवा तशा कांहीं कारणांनीं होऊं शकतात, असें मानण्यास

हरकत नाहीं ! **या दोन प्रकारच्या शक्ती, दृष्ट** असतात किंवा **अदृष्ट** असतात—कसेंही माना, त्याची हरकत नाहीं; पण **रोगोत्पत्तीचें कारण एकच व रोगनाशाचें साधनही एकच** असे, या तत्वविचारापुरतें कबूल करण्यास कोणाचीही हरकत दिसत नाहीं ! तत्वविचाराचा हा भाग झाला; पण **शरीर ज्या निरनिराळ्या पदार्थांचें बनलें आहे,** त्या निरनिराळ्या पदार्थांवर या तत्वाचा परिणाम सर्वदा एकसारखांच दिसून येईल असें कधींही ह्मणतां येणार नाहीं. तसें असतें, तर—मूत्राशयांत रोग झाला असतां, द्रवपदार्थांत विघाड होणें; गाठ होऊन पू झाला असतां लस अथवा रक्ताची विकृति दिसणें; ताप आला असतां दाहाचा विकार होणें; इत्यादि निरनिराळे प्रकार दिसले नसते. अर्थात् तत्वशः रोगस्थिति व नाशकारण जरी एकच आहे, तरी—**स्थान, पदार्थधर्म इत्यादि भेदांनीं रोगांचीं कारणें अनेक आहेत;** आणि कारणें जर अनेक आहेत, तर **त्याच्या नाशाचे उपायही अनेक** आहेत असेंच मानलें पाहिजे.

**डा० कुन्हे** यांनीं **जे उपाय** सांगितले आहेत; **ते** इतके **पुष्कळ व एकाहून एक अगदीं विरुद्ध** इतके आहेत, कीं कुन्हे जर शंभरपन्नासवर्षें शोध करीत रहातील, तर त्यांना, त्या स्वतंत्र उपायांचें परिज्ञान लोकांना करून देण्यासाठीं, आपल्या मताचें **एक मोठें शास्त्र रचावें लागेल**! जर उपाय भिन्न आहेत, तर अर्थात् कारणेंही भिन्न असलींच पाहिजेत. जर कारण एकच असतें, तर भिन्न उपायांवाचून भिन्न व्याधी बऱ्या होणार नाहींत या कल्पनेनें त्यांस एवढा ग्रंथविस्तार करण्याची कांहीं जरूर नव्हती. नुसते सामान्य तत्व एक असलें, ह्मणजे त्यांत विशेषत्वानें भेद होत नाहींत असें ह्मणतां येणार नाहीं! आणि सर्वांत हें मुख्य आहे, कीं जर रोगकारण एकच आहे, तर सर्व रोगांना एकच उपाय कां नसावा? शरीरांत जो **रोगकारक पदार्थ उत्पन्न होतो, तो रोगाचें कारण व तो बाहेर काढून टाकणें हा रोगनाशक उपाय** असें जर डा० कुन्हे ह्मणत असले, व "रोगकारक पदार्थ ज्या स्थानांतून काढून टाकावयाचा, तेथें त्याच्या अनुरूप उपाय करावयाचा ह्मणून भिन्न उपाय आहेत; बाकी रोगकारण एकच आहे व तत्वतः उपायही एकच आहे" असें जर डा. कुन्हे किंवा अनुयायी ह्मणतील, तर बाहेरून होणाऱ्या **'जखमेचें कारण व उपाय'** यांची एकवाक्यता कशी करणार? हा प्रश्न आहे. तावडतोब झालेल्या **जखमेंतून रोगकारक** पदार्थ बाहेर काढून टाकण्याचा असतो काय ? तेंही असो; पण **रोगकारक** पदार्थ बाहेर काढून टाकावयाचा यापेक्षां डा. कुन्हे यांच्या हरएक उपायांत **शरीरावर दुसरा कांहीं प्रकार होत नाहीं कीं काय** ? थंड पाण्याच्या मार्जनानें शरीरांतील **उष्णता शमन** होत नाहीं काय ? गरम पट्ट्यानें त्या ठिकाणीं **उष्णता वाढत** नाहीं काय ? मातीच्या लेपानें **रासायनिक फेरफार** होत नाहीं·

त काय ? **डाक्टर कुन्हे** यांनीं **जे उपाय** सांगितले आहेत, ते फक्त रोगकारक पदार्थ बाहेर काढतात असें समजूं नये; तर **ते कांहीं पदार्थ शरीरांत आणखी वाढवितात ; कांहीं नसतात ते उत्पन्न करतात; कधीं कधीं नको आहेत ते बाहेर घालवितात;** अणि एकंदरींत--**रोगांचीं जीं निरनिराळीं कारणें** असतात, त्यांच्या अनुरूप **निरनिराळे उपाय** कारितात. तेव्हां, एकच कारण व एकच उपाय हें फक्त सामान्य तत्वापुरतें ह्मणणें असून, शारीरिक दृष्टीनें सूक्ष्म विचार करणारांस–जशा इतर वैद्यकाच्या प्याथ्या आहेत तशाच प्रकारची ही एक प्याथी आहे असेंच ह्मणावें लागतें.

यावरून असें मात्र समजूं नये, कीं सर्व प्याथ्या निर्दोषच आहेत. **अमुकच एक प्याथी खरी असें ह्मणणें मात्र चुकीचें आहे.** " प्याथी " ह्मणून ज्या " रोग बरे करण्याच्या निरनिराळ्या पद्धती " हल्लीं निघत आहेत, त्यांत तत्वशः कांहीं योग्य भाग घेतलेला असतो आणि कांहीं मुद्दे सोडून दिलेले असतात. इतकेंच नव्हे, तर नकळत भलतींच तत्वें मानून देखील–मानीत नसल्याचें सांगतात. त्यामुळें दिसतांना मात्र भेद दिसतो; पण वस्तुतः सर्वांचा मार्ग एकच असतो. अभिमान सोडून सूक्ष्म तत्वविचाराकडे आधुनिक विद्वानांची दृष्टी वळेल तर फायदा होईल !

## सारासार–विचारव्यवस्था.

सर्व बाजूंचा शांतपणानें विचार करून, व जुन्यांत जें चांगलें असेल तेंच सुधारून जगापुढें मांडण्याची रीतीच हल्लीं नाहींशी झाली आहे. जो उठतो तो एक नवें धतिंग उभें करतो. व हेंच काय तें मुख्य असें ह्मणतो. रेलवे झाल्या ह्मणून बैलांच्या गाड्या धुळीस मिळाल्या नाहींत. अथवा गाड्या झाल्या ह्मणून पायीं चालण्याची जरूर नाहीं असें ह्मणून पाय तोडण्याचीही जरूर उत्पन्न झाली नाहीं ! तशा रीतीनें, ज्यांत ज्याची उपयुक्तता, जितक्या प्रमाणांत मानली पाहिजे, त्यास तितकीच योग्यता दिली पाहिजे. एका साधूनें ह्मटलें आहे तें अगदी बरोबर आहेः " सोन्याची सुरी झाली ह्मणून काय उरींच खोचावी ॥ ऊस गोड झाला ह्मणुन काय उरींच खोचावा " तसा या प्याथांचा विचार करतांना, अमुक एक प्याथीच उत्तम असें ह्मणून, प्रमाणशुद्ध वैद्यशास्त्राकडे कधींही दुर्लक्ष्य करतां येणार नाहीं ! या प्याथ्या ह्मणजे विचारास एक प्रकारच्या सामान्य सहाय्यभूत होत; यापेक्षां यांत मोठेंसें महत्व नाहीं.

वैद्यशास्त्राचे मुख्य व जरूरीचे भाग चार आहेत. पहिल्या भागांत–जरूरीपुरती शरीररचना कळणें; दुसऱ्या भागांत–औषधींचें गुणदोषादि ज्ञान असणें; तिसऱ्या भागांत–रोगस्थितींत शरीरांत कोणकोणते फेरफार होतात तें कळणें, व चवथ्या भागांत—रोग घालविण्यास काय घडलें पाहिजे तें जाणून, तशा उपायांनीं रोग घालविणें, या चार भागांचें ज्ञान प्रत्येक वैद्यास पाहिजे. असें असेल तोच वैद्य व तशा ज्ञा

नासच वैद्यशास्त्र ह्मणावयाचें. या वैद्यशास्त्रांतील मुख्य तत्वें, निरनिराळ्या देशांतील लोकांत एकाच प्रकारचीं आहेत. कांहीं सामान्य गोष्टींत मतभेद आहे. आह्मांस पूर्ण खात्री आहे, कीं निःपक्षपातानें व तत्वतः विचार करणाऱ्या कोणत्याही देशाच्या विद्वानांस आमच्या वैद्यशास्त्राचे सिद्धांत अक्षरशः मान्य होतील. वाद इतकाच राहील, कीं कोणीं ह्मणतील: आह्मांस तात्काल उपयोग पाहिजे; कोणीं ह्मणतील: जास्त खटपट नको; कोणीं ह्मणतील: पुढें कांहीं का होईना, पण सध्यां तर सुख होईल भोगूं; कोणीं ह्मणतील: आह्मांस यथेच्छ अस्ताव्यस्त वागण्यासाठीं वैद्यकाचें साह्य पाहिजे तें वैद्यशास्त्रानें केलें पाहिजे. अशा रीतीनें, सृष्टिनियमाविरुद्ध इच्छा ठेऊन, परिणामीं दुःख भोगणाऱ्या अदूरदृष्टी मनुष्याशिवाय—आमच्या वैद्यशास्त्राचा मतभेद कोणाशीं राहणार नाहीं !

## वैद्यकाचें खरे तत्व.

मुळीं आमचें वैद्यशास्त्र, कीं जें ऋषिप्रणित असून, आमच्याच अर्वाचीन शोधकांनीं देखील ज्यांत “ यथासुखं क्रीडस्व ” केलें नाहीं, तें—मोठया सात्विक पायावर रचलें आहे. वैद्यशास्त्राची जरूर आह्मांस उत्पन्न झाली, तीच आधीं किती सत्वगुणी होती ती पहा. ( श्रीचरकसंहिता, अध्याय १ श्लोक १५–१६ ) यांत पहिलें साध्य “ धर्म ” आहे. धर्माच्या साथीनें अर्थ व काम साधून पुनः शेवटीं मोक्षच मिळविणें आहे. अर्थात् केवळ ऐहिकसुखाशेनें आमचें वैद्यशास्त्र रचलेंच नाहीं. त्यामुळें निव्वळ पायापुरतें पहाण्याची चूक आमच्यापासून होत नाहीं. दूरवर नजर देऊन व सूक्ष्म कारणांचा तपास करून आमचें वैद्यशास्त्र रचलेलें आहे. तसेंच तें, नुसत्या प्रत्यक्ष ज्ञानावरून तयार केलें नसून, योगासारख्या—व्यवहारांत अदृष्ट परंतु खरे मर्म कळरयाच्या साधनानें तयार केलें असल्यानें, भ्रम किंवा प्रमाद हा त्यांत नाहीं. त्यामुळें त्यांतील मुख्य तत्वें बदलण्याची किंवा चुकण्याची भीतिच नाहीं. मात्र तत्व जाणून देशकालाप्रमाणें योजना केली पाहिजे.

“ देशं, कालं वयो, वन्हि, सात्म्यं, प्रकृति, भेषजं ” इत्यादिकांचा बारीक विचार केल्याशिवाय चिकित्सा करूं नये असें आमच्या वैद्यशास्त्रांत स्पष्ट सांगितलें आहे. तसेंच एकंदर चिकित्सेचे (Treatment) दोन विभाग केले आहेत. “ शोधनं शमनं चेति समासादौषधं द्विधा ” रोग घालविण्याचे दोन मार्ग: एक त्याचें शोधन करणें व दुसरा शमन करणें. रोग घालविणें ह्मणजे रोगरूपानें जी क्रिया घडते तिचा नाश करणें, असली स्थूल कल्पना वैद्यकांत नाहीं. “ ताप ” ही रोगाची दिसणारी क्रिया आहे; परंतु तो ताप येण्यास जें **कारण** घडलें असतें त्यावर लक्ष्य देऊन वैद्यशास्त्रांत चिकित्सा सांगितली असते. **कारण** देखील सामान्य नव्हे ! ह्मणजे उन्हांत फिरण्यानें किंवा थंडींत बसल्यानें ताप आला असला ह्मणजे तें त्याचें कारण कल्पून, त्या कारणानुरूप चिकित्सा करावयाची असें नाहीं. पुष्कळ वेळां या कारणां—

वरून केलेली कल्पना चुकण्याचा संभव असतो, किंवा अशा कारणानुरूपच कार्य घडतें असें नाहीं ! कारण जरी एकच असलें, तरी भिन्न भिन्न प्रकृतींच्या मनुष्यांवर त्या कारणाचे निरनिराळे प्रकार घडतात. त्यामुळें एकाच कार्यावर दिलेल्या एकाच औषधापासून निरनिराळ्या व्यक्तींवर निरनिराळे परिणाम घडतात. कित्येकांना उष्ण पदार्थ मुळींच सोसत नाहीं, तर कित्येकांची त्याच्या उलट प्रकृति असते. शिवाय ऋतु व देश यांच्या भेदानेंही कधीं कधीं फेरफार घडतात. याकरितां आमच्या पूर्वजांनीं **रोगांच्या कारणांचा** विचार निश्चित करतां यावा म्हणून फार उत्तम योजना करून ठेवली आहे !

## त्रिदोषकल्पना.

ती ही, कीं सर्व शरीरांत जो **एकसारख्या तऱ्हेचा बिघाड** होण्याचा संभव असतो, तो कोणता आहे तें पहाणें. प्रत्येक मनुष्यालाच नव्हे तर प्रत्येक प्राण्यास त्या योजनेपासून उपयोग होईल. सर्व जगत् पंचमहाभूतांपासून उत्पन्न झालें असून, त्या पंचमहाभूतांच्याच आधारावर या जगाची घडामोड चालली आहे याविषयीं, बारीक विचार करणारांना मुळींच शंका नाहीं. फरक काय तो भाषेपुरता किंवा मांडणीपुरता असणें संभवनीय आहे. बाकी तत्व एकच आहे. असो. अशा पंचमहाभूतांत कायकर्तेपण **मुख्यतः** वाताकडें आहे यांत संशय नाहीं ! **चलशक्ति** तीच आहे. ती सर्व ब्रह्मांडांत आहे; तशीच शरीरांतही आहे. तिच्यांत जसजसा फेरफार होतो, त्या अनुमानानें शरीरांतही फेरफार होतो. म्हणून शरीरांत ही शक्ति कशी काय कार्य करतें हें पहाणें महत्वाचें आहे असें ठरविलें आहे. त्यापेक्षां कमी महत्वाचें पण एक प्रकारचें महत्वाचें **कार्य** करणारें **तेज** आहे; त्या **शक्तीचें नांव पित्त** असें ठेविलें आहे. तिसरी कार्यकर्ती जडशक्ति, तिचें नांव **कफ** असें ठेवलें आहे; जिचा संबंध, पंचमहाभूतांपैकीं **जल** तत्वाशीं आहे. अशा रीतीनें आप ( जल ), तेज व वायु या–पंचमहाभूतांतील मधल्या तीन तत्वाची व्यवस्था लागली. राहिलीं तत्वें दोनः एक आद्यतत्व **आकाश** व शेवटचें तत्व **पृथ्वी**. या दोन तत्वांविषयीं शारीरशास्त्राचा निर्णय निराळाच आहे. !

शरीर दोन प्रकारांनीं बनलेलें आहे. एक **पोकळी** व दुसरा प्रकार, भरींवपणा किंवा **आकार**. या दोन्ही मिळून शरीर आहे; व अशा शरीरांत कार्यकर्त्या. मुख्यतः तीन शक्त्या आहेत. त्याप्रमाणें पहातां, पोकळी अर्थात् **आकाश**, व आकार किंवा भरींवपणा अर्थात् **पृथ्वी** या मुख्य **दोन** तत्वांच्या आधारांचें शरीर बनलें असून, वायु ( चलशक्ति ), **पित्त** ( दाहकशक्ति=तेजशक्ति ) व **कफ** ( शीतशक्ति=जलशक्ति=जडशक्ति ) या **तीन** शक्त्यांच्या परिणामानें हें शरीर चालत आहे. शरीरांत या **तीन शक्ति** बरें वाईट कार्य करतात,व तें मुख्यतः दोन तत्वानें दिसत आहे. मिळून पांचीतत्वांचा शरीराशीं योग आहे. हा **योग–योग्य ( सम ) प्रमाणांत** असणें हें शरीराचें इष्ट ( निरोगी ) कार्य असून, तो

कमी ( **हीन** ), जास्त ( **अति** ) किंवा भलताच ( **मिथ्या** ) होणें हें शरीरास **अयोग्य** ( रोगोत्पादक किंवा शरीरास नाशक ) अर्थात् अनिष्ट कार्य आहे. अशा रीतीनें शरीरसंबंधीं रोगी किंवा निरोगी स्थितीचा विचार करतांना–वात, पित्त व कफ या तीन दोषांची स्थिति पाहिली पाहिजे. या तीन दोषांशिवाय मूळची शरीरस्थिति हीही एक पहावी लागते. कारण, मूळचें शरीर, कोणत्या प्रकारास सात्म्य (अनुकूल) व कोणास असात्म्य ( विरुद्ध ) आहे तें पाहून, नंतर त्रिदोषांचे त्यावरील परिणाम ताडून पाहण्यास ठीक होतें. वर सांगितल्याप्रमाणें त्रिदोष व प्रकृति मिळून पंचतत्वांच शारीरोपयोगीं समुदाय झाला. याबद्दल फार बारीक विचार करूं लागल्यास अतिशय विस्तार होऊन, सामान्य वाचकांच्या शक्ती बाहेर तो विषय जाईल ह्मणून येथें एवढाच मुद्द्याचा भाग सांगून, आह्मीं यापुढील विचाराकडे वळतों ज्या कित्येकांना. त्रिदोषाचीं तत्वें कळत नाहींत, त्यांना या कल्पनेचें रहस्य न समजल्यामुळें, हा कांहीं तरी पोरकटपणा आहे असें वाटणें यांत आश्चर्य नाहीं. पण तेही जर घटकाभर शांतपणें विचार करतील, तर त्यांनाही हें रहस्य सहज समजण्यासारखें आहे.

## त्रिदोषांची स्थिति

प्रत्येक दृश्य पदार्थांत अदृश्य असें कांहीं आहे व अदृश्यांतही दृश्य असें कांहीं आहे हें विचारी मनुष्याला सहज कळण्या सारखें आहे. हल्लींच्या नवीन शोधकांना याबद्दल विशेष सांगण्याची जरूर नाहीं ! पण " ज्ञानलवदुर्विदग्धां " ना हें एकदम नीटसें कळत नाहीं ! सकृद्दर्शनी कोणीं असें ह्मणतात, कीं " काय? बाहेर लागणारा वारा हा आमच्या शरीरांत जातो व आमच्या शरीराचें कार्य करतो ? " असल्या पोरकट प्रश्नांचा विचार करीत बसल्यास विस्तार होईल हें आह्मीं जाणतों; पण आपणास जर शांतपणें नीट विचार करणें आहे, तर याचाही थोडा विचार केला पाहिजे. मनुष्याला श्वासोच्छ्वासाची आवश्यकता आहे व बाहेरील वायु बंद केला तर मनुष्य गुदमरून मरतो, ही सामान्य गोष्ट घेतली तरी–पर्यायानें मनुष्यांत–बाहेर अनुभवास येणारा वायु, शरीराच्या आंतल्या कार्यास उपयोगीं आहे हें सांगण्याची आवश्यकता राहत नाहीं ! तीच स्थिति बाहेरच्या शीतोष्णांची आहे. फरक इतकाच आहे, कीं कुठें प्रत्यक्ष तर कुठें अप्रत्यक्ष असे त्याचे परिणाम होतात. जसें अग्नीवर एकादें रताळें भाजलें आणि दुसरें भांड्यांत ठेऊन पाण्यांत उकडलें; या दोन्हींवर अग्निसंस्कार घडला यांत संशय नाहीं ! पहिल्यांत अग्निसंस्कार प्रत्यक्ष घडला व दुसऱ्यांत अप्रत्यक्ष घडला ! फार लांब नको, अग्नीनें भाजल्यासारखा फोड आणणारा असूनही द्रव व स्पर्शाला शीत असा पदार्थ, प्लास्टरचें कार्य करतो हें आपण प्रत्यक्ष पाहत नाहीं काय ? अर्थात् त्या द्रव पदार्थांत आग्नेय गुण विशिष्ट आहे असें जर कोणी ह्मटलें, तर तो अज्ञ होईल काय ? तशाच रीतीनें शरीरांत वायु, पित्त ( उष्णता ) व कफ ( शीतता ) हे तीन दोष–कुठें कार्यरूपानें, कुठें परिणामरूपानें व कुठें अ-

नुमानानें जाणण्यापुरते आहेत यांत बिलकूल संशय नाहीं! यांची स्थिति जाणल्या-शिवाय–शारीरशास्त्राचा केलेला विचार–केवळ आंधळ्यासारखा आहे!

कारण, शरीरांत आपल्याला पूर्ण अनुभवांत येत असतें, कीं एक क्रिया एका ठिकाणीं होत असते व तिचे परिणाम भलत्याच एखाद्या शरीरप्रदेशावर घडत असतात! फार तर काय, पण क्रिया होत असते उष्ण व परिणाम होत असतात शीत! उपदंशापासून संधिवात उत्पन्न होतो ही गोष्ट सर्वांना निर्विवाद कबूल केलीच पाहिजे! तेव्हां अशीं जीं कार्यें होतात, त्यांचा कार्यकारणभाव कसा जाणणार? इतकेंच नव्हे, तर शरीरांत पदोपदीं असे पुष्कळ परिणाम घडत असतात! आणि त्यांची व्यवस्था कळण्यास नुस्तें शारीरशास्त्र जाणणारे किति तरी भलत्याच भराऱ्या मारीत असतात!

## आप्तवाक्याची योग्यता.

प्रत्येक मनुष्य शास्त्रकार होऊं शकणें संभवनीय नाहीं! तशाच रीतीनें प्रत्येक मनुष्य तत्वविचारी वैद्यही होणें अवश्य नाहीं! इतकेंच नव्हे, तर तसा होणें उपयुक्तही नाहीं! कारण, कोणतीही गोष्ट प्रमाणांत असली तरच तिचा उपयोग होतो! एखाद्या मोठ्या गणितज्ञाला बाजारांत पै–पैशाचा भाजीपाला विकण्यास बसविलें, तर बाजारांतल्या नित्याच्या व्यापाऱ्याप्रमाणें त्याच्याच्यानें हिशोबाचें काम त्वरेनें होणार नाहीं! तीच तऱ्हा वैद्यशास्त्राची आहे! चिकित्सा करणाऱ्या वैद्यानें शरीराचा शास्त्रीयदृष्टीनें-रोम रोम पाहून व सर्व तत्वविचार करण्यांत गुंग होऊन–चिकित्सा करण्याचें मनांत आणल्यास, त्या वैद्यापासून लोकोपयोग व्हावा तसा होणार नाहीं! यासाठीं मोठमोठे तत्वज्ञ होऊन गेले, त्यांनीं सर्व तत्वविचार करून जे सिद्धांत ठरविले आहेत तेच त्यांनीं पाहिले पाहिजेत. त्यापेक्षां उगीच काथ्याकुटींत जो शिरेल तो आपल्या धंद्याला मुकून "इतो भ्रष्टस्ततो भ्रष्टः" असा होईल! कारण, तत्वविचार करण्याला विशाल व सूक्ष्मशोधक बुद्धीची जशी आवश्यकता आहे, तशीच इतरही साधनांची जरूर आहे. ती सर्वांना असणें शक्य नसून, भलताच मनुष्य असा प्रयत्न करील, तर त्यापासून फायद्याऐवजीं नुकसान मात्र होईल! जसें हल्लीं आमच्यांतील कित्येक इतोभ्रष्टस्ततो भ्रष्टांपासून होत आहे! आमचें वैद्यक प्रमाणशुद्ध रीतीनें शिकलेलें नसावयाचें, आणि इंग्लिशवैद्यकाच्या एखाद्या प्यार्थीचें ज्ञानही ओरबाडलेलेंच असावयाचें!–अर्थात् जशी प्यार्थी शोधणारास अनंतें त्याच्या शतांशही ज्ञान नसतां, तिचा अभिमान धरून, आमच्या वैद्यकाला नाकतोंड मुरडण्यास व त्यावर भलतेच आक्षेप करण्याची मात्र सत्रा आणे तयारी दाखवायाची! असल्या लोकांपासून देशाची भयंकर हानि मात्र होते! ह्मणून आमची सर्व विचारी लोकांना विनंति आहे, कीं त्यांनीं आपल्यापेक्षां जास्त अनुभव घेतलेल्या प्राचीन ऋषींचें वचन आप्तवाक्य समजूनच चालावें यांत शहाणपणा विशेष आहे! आणि जर "बाबावाक्यं प्रमाणं" मानणें हास्यास्पद वाटत असेल, तर–जसें प्रस्तुत पाश्चिमात्य शो-

धक, आपलें आयुष्य निःसीमपणानें एकाच विषयाच्या पूर्ण अभ्यासांत घालवितात, तसें या शास्त्राचें तत्व शोधण्याकरितां, याच्या प्रांजल अभ्यासांत आयुष्य खर्चून आपली योग्यता तरी सिद्ध करून दाखवावी ! उगीच बरळत सुटूं नये ! असा तत्व शोधक बनणारा शेंपन्नास वर्षांत-अवघ्या देशांत एखादाही निपजणें मुष्कीलीचें असल्यामुळें, आमच्या प्राचीन ऋषींनीं, निरनिराळ्या बुद्धीच्या मनुष्याकरितां निरनिराळे लहानमोठे ग्रंथ करून ठेवले आहेत. जो तो आपापल्या बुद्धीप्रमाणें त्यांपैकीं एक किंवा अनेकांचा आश्रय करून आपलें कार्य सहज व बिनधोक करून घेतो.

## आर्यवैद्यकाची सर्वश्रेष्ठ योग्यता.

त्यांनीं आपलें सिद्धांत मोठया युक्तीनें व सहज समजण्याजोगे बसविले आहेत. अज्ञ मनुष्याचींही चूक होऊं नये ह्मणून त्यास, त्या त्या ग्रंथाच्या संक्षेप–विस्ताराप्रमाणें त्यास निरनिराळें रूप दिलें आहे. जसें कायदे करणाऱ्यांनीं हायकोर्ट जज, सामान्य जज, पोलीस फौजदार व सामान्य शिपाई यांच्या योग्यतेप्रमाणें लहान मोठे कायदे केले आहेत, तथापि त्यांतील कोणत्याही कायद्यांत न्यायाचें तत्व सोडलें नाहीं; त्याचप्रमाणें–आमच्या वैद्यकाच्या मोठ्यांत मोठ्या ग्रंथापासून तर लहानांतही लहान अशा ग्रंथापर्यंत वैद्यकाचें तत्व अगदीं थोडेंसें सुद्धां सोडलेलें नाहीं ! त्यांच्या या विशाळ बुद्धिमत्तेचें आणि योजकतेचें कौतुक करावें तेवढें थोडें आहे ! त्यांनीं सर्व ठिकाणीं एक मोठी महत्वाची गोष्ट साधली आहे ! उत्तम राजा आपल्या प्रजेला " न्याय व दया " या दोन तत्वांस धरून वागवीत असतो. हीं तत्वें, त्याच्या प्रत्येक कामगाराच्या आज्ञेंत समाविष्ट केलेलीं असतात ! आपल्या प्रजेला न्याय मिळावा व त्यांच्यावर दयाही करण्यांत यावी अशी त्याची प्रत्येक आज्ञा असते. तसेंच आमचें वैद्यशास्त्र आहे ! या वैद्यशास्त्राच्या प्रत्येक आज्ञेंत हें तत्व आहे, कीं–

### रोग बरा व्हावा पण कोणत्याही रीतीनें व केव्हांही-त्या क्रियेपासून अपाय होऊं नये !

वैद्यशास्त्राचें हें तत्व, इतक्या सुलभ रीतीनें कोणत्याही प्याथींत असेल असें आह्मांस तर दिसत नाहीं ! आणि असेलच तर ती प्याथी पूर्ण निर्दोष आहे असें आह्मी संतोषानें ह्मणूं. आमच्या वैद्यशास्त्रांत हें तत्व ज्या आधारावर पाळलें जात आहे, त्यांतील पहिला आधार **त्रिदोष होय.** या त्रिदोषांची व्यवस्था कळविण्यासाठीं-नाडी, मल, मूत्र, नेत्र, जिव्हा, त्वचा इत्यादि परीक्षा सांगितल्या आहेत. शिवाय प्रत्येक रोगांचीं वातादिकारणानुरूप लक्षणेंही बांधली आहेत. त्या लक्षणांचा सूक्ष्म भाग कळावा ह्मणून निदानपंचक सांगितलें आहे. प्रत्येक मनुष्याला आपल्या शरीररक्षणांसाठीं थोडेंसें तरी वैद्यशास्त्राचें ज्ञान असलेंच पाहिजे. त्यांच्यासाठीं–ऋषिप्रणित ग्रं-

थांत प्रथमच " सूत्रस्थान " म्हणून एक भाग सांगितलेला असतो. हा भाग, प्रत्येक मनुष्यास उपयोगीं असून, वैद्यास तर तो पहिल्यानें समजून घेण्याची आवश्यकता आहे. वैद्याला याशिवाय जरूरीचे पण उगीच वायफळ न होणारे-इतरही विषय सांगून, कोणताही–लहान किंवा मोठा–ऋषिप्रणित ग्रंथ पुरा केलेला असतो. अशा कोणत्याही ग्रंथाचें यथार्थ अध्ययन केलेला मनुष्य " योग्य वैद्य " होऊं शकतो. या सर्वांवर–प्रत्येकाची विचारशक्ति ही निराळी आहेच! कारण, कितीही शिकला, तरी सारासार विचार हा निराळा पाहिजेच. असो. अशा रीतीनें आमचें वैद्यशास्त्र मोठया महत्वाच्या व भक्कम पायावर रचलें असल्यामुळें,

## आह्मांला कोणत्याही प्याथीवर अवलंबून रहाण्याची जरूर नाहीं!

आतां इतकें खरें, कीं तत्वज्ञानास धरून मनुष्यानें आपली बुद्धि, निरनिराळ्या अनुभवानें विकसित केल्यानें फायदेच होतील. तोटे कधींडी होणार नाहींत. पण हें पक्कें ध्यानांत ठेवावें, कीं मोहून जाऊन मुद्दयाची गोष्ट कधींही विसरूं नये. श्रीसमर्थ रामदासांनीं म्हटलें आहे: "**जाऊं नये तेथें जावें**" पण "विवेकेंसहित." तसेंच जर आमचे लोक नवीन शोधांत खेळूं लागतील, तर आमच्या देशाचें नष्टचर्य केव्हांच संपेल. पण

## आमची स्थिति याहून उलट आहे,

आमच्या देशाला, प्रकृतीला, रहणीला,कुळाला,ऋतुव्यवस्थेला अशा अनेक बाबतींनां धरून योग्य असें मजबूत तत्वविचारावर रचलेलें वैद्यशास्त्र, यथार्थ दृष्टीनें न पहाता, "हुरळली मेंढी व लागली लांडग्याच्या मागें" असें आमचें चालू आहे. त्यामुळें, आह्मास होत असतें एक, पण आह्मांस भासतें दुसरेंच! उपाय होतात तिसरे व परिणाम होतो चौथा! "यस्य कस्य तरोर्मूलं येन केनापि घर्षितं ॥ यस्मै कस्मै प्रदातव्यं यद्वा तद्वा भविष्यति" अशा रीतीनें हिंदुस्थानच्या आरोग्याची हल्लीं पूर्ण दुर्दशा झाली आहे यांतून सोडविण्याचा कोणीं प्रयत्न न केल्यास काय होईल तें अनुभवीत आहोंच! सर्व रोगांच्या साथी हिंदुस्थानांत ! सर्व अशक्ततेचें मूळ हिंदुस्थानांत आणि त्यामुळें सर्व दारिद्र्याचें लक्षण हिंदुस्थानचेंच! आमचा आरोग्यशास्त्रानुरूप योग्य आचार, मुसलमानी व त्यावर इंग्रजी आल्यानें तर पार बुडाला. आमची आमच्या विद्येवर पूर्ण अश्रद्धा झाली ! पण दुसऱ्याचें तरी पुरें कळलें ह्मणावें. तर–आज उणेंपुरें दीडशतक इंग्रजी राज्यास हिंदुस्थानांत झालें, पण

## युरोपच्या तोडीचा एक शोधक देखील वैद्यशास्त्रांत हिंदुस्थानामध्यें प्रस्तुत उत्पन्न झाला नाहीं !

मोठी शरमेची गोष्ट नाहीं कां ? जर तुह्मांला तुमचें शास्त्र मानावयाचें नाहीं, तर परकीशास्त्रांत तरी तुह्मी पूर्ण तरबेज व्हाल कीं नाहीं ? दीड शतकांत जर

या कामीं हजारों रुपयांची आवश्यकता आहे. इतकेंच नव्हे, तर कित्येक लोकांचे जन्मही अशा कार्यांत खर्चण्याची अपेक्षा आहे. तथापि "आकाश-अंत न कळोनिाहि अंतरिक्षीं ॥ आकाश आक्रमिति शक्त्यनुसार पक्षी" या न्यायानें आमचा प्रयत्न सतत चालू आहे; व "थेंबें थेंबें तळें साचे" या न्यायानें, त्यास चांगलें स्वरूपही येत चाललें आहे. "**आर्यभिषक् पुस्तकावलींतून**" आज मित्तीला खालील ग्रंथ छापून प्रसिद्ध झाले आहेत. यांत कित्येकांच्या दोन दोन आवृत्त्याही निघाल्या आहेतः—

**विक्रीस तयार असलेल्या पुस्तकांची यादी.** (किंमतीशिवाय टपालखर्च.)

वनौषधीगुणा० १ ला १२ आ.
,, भा. २ रा १ रु.
,, भा ३ रा. १। रु.
,, भा. ४था. १॥ रु.
,, भा. ५ वा. १। रु.
,, भा. ६ वा १२ आ.
सुबोध वैद्यक.... १॥ रु.
रसवैद्य. ... ... १२ आ.
बृहन्निघंटु... ... १॥ रु.
औषधिगुणदोष १॥ रु.
गर्भारपण-बाळंतपण १ रु.
वीर्यनाश व उपाय. ३ आ.
औषधीक्रिया. ... ८ आ.
राजवैद्य.... ... १२ आ.

औषधीमानपरिभा. १॥ आ.
गोवैद्यक.... ... २ आ.
प्राणिज औषधी. २ आ.
अश्वरोगपरिज्ञान. पाऊणआ
त्रिदोषविचार, भा. १; ४ आ.
,, भा. २ रा ४ आ.
ग्रंथिकसन्निपात... ६ आ.
सार्थ हारीतसं. भा. १ ला १। रु
सार्थयोगशतक... ४ आ.
सार्थ वैद्यवल्लभ... ४ आ.
बृहत्पाकसंग्रह ... १॥ रु.
नाडीपरीक्षेचें महत्व ३ आ.
औषधीवाद ... २ रु.
सार्थ ज्वरपराजय २ रु.

सार्थ श्रीचरकसंहिता,
सूत्रस्थान, पूर्वा. २ रु.
,, सूत्र. उत्त.-भा. १ ला १॥ रु
,, ,, भा. २ रा २ रु.
,, निदानस्थान १४ आ.
,, विमानस्थान १॥ रु.
,, इंद्रियस्थान १२ आ.
,, कल्पस्थान १४ आ.
,, सिद्धिस्थान १॥ रु.
,, चिकित्सा. भा. १ ला. १।॥ रु
,, चिकित्सा. भा. २ रा २ रु.
नपुंसकमीमांसा-काम. १॥ रु.
निघंटशिरोमणि. २। रु.
आयुर्वेदरहस्य भा १ ला १ रु.

**आश्रयाविषयीं स्पष्टता**—दुसऱ्या वर्गाप्रमाणें आश्रय देणारांनीं ३० रु. पेक्षां कमी रु. भरले, तर भरलेल्या रुपयांचा, दर वर्षास १॥ रुप्य प्रमाणें हिशेब करून, त्या रकमेपर्यंत मा. पु. बंद केलें जाईल.

# विशेष खुलासा.

कोणास वाटेल कीं, आपण आश्रय दिला व मासिकपुस्तक कांहीं कालानें बंद पडलें, तर आपल्यास बदला काय मिळणार ! या **शंकेस** वास्तविक **समाधान** हेंच आहे, कीं हा **आश्रय** आहे; हा **बदला** नाहीं ! परमेश्वरानें **हें** चिरकाल **चालवावें** असा प्रयत्न आहे, व आज सतत **१५** वर्षें त्यानें **चालविलेंही** आहे. पण पुढें जर इच्छेविरुद्धच घडलें, तर नाइलाज आहे. ह्मणूनच आह्मी यास मोबदल्याचें स्वरूप दिलें नसून, **'आश्रय' असेंच स्पष्ट ह्मटलें आहे.** आणि आशा आहे कीं, या कामीं जे हजारों रुपये आह्मीं घातले आहेत, व आणखीही घालण्याची व्यवस्था केली आहे, त्याचा बदला, परमेश्वरच देईल, कीं त्यामुळें **हें मासिक पुस्तक** निदान पांचपन्नास वर्षें तरी चालेल, आणि आश्रय देणारांना मिळून, त्यांना आश्रयाचा मोबदला अनायासें मिळूं शकेल.

# प्रख्यात वाग्भट (अष्टांगहृदय)

## या ग्रंथाचें सरळ व संपूर्ण भाषांतरपुस्तक

# बक्षीस! फुकट!

'आर्यभिषक्' मासिकपुस्तकास चालू वर्षी वर्गणीदार होऊन, पुढच्या वर्षी कायम रहातील त्यांस, सदर्हू मराठी वाग्भटाचा **पूर्वार्ध** बक्षीस दिला जाईल! व **उत्तरार्ध**, त्यापुढें बक्षीस मिळेल! वर्षारंभ **जुलै. केव्हांही वर्गणीदार होणारांस**, वर्षाच्या आरंभापासूनचे अंक मिळतील. 'आर्यभिषक्' मा. पु. स **चालू वर्ष पंधरावें आहे. अनेक वनस्पतींचे हुबेहुब रंगीबेरंगी देखावे, शारीराचीं चित्रें, निरनिराळ्या वैद्यकविषयांची** भरपूर माहिती, इत्यादि संग्रह, **आर्यभिषकांत फारच चांगला होतो** --याविषयीं सर्वत्र प्रसिद्धि आहेच. वर्षाची वर्गणी टपालासह फक्त १॥ रु. ( **सचित्र 'भारतधर्म'** मा. पु. घेतल्यास ८ आणे शिवाय.)

**सम्पादक--आयुर्वेदमहोपाध्याय वै० शंकर दाजी शास्त्री पदे.**

**'सार्थ श्रीचरकसंहिता'** ही हल्लीं आर्यभिषकांत येत असून,

# योगरत्नाकर, रसरत्नसमुच्चय

वगैरे अनेक रसायनग्रंथांचा **सर्व उपयुक्त भाग घेऊन**, व प्रस्तुतची **नवी माहिती** सचित्र घालून तयार केलेला **'सार्थ रससारशंकर'** हा ग्रंथही, आर्यभिषकांतून लौकरच दिला जाईल.

☞ **बक्षीस देण्याच्या मराठी वाग्भटांत**--संस्कृत वाग्भटाचा क्रम बिलकूल न बदलतां, किंवा त्यांतील कोणताही विषय न सोडतां, सरळ व सोप्या मराठी भाषेंत, मुणकारितां जागजागीं श्लोकांचे आकडे देऊन, आणि--

**जागजागीं उपयुक्त टीपा व देखावे देऊन,**

भाषांतर छापण्याची व्यवस्था केली आहे. **वर्गणीदारांशिवाय इतरांस हा ग्रंथ ५ रु. किंमतीस पडेल.** वर्गणीदारांस टपालखर्च मात्र द्यावा लागेल. शिवाय त्यांस आमचीं **इतर वैद्यकपुस्तकें निम्मे किंमतीस** मिळतील!

**ध्यानांत ठेवा! ही संधि फार दिवस रहाणार नाहीं!**

**म्हणून त्वरा करा!**

**आश्रयदाते.** एकदम २५रु., किंवा दरसाल ५ रु. प्रमाणें ६ वर्षांत ३० रु.--आश्रय म्हणून देणारांस, **आर्यभिषक् मा० पु० अक्षयीं** (टपालखर्चही न घेतां) **फुकट देण्यांत येते. शिवाय बक्षिसें वगैरे, सवलतीही** मिळून, आमच्याकडील **औषधें** घेतल्यास, दर रुपयास २ आणे सूट मिळते. आश्रयदात्यांचीं नांवें, वर्तमानपत्रांतून छापून प्रसिद्ध होतात.

मुंबई, खेतवाडी, आर्यभिषक्कार्यालय.

**व्यवस्थापक आर्यभिषक्**

ज्योतिर्विद् दाजी हरि भट्ट पदे यांचे स्मारक.



वर्ष १५

# आर्यभिषक्

अंक ८-९



सम्पादक वै० शंकर दाजी शास्त्री पदे.

. आयुर्वेदमहोपाध्याय.

मुंबई, खेतवाडी-मेनरोड, आर्यभिषक्कार्यालय,

हृदयं साधुवृत्तानां भद्रमागमशालिनाम् ।
अभ्यस्तकर्मणां भद्रं, भद्रं भद्राभिलाषिणाम् ॥-श्रीयोगवा :।

कुंभ व मीन संक्रांति शके १८२५ माघ व फाल्गुन. ( ता. ५।८।१९०४.

**विषयानुक्रम**.-सार्थ चरकसंहिता, चिकित्सास्थान पृष्टें १७-५६, त्रिदोषविकफ पृष्टें १-८

---

**विशेष माहिती**.—आर्यभिषक् मासिक पुस्तक, सन १८८९च्या जुलैपा सुरू झालें असून, त्यास हल्लीं पंधरावें वर्ष सुरू आहे. या मा. पुस्तकांत जे विषय येतात, त्यांचीं पुस्तकें निरनिराळीं बांधतां यावीं अशी सोय प्रथमपासूनच केली आहे. त्यामुळें जुन्या वर्षाचे अंक घेण्याची जरूर रहात नाहीं. तर त्यांतून निरनिराळ्या रीतीनें बांधलेल्या पुस्तकांची, किंमतवार यादी खालीं देत आहों:—

वनौषधीगुणादर्श भा. १ ला. १२ आ.
" भा. २ रा. १ रु.
" भा. ३ रा. १। रु.
" भा. ४ था. १॥ रु.
" भा. ५ वा. १। रु.
" भा. ६ वा. १२ आ.
सुबोध वैद्यक. पूर्वार्ध व उत्तरार्ध १॥ रु.
रसवैद्य... ... १२आ.
बृहन्निघंटु... ... १॥ रु
औषधिगुणदोष १॥ रु.
गर्भारपण-बाळतपण १ रु.
सार्थयोगशतक... ४ आ.
सार्थ वैद्यवल्लभ... ४ आ.
बृहत्पाकसंग्रह ... १॥ रु
नाडीपरीक्षेचें महत्व ३ आ
औषधीवाद . २ रु
दीर्घायु कसें व्हावें? भाग १ ला. १० आ.
सार्थ श्रीचरकसंहिता
सूत्रस्थान, पूर्वार्ध. २ रु
"सूत्रस्थान उत्तरार्ध भा. १ ला १॥ रु.
" " भा. २ रा २ रु.

हल्लींचा वीर्यनाश व उपाय. ३ आ.
औषधीक्रिया ... ८ आणे
राजवैद्य......, १२ आ.
औषधीमानपरिभाषा १॥ आ.
गोवैद्यक......... २ आ.
प्राणिज औषधी. २ आ.
अश्वरोगपरिज्ञान. ८८॥। आ.
त्रिदोषविचार, भा. १ ला. ४ आ.
" भा. २ रा. ४ आ.
" भा. ३ रा. ४ आ.
ग्रंथिकसन्निपात.... ६ आ.
सार्थ हारीतसंहिता भा. १ ला. १। रु.
सार्थ श्रीचरकसंहिता निदानस्थान १४ आ.
" विमानस्थान १॥ आ.
" इंद्रियस्थान १२ आ.
" कल्पस्थान १४ रु.
" सिद्धिस्थान १॥ रु.
"चिकित्सास्थान भा. १ ला. १॥। आ.
"चिकित्सास्थान भा. २ रा. २ रु.
नपुंसकमीमांसा-कामसंजीवन १॥ रु.
निघंटशिरोमणी भा. १।२ २। रु.
आयुर्वेदरहस्य भा. १ ला. १ रु.

स्थिरसत्वशरीरा ये पुराणा मद्यपान्वयाः ।
बहुमद्योचिता येच माद्यन्ति सहसा न ते ॥ ८२ ॥
प्राङ्मद्यात्क्षुत्पिपासार्ता दुर्बला वात पैत्तिकाः ।
रूक्षाल्पप्रमिताहारा विस्तब्धाः सत्वदुर्बलाः ॥ ८३ ॥
क्रोधिनोऽनुचिताः क्षीणाः परिश्रान्ता मदक्षताः ।
स्वल्पेनापि मदं शीघ्रं यान्ति मद्येन मानवाः ॥ ८४ ॥
ऊर्ध्वं मदात्ययस्यातः सम्भवं स्वस्वलक्षणम् ।
अग्निवेश चिकित्साञ्च प्रवक्ष्यामि यथाक्रमम् ॥ ८५ ॥

ज्यांचें सत्व अर्थात् मानसिक शक्ति व शरीर ही दृढ आहेत, ज्यांचा जन्म मद्य पिणारांच्या कुळांत झालेला आहे व ज्यांस मद्य पिण्याचा नित्य अभ्यास आहे अशा मनुष्यांनीं थोडें जास्त मद्य घेतलें तरी त्यांस सहसा फारसा अम्मल चढत नाहीं. परंतु याच्याच उलट उपाशीं व तृषाक्रांत असतां आणि अशक्त, वात-पित्त प्रधान प्रकृतीचे, रूक्ष—थोडें व—एकाच प्रकारचें भोजन करणारे, विस्तब्ध, दुर्बल मनोवृत्तीचे, रागीट किंवा रागावलेले, मद्य पिण्याचा अभ्यास नसलेले, क्षीण झालेले, थकलेले आणि अतिमद्यपानानें ज्यांच्या शरीरांत क्षत झालें आहे असे जे मनुष्य असतात त्यांनीं थोडें जरी मद्य घेतलें तरी त्यांस लवकर ( व जास्त ) अम्मल येतो. हे अग्निवेश ! यापुढें आतां दोषभेदपरत्वें निरनिराळ्या मदात्ययांचीं लक्षणें व त्यांची चिकित्सा क्रमानें सांगतों.

स्त्रीशोकभयभाराध्वकर्मभिर्योऽतिकर्षितः ।
रूक्षाल्पप्रमिताशी वा यः पिबत्यतिमात्रया ॥ ८६ ॥
रूक्षं परिणतं मद्यं निशि निद्रां विहत्य च ।
करोति तस्य तच्छीघ्रं वातप्रायं मदात्ययम् ॥ ८७ ॥
हिक्काश्वासशिरःकम्पपार्श्वशूलप्रजागरैः ।
विद्याद्बहुप्रलापस्य वातप्रायं मदात्ययम् ॥ ८८ ॥

स्त्रीसंग, शोक, भीति, ओझें वाहणें, मार्ग चालणें यांच्या अतिरेकानें, अत्यंत थकलेल्या मनुष्यानें, अथवा रूक्ष अन्न खाणारा, थोडें

खाणारा किंवा एकाच प्रकारचें भोजन करणारा-अशा मनुष्यानें अतिशय मद्यपान केलें असतां तें परिणामीं त्याच्या मूळच्या रूक्ष शरीरांत अतिशय रूक्षता वाढवून, व त्यामुळें त्याची रात्रीची झोंप नाहींशी करून लौकरच वाताधिक मदात्यय उत्पन्न करितें. उचकी, श्वास, मस्तककंप, बरगड्या दुखणें, झोंप न येणें व फार बडबड करणें हीं वाताधिक मदात्ययाचीं लक्षणें होत.

तीक्ष्णोष्णं मद्यमम्लं वा योऽतिमात्रं निषेवते ।
अम्लोष्णतीक्ष्णभोजी च क्रोधनोऽग्न्यातपप्रियः ॥ ८९ ॥
तस्योपजायते पित्ताद्विशेषेण मदात्ययः ।
स तु वातोल्बणस्याशु प्रशमं याति हन्ति वा ॥ ९० ॥
तृष्णादाहज्वरस्वेदमूर्च्छातीसारविभ्रमैः ।
विद्याद्धरितवर्णस्य पित्तप्रायं मदात्ययम् ॥ ९१ ॥

नेहमीं आंबट व तीक्ष्ण पदार्थ खाणारा, रागीट आणि अग्नि व ऊन्ह यांचें प्रीतिपूर्वक सेवन करणारा मनुष्य तीक्ष्ण, उष्ण, अतिशय आंबट असें मद्य अतिशय प्याला असतां त्यास पित्ताधिक मदात्यय उत्पन्न होतो. आणि त्या रोग्याची प्रकृति वात प्रधान असल्यास हा पित्ताधिक मदात्यय एकतर लवकर बरा होतो किंवा लवकरच त्याचा अंत करितो. तहान लागणें, अंगाचा दाह होणें, ताप भरणें, घाम सुटणें, मूर्छा येणें, अतीसार व भ्रम होणें, आणि अंग हिरवट होणें हीं पित्ताधिक मदात्ययाचीं लक्षणें जाणावीं.

तरुणं मधुरप्रायं गौडं पैष्टिकमेव वा ।
मधुरस्निग्धगुर्वाशी यः पिबत्यतिमात्रया ॥ ९२ ॥
अव्यायामदिवास्वप्नशय्यासनसुखे रतः ।
मदात्ययं कफप्रायं स शीघ्रमधिगच्छति ॥ ९३ ॥
छर्द्यरोचकहृल्लासतन्द्रास्तैमित्यगौरवैः ।
विद्याच्छीतपरीतस्य कफप्रायं मदात्ययम् ॥ ९४ ॥

नेहमीं नवें धान्य, गुळचट, गुळाचे व पिठाचे पदार्थ, आणि मधुर, स्निग्ध व जड अन्न खाणारानें; तसेंच परिश्रम न करणें, दिवसा निजणें,

सदासर्वकाळ चैनीनें बिछान्यावर पडून किंवा एका जागीं बसून राहणें, हे दोष करणारानें अतिशय मद्यपान केलें असतां त्यास तत्काल कफाधिक मदात्यय उत्पन्न होतो. वांति, अरुचि, मळमळ. झांपड, सुस्ती, जडपणा व थंडी लागणें हीं कफज मदात्ययाचीं लक्षणें समजावीं.

विषस्य ये गुणा दृष्टाः सन्निपातप्रकोपणाः ।
त एव मद्ये दृश्यन्ते विषे तु बलवत्तराः ॥ ९५ ॥
हन्त्याशु हि विषं किञ्चित्किञ्चिद्रोगाय कल्पते ।
यथा विषं तथैवान्त्यो ज्ञेयो मद्यकृतो मदः ॥ ९६ ॥
तस्मात्रिदोषजं लिङ्गं सर्वत्रापि मदात्यये ।
दृश्यते रूपवैशेष्यात्पृथक्त्वं चास्य लक्ष्यते ॥ ९७ ॥

विषांत जे जे त्रिदोष प्रकुपित करण्याचे गुण आहेत ते सर्व गुण मद्यांत आहेत. फरक इतकाच कीं, मद्यांत ते सौम्य स्वरूपांत आहेत, आणि विषांत जोरदार आहेत. एखादें विष तावडतोब प्राणघात करितें व एखादें कांहीं रोग उत्पन्न करितें. तीच स्थिति मदात्ययाची आहे. मागें मदाची जी शेवटची अवस्था सांगितली आहे तिच्या व विषाच्या परिणामांत कांहीं अंतर नाहीं. ह्मणूनच सर्व प्रकारच्या मदात्ययांत त्रिदोषांचीं लक्षणें आढळतात. परंतु ज्यांत ज्यांची विशेषता असेल त्याचें नांव त्यास देतात.

शरीरदुःखं बलवत्सम्मोहो हृदयव्यथा ।
अरुचिः प्रतता तृष्णा ज्वरः शीतोष्णलक्षणः ॥ ९८ ॥
शिरःपार्श्वास्थिसन्धीनां विद्युत्तुल्या च वेदना ।
जायतेऽतिबला जृम्भा स्फुरणं वेपनं श्रमः ॥ ९९ ॥
उरोविबन्धः कासश्च हिक्का श्वासः प्रजागरः ।
शरीरकम्पः कर्णाक्षिमुखरोगस्त्रिकग्रहः ॥ १०० ॥
छर्द्यतीसारमुत्क्लेशो वातपित्तकफात्मकः ।
भ्रमः प्रलापो रूपाणामसतां चैव दर्शनम् ॥ १०१ ॥
तृणभस्मलतापर्णपांशुभिश्चावपूरणम् ।
प्रधर्षणं विहङ्गैश्च भ्रान्तचेता स मन्यते ॥ १०२ ॥

व्याकुलानामशस्तानां स्वप्नानां दर्शनानि च ।
मदात्ययस्य रूपाणि सर्वाण्येतानि लक्षयेत् ॥ १ ३ ॥
सर्वं मदात्ययं विद्यात्रिदोषमधिकन्तु यत् ।
दोषं मदात्यये पश्येत्तस्यादौ प्रतिकारयेत् ॥ १०४ ॥
कफस्थानानुपूर्व्या च क्रिया कार्या मदात्यये ।
पित्तमारुतपर्यंतः प्रायेण हि मदात्ययः ॥ १०५ ॥

प्रबल शरीर क्लेश, मोह, हृदयपीडा, अरुचि, अत्यंत तहान, थंडीच्या किंवा उष्णतेच्या लक्षणांनीं युक्त असा ताप, डोकें, बरगडच्या व हाडांचे सांधे यांत विजेच्या धक्याप्रमाणें चमका मारणें, मोठमोठ्या जोराच्या जांभया, अंग फडकणें. कांपरें भरणें, थकवा येणें, छातींत भरून आल्याप्रमाणें—अडकल्याप्रमाणें वाटणें, खोकला, उचकी, श्वास, झोंप न येणें, शरीर कांपणें, कान-डोळे व तोंड यांचे रोग, माकड हाड आखडणें, उलटी, अतिसार, तीन्ही दोष चाळवणें, भ्रम, बडबड, भलतींच खोटीं दृश्यें दृष्टीस पडणें, गवत, राख, वेली, पानें, धूळ यांनीं शरीर आच्छादित झाल्यासारखें वाटणें, पक्ष्यांनीं आपणांस धमकावलें अशी चित्तास भ्रांति होणें आणि अनेक प्रकारचीं व्याकुलता जनक वाईट-अशुभ स्वप्नें पडणें हीं सर्व मदात्ययाचीं लक्षणें समजावीं. सर्व मदात्यय त्रिदोषजनित असतात. ह्मणजे त्यांत तिन्ही दोष बिघडलेले असतात. परंतु त्यांत ज्या दोषाचें वर्चस्व दिसून येईल त्याचें अगोदर निवारण करावें. आणि जर सर्व दोष सारखेच बिघडले असेल तर प्रथम कफाची, नंतर पित्ताची आणि शेवटीं वायुची अशी क्रमानें चिकित्सा करावी. कारण मदात्ययांत बहुधा प्रथम कफाचा बिघाड होतो आणि नंतर पित्त व वायु हे वाढतात.

मिथ्यातिहीनपीतेन यो व्याधिरुपजायते ।
समपीतेन तेनैव स मद्येनोपशाम्यति ॥ १०६ ॥
जीर्णममद्यदोषाय मद्यमेव प्रदापयेत् ।
प्रकाङ्क्षा लाघवे जाते यद्यदस्मै हितं भवेत् ॥ १०७ ॥
सौवर्चलानुसंविद्धं शीतं सविडसैन्धवम् ।
मातुलुङ्गार्द्रकोपेतं जलयुक्तं प्रमाणवित् ॥ १०८ ॥

तीक्ष्णोष्णेनातिमात्रेण पीतेनाम्लविदाहिना ।
मद्येनान्नरसक्लेदो विदग्धः क्षारतां गतः ॥ १०९ ॥
अन्तर्दाहं ज्वरं तृष्णां प्रमोहं विभ्रमं मदम् ॥
जनयत्याशु तच्छान्त्यै मद्यमेव प्रदापयेत् ॥ ११० ॥
क्षारो हि याति माधुर्यं शीघ्रमम्लोपसंस्कृतः ।
श्रेष्ठमम्लेषु मद्यञ्च यैर्गुणैस्तान्परं शृणु ॥ १११ ॥
मद्यस्याम्लस्वभावस्य चत्वारोऽनुरसाः स्मृताः ।
मधुरश्च कषायश्च तिक्तः कटुक एव च ॥ ११२ ॥
गुणाश्च दश पूर्वोक्तास्तैश्चतुर्दशभिर्गुणैः ।
सर्वेषां मद्यमम्लानामुपर्युपरि तिष्ठति ॥ ११३ ॥

विधिविपरीत-गैरशिस्त रीतीनें प्यालयानें, जास्तप्यालयानें अथवा कमी प्याल्यांनें जो रोग उत्पन्न होतो तो त्याच ह्मणजे गुळाच्या, द्राक्षाच्या अथवा अन्य ज्या जातीच्या मद्यानें रोग उत्पन्न झाला असेल त्याच जातीचें मद्य समप्रमाणानें प्यालें असतां बरा होतो याचें कारण मागें सांगितलेंच आहे कीं, मद्य विषाप्रमाणें आहे. विष जसें विषानें उतरतें तसें मद्य मद्यानें उतरतें. यावर अशी शंका येईल कीं, एक जातीचें विष उतरण्यास दुसऱ्या जातीच्या विषाची गरज लागते, तसें एका जातीचें मद्य उतरण्यास दुसऱ्या प्रकारचें मद्य लागलें पाहिजे. याचें उत्तर मागेंच असें दिलें आहे कीं, जरी विष व मद्य या दोहोंचे गुण सारखे आहेत तरी विषांत ते फार जोरदार आहेत व मद्यांत सौम्यरूपांत आहेत. याच भेदामुळें विषास दुसऱ्या विषाची गरज लागते आणि मद्यास ती लागत नाहीं. मद्यजनित आमदोष पक्क झाल्यावर आणि मद्यपानाची इच्छा कमी झाल्यावर, त्या त्या रोग्याच्या प्रकृतिमानानुरूप त्यास हितकर असें थंड मद्य संचळ ( पादेलोण ), बिडलोण, शेंदेलोण, महाळुंगाचा व आल्याचा रस आणि पाणी मिळवून योग्य प्रमाणांत द्यावें. मूळचें तीक्ष्ण, उष्ण, आंबट व विदाही असें मद्य अतिशय प्यालयानें अन्नरसाचा द्रव

१ "यावद्दृष्टेर्न सम्भ्रांतिर्यावन्न क्षोभ्यते मनः । तावदेव विरंतव्यं मद्यपानमवतासदा" अर्थात् जोंवर डोळे फिरूं लागले नाहींत व मन क्षुब्ध झालें नाहीं तोंवर तें सम पान समजावें.

भाग जळून जाऊन क्षारत्व पावतो आणि त्यापासून अन्तर्दाह, ताप, तहान, मोह, भोंवळ, मद हे विकार ताबडतोब होतात. त्यांवर वर सांगितल्याप्रमाणें तयार केलेलें मद्यच प्यावयास द्यावें. आंबटाचा सम्पर्क झाला असतां लगेच क्षारास मधुरत्व येतें. व हेंच, मद्यानें पूर्वोक्त विकार नाहींसे होण्याचें कारण आहे. एकंदर आंबट पदार्थांत मद्य श्रेष्ठ आहे, व त्याचें कारण असें आहे कीं, मद्य मुख्यत्वें करून जरी आंबट आहे तरी त्याचे मधुर तुरट, कडू, व तिखट असे चार अनुरस अथवा उपरस आहेत. आणि मागें "लघूष्णतीक्ष्ण" इत्यादि श्लोकांत दहा गुण सांगितले आहेत. असे एकंदर चौदा गुण मद्यांत आहेत. जे दुसऱ्या कोणत्याही आंबट पदार्थांत नाहीत. ह्मणून सर्व आंबट पदार्थांत मद्य श्रेष्ठ मानलें आहे.

मद्योत्क्लिष्टेन दोषेण रुद्धः स्रोतस्सु मारुतः ।
करोति वेदनां तीव्रां शिरस्यस्थिषु सन्धिषु ॥ ११४ ॥
दोषविष्यन्दनार्थं हि तस्मै मद्यं विशेषतः ।
व्यवायि तीक्ष्णोष्णतया देयमम्लेषु सत्स्वपि ॥ ११५ ॥
स्रोतोविबन्धमुन्मथ्य मारुतस्यानुलोमनम् ।
रोचनं दीपनं चाग्नेरभ्यासात्सात्म्यमेव च ॥ ११६ ॥
रसस्रोतस्स्वरुद्धेषु मारुते चानुलोमिते ।
निवर्तन्ते विकाराश्च शाम्यन्त्यस्य मदोदयाः ।

मद्यानें चाळवलेल्या दोषानें स्रोतांत अवरुद्ध झालेला वायु डोकें हाडें व सांधे यांत तीव्र वेदना उत्पन्न करितो. अशा वेदना होत असलेल्या मनुष्याचे दोष स्रवून जाण्याकरितां त्यास मद्य प्यावयास द्यावें. यद्यपि इतर आंबट पदार्थही पुष्कळ आहेत तरी मद्य हें शरीराच्या एकंदर सूक्ष्म भागांत देखील पसरणारें तीक्ष्ण व उष्ण असल्यामुळें वरील विकारांवर इतर सर्व आंबट पदार्थांपेक्षां देण्यास श्रेष्ठ आहे. हें स्रोतें मोकळीं करून वायूचें अनुलोमन करितें, रुचि उत्पन्न करितें, अग्नी प्रदीप्त करितें व मद्य पिण्याची संवय असल्यानें त्याचें त्याच्याशीं सात्म्य झालेलें असतें रसवाही स्रोतें एकदां मोकळीं होऊन वायूचें

अनुलोमन झालें ह्मणजे पूर्वोक्त सर्व विकार नाहींसे होऊन मदादिकांचें शमन होतें.

बीजपूरकवृक्षाम्लकोलदाडिमसंयुतम् ।
यमानीहपुषाजाजीशृङ्गवेरावचूर्णितम् ॥ ११८ ॥
सस्नेहैः सक्तुभिर्युक्तमर्द्धदशैश्चिरोत्थितम् ।
दद्यात्सलवणं मद्यं पैष्टिकं वातशान्तये ॥ ११९ ॥
दृष्ट्वा वातोल्बणं लिङ्गं रसैश्चैनमुपाचरेत् ।
लावतित्तिरदक्षाणां स्निग्धाम्लैः शिखिनामपि ॥ २० ॥
पक्षिणां मृगमत्स्यानामानूपानाञ्च संस्कृतैः ।
भूशयप्रसहानाञ्च रसैः शाल्योदनेन च ॥ १२१ ॥
स्निग्धोष्णलवणाम्लैश्च वेशवारैर्मुखप्रियैः ।
चित्रैर्गोधूमिकैश्चान्नैर्वारुणीमण्डसंयुतैः ॥ १२२ ॥
पिशितार्द्रकगर्भाभिः स्निग्धाभिर्धूपवर्तिभिः ।
माषपूपलिकाभिश्च वातिकं समुपाचरेत् ॥ १२३ ॥
नातिस्निग्धं न चाम्लेन युक्तं समरिचार्द्रकम् ।
मध्ये प्रागुदितं मांसं दाडिमस्वरसेन वा ॥ १२४-
पृथक्त्रिजातकोपेतं सधान्यमरिचार्द्रकम् ।
रसप्रलेपिसम्पूपैः सुखोष्णैः सम्प्रदापयेत् ॥ १२५ ॥
भक्तेन वारुणीमण्डं दद्यात्पातुं पिपासवे ।
दाडिमस्य रसं वाथ जलं वा पाञ्चमूलिकम् ॥ १२६ ॥
धान्यनागरतोयञ्च दाधिमण्डमथापि वा ।
अम्लकाञ्जिकमण्डं वा शुक्तोदकमथापि वा ॥ १२७ ॥
कर्मणानेन सिद्धेन विकार उपशाम्यति ।
मात्राकालप्रयुक्तेन बलं वर्णश्च वर्धते ॥ १२८ ॥
रागषाडवसंयोगैर्विविधैर्भक्तरोचनैः ।
पिशितैर्बहुपिष्टान्नैर्यवगोधूमशालिभिः ॥ १२९ ॥
अभ्यङ्गोत्सादनैः स्नानैरुष्णैः प्रावरणैर्घनैः ।
घनैरगुरुपङ्कैश्च धूपैश्चागुरुजैर्घनैः ॥ १३० ॥
नारीणां यौवनोष्णानां निर्दयैरवगूहनैः ।
श्रोण्यूरुकुचभारैश्च संरोधोष्णसुखावहैः ॥ १३१ ॥

शयनाच्छादनैरुष्णैरूक्षश्चान्तर्गृहैः सुखैः ।
मारुतप्रबलः शीघ्रं प्रशाम्यति मदात्ययः ॥ १३२ ॥

वातिक मदात्ययांत जुनें पिठाचें मद्य, महाळुंग, आमसोल, बोर व डाळिंब यांचा रस, आणि ओंवा, शेरणी, जिरें, सुंठ यांचें चूर्ण व स्नेहयुक्त सातूचें पीठ मिळवून द्यावें. ज्या मदात्ययांत वाताचीं लक्षणें विशेष दिसूं लागतील त्यांत लावा, तित्तर, कोंबडा, मोर, यांच्या मांसाचे शोरुवे तसेंच आनूप, भूशय व प्रसह पशु—पक्षी यांच्या मांसाचे शोरुवे, माशांचे शोरुवे हे स्नेहयुक्त करून व आंबटाण टाकून त्याबरोबर साळींचा भात खाऊं घालावा. स्निग्ध, उष्ण, खारट, व आंबट असे तोंडास रुचकर लागणारे मांसाचे पदार्थ नानाप्रकारचे वारुणीमंडमिश्रित गव्हांचे पदार्थ, मांस व आलें यांचें पुरण घालून केलेल्या स्निग्ध धूपवर्ती व उडदाचे वडे हेही प्रकार वातप्रधान मदात्ययांत हितकर आहेत. फार स्निग्ध नाहींत व फार आंबट नाहींत असे वर सांगितलेल्या मांसाचे शोरुवे—काळीं मिरें, आलें, व डाळिंबाचा अंगरस टाकून द्यावें. किंवा तेजपत्र, वेलची, दालचिनी, धणे, काळीं मिरें व आलें हा मसाला टाकून तयार केलेल्या शोरुव्यांबरोबर सोसे इतके उन्हुनीत वडे खावयास द्यावे. ज्यांस तहान लागत असेल त्यांस जेवतांना मद्याचें मांड, डाळिंबाचा रस, लघु पंचमूळांचा काढा, धणे व सुंठ यांचा काढा, दह्यांवरचें पाणी, आंबट कांजीचें मंड किंवा, शिरका प्यावयास द्यावा. याप्रमाणें यथासमय व यथाप्रमाण उपचार केल्यानें विकारांची शांति होऊन रोग्याचें बल व वर्ण यांचीही वृद्धि होते. मोरंबे अनेक प्रकारच्या चटण्या, कोशिंबिरी, रायतीं, लोणचीं वगैरे तोंडास रुचि देणारे पदार्थ, मांसपदार्थ, अनेक प्रकारचे पिठाचे पदार्थ, गहूं व साळी यांचे अनेक तऱ्हेचे पदार्थ, अंगास तैल मर्दन करणें, उटणें लावणें, स्नान करणें, गरम व जाड वस्त्रें पांघरणें, अगराची जाड उटी लावणें, अगराचा खूप दाट धूर घेणें, तारुण्यानें मुसमुसलेल्या स्त्रियांचें घट्ट आलिंगन, त्यांची कंबर, मांड्या व कुच यांच्या भारानें दबून गेल्यामुळें वाटणारी सुखदायक

ऊब, गरम बिछाना व पांघरुण, आणि स्नान व सुखदायक तळवटें या उपचारांनीं वातजन्य मदात्यय लवकर बरा होतो,

मद्यं खर्जूरमृद्वीका परूषकरसैर्युतम् ।
सदाडिमरसं शीतं सक्तुभिः स्वक्षचूर्णितम् ॥ १३३ ॥
सशर्करं शार्करं वा माध्वीकमथवापरम् ।
दद्याद्बहूदकं काले पातुं पित्तमदात्यये ॥ १३४ ॥
शशान्कपिञ्जलानेणान्लावानसितपुच्छकान् ।
मधुराम्लान्प्रयुञ्जीत भोजने शालिषष्टिकान् ॥ १३५ ॥
पटोलयूषमिश्रं वा छागलं कल्पयेद्रसम् ।
सतीनमुद्गमिश्रं वा दाडिमामलकान्वितम् ॥ १३६ ॥
द्राक्षामलकखर्जूरपरूषकरसेन वा ॥
कल्पयेत्तर्पणान्यूषान्रसांश्च विविधात्मकान् ॥ १३७ ॥

पित्तप्रधान मदात्ययांत खजूर, द्राक्षें, पिकलेलीं फालशाचीं फळें व डाळिंब यांचा रस, लाह्यांचें पीठ व खडीसाखर यांबरोबर साखरेचें, मधाचें किंवा दुसरें एखादें थंड मद्य पुष्कळसें पाणी घालून द्यावें. ससा, पांढरा तितर, हरिण, लावा, कालपुच्छ यांच्या मांसाचे मधुर व आंबट असे शोरुवे करून त्यांबरोबर साठेसाळींचा भात जेवावा. अथवा कडू पडवळीचें कढण मिळवून बकऱ्याच्या मांसाचा शोरुवा करावा. किंवा वाटाणे व मूग घालून व डाळींब आणि आंवळकाठी मिळवून बकऱ्याच्या मांसाचा शोरवा करून त्याबरोबर साळींचा भात खाऊं घालावा. याच तऱ्हेनें द्राक्षें, आंवळे, खजूर, फालसा यांचे रस मिळवून निरनिराळ्या प्रकारचीं तर्पणें, कढणें, व शोरुवे बनवून ते सेवन करावे म्हणजे पित्तजन्य मदात्यय बरा होतो.

आमाशयस्थमुत्क्लिष्टं कफपित्ते मदात्यये ।
विज्ञाय बहुदोषस्य दह्यमानस्य तृष्यते ॥ १३८ ॥
मद्यं द्राक्षारसं तोयं दत्वा तर्पणमेव वा ।
निःशेषं वामयेच्छीघ्रमेवं रोगाद्विमुच्यते ॥ १३९ ॥

काले पुनस्तर्पणाद्यं कर्म कुर्यात्प्रकाङ्क्षिते ।
तेनाग्निर्दीप्यते तस्य दोषशेषान्नपाचनः ॥ १४० ॥

मदात्ययांत आमाशयांतील कफ व पित्त हीं चाळवलीं जाऊन अंगाचा दाह होत असेल व तहान लागत असेल अशा बहुदोषी रोग्यास लागलेंच मद्य, द्राक्षारस अथवा थंड पाणी पाजून उलटी करवावी. ह्मणजे सर्व दोष निघून जाऊन रोगी बरा होतो. वमन झाल्यानंतर क्षुधा लागली असतां सूत्रस्थानांत सांगितलेला पेया–विलेपी वगैरे तर्पणक्रम करावा. त्यायोगानें अग्नी प्रदीप्त होऊन शिल्लक राहिलेला दोष व अन्न याचें पचन करितो.

कासे सरक्तनिष्ठीवे पार्श्वस्तनरुजोस्तथा ।
तृष्यते सविदाहे च सोत्क्लेशे हृदयोरसि ॥ १४१ ॥
गुडूचीभद्रमुस्तानां, पटोलस्याथवा भिषक् ।
रसं सनागरं दद्यात्तित्तिरिप्रतिभोजनम् ॥ १४२ ॥

पित्तमदात्ययांत खोकला येऊन त्याबरोबर रक्तमिश्रित बेडका पडत असेल, बरगड्या व स्तनांत दुखत असेल, तहान लागत असेल, दाह होत असेल आणि हृदय व छातींत मळमळ होत असेल तर गुळवेल व भद्रमोथा यांचा अथवा कडू पडवळाचा काढा सुंठीचें चूर्ण घालून द्यावा आणि वर तित्तराचें थोडेंसें मांस खावयास द्यावें.

तृष्यते चातिबलवद्वातपित्ते समुद्धते ।
दद्याद्द्राक्षारसं पातुं शीतं दोषानुलोमनम् ॥ १४३ ॥
जीर्णे समधुराम्लेन छागमांसरसेन तम् ।
भोजनं भोजयेन्मद्यस्यानुतर्षञ्च पाययेत् ॥ १४४ ॥
अनुतर्षस्य मात्रा सा यया नो हन्यते मनः ।
तृष्यते मद्यमल्पाल्पं प्रदेयं स्याद्बहूदकम् ॥ १४५ ॥
तृष्णा येन च संशाम्येन्मदं येन च नाप्नुयात् ।
परूषकाणां पीलूनां रसं शीतमथापि वा ॥ १४६ ॥

पर्णिनीनां चतसृणां पिबेद्वा शिशिरं जलम् ।
मुस्तदाडिमलाजानां तृष्णाघ्नं वा पिबेद्रसम् ॥ १४७ ॥
कोलदाडिमवृक्षाम्लचुक्रीकाचुक्रिकारसः ।
पञ्चाम्लको मुखालेपः सद्यस्तृष्णां नियच्छति ॥ १४८ ॥
शीतलान्यन्नपानानि शीतशय्यासनानि च ।
शीतवातजलस्पर्शाः शीतान्युपवनानि च ॥ १४९ ॥
क्षौमपद्मोत्पलानाञ्च मणीनां मौक्तिकस्य च ।
चन्दनोदकशीतानां स्पर्शाश्चन्द्रांशुशीतलाः ॥ १५० ॥
हेमराजतकांस्यानां पात्राणां शीतवारिभिः ।
पूर्णानां हिमपूर्णानां हृतानां पवनाहताः ॥ १५१ ॥
संस्पर्शाश्चन्दनार्द्राणां नारीणाञ्च समारुताः ।
चन्दनानाञ्च मुख्यानां शस्ताः पित्तमदात्यये ॥ १५२ ॥
कुमुदोत्पलपत्राणां सिक्तानां चन्दनाम्बुना ।
हिताः स्पर्शा मनोज्ञानां दाहे मद्यसमुत्थिते ॥ १५३ ॥
कथाश्च विविधाः शस्ताः शब्दाश्च शिखिनां शिवाः ।
तोयदानाञ्च शब्दा हि शमयन्ति मदात्ययम् ॥ १५४ ॥
जलयन्त्राभिवर्षीणि वातयन्त्रवहानिच ।
कल्पनीयानि भिषजा दाहे धारागृहाणि च ॥ १५५ ॥
फलिनी सेव्यलोध्राम्बुहेमपत्रं कुटन्नटम् ।
कालीयकरसोपेतं दाहे शस्तं प्रलेपनम् ॥ १५६ ॥
बदरीपल्लवोत्थाश्च तथैवारिष्टकोद्भवाः ।
फेनिलायाश्च यः फेनस्तैर्दाहे लेपनं शुभम् ॥ १५७ ॥
सुरा समण्डा दध्यम्लं मातुलुङ्गरसो मधु ।
सेकप्रदेहे शस्यन्ते दाहघ्नाः साम्लकाञ्जिकाः ॥ १५८ ॥
परिषेकावगाहेषु व्यञ्जनानाञ्च सेवने ।
शस्यते शिशिरं तोयं दाहतृष्णाप्रशान्तये ॥ १५९ ॥
मात्राकालप्रयुक्तेन कर्मणानेन शाम्यति ।
धीमतो वैद्यवश्यस्य शीघ्रं पित्तमदात्ययम् ॥ १६० ॥

वायु व पित्त हे दोष वाढले असून फार तहान लागत असल्यास सदरहू दोषांचें अनुलोमन करणारा थंड असा द्राक्षांचा रस प्यावयास द्यावा. आणि तो जिरल्यावर गोड व आंबट पदार्थ घालून तयार केलेल्या बकऱ्याच्या मांसाच्या शोरव्याबरोबर त्यास जेऊं घालावें व पेलाभर मद्य पिण्यास द्यावें. पेल्याचें प्रमाण इतकें बेताचें असावें कीं ज्याच्या योगानें मनास धक्का पोंचणार नाहीं. तहान लागल्यास, तिचें तर शमन होईल व अंमल तर येणार नाहीं अशा बेतानें थोडें थोडें मद्य पुष्कळसें पाणी घालून देत जावें. अथवा फालसा किंवा पिलूचीं फळें अथवा रानगांजा–रानभाल–रानमूग–रानउडीद यांचा थंड काढा किंवा थंड पाणी, अथवा नागरमोथा, डाळिंब व लाह्या घालून उकळलेलें तहान शमविणारें पाणी प्यावें. बोरें, डाळिंब, आमसोल, चिंच व चुका या पांच आंबट पदार्थांच्या रसांचा तोंडांत लेप केल्यानें ह्मणजे यांचा काढा करून त्याचे गुळणे तोंडांत धरल्यानें ताबडतोब तहान शांत होते. थंड खाणें पिणें, थंडगार बैठक–बिछाने, थंड वायु व पाण्याचा स्पर्श, थंडगार सावलीचे बगीचे; चंदनमिश्रित पाणी शिडकून गार केलेलें रेशमी वस्त्र, निरनिराळ्या जातीचीं कमळें, मणी, व मोत्यें, यांचा चंद्रिकेप्रमाणें शीतळ स्पर्श; गार पाण्यानें भरलेल्या सोनें, रुपें व कांशाच्या भांड्यांचा स्पर्श, बर्फानें किंवा खूब गार पाण्यानें भरलेल्या चामड्याच्या पिषव्यांचा, अंगास चंदनाची उटी लाविलेल्या स्त्रियांचा व चंदनाचा स्पर्श हे पित्तजन्य मदात्ययांत प्रशस्त आहेत. मदात्ययांत दाह होत असल्यास चंदनाचें पाणी शिडकलेलीं निरनिराळ्या जातीचीं सुंदर कमळपत्रें अंगावर ठेवावीं. नानाप्रकारच्या मनोहर गोष्टी, मोरांचा मधुर केकाध्वनि, व मेघांचा गडगडाट यांच्या योगानेंही मदात्ययाचें शमन होतें. मदात्ययांत दाहशमन करण्याकरितां, वैद्यानें तऱ्हेतऱ्हेचे कारंजे व वारा येण्याचीं यांत्रिक साधनें असलेलीं स्नानगृहें तयार करवावीं. बोरीचीं पानें, कडू निंबाचीं पानें व रिठे यांच्या फेंसांचा लेप

लावला असतां अंगाचा दाह कमी होतो. सुरामण्ड, आंबट दहीं, महाळुंगाचा रस, मध, व आंबट कांजी हीं अंगावर शिंपडलीं असतां व यांचा लेप लावला असतां दाह बंद होतो. दाह बंद होण्याकरितां जे सेचन अवगाहन उपचार केले जातील व तहान बंदहोण्याकरितां जे, खाण्यापिण्याचे पदार्थ उपयोगांत आणले जातील त्या सर्वांत थंड पाणी वापरावें. वर सांगितलेले सर्व उपचार योग्य प्रमाणांत व योग्य काळीं होत गेले आणि रोगी बुद्धिवान् असून तो वैद्याच्या सांगण्याप्रमाणें वागत गेला तर त्याचा पित्तमदात्यय लवकर बरा होतो.

उल्लेखनोपवासाभ्यां जयेत्कफमदात्ययम् ।
तृष्यते सलिलं चास्मै दद्याद्ध्रीवेर साधितम् ॥ १६१ ॥
बलायाः पृश्निपर्ण्या वा कण्टकार्याथवाशृतम् ।
सनागराभिः सर्वाभिर्जलं वा शृतशीतलम् ॥ १६२ ॥
दुःस्पर्शितेन मुस्तेन मुस्तपर्पटकेन वा ।
जलं मुस्तैः शृतं वापि दद्याद्दोषविपाचनम् ॥ १६३ ॥
एतदेव च पानीयं सर्वत्रापि मदात्यये ।
निरत्ययं पीयमानं पिपासाज्वरनाशनम् ॥ १६४ ॥
निरामं काङ्क्षितं काले सक्षौद्रं पाययेन्नुतम् ।
शार्करं मधु वा जीर्णमरिष्टं शीधुमेव वा ॥ १६५ ॥
रूक्षतर्पणसंयुक्तं यमानीनागरान्वितम् ।
यवगोधूमिकं चान्नं रूक्षयूषेण भोजयेत् ॥ १६६ ॥
कुलत्थानां सुशुष्काणां मूलकानां रसेन वा ।
तनुनाल्पेन लघुना कट्वम्लेनाल्पसर्पिषा ॥ १६७ ॥
व्योषयूषमथाम्लं वा यूषं वा साम्लवेतसम् ।
छागमांसरसं रूक्षमम्लं वा जाङ्गलं रसम् ॥ १६८ ॥
स्थाल्यां वाथ कपाले वा भृष्टं निर्द्रववार्तितम् ।
कट्वम्ललवणं मांसं भक्षयन्नुणुयान्मधु ॥ १६९ ॥

त्र्यक्षमारीचकं मांसं मातुलुङ्गरसान्वितम् ।
भृष्टं दाडिमसाराम्लमुष्णयूषोपवेष्टितम् ॥ १७० ॥
यथाग्निभक्षयेत्काले प्रभूतार्द्रकपेशिकम् ।
पिबेच्च निगदं मद्यं कफप्राये मदात्यये ॥ १७१ ॥
सौवर्चलमजाजी च वृक्षाम्लं साम्लवेतसम् ।
त्वगेलामरिचार्धांशं शर्कराभागयोजितम् ॥ १७२ ॥
एतल्लवणमष्टाङ्गमग्निसन्दीपनं परम् ।
मदात्यये कफप्राये दद्यात्स्रोतोविशोधनम् ॥
एतदेव पुनर्युक्त्या मधुराम्लैर्द्रवीकृतम् ।
गोधूमान्नयवान्नानां मांसानां चातिरोचनम् ॥ १७४ ॥
पेषयेत्कटुकैर्युक्तां श्वेतां बीजविवर्जिताम् ।
मृद्वीकां मातुलुङ्गस्य दाडिमस्य रसेन वा ॥ १७५ ॥
सौवर्चलैलामरिचैरजाजीभृंगदीप्यकैः ।
सरागः क्षौद्रसंयुक्तः श्रेष्ठो रोचनदीपनः ॥ १७६ ॥
मृद्वीकानां विधानेन कारयेत्कारवीमपि ।
युक्तमत्स्यण्डिकोपेतं रागं दीपनपाचनम् ॥ १७७ ॥
आम्रामलकपेशीनां रागान्कुर्यात्पृथक् पृथक् ।
धान्यसौवर्चलाजाजीकारवीमरिचान्वितान् ॥ १७८ ॥
गुडेन मधुयुक्तेन व्यक्ताम्लवणीकृतान् ।
तैरन्नं रोचते दिग्धं सम्यग्भुक्तं विजीर्यति ॥ १७९ ॥
रूक्षोष्णेनान्नपानेन स्नानेनाशिशिरेण च ।
व्यायामलङ्घनाभ्याञ्च युक्ताभ्यां जागरेण तु ॥ १८० ॥
कालयुक्तेन रूक्षेण स्नानेनोद्वर्तनेन च ।
स्नानवर्णकवासानां प्रहर्षाणाञ्च सेवया ॥ १८१ ॥
घ्राणवर्णकराणाञ्च गुरूणामगुरोरपि ।
सकामोष्णसुखाङ्गीनामङ्गनानाञ्च सेवया ॥ १८२ ॥
सुखशिक्षितहस्तानां स्त्रीणां संवाहनेन च ।
मदात्ययः कफप्रायः शीघ्रमेवोपशाम्यति ॥ १८३ ॥

कफमदात्यय वांति व उपास यांनीं बरा करावा. तहान लागली असतां वाळा, चिकणा, पिठवण, रिंगणी व सुंठ यां पैकीं कोणती तरी एक जिन्नस टाकून कढविलेलें किंवा वरील सर्व द्रव्यें टाकून उकळलेलें पाणी थंड करून प्यावयास द्यावें. किंवा धमासा व नागरमोथा, नागरमोथा व पित्तपापडा, किंवा नुस्ता पित्तपापडा टाकून कढविलेलें पाणी द्यावें. हें पाणी दोषांचें पाचन करणारें आहे. हें पाणी सर्व प्रकारच्या मदात्ययांत देण्यास हरकत नाहीं. यापासून तहान व ज्वर हीं नाहींशीं होतात. आमदोष नाहींसा होऊन रोग्यास भूक लागली असतां त्यास साखरेचें, द्राक्षांचें किंवा उंसाचें जुनें मद्य, अथवा जुनें अरिष्ट तूप वगैरे न टाकलेल्या ह्मणजे स्नेहरहित सातू वगैऱ्यांच्या तर्पणांत मिळवून, त्यांत मध, ओंवा व सुंठीचें चूर्ण टाकून तें प्यावयास द्यावें. कुळताच्या बिनतुपाच्या काटाबरोबर गहूं किंवा जवांचें अन्न खावें. किंवा थोडें तिखट, आंबट, व तूप घालून तयार केलेल्या सुकलेल्या मुळ्यांच्या पातळशा काटवणाबरोबर खावें. सुंठ, मिरें, पिंपळी, अमसोल अथवा अम्लवेतस टाकून बिनतुपानें तयार केलेल्या बकऱ्याच्या मांसाच्या शोरव्याबरोबर किंवा ससा-हारिण वगैरे जांगल जनावरांच्या अम्लयुक्त शोरव्या बरोबर खावें. तिखट, आंबट व मीठ टाकून तपेल्यांत किंवा खापरांत कोरडें मांस भाजून तें खाऊन वर मध किंवा द्राक्षमद्य प्यावें. बरीच मिऱ्यांची पूड, महाळुंगाचा व डाळिंबाचा रस, व आल्याच्या पुष्कळशा कापऱ्या, संचळ, जिरें, अमसोल, अम्लवेतस व खडीसाखर एकेक भाग आणि दालचिनी, वेलची दाणे, आणि काळीं मिरें अर्धा अर्धा भाग याप्रमाणें हा अष्टांगलवण नांवाचा मसाला घालून भाजलेलें मांस उष्ण काटवणाबरोबर जशी भूक असेल त्याप्रमानें खाऊन वर जुनें मद्य प्यावें. उपरोक्त अष्टांगलवण उत्तम प्रकारें अग्निदीपन करणारें आहे. कफजन्य मदात्ययांत स्रोतें शुद्ध करण्याच्या कामीं तें फार उपयोगी आहे. या अष्टांगलवणांत गूळ किंवा खडीसा-

खर आणि डाळिंबाचा रस, महाळुंगाचा रस किंवा दुसरी कसलीतरी आंबटाण मिळवून तें पातळ केलें असतां गव्हांचें किंवा जवांचें अन्न अथवा मांसाबरोबर खाण्यास एक उत्तम रुचिकर तोंडीलावणें बनतें. पांढऱ्या द्राक्षांतील बिया काढून टाकून तीं द्राक्षें तिखटाबरोबर वाटावीं. आणि त्यांत महाळुंगाचा किंवा डाळिंबाचा रस आणि पादेलोण, वेलची, काळीं मिरें, जिरें, दालचिनी व ओंवा यांची पूड मिळवावी. आणि शेवटीं मध टाकावा. ह्मणजे हें एक उत्कृष्ट दीपन–पाचन करणारें पंचामृत बनतें. सदरहू द्राक्षांच्या पंचामृताच्या पद्धतीनेंच बडीशोपेचें पंचामृत खडीसाखर घालून करावें. हेंही चांगलें दीपकपाचक आहे. आंबे व आंवळे यांच्या कापट्या करून त्यांत गूळ, मध, धणे, पादेलोण, जिरें, बडीशोप, काळीं मिरें यांची पूड घालून, ह्मणझणीत आंबटाण व मीठ घालून निरानिराळे (आंब्याचा व आंवळ्याचा) मुरांबे करावे. यांच्याशीं अन्न कालवून खाल्लें असतां तें रुचिकर लागतें व त्याचें उत्तम प्रकारें पचन होतें. रूक्ष व उष्ण खाणें–पिणें, गरम पाण्याचें स्नान, देशकालानुसार योग्य कसरत व उपास, रात्रींचें जागरण, रूक्ष उटणीं अंगास लावून स्नान करणें, कामोष्ण व सुखाङ्गी स्त्रियांनीं सेवा करणें आणि हलक्या व सुशिक्षित हातांच्या स्त्रियांनीं अंग चेपणें या उपचारांनीं कफजन्य मदात्यय लवकरच बरा होतो.

यदिदं कर्म निर्दिष्टं पृथग्दोषबलम्प्रति ।
सन्निपाते दशविधे तद्विकल्प्यं भिषग्विदा ॥ १८४ ॥
यस्तु दोषविकल्पज्ञो यश्चौषधिविकल्पवित् ।
स साध्यान्साधये द्व्याधीन्साध्यासाध्यविभागवित् ॥१८५॥
वनानिरमणीयानि सपद्माः सलिलाशयाः ।
विशदान्यन्नपानानि सहत्याश्च प्रहर्षणाः ॥ १८६ ॥
माल्यानि गन्धयोगाश्च वासांसि विमलानि च ।
गान्धर्वशब्दाः कान्ताश्च गोष्ठ्यश्च हृदयप्रियाः ॥ १८७ ॥

सत्कथा हास्यगीतानां विशदाश्चैव योजनाः ।
प्रियाश्चानुगता नार्यो नाशयन्ति मदात्ययम ॥ १८८ ॥
नाक्षोभ्यं हि मनो मद्यं शरीरमवहत्य च ।
कुर्यान्मदात्ययं तस्मादेष्टव्या हर्षणी क्रिया ॥ १८९ ॥

येथपर्यंत निरनिराळ्या दोषांची जी निरनिराळी चिकित्सा सांगितली आहे ती दहा ही प्रकारच्या सन्निपातांत 'योजनाभेदें करून कुशल वैद्यानें अमलांत आणावी. याचें तात्पर्य असें कीं, मदात्यय सर्वच सान्निपातिक असतात हें मागें सांगितलेंच आहे. आतां त्याचे वाताधिक, पित्ताधिक व कफाधिक असे तीन भेद वर्णन करून त्यांची भिन्न भिन्न चिकित्सा सांगितली. आतां वातपित्ताधिक मदात्ययांत, केवल वाताधिक व केवल पित्ताधिक मदात्यांत सांगितलेली निरानिराळी चिकित्सा मिश्रित करावी. याच प्रमाणें सर्वप्रकारच्या सन्निपातांत दोषाचें कमी जास्त प्रमाण पाहून तदनुसार मिश्रित उपाय करावे. दोषांचें कमी जास्त प्रमाण, औषधांची विविध योजना व रोगाची साध्यासाध्यता इतक्या गोष्टींचें ज्या वैद्यास चांगलें ज्ञान असेल तोच साध्य रोग बरे करूं शकेल. रमणीय वनें, कमळांनीं भरलेले जलाशय, स्वच्छ खाणें–पिणें, आनंददायक सोबती, फुलें, सुगंधी द्रव्यें, निर्मल वस्त्रें, गवयांचे गायनस्वर, हृदयप्रिय गोष्टी व बायका, हास्य-विनोद, गाणें–बजावणें, सर्व प्रकारची स्वच्छ योजना, आणि प्रिय व अनुकूल स्त्रिया या गोष्टी मदात्यय नाहींसा करितात. मद्य हें मनाचा क्षोभ व शरीराचें हनन करूनच मदात्यय उत्पन्न करितें. करितां त्यावर हर्ष–आनंद उत्पन्न करणारे उपाय करावे.

आभिः क्रियाभिः सिद्धाभिः शमं याति मदात्ययः ।
न चेन्मद्यविधिं हित्वा क्षीरमस्य प्रयोजयेत् ॥ १९० ॥
लङ्घनैः पाचनैश्चैव दोषसंशोधनैरपि ।
विमद्यस्य कफे क्षीणे जाते दौर्बल्यलाघवे ॥ १९१ ॥
तस्य मद्यविदग्धस्य वातपित्ताधिकस्य वा ।
ग्रीष्मोपततस्य तरोर्यथा वर्षं तथा पयः ॥ १९२ ॥

पयसाभिहते रोगे बले जाते निवर्तयेत् ।
क्षीरप्रयोगं मद्यञ्च क्रमेणाल्पाल्पमाचरेत् ॥ १९३ ॥

वर सांगितलेले उपाय केल्यानें मदात्यय रोग बरा होतो. नच झाल्यास पूर्वोक्त मद्यविधि बंद करून दूध सुरू करावें. लंघन, पाचन, व दोष शोधन हे पूर्वोक्त उपाय करून ही ज्याचा रोग बरा होत नाहीं व सर्व शरीर मद्यानें करपून गेल्यामुळें व वात–पित्त वाढल्यामुळें कफ दोष क्षीण होऊन अशक्तपणा व कृशता आली असेल अशा मनुष्यास दूध हें इतकें हितावह आहे कीं जसें ग्रीष्म ऋतूंत उन्हानें होरपळलेल्या झाडास पावसाचें पाणी असतें. दुधाच्या सेवनानें रोग नाहींसा होऊन शक्ति आली ह्मणजे दूध बंद करून थोडें थोडें मद्य सुरू करावें. परंतु हें जो नेहमींचा पिणारा असेल त्याच्या करितां सांगितलें आहे.

विच्छिन्नमद्यः सहसा योऽतिमद्यं निषेवते ।
ध्वंसको विक्षयश्चैव रोगस्तस्योपजायते ॥ १९४ ॥
व्याध्युपक्षीणदेहस्य दुश्चिकित्स्यतमौ मतौ ।
तयोर्लिङ्गं चिकित्साञ्च यथावदुपदेक्ष्यते ॥ १९५ ॥
श्लेष्मप्रकोपः कण्ठस्य शोषः शब्दासहिष्णुता ।
तन्द्रानिद्राभियोगश्च ज्ञेयं ध्वंसकलक्षणम् ॥ १९६ ॥
हृत्कण्ठरोगः सम्मोहश्छर्दिरङ्गरुजा ज्वरः ।
तृष्णा कासः शिरःशूलमेतद्विक्षयलक्षणम् ॥ १९७ ॥

एकदां मद्याची संवय मोडल्यावर पुन्हां एकाएकीं खूब मद्य पिऊं लागल्यास त्यापासून ध्वंसक व विक्षय नांवाचे रोग होतात. अगोदर

१ मद्य व ओज यांचे गुण परस्पर विरुद्ध आहेत हें मागें सांगितलेंच आहे तेव्हां मद्यानें दग्ध झालेल्या मनुष्याचा सौम्य कफधातु व ओज हीं अर्थातच क्षीण होणार. त्या करितां दूध जें ओजाच्या समानगुणी आहे. त्याचा प्रयोग ओजोवृद्धीकरितां सांगितला आहे. स्वादु "शीतं मृदु स्निग्धं बहलं श्लक्ष्णं पिच्छिलम् । गुरुमंदं प्रसन्नञ्च गव्यं दशगुणंपयः" असे गाईच्या दुधाचे गुण मागें सांगितले आहेत व ओजांतही हेच गुण आहेत. करितां ओजोवृद्धीकरितां जेव्हां दूध घेणें असेल तेव्हां तें गाईचें घ्यावें.

मदात्ययरोगानें क्षीण झालेल्या मनुष्यास सदरहू रोग झाले असता ते दुस्साध्य समजावे. त्यांचीं यथावत् लक्षणेंव चिकित्सा यापुढें सांगतों. कफप्रकोप, घशास कोरड, शब्द सहन न होणें म्हणजे बोलण्याचा तिटकारा, आणि डोळ्यावर झांपड व झोंप असणें हीं ध्वंसकाचीं लक्षणें समजावीं. हृदय व गळ्याचे रोग, मोह, उलटी, अंग दुखणें, ताप, तहान खोकला व डोकें दुखणें हीं विट्क्षयाचीं लक्षणें जाणावीं.

तयोः कर्म तदेवेष्टं वातिके यन्मदात्यये।
तौ हि प्रक्षीणदेहस्य जायेते दुर्बलस्य वा ॥ १९८ ॥
वस्तयः सर्पिषः पानं प्रयोगः क्षीरसर्पिषोः।
अभ्यङ्गोद्वर्तनस्नानान्यनुपानञ्च वातनुत् ॥ १९९ ॥
ध्वंसको विट्क्षयश्चैव कर्मणानेन शाम्यति।
युक्तमद्यस्य मद्योत्थो न व्याधिरुपजायते ॥ २०० ॥
निवृत्तः सर्व मद्येभ्यो नरो यः स्याज्जितेन्द्रियः।
शरीरमानसैर्धीमान्विकारैर्न स युज्यते ॥ २०१ ॥

ध्वंसक व–विट्क्षयांवर वातजन्य मदात्ययावर सांगितलेली चिकित्सा करावी. हे रोग कृश किंवा अशक्त झालेल्या मनुष्यास होतात. बृंहण-बस्ती, तूप पाजणें, दूध–तुपाचा मिश्रित प्रयोग आणि वातनाशक अभ्यंग, उटणीं, स्नान व खाणें–पिणें या उपायांनीं ध्वंसक व विट्-क्षय बरे होतात. बेतानें मद्य पिणाऱ्यास मद्यापासून उत्पन्न होणारे रोग होत नाहींत. परंतु जो मद्यापासून मुळींच अलिप्त व जितेन्द्रिय राहील तो अनेक प्रकारच्या शारीरिक व मानसिक रोगांपासून मुक्त राहील.

## भवन्ति चात्र।

यत्प्रभावा भगवती सुरा पेया यथा च सा ॥
यद्द्रव्या यस्य या चेष्टा योगं चापेक्षते यथा ॥ २०२ ॥
यथा यथा मदयते येश्च युक्ता महागुणैः।
यो मदो मदभेदाश्च ये त्रयः स्वस्वलक्षणाः ॥ २०३ ॥

ये च मद्यकृता दोषा गुणा येच मदात्मकाः ।
यच्च त्रिविधमापानं यथासत्वं च लक्षणम् ॥ २०४ ॥
ये सहायाः सुखा ये च चिरक्षिप्रमदा नराः ।
मदात्ययस्य यो हेतुर्लक्षणं यद्यथा च यत् ॥ २०५ ॥
मद्यं मद्योत्थितारोगान्हान्ति यश्च क्रियाक्रमः ।
सर्वं तदुक्तमखिलं मदात्ययचिकित्सिते ॥ २०६ ॥

मद्याचा प्रभाव, तें कसें प्यावें, कोणकोणत्या पदार्थां पासून ते बनतें, कोणीं कोणतें मद्य प्यावें व त्यांत कशाचा संयोग करावा, तें कशा तऱ्हेनें मद उत्पन्न करितें, त्यांतील मोठेमोठे गुण, निरनिराळे तीन मद व त्यांचीं लक्षणें, मद्याचे दोष व मदाचे गुण, तीन प्रकारची पिण्याची बैठक व त्यांचीं पिणाऱ्यांच्या सत्वानुसार लक्षणें, बैठकींत पिण्यास कोणत्या प्रकारचे सोबती घ्यावे, मद्याचा अमल उशिरा कोणास येतो. व लौकर कोणास येतो, मदात्ययाचीं कारणें व लक्षणें, मद्यानेंच मद्यापासून होणारे रोग बरे करण्याचा विधि, आणि मदात्ययाची चिकित्सा इतके सर्व विषय या मदात्यय चिकित्सा नांवाच्या अध्यायांत विस्तार पूर्वक सांगितले आहेत.

---

# ॥ अथ त्रयोदशोऽध्यायः ॥

## द्विव्रणीयचिकित्सितम् ।

परावरज्ञमात्रेयं गतमानमदव्यथम् ।
अग्निवेशो गुरुं काले विनयादिदमुक्तवान् ॥ १ ॥
भगवन्पूर्वमुद्दिष्टौ द्वौ व्रणौ रोगसङ्ग्रहे ।
तयोर्लिङ्गं चिकित्साञ्च वक्तुमर्हसि शर्मद ॥ २ ॥
इत्यग्निवेशस्य वचो निशम्य गुरुरब्रवीत् ।
यौ व्रणौ पूर्वमुद्दिष्टौ निजश्चागन्तुरेव च ॥ ३ ॥

श्रूयतां विनिवत्सौम्य तयोर्लिङ्गञ्च भेषजम् ।
निजः शरीरदोषोत्थ आगन्तुर्बाह्यहेतुजः ॥ ४ ॥
वधबन्धप्रपतनाद्दंष्ट्रादन्तनखक्षतात् ।
आगन्तवो व्रणास्तद्वद्विषस्पर्शाग्निशस्त्रजाः ॥ ५ ॥
मन्त्रागदप्रलेपाद्यैर्भेषजैर्हेतुभिश्च ते ।
लिङ्गैकदेशैर्निर्दिष्टा विपरीता निजैर्व्रणाः ॥ ६ ॥
व्रणानां निजहेतूनामागन्तूनामसाध्यताम् ।
कुर्याद्दोषबलापेक्षी निजानामौषधं यथा ॥ ७ ॥

एके दिवशीं अग्निवेश भूतभविष्यज्ञ व मान–मद–व्यथारहित अशा आत्रेय महर्षींस विनयपूर्वक सांगता झाला कीं, हे भगवन् ! आपण मागें सूत्रस्थानाच्या अष्टोदरीय नांवाच्या १९ व्या अध्यायांत दोन प्रकारचे व्रण आहेत असें सांगितलें. तर हे लोक कल्याणकारी महर्षि ! आपण आतां त्या दोन्ही प्रकारच्या व्रणांचीं लक्षणें व चिकित्सा कृपा करून सांगावी. अग्निवेशाचें याप्रमाणें भाषण ऐकून आत्रेय ऋषि ह्मणाले, हे अग्निवेश ! पूर्वीं निज व आगन्तु असे दोन प्रकारचे व्रण मीं सांगितले आहेत; त्यांचीं लक्षणें व चिकित्सा आतां विधिपूर्वक सांगतों ती तूं ऐक. आहारादिकांनीं शरीरांतील वातादिदोष बिघडल्यानें होणारे ते निज आणि बाह्य कारणांच्या योगानें होणारे ते आगन्तु व्रण समजावे. आघात, बांधणें, पडणें, दाढ, दांत व नखें लागणें, विष व विस्तवाचा स्पर्श होणें आणि शस्त्राचा घाव या कारणांनीं आगंतु व्रण उत्पन्न होतात. मंत्र, औषध, लेप वगैरे उपायांनीं त्यांचें शमन केलें जातें. हे उपाय, वर सांगितलेलीं कारणें, व लक्षणें हीं निजव्रणांच्या विपरीत आहेत.

यथास्वैर्हेतुभिर्दुष्टा वातपित्तकफा नृणाम् ।
बहिर्मार्ग समाश्रित्य जनयन्ति निजान्व्रणान् ॥ ८ ॥
स्तब्धः कठिनसंस्पर्शो मन्दस्रावोऽतितीव्ररुक् ।
तुद्यते स्फुरति श्यावो व्रणो मारुतसम्भवः ॥ ९ ॥

सम्पूरणैः स्नेहपानैः स्निग्धैः स्वेदोपनाहनैः ।
प्रदेहैः परिषेकैश्च वातव्रणमुपाचरेत ॥ १० ॥
तृष्णामोहज्वरस्वेददाहदुष्टावदारणैः ।
व्रणं पित्तकृतं विद्याद्गन्धस्रावैः सपूतिकैः ॥ ११ ॥
शीतलैर्मधुरैस्तिक्तैः प्रदेहपरिषेचनैः ।
सर्पिः पानैर्विरेकैश्च पैत्तिकं शमयेद्व्रणम् ॥ १२ ॥
बहुपिच्छो गुरुः स्निग्धः स्तिमितो मन्दवेदनः ।
पाण्डुवर्णोऽल्पसङ्क्लेदश्चिरकारी कफव्रणः ॥ १३ ॥
कषायकटुरूक्षोष्णैः प्रदेहपरिषेचनैः ।
कफव्रणं प्रशमयेत्तथा लङ्घनपाचनैः ॥ १४ ॥

वातादि तीन दोष आपापल्या आहार विहारसंबंधीं प्रकोपक कारणानीं कुपित होऊन त्यांनीं बाह्य मार्गाचा आश्रय केला ह्मणजे व्रण उत्पन्न होतात. ताठ, स्पर्श केला असतां कठिण, थोडथोडा स्राव होणारा, अत्यंत तीव्र वेदनायुक्त, टोंचण होत असलेला, स्फुरण पावणारा, काळ-सावळ्या रंगाचा असा जो व्रण असेल तो वातापासून झालेला समजावा. पूरण करणें, वातघ्नऔषधि–सिद्ध तूप पाजणें, स्निग्ध क्रियांनीं घाम आणणें व स्निग्ध पोटीस बांधणें, आणि वातघ्न लेप लावणें व वातघ्न औषधांच्या काढ्यानें धुणें या उपायांनीं वातव्रणाची चिकित्सा करावी. पित्तजन्य व्रणांत तहान, मोह, ताप, घाम, दाह हीं लक्षणें होऊन, व्रणांत भेगा पडतात आणि दुर्गंधयुक्त व पूमिश्रित स्राव होतो. त्यावर थंड, मधुर व कडू औषधांचा लेप, त्याच औषधांच्या काढ्यानें धुणें, घृतपान आणि विरेचन हे उपाय करावे. ज्यांतून फार बुळबुळीत पू निघतो, जो फार भारी, तुळतुळीत व ओलसर सारखा असतो, ज्यांत बारीक बारीक ठणका होतो, ज्याचा रंग फिकट पांढरा असतो, ज्यांत लस थोडी असते व जो हळूहळू वाढतो तो कफजन्य व्रण समजावा. कषाय, तिखट, रूक्ष व उष्ण लेप आणि सेचन, तसेंच लंघन-पाचन या उपायांनीं कफव्रणाचें शमन करावें.

तौ द्वौ नानात्वभेदेन निरुक्ता विंशतिर्व्रणाः ।
तेषां परीक्षा त्रिविधा प्रदुष्टा द्वादश स्मृताः ॥ १५ ॥
स्थानान्यष्टौ तथा गन्धाः परिस्रावाश्चतुर्दश ।
षोडशोपद्रवा दोषाश्चत्वारो विंशतिस्तथा ॥ १६ ॥
तथा चोपक्रमाः सिद्धाः षट्त्रिंशत्समुदाहृताः ।
विभाव्यमानाः शृणु तन्सर्वानेव यथेरितान् ॥ १७ ॥

मूळच्या निज व आगंतु प्रकाराचे अनेक भेदांनीं वीस प्रकारचे व्रण होतात. त्यांची तीन प्रकारांनीं परीक्षा केली जाते. दुष्ट व्रण बारा प्रकारचे सांगितले आहेत. व्रणांचीं स्थानें व त्यांचे वास आठ आठ प्रकारचे आहेत. व्रणांतून होणारा स्राव चौदा प्रकारचा आहे. व्रणांत सोळा प्रकारचे उपद्रव, चोवीस प्रकारचे दोष आहेत आणि त्यांवर छत्तीस खात्रीचे उपाय आहेत. ते सर्व आतां मी सांगत जातों. तूं श्रवण कर.

कृत्योत्कृत्यस्तथा दुष्टस्तथा मर्मस्थितो नव ।
संवृतो दारुणस्रावी सविषो विषमस्थितः ॥ १८ ॥
त्वक्संग्युत्सन्न एषाश्च व्रणान्विद्याद्विपर्ययात् ।
इति नानात्वभेदेन निरुक्ता विंशतिर्व्रणाः ॥ १९ ॥

कृत्योत्कृत्य (फाटलेला, चिरलेला?). दुष्ट, मर्मस्थानीं असलेला, नवा, आवळलेल्या तोंडाचा, अत्यंत वाहणारा, विषारी, विषम (अडचणीच्या) जागीं असलेला, कातडीशीं चिकटून असलेला, उभरलेला हे दहा प्रकार आणि यांच्याच उलट दहा प्रकार असे एकंदर वीस प्रकारचे व्रण आहेत.

दर्शनप्रश्नसंस्पर्शैः परीक्षा त्रिविधा स्मृता ।
वयोवर्णशरीराणामिन्द्रियाणाञ्च दर्शनात् ॥ २० ॥
हेत्वर्तिसात्म्याग्निबलं परीक्ष्यं वचनाद्बुधैः ।
स्पर्शान्मार्दवशैत्ये च परीक्ष्ये सविपर्यये ॥ २१ ॥

पाहणें, प्रश्न विचारणें व स्पर्श करणें या तीन प्रकारांनीं व्रणांची परीक्षा केली जाते. वय, वर्ण, शरीर व इन्द्रियें यांची परीक्षा पाहून

करावी. व्रणाचें कारण, त्यांत होणाऱ्या वेदना, रोगाचें सात्म्य व अग्निबल हीं रोग्यास विचारून समजून घ्यावीं. व्रणांचा मऊपणा—कठिणपणा, शीतता—उष्णता हीं हात लावून पहावीं.

श्वेतोपसन्नवर्त्मातिस्थूलवर्त्मातिपिञ्जरः ।
नीलः श्यावोऽतिपिडको रक्तः कृष्णोऽतिपूतिकः ॥ २२ ॥
रौप्यः कुम्भीमुखश्चेति प्रदुष्टा द्वादशव्रणाः ।
कल्पेनानेन दोषाणां चतुर्विंशतिरुच्यते ॥ २३ ॥

श्वेतवर्त्मा (व्रण फाटला असतां आंतला भाग पांढरा दिसतो) उपसन्न (जवळ असलेला) वर्त्मा, अतिस्थूलवर्त्मा, अतिपिञ्जर (अतिशय पिंगट) निळा; काळसांवळा, अतिपिडक, (अतिशय फोड असलेला) लाल, कृष्ण, अतिपूतिक (अतिशय सडलेला) रौप्य व कुंभीमुख असे एकंदर बारा दुष्ट व्रण आहेत. याप्रमाणें एकंदर २४ दोष होतात.

त्वक्शिरामांसमेदोऽस्थिस्नायुमर्मान्तराश्रयाः ।
व्रणस्थानानि निर्दिष्टान्यष्टावेतानि सङ्ग्रहे ॥ २४ ॥
सर्पिस्तैलवसापूयरक्तश्यावाम्लपूतिकाः ।
व्रणानां व्रणगन्धज्ञैरष्टौ गन्धाः प्रकीर्तिताः ॥ २५ ॥

चामडी, शिरा, मांस, चरबी, हाडें, स्नायु, मर्मस्थानें आणि शरीरांतील पक्वाशय, वगैरे आशय या व्रणांच्या मुख्य आठ जागा आहेत. तूप, तेल, चरबी, पू, रक्त व प्रेत यांच्या सारखा, आंबट व सडलेला असे एकंदर आठ प्रकारचे वास व्रणांतून निघणाऱ्या स्रावास येतात असें व्रणांचे गंध जाणणाऱ्यांनीं ठरविलें आहे.

लसीकाजलपूयासृग्घरितारुणपिञ्जराः ।
कषायनीलहरितस्निग्धरूक्षसितासिताः ॥ २६ ॥
इति रूपैः समुद्दिष्टैर्व्रणस्रावाश्चतुर्दश ।
विसर्पः पक्षघातश्च शिरास्तम्भोऽपतानकाः ॥ २७ ॥
मोहोन्मादव्रणरुजो ज्वरस्तृष्णा हनुग्रहः ।

कासश्छर्दिरतीसारो हिक्का श्वासः सवेपथुः ।
षोडशोपद्रवाः प्रोक्ता व्रणानां व्रणचिन्तकैः ॥ २८ ॥

लस, पाणी, पू, रक्त, हिरवा, गुलाबी, पिंगट, कषाय, (लाल-पिवळा मिळालेला), निळा, हरित, स्निग्ध, रूक्ष, पांढरा व काळा असे व्रणस्रावाचे एकंदर चौदा प्रकार दिसतात. * विसर्प, अर्धांगवायु, शिरास्तंभ, अपतानक, मोह, उन्माद, व्रणांत ठणका, ताप, तहान, हनुग्रह, खोकला, उलटी, अतीसार, उचकी, श्वास व कांपरें हे सोळा उपद्रव व्रणांत होतात.

स्नायुक्लेदाच्छिराक्लेदाद्गांभीर्यात्क्रिमिदर्शनात् ।
अस्थिभेदात्सशल्यत्वात्सविषत्वाच्च सर्पणात् ॥ २९॥
नखकाष्ठप्रभेदाच्च चर्मलोमातिघट्टनात् ।
मिथ्याबन्धादतिस्नेहादतिभैषज्यकर्षणात् ॥ ३० ॥
अजीर्णादतिभुक्ताच्च विरुद्धासात्म्यभोजनात् ।
शोकात्क्रोधाद्दिवास्वप्नाद्व्यायामान्मैथुनात्तथा ॥ ३१ ॥
व्रणा न प्रशमं यान्ति निष्क्रियत्वाच्च देहिनाम् ।
परिस्रावाच्च गन्धाच्च दोषश्चोपद्रवैःसह ॥ ३२ ॥

स्नायु व शिरा कुजल्यास, जखम खोल असल्यास, कृमी पडले असल्यास, हाडांत व्रण पोंचला असल्यास, जखमेंत कांटा वगैरे असल्यास, जखम वि-

---

* १ आंग्लवैद्यकानुसार या उपद्रवांची गणना 'टेटनस' (धनुस्तंभ) जातीच्या रोगांत केली जाते. लहान मुलाची नाळ कापण्यांत कांहीं चूक झाल्यास उत्तुंडिता वगैरे धनुस्तंभाच्या जातीचे रोग होतात. म्हणून नाळ कापतांना फार हुशारी बाळगावी लागते. क्षताच्या योगानें वायुवाहिनीशिरा ताडित होऊन पक्षघात, शिरास्तंभ, हनुग्रह वगैरे रोग उत्पन्न होतात. कधीं कधीं हातापायाच्या बोटांस सामान्य व्रण झाल्यानें त्यापासून धनुस्तंभ झालेला पाहण्यांत येतो. इतकेंच नव्हे तर सुईनें एखादा फोड फोडल्यापासून देखील धनुस्तंभ झाल्याचे दाखले कोठें कोठें पाहण्यांत येतात. आपल्याकडे हातापायाचीं नखें चाकूनें किंवा दांतांनीं देखील वेडींवाकडीं कुरतुडण्याची सवय लागलेली असते. परंतु ही सवय फार घातुक आहे. नख जरा कमी जास्ती कापलें गेल्यास त्यापासून धनुस्तंभासारखा भयंकर परिणाम होण्याचा संभव असतो. करितां या बाबतींत फार काळजी घेतली पाहिजे. शृंगीमाशाचा कांटा लागल्यानें ही कधीं कधीं धनुस्तंभ होतो.

षारी असल्यास, ती पसरत चालल्यास, नखानें किंवा लांकडानें चिरली असल्यास, कातडी किंवा केंस फार चोळले गेल्यानें, बांधण्यांत चूक झाल्यानें, अति स्निग्धतेनें, जोरदार व अतिशय औषधांनीं शरीर कृश झालें असल्यास, अजीर्णानें, फार खाल्ल्यानें, परस्पर विरुद्ध व आपल्या प्रकृतीस न सोसणारें असें भोजन केल्यानें; शोक, क्रोध केल्यानें, दिवसा निजल्यानें, कसरत केल्यानें, स्त्री संग केल्यानें आणि एके ठिकाणीं रिकामपणीं राहिल्यानें, व्रण फार वाहत असल्यास, दुर्गंधि येत असल्यास, व वर सांगितलेले उपद्रव होत असल्यास व्रण बरे होत नाहींत.

**व्रणानां बहुदोषाणां कृच्छ्रत्वं चोपजायते ।**
**त्वङ्मांसजः सुखे देशे तरुणस्यानुपद्रवः ।**
**धीमतोऽभिनवः काले सुखसाध्यः स्मृतो व्रणः ॥ १३ ॥**
**गुणैरन्यतमैर्हीनस्ततः कृच्छ्रतमः स्मृतः ।**
**सर्वैर्विहीनो विज्ञेयस्त्वसाध्यो निरुपक्रमः ॥ १४ ॥**

ज्याचे दोष फार वाढले आहेत अशा रोग्यांचे व्रण कष्टसाध्य असतात. चामडी व मांसांत झालेले, बिन अडचणीच्या जागीं झालेले, तरुण व बुद्धिमान् मनुष्यास झालेले, आणि पूर्वोक्त विसर्पादि उपद्रवरहित असे व्रण सुसाध्य समजावे. सदरहू गोष्टीपैकीं कोणतीही एखादी गोष्ट विपरीत असली तर व्रण कष्टसाध्य समजावा. आणि सर्वच गोष्टी उलट असल्या, ह्मणजे व्रण असाध्य व चिकित्सेस अयोग्य समजावा.

**व्रणानामादितः कार्यं यथासन्नं विशोधनम् ।**
**ऊर्ध्वभागैरधोभागैः शस्त्रैर्बस्तिभिरेवच ॥ १५ ॥**
**सद्यः शुद्धशरीराणां प्रशमं यान्ति हि व्रणाः ।**
**यथाक्रममतश्चोर्ध्वं शृणु सर्वानुपक्रमान् ॥ १६ ॥**

व्रणांत आरंभीं शरीराचें शोधन करावें व तें शरीराच्या ज्या भागांत व्रण असेल किंवा ज्या वातादि दोषांचें व्रणांत आधिक्य असेल तदनुसार वमन

विरेचन शस्त्रक्रिया किंवा बस्ति यांच्या द्वारें करावें; ह्मणजे कफाधिक व्रण असल्यास ऊर्ध्वभागा शोधन ह्मणजे वमन करवावे. पित्तव्रण असल्यास विरेचन द्यावें. वातव्रण असल्यास बस्ति द्यावा. उक्त क्रियांनीं शरीर शुद्ध झालेलें असलें ह्मणजे शामक उपायांनीं व्रण लवकर बरे होतात. आतां यापुढें क्रमशः सर्व प्रकारच्या व्रणांची चिकित्सा सांगतों, ती श्रवण कर.

**शोफघ्नं षड्विधं चैव शस्त्रकर्मावपीडनम् ।**
**निर्वापणं ससन्धानं स्वेदः शमनमेषणा ॥ ३७ ॥**
**शोधनौ रोपणीयौ च कषायौ सप्रलेपनौ ।**
**द्वौ स्नेहौ तद्गुणौ पत्रच्छेदने द्वे च बंधने ॥ ३८ ॥**
**भोज्यमुत्सादनं दाहो द्विविधः सावसादनः ।**
**काठिन्यमार्दवकरे धूपने लेपने शुभे ॥ ३९ ॥**
**व्रणावचूर्णनं वर्ण्यं लेपनं लोमरोपणम् ।**
**इति षट्त्रिंशदुद्दिष्टा व्रणानां समुपक्रमाः ॥ ४० ॥**

सूज काढणें, सहा प्रकारची शस्त्रक्रिया, ओढे लावणें, दाह बंद करणें, जोडणें, घाम आणण्याची क्रिया करणें, शमन करणें, सळई घालणें, दोन प्रकारचे शोधन करणारे व दोन प्रकारचे जखम भरून आणणारे कषाय; शोधन व रोपण करणारे दोन लेप. शोधन व रोपण करणारे दोन प्रकारचे स्नेह, शोधन व रोपण करणारे दोन प्रकारचे पत्रच्छेदन, दोन प्रकाचे पट्टे बांधणें, व्रण नाशक भोजन, सखल असलेला व्रण वर भरून आणणें, दोन प्रकारचे डाग देणें, उभरलेला व्रण खालीं बसविणें, व्रणास कठिण करणाऱ्या व मऊ करणाऱ्या अशा दोन धुऱ्या व याच क्रिया करणारे दोन लेप, व्रणावर बसवावयाचें चूर्ण, व्रणाच्या जागच्या कातडीचा बिघडलेला रंग सारखा करणारा व त्या जागचे गेलेले केंस फिरून उत्पन्न करणारा असे लेप, याप्रमाणें व्रणाचे एकंदर छत्तीस प्रकारचे उपाय आहेत.

**पूर्वरूपं भिषग्बुध्द्वा व्रणानां शोफमादितः ।**
**रक्तावसेचनं कुर्यादजातव्रणशान्तये॥ ४१ ॥**

शोधयेद्बहुदोषाँस्तु स्वल्पदोषान्विलङ्घयेत् ।
पूर्वं कषायैः सर्पिर्भिर्जयेद्वा मारुतोत्तरम् ॥ ४२ ॥

शरीराच्या कोणत्याही भागावर सूज आली असतां हें व्रणाचें पूर्वरूप समजून पुढें व्रण होऊं नये ह्मणून वैद्यानें त्या ठिकाणचें रक्त काढवावें. जर रोग्याचे दोष फार वाढले असतील तर त्याचें वमन–विरेचनद्वारा शोधन करावें आणि अल्पदोषी रोग्यास लंघन करावयास लावावें. किंवा बहुदोषी रोग्यास वायूचा जोर असल्यास कषायवर्गांतील औषधांनीं सिद्ध केलेलें घृत द्यावें.

न्यग्रोधोदुम्बराश्वत्थप्लक्षवेतसवल्कलाः ।
ससर्पिष्कः प्रलेपः स्याच्छोफनिर्वापणं परम् ॥ ४३ ॥
विजया मधुकं वीरा बिसग्रन्थिः शतावरी ।
नलिोत्पलं नागपुष्पं प्रदेहः स्यात्सचन्दनः ॥ ४४ ॥
सक्तवो मधुकं सर्पिः प्रदेहः स्यात्सशर्करः ।
अविदाहीनि चान्नानि शोफे भेषजमुत्तमम् ॥ ४५ ॥
स चेदेवमुपक्रान्तः शोफो न प्रशमं व्रजेत् ।
तस्योपनाहैः पक्वस्य पाटनं हितमुच्यते ॥ ४६ ॥
तैलेन वा सर्पिषा वा ताभ्यां वा सक्तुपिण्डिका ।
सुखोष्णा शोफपाकार्थमुपनाहः प्रशस्यते ॥ ४७ ॥
सतिला सातसीबीज दध्यम्ला सक्तुपिण्डिका ।
सकिण्वकुष्ठलवणा शस्ता स्यादुपनाहने ॥ ४८ ॥
रुग्दाहरागतोदैश्च विदग्धं शोफमादिशेत् ।
जलबस्तिसमस्पर्शं सम्पक्वं पिण्डितोन्नतम् ॥ ४९ ॥
उमाथ गुग्गुलुः सौधं पयो दक्षकपोतयोः ।
विट् पलाशभवः क्षारो हेमक्षीरी मकूलकः ।
इत्युक्तो भेषजगणः पक्वशोथप्रभेदनः ॥ ५० ॥

वड, उंबर, पिंपळ, पायरी व वेत यांच्या साली वाटून, त्यांत तूप मिळ-

वून त्याचा लेप लावला असतां लवकर सूज उतरते. काळी निर्गुडी, ज्येष्ठमध, भुइकोहळा, कमळाचें मूळ, शतावरी, निळें कमळ, नागकेशर, व चंदन या जिनसा वाटून त्यांचा लेप लावल्यानें सूज उतरते. सातूचें पीठ, ज्येष्ठमध, तूप व खडीसाखर यांचा लेप केल्यानेंही सूज उतरते. सूज आली असतां विदाह न उत्पन्न करणारें सौम्य अन्न खाणें हेंही उत्तम औषध आहे. याप्रमाणें उपचार करूनही जर सूज उतरली नाहीं तर पोटीस बांधून ती पिकवावी. आणि मग चिरून आंतला पू वगैरे दोष काढून टाकावा. तेल * किंवा तूप अथवा तेल–तूप दोन्हीं मिळून केलेली सातूच्या पिठाची सोसे इतकी गरम वडी सुजेवर बांधावी. ह्मणजे सूज पिकते. तीळ, अळशी, सुरावीज, कोष्ठ सैंधव आणि आंबट दहीं सातूच्या पिठांत मिळवून तें शिजवावें. आणि वेताचें गरम असतां त्याची वडी सुजलेल्या जागीं बांधावी. हें चांगलें पोटीस आहे. सुजेंत जर शूल, आग, लाली व टोंचण असेल तर ती विदग्ध झाली, ह्मणजे तिच्यांत दाह सुरू झाला आहे असें समजावें; आणि सूज हात लावला असतां पाण्याच्या पखालीसारखी, पिण्डाकार ह्मणजे एके जागीं जमलेली आणि वर उभरलेली असली ह्मणजे पिकली असें समजावें. अळशी, गुग्गुळ, निवडुंगाचे दूध, कोंबडयाची अथवा पारव्याची विष्ठा, ळसाचा क्षार, पिवळा धोतरा व दंती हीं, पिकलेली सूज फोडणारीं औषधें आहेत.

सुकुमारस्य कृच्छ्रस्य शस्त्रन्तु परमुच्यते ।
पाटनं व्यधनं चैव छेदनं लेखनं तथा ।
प्रोच्छनं सीवनं चैव षड्विधं शस्त्रकर्म तत् ॥ ५१ ॥
नाडीव्रणाः पक्वशोथास्तथा क्षतगुदोदरम् ।
अन्तःशल्याश्च ये शोफाः पाट्यास्ते तद्विधाश्च ये ॥ ५२ ॥
दकोदराणि सम्पक्का गुल्मा ये ये च रक्तजाः ।
व्यध्याः शोणितरोगाश्च विसर्पपिडकादयः ॥ ५३ ॥

* वातजन्य सूज असल्यास तेल, पित्तजन्य सुजेंत तूप व रक्तपित्तजन्य असल्यास तेल–तूप दोन्ही वापरावीं असा याचा भावार्थ दिसतो.

उद्वृत्तान्स्थूलपर्यन्तानुत्सन्नान्कठिनान्व्रणान् ।
अर्शः प्रभृत्यधिमांसं छेदनेनोपपादयेत् ॥ ५४ ॥
किलासानि सकुष्ठानि लिखेल्लेख्यानि बुद्धिमान् ।
वातासृग्ग्रन्थिपिडकाः सकोठा रक्तमण्डलाः ॥ ५५ ॥
कुष्ठन्यभिहतं चाङ्गं शोथाँश्च प्रोच्छयेद्भिषक् ।
सीव्यं कुक्ष्युदराद्यं तु गम्भीरं यद्विपाटितम् ॥ ५६ ॥
इति षड्विधमुद्दिष्टं शस्त्रकर्म मनीषिभिः ।

रोगी सुकुमार असून वरील उपायांनीं त्याचा व्रण फुटत नसेल तर त्याठिकाणीं शस्त्रक्रिया करणें हाच उत्तम उपाय आहे. चिरणें, छेदणें, कापणें, झाडणें, प्रोच्छन करणें व शिवणें असे शस्त्रक्रियेचे सहा प्रकार आहेत. नाडीव्रण, पिकलेली सूज, क्षतोदर, गुदोदर आणि ज्यांत कांटा, बंदुकीची गोळी, किंवा दुसरें कोणतेंही शल्य आहे अशी सूज, या रोगांत चिरावें. जलोदर, पिकलेला गुल्म, रक्तगुल्म, आणि विसर्प, पिडका वगैरे रक्तरोग यांत छेदावें. वर उठलेले, जाड कडांचे, फार वाढलेले व कठिण व्रण आणि मूळव्याधीच्या मोडाप्रमाणें मांस वाढून होणारे व्रण यांस कापावें. किलास, कुष्ठ हीं झाडून काढावीं. वातरक्त, गांठी, पुळ्या, गांधी, रक्ताचे चट्टे, कुष्ट, बिघडलेलें अंग व सूज यांचें मार्जन करावें. कुक्ष्युदर वगैरे ज्या रोगांत पुष्कळ चिरावें लागतें त्यांत नंतर शिवावें. याप्रमाणें शस्त्रक्रियाकुशल वैद्यांनीं ही सहा प्रकारची शस्त्रक्रिया व्रणचिकित्सेच्या संबंधांत सांगितली आहे.

सूक्ष्माननाः कोषवन्तो ये व्रणास्तान्प्रपीडयेत् ॥ ५७ ॥
कलायाश्च मसूराश्च गोधूमाः सहरेणवः ।
कल्कीकृताः प्रशस्यन्ते निःस्नेहा व्रणपीडने ॥ ५८ ॥
शाल्मालीत्वग्बलामूलं तथा न्यग्रोधपल्लवाः ।
न्यग्रोधादिकमुद्दिष्टं बलादिकमथापि वा ॥ ५९ ॥
आलेपनं निर्वपणं तद्विधान्यैश्च सेचनम् ।
सर्पिषा शतधौतेन पयसा मधुकाम्बुना ॥ ६० ॥

निर्वापयेत्सुशीतेन रक्तपित्तोत्तरान्व्रणान् ।
लंबानि व्रणमांसानि प्रलिप्य मधुसर्पिषा ॥ ६१ ॥
सन्दधीत समं वैद्यो बन्धनैश्चोपपादयेत् ।
तान्समान्सुस्थिताञ्ज्ञात्वा फलिनीलोध्रकट्फलैः ॥ ६२ ॥
समंगाधातकीयुक्तैश्चूर्णितैरवचूर्णयेत् ।
पञ्चवल्कलचूर्णैर्वा शुक्तिचूर्णसमायुतैः ॥ ६३ ॥
धातकीलोध्रचूर्णैर्वा तथा रोहन्ति ते व्रणाः ।
अस्थिभग्नच्युतं सन्धि सन्दधीत समं पुनः ॥ ६४ ॥
समेन सममङ्गेन कृत्वान्येन विचक्षणः ।
स्थिरैः कवलिकाबन्धैः कुशिकाभिश्च संस्थितम् ॥ ६५ ॥
पट्टैः प्रभूतसर्पिष्कैर्बध्नीयाद्बलं सुखम् ।
अविदाहिभिरन्नैश्च पैष्टिकैस्तमुपाचरेत् ॥ ६६ ॥
ग्लानिर्हि न हिता तस्य संधिविश्लेषकारिका ।
विच्युताभिहताङ्गानां विसर्पादीनुपद्रवान् ।
उपाचरेद्यथाकालं कालज्ञः स्वचिकित्सितात् ॥ ६७ ॥

जे व्रण आंत पोकळ व पुवानें भरलेले असून ज्यांचीं तोंडें बारीक असतील त्यांवर लाख, मसुरा, गहूं व रेणुकबीज हीं, तसेंच सांवरीची साल, चिकण्याचें मूळ व वडाची पालवी हीं, एकत्र वाटून त्यांत तूप न घालतां त्यांचा सभोंवार ओढा लावावा. न्यग्रोधादि किंवा बलादि गणांतील औषधांचा किंवा तशाच गुणांच्या दुसऱ्या औषधांचा लेप लावावा. व त्यांच्या काढयानें सेचन करावें. ह्मणजे व्रणांतील दाह शांत होतो. रक्तपित्तजन्य व्रणांतील दाह शांत करण्याकारितां शंभर वेळां धुतलेलें तूप किंवा ज्येष्ठीमधाचा निवालेला काढा यांचा उपयोग करावा. व्रण फुटल्यावर त्या ठिकाणचें मांस विस्कळीत होऊन लोंबूं लागतें तें वैद्यानें, मध व तूप लावून सारखें सांधावें आणि त्यावर पट्टा बांधून टाकावा. मांस सारखें सांधलें गेलें ह्मणजे त्यावर गहुला, लोध्र, कायफळ, लाजाळू, धायटीचीं फुलें यांचें किंवा वड, उंबर, पिंपळ, पायरी,

वेत व बोरी यांच्या सालींचें चूर्ण अथवा धायटीचीं फुलें व लोध्र यांचें चूर्ण चेपून बसवावें. ह्मणजे व्रण भरून येतात. हाड मोडलें असेल किंवा सांधा निखळला असेल तर तो सारखा न हालेसा जुळवून त्यासभोंवतीं तुपांत खूप भिजलेलीं फडकीं सारख्या हातानें गुंडाळून वर वृक्षांच्या साली किंवा बांबूच्या अगदी पातळ कांबी फडक्याच्या पट्टयांनीं न हालेशा बांधाव्या. अशा रोग्यास विदाह न उत्पन्न करणारे पिठाचे पदार्थ खावयास द्यावे. त्यास ग्लानि झाल्यास सांधे ढिले पडतील; ह्मणून ती न होऊं देण्याविषयीं जपावें. निखळलेल्या किंवा दुखावलेल्या जागीं विसर्प वगैरे उपद्रव झाल्यास त्यांची योग्य काळीं त्या त्या रोगप्रकरणांत सांगितलेली चिकित्सा करावी.

शुष्का महारुजः स्तब्धा ये व्रणा मारुतोत्तराः ।
स्वेद्याः शङ्करकल्पेन ते स्युः कृशरपायसैः ॥ ६८ ॥
ग्राम्यवैलाम्बुजानूपैर्वेशवारैश्च संस्कृतैः ।
उत्कारिकाभिरुष्णाभिः सुखीस्याद्व्रणितस्तदा ॥ ६९
सदाहवेदनावन्तो ये व्रणा मारुतोत्तराः ।
तेषां तिलानुमाश्चैव भृष्टान्पयसि निर्वृतान् ॥ ७० ॥
तेनैव पयसा पिष्ट्वा कुर्यादालेपनं भिषक् ।
बला गुडूचीमधुकं पृश्निपर्णी शतावरी ॥ ७१ ॥
जीवन्ती शर्करा क्षीरं तैलमत्स्यवसामृतम् ।
संसिद्धा समधूच्छिष्टा शूलघ्नी स्नेहशर्करा ॥ ७२ ॥
द्विपञ्चमूलकथितनाम्भसा पयसाऽथ वा ।
सर्पिषा वा सतैलेन कोष्णेन परिषेचयेत् ॥ ७३ ॥
यवचूर्णं समधुकं सतैलं सह सर्पिषा ।
दद्यादालेपनं कोष्णं दाहशूलोपशान्तये ॥ ७४ ॥
उपनाहश्च कर्तव्यः सतिलोमुद्गपायसाः ।
रुग्दाहयोः प्रशमनो व्रणेष्वेषु विधिर्हितः ॥ ७५ ॥

सुकलेले अथवा कोरडे, फार दुखत असलेले, स्तब्ध अर्थात् ताठ, व वाताधिक व्रणांत तीळ, तांदूळ, उडीद व दूध यांनीं मागें सूत्रस्थानाच्या स्वेदाध्यायांत शंकरस्वेदविधि सांगितला आहे, त्या विधीनें, ग्राम्य, बिळांत राहणारे, जलज व आनूप प्राण्यांच्या मांसाच्या खिम्यांत ( बारीक कुटलेल्या मांसांत ) तूप वगैरे पदार्थ मिळवून त्यानें, किंवा गरम गरम रोटीनें शेकावें ह्मणजे ते व्रण बरे होतात. ज्या व्रणांत वाताचा जोर असेल, आग होत असेल व वेदना होत असतील त्यांत तीळ व अळशी भाजून दुधांत वाटून तिचा लेप करावा. चिकणामूळ, गुळवेल, ज्येष्ठमध, पिठवण, शतावरी, जीवन्ती खडी साखर, दूध, तिळांचें तेल, माशांची चरबी व तूप या सर्व जिनसा एकत्र शिजवून त्यांत मेण मिळवून त्याचा लेप करावा. ह्मणजे व्रणांतील शूल बंद होतो. यास स्नेहशर्करा ह्मणतात. दशमुळांचा काढा, दशमुळें टाकून कढविलेलें दूध किंवा तेल-तुपाचें मिश्रण यांनीं कोमट असतांना परिषेचन करावें. किंवा जवांचें पीठ, ज्येष्ठमध, तेल व तूप हीं एकत्र कढवून कोमट करून त्यांचा लेप द्यावा. ह्मणजे व्रणांतील दाह व दुखणें बंद होतें. किंवा तीळ व मूग यांचें पीठ दुधांत शिजवून त्याचें पोटीस बांधावें ह्मणजे शूल व आग बंद होतात.

**सूक्ष्मानना बहुस्रावाः कोषवन्तश्च ये व्रणाः ।**
**न च मर्माश्रितास्तेषामेषणं हितमुच्यते ॥ ७५ ॥**
**द्विविधामेषणां विद्यान्मृद्वीश्च कठिनामपि ।**
**उद्भिदैर्मृदुभिर्नालैर्लोहानां वा शलाकया ॥ ७६ ॥**
**गम्भीरमांसगे देशे पार्श्वे लौहशलाकया ।**
**एष्यं विद्याद्व्रणं नालैर्विपरीतमतो भिषक् ॥ ७७ ॥**
**पूतिगन्धान्विवर्णांश्च बहुस्रावान्महारुजः ।**
**व्रणानशुद्धान्विज्ञाय शोधनैः समुपाचरेत् ॥ ७८ ॥**
**त्रिफला खदिरो दार्वी न्यग्रोधादिर्बला कुशः ।**
**निम्बकोलकपत्राणि कषायाः शोधना मताः ॥ ७९ ॥**

तिलकल्कः सलवणो द्वे हरिद्रे त्रिवृद्घृतम् ।
मधुकं निम्बपत्राणि प्रलेपो व्रणशोधनः ॥ ८० ॥

ज्या व्रणाचें तोंड बारीक असून तो आंतून पोकळ आहे, ज्यांतून फार स्राव होत आहे व जो मर्मस्थानीं नाहीं अशा व्रणांत सळई ( Probe घालून त्याचें तोंड मोठें करणें व रस्ता साफ करणें हितकर आहे. सळई-मृदु व कठिण अशी दोन प्रकारची असते. वनस्पतींचे कोंवळे दंड मृदु सळई व लोखंडाची कठिण सळई समजावी. शरीराच्या ज्या भागीं पुष्कळ खोल पर्यंत मांस आहे अशा ठिकाणीं व पार्श्वभागीं लोखंडाच्या सळईचा उपयोग करावा. आणि याच्या उलट स्थितीच्या व्रणांत वनस्पतीच्या दंडांचा उपयोग करावा. ज्या व्रणांतून सडकी दुर्गंधि येत असेल, ज्याचा रंग विकृत झालेला असेल, ज्यांतून फार स्राव होत असेल व वेदनाही फार होत असतील, अशा व्रणांस अशुद्ध समजून त्यांचें शोधन करावें. त्रिफळा, खैरसार, दारुहळद, न्यग्रोधादि गणांतील औषधें, चिकणा, दर्भमूळ, कडूलिंब व बोरीचीं पानें यांचे काढे व्रणाचें शोधन करितात. तिळांचा ठेंचा, मीठ, हळद, दारुहळद, निशोत्तर, तूप, ज्येष्ठमध व कडू लिंबाचीं पानें या जिनसांचा लेप व्रणशोधक आहे.

नातिरक्तो नाति पाण्डुर्नातिश्यावो न चातिरुक् ।
न चोत्सन्नो न चोत्सङ्गी शुद्धो रोप्यः परं व्रणः ॥ ८१ ॥
न्यग्रोधोदुम्बराश्वत्थकदम्बप्लक्षवेतसाः ।
करवीरार्ककुटजाः कषाया रोपणाः स्मृताः ॥ ८२ ॥
चन्दनं पद्मकिञ्जल्कं दार्वीत्वङ्नीलमुत्पलम् ।
मेदां मूर्वां समङ्गाश्च यष्ट्याह्वां व्रणरोपणम् ॥ ८३ ॥
प्रपौण्डरीकं जीवन्तीं गोजिव्हां धातकीं बलाम् ।
रोपणं सतिलं दद्यात्प्रलेपं सघृतं व्रणे ॥ ८४ ॥
कम्पिल्लकं विडङ्गानि वत्सकं त्रिफलां बलाम् ।
पटोलं पिचुमर्दश्च लोध्रं मुस्तं प्रियंगुकम् ॥ ८५ ॥
खदिरं धातकीं सर्जमेलामगुरुचन्दने ।

पिष्ट्वा साध्यं भवेत्तैलं तत्परं व्रणशोधनम् ॥ ८६ ॥
प्रपौण्डरीकं मधुकं काकोल्यौ द्वे च चन्दने ।
सिद्धमेतैः समैस्तैलं तर्पणं व्रणरोपणम् ॥ ८७ ॥
दूर्वास्वरससिद्धं वा तैलं कम्पिल्लकेन वा ।
दार्वीत्वचश्च कल्केन प्रधानं व्रणरोपणम् ॥ ८८ ॥
येनैव विधिना तैलं घृतं तेनैव साधयेत् ।
रक्तपित्तोत्तरं दृष्ट्वा रोपणीयं घृतं तथा ॥ ८९ ॥
कदम्बार्जुननिम्बानां पाटल्याः पिप्पलस्य च ।
व्रणप्रच्छादने विद्वान्पत्राण्यर्कस्य चादिशेत् ॥ ९० ॥
शाङ्कोऽथ बादरश्चैव पट्टो व्रणहितः स्मृतः ।
बन्धश्च द्विविधः शस्तो व्रणानां सव्यदक्षिणः ॥ ९१ ॥

फार तांबडा नाहीं, फार फिकट-पांढरा नाहीं, फार काळसर नाहीं, फार दुखत नाहीं, वर उभरलेला नाहीं व आंत पोकळीही नाहीं अशा तऱ्हेचा जो व्रण असेल तो शुद्ध व भरून आणण्यास योग्य समजावा. वड, उंबर, पिंपळ, कळंब, पिंपरी, वेत, कण्हेर, रुई व कुडा यांचा कषाय व्रण भरून आणणारा आहे. चन्दन, कमळकेशर, दारुहळद, दालचिनी, निळें कमळ, मेदा, मोरवेल, लाजाळू किंवा मंजिष्ठ व ज्येष्ठमध यांच्या लेपानें व्रण भरून येतो, पुण्डरीक, जीवंती, पाथरी, धायटीचीं फुलें, चिकणमूळ यांत तीळ व तूप मिळवून लेप केला असतां व्रणाचें रोपण होतें. कपिला, वावडिंगें कुडा, त्रिफळा, चिकणा, कडू पडवळ, कडूलिंबाचीं पानें, लोध्र, नागरमोथा, गहुला, खैरसाल, धायटीचीं फुलें, राळ, वेलची, अगर, चंदन या सर्व जिनसांचा कल्क टाकून तयार केलेलें तेल उत्कृष्ट प्रतीचें व्रणशोधक आहे. पुंडरीक, ज्येष्ठमध, काकोली, क्षीरकाकोली, आणि पांढरें व तांबडें चंदन यांचा कल्क मिळवून तयार केलेलें तेल तर्पण करून व्रण भरून आणणारें आहे. दुर्वांचा अंगरस टाकून तयार केलेलें, कपिला मिळवून शिजविलेलें, किंवा दारुहळदीच्या सालीचा कल्क टाकून सिद्ध केलेलें तेल

उत्तम व्रणरोपण करणारें आहे. ज्या तऱ्हेनें तेलें करावयाचीं तशींच म्हणजे तींच औषधें घालून तूप सिद्ध करावें. रक्तपित्ताधिक व्रणांत तुपाचाच उपयोग करावा. व्रणावर झांकण्याकरितां कळंब, अर्जुनसादडा, कडूलिंब, पाडळ, पिंपळ किंवा रुई यांचीं पानें घ्यावीं. व्रणावर पट्टा बांधावयाचा तो मृगाच्या केंसापासून बनविलेल्या कपडयाचा ( पश्मीन्याचा ? ) अथवा सुती कपडयाचा असावा. पट्टा बांधावयाचा तो डावा—उजवा बांधणें प्रशस्त आहे.

लवणाम्लकटूष्णानि विदाहीनि गुरूणि च ।
वर्जयेदन्नपानानि व्रणी मैथुनमेव च ॥ ९२ ॥
नातिशीतगुरुस्निग्धमविदाहि यथाक्रमम् ।
अन्नपानं व्रणहितं हितं चास्वपनं दिवा ॥ ९३ ॥
स्तन्यानि जीवनीयानि बृंहणीयानि यानि च ।
उत्सादनार्थं निम्नानां व्रणानां तानि कल्पयेत् ॥ ९४ ॥
भूर्जग्रन्थ्यश्मकासीसमधोभागानि गुग्गुलुः ।
व्रणावसादनं तद्वत्कलविङ्ककपोतविट् ॥ ९५ ॥
रुधिरेऽति प्रवृत्ते तु छिन्ने छेद्येऽधिमांसके ।
कफग्रन्थिषु गण्डेषु वातस्तम्भानिलार्तिषु ॥ ९६ ॥
गूढपूयलसीकेषु गम्भीरेषु स्थिरेषु च ।
क्लिन्नेषु चाङ्गदेशेषु कर्माग्नेः सम्प्रशस्यते ॥ ९७ ॥
मधूच्छिष्टेन तैलेन मज्जक्षौद्रवसाघृतैः
तप्तैर्वा विविधैर्लोहैर्दहेद्दाहविशेषवित् ॥ ९८ ॥
रूक्षाणां सुकुमाराणां गम्भीरान्मारुतोत्तरान् ।
दहेत्स्नेहैर्मधूच्छिष्टैर्लोहैः क्षौद्रैस्ततोघृतैः ॥ ९९ ॥
बालदुर्बलवृद्धानां गर्भिण्या रक्तपित्तिनाम् ।
तृष्णाज्वरपरीतानामबलानां विषादिनाम् ॥ १०० ॥
नाग्निकर्मोपदेष्टव्यं स्नायुमर्मव्रणेषु च ।
सविषेषु च शल्येषु नेत्रकुष्ठव्रणेषु च ॥ १०१ ॥

खारट, आंबट, तिखट, गरम, विदाही व जड असें खाणें पिणें, तसेंच मैथुन इतक्या गोष्टी व्रण झालेल्या मनुष्यानें वर्ज्य कराव्या. फार थंड नाहीं, फार जड नाहीं, फार स्निग्ध नाहीं व विदाह न करणारें असें खाणें-पिणें आणि दिवसा न निजणें या गोष्टी व्रणी मनुष्यास हितकर आहेत. खोलगट व्रण भरून आणण्याकरितां मागें सूत्रस्थानांत सांगितलेल्या स्तन्य, जीवनीय व बृंहणीय वर्गांतील औषधें सेवन करावीं. भोजवृक्षाच्या गांठी, शिलारस, ( किंवा स्वर्णमाक्षिक ? ) हिराकस, व गुग्गुळ यांच्या लेपानें उभरलेला व्रण बसतो. चिमणी व पारवा यांच्या विष्ठेनेंही हें कार्य होतें. मूळव्याधीच्या मोडासारख्या मांस वाढून होणाऱ्या रोगांत वाढलेलें मांस कापून टाकलें असतां अतिशय रक्त जाऊं लागल्यास त्या ठिकाणीं अग्निक्रिया करावी ह्मणजे डाग द्यावा. तसेंच कफाच्या गांठी, गलगण्ड, वातस्तंभ, वातपीडा, या विकारांवर, त्याचप्रमाणें खालपर्यंत पू व लसीनें भरलेले, खोल असलेले, न वाढणारे, आणि चिवळलेले असे जे व्रण असतील त्यांवर अग्निकर्म हाच प्रशस्त उपाय आहे मेण, तेल, मज्जा, मध, चरबी, तूप, किंवा लोखंडाची सळई-दांडा वगैरे हीं तापवून अग्निकर्म जाणणाऱ्या वैद्यानें डाग द्यावा. रूक्ष, सुकुमार, खोल अशाप्रकारच्या व्रणांवर अनुक्रमें तेल, मेण व लोखंड यांनीं डाग द्यावा. आणि वातादिक व्रणांत मध व तूप गरम करून त्यानें अग्निकर्म करावें लहान मूल, अशक्त किंवा वृद्ध मनुष्य, गर्भार बायको, रक्तपित्तरोगी, तृषार्त व ज्वरपीडित आणि निःशक्त व खिन्न मनुष्य यांस तसेंच स्नायु, मर्मस्थानें यांवरील व्रणांत, विषारी जखमेंत, ज्यांत कांटा, बंदुकीची गोळी किंवा दुसरा कोणताही बाह्य पदार्थ आहे अशा व्रणांत आणि डोळयाच्या किंवा कुष्ठाच्या व्रणांत अग्निकर्म करूं नये.

रोगदोषबलापेक्षी मात्राकालाग्निकोविदः ।
शस्त्रकर्माग्निकृत्येषु क्षारमप्यवचारयेत् ॥ १०२ ॥
कठिनत्वं व्रणा यान्ति गन्धैःसारैश्च धूपिताः ।
सर्पिर्मज्जवसाधूपैः शैथिल्यं यान्ति हि व्रणाः ॥ १०३ ॥

रुजःस्रावाश्च गन्धाश्च कृमयश्च व्रणाश्रिताः ।
शैथिल्यं मार्दवं चापि धूपेनोपशाम्यति ॥ १०४ ॥
लोध्रन्यग्रोधशुङ्गानि खदिरस्त्रिफलाघृतम् ।
प्रलेपो व्रणशैथिल्यं सौकुमार्यप्रसाधनः ॥ १०५ ॥
सरुजः कठिनाः स्तब्धा निरास्रावाश्च ये व्रणाः ।
यवचूर्णैः सर्पिष्कैर्बहुशस्तान्प्रलेपयेत् ॥ १०६ ॥
मुद्गषष्टिकशालीनां पायसैर्वा यथाक्रमम् ।
सघृतैर्जीवनीयैर्वा तर्पयित्वानभीक्ष्णशः ॥ १०७ ॥

मात्रा, काल व अग्निबल जाणणाऱ्या वैद्यानें, रोग, दोष व रोग्याची शक्ति यांचें मान पाहून शस्त्रक्रिया व अग्निकर्म यांत क्षाराचाही उपयोग करावा, अगर चन्दन वगैरे सुगंधि पदार्थ आणि राळ, धूप वगैरे वृक्षसार यांची धुरी दिल्यानें व्रण टणक होतात, आणि तूप, मज्जा, चरबी यांची धुरी दिल्यानें व्रण नरम पडतात. व्रणांतील शूळ, स्राव, वास, किडे, शिथिलता व मृदुता हीं धुरीनें बरीं होतात. लोध्र, वडाची कोवळी पालवी, खैरसाल, त्रिफळा व तूप यांचा लेप लावला असतां व्रण ढिला पडून मऊ होतो. ज्या व्रणांत वेदना होत असतील, जे टणक व ताठरलेले असतील व ज्यांतून स्राव होत नसेल त्यावर जवांच्या पिठांत तूप मिळवून त्याचा खूप लेप करावा. किंवा मूग, साळी, अथवा साठेसाळीचे तांदूळ यांची खीर किंवा तूप मिळवून जीवनीय वर्गांतील औषधें यांचा तर्पण करणारा लेप लावावा.

ककुभोदुम्बराश्वत्थलोध्रजाम्बवकट्फलैः ।
त्वचमाश्वेव गृह्णन्ति त्वक्चूर्णैश्चूर्णिता व्रणाः ॥ १०८ ॥
मनःशिलैला मञ्जिष्ठा लाक्षा च रजनीद्वयम् ।
प्रलेपः सघृतक्षौद्रस्त्वग्विशुद्धिकरः परः ॥ १०९ ॥
अयोरजः सकासीसं त्रिफलाकुसुमानि च ।
करोति लेपः कृष्णत्वं सद्य एव नवत्वचि ॥ ११० ॥

कालीयकलताम्रास्थि हेमकाला रसोत्तमः ।
लेपः सगोमयरसः सवर्णीकरणः परः ॥ १११ ॥
श्यामकाश्वत्थनिचुलमूलं लाक्षा सगैरिका ।
सहेमश्यामृतासङ्गा कासीसं चेति वर्णकृत् ॥ ११२ ॥
चतुष्पदानां त्वग्लोमखुरशृंगास्थिभस्मना ।
तैलाक्ता चूर्णिता भूमिर्भवेल्लोमवती पुनः ॥ ११३ ॥
षोडशोपद्रवा ये च व्रणानां परिकीर्तिताः ।
तेषां चिकित्सा निर्दिष्टा यथा स्वे स्वे चिकित्सिते ॥ ११४ ॥

अर्जुनसादडा, उंबर, पिंपळ, लोध्र, जांभूळ व कायफळ यांच्या सालींचें चूर्ण करून तें व्रणावर दडपून बसविलें असतां त्या ठिकाणीं नवी चामडी लवकर येते. मनशीळ, वेलची, मंजिष्ठ, लाख, हळद, दारुहळद यांचें चूर्ण तूप व मधांत खलून लेप करावा ह्मणजे व्रणाच्या जागेचे डाग वगैरे जाऊन चामडी स्वच्छ होते लोहचूर्ण, हिराकस, त्रिफलावृक्षांचीं फुलें, यांच्या लेपानें. नव्या चामडीचा पांढरा फटफटीत रंग बदलून तत्काळ काळसरपणा येतो पिंवळें चंदन ( किंवा दारुहळद ), गहुला, आंब्याची कोय, घोत्र्याचें बीं किंवा नागकेसर, मंजिष्ठ व पारा हीं सर्व द्रव्यें गाईच्या शेणाच्या रसांत अथवा काढयांत खलून त्यांचा लेप केला असतां व्रणाच्या जागीं नव्या आलेल्या कातडीचा रंग आजूबाजूच्या कातडीच्या रंगासारखा होतो. रोहिसगवत, पिंपळाची साल, वेताचें किंवा पाणवेताचें मूळ, लाख, गेरू, नागकेशर किंवा घोत्र्याचें बीं, मोरचूत व हिराकस या द्रव्यांचा लेप केल्यानें नव्या कातडीवर स्वाभाविक रंग येतो. चतुष्पाद जनावराचें कातडें, केंस, खूर, शिंगें व हाडें यांची राख किंवा कोळसा व्रणाच्या जागीं तेल लावून वर चोळल्यानें किंवा तो तेलांत खलून

* कांहीं प्रतींत या ठिकाणी ' नता ' असा पाठ आहे व त्याचा अर्थ तगर असा होतो. कांहीं प्रतींत ' कालीयकलनाम्रास्थि ' असा पाठ आहे, हा पाठ स्वीकारल्यास ' कालीय-कलन ' असा पदच्छेद करावा लागेल आणि त्यांचा अर्थ पिवळें चंदन व वेत असा होईल, या दोहोंपैकीं कोणताही पाठ धरिल्यानें अर्थास बाध येत नाहीं. कारण तगर व वेत दोन्हीं त्वक्शोधकच आहेत.

लावल्यानें व्रणाच्या जागचे गेलेले केस पुन्हां येतात. व्रणांचे जे सोळा उपद्रव सांगितले त्यांची चिकित्सा त्या त्या रोगप्रकरणांत निरनिराळी सांगितलीच आहे.

तत्र श्लोकौ

द्वौ व्रणौ व्रणभेदाश्च परीक्षा दुष्टिरेव च ।
स्थानानि गन्धाः स्रावाश्च सोपसर्गाः क्रियाश्च याः ॥ ११५ ॥
व्रणाधिकारे सप्रश्नमेतन्नवकमुक्तवान् ।
मुनिर्व्याससमासाभ्यामग्निवेशाय धीमते ॥ ११६ ॥

व्रणाचे मुख्य दोन प्रकार, किरकोळ भेद, त्यांची परीक्षा. दुष्टता, स्थानें. वास, स्राव, उपद्रव व व्रणांची चिकित्सा या नऊ विषयांचें विवेचन, अग्निवेशाच्या प्रश्नांवरून आत्रेय महर्षींनीं संक्षेप–विस्तारानें या अध्यायांत केलें आहे.

इति त्रयोदशोऽध्यायः समाप्तः ।

---

# अथ चतुर्दशोऽध्यायः ।

## उन्मादचिकित्सितम् ।

बुद्धिस्मृतिज्ञानतपोनिवासः पुनर्वसुः प्राणभृतां शरण्यः ।
उन्मादहेत्वाकृतिभेषजानि कालेऽग्निवेशाय शशंस पृष्टः ॥ १ ॥
विरुद्धदुष्टाशुचिभोजनानि प्रधर्षणं देवगुरुद्विजानाम् ।
उन्मादहेतुर्भयहर्षपूर्वो मनोऽभिघातो विषमाश्च चेष्टाः ॥ २ ॥
तैरल्पसत्त्वस्य मलाः प्रदुष्टा बुद्धेर्निवासं हृदयं प्रदूष्य ।
स्रोतांस्यधिष्ठाय मनोवहानि प्रमोहयन्तीह नरस्य चेतः ॥ ३ ॥
धीविभ्रमः सत्त्वपरिप्लवश्च पर्याकुला दृष्टिरधीरता च ॥
अबद्धवाक्त्वं हृदयञ्च शून्यं सामान्यमुन्मादगदस्य लिङ्गम् ॥ ४ ॥
स मूढचेता न सुखं न दुःखं नाचारधर्मौ कुत एव शान्तिम् ।
विन्दत्यपास्तस्मृतिबुद्धिसंज्ञो भ्रमत्ययं चेत इतस्ततश्च ॥ ५ ॥
समुद्भ्रमं बुद्धिमनःस्मृतीनामुन्मादमागन्तुनिजोत्थमाहुः ।
तस्योद्भवं पञ्चविधस्य भूयो वक्ष्यामि लिङ्गानि चिकित्सितञ्च ॥ ६

श्रीशंकर.

# त्रिदोषविचार.

## भाग ३ रा.

( लेखक-सम्पादकान्तेवासी-अवधूत वासुदेव वैद्य. )

### कफदोष.

**हिमांशु प्रभाजनकर्मा ।**

( प्राणाग्निहोत्रोपनिषत् )

एकंदर स्थावर जंगम पदार्थवर्ग, घन, द्रव, व वायुरूप अशा तीन अवस्थांतून आढळतो. त्यांतून घन पदार्थ हे द्रवरूप व वायुरूप पदार्थांपासूनच उत्पन्न झाले आहेत. हें आपण विश्वांतील ग्रहगोलांच्या उत्पत्तिप्रकाराचें आधुनिकशास्त्रदृष्ट्या परिशीलन केलें असतां देखील सिद्धांतरूपानें ध्यानीं येणार आहे. तसेंच त्यावरून सर्व समंजस व जिज्ञासु वाचकांस समजून येईल कीं, आपल्या तत्वपद्धतींत देखील पृथ्वी-अप्-तेज-वाय्वाकाश अशी पंचमहाभूतांची निवड ही देखील हाच विचार दाखविते. फार काय हाच प्रकार आमच्या देहास लागू पडतो. आपलें हें एवढें शरीर संगमशील रेतार्तवांतून ( वायु व द्रव या स्थितींतून ) निपजतें, व पुढें संयोगसंस्कारानें योग्य स्थितींत ( घन वगैरेंत ) येतें. ह्मणजे शरीरघटनेस आरंभीं तेजरूप शक्ति, वायु, व द्रवरूप पदार्थ ह्यांची आवश्यकता आहे. पैकीं पहिल्या दोहोंचा पूर्वी विचार झाला असून येथें क्रमप्राप्त तिसऱ्याचा विचार करावयाचा आहे.

---

१ हें येथें लेखविस्तार होईल ह्मणून घेत नाहीं. याविषयीं वाचकांस ज्योतिर्विषयक ग्रंथांतून सोपपत्तिक माहिती मिळेल. सदरील ग्रंथांतून पूर्वी ग्रहगोल द्रवावस्थेंत असून पुढें ते निवून घनावस्थेंत आले इ० विवेचन आहे.

२ आकाशाद्वायुः वायोरग्निः इ०

२ आपल्या शरीराचा ३⁄४ भाग द्रवात्मक आहे. आणि एवढ्याकरितांच तो द्रवभाग कायम राखणाऱ्या पाण्याला महत्व देऊन त्या संबंधानें ह्मटलें आहे कीं —

पानीयं प्राणिनां प्राणा विश्वमेवहि तन्मयम् ।
अतोऽत्यंतनिषेधेऽपि न क्वचिद्वारि वार्यते ॥ १ ॥
तृषितो मोहमायाति मोहात्प्राणान् विमुंचति ;
तस्मात्स्वल्पञ्च दातव्यं न क्वचिद्वारि वार्यते ॥ २ ॥

देहास पाणी हें जीवन आहे. जर कां पाणी मिळालें नाहीं, तर रक्त आटतें—रक्ताचें प्रमाण कमी होतें—( अन्नहीनो दहेद्धातुः । अंबुहीनंच शोणितम् ) यामुळें देहाच्या शेवटच्या भागापर्यंत तें पोंचत नाहीं. अखेरीस शरीरास ग्लानि येऊन अंतरिंद्रियें विकल होऊन घात होतो. करितां पाणी कधींही बंद करूं नये. अगदीं देऊं नये असें जेथें सांगितलें असेल तेथें देखील थोडेंसें द्यावेंच. आतां पाण्यापासून देहास मिळतें तरी काय ? तर— “ स्नेहः क्लेदः शैत्यं रसे रसनं चोदकात् ” स्निग्धता, क्लिन्नत्व, शीतत्व, रस आणि चव इ० गुणांची प्राप्ति या पाण्यापासून होते. असो. शरीरांतील उदकजन्य द्रवविभाग जेव्हां तेजोगुणभूयिष्ठ असतो तेव्हां तो पित्तवर्गांत मोडतो. पण जर तो तद्व्यतिरिक्त असला तर त्यास “ कफ ” अशी आर्यवैद्यकांत संज्ञा दिली आहे. आणि यामुळें याची व्याप्ति रस, मांस, मेद, मज्जा, शुक्र, मूत्र इत्यादिकांत आहे. ह्मटलें आहे कीं—“ तत्रास्थनि स्थितो वायुः पित्तं तु स्वेदरक्तयोः । श्लेष्मा शेषेषु तेनैकमाश्रयाश्रयिणं मिथः । ( वाग्भट ) तेव्हां अशा ह्या शरीराचा अधिकांश व्यापणाऱ्या कफाविषयीं येथें त्रोटक, संक्षिप्त व होईल तेवढी संगतवार माहिती द्यावयाची आहे.

३ पूर्वी कफाविषयीं सांगतांना फक्त श्लेष्म्याचें देहभर असलेलें माखण सांगून त्याची साधारण व्याप्ति दाखविली गेली. परंतु आतां या ठिकाणीं त्याच्या वास्तविक स्वरूपाचा निदान त्या स्वरूपा जवळ जवळ तरी विचार

करावयाचा आहे. अर्थात् त्या पूर्व विचारापलीकडील माहितीचा भाग जुळविला पाहिजे. तो येथें नुसत्या कफविचाराखालीं सामान्यपणें सांगत बसण्यापेक्षां कफ–भेद–विचारांतून जुळवून घेणें चांगलें. ह्मणजे लेखन विस्तार होणार नाहीं.

४ पूर्वी पित्तविवरणांतून आर्यांग्लवैद्यकांत असलेल्या भेदाचें स्पष्ट विवेचन आलें आहे. त्यावरून प्रत्येकाच्या ध्यानीं आलें असेल कीं आर्यवैद्यक हें दृष्टपदार्थ व विशेषत: त्यांच्या अदृष्ट शक्ति या दोहोंच्या विचारानें पूर्णत्व पावलें आहे. पण आंग्लवैद्यक हें बहुतेक दृष्टपदार्थावलंबी आहे. अदृष्ट शक्तींना त्यांतून आर्यवैद्यकाप्रमाणें प्रधानत्व नाहीं. अर्थात् हा जो मोटा भेद आर्यांग्लवैद्यक पद्धतींत आहे त्यास अनुसरून कफ व तद्विभाग यांची माहिती दोन्हीं पद्धतीनें बरोबर जुळविणें शक्य नाहीं. कारण तैजस पित्ताच्या अग्न्यात्मक शक्तीप्रमाणें कफाची जी शीतगुणोत्पादकता ती केवळ दृष्टपदार्थावलंबी अशी दाखवितां येत नाहीं. तरी पुढील वर्णनांतून ती न्यूनता विद्वानांकरितां राखून मी आपलें काम यथामति करितों.

५ पदार्थमात्रांच्या वीर्याची निवड होऊन त्याचे दोन प्रकार आपल्या ग्रंथांतून केलेले आहेत. ‘उष्णशीतगुणोत्कर्षात्तत्रवीर्यं द्विधा स्मृतम्’ या प्रमाणें शीतगुणभूयिष्ट अशा स्निग्ध पदार्थानें शरीरांत या कफदोषाची वृद्धि होते. ( शीतेन युक्ताः स्निग्धाद्या कुर्वते श्लेष्मणश्चयम् )

६ श्लेष्मोत्पत्ति विशेषत: अप् तत्वापासून असल्यामुळें तत्प्राप्त जे “ स्नेहः[1] क्लेदः शैत्यं रसो रसनं चोदकात् ” हे गुण, ते त्या श्लेष्म्यांत आहेत. तसेच “ स्निग्धः[2] शीतो गुरुर्मंदः श्लक्ष्णो मृत्स्नः स्थिरः कफः ” हेही गुण त्या श्लेष्म्या-चे ठायीं आहेत. या सर्व गुणप्रकारांचें विवरण पुढें कफभेदाखालीं येईल.

---

१ ह्यांचे प्रतिशब्द कलम २ यांतून आहेत.

२ ओशटपणा, थंडाई, जडत्व, मांद्य, चिकणाई–गुळगुळीतपणा, बुळबुळीतपण व मजबुती असे ७ गुण आहेत.

पहिल्या व दुसऱ्या श्लोकार्धांतून निवड केल्यास एकंदर १० गुणं श्लेष्म्यांतून आहेत असें दिसतें.

७ वाग्भटांतून आलें आहे कीं,—

> अष्टावंगानि तस्याहुश्चिकित्सा येषु संश्रिता ।
> वायुःपित्तं कफश्चेति त्रयो दोषाः समासतः ।
> विकृताविकृता देहं घ्नंति ते वर्तयन्ति च ।
> ते व्यापिनोऽपि हृन्नाभ्योरधोमध्योर्ध्वसंश्रयाः ॥

यां श्लोकांतून वात, पित्त, कफ या चिकित्सामूलक तिन्ही दोषांची व्याप्ति देहभर आहे ह्मणून सांगितलें असून हृदयावरील भागांत कफ आहे असें सांगितलें आहे. धन्वंतरिसंहितेंत देखील असेंच ह्मटलें आहे. " गुदश्रोण्याश्रयो वायुः पित्तं पक्काशयस्थितं । कफस्यामाशयस्थानं कण्ठो वा मूर्धसंधयः ॥ आतां यापेक्षांही स्थानांची स्पष्टता पुढील श्लोकांत चांगली झाली आहे. " उरः कण्ठशिरःक्लोम पर्वाण्यामाशयस्तथा । मेदोघ्राणंच जिव्हाच कफस्य सुतरामुरः ॥ " यावरून कफस्थानें मुख्यत्वें उरःस्थल व मस्तक हीं होत. ह्मणजे सर्व देहावयवांत या स्थानांतून सांपडणारे निरनिराळे कफाशय जास्त आहेत असें ठरतें. असे जे देहस्थ निरनिराळे कफाशय त्यांस अनुसरून कफाचे ५ भाग केले आहेत. ते-अवलंबक, क्लेदक, बोधक, तर्पक व श्लेषक असे होत. हे पांच विभाग अनुक्रमें हृदय, तोंड, जीभ, नेत्र व इतर संधिस्थानें यांतून आहेत. ह्मणजे या कफाचा ४/५ भाग हृदयावरील अवयवांतून आहे. आणि १/५ भाग सर्व संधींतून आहे असें होतें. तेव्हां या रीतीनेंही हृदूर्ध्व भागांतून कफाधिक्य कसें आहे, तें ध्यानीं येणार आहे. असो. आतां या पांच प्रकारांचें सारतः वर्णन करूं. प्रथम क्रमप्राप्त अवलंबक घेऊं.

---

१ ह्या विभागांचें प्रमाण सर्व आशयांतून सारखें नाहीं हें ध्यानीं ठेवणा-सारखें आहे.

## ( १ ) अवलंबक.

**अथ या एता वक्ष्यमाणा हृदयस्य पुंडरीकाकारस्य ब्रह्मोपासनस्थानस्य संबंधिनो नाडयो हृदयपिंडात् सर्वतो विनिसृताः। आदित्यमण्डलादिव रश्मयस्ताः ॥ कथमसा वादित्यः। पिंगलोवर्ण एष आदित्यः शुक्लोपि एष नील एष लोहित एष आदित्य एव ॥ इ० इ० ( शांकरभाष्य )**

यांत हृदयपिंडापासून निरनिराळ्या तऱ्हेच्या नाड्या योग्यास कशा निघालेल्या दिसतात त्याचें वर्णन आहे. त्यांत कांहीं शुक्ल असतात असें सांगितलें आहे. या शुक्ल कां? तर एकंदर शारीरिक व मानसिक स्थिति सुव्यवस्थेंत ठेवणारें चरम धातुस्थान जें ओज तें बरेंच सोमात्मक—श्वेतवर्णानुकूल असतें. कारण तें अप्गुणभूयिष्ट आहे. ह्मटलें आहे " हृदयस्थमपि व्यापि देहस्थितिनिबंधनम् । स्निग्धं सोमात्मकं शुद्धमीषल्लोहितपीतकम् ॥ " आतां ओजांत स्निग्धत्व, शुद्धपणा, व अप्भूयिष्टता हे जे गुण आहेत ते आमच्या अवलंबक श्लेष्म्याचे होत. आणि ओजघटक अवलंबकांत हे गुण असल्यामुळेंच प्राणाग्निहोत्रोपनिषदांत " हिमांशु प्रभाप्रजनकर्मा " हे शब्द सोमाचे स्तुतिपर दिले आहेत. आतां हें एवढें कार्य सतत करण्याची शक्ति यांत कायम तरी कशी असते ? याचा स्वभाविकपणें जन्मभर आवश्यक इतका कायमचा संचयच हृदयांतून आहे काय ? नाहीं. तर अन्नरसांतून उत्तरोत्तर त्याच्या आशयप्रमाणानुरूप ह्यांत तो जमतो. आणि असा जमल्यावर मग हृदयकर्म वगैऱ्यांस उत्तेजक बनतो. आणि व्यान साहायानें देहभर संचार पावतो. व जीवनाधार किंवा त्याहून स्पष्ट ह्मटलें ह्मणजे देहाधार जें रक्त ह्याच्या जीवनास हा कारण बनतो. व अशा रीतीनें कारण बनला कीं त्यास अवलंबक-आश्रयजनक अशी संज्ञा प्राप्त होते. आणि ती ठीकच आहे. इतर कफस्थानें तरी रक्तापासून मिळणाऱ्या कफकार्यकरी द्रव्यावरच कार्यकर्तीं बनतात. परंतु हें अवलंबकस्थान तर स्वतःसिद्ध असून उलट अन्नरसांतून होणाऱ्या लब्धिवि-

शेषानें रक्तद्वारा देहभर तुष्टि पुष्टि राखिलें. या अवलंबकाच्या सम्यक् स्थितींतच देहांतून असणाऱ्या एकंदर कफाशयांतून जलांशाचा पुरवठा होतो. अर्थात् आपल्या ग्रंथांतून श्लेष्म्याचे जे जे गुण सांगितले आहेत त्या बहुतेक गुणांची व्याप्ति या अवलंबकांतून असणार हें उघड आहे. तेव्हां या अवलंबकाची सविस्तर व याथातथ्य माहिती देणें निदान अशा स्थलीं तरी अशक्य आहे तथापि मुख्य ती माहिती पुढें येईल.

आंग्लवैद्यकांत कार्यभेदानें अंतरिंद्रियांचें ३ वर्ग बांधिले आहेत. ते नर्व्हस सिस्टिम्, डायजेस्टिव सिस्टिम व लिम्फाटिक सिस्टिम असे होत. आतां नर्व्हसासिस्टिम व डायजेस्टिव सिस्टिम यांचा आपल्या वात व पित्त यांत जसा समावेश होतो त्याप्रमाणें तिसरा जो लिंफॅटिक सिस्टिम ह्याचा आमच्या कफदोष व्यवस्थेत समावेश होतो. तेव्हां क्रमप्राप्त कफाचा विचार पूर्ण होण्यास लिंफॅटिक सिस्टिम संबंधानें थोडीतरी माहिती जुळविली पाहिजे.

आपल्या शरीरांत हर एक धमन्यांतून निघणाऱ्या ज्या केशाकार नलिका देहभर मांसपेशी वगैऱ्यांतून जालवत् पसरलेल्या असतात, त्यांतून रक्त जातांना त्यांच्या सच्छिद्रतेमुळें ठिकठिकाणीं त्यांतील द्रवांश पाझरतो. प्राणिमात्रांच्या अंतस्त्वचेंत मोठीं छिद्रें नाहींत, तरी त्यांतून घडणाऱ्या अभिसरणक्रियेमुळें त्या त्या रंध्रांतून अनेक स्निग्ध पदार्थ बाहेर येतात. कसें? तर जाड कापडांतून पाणी नेतलें असतां व तें त्यांतून दुसरीकडे नेत असतां जसा जमिनीचा भाग ओला होतो तद्वत्-आतां हाच प्रकार धमन्या वा तज्जन्य शाखा यांचा समजावयाचा. रक्तवहन, पराकाष्ठा २$\frac{3}{5}$ मिनिटांत देहभर घडतें. अर्थात् या पद्धतीनें तो प्रगलित द्रव नेहमीं मांसपेशी, आस्थि, मेंदू इ० रक्तमार्गांतून सांचत गेला पाहिजे हें उघड आहे. आतां या संचित द्रवाचा ४।५ मिनिटें निकालच जर झाला नाहीं तर सर्व शरीररचनाच बदलणार. व अंतरिंद्रयें कमकुवत बनून स्तब्ध होऊन शरीरहानि होणार हें उघड आहे. तेव्हां असा अनर्थ होऊं नये ह्मणून किंवा इतर कांहीं महत्वाचीं कार्यें व्हावीं

यासाठीं शरीरांत रसवाहिन्यांची व्यवस्था झालेली आहे. अशा त्या रसवाहिन्यांच्या जरूरीपुरत्या माहितीकडे वळूं.

आगगाडी रुळावरून चालत असतां निरनिराळ्या स्टेशनावरून माल घेत घेत व त्या त्या स्टेशनावर थांबत थांबत मुख्य स्थलीं येते. अशा वेळीं गाडीच्या सोयीकरितां दर स्टेशनाजवळ रस्ते मुद्दाम वाढविलेले असतात. व त्यांची परस्पर गुंतागुंत झालेली असते. तद्वत् कांहींशी शरीरांतून एकंदर रसवाहिन्यांची व्यवस्था आहे. या रसवाहिन्यांस ठिकठिकाणीं गंड ( गांठी ) जणुं जोडलेल्या आहेत. त्या रसवाहिन्या या गांठीपासून त्या गांठीपर्यंत अशाच फार आहेत. या अशा गांठी हरएक संधींतून आहेत. पण त्यांतल्या त्यांत डोकें, मान, काख, वंक्षण (जांगाड) इत्यादिकांतून तर फारच आहेत. जर हातानें चांचपून पाहिलें तर काखेंत या गुठळ्या चांगल्या स्पष्ट हातीं लागतात. गंडमाळा वगैरे विकारांत तरी याच गांठी गळ्यावर येतात; व खरूज, फोड वगैरे झाल्यास जांगाड अथवा कांख व इतर संधि यांतून वाघाणें किंवा वळंवा येतो तो तरी ह्याच गांठींतून येतो. असो. तेव्हां असे गंड शरीरांत अनेक आहेत, व ते रक्तप्राप्त द्रवधारणाचें---खजिन्याचें---काम करितात. या गंडास ज्या निरनिराळ्या रसवाहिन्या जोडलेल्या आहेत. त्यांस लिंफॅटिक व्हेसल्स Lymphatic Vessels ह्मणतात. या रसवाहिन्या व गंड यांच्या साह्यानें देहांतून रसवहनकार्य घडतें.

आतां यापुढें रसवहनपद्धतीचा व तत्कार्याचा विचार करूं.

या रसवाहिन्या त्या निरनिराळ्या गांठींतून जात जात मुख्य ज्या दोन रसवाहिन्या आहेत त्यांत सुटतात. या दोन मुख्य रसवाहिन्या उजव्या व डाव्या बाजूनें आहेत. ( १ ) दक्षिण रसवाहिनी ( डक्टस् लिंफाटिक्स् डेक्स्टर ) हिच्यांत उजव्या अंगच्या अंतरिंद्रियांतील रसवाहिन्या सुटतात, व ही शेवटीं अधोजत्रुशिरा व अंतर्ग्रैवेयक यांच्या संगमस्थलीं एन्योर्ता ( अनामक ) महच्छिरेंत सुटते. ज्या ठिकाणीं ही शिरेंत सुटते तेथें रक्तवाहिनींतील ( एन्योर्ता-

तील ) रक्त या रसवाहिनींतून येऊं नये ह्मणून वाल्व्हस् पडदे असतात. यांच्या साहाय्यानें रसवाहिन्यांतील रस त्या शिरेंत जातो, पण रक्त मात्र रसवाहिन्यांतून येत नाहीं. ( २ ) वामरसवाहिनी ( थोरॅसिक डक्ट ) ही वाम अधोजत्रुशिरा व अंतर्ग्रैवेयक यांच्या संगमस्थलीं पूर्वीच्या त्या अनामक शिरेंत शिरते. हिच्यांत डाव्या आंगच्या रसवाहिन्या सुटतात. ही आपल्या उगमस्थानापासून ( 'रिसेप्टा कुयुल कायलाय' पासून ) निघते ती पृष्ठवंशाच्या पुढल्या आंगानें वर चढते; व वक्षस्थळाच्या मध्यभागीं दुभागून पुन्हा एकवटते. या वाहिनींत मस्तक, मान, हृदय, वक्षस्थळ यांच्या डाव्या भागांतील रसवाहिन्या व डावा हात, डावा फुप्फुस, अन्ननलिका, श्वासनलिका, अंत्र यांच्या रसवाहिन्या मिळतात. हिच्या आरंभींच्या रसाशयांत दोन्ही पायांकडील रसवाहिन्या मिळतात.

आतां या रसवाहिनीचे जे भाग जठर व क्षुद्रांत्र यांतून पसरले आहेत, त्या सामान्य रसवाहिन्यांच्या कार्याखेरीज आणखी एक असें कार्य करितात कीं, अन्नांतील दुधासारखा रस शोषून घेऊन वामरसवाहिनींत पोंचवितात. ह्मणून यांस अन्नरसवाहिन्या ( लाक्टिल्स ) ह्मणतात. येथें लक्ष्यांत ठेवण्याजोगी गोष्ट ही कीं, अन्नाचा अगदीं चरम उपयुक्त अंश-रस-तो वक्षस्थळीं या वाहिन्यांच्या द्वारानें रक्तरूपांत येतो. ह्याच्याच योगानें अवलंबकाचे अस्तित्व देहांत कायम राहतें. व एकंदर रसवाहिन्या कफकार्यास साधनीभूत होतात.

आतां हेंच प्रमेय आपल्या पूर्वजांनीं थोडक्यांत अवलंबक कफदोषावतरणांत सांगितलें आहे.—

श्लेष्मातु पंचधा,

**उरःस्थः स त्रिकस्य स्ववीर्यतः ॥**

**हृदयास्यान्नवीर्याच्च तत्स्थ एवांबुकर्मणा ॥**

**कफधाम्नाञ्च शेषाणां यत्करोत्यवलंबनम् ॥**

अतोऽवलंबकः श्लेष्मा, ( वाग्भट )

## व्ही. पी. ची व्यवस्था.

( १ ) ज्यांच्याकडून वाग्भटाबद्दल टपालखर्च १२ आणे आला आहे त्यांस ३ रु. १ आण्याची व्ही. पी. करण्यांत येईल.

( २ ) इतरांना ३ रु. १३ अण्यांची व्ही. पी. होईल.

( ३ ) वर्ग २ च्या प्रमाणें आश्रय देणारांना ५ रु. आश्रय व वाग्भट बक्षीस रवानगीखर्च १२ आणे व व्ही. पी. खर्च मिळून केली जाईल.

( ४ ) पहिल्या वर्गाच्या आश्रयदात्यांना वाग्भट बक्षीस ग्रंथ पाठवितांना, टपालापुरती व्ही. पी. आकारणी करून पाठवू.

## ध्यानांत ठेवा आणि व्यवस्था करा.

वरील प्रमाणें व्ही. पी. ता. २० जूनरोजीं करण्यांत येतील. सरसकट सर्वांकरितां ही व्यवस्था ठरविली आहे. त्यांत कांहीं फेरबदल करतां येणार नाहीं. तरी ज्यांना--

**याप्रमाणें व्ही. पी. घेणें नसेल,**

त्यानीं ता. १९ जून १९०४ च्या आंत आह्मांस रिप्लाय कार्डानें कळवावें. कारण, ही सूचना पाठविणारांस आमच्याकडून जो योग्य जबाब पाठविणें तो रिप्लाय कार्डावर पाठवितां येईल.

मुंबई--खेतवाडी, मेनरोड. **व्यवस्थापक आर्यभिषक्**

---

## वर्गणीबद्दल व्ही. पी. रवाना होईल.

### तरी खालील सूचनेकडे लक्ष द्या.

येत्या अक्टोबरांत वाग्भटाचा पूर्वार्ध रवाना होईल, व १९०५ मध्यें उत्तरार्ध रवाना होईल. शिवाय १९०६ मध्यें अष्टांगसंग्रह ( वृद्धवाग्भट ) याचा उरलेला भाग मिळेल.

जुलैपासून नवीन वर्ष लागणार; तरी त्या व पुढच्या वर्षाची मिळून ३ रु. वर्गणी देणारांस मात्र हीं बक्षिसें देणें आहेत. शिवाय वाग्भट दोन भाग रवानगीचा खर्च १२ आणे. याबद्दल ता. २० जून रोजीं तिन्ही अंकांचें जें एक पुस्तक रवाना होईल तेंच जुन्या वर्गणीदारांना व्ही. पी. नें पाठवू. सदर प्रमाणें ३ रु. १२ आणे व व्ही. पी. खर्च १ आणा, मिळून सदर तिन्ही अंकांचें पुस्तक ३ रु. १३ आण्यास व्ही. पी. केलें जाईल. **ज्यांस घेणें नसेल** त्यांनीं ता. १९ च्या आंत कळवावें.

# अगत्याची सूचना.

मुंबईस प्लेग वाढल्यामुळें अंक छापण्याचें काम बंद होतें; ह्मणून अंक रवाना झाले नाहींत. आज अंक ८ व ९ जात आहेत. १०, ११ आणि १२ हे तिन्ही अंक एकत्र पुस्तक, ता. २० जूनरोजी रवाना होईल.

## नवीन वर्ष १६ वें,

कर्कसंक्रांति ( जुलै ता. १४ ) रोजीं बसतें. त्यापासून प्रत्येक अंक नियमित रवाना होत जाईल.

हल्लीं **स्वतंत्र छापखाना घेतला** असल्यामुळें, अंक नियमित रवाना होत जातील.

### आर्यभिषक् मा. पु. आश्रय दात्यांकडून आश्रयांचो पोंच.

( गतांकाच्या पुढील. )

### वर्ग १ ला–मुंबई.

रा. रा. राजू बाबाजी, जनरल कंट्राक्टर.

### वर्ग १ ला–बाहेरगांव.

रा. रा. साम्युएल सालामेन, विगतपुरी.
श्री० रा. रा. हरी कृष्ण पाटणकर, राजापूर.
वे. सं. बाळशास्त्री वाशीमकर, वा. सं. ना. मं. चे मालक.
श्री. स. दादासाहेब महाराज पंतप्रतिनिधि, सं. औंध.
श्री. पुरुषोत्तमराव नारायण मुनेदार ऊर्फ तात्यासाहेब, विठूर ( ब्रह्मावर्त. )

### वर्ग २ रा–बाहेरगांव.

श्री. रामचंद्र नरसिंह देशपांडे, चंदूर.
रा. रा. द्वारकू भगाजी लाटे चिखली.
डा० रामचंद्र वासुदेव जोशी, पुणें.
वैद्य वासुदेव विठ्ठल केरकर, मडगांव.

### वर्ग २ रा—मुंबई.

रा. रा. विनायक सदानंद जोशी, जे. पी.
रा. ब. हरिश्चंद्र कृष्ण जोशी, जे. पी. तीन प्रती


# अमदाबाद येथील

कापड सूत वगैरे हरएक प्रकारचा माल आह्मीं कसोशीनें व खात्रीपूर्वक पाठवूं. विशेष माहिती मागवा. अमदाबाद –भद्रेंत.

यमाजी गोपाळ वैद्य

बुद्धि, स्मृति, ज्ञान व तपश्चर्या यांचें निवासस्थान व प्राणिमात्रांनीं शरण जाण्यास योग्य असे जे आत्रेय ऋषि ते अग्निवेशाच्या प्रश्नावरून उन्मादरोगाचीं कारणें, लक्षणें व चिकित्सा सांगते झाले. परस्पर विरुद्ध, दुष्ट व अपवित्र भोजन करणें, देव, गुरु, पूज्य जन, ब्राह्मण यांस दरडावणें, अतिशय भीति किंवा हर्ष होऊन मनावर आघात होणें, आणि अनेक प्रकारच्या विषम चेष्टा करणें, या कारणांनीं अशक्त मनाच्या मनुष्याचे दोष दूषित होऊन ते बुद्धिचें राहण्याचें ठिकाण जें हृदय त्यास दूषित करून आणि मनोवाहक स्रोतांचे ठायीं अधिष्ठित होऊन त्या मनुष्याचें मन अतिशय मुग्ध करितात. बुद्धिस भ्रम होणें, मन इतस्ततः भटकणें किंवा मनाचें उड्डाण, व्याकुळ दृष्टि, अधीरता, असंबद्ध भाषण, आणि शून्य हृदय हीं उन्मादाचीं सामान्य लक्षणें होत. उन्मादानें मूढ झालेल्या मनुष्यास सुख, दुःख, आचार, धर्म हीं मुळींच कळत नाहींत. त्यास कोणत्याही प्रकारें शांति प्राप्त होत नाहीं. त्याची स्मृति, बुद्धि, शुद्धि हीं नाहींशी होतात आणि तो इकडे तिकडे भटकूं लागतो. बुद्धि, मन व स्मृति यांची जी व्याकुलता किंवा जो उद्भ्रम त्याचें नांव उन्माद. तो आगन्तु व निज असा दोन प्रकारचा आहे. निराळ्या तऱ्हेनें तो पांच प्रकारचाही आहे. त्याचीं निरनिराळीं लक्षणें व चिकित्सा आतां विस्तार पूर्वक सांगतों.

रूक्षाल्पशीतान्नविरेक धातुक्षयोपवासैरनिलो तिवृद्धः ।
चिन्तादिजुष्टं हृदयं प्रदूष्य बुद्धिं स्मृतिं चाप्युपहन्ति शीघ्रम् ॥७॥
अस्थानहासस्मितनृत्यगीतवागङ्गविक्षेपणरोदनानि ।
पारुष्यकार्श्यारुणवर्णताच जीर्णे बलं चानिलजस्य रूपम् ॥ ८ ॥
अजीर्णकट्वम्लविदाह्यशीतैर्भोज्यैश्चितं पित्तमुदीर्णवेगम् ।
उन्मादमत्युग्रमनात्मकस्य हृदि श्रितं पूर्ववदेव कुर्यात् ॥ ९ ॥
अमर्षसंरम्भविनग्नभावाः सन्तर्जनाभिद्रवणौष्ण्यरोषाः ।
प्रच्छायशीतान्नजलाभिलाषः पीताच भाः पित्तकृतस्य लिङ्गम् १०
सम्पूरणैर्मन्दविचेष्टनैश्च सोष्मा कफो मर्मणि सम्प्रवृद्धः ।

बुद्धिं स्मृतिश्चाप्युपहत्य चित्तं प्रमोहयन्सञ्जनयेद्विकारम् ॥ ११ ॥
वाक्चेष्टितं मन्दमरोचकश्च नारीविविक्तप्रियतातिनिद्रा ।
छर्दिश्च लाला च बलश्च भुङ्क्ते नखादिशौक्ल्यञ्च कफात्मके स्यात् ॥ १२ ॥
यः सन्निपातप्रभवोऽतिघोरः सर्वैः समस्तैः स तु हेतुभिः स्यात् ।
सर्वाणि रूपाणि बिभर्ति तादृग्विरुद्धभेषज्यविधिर्विवर्ज्यः ॥ १३ ॥

रूक्ष, थोडें व थंड असें अन्न खाणें; आणि अतिशय जुलाब, धातुक्षय व उपास या कारणांनीं वायु अतिशय वाढून तो, चिंता, शोक वगैरे विकारांनीं ग्रस्त झालेल्या हृदयास दूषित करून लवकरच बुद्धि व स्मृति यांस नष्ट करितो. अर्थात् उन्माद उत्पन्न करितो. प्रसंगावांचून मोठ्यानें किंवा गालांतल्या गालांत हंसणें, नाचणें, गाणें, बडबडणें, अंगें वेडींवांकडीं करणें, रडणें, शरीर खरखरीत, कृश व लाल होणें, आणि अन्न जिरल्यावर रोगाचा जोर वाढणें हीं वातोन्मादाचीं लक्षणें होत. अजीर्णावर जेवणें, आणि तिखट, आंबट, विदाही, व उष्ण पदार्थांचा आहार करणें या कारणांनीं वाढलेलें पित्त कुपित होऊन तें दुर्बलचित्त मनुष्याच्या हृदयाचे ठायीं अधिष्ठित होऊन भयंकर उन्माद उत्पन्न करितें. राग, आवेश, नागवें राहणें, लोकांस शिव्या देणें अथवा त्यांची निर्भर्त्सना करणें, पळणें, उष्णता, रुसून बसणें, दाट छाया आणि थंडगार अन्न-पाण्यावर इच्छा होणें व शरीराचा रंग पिवळट होणें हीं पित्तोन्मादाचीं लक्षणें जाणावीं. अति भोजन करणें व परिश्रम न करणें या कारणांनीं उष्णतायुक्त कफ हृदयमर्माचे ठायीं वाढून बुद्धि व स्मृति यांचा नाश करून चित्तास मोह उत्पन्न करितो. अर्थात् उन्माद होतो. थोडें बोलणें, मंद चेष्टा, अरुचि, बायकांची व एकांताची आवड, अतिशय झोंप, उलटी, लाळ गळणें, जेवल्याबरोबर रोगाचा जोर वाढणें, आणि नखें वगैरे पांढरीं होणें, हीं कफज उन्मादाचीं लक्षणें समजावीं. वातादि तिन्ही दोष प्रकुपित होण्याचीं कारणें एकत्र घडल्यानें सान्निपातिक उन्माद उत्पन्न होतो आणि त्यांत वर सांगितलेल्या तीन्ही प्रकारच्या निरनिराळ्या उन्मादांचीं लक्षणें एकत्र

होतात. सान्निपातिक उन्माद अत्यंत भयंकर आहे. त्याची चिकित्सा परस्पर विरुद्ध करावी लागत असल्यामुळें तो असाध्य आहे.

देवर्षिगन्धर्वपिशाचयक्षरक्षःपितृणामभिधर्षणानि ।
आगन्तुहेतुर्नियमव्रतादि मिथ्याकृतं कर्मच पूर्वदेहे ॥ १४ ॥
अमर्त्यवाग्विक्रमवीर्यचेष्टाज्ञानादिविज्ञान बलादिभिर्यः ।
उन्मादकालोऽनियतश्च यस्य भूतोत्थमुन्मादमुदाहरेत्तम् ॥ १५ ॥
अदूषयन्तः पुरुषस्य देहं देवादयः स्वैश्च गुणप्रभावैः ।
विशन्त्यदृश्यास्तरसा यथैव छायातपौ दर्पणसूर्यकान्तौ ॥ १६ ॥
आयातकालो हि सपूर्वरूपः प्रोक्तो निदानेऽस्य परं सुराद्यैः ।
उन्मादरूपाणि पृथङ्निबोध कालश्च गम्यान्पुरुषांश्च तेषाम् १७॥

देव, ऋषि, गंधर्व, पिशाच, यक्ष, राक्षस, व पितरांचें धर्षण अर्थात् त्यांची निर्भर्त्सना, नियम—व्रतादिकांत अतिक्रम होणें आणि पूर्वजन्मीं केलेलें पापकर्म या कारणांनीं आगन्तु उन्माद उत्पन्न होतो. ज्या उन्मत्त मनुष्यांत अमानुष वाणी, पराक्रम, शक्ति, क्रिया, ज्ञान, विज्ञान व सामर्थ्य हीं आढळतील आणि ज्याचा आवेश येण्याचा वेळ ठरलेला नसेल त्यास भूतोन्माद झाला आहे असें समजावें. ज्याप्रमाणें छाया व सूर्याचे किरण, आरसा किंवा सूर्यकांत मण्यांत, न दिसतां व आरसा किंवा मण्याचा भंग न करितां, आपल्या विशिष्ट शक्तिच्या योगानें झटकन आंत शिरतात, तसेच देवर्षि गन्धर्वादिक मनुष्याच्या शरीरास दूषित न करितां व इतरांस न दिसतां आपल्या गुणप्रभावाच्या योगानें आंत झटकन प्रवेश करितात. निरनिराळ्या उन्मादांचा आगमनकाल व त्यांचीं पूर्वरूपें मागें निदानस्थानांत सांगितलींच आहेत. आतां निरनिराळ्या उन्मादांचीं लक्षणें, ते येण्याच्या वेळा व कोणता उन्माद कशा प्रकारच्या मनुष्यास होतो याविषयींचें सविस्तर व वेगवेगळें निरूपण करितों तें ऐक.

तद्यथा—सौम्यदृष्टिं गम्भीरमप्रधृष्यमकोपनमस्वप्नम भोजनाभिलाषिणमल्पस्वेदमूत्रपुरीषवाचं शुभगन्धं फुल्लपद्मवदनमितदेवोन्मत्तं विद्यात् ॥ १८ ॥ गुरुवृद्धसिद्धर्षीणामभिशापाभिचाराभिध्यानानुरूपाहारचेष्टा-व्याहारं तैरुन्मत्तं विद्यात् ॥ १९ ॥ अप्रसन्नदृष्टि-मपश्यन्तं निद्रालुं प्रतिहतवाचमनन्नाभिलापारोचका-विपाकपरीतं पितृभिरुन्मत्तं विद्यात् ॥ २० ॥ चण्डं माहासिकं तीक्ष्णं गम्भीरमप्रधृष्यं मुखवाद्यनृत्यगीतान्न-पानस्नानपानमाल्यधूपगन्धरक्तवस्त्रबलिकर्महास्यकथा योगप्रियं शुभगन्धमिति गन्धर्वोन्मत्तमिति विद्यात् ॥ ॥ २१ ॥ असकृत्स्वप्नरोदनहास्यं नृत्यगीतवाद्यकथा-न्नपानस्नानमाल्यधारणगन्धरतिं रक्तविप्लुताक्षं द्विजा-तिवैद्यपरिवादिनं रहस्यभाषिणमिति यक्षोन्मत्तं वि-द्यात् ॥ २२ ॥

ज्याची दृष्टि सौम्य आहे असा, गंभीर, न दबणारा—धमकीस न जुमानणारा, न रागावणारा, झोंप न येणारा, ज्यास अन्नावर इच्छा नाहीं असा, ज्यास घाम, लघ्वी व शौच हीं कमी होतात असा, कमी बोलणारा, ज्याच्या अंगास सुगंध येतो असा, आणि ज्याचा चेहरा प्रफुल्लित कमलाप्रमाणें आहे असा जो उन्माद रोगी असेल, त्यास देवोन्माद झाला आहे असें समजावें. गुरु, वृद्ध, सिद्ध, ऋषि, यांच्या अभिशाप, अभिचार व अभिध्यानानुरूप, आहार, विहार करूं लागल्यास तत्कृत उन्माद आहे असें समजावें. ज्याचे डोळे गढूळ आहेत, ज्यास बरोबर दिसत नाहीं, झोंप फार येते, जो बोलतांना अडखळतो, ज्याची अन्नावर प्रीति नाहीं, ज्याच्या तोंडास रुचि नाहीं व ज्यास अन्नपचन बरोबर होत नाहीं, त्यास पितृकृत उन्माद झाला आहे असें समजावें. कोपिष्ट, साहसी, तीव्र प्रकृतीचा, गंभीर, न भिणारा, सनई, बांसरी वगैरे तोंडानें वाजविण्याचीं

वाद्यें वाजविणें, नाचणें, गाणें, खाणें, पिणें, स्नान, फुलें, धूप, सुवास, तांबडीं वस्त्रें, बलिकर्म, हास्यरसयुक्त गोष्टी, या विषयांवर ज्याची प्रीति आहे असा, आणि ज्याच्या अंगास सुगंध येतो अशा उन्माद रोग्यास गन्धर्वोन्माद झाला आहे असें समजावें. जो वरचेवर झोंपतो, रडतो, हंसतो; ज्यास नाच, गाणें, वाद्य, गोष्टी, खाणें, पिणें, स्नान, पुष्पें, धूप व सुगंध या गोष्टी आवडतात, ज्याचे डोळे लाल व पाण्यानें भरलेले असतात, जो द्विज व वैद्यांची निंदा करितो आणि जो गुप्त गोष्टी बोलतो त्यास यक्षोन्माद झाला आहे असें समजावें.

**नष्टनिद्रमन्नपानद्वेषिणमनाहारमेप्यतिबलिनं शस्त्रशोणित मांसरक्तमाल्याभिलाषिणं सन्तर्जकमिति राक्षसोन्मत्तं विद्यात् ॥ २३ ॥ प्रहासनृत्यप्रधानंदेवविप्रवैद्यद्वेषावज्ञाभिस्तुतिवेदमन्त्रशास्त्रोदाहरणैः काष्ठादिभिरात्मपीडनेन च ब्रह्मराक्षसोन्मत्तं विद्यात् ॥२४॥ अस्वस्थचित्तं स्थानमलभमानं नृत्यगीतहासिनं बद्धाबद्धप्रभाषिणं सङ्कटकूटमलिनरथ्याचेलतृणेष्वारोहणरतिं सम्भिन्नवर्णरूक्षस्वरं नग्नं विधावन्तं नैकत्र तिष्ठन्तं दुःखान्यावेदयन्तं नष्टस्मृतिं पिशाचोन्मत्तं विद्यात् ॥ २५ ॥**

ज्यास झोंप येत नाहीं, खाणें पिणें आवडत नाहीं, जो जेवीत नाहीं, जो अतिशय बलवान् असतो, ज्यास हत्यार, रक्त, मांस, व तांबडीं फुलें हीं आवडतात व जो लोकांची निर्भर्त्सना करितो, शिव्या देतो, त्यास राक्षसोन्माद आहे असें समजावें. जो अतिशय हंसतो व नाचतो, देवांचा द्वेष करितो, ब्राह्मणांची अवज्ञा करितो, वैद्यांची स्तुति करितो, जो वेदमंत्र ह्मणतो व शास्त्राचीं उदाहरणें देतो आणि लांकूड वगैऱ्यांनीं स्वतःस मारून घेतो, त्यास ब्रह्मराक्षसोन्माद आहे असें समजावें. ज्याचें मन स्वस्थ नाहीं, जो एकजागीं स्थिर बसत नाहीं, नेहमीं नाचतो, गातो, हंसतो, कांहीं संबद्ध व कांहीं असंबद्ध भाषण करितो, भिंताड, पर्वताचें शिखर, किंवा गवताचा ढीग यांवर चढण्यांत प्रसन्न होतो,

रस्त्यांतील वाणेरड्या चिंध्या अंगावर घेतो, शरीराचा वर्ण बदलतो, आवाज रूक्ष होतो, जो नागवा धांवतो, एके ठिकाणीं बसत नाहीं, आपलीं दुःखें सांगत फिरतो व ज्याची स्मृति नाहींशी झाली आहे अशा मनुष्यास पिशाचोन्माद झाला आहे असें समजावें.

तत्र शौचाचारं तपःस्वाध्यायकोविदं नरं प्रायः शुक्लप्रतिपदि त्रयोदश्याञ्च देवा धर्षयन्ति ॥ २६ ॥ स्नानशुचिविविक्तसेविनं धर्मशास्त्रश्रुतिकाव्यकुशलं प्रायः षष्ठीनवम्योर्ऋषयो धर्षयन्ति ॥ २७ ॥ मातृपितृगुरुवृद्धसिद्धाचार्योपसेविनं प्रायो दशम्याममावास्यायाञ्च पितरो धर्षयन्ति ॥ २८ ॥ गन्धर्वास्तु स्तुतिगीतवादित्ररतिं परदारगन्धमाल्यप्रियं शौचाचारं द्वादश्यां चतुर्दश्याञ्च धर्षयन्ति ॥ २९ ॥ सत्वबलरूपगर्वशौर्ययुक्तं माल्यानुलेपनं हास्यप्रियमतिवाक्करणं प्रायः शुक्लैकादश्यां सप्तम्याञ्च यक्षा धर्षयन्ति ॥ ३० ॥ स्वाध्यायतपोनियमोपवासव्रतचर्यादेवयतिगुरुपूजारतिं भ्रष्टशौचं ब्राह्मणमब्राह्मणं वा ब्रह्मवादिनं शूरमानिनं देवतागारसलिलक्रीडनरतिं प्रायः शुक्लपञ्चम्यां पूर्णचन्द्रदर्शने च ब्रह्मराक्षसा धर्षयन्ति ॥ ३१ ॥ रक्षःपिशाचास्तु हीनसत्त्वपिशुनस्त्रैणलुब्धं प्रायो द्वितीयातृतीयाष्टमीषु पुरुषं छिद्रमवेक्ष्याभिधर्षयन्ति ॥ ३२ ॥ इत्यपरिसङ्ख्यानां ग्रहाणामाविष्कृततया ह्यष्टावेते व्याख्याताः ॥ ३३ ॥

शौचाचारयुक्त आणि तपस्वी व स्वाध्यायतत्पर मनुष्यास बहुतकरून शुक्लपक्षाची प्रतिपदा व त्रयोदशीच्या दिवशीं देवता पकडतात, अर्थात् सद-

रहू तिथींस देवोन्माद होतो. नेहमीं स्नान करून पवित्र राहणारा, एकांत सेवन करणारा, आणि धर्मशास्त्र–वेद–काव्यनिपुण अशा मनुष्यास बहुतकरून षष्ठी व नवमीच्या दिवशीं ऋष्युन्माद होतो. आई–बाप–गुरु–वृद्ध–सिद्ध-आचार्य यांची सेवा करणाऱ्या मनुष्यास बहुतकरून दशमी–अमावास्येस पितृकृत उन्माद होतो. जो स्तुति, गाणें, वाजवणें, या गोष्टींत आसक्त असतो, ज्यास परस्त्री, सुगंध, पुष्पें, इत्यादिक आवडतात व जो शुचिर्भूत राहतो, अशा मनुष्यास द्वादशी व चतुर्दशीस गन्धर्वोन्माद होतो. धैर्यशाली, बलवान्, रूपवान्, गर्विष्ठ, शूर, पुष्पमाळा व चंदनादि सुगंधि लेप अंगास लावणारा, हास्यप्रिय व अतिशय बोलणारा, अशा मनुष्यास बहुतकरून शुक्ल एकादशी व सप्तमीस यक्षोन्माद होतो. स्वाध्याय, तप, नियम, उपास, व्रतें आणि देव–सन्यासी व गुरू यांची पूजा करणारा, पवित्राचारभ्रष्ट, ब्राह्मण, अथवा अब्राह्मण, ब्रह्मवादी, शौर्याभिमानी, देवमंदिरांत व जलांत क्रीडा करणारा, अशा मनुष्यास बहुतकरून शुक्ल पंचमी व पूर्णिमेच्या दिवशीं ब्रह्मराक्षसोन्माद होतो. धैर्यहीन, चहाडखोर, स्त्रीलंपट, व लोभी मनुष्यास, बहुतकरून द्वितीया–तृतीया व अष्टमीच्या दिवशीं, तो पापकर्मांत प्रवृत्त होत असतां राक्षस व पिशाच उन्मत्त करितात. असंख्य ग्रहांपैकीं संक्षेपतः हे प्रसिद्धतर आठ प्रकारचे ग्रह सांगितले.

सर्वेष्वपि तु खल्वेषु यो हस्तावुद्यम्य रोषसंरम्भान्निस्संज्ञमन्येष्वात्मनि वा पातयेत्सह्यसाध्यो ज्ञेयस्तथा यः साश्रुनेत्रो मेढ्रमवृत्तरक्तः क्षतजिव्हः प्रस्रुतनासिकश्छिद्यमानमर्मा प्रतिहन्यमानपाणिः सततं विकूजन्दुर्वर्णस्तृषार्तः पूतिगन्धिश्च हिंसार्थ उन्मत्तो ज्ञेयस्तं परिवर्जयेत् । रत्यर्चनकामोन्मादिनौ तु भिषगभिचाराभिशापाभ्यां बुद्ध्वा तदङ्गोपहारबलिश्रमेण मन्त्रभेषज्यविधिनोपक्रमेत् । तत्र द्वयोरपि निजागन्तुनिमित्तयो

**उन्मादयोः समासविस्ताराभ्यां भेषजविधिं व्याख्यास्यामः ॥ ३४ ॥**

वर वर्णन केलेल्या अनेक प्रकारच्या उन्माद रोग्यांपैकीं जो रोगी आपले दोन्ही हात वर उचलून रागानें व आवेशानें आपल्या स्वतःच्या किंवा दुसऱ्याच्या आंगावर आपटून बेशुद्ध पडतो, ज्याचे डोळे पाण्यानें भरलेले असतात, ज्याच्या शिस्नांतून रक्त वाहतें, ज्याच्या जिभेस क्षत असतें, नाकांतून शेंबूड वाहतो, मर्मस्थानें फाटल्यासारखीं वाटतात, जो हात आपटीत असतो, नेहमीं कुजबुजत असतो, ज्याच्या शरीराचा वर्ण बिघडतो, अतिशय तहान लागते, आंगास घाण येते व जो हिंसा करण्याचा प्रयत्न करतो तो रोगी असाध्य समजून वैद्यानें सोडून द्यावा. रत्युन्मत्त, अर्चनोन्मत्त व कामोन्मत्त ह्मणजे देवतादिकांच्या पूजेंत किंवा कामसेवनांत कांहीं व्यतिक्रम झाल्यानें, देवतांच्या शापानें किंवा स्त्रीच्या अभिचारप्रयोगानें (ज्यास करणी केली असें ह्मणतात) उन्मत्त झालेल्या रोग्याची चिकित्सा उपहार, बलि, होम हवन, जप, मंत्र, औषध, इत्यादि दैवी व औषधी उपचारांनीं करावी. आतां यापुढें निज व आगन्तु दोन्ही प्रकारच्या उन्मादांची संक्षिप्त व विस्तृत चिकित्सा वर्णन करितों.

**उन्मादे वातजे पूर्वं स्नेहपानं विशेषवित् ।**
**कुर्यादावृतमार्गे तु सस्नेहं मृदुशोधनम् ॥ ३५ ॥**
**कफपित्तभवेष्यादौ वमनं सविरेचनम् ।**
**स्निग्धस्विन्नस्य कर्तव्यं शुद्धे संसर्जनक्रमः ॥ ३६ ॥**
**निरूहणस्नेहवस्ती शिरसश्च विरेचनम् ।**
**ततः कुर्याद्यथादोषं तेषां भूयस्त्वमाचरेत् ॥ ३७ ॥**
**हृदिन्द्रियशिरःकोष्ठे संशुद्धे वमनादिभिः ।**
**मनःप्रसादमाप्नोति स्मृतिं संज्ञाञ्च विन्दति ॥ ३८ ॥**
**शुद्धस्याचारविभ्रंशे तीक्ष्णनावनमञ्जनम् ।**

ताडनञ्च मनोबुद्धिदेहसन्तर्जनं हितम् ॥ ३९ ॥
यः शक्तो विनयेत्पट्टैः संयम्य सुदृढैः सुखैः ।
अपेतलोहकाष्ठाद्यैः संरोध्यश्च तमोगृहे ॥ ४० ॥
तर्जनं त्रासनं दानं सान्त्वनं हर्षणं भयम् ।
विस्मयो विस्मृतिर्हेतोर्नयन्ति प्रकृतिं मनः ॥ ४१ ॥
प्रदेहोत्सादनाभ्यङ्गधूमपानञ्च सर्पिषः ।
प्रयोक्तव्यं मनोबुद्धिस्मृतिसंज्ञाप्रबोधनम् ॥ ४२ ॥
सर्पिःपानादिरागन्तोर्मन्त्रादिश्चेष्यते विधिः ।
अतः सिद्धतमान्योगान्छृणून्मादविनाशनान् ॥ ४३ ॥

वातज उन्मादांत देश-काल-मात्रादिकांचे नियम जाणणाऱ्या वैद्यानें प्रथम स्नेहपान करवावें. वायु वाढल्यानें स्रोतोमार्ग अवरुद्ध झाले असल्यास स्नेहयुक्त हलकेंसे विरेचन द्यावें. कफ-पित्तजन्य उन्मादांत प्रथम स्नेहनस्वेदन क्रिया करून नंतर वमन विरेचन द्यावें. वमन-विरेचनानें कोष्ठशुद्धि झाल्यावर पूर्वोक्त पेयादिक्रम करावा. नंतर दोषानुसार आस्थापन किंवा अनुवासनबस्ती व शिरोविरेचन द्यावें. जो दोष जोरांत असेल त्याचा उपचार प्रथम करावा. वमन-विरेचनादि प्रयोगांनीं हृदय, इंद्रियें, मस्तक व कोठा हीं साफ झालीं ह्मणजे रोग्याच्या मनाला प्रसन्नता होते आणि स्मृति व संज्ञा हीं प्राप्त होतात. वमनादिकांनीं शुद्ध झाल्यानंतरही रोगी आचारभ्रष्ट राहिल्यास अर्थात् भलत्याच गोष्टी करूं लागल्यास त्यास तीक्ष्ण नस्यें व अंजनें करावीं, मार द्यावा, आणि त्याचें मन, बुद्धि व शरीर यांस झोंबण्याजोगीं कर्मे करावीं. रोगी सशक्त असल्यास त्यास मजबूत व शरीरास इजा न होईल अशा प्रकारच्या वस्त्रांनीं किंवा दोरी वगैरे बंधनांनीं बांधून अंधार कोठडींत कोंडून ठेवावें. मात्र त्या बंधनांत लांकूड किंवा लोखंडाचा संपर्क असूं नये. निर्भर्त्सना करणें, त्रास देणें, अभीष्ट वस्तु देणें, समजुतीच्या गोष्टी सांगून सांत्वन करणें, हर्ष उत्पन्न करणें, भीति दाखविणें, आणि विस्मय उत्पन्न करणें या उपायांनीं उन्मत्त मनुष्याचें मन

मूळ स्थितीवर येतें. लेप, उटणीं लावणें, अभ्यंग, धूमपान व घृतपान या उपायांनीं मन, बुद्धि, स्मृति व चेतना हीं जागृत होतात. आगन्तु उन्मादांत घृतपानादि औषधोपचार व मंत्रादि दैवी उपाय करावे. आतां यापुढें उन्मादनाशक उत्कृष्ट प्रकारचे सिद्ध औषधिप्रयोग सांगतों ते ऐक.

हिङ्गुसौवर्चलाव्योषैर्द्विपलांशैर्घृताढकम् ।
चतुर्गुणे गवां मूत्रे सिद्धमुन्मादनाशनम् ॥ ४४ ॥

हिंग, पादेलोण, सुंठ, मिरें, पिंपळी, प्रत्येकीं आठ आठ तोळे आणि तूप चार शेर एकत्र मिळवून सोळा शेर गोमूत्रांत सिद्ध करावें. हें घृत सिद्ध उन्मादनाशक आहे.

विशाला त्रिफला कौन्ती देवदार्वेलवालुकम् ।
स्थिरानन्ता रजन्यौ द्वे शारिवे द्वे प्रियङ्गुकम् ॥ ४५ ॥
नीलोत्पलैलामञ्जिष्ठा दन्तीदाडिमकेशरम् ।
तालीशपत्रं बृहती मालत्याः कुसुमं नवम् ॥ ४६ ॥
विडंगं पृश्निपर्णी च कुष्ठं चन्दनपद्मकौ ।
कल्कैः कर्षसमैरेतैर्विंशत्यष्टाभिरेव च ॥ ४७ ॥
चतुर्गुणे जले पक्त्वा घृतप्रस्थं विपाचयेत् ।
अपस्मारे ज्वरे कासे श्वासे मन्देऽनले क्षये ॥ ४८ ॥
वातरोगे प्रतिश्याये तृतीयकचतुर्थके ।
छर्द्यर्शोमूत्रकृच्छ्रे च विसर्पोपहतेषु च ॥ ४९ ॥
कण्डूपाण्ड्वामयोन्मादविषमेहगदेषु च ।
भूतोपहतचित्तानां गद्गदानामचेतसाम् ॥ ५० ॥
शस्तं स्त्रीणाञ्च वन्ध्यानां धन्यमायुर्बलप्रदम् ।
अलक्ष्मी पापरक्षोघ्नं सर्वग्रहविनाशनम् ॥ ५१ ॥
कल्याणकमिदं सर्पिः श्रेष्ठं पुंसवनेषु च ।

**कल्याण घृत**—इन्द्रायणमूळ, हिरडा, बेहडा, आंवळकाठी, रेणुकबीज, देवदार, एलवालुक, सालवणमूळ, अनन्तमूळ, हळद दारूहळद, काळी व पांढरी उपलसरी, गहुला, निळेंकमळ, वेलची, मंजिष्ठ, दन्तीमूळ, डाळिंबरस, नागकेशर, तालिसपत्र, डोरलीमूळ, जाईच्या कळ्या, वावडिंग, पिठवण, कोष्ठ, चंदन, पद्मकाष्ठ, हीं २८ औषधें प्रत्येकीं एक एक तोळ्याप्रमाणें घेऊन त्यांचा कल्क करून तो चौपट पाण्यांत शिजवावा आणि तें पाणी गाळून घेऊन त्यांत एकशेर तूप घालून तें सिद्ध करावें. यास कल्याणघृत असें ह्मणतात. हें अपस्मार, ताप, खोकला, दमा, अग्निमांद्य, क्षय, वातरोग, पडसें, तीन व चार दिवसांच्या पाळीचे ताप, उलटी, मूळव्याधि, मूत्रकृच्छ्र, विसर्प, कण्डू, पाण्डु उन्माद, विषविकार, प्रमेह, भूतोन्माद, गद्गदरोग, नष्टचित्तरोगी वन्ध्या स्त्रिया यांस उत्कृष्ट गुणकारी आहे. हें धन्य, आयुर्वर्धक, शक्तिदायक, दारिद्र्य-पाप-राक्षसपीडा, आणि ग्रहपीडा यांचें नाशक व पुंसवनकर्मांत श्रेष्ठ असें आहे.

**एभ्य एव स्थिरादीनि जले पक्त्वैकविंशतिम् ॥ ९२ ॥**
**रसे तस्मिन्पचेत्सर्पिर्गृष्टिक्षीरचतुर्गुणे ।**
**वीराद्विमाषकाकोलीस्वयङ्गुप्तर्षभकर्द्धिभिः ॥ ९३ ॥**
**मेदया च समैः कल्कैस्तत्स्यात्कल्याणकं महत् ।**
**बृंहणीयं विशेषेण सन्निपातहरं परम् ॥ ९४ ॥**

**महाकल्याणघृत.**—वर कल्याणघृताच्या पाठांत सांगितलल्या औषधांपैकीं सालवणीपासून पुढचीं २१ औषधें घेऊन त्यांच्या सोळापट पाणी घालून काढा करावा. नंतर तो गाळून घेऊन त्यांत चतुर्थांश तूप, पहलटकर गाईचें चौपट दूध आणि शतावरी, उडीद, रानउडीद, काकोली, कवचबीज, ऋषभक, ऋद्धि व मेदा यांचा समभाग कल्क घालून तूप सिद्ध करावें यास महाकल्याण घृत ह्मणातात. हें विशेष बृंहणीय व उत्कृष्ट प्रकारचें सन्निपातनाशक आहे.

जटिलां पूतनां केशीं चारटीं मर्कटीं वचाम् ।
त्रायमाणां जयां वीरां चोरकं कटुरोहिणीम् ॥ ५५ ॥
कायस्थां शूकरीं छत्रामतिछत्रां पलङ्कषाम् ।
महापुरुष दन्ताश्च वयःस्थां नाकुलीद्वयम् ॥ ५६ ॥
कटम्भरां वृश्चिकालीं स्थिराश्चाहृत्य तैर्घृतम् ।
सिद्धश्चातुर्थकोन्मादग्रहापस्मारनाशनम् ॥ ५७ ॥
महापैशाचिकं नाम घृतमेतद्यथामृतम् ।
बुद्धिस्मृतिकरश्चैव बालानां चाङ्गवर्धनम् ॥ ५८ ॥

महापैशाचिकघृत—जटामांसी, हिरडे, सुगंध जटामांसी, स्थलकमलिनी, कवचबीज, वेखंड, त्रायमाण, ऐरणमूळ ( नरवेल ) काकोली, किरमाणी ओंवा, कुटकी, क्षीरकाकोली, वरधारा, धणे, वर्डशेप, लाख किंवा गुग्गुळ, शतावरी, ब्राह्मी किंवा गुळवेल अथवा आवळकाठी, दोन्ही प्रकारची सापसंद मालकांगोणी ( कांहींच्या मतें किन्ही ) लघुमेढशिंगी व सालवण यांचा कल्क टाकून तूप सिद्ध करावें. यास महापैशाचघृत ह्मणतात. हें अमृता प्रमाणे गुणकारक आहे. हें चातुर्थिक ज्वर भूतबाधा व फेंपरें यांचा नाश करणारें असून लहान मुलांची वुद्धि, स्मरणशक्ति व शरीर वाढविणारें आहे.

लशुनानां शतं त्रिंशदभयात्र्यूषणात्पलम् ।
गवां चर्ममसीप्रस्थो द्व्याढकं क्षीरमूत्रयोः ॥ ५९ ॥
पुराणसर्पिषः प्रस्थमेभिः सिद्धं प्रयोजयेत् ।
हिङ्गुचूर्णपलं शीते दत्वाच मधुमानिकाम् ॥ ६० ॥
तद्दोषागन्तुसम्भूतानुन्मादान्विषमज्वरान् ।
अपस्मारांश्च हन्त्याशु पानाभ्यञ्जननावनैः ॥ ६१ ॥

लशुनादिघृत—लसणीच्या कांड्या शंभर, तीस हिरडे, सुंठ, मिरीं, पि-

पळी चार चार तोळे, गाईच्या चामड्याची राख ६४ तोळे, गाईचें दूध व मूत्र प्रत्येकीं आठ आठ शेर हीं औषधें मिळवून ६४ तोळे जुनें तूप सिद्ध करावें आणि तें निवल्यावर त्यांत चार तोळे हिंगाची पूड व ३२ तोळे ( कित्येकांच्या मतें ६४ तोळे ) मद्य मिळवावा. या लशुनादिघृताचा पिण्यांत, अंगास लावण्यांत व नाकांत घालण्यांत उपयोग केल्यानें दोषज व आगन्तु उन्माद, विषमज्वर व अपस्मार हे रोग तत्काल नाश पावतात.

लशुनस्याविनष्टस्य तुलार्धं निस्तुषीकृतम् ।
तदर्धं दशमूलस्य द्व्याढकेऽपां विपाचयेत् ॥ ६२ ॥
पादशेषे घृतप्रस्थं लशुनस्य रसं तथा ।
कोलमूलकवृक्षाम्लमातुलुङ्गार्द्रकै रसैः ॥ ६३ ॥
दाडिमाम्लसुरामस्तु काञ्जिकाम्लैस्तदर्धिकैः ।
साधयेत्त्रिफलादारुलवणव्योषदीप्यकैः ॥ ६४ ॥
यमानीचव्यहिङ्ग्वम्लवेतसैश्च पलार्द्धिकैः ।
सिद्धमेतत्पिबेच्छूलगुल्मार्शो जठरापहम् ॥ ६५ ॥
ब्रध्नपाण्ड्वामयप्लीहयोनिदोषज्वरकृमीन् ।
वातश्लेष्मामयान्सर्वानुन्मादं चापकर्षति ॥ ६६ ॥

**दुसरें लशुनादिघृत**—सालपटें काढून टाकलेल्या उत्तम लसणीच्या कांड्या २०० तोळे आणि दशमुळें १०० तोळे सर्व मिळून आठ शेर पाण्यांत शिजवावीं. चतुर्थांश काढा झाला ह्मणजे गाळून घेऊन त्यांत ६४ तोळे तूप, ६४ तोळे लसणीचा रस, बोरें-मुळे-रातंबी-महाळुंग-आलें-डाळिंब यांचा रस प्रत्येकीं ३२ तोळे, सुरा, दह्यांवरची निवळ, आणि कांजी हीं प्रत्येकीं ३२ तोळे, त्रिफळा, देवदार, सैंधव, सुंठ, मिरें, पिंपळी, ओंवा, अजमोदा, अथवा ( जिरें व ओंवा ) चवक, हिंग, व अम्लवेतस या प्रत्येकाचा दोन दोन तोळे कल्क घालून तूप सिद्ध करावें. या घृताच्या सेवनानें शूल, गुल्म, मूळ-

व्याध, उदररोग, वर्म्म, पाण्डु, पाणथरी, योनिरोग, ताप, कृमि, सर्व प्रकारचे वात-कफजन्य रोग व उन्माद हे नाहींसे होतात.

हिङ्गुना हिङ्गुपर्ण्या च सकायस्था वयःस्थया ।
सिद्धं सर्पिर्हितं तद्वद्वयःस्था हिङ्गुरोचकैः ॥ ६७ ॥
केवलं सिद्धमेभिर्वा पुराणं पाययद्घृतम् ।
पाययित्वोत्तमां मात्रां श्वभ्रे रुन्ध्याद्गृहेऽपि वा ॥ ६८ ॥
विशेषतः पुराणञ्च घृतं तं पाययेद्भिषक् ।
त्रिदोषघ्नं पवित्रत्वाद्विशेषाद्ग्रहमोक्षणम् ॥ ६९ ॥
गुणकर्माधिकं स्थानादास्वादात्कटुतिक्तकम् ।
उग्रगन्धं पुराणं स्याद्दशवर्षस्थितं घृतम् ॥ ७० ॥
लाक्षारसनिभं शीतं तद्धि सर्वग्रहापहम् ।
मेध्यं विरेचनेष्वग्र्यं प्रपुराणमतः परम् ॥ ७१ ॥
नासाध्यं नाम तस्यास्ति यत्स्याद्वर्षशतस्थितम् ।
दृष्टं स्पृष्टमथाघ्रातं तद्धि सर्वग्रहापहम् ॥ ७२ ॥
अपस्मारग्रहोन्मादवतां शस्तं विशेषतः ।
एतैरौषधवर्गैर्वा विधेयस्तं स गच्छति ॥ ७३ ॥
अंजनोत्सादनाल्लेपान्भावनादींश्च योजयेत् ।

हिंग, डिकेमाली, क्षीरकाकोली व ब्राह्मी या द्रव्यांनीं अथवा ब्राह्मी, हिंग आणि सैंधव किंवा महाळुंग यांनीं सिद्ध केलेलें जुनें तूप उन्मादास हितकर आहे. तुपाची जी पहिल्या प्रतीची मात्रा सांगितली आहे तितकें तूप रोग्यास पाजून एखाद्या खड्ड्यांत अथवा घरांत अडकवून ठेवावें. उन्माद रोग्यास वि-शेषेंकरून जुनें तूप पाजावें. तें पवित्र असल्यामुळें त्रिदोषनाशक व ग्रहबाधा नाहींशी करणारें आहे. दहा वर्षांच्या तुपास जुनें तूप म्हणतात. तें पुष्कळ दिवस राहिलें असल्यानें त्याचे गुण व क्रिया अधिक आहेत. त्याचा स्वाद तिखट कडू असतो, वास उग्र येतो, व दिसण्यांत लाखेच्या रसाप्रमाणें

असतें. तें सर्व ग्रहाची बाधा सोडविणारें, धारणाशक्ति वाढविणारें, आणि उत्तम प्रकारचें रेचक आहे. दहा वर्षांनंतरच्या तुपास प्रपुराण ह्मणतात. शंभर वर्षांच्या जुन्या तुपांत इतका गुण आहे कीं त्यानें बरा होत नाहीं असा रोगच नाहीं. तें नुसतें पाहिल्यानें, स्पर्श केल्यानें किंवा वास घेतल्यानें देखील सर्व ग्रहांची पीडा नाहींशी होते. फेंपऱ्यावर व भूतोन्मादांत हें विशेष प्रशस्त आहे. या औषधोपचारांशिवाय अंजन, उटणें, लेप, नस्य वगैरे उपाय योजावे.

**शिरीषो मधुकं हिंगु लशुनं तगरं वचाम् ।**
**कुष्ठञ्च वस्तमूत्रेण पिष्टं स्यान्नावनाञ्जनम् ॥ ७४ ॥**
**तद्वद्व्योषं हरिद्रे द्वे मञ्जिष्ठा हिङ्गु सर्षपाः ।**
**शिरीषबीजं चोन्मादग्रहापस्मारनाशनम् ॥ ७५ ॥**
**पिष्ट्वा तुल्यमपामार्गं हिङ्गुलं हिंगुपत्रिकाम् ।**
**वर्तिः स्यान्मरिचार्धांशा पित्ताभ्यां गोशृगालयोः ॥ ७६ ॥**
**तयाञ्जयेदपस्मारभूतोन्मादज्वरार्दितान् ।**
**भूतार्तानमरार्तांश्च नरार्तांश्चैव गोमये ॥ ७७ ॥**
**मरिचं चातपे मासं सपित्तस्थितमञ्जनम् ।**
**वैकृतं पश्यतः कार्यं दोषभूतहतस्मृतेः ॥ ७८ ॥**

**नस्य व अंजन**–शिरसाचें बीज, ज्येष्ठमध, हिंग, लसुण, तगर, वेखंड व कोष्ठ हीं औषधें बकऱ्याच्या मूत्रांत उगळून नाकांत घालावीं व डोळ्यांत अंजन करावें. सुंठ, मिरें, पिंपळी, हळद, दारुहळद, मंजिष्ट, हिङ्ग, शिरस व मोहऱ्या यांचें नस्य व अंजन केल्यानें उन्माद भूतपीडा व अपस्मार हे विकार नाश पावतात. अघाड्याचें बीं, हिंगूळ, वाफळीचें बीं किंवा हिंगाचीं पानें हीं सर्व समभाग आणि काळीं मिरें अर्धाभाग घेऊन त्यांचें चूर्ण गाय व कोल्ह्याच्या पित्तांत भिजवून त्याची सळई करून तिचें अंजन डोळ्यांत घातल्यानें अपस्मार भूतोन्माद, विषमज्वर, अर्दित, भूतावेश, देवोन्माद व पितृन्माद हे विकार नाहींसे होतात. काळ्या मिऱ्याचे चूर्णास एक महीनाभर गाईच्या व कोल्ह्याच्या पित्तांत

पुटें देऊन उन्हांत सुकवावें आणिउन्मादापासून ज्याची दृष्टि विकृत झाली आहे व दोषज किंवा भूतोन्मादनें ज्याची स्मृति नष्ट झाली आहे अशा मनुष्यास त्याचें अंजन करावें.

सिद्धार्थको वचा हिङ्गुकरञ्ज देवदारु च ।
मंजिष्ठा त्रिफलाश्वेता कटभी त्वक्कटु त्रिकम् ॥ ७९ ॥
समांशानि प्रियंगुश्च शिरीषो रजनीद्वयम् ।
बस्तमूत्रेण पिष्टोऽयमगदः पानमञ्जनम् ॥ ८० ॥
नस्यमालेपनञ्चैव स्नानमुद्वर्तनं तथा ।
अपस्मारविषोन्मादकृत्यालक्ष्मीज्वरापहः ॥ ८१ ॥
भूतेभ्यश्च भयं हन्ति राजद्वारे च शस्यते ।
सर्पिरेतेन सिद्धं वा सगोमूत्रं तदर्थकृत् ॥ ८२ ॥
प्रसेके पीनसे गन्धैर्धूमवर्तिं कृतां पिबेत् ।
वैरेचनिकधूमोक्तैः श्वेताद्यैर्वा सहिङ्गुभिः ॥ ८३ ॥
शल्लकोलूकमार्जारजम्बूकवृकवस्तजैः ।
मूत्रपित्तशकृल्लोमनखैश्चर्मभिरेव च ॥ ८४ ॥
सेकांजनं प्रधमनं नस्यं धूमं च कारयेत् ।
वातश्लेष्मात्मके प्रायः पैत्तिके च प्रशस्यते ॥ ८५ ॥
तिक्तकं जीवनीयं च सर्पिः स्नेहश्च मिश्रकः ।
शीतानि चान्नपानानि मधुराणि मृदूनि च ॥ ८६ ॥
शंखकेशान्तसन्धौ वा मोक्षयेज्ज्ञो भिषक् शिराम् ।
उन्मादे विषमे चैव ज्वरेऽपस्मार एव च ॥ ८७ ॥
घृतमांसावितृप्तं वा निवाते स्थापयेत्सुखम् ।
त्यक्त्वा मतिस्मृतिभ्रंशं संज्ञां लब्ध्वा प्रबुध्यते ॥ ८८ ॥
आश्वासयेत्सुहृद्वा तं वाक्यैर्धर्मार्थसंहितैः ।
ब्रूयादिष्टविनाशं वा दर्शयेदद्भुतानि वा ॥८९॥

बध्द्वा सर्षपतैलाक्तं न्यसेद्वोत्तानमातपे ।
कपिकच्छ्वाथवा तप्तलोहतैलजलैः स्पृशेत् ॥ ९० ॥
कशाभिस्ताडयित्वा वा सुबद्धं विजने गृहे ।
रुन्ध्याच्चेतो हि विभ्रान्तं व्रजत्यस्य यथा शमम् ॥ ९१ ॥
सर्पेणोद्धृतदंष्ट्रेण दान्तैः सिंहैर्गजैश्चतन् ।
त्रासयेच्छस्त्रहस्तैर्वा तस्करैः शत्रुभिस्तथा ॥ ९२ ॥
अथवा राजपुरुषा बहिर्नीत्वा सुसंयुतम् ।
त्रासयेयुर्वधेनैनं तर्जयन्तो नृपाज्ञया ॥ ९३ ॥
देहदुःखभयेभ्योहि परं प्राणभयं महत् ।
तेन याति शमं तस्य सर्वतो विप्लुतं मनः ॥ ९४ ॥
इष्टद्रव्यविनाशात्तु मनो यस्योपहन्यते ।
तस्य तत्सदृशप्राप्तिसान्त्वाश्वासैः शमं नयेत् ॥ ९५ ॥
कामशोकभयक्रोधहर्षेर्ष्यालोभसम्भवान् ।
परस्परप्रतिद्वन्द्वैरोभिरेव शमं नयेत् ॥ ९६ ॥

पांढरे शिरस, वेखंड, हिंग, कांटेरी व घाणेऱ्या करंजाचें बीं, देवदार, मंजिष्ठ, त्रिफळा, पांढरी गोकर्णी, किनहीची[1] साल, सुंठ, मिरें, पिंपळी, गहुला, शिरस, हळद, दारुहळद, हीं औषधें बोकडाच्या मुतांत वाटून प्यावीं, अंजन घालावें, नाकांत घालावीं, अंगास लेप लावावा, व अंगास चोळून स्नान करावें. यापासून अपस्मार, विषविकार, उन्माद, कृत्या, दारिद्र्य, व ज्वर यांचा नाश होतो. भूतांचें भय राहत नाहीं व राजदरबारांत प्रशंसा होते. हीं औषधें व गोमूत्र मिळवून सिद्ध केलेल्या तुपांतही हेच गुण आहेत. ज्या उन्माद रोग्याची लाळ गळत असेल व ज्यास पीनस झाला असेल त्यानें मागें सूत्रस्थानांत वैरेचानिक धूमपानविधींत सांगितलेल्या गन्धद्रव्यांची धूमवर्ति ( वात )

---

१ श्वेतां व 'कटभी' हे दोन शब्द निरनिराळे धरून हा अर्थ केला आहे श्वेतां हें कटभी चें विशेषण मानल्यास पांढरी किन्ही असा अर्थ होईल

करून धूम्रपान करावें. किंवा वर पांढऱ्या गोकर्णीपासून पुढें सांगितलेल्या औषधांत हिंग मिळवून त्यांची वात करून तिचें धूम्रपान करावें. वातकफाधिक उन्मादांत खवलें मांजर, घुबड, मांजर, कोल्हा, लांडगा व बकरा या पशुपक्ष्यांचें मूत्र, पित्त, विष्टा, केंस, नखें व कातडें यांच्या योगानें सिंचन, अंजन, प्रधमन नस्य, व धूम्रपान या क्रिया वरचेवर कराव्या. पित्ताधिक उन्मादांत तिक्तघृत, जीवनीयघृत, यमक स्नेह आणि थंड-मधुर व मृदु अन्न-पान हीं प्रशस्त होत. उन्माद, विषमज्वर व अपस्मार यांत शिराव्यधकुशल वैद्यानें कानपटी व केशान्त यांच्या सन्धिवरची शीर तोडावी. किंवा तूप व मांस हीं पोटभर जेऊं घालून निवाऱ्याच्यां जागीं सुखानें बसवावें ह्मणजे त्याच्या बुद्धि व स्मृतिचा भ्रम दूर होऊन तो शुद्धीवर येतो. किंवा रोग्याच्या इष्टमित्रांनीं धर्म व नीतिविषयक समजुतीच्या गोष्टी सांगून त्याचें सान्त्वन करावें. त्याच्या आवडत्या वस्तूचा नाश झाला असें सांगावें (जसें मुलगा मेला किंवा बायको मेली हें सांगणें), अद्भुत दृश्यें दाखवावीं, सर्वांगास शिरसेल तेल लावून उन्हांत उताणा निजवून बांधावें, अंगास कुहिलीची शेंग, तापलेलें लोखंड, तेल किंवा पाणी लावावें. अथवा रिकाम्या घरांत गच्च बांधून कोरड्यांचा मार देऊन कोंडून ठेवावें. विषारी दाढा उपटून टाकलेला साप, किंवा पाळलेला सिंह अथवा हत्ती यांस त्याच्या अंगावर सोडून भिववावें. अथवा हातात शस्त्रें घेतलेले चोर किंवा शत्रु यांजकडून त्यास भय दाखवावें. किंवा पोलीसच्या शिपायांनीं त्यास दूर बांधून नेऊन तुला ठार मारण्याचा हुकूम झाला आहे असें दरडावून सांगून तलवार उगारून भय घालावें. शारीरिक दुःखाच्या भीतिपेक्षां प्राणाची भीति फार मोठी आहे. तिच्या योगानें रोग्याचें चहुंकडे फांकलेलें मन ठिकाणावर येतें. आपली आवडती वस्तु नष्ट झाल्याकारणानें ज्यास उन्माद झाला असेल त्यास तशाच प्रकारची दुसरी वस्तु आणून देऊन शांतवन करून धीर द्यावा. काम, शोक, भय, क्रोध, हर्ष, ईर्ष्या व लोभ यांपासून उत्पन्न झालेले उन्माद, या मनोविकारांत जो परस्पर विरोध आहे त्याचे योगानें शमन करावें.

उदाहरणार्थ, कामोन्माद क्रोधानें, क्रोधान्माद कामानें इत्यादि ( ज्वर चिकित्साध्याय पहा ).

बुद्ध्वा देशं वयः सात्म्यं दोषं कालं बलाबलम् ।
चिकित्सितमिदं कुर्यादुन्मादे भूतदोषजे ॥ ९७ ॥
देवर्षिपितृगन्धर्वैरुन्मत्तस्य तु बुद्धिमान् ।
वर्जयेदञ्जनादीनि तीक्ष्णानि क्रूरकर्म च ॥ ९८ ॥
सर्पिष्पानादि तस्येह मृदु भैषज्यमाचरेत् ।
पूजां बल्युपहारांश्च मन्त्राञ्जनविधींस्तथा ॥ ९९ ॥
शान्तिकर्मेष्टिहोमांश्च जप्यस्वस्त्ययनानि च ।
वेदोक्तान्नियमांश्चापि प्रायश्चित्तानि चाचरेत्॥ १०० ॥
भूतानामधिपं देवमीश्वरं जगतः प्रभुम् ।
पूजयन्प्रयतो नित्यं जयत्युन्मादजं भयम् ॥ १०१ ॥
रुद्रस्य प्रमथा नाम गणा लोके चरन्ति ये ।
तेषां पूजाञ्च कुर्वाण उन्मादेभ्यो विमुच्यते ॥ १०२ ॥
बलिभिर्मङ्गलैर्होमैरोषध्यगदधारणैः ।
सत्याचारतपोज्ञानप्रदाननियमव्रतैः ॥ १०३ ॥
देवगोब्राह्मणानां गुरूणां पूजनेन च ।
आगन्तुः प्रशमं याति सिद्धैर्मन्त्रौषधैस्तथा ॥ १०४ ॥
यच्चोपदेक्ष्यते किञ्चिदपस्मारे चिकित्सिते ।
उन्मादे तच्च कर्तव्यं सामान्याद्धेतुदृष्ययोः ॥ १०५ ॥
निवृत्तामिषमद्यो यो हिताशी प्रयतः शुचिः ।
निजागन्तुभिरुन्मादैः सत्त्ववान्न स युज्यते ॥ १०६ ॥
प्रसादश्चेन्द्रियार्थानां बुध्यात्ममनसां तथा ।
धातूनां प्रकृतिस्थत्वं विगतोन्मादलक्षणम् ॥ १०७ ॥

देश, रोग्यांचें वय, सात्म्य, दोष, काल व बलाबल हीं पाहून वैद्यानें भूतकृत

व दोषज उन्मादांत वरील उपाय योजावे. देवोन्मादे, ऋष्युन्माद, पितृन्माद व गन्धर्वोन्माद यांत तीक्ष्ण अंजनें व बांधणें, मारणें वगैरे क्रूरतेचे उपाय करूं नयेत. तर घृतपानादि सौम्य औषधें द्यावीं. पूजा, बली, उपहार, मंत्र, सौम्य अंजनें, शान्ति, इष्टि, होम-हवन, जप, स्वस्तिवाचन, वेदोक्त नियम व प्रायश्चित्तें करावीं. भूत, पिशाच, राक्षसादि ग्रहांचा अधिपति व जगताचा स्वामी जो शंकर त्याची नित्य एकाग्र मनानें पूजा केली असतां उन्मादाची भीति नाहींशी होते. प्रमथ नांवाचे रुद्रगण पृथ्वीवर संचार करीत असतात, त्यांची पूजा केल्यानें उन्माद बरे होतात. बलि, मंगल, होम, औषध सेवन करणें, अंगावर धारण करणें, सत्य भाषण, आचार, तप, ज्ञान, दान, नियम, व्रतें, देवगुह्यक (देवांचा एकभेद) ब्राह्मण व गुरू यांची पूजा केल्यानें व सिद्धमंत्र आणि औषधांच्या सेवनानें आगंतु उन्माद बरा होतो. पुढील अपस्मारचिकित्साध्यायांत अपस्माराची जी चिकित्सा सांगितली जाईल तीही उन्मादांत करावी. कारण उन्माद व अपस्मार या दोहोंचीं कारणें व विकृत होणारे अवयव एकच आहेत. जो मद्यमांस सेवन करीत नाहीं, हितकर भोजन करितो, चित्त एकाग्र-स्थिर ठेवितो, शुचिर्भूतपणानें वागतो व ज्याचें मन दृढ आहे, अशा मनुष्यास निज किंवा आगन्तु उन्माद होत नाहीं. इंद्रियें, त्यांचे ग्राह्य विषय, बुद्धि, आत्मा व मन यांची प्रसन्नता आणि रसादि धातूंचें मूळ स्थितीवर येणें, हीं उन्माद बरा झाल्याचीं लक्षणें होत.

तत्र श्लोकः ।

उन्मादानां समुत्थानं लक्षणं सचिकित्सितम् ।
निजागन्तुनिमित्तानामुक्तवान्भिषगुत्तमः ॥ १०८ ॥

निज व आगंतु उन्मादांचीं कारणें, लक्षणें व चिकित्सा इतके विषय या अध्यायांत भिषक्श्रेष्ठ आत्रेय महर्षींनीं निरूपण केले आहेत.

चतुर्दशोऽध्यायः समाप्तः ।

# अथ पञ्चदशोऽध्यायः ।

अथतोऽपस्मारचिकित्सितं व्याख्यास्यामः ।
इति ह स्माह भगवानात्रेयः ॥

आतां आपण अपस्माराचीकित्सेचें निरूपण करूं. आत्रेय ऋषि असेंच सांगते झाले.

स्मृतेरपगमं प्राहुरपस्मारं भिषग्विदः ।
तमःप्रवेशबीभत्सचेष्टं धीसत्वसम्प्लवात् ॥ १ ॥
विभ्रान्तबहुदोषाणामहिताशुचिभोजिनाम् ।
रजस्तमोभ्यां विहते सत्वे दोषावृते हृदि ॥ २ ॥
चिन्ताकामभयक्रोधशोकोद्वेगादिभिस्तथा ।
मनस्यभ्याहते नृणामपस्मारः प्रवर्तते ॥ ३ ॥
धमनीभिः श्रिता दोषा हृदयं पीडयन्ति हि ।
सम्पीड्यमानो व्यथते मूढो भ्रान्तेन चेतसा ॥ ४ ॥
पश्यत्यसन्ति रूपाणि पतति प्रस्फुरत्यपि ।
जिह्माक्षिभ्रूस्रवल्लालो हस्तौ पादौ च विक्षिपन् ॥ ५ ॥
दोषवेगे च विगते सुप्तवत्प्रतिबुध्यते ।
पृथग्दोषैः समस्तैश्च वक्ष्यते स चतुर्विधः ॥ ६ ॥

स्मृतीचा जो अपगम ह्मणजे लोप किंवा नाश त्यास वैद्य अपस्मार ह्मणतात. प्राकृत भाषेंत त्यास फेंपरें ह्मणतात[१]. विभ्रान्तचित्त, बहुदोषी, अपथ्य व अपवित्र भोजन करणाऱ्या मनुष्यांची बुद्धि व सत्व नष्ट होऊन, रजो-तमो गुणांच्या वृद्धीनें सत्वगुणाचा नाश होऊन, वातादि दोषांनीं हृदय व्याप्त होऊन, चिंता, काम, भय, क्रोध, शोक, उद्विग्नता या विकारांनीं मनास धक्का बसून अपस्मार उत्पन्न होतो. ह्मणजे तो मूढ होऊन निन्द्य क्रिया करूं लागतो. वातादि दोष हृदयाश्रित धमनींच्या द्वारा हृदयास पीडा देतात. त्या

१ इंग्रजींत Epilepsy एपिलेप्सी अथवा फॉलिंग फिट Falling fit ह्मणतात.

योगानें तो भ्रान्तचित्त मूढ मनुष्य क्लेश पावतो, त्यास भलतींच खोटीं दृश्यें ह्मणजे जे पदार्थ मुळींच नाहींत ते दिसूं लागतात, जमिनीवर पडतो, कांपतो, त्याचे डोळे व भिवया वांकड्या होतात, तोंडांतून लाळ गळूं लागते, हात-पाय जमिनीवर आपटतो आणि हे विकार उत्पन्न करणाऱ्या दोषांचा जोर गेला ह्मणजे निजून उठल्याप्रमाणें जागा होतो. वातज, पित्तज, कफज व सान्निपातिक असे एकंदर चार प्रकारचे अपस्मार आहेत. त्यांचें वर्णन पुढें करितों.

कम्पते दशते दन्तान्फेनोद्वामी श्वसित्यपि ।
परुषाणि च कृष्णानि पश्यद्रूपाणि चानिलात् ॥ ७ ॥
पीतफेनाङ्गवक्त्राक्षः पातासृग्रूपदर्शनः ।
सतृष्णश्चानलव्याप्तलोकदर्शी च पैत्तिकः ॥ ८ ॥
शुक्लफेनाङ्गवक्त्राक्षः शीतहृष्टांगजो गुरुः ।
पश्यञ्छुक्लानि रूपाणि श्लैष्मिको मुच्यते चिरात् ॥ ९ ॥
सर्वैरेतैः समस्तैस्तु लिङ्गैर्ज्ञेयस्त्रिदोषजः ।
अपस्मारः स चासाध्यो यः क्षीणस्यानवश्च यः ॥१०॥
पक्षाद्वा द्वादशाहाद्वा मासाद्वा कुपिता मलाः ।
अपस्माराय कुर्वन्ति वेगं किञ्चिदथान्तरम् ॥ ११ ॥

वातज अपस्मारांत रोगी कांपतो, दांत खातो, तोंडांतून फेंस येतो, दमा लागतो, आणि डोळ्यांपुढें कठोर व काळ्या रंगाचे पदार्थ दिसतात. पित्तज अपस्मारांत तोंडांतून निघणारा फेंस, अंग, तोंड, डोळे, हे पिंवळे असतात; बेशुद्धींत डोळ्यापुढें पिंवळे-तांबडे पदार्थ दिसूं लागतात; तहान लागते; आणि चोहोंकडे विस्तव पेटल्याप्रमाणें दिसतें. कफज अपस्मारांत फेंस, अंग, तोंड व डोळे पांढरे होतात, अंग गार व जड होतें, रोमांच उभे राहतात, डोळ्यांपुढें सगळें पांढरें दिसतें आणि रोग्यास सावध होण्यास वेळ लागतो. सान्निपातिक अपस्मारांत वर सांगितलेलीं तिन्ही प्रकारचीं लक्षणें होतात. सान्निपातिक, अशक्त मनुष्यास झालेलें, व पुष्कळ दिवसांचें जुनें फेंपरें असाध्य समजावें.

बहुधा पंधरा दिवसांनीं, बारा दिवसांनीं, किंवा एक महिन्यानें दोष सांचून कुपित झाले ह्मणजे फेंपरें येतें. कचित्काळीं या नियमांत कांहीं बदलही होतो.

तैरावृतानां हृत्स्रोतोमनसां सम्प्रबोधनम् ।
तीक्ष्णैरादौ भिषक्कुर्यात्कर्मभिर्वमनादिभिः ॥ १२ ॥
वातिकं बस्तिभूयिष्ठैः पैत्तं प्रायो विरेचनैः ।
श्लैष्मिकं वमनप्रायैरपस्मारं समाचरेत् ॥ १३ ॥
सर्वतः सुविशुद्धस्य सम्यगाश्वासितस्य च ।
अपस्मारविमोक्षार्थं योगान्संशमनाञ्छृणु ॥ १४ ॥

प्रथमारंभीं अपस्मारोत्पादक दोषांनीं आच्छन्न झालेलीं हृदय, मनोवाहक स्रोतें व मन यांस वमनादि तीक्ष्ण क्रियांनीं उत्तेजित करावें. वातज अपस्मारांत बस्ति, पित्तापस्मारांत रेचन, आणि कफापस्मारांत वमन हे उपाय मुख्यत्वें करून योजावे. वमनविरेचनादिकांनीं रोग्यांचें सर्व प्रकारें उत्तम संशोधन करून त्यास धीर देऊन पुढें फेंपरें यावयाचें बंद होण्याकरितां पुढील औषधप्रयोग योजावे.

गोशकृद्रसदध्यम्लक्षीरमूत्रैः सहैर्घृतम् ।
सिद्धं पिबेदपस्मारकामलाज्वरनाशनम् ॥ १५ ॥

**पंचगव्यघृत**—गाईच्या तुपांत त्याच्या बरोबरीनें गाईच्या शेणाचा अंगरस, गाईचें आंबट दहीं, दूध व मूत्र हीं मिळवून तूप सिद्ध करावें हें तूप प्याल्यानें फेंपरें, कावीळ व ताप हे नाहींसे होतात.

द्वे पञ्चमूले त्रिफला रजान्यौ कुटजत्वचम् ।
सप्तपर्णमपामार्गं नीलिनीं कटुरोहिणीम् ॥ १६ ॥
सम्पाकं फल्गुमूलं च पौष्करं सदुरालभम् ।
द्विपलानि जलद्रोणे पक्त्वा पादावशेषिते ॥ १६ ॥
भार्गीं पाठां त्रिकटुकं त्रिवृतां निचुलानि च ।

श्रेयसीमाढकीं मूर्वां दन्तीं भूनिम्बचित्रकौ ॥ १८ ॥
द्वे शारिवे रोहिषञ्च भूतिकं मदयान्तकाम् ।
क्षिपेत्पिष्ट्वाक्षमात्राणि तेन प्रस्थं घृतात्पचेत् ॥ १९ ॥
गोषकृद्रसदध्यम्लक्षीरमूत्रैश्च तत्समः ।
पंचगव्यमिति ख्यातं महत्तदमृतोपमम् ॥ २० ॥
अपस्मारे तथोन्मादे श्वयथावुदरेषु च ।
गुल्मार्शः पाण्डुरोगेषु कामलासु भगन्दरे ।
अलक्ष्मीग्रहरोगघ्नं चातुर्थिकविनाशनम् ॥ २१ ॥

**महापंचगव्यघृत.**—दशमुळें, त्रिफळा, हळद, दारुहळद, कुड्याची साल, सातविणीची साल, आघाड्याचें मूळ, कुटकी, बाहव्याचा मगज, काळ्या उंब-राचें मूळ, पुष्करमूळ व धमासा हीं औषधें प्रत्येकीं आठ आठ तोळे घेऊन त्यांचा १६ शेर पाण्यांत चतुर्थांश उरेपर्यंत काढा करून तो गाळून घ्यावा. नंतर त्यांत भारंगमूळ, पहाडमूळ, सुंठ, मिरें, पिंपळी, निशोत्तर, समुद्रफळ, गजपिंपळी, तुरीचें मूळ, मोरवेल, दन्तीमूळ, कडू किराइताचें मूळ, चित्रकमूळ, काळी व पांढरी उपळसरी, रोहिसगवत, ओंवा व मोगरी या जिनसा प्रत्येकीं एकेक तोळा घेऊन वाटून घालाव्या. मग त्यांत एक शेर तूप, आणि ति-तकाच गाईच्या शेणाचा रस, गाईचें आंबट दहीं, दूध, व मूत्र हीं मिळवून तें तूप सिद्ध करावें. या तुपास महापंचगव्यघृत असें नांव आहे हें अमृ-ताप्रमाणें गुणकारी आहे. याच्या सेवनानें अपस्मार, उन्माद, सूज, उदररोग, गुल्म, मूळव्याध, पाण्डुरोग, कावीळ, भगंदर, दारिद्र्य, भूतबाधा व चातुर्थिक ज्वर हे रोग नाश पावतात.

ब्राह्मीरसवचाकुष्ठशंखपुष्पीभिरे वच ।
पुराणं घृतमुन्मादालक्ष्म्यपस्मारपाप्मजित् ॥ २२ ॥
घृतं सैन्धवहिंगुभ्यां वार्षे वास्ते चतुर्गुणे ।
मूत्रे सिद्धमपस्मार हृद्ग्रहश्वयथुनाशनम् ॥ २३ ॥

वचासम्पाककैटर्यवयःस्था हिङ्गुरोचकैः ।
सिद्धं पलङ्कषायुक्तैर्वातश्लेष्मात्मके घृतम् ॥ २४ ॥
तैलप्रस्थं घृतप्रस्थं जीवनीयैः पलोन्मितैः ।
क्षीरद्रोणे पचेत्सिद्धमपस्मारविनाशनम् ॥ २५ ॥
कंसे क्षीरेक्षुरसयोः काश्मर्येऽष्टगुणे रसे ।
कार्षिकैर्जीवनीयैश्च घृतप्रस्थं निपाचयेत् ॥ २६ ॥
वातपित्तोद्भवं क्षिप्रमपस्मारं वियच्छति ।
तद्वत्काशविदारीक्षुकुशक्काथशृतं घृतम् ॥ २७ ॥
मधुकाद्विपले कल्के द्रोणे चामलकी रसात् ।
तद्वत्सिद्धो घृतप्रस्थः पित्तापस्मारभेषजम् ॥ २८ ॥

ब्राह्मीचा रस, वेखंड, कोष्ठ व शंखपुष्पी यांनीं सिद्ध केलेलें जुनें तूप, उन्माद, अलक्ष्मी, फेंपरें व ग्रहादि दोष नाहींसे करितें. एक भाग तूप, त्याच्या चतुर्थांश सैंधव व हिंग, आणि चौपट बैलाचें व बोकडाचें मूत्र हीं मिळवून सिद्ध केलेलें तूप फेंपरें, हृद्रोग व ग्रहरोग यांचा नाश करितें. वेखंड, बाहव्याचा मगज, कायफळ, आंवळकाठी, हिंग, महाळुंग, व रास्ना यांनीं सिद्ध केलेलें तूप वात-कफात्मक अपस्माराचा नाश करितें. एक शेर तेल व एक शेर तूप, जीवक-ऋषभकादि० जीवनीयगणांतील औषधें प्रत्येकीं चार चार तोळे आणि सोळा शेर गाईचें तूप मिळवून सिद्ध करावें. हें अपस्मारनाशक आहे. चार शेर दूध, चार शेर उंसाचा रस, आठ शेर शिवणीच्या फळांचा रस, आणि पूर्वोक्त जीवनीय गणांतील औषधें प्रत्येकीं एक एक तोळा, यांनीं एक शेर तूप सिद्ध करून घावें. हें वातज व पित्तज अपस्मारास लवकर वरें करितें. कसईचीं मुळें, भुइकोहळा, उंसाचा रस किंवा मुळें व दर्भाचीं मुळें यांच्या काढ्यांत सिद्ध केलेलें तूप ही उपरोक्त गुण करितें.[1] ज्येष्ठमधाचा कल्क ८ तोळे

[1] यांत पूर्वोक्त जीवनीय गणांतील औषधांचा कल्कही घालावा असें कित्येकांचें मत आहे.

आणि आवळ्याचा रस किंवा काढा १६ शेर यांत एक शेर तूप सिद्ध करावें. तें पित्तापस्मारास दूर करितें.

अभ्यङ्गः सार्षपं तैलं वस्तमूत्रे चतुर्गुणे ।
सिद्धं स्याद्गोशकृन्मूत्रे स्नानोत्सादनमेव च ॥ २९ ॥
कटभीनिम्बकट्वङ्गमधुशिग्रुत्वचां रसे ।
सिद्धं मूत्रसमं तैलमभ्यंगार्थे प्रशस्यते ॥ ३० ॥
पलङ्कषावचा पथ्या वृश्चिकाल्यर्कसर्षपैः ।
जटिला पूतना केशी नाकुली हिंगु चोरकैः ॥ ३१ ॥
लशुनातिरसाचित्रा कुष्ठैर्विड्भिश्च पक्षिणाम् ।
मांसाशिनां यथालाभं वस्तमूत्रे चतुर्गुणे ॥ ३२ ॥
सिद्धमभ्यञ्जनं तैलमपस्मारविनाशनम् ।
एतैरेवौषधैः कार्यं धूपनं सम्प्रलेपनम् ॥ ३३ ॥
पिप्पलीं लवणं शिग्रुं हिंगु हिंगुशिवाटिकाम् ।
काकोलीं सर्षपान्काकनासां कैटर्यचन्दने ॥ ३४ ॥
शुनःस्कन्धास्थिनखरान्पशुकांश्चेति पेषयेत् ।
वस्तमूत्रेण पुष्यर्क्षे प्रदेहः स्यात्सधूपनः ॥ ३५ ॥
अपेत राक्षसीकुष्ठ पूतना केशिचोरकैः ।
उत्सादनं मूत्रपिष्टैर्मूत्रैरेवावसेचनम् ॥ ३६ ॥
जलौकाशक्कता तद्वद्गन्धैर्वा तस्तलोमभिः ।
खराास्थिभिर्हस्तिनखैस्तथा गोपुच्छलोमभिः ॥ ३७ ॥

एक भाग शिरसेल तेल, बोकडाच्या चौपट मूत्रांत शिजवून अंगास मर्दन करावें. गाईचें शेण अंगास चोळून गोमूत्रानें स्नान करावें. मालकांगोणी, कडूलिंब, टेंटू व लाल शेवगायांच्या सालींच्या काढ्यांत तेल व तेलाच्या बरोबरीनें गोमूत्र घालून तेल सिद्ध करावें. हें अंगास चोळण्यास प्रशस्त आहे.

रास्ना, वेखंड, हिरडे, लघु मेढशिंगी, रुईचीं मुळें, शिरस, काळी जटामांसी,

सुगंध जटामांसी, सापसंद, हिंग, अजमोदा, लसूण, मोरवेल, दंतीमूळ, कोष्ठ, आणि मिळूं शकेल तितक्या मांसाहारी पक्ष्यांची विष्टा यां सर्व जिनसा एकत्र करून त्यांत एक भाग तेल व त्याच्या चौपट बोकडाचें मूत्र मिळवून तें तेल सिद्ध करावें. हें तेल अंगास चोळल्यानें अपस्माराचा नाश करितें. याच औषधांची धुरी व अंगास लेप करावा. पिंपळी, सैंधव, शेवग्याची साल, हिंग, वंशपत्री गवत, काकोली, शिरस, थोर पांढरी कावळी, कायफळ, चंदन, कुत्र्याच्या खांद्यांतील हाड, त्याचीं नखें व बरगड्यांचीं हाडें, हीं सर्व द्रव्यें पुष्य नक्षत्रावर बोकडाच्या मुतांत वाटून अंगास लेप करावा व त्याचीच धुरी द्यावी. काळी तुळस, कोष्ठ, सुगंधि जटामांसी, व अजमोदा हीं औषधें गोमूत्रांत वाटून अंगास चोळावीं व गोमूत्रांत कालवून त्यानें अंग धुवावें. किंवा जळवांची विष्टा अथवा बोकडाचे केंस, गाढवाचें हाड, हत्तीचीं नखें, किंवा गाईच्या शेंपटीचे केंस हीं जाळून त्यांची राख अंगास लावावी व गोमूत्रांत कालवून त्यानें अंग धुवावें.

**कपिलानां गवां पित्तं नावनं परमं हितम् ।**
**श्वशृगालबिडालानां सिंहादीनाञ्च शस्यते ॥ ३८ ॥**
**भार्गीवचानागदन्ती श्वेता श्वेता विषाणिका ।**
**ज्योतिष्मती नागदन्ती पादोत्था मूत्रपेषिताः ॥ ३९ ॥**
**योगास्त्रयोऽतः षड्बिन्दून्पञ्च वा नावयेद्भिषक् ।**
**त्रिफलाव्योषपीतद्रुयवक्षारफणिज्जकैः ॥ ४० ॥**
**श्यामापामार्गकारंजफलैर्मूत्रेऽथ बस्तजे ।**
**साधितं नावनं तैलमपस्मारविनाशनम् ॥ ४१ ॥**
**पिप्पली वृश्चिकाली च कुष्ठं च लवणानि च ।**
**भार्गी च चूर्णितं नस्तःकार्यं प्रधमनं परम् ॥ ४२ ॥**

पिंगट एकवर्णी गाईचें, कुतऱ्याचें, कोल्ह्याचें, मांजराचें, व सिंहादि जनावरांचें पित्त अपस्मारांत उत्तम नस्य आहे. १ भारंगमूळ, वेखंड, थोर दंतीमूळ, २ पांढरी गोकर्णी, पांढऱ्या दूर्वा व मेढशिंगी ३, मालकांगोणी व थोर दंतीमूळ

हीं तीन चरणांत सांगितलेलीं तीन वेगवेगळीं औषधें गोमूत्रांत वाटून त्यांचे पांच किंवा सहा थेंब नाकांत सोडावे. त्रिफळा, त्रिकटु, सरळ देवदार, जव-खार, मरवा, काळें निशोत्तर, अघाडयाचें बीं, यांचा कल्क आणि बोकडाचें मूत्र यांनीं सिद्ध केलेलें तेल नाकांत घातलें असतां अपस्माराचा नाश करितें. पिंपळी, लघु मेढशिंगी, कोष्ठ, सैंधव-पादेलोण-बिडलोण-समुद्रमीठ व उद्भिदमीठ हीं पांच प्रकारचीं मिठें व भारंगमूळ यांचें चूर्ण करून तें नाकांत फुंकावें.

कायस्थाञ्छारदान्मुद्गान्मुस्तोशीरयवांस्तथा ।
सव्योषान्बस्तमूत्रेण पिष्ट्वा वर्तीः प्रकल्पयेत् ॥ ४३ ॥
अपस्मारे तथान्मादे सर्पदष्टे तथार्दिते ।
विषपीते जलमृते चैताः स्युरमृतोपमाः ॥ ४४ ॥
मुस्तं वयःस्थां त्रिफलां कायस्थां हिंगुशाद्वलम् ।
व्योषं-माषान्यवान्मूत्रैर्बस्तमेषर्षभैस्त्रिभिः ॥ ४५ ॥
पिष्ट्वा कृत्वा च तां वर्तिमपस्मारे प्रयोजयेत् ।
किलासेषु तथोन्मादे ज्वरेषु विषमेषु च ॥ ४६ ॥
पुष्योद्धृतं शुनः पित्तमपस्मारघ्नमंजनम् ।
तदेव सर्पिषा युक्तं धूपनं परमं मतम् ॥ ४७ ॥
नकुलोलूकमार्जार गृध्रकीटाहिकाकजैः ।
तुण्डैः पक्षैः पुरीषैश्च धूपनं कारयेद्भिषक् ॥ ४८ ॥
आभिः क्रियाभिःसिद्धाभिर्हृदयं सम्प्रबुध्यते ।
स्रोतांसिचापि शुध्यन्ति ततः संज्ञां स विन्दति ॥ ४९ ॥
यस्यानुबन्धं त्वागन्तुर्दोषलिंगाधिकाकृतिम् ।
पश्येत्तस्य भिषक्कुर्यादागन्तून्मादभेषजम् ॥ ५० ॥

निर्गुंडीचें मूळ, हिरवे मूग, नागरमोथा, वाळा, जव व त्रिकटु हीं औषधें बोकडाच्या मुतांत वाटून त्यांची वर्ति करावी. फेंपरें, उन्माद, सर्पदंश, वायुनें तोंड वाकडें होणें या रोगांवर, विष प्यालेल्या मनुष्यास व पाण्यांत बुडालेल्या मनुष्यास बाहेर काढल्यावर त्याची जी मृतप्राय अवस्था असते

त्यांत ही वर्ति उगाळून अंजन केलें असतां अमृताप्रमाणें गुण करिते. नागरमोथा, आंवळकाठी किंवा दारुहळद, त्रिफळा, निगुडीचें मूळ, हिंग, निळ्यादूर्वा, त्रिकटु, उडीद व जव ही औषधें, बोकड, मेंढा व बैल या तिहींच्या मूत्रांत वाटून त्यांची वर्ति करावी. अपस्मार, उन्माद, विषमज्वर या रोगांत ही वर्ति उगाळून डोळ्यांत अंजन करावें आणि किलास कुष्ठावर लेप लावावा. पुष्य नक्षत्रावर कुड्याचें पित्त काढून ठेवावें. त्याचें अंजन केल्यानें अपस्मार नाश पावतो. या पित्तांत तूप मिळविलें असतां तें धुरीच्या उपयोगीं पडतें. मुंगुस, घुबड, मांजर, गिधाड, किडे, सर्प व कावळे ,यांचीं तोंडें पिसें व विष्टा अर्थात् यां पैकीं ज्यास जें जें असेल तें घेऊन त्यांचा धूर द्यावा. हे उपाय केल्यानें हृदय जागृत होतें, स्रोतें शुद्ध होतात आणि त्यायोगानें रोगी सावध होतो. ज्या अपस्मारांत दोषलक्षणापेक्षां आगन्तु लक्षणें अधिक दृष्टी पडतात. त्यांत मागें सांगितलेली आगन्तु उन्मादाची चिकित्सा करावी.

अनन्तरमुवाचेदमग्निवेशः कृतांजलिः ।
भगवन्प्राक् समुद्दिष्टः श्लोकस्थाने महागदः ॥ ५१ ॥
अतत्वाभिनिवेशश्च तस्य व्यक्तिरिहोच्यताम् ।
शुश्रूषवे वचः श्रुत्वा शिष्यायाह पुनर्वसुः ॥ ५२ ॥
महागदं सौम्य शृणु सहेत्वाकृतिभेषजम् ।
मलिनाहारशीलस्य वेगान्प्राप्तान्निगृण्हतः ॥ ५३ ॥
शीतोष्णस्निग्धरूक्षाद्यैर्हेतुभिश्चातिसेवितैः ।
हृदयं समुपाश्रित्य मनोबुद्धिवहाशिराः ॥ ५४ ॥
दोषाः सन्दूष्य तिष्ठन्ति रजोमोहावृतात्मनः ॥
रजस्तमोभ्यां वृद्धाभ्यां बुद्धौमनसि चावृते ।
हृदये व्याकुले दोषैरथमूढोऽल्पचेतनः ॥ ५५ ॥
करोति विषमां बुद्धिं नित्यानित्ये हिताहिते ।
अतत्वाभिनिवेशं तमाहुराप्ता महागदम् ॥ ५६ ॥

स्नेहस्वेदोपपन्नं तं संशोध्य वमनादिभिः ।
कृतसंसर्जनं मेध्यैरन्नपानैरुपाचरेत् ॥ ५७ ॥
ब्राह्मीस्वरससंयुक्तं पञ्चगव्यमुदाहृतम् ।
तत्सेव्यं शंखपुष्पीच यच्च सेव्यं रसायनम् ॥ ५८ ॥
सुहृदश्चानुकूलास्तं स्वाप्तधर्मार्थ वादिनः ।
संयोजयेयुर्विज्ञानधैर्यस्मृतिसमाधिभिः ॥ ५९ ॥
प्रयुञ्ज्यात्तैललशुनं पयसा वा शतावरीम् ।
ब्राह्मीरसं कुष्ठरसं वचां वा मधुसंयुताम् ॥ ६० ॥

याप्रमाणें निरूपण ऐकल्यावर अग्निवेश हात जोडून आत्रेयमहर्षीस ह्मणाला.—हे भगवन्! आपण मागें सूत्रस्थानांत अतत्वाभिनिवेश नामक महारोगाचा उल्लेख केला आहे, त्याचें विस्तृत वर्णन येथें करावें. श्रवणोत्सुक शिष्याचें हें भाषण ऐकून आत्रेयमहर्षी त्यास ह्मणाले हे अग्निवेश! मी आतां उपरोक्त महगदाचें निदान, लक्षण व चिकित्सा यांचें निरूपण करितों तें ऐक. नेहमीं घाणेरडें अन्न खाणें, मलमूत्रादिकांचे उपस्थित वेग थांबवून धरणें आणि शीत-उष्ण, स्निग्ध रूक्ष वगैरे आहारविहारांचें अति सेवन करणें, या कारणांनीं वातादि दोष हृदयांत जमून मन व बुद्धिवाहक शिरा दूषित करितात. त्या योगानें चित्त रजो व तमोगुणानें आच्छादित होतें. याप्रमाणें रज व तमोगुण वाढून त्यांच्या योगानें बुद्धि व मन आच्छादित झालें आणि दोषांनीं हृदय व्याकुळ झालें ह्मणजे मनुष्य मूढ होतो, चेतना कमी होते, आणि नित्यानित्य व हिताहित पदार्थांच्या ठायीं त्याची बुद्धि विपरीत होते. ह्मणजे तो बऱ्यास वाईट व वाइटास बरें समजूं लागतो. या विकृतीस अतत्वाभिनिवेश ह्मणतात. हा रोग झालेल्या मनुष्यास स्नेहन-स्वेदन करून, वमन विरेचनादिकांनीं संशोधन करावें. नंतर रीतीप्रमाणें पेयादिक्रम करून बुद्धिवर्धक खाणें-पिणें चालू ठेवावें. पूर्वोक्त पंचगव्यघृत ब्राह्मीचा अंगरस टाकून द्यावें. शंखपुष्पीचें सेवन करावें. ती रसायनगुणी आहे. रोग्याच्या आप्त इष्ट मित्रांनीं धर्म व नीतीच्या गोष्टी सांगून त्यास ज्ञान, धैर्य, स्मृति व समाधान

हीं उत्पन्न करावीं. तेलांतून लसूण, दुधा बरोबर शतावरीच्या मुळ्या, किंवा मद्याबरोबर ब्रह्मीचा रस अथवा कोष्टाचा काढा द्यावा.

दुश्चिकित्स्यो ह्यपस्मारश्चिरकारी कृतास्पदः ।
तस्माद्रसायनैरेनं प्रायशः समुपाचरेत् ॥ ६१ ॥
जलाग्निद्रुमशैलेभ्यो विषमेभ्यश्च तं सदा ।
रक्षेदुन्मादिनश्चैव सद्यः प्राणहरा हि ते ॥ ६२ ॥

अपस्मार हा दीर्घकालपर्यंत चालत येणारा व शरीरांत घर करून राहणारा रोग असल्या मुळें कष्टसाध्य आहे. कारितां याची चिकित्सा विशेषतः रसायन[१]-औषधांनीं करावी. उन्माद व फेंपऱ्याच्या रोग्यास पाणी, विस्तव, झाडें, पर्वत वगैरे भीतिकारक गोष्टींपासून दूर राखावें. हे प्रकार या रोग्यांस इतके भयंकर आहेत कीं यांपासून तत्काळ प्राणघात होतो.

हेतुं कुर्वन्त्यपस्मारं दोषाः प्रकुपिता यथा ।
सामान्यतः पृथक्त्वाच्च लिंगं तेषां च भेषजम् ॥ ६३ ॥
महागदसमुत्थानं लिंगं चोक्तं च सौषधम् ।
मुनिर्व्याससमासाभ्यामपस्मारचिकित्सिते ॥ ६४ ॥

कशा तऱ्हेनें दोष कुपित झाले असतां ते अपस्मार उत्पन्न कारितात, त्याचीं सामान्य व दोषभेदपरत्वें निरनिराळीं लक्षणें, औषध, महागदाचीं कारणें, लक्षणें व औषध इतके विषय या अपस्मार चिकित्साध्यायांत आत्रेयऋषींनीं संक्षेप-विस्तारानें सांगितले आहेत.

---

१ रसायन शब्दाचा अर्थ सर्व साधारण पारागंधक मिश्रित औषधें समजतात तसा नव्हे. वास्तविक अर्थ चिकित्सास्थानाच्या रसायनाध्यायांत पहावा.

## १५ पञ्चदशोऽध्यायः समाप्त.

# अथ षोडशोऽध्यायः

## क्षतक्षीणचिकित्सितम्.

उदारकीर्तिर्ब्रह्मर्षिरात्रेयः परमार्थवित् ।
क्षतक्षीणचिकित्सार्थमिदमाह चिकित्सितम् ॥ १ ॥
धनुषायस्यतोऽत्यर्थं भारमुद्वहतो गुरुम् ।
पततो विषमोच्चेभ्यो युद्ध्यमानस्य चाधिकैः ॥ २ ॥
वृषं हयं वा धावन्तं दम्यं वान्यं निगृह्णतः ।
शिलाकाष्ठाश्मनिर्घातान् क्षिपतो निघ्नतः परान् ॥ ३ ॥
अधीयमानस्यात्युच्चैर्दूरं वा व्रजतो द्रुतम् ।
महानदीं वा तरतो गजैर्वा सह धावतः ॥ ४ ॥
सहसोत्पततो दूरं तूर्णं चाति प्रनृत्यतः ।
तथान्यैः कर्मभिः क्रूरैर्भृशमभ्याहतस्य वा ।
विक्षते वक्षसि व्याधिर्बलवान्समुदीर्यते ॥ ५ ॥

**क्षतनिदान**—उदारकीर्ति, परमार्थवेत्ते, आत्रेयब्रह्मर्षि क्षतक्षीण रोगाच्या चिकित्सेकरितां पुढील निरूपण करिते झाले. अतिशय धनुष्य ओढण्यानें, अवजड ओझें वाहण्यानें, वेड्यावांकड्या व उंच जागेवरून पडल्यानें आपल्यापेक्षां अधिक बलवान् मनुष्याशीं कुस्ती केल्यानें, धांवत असलेल्या किंवा शिकाऊ बैलास, घोड्यास अथवा अन्य जनावरास आवरून धरल्यानें, शिळा, लांकूड किंवा दगड फेंकल्यानें अथवा दुसऱ्यास मारण्यानें, ( वेद शिकणारांप्रमाणें ) खूब मोठ्यानें घोंकल्यानें, लांबवर लवकर लवकर चालत गेल्यानें, मोठी नदी तरून गेल्यानें, हत्तींबरोबर धांवल्यानें, सहसा उड्या मारल्यानें, दूर, जलद व अत्यंत नाचण्यानें आणि अशाच प्रकारच्या इतर अचाट कामांच्या योगानें अत्यंत जबरदस्त आघात झाल्यानें छातीस क्षत होतें. हा क्षतरोग बलवान् आहे.

स्त्रीषु चातिप्रसक्तस्य रूक्षाल्पप्रमिताशिनः ।
उरो निरुध्यते तस्य भिद्यतेऽथ विदह्यते ॥ ६ ॥

**क्षीणरोग निदान**—अत्यंत कामासक्त आणि रूक्ष, थोडें व एकच प्रकारचें भोजन करणाऱ्या मनुष्याची छाती फार दुखूं लागते, फाटल्या प्रमाणें वाटतें व दाह होतो.

प्रपीड्यते ततः पार्श्वे शुष्यत्यङ्गं प्रवेपते ।
क्रमाद्वीर्यं बलं वर्णो रुचिरग्निश्च हीयते ॥ ७ ॥
ज्वरो व्यथा मनोदैन्यं विड्भेदोऽग्निवधस्तथा ।
दुष्टः श्यावः सदुर्गन्धः पीतो विग्रथितो बहुः ॥ ८ ॥
कासमानस्य च श्लेष्मा सरक्तः सम्प्रवर्तते ।
सक्षतः क्षीयतेऽत्यर्थं तथा शुक्रौजसोः क्षयात् ॥ ९ ॥
अव्यक्तं लक्षणं तस्य पूर्वरूपमिति स्मृतम् ।
उरोरुक् शोणितच्छर्दिः कासो वैशेषिकः क्षते ॥ १० ॥
क्षीणे सरक्तमूत्रत्वं पार्श्वं पृष्ठकटिग्रहः ।
अल्पलिङ्गस्य दीप्ताग्नेः साध्यो बलवतो नरः ।
गते संवत्सरे याप्यः सर्वलिङ्गन्तु वर्जयेत् ॥ ११ ॥

नंतर बरगड्या फार दुखूं लागतात, अंग कृश होत जातें, कांपरें भरतें, हळूं हळूं वीर्य, शक्ति, वर्ण, रुचि, जठराग्नि हीं कमी होत जातात, ताप येतो, व्यथा होते, मन खिन्न राहतें, जुलाब होतात, अग्निनाश होतो, खोंकतांना दुष्ट, काळसर, दुर्गंधयुक्त, पिंवळा, गांठी बनलेला, असा पुष्कळसा रक्तमिश्रित कफ पडतो. क्षतरोगी व ज्याचें शुक्र आणि ओज हीं क्षीण झालीं आहेत असा रोगी अतिशय क्षीण होत जातो. क्षतक्षीण रोग्यास होणारीं लक्षणें जोंपर्यंत अस्पष्ट असतात तोंपर्यंत तें त्याचें पूर्वरूप समजावें. छातींत दुखणें, रक्ताची उलटी आणि खोकला हीं क्षत रोगांतील विशेष लक्षणें होत. क्षीण-रोगांत लघ्वीबरोबर रक्त जाणें, आणि बरगड्या, पाठ व कमर हीं धरतात,

जो क्षत-क्षीणरोगी सशक्त आहे, ज्याचा अग्नि प्रदीप्त आहे आणि ज्यास रोगाचीं थोडींच लक्षणें झालीं आहेत तो रोगी सुखसाध्य समजावा. एक वर्ष होऊन गेल्यावर याप्य आणि ज्यांत सर्व लक्षणें विद्यमान आहेत तो असाध्य समजून सोडून द्यावा.

उरो मत्वा क्षतं लाक्षां पयसामधुसंयुताम् ।
सद्य एव पिबेज्जीर्णे पयसान्नात्सशर्करम् ॥ १२ ॥
पार्श्वबस्तिरुजश्चाल्पपित्ताग्निस्तां सुरायुताम् ।
भिन्नविट्कः समुस्तातिविषां पाठां सवत्सकाम् ॥ १३ ॥
लाक्षां सर्पिर्मधूच्छिष्टं जीवनीयगणं सिताम् ।
त्वक्क्षीरीं सम्मितं क्षीरे पक्त्वा दीप्तानलः पिबेत् ॥ १४ ॥
इक्ष्वालिका बिसग्रन्थि पद्मकेशर चन्दनैः ।
शृतं पयो मधुयुतं सन्धानार्थं पिबेत्क्षती ॥ १५ ॥
यवानां चूर्णमादाय क्षीरसिद्धं घृतप्लुतम् ।
ज्वरदाहे सिताक्षौद्रसक्तून्वा पयसा पिबेत् ॥ १६ ॥
कासी पर्वास्थिशूलीच लिह्यात्सघृतमाक्षिकान् ।
मधूकमधुकद्राक्षात्वक्क्षीरीपिप्पलीबलान् ॥ १७ ॥
एलापत्रत्वचोऽर्धाक्षाः पिप्पल्यर्धपलं तथा ।
सितामधुकखर्जूरमृद्वीकाश्च पलोन्मिताः ॥ १८ ॥
सञ्चूर्ण्य मधुना युक्ता गुलिकाः सम्प्रकल्पयेत् ।
अक्षमात्रां ततश्चैकां भक्षयेन्ना दिने दिने ॥ १९ ॥
कासं श्वासं ज्वरं हिक्कां छर्दिं मूर्च्छां मदं भ्रमम् ।
रक्तनिष्ठीवनं तृष्णां पार्श्वशूलमरोचकम् ॥ २० ॥
शोषप्लीहाढ्यवातांश्च स्वरभेदं क्षतं क्षयम् ।
गुलिका तर्पणी वृष्या रक्तपित्तञ्च नाशयेत् ॥ २१ ॥

उरांत क्षत झालें आहे असें समजल्यावर लाखेतील लागेचें चूर्ण मध

घालून दुधांतून प्यावें आणि तें जिरल्यावर साखरेसह दूधभात जेवावा. ज्याच्या कुशींत व बस्तींत शूळ होत असेल व ज्याचें पित्त आणि जठराग्नि हीं मंद असतील, त्यानें मद्यांतून लाखेचें चूर्ण घ्यावें. ज्यास पातळ जुलाब होत असतील, त्यानें नागरमोथा, अतिविष, पहाडमूळ, आणि इंद्रजव यांच्या चूर्णा-बरोबर लाखेचें चूर्ण घ्यावें. लाख, तूप, मेण, जीवनीय गणांतील औषधें, खडीसाखर, व वंशलोचन हीं औषधें समभाग घालून आटविलेलें दूध, ज्याचा जठराग्नि प्रदीप्त आहे अशा उरःक्षत रोग्यानें प्यावें. तालिमखाना, कमळाची देंठी, पिंपळमूळ, कमळांतील केशर व चन्दन हीं औषधें टाकून कढविलेलें दूध उरांतील क्षत भरून येण्याकरितां मध टाकून घ्यावें. हिरव्या जवांचें पीठ दुधांत शिजवून तूप टाकून ताप व दाह असतां घ्यावें किंवा सातूचें ( भाजलेल्या जवांचें ) पीठ दूध,खडीसाखर व मधांत मिळवून प्यावें. उरःक्ष-तांत खोकला आणि सांधे व हाडें यांत शूळ हे विकार होत असल्यास मोहा-चीं फुलें, ज्येष्ठमध, काळीं द्राक्षें, वंशलोचन, पिंपळी व चिकणामूळ यांचें चूर्ण तूप व मधांतून चाटावें. **एलादिगुटिका**—वेलची, तमालपत्र, व दालचिनी हीं प्रत्येकीं अर्धा अर्धा तोळा, पिंपळी २ तोळे, खडीसाखर, ज्येष्ठ-मध, खारका, व द्राक्षें हीं प्रत्येकीं चार चार तोळे घेऊन सर्वांचें चूर्ण करून मध मिळवून एकएक तोळयाच्या गोळया कराव्या. यांतून दररोज एक एक गोळी खावी. या गोळ्या खोकला, दमा, ताप, उचकी, उलटी, मूर्च्छा, मद, भोंवळ, रक्ताचे बेडके पडणें, तहान, बरगडया दुखणें, अरुची, शोष, पानथरी, आढयवात, स्वरभेद, उरःक्षत, क्षय, आणि रक्तपित्त या रोगांचा नाश करि-तात व तर्पण करून वीर्याची वृद्धि करितात.

**रक्तेतिवृत्ते दक्षाण्डं यूषैस्तोयेन वा पिबेत् ।**
**चटकाण्डरसं वापि रक्तं वा छागजांगलम् ॥ २२ ॥**
**चूर्णं पौनर्नवं रक्तशालितण्डुलशर्करम् ।**
**रक्तष्ठीवी पिबेत्सिद्धं द्राक्षारसपयोघृतैः ॥ २३ ॥**

मधूकमधुकक्षीर सिद्धं वा तण्डुलीयकम् ।
मूढवातस्त्वजामेदः सुराभृष्टं ससैन्धवम् ॥ २४ ॥
क्षामः क्षीणः क्षतोरस्कस्त्वनिद्रः सबलेऽनिले ।
शृतक्षीरसरेणाद्यात्सक्षौद्रघृतशर्करम् ॥ २५ ॥
शर्कराञ्च यवक्षौद्रजीवकर्षभका मधु ।
शृतक्षीरानुपानं वा लिह्यात्क्षीणः क्षतः कृशः ॥ २६ ॥
क्रव्यादमांसनिर्यूहं घृतभृष्टं पिबेच्च सः ।
पिप्पली क्षौद्रसंयुक्तं मांसशोणित वर्धनम् ॥ २७ ॥
न्यग्रोधोदुम्बराश्वत्थप्लक्षशालप्रियंगुभिः ।
तालमस्तकजम्बूत्वक्प्रियालैश्च सपद्मकैः ॥ २८ ॥
साश्वकर्णैः शृतात्क्षीराद्दध्याज्जातेन सर्पिषा ।
शाल्योदनं क्षतोरस्कः क्षीणशुक्रश्च मानवः ॥ २९ ॥
यष्ट्याव्हानागवलयोः क्वाथे क्षीरसमे घृतम् ।
पयस्या पिप्पली वांशी कल्कसिद्धं क्षते शुभम् ॥ ३० ॥
कोललाक्षारसे तद्वत्क्षीराष्टगुणसाधितम् ।
कल्कैः कटुंगदार्वीत्वग्वत्सकत्वक्फलैर्घृतम् ॥ ३१ ॥

रक्त अतिशय जाऊं लागल्यास कोंबड्याच्या किंवा चिमणीच्या अंड्यांतील बलक किंवा बोकडाचें अथवा जांगल जनावराचें रक्त, यूप किंवा रस स्वरूपानें प्यावें. ज्यास रक्ताचे बेडके पडत असतील त्यानें पुनर्नव्याच्या मुळ्या, लाल साळीचे तांदूळ व साखर यांचें चूर्ण, द्राक्षांचा काढा, दूध व तूप यांत शिजवून खावी. ज्या उरःक्षत रोग्याचा अधोवायु सरत नसेल त्यानें बकरीची चर्बी थोडें सैंधव मिळवून मद्यांत शिजवून खावी. अशक्त, क्षीण झालेला, उरांत क्षत झालेला व ज्यास झोंप लागत नाहीं. परंतु ज्याचा जठराग्नि प्रदीप्त आहे, अशा रोग्यानें तापविलेल्या दुधावरच्या साईबरोबर, मध, तूप, व साखर घालून बकरीची चर्बी खावी. किंवा क्षीण, क्षत झालेल्या व कृश मनुष्यानें

साखर, जवांचें पीठ, मध, जीवक, ऋषभक व मध हीं एकत्र मिळवून चाटून वर तापविलेलें दूध प्यावें. तसेंच मांसाहारी प्राण्यांच्या मांसाचा शोरवा, पिंपळी व मध मिळवून तुपाची फोडणी देऊन प्यावा. हा मांस व रक्त वाढवितो. उरःक्षती व वीर्यक्षयी मनुष्यानें वड, उंबर, पिंपळ, पायरी, राळेचा वृक्ष, गहुला, ताडाच्या शेंडयांतील मगज, जांभळीची साल, चारोळी, पद्मकाष्ट व लघु राळेच्या वृक्षाचा डिंख हीं औषधें घालून कढविलेल्या दुधांतून लोणी काढून त्याचें तूप करून त्याच्या बरोबर साळीच्या तांदळांचा भात जेवावा. ज्येष्ठमध व गांगेरुकी (तुपकडी) यांचा काढा करून त्यांत काढ्याइतकेंच दूध आणि क्षीरकाकोली, पिंपळी व वंशलोचन यांचा कल्क मिळवून तूप सिद्ध करून तें घ्यावें. हें उरःक्षतावर हितकर आहे. बोरें व लाखेचा काढा, आठपट दूध आणि टेंटूमूळ, दारुहळद, दालचिनी, कुडयाची साल व कुड्याच्या बिया यांचा कल्क मिळवून तूप सिद्ध करावें. हेंही उपरोक्त तुपाचे गुण करितें.

जीवकर्षभकौ वीरां जीवन्तीं नागरं शटीम् ।
चतस्रः पर्णिनीर्मेदे काकोल्यौ द्वे निदिग्धिके ॥ ३२ ॥
पुनर्नवे द्वे मधुकमात्मगुप्तां शतावरीम् ।
ऋद्धिं परूषकं भार्गीं मृद्वीकां बृहतीं तथा ॥ ३३ ॥
शृंगाटकीं तामलकीं पयस्यां पिप्पलीं बलाम् ।
बदराक्षोटखर्जूरवातामाभिषुकाण्यपि ॥ ३४ ॥
फलानि चैवमादीनि कल्कान्कुर्वीत कार्षिकान् ।
धात्रीरसविदारीक्षुच्छागमांसरसं पयः ॥ ३५ ॥
कुर्यात्प्रस्थोन्मितं तेन घृतप्रस्थे विपाचयेत् ।
प्रस्थार्धं मधुनः शीते शर्करार्धतुलां तथा ॥ ३६ ॥
द्विकार्षिकाणि पत्रैलाहेमत्वङ्मरिचानि च ।
चूर्णितानि विनीयास्माल्लिह्यान्मात्रां सदा नरः ॥ ३७ ॥

अमृतप्राशमित्येतन्नराणाममृतं घृतम् ।
सुधामृतरसं प्राश्यं क्षीरमांसरसाशिना ॥ ३८ ॥
नष्टशुक्रक्षतक्षीणदुर्बलव्याधिकार्षितान् ।
स्त्रीप्रसक्तान्कृशान्वर्णस्वरहीनांश्च बृंहयेत् ॥ ३९ ॥
कासहिक्काज्वरश्वासदाहतृष्णास्रपित्तनुत् ।
पुत्रदं वमिमूर्च्छाहृद्योनिमूत्रामयापहम् ॥ ४० ॥

**अमृतप्राशघृत**—जीवक, ऋषभक, ( अभावीं गुळवेल, वंशलोचन ) भुइकोहळा ( साया ), जीवन्ती, सुंठ, कचोरा, सालवण, पिठवण, रानमूग, रानउडीद, मेदा, महामेदा ( अभावीं अस्कंध, उपळसरी, काकोली, क्षीरकाकोली, रिंगणीमूळ, डोरलीमूळ, तांबडा व पांढरा पुनर्नवा, ज्येष्ठमध, कवचबीज, शतावरी, ऋद्धि ( अभावीं चिकणामूळ ) फालसा, भारंगमूळ, द्राक्षे, शिंगाडे, भुईआंवळी, पांढरा भुईकोंहळा, पिंपळी, त्रिकणा, बोरें, अक्रोड, खारका, वदाम, पिस्ता आणि अशाच तऱ्हेचीं इतर मेव्याचीं फळें प्रत्येकीं एक एक तोळा घेऊन वाटून कल्क करावा; त्यांत आंवळ्यांचा, भुइकोहळ्याचा व उंसाचा रस, वकऱ्याच्या मांसाचा शोरवा व दूध हीं प्रत्येकीं एक एक शेर घालावीं आणि यांनीं एक शेर तूप सिद्ध करावें. तें निवून थंड झालें ह्मणजे यांत अर्धाशेर मध, २०० तोळे साखर, आणि तमालपत्र, वेलची, नागकेशर, दालचिनी, व काळीं मिरें या प्रत्येकाचें दोन दोन तोळे चूर्ण घालून तें एकंदर मिश्रण सारखें मिळवावें. याचें नांव अमृतप्राशघृत आहे. हें शक्त्यनुरूप नित्य सेवन केलें असतां अमृताप्रमाणें गुण करितें. हें अमृततुल्यघृत सेवन करून वर दूध व मांसाचे शोरवे यांचें भोजन करावें. ज्यांच्या शरीरांतील वीर्य नाहींसें झालें आहे, उरांत क्षत आहे, क्षयी, अशक्त, रोगानें क्षीण झालेले, कामासक्त, कृश, निस्तेज व ज्यांचा स्वरभेद झाला आहे अशा मनुष्यांस पुष्ट करितें, खोकला, उचकी, ताप, दमा, दाह, तहान, रक्तपित्त, वांति, मूर्च्छा, योनिरोग व मूत्ररोग यांचा नाश करितें आणि वांझ स्त्रियांस पुत्र देतें.

श्वदंष्ट्रोशीरमंजिष्ठबलाकाश्मर्यकत्तृणम् ।
दर्भमूलं पृथक्पर्णीं पलाशर्षभकौ स्थिराम् ॥ ४१ ॥
पालिकं साधयेत्तेषां रसे क्षीरचतुर्गुणे ।
कल्कः स्वगुप्ताजीवन्तीमेदर्षभजीवकैः ॥ ४२ ॥
शतावर्यृद्धिमृद्वीकाशर्कराश्रावणीबिसैः ।
प्रस्थः सिद्धो घृताद्वातपित्तहृद्रोगशूलनुत् ॥ ४३ ॥
मूत्रकृच्छ्रप्रमेहार्शःकासशोषक्षयापहः ।
धनुःस्त्रीमद्यभाराध्वखिन्नानां बलमांसदः ॥ ४४ ॥

**श्वदंष्ट्रादिघृत**—गोखरू, वाळा, मंजिष्ठ, चिकणामूळ, शिवणीचीं फळें, रोहिस गवत, दर्भाचीं मुळें, पिठवण, पळस, ऋषभक व साल्वण हीं औषधें चार चार तोळे घेऊन त्यांचा काढा करावा. त्यांत त्याच्या चतुर्थांश दूध, आणि कवचबीज, जीवंती, मेदा, ऋषभक, जीवक, शतावरी, ऋद्धि, द्राक्षें, साखर, मुंडी व कमळाचे देंठ यांचा कल्क योग्यप्रमाणानें मिळवून त्यांत एक शेर तूप सिद्ध करावें. हें वातज व पित्तज हृद्रोग, शूल, मूत्रकृच्छ्र, प्रमेह, मूळव्याध, खोकला, क्षयरोग, आणि रसादि धातूंचा क्षय यांस नाहींसे करून धनुष्य, स्त्रीसंग, मद्यपान ओझें वाहणें व मार्ग चालणें या कारणांनीं क्षीण झालेल्या मनुष्याची शक्ति व मांस वाढवितें.

मधुकाष्टपलं द्राक्षाप्रस्थक्वाथे घृतं पचेत् ।
पिप्पल्यष्टपले कल्के प्रस्थं सिद्धे च शीतले ॥ ४५ ॥
पृथगष्टपलं क्षौद्रशर्कराभ्यां विमिश्रयेत् ।
समं सक्तु क्षत क्षीणे रक्तगुल्मेषु तद्धितम् ॥ ४६ ॥

**सक्तुप्रयोग**—ज्येष्ठमध ३२ तोळे आणि ६४ तोळे काळीं द्राक्षें यांच्या काढ्यांत ३२ तोळे पिंपळीचा कल्क मिळवून ६४ तोळे तूप सिद्ध करावें. तें थंड झाल्यावर त्यांत ३२ तोळे मध व ३२ तोळे

साखर घालून सारखें मिळवावें. हें समभाग सातूच्या पिठाबरोबर घेतलें असतां उरःक्षत, क्षय व रक्तगुल्म या रोगांवर हितकर आहे.

धात्रीफल विदारीक्षुजीवनीयरसाद्घृतात् ।
छागगोपयसोश्चैव सप्तप्रस्थान्पचेद्भिषक् ॥ ४७ ॥
सिद्धशीते सिताक्षौद्रद्विप्रस्थं विनयेत्ततः ।
यक्ष्मापस्मारपित्तासृक्कासमोहक्षयापहम् ।
वयः स्थापनमायुष्यं मांसशुक्रबलप्रदम् ॥ ४८ ॥

आवळकाठी, भुइकोहळा, ऊंस व जीवनीय गणांतील औषधें यांपैकीं प्रत्येकाचा एक एक शेर ह्मणजे ६४ तोळे काढा, बकरीचें व गाईचें दूध प्रत्येकीं एक शेर आणि तूप एक शेर याप्रमाणें एकंदर सात जिनसा सात शेर एकत्र करून रीतीप्रमाणें तूप सिद्ध करावें. तें निवल्यावर त्यांत एकशेर खडीसाखर व एकशेर मध मिळवून तें सेवन करावें. हें तूप क्षयरोग, फेंपरें, रक्तपित्त, खोकला, मोह व रसादि धातूंचा क्षय यांस दूर करून तारुण्य राखतें, आयुष्य वाढवितें आणि मांस, वीर्य व शक्ति देतें.

घृतन्तु पित्तेऽभ्यधिके लिह्याद्वातेऽधिके पिबेत् ।
लीढं निर्वापयेत्पित्तमल्पत्वाद्धन्ति नानलम् ।
आक्रामत्यनिलं पीतमूष्माणं निरुणद्धि च ॥ ४९ ॥
क्षामक्षीणकृशांगानामेतान्येव घृतानिच ।
त्वक्क्षीरीशर्करालाजचूर्णैः पानानि योजयेत् ॥ ५० ॥
सर्पिर्गुडान्समध्वांशाञ्जग्ध्वा दद्यात्पयोऽनुच ।
रेतो वीर्यं बलं पुष्टिं तैराशुतर माप्नुयात् ॥ ५१ ॥

उरःक्षतांत पित्त अधिक वाढलें असल्यास तूप चाटावें ह्मणजे पूर्वोक्त घृतप्रयोगांपैकीं जे तूप चाटावयाचे प्रयोग सांगितले आहेत ते करावे. आणि वायूचा जोर असल्यास तूप प्यावें. लेह्य ह्मणजे चाटावयाच्या प्रयोगांत तुपाचें प्रमाण थोडें असतें त्यामुळें तें अगोदरच मंदावलेल्या जठराग्नीस अधिक मंद न करितां पित्ताचें शमन करितें. प्यालेलें तूप प्रमाणानें जास्त असल्यामुळें

वायूस जोरानें हटवितें व जाज्वल्य जठराग्नीसही किंचित् शमवितें. अशक्त, क्षीण व कृश मनुष्यास वर सांगितलेलीं घृतें, वंशलोचन, साखर व लाह्या यांचें चूर्ण घालून योग्य योजनेनें प्यावयास द्यावीं. पुढें सांगितलेले सर्पिगुड चतुर्थांश मध मिळवून खावे आणि वर दूध प्यावें. त्या योगानें रेत, वीर्य, शक्ति व पुष्टि हीं फार लवकर प्राप्त होतात.

बलां विदारीं ह्रस्वाञ्च पञ्चमूलीं पुनर्नवाम् ।
पञ्चानां क्षीरिवृक्षाणां शुङ्गामुष्ट्यंशकामपि ॥ ५२ ॥
एषां कषाये द्विक्षीरे विदार्याजरसांशके ।
जीवनीयैः पचेत्कल्कैरक्षमात्रैर्घृताढकम् ॥ ५३ ॥
सिता पलानि पूतेऽस्मिञ्छीते द्वात्रिंशतं क्षिपेत् ।
गोधूमपिप्पलीवांशीचूर्णं शृंगाटकस्य च ॥ ५४ ॥
सक्षौद्रं कुडवांशेन तत्सर्वं खजमूर्च्छितम् ।
स्त्यानं सर्पिगुडान्कृत्वा भूर्जपत्रेण वेष्टयेत् ॥ ५५ ॥
ताञ्जग्ध्वा पलिकान्क्षीरं मद्यं वानुपिबत्कफे ।
शोषे कासे क्षते क्षीणे श्रमस्त्रीभारकर्षिते ॥ ५६ ॥
रक्तनिष्ठीवने तापे पीनसे चोरसि स्थिते ।
शस्ताः पार्श्वशिरःशूले विभेदे स्वरवर्णयोः ॥ ५७ ॥

**सर्पिगुड**—चिकणामूळ, भुइकोहळा, सालवण, पिठवण, डोरली, गोखरू व घेटुळी हीं चार चार तोळे आणि वड, पिंपळ, उंबर, पायरी व पारोसा पिंपळ या पांच वृक्षांचे कोंब प्रत्येकीं चार चार तोळे यांचा काढा करून त्यांत दुप्पट दूध, भुइकोहळ्याचा रस व बकऱ्याच्या मांसाचा शोरुआ प्रत्येकीं चौथा हिस्सा आणि एक एक तोळा जीवनीय गणांतील औषधांचा कल्क मिळवून चार शेर तूप सिद्ध करावें. तें थंड झालें ह्मणजे गाळून घेऊन त्यांत १२८ तोळे खडीसाखर आणि गव्हांचें पीठ, पिंपळी, वंशलोचन व शिंगाडे यांचें चूर्ण आणि मध प्रत्येकीं

१६ तोळे घालून पिंपळीनें सारखें ढवळून दाट व चिकट झालें म्हणजे त्याच्या चार चार तोळ्याच्या गोळ्या करून त्या भोजपत्रांत गुंडाळून ठेवाव्या; यास ' सर्पिर्गुड ' म्हणतात शक्त्यनुसार या गोळ्या सेवन करून वर दूध प्यावें. कफाचा जोर असल्यास मद्य प्यावें. हा सर्पिर्गुड क्षयरोग, खोकला, उरांतील क्षत, क्षीणता, श्रम, स्त्रीसंग, ओझें वाहणें, या कारणांनीं आलेली अशक्तता, रक्ताचे वेडके पडणें, दाह, पीनस, छाती–बरगड्या-डोकें दुखणें, स्वरभेद व शरीराची निस्तेजता या विकारांवर प्रशस्त आहे.

त्वक्क्षीरी श्रावणी द्राक्षा मूर्वकर्षभजीवकैः ।
वीरर्द्धिक्षीरकाकोली बृहतीकपिकच्छुभिः ॥ ५८ ॥
खर्जूरफलमेदाभिः क्षीरपिष्टैः पलोन्मितैः ।
धात्रीविदारीक्षुरसप्रस्थैः प्रस्थं घृतात्पचेत् ॥ ५९ ॥
शर्करार्धतुलां शीते क्षौद्रार्धप्रस्थमेव च ।
क्षिप्त्वा सर्पिर्गुडान्कुर्यात्कासहिक्काज्वरापहान् ॥ ६० ॥
यक्ष्माणं तमकं श्वासं रक्तपित्तं हलीमकम् ।
शुक्रनिद्राक्षयं तृष्णां हन्युः कार्श्यं सकामलम् ॥ ६१ ॥

**दुसरा सर्पिर्गुडक.**—वंशलोचन, मुंडी,काळ्या मनुका,मोरवेल, ऋषभक, जीवक, काकोली, क्षीरकाकोली, डोरलीमूळ, कवचबीज, खारका व मेदा हीं सर्व औषधें चार चार तोळे घेऊन दुधांत वाटावीं आणि त्यांत आंवळ्यांचा, भुइकोहळ्याचा व उंसाचा रस एक एक शेर मिळवून त्यानें एक शेर तूप सिद्ध करावें. तें निवल्यावर त्यांत २०० तोळे साखर आणि ३२ तोळे मध मिळवून पूर्वोक्त रीतीनें सर्पिर्गुड तयार करावे. हे खोकला, उचकी,ताप,क्षयरोग, तमकश्वास, रक्तपित्त, हलीमक, वीर्यक्षय, झोंप नष्ट होणें, तहान, कृशता व कावीळ या विकारांचा नाश करितात.

द्राक्षां नवामामलकीमात्मगुप्तां पुनर्नवाम् ।
शतावरीं विदारीञ्च समांशां पिप्पलीं तथा ॥ ६२ ॥

पृथग्दशफलान्भागान्पलान्यष्टौ च नागरात् ।
यष्ट्याह्वसौवर्चलयोर्द्विपलं मरिचस्य च ॥ ६३ ॥
क्षीरतैलघृतानां च त्र्याढके शर्करा शते ।
कथिते तानि चूर्णानि दत्वा विल्वसमान् गुडान् ॥ ६४ ॥
कुर्यात्तान्भक्षयेत्क्षीणः क्षतशुष्कश्च मानवः ।
तेन सद्यो रसादीनां वृद्धया पुष्टिं स विन्दति ॥ ६५ ॥

**तिसरा सर्पिर्गुडक.**—द्राक्षें, ओले आंवळे, कवचबीज, पुनर्नवा, शतावरी, भुइकोहळा व पिंपळी हीं प्रत्येकीं ४० तोळे; सुंठ ३२ तोळे, आणि ज्येष्ठमध, पादेलोण व काळीं मिरें हीं आठ आठ तोळे घेऊन त्यांचें चूर्ण करून ठेवावें. नंतर दूध, तेल व तूप चार चार शेर आणि साखर ४०० तोळे यांचा एकत्र पाक करून त्यांत वरील चूर्ण मिळवून बेलफळाएवढे गुड ( गोळे ) करावे. हे सेवन केल्यानें लवकरच क्षीण व क्षतक्षयी मनुष्याच्या रसादिकांची वृद्धि होऊन तो पुष्ट होतो.

गोक्षीराद्व्याढकं सर्पिः प्रस्थमिक्षुरसाढकम् ।
विदार्याः स्वरसात्प्रस्थं रसात्प्रस्थं च तैत्तिरात् ॥ ६६ ॥
दद्यात्सिध्यति तस्मिँस्तु पिष्टानिक्षुरसैरिमान् ।
मधूकपुष्पं कुडवं पियालकुडवं तथा ॥ ६७ ॥
तुगाक्षीर्यर्धकुडवां खर्जूराणिच विंशतिम् ।
पृथग्बिभीतकान्यक्षः पिप्पल्याश्च चतुर्थिकाम् ॥ ६८ ॥
त्रिंशत्पलानिखण्डाच्च मधुकात्कर्षमेव च ।
तथार्धपलिकान्यत्र जीवनीयानि चावपेत् ॥ ६९ ॥
सिद्धेऽस्मिन्कुडवं क्षौद्रं शीते क्षिप्त्वाथ मोदकान् ।
कारयेन्मरिचाजाजीपलचूर्णावचूर्णितान् ॥ ७० ॥
वातासृक्पित्तरोगेषु क्षतकासक्षयेषु च ।
शुष्यतां क्षीणशुक्राणां रक्ते चोरसि संस्थिते ॥ ७१ ॥

कृशदुर्बल वृद्धानां पुष्टिवर्णबलार्थिनाम् ।
योनिदोषक्षतस्रावहतानां चापि योषिताम् ॥ ७२ ॥
गर्भार्थिनीनां गर्भश्च स्रवेद्यासां म्रियेत वा ।
धन्या बल्या हितास्ताभ्यः शुक्रशोणितवर्धनाः ॥ ७३ ॥

**सर्पिर्मोदक**–गाईचें दूध ८ शेर, तूप १ शेर, उंसाचा रस चार शेर, भुइकोहळयाचा अंगरस एक शेर व तित्तिरपक्ष्याचा मांसरस एक शेर, हीं सर्व एकत्र मिळवून अग्नीवर शिजत ठेवावीं. हें मिश्रण बरेंच उकळून तयार होण्याच्या बेतांत आलें ह्मणजे त्यांत मोहाचीं फुलें १६ तोळे, चारोळ्या १६ तोळे, वंशलोचन ८ तोळे, खारका वीस, बेहडे वीस, पिंपळी चार तोळे, खडीसाखर १२० तोळे, ज्येष्ठमध एक तोळा, आणि जीवनीय गणांतील औषधें दोन दोन तोळे हीं उंसाच्या रसांत वाटून घालावीं. हें सिद्ध होऊन थंड झालें ह्मणजे त्यांत १६ तोळे मध आणि चार चार तोळे काळीं मिरें व काळें जिरें यांचें चूर्ण मिळवून लाडू बनवावे. हे मोदक वात, रक्तपित्त, क्षत, खोकला, धातुक्षय, राजयक्ष्मा, वीर्यक्षय, छातींत रक्त गोठणें, कृश, दुर्बळ, वृद्ध; पुष्टि, कांति, व शक्ति इच्छिणाऱ्या मनुष्यांस, योनिरोग, योनिक्षत, योनिस्रावानें पीडिलेल्या, वांझ, ज्यांचा गर्भस्राव होतो किंवा मुलें होऊन मरतात अशा स्त्रियांस हितकर, शक्ति देणारे, धन्य, आणि वीर्य व रक्त वाढविणारे आहेत.

बस्तिदेशे विकुर्वाणे स्त्रीप्रसक्तस्य मारुते ।
वातघ्नान्बृंहणान्वृष्यान्योगांस्तस्य प्रयोजयेत् ॥ ७४ ॥
शर्करापिप्पलीचूर्णैः सर्पिषा माक्षिकेण वा ।
संयुक्तं वा शृतं क्षीरं पिबेत्कासज्वरापहम् ॥ ७५ ॥
फलाम्लं सर्पिषा भृष्टं विदारीक्षुरसे शृतम् ।
स्त्रीषु क्षीणः पिबेद्यूषं जीवनं बृंहणं परम् ॥ ७६ ॥
सक्तूनां वस्त्रपूतानां मन्थं क्षौद्रघृतान्वितम् ।
यवाग्निसात्म्यो दीप्ताग्निः क्षतक्षीणः पिबेन्नरः ॥ ७७ ॥

जीवनीयोपसिद्धं वा घृतभृष्टं तु जांगलम् ।
रसं प्रयोजयेत्क्षीणो व्यंजनार्थं सशर्करम् ॥ ७८ ॥
गोमहिषाश्वनागाजैः क्षीरैर्मांसरसैस्तथा ।
यथाग्नि भोजयेद्यूषैः फलाम्लैर्घृतसंस्कृतैः ॥ ७९ ॥
दीप्तेऽग्नौ विधिरेषः स्यान्मन्दे दीपनपाचनः ।
यक्ष्मिणां विहितो ग्राही भिन्ने शकृति चेष्यते ॥ ८० ॥

अत्यंत कामासक्त मनुष्याचा वायु बस्ति प्रदेशांत विकृत झाला असतां त्यास वातनाशक, पौष्टिक व वीर्यवर्धक औषधें द्यावीं. खडीसाखर व पिंपळीचें चूर्ण तुपांतून किंवा मधांतून घ्यावें. अथवा पिंपळी व खडीसाखर घालून आटविलेलें दूध प्यावें ह्मणजे खोकला व ताप बरे होतात. भुईकोहळ्याच्या व उंसाच्या रसांत आमसोलें टाकून त्यांचें कढण करावें व त्यास तुपाची फोडणी देऊन तें अतिशय स्त्रीसंगानें क्षीण झालेल्या मनुष्यानें प्यावें. हें उत्तम आयुरक्षक व पौष्टिक आहे. ज्या क्षतक्षीण मनुष्याचा अग्नि प्रदीप्त असेल व ज्यास जवांचें अन्न मानवत असेल त्यानें वस्त्रगाळ सातूच्या पिठाचें मंथ करून मध–तूप मिळवून प्यावें. क्षीण झालेल्या मनुष्यानें जीवनीय गणांतील औषधें घालून जांगल जनावरांच्या मांसाचा शोरवा तयार करून त्यास तुपाची फोडणी देऊन त्यांत थोडी साखर घालून त्याबरोबर भात जेवावा. गाय, हैस, घोडी. हत्तीण व बकरी यांचें दूध व मांसरस यांचें, आमसोल घालून तुपाची फोडणी देऊन यूष करून त्याबरोबर जेवावें. हा विधि ज्यांचा अग्नि प्रदीप्त आहे अशा क्षयरोग्यांकरितांच सांगितला आहे. ज्यांचा अग्नि मंद असेल त्यास पुढें सांगितलेलीं दीपक पाचक औषधें द्यावीं. तसेंच ज्यांस पातळ जुलाब होत असतील त्यास ग्राहक औषधें द्यावीं.

पालिकं सैन्धवं शुण्ठी द्वे च सौवर्चलात्पले ।
कुडवांशानि वृक्षाम्लं दाडिमं पत्रमर्जकात् ॥ ८१ ॥

एकैकं मरिचाजाज्योर्धान्यिकाद्द्वे चतुर्थिके ।
शर्करायाः पलान्यत्र दश द्वे च प्रदापयेत् ॥ ८२ ॥
कृत्वा चूर्णमतो मात्रामन्नपाने प्रयोजयेत् ।
सेचनं दीपनं वल्यं पार्श्वार्तिश्वासकासनुत् ॥ ८३ ॥

**सैन्धवादिचूर्ण**--सैंधव व सुंठ चार चार तोळे, पादेलोण ८ तोळे, अमसोलें १६ तोळे, डाळिंबसाल १६ तोळे, आजवल्याचीं पानें १६ तोळे काळीं मिरें व काळें जिरें चार चार तोळे, धणे ८ तोळे आणि साखर ४८ तोळे या सर्व जिनसांचें चूर्ण करून एकत्र मिळवावें, आणि खाण्या पिण्याच्या पदार्थांतून वापरावें. हें रुचि देणारें, अग्निदीपक, शक्तिवर्धक आणि बरगड्यांतील दुखणें, दमा व खोकला नाहींसें करणारें आहे.

एका षोडशिका धान्याऽद्द्वेजाज्यजमोदयोः ।
ताभ्यां दाडिमवृक्षाम्लाद्द्विः सौवर्चलात्पलम् ॥ ८४ ॥
शुण्ठ्याः कर्षं दधित्थस्य मध्यात्पञ्च पलानि च ।
तच्चूर्णं षोडश पले शर्करायां विमिश्रयेत् ।
षाडवोऽयं प्रदेयः स्यादन्नपानेषु पूर्ववत् ॥ ८५ ॥

**षाडव**--धणे १ तोळा, काळें जिरें व अजमोदा दोन तोळे, डाळिंबाची साल व अमसोलें आठ आठ तोळे, पादेलोण चार तोळे, सुंठ एक तोळा आणि कवठाचा गीर वीस तोळे या सर्वांचें चूर्ण करून त्यांत ६४ तोळे साखर मिळवून चटणी अथवा पंचामृत तयार करावें व तें वरील चूर्णाप्रमाणें खाण्या पिण्याच्याच्या पदार्थांत वापरावें.

पिबेन्नागवलामूलस्यार्धकर्षविवर्धनम् ।
पलं क्षीरयुतं मासं क्षीरवृत्तिरनन्नभुक् ॥ ८६ ॥
एष प्रयोगः पुष्ट्यायुर्बलारोग्यकरः परः ।
मण्डूकपर्ण्याः कल्पोऽथ शुण्ठीमधुकयोस्तथा ॥ ८७ ॥

गांगेरुकीचें मूळ पहिल्या दिवशीं अर्धा तोळा, दुसऱ्या दिवशीं एक

तोळा याप्रमाणें दररोज अर्धा तोळा वाढवीत वाढवीत चार तोळा प्रमाणावर येऊन पोंचलें ह्मणजे दररोज चार तोळे प्रमाणें एक महिनाभर दुधाबरोबर घ्यावें. हें औषध घेत असतां अन्न अगदीं न खातां निव्वळ दुधावर रहावें. हा प्रयोग पुष्टि, आयु, शक्ति व आरोग्य देण्याविषयीं उत्तम आहे. याचप्रमाणें मण्डूकपर्णी, सुंठ, व ज्येष्ठमध यांचेही कल्प आहेत.

यच्चोक्तं यक्ष्मिणां पथ्यं कासिनां रक्तपित्तिनाम् ।
तच्च कुर्यादपेक्ष्याग्निं व्याधिं सात्म्यबलॉस्तथा ॥ ८८ ॥
उपेक्षितो भवेत्तस्मिन्ननुबन्धो हि यक्ष्मणः ।
प्रागेवागमनात्तस्य तस्मात्तं त्वरया जयेत् ॥ ८९ ॥

याशिवाय क्षयरोग, खोकला व रक्तपित्त या रोगांवर जे जे हितावह उपचार सांगितले आहेत ते सर्व रोग्याचा जठराग्नि, सात्म्य, शक्ति व रोगाचें मान पाहून उरःक्षतांत योजावें. उरःक्षताची हेळसांड केल्यानें त्याचा परिणाम क्षयावर जातो. कारितां तितकी मजल पोंचण्यापूर्वींच त्वरेनें उरःक्षताची चिकित्सा करावी.

क्षतक्षयसमुत्थानं सामान्यपृथगाकृतिम् ।
असाध्ययाप्यसाध्यत्वं साध्यानां सिद्धिमेव च ॥ ९० ॥
उक्तवाञ्ज्येष्ठशिष्याय क्षतक्षीणचिकित्सिते ।
तत्त्वार्थविद्वीतरजस्तमोदोषः पुनर्वसुः ॥ ९१ ॥

क्षतक्षयाचीं कारणें, त्याचीं सामान्य विशेष लक्षणें, साध्य–असाध्य-याप्य भेद, आणि साध्याची चिकित्सा इतके विषय या क्षतक्षीण चिकित्साध्यायांत तत्वज्ञ, व रज–तम दोष रहित अशा आत्रेय महर्षींनीं आपल्या अग्निवेश नांवाच्या वडील शिष्यास सांगितले आहेत.

१६ षोडशोऽध्यायः समाप्तः ।

# अथ सप्तदशोऽध्यायः ।

## श्वयथुचिकित्सितम् ।

भिषग्वरिष्ठं सुरसिद्धजुष्टं मुनीन्द्रमत्र्यात्मजमग्निवेशः ।
महागदस्य श्वयथोर्यथावत्प्रकोपरूपप्रशमानपृच्छत ॥ १ ॥
तस्मै जगादागदवेदसिन्धुप्रवर्तनाद्विप्रवरोऽत्रिजस्तान् ।
वातादिभेदात्त्रिविधस्य सम्यङ्निजानिजैकांगजसर्वजस्य ॥ २ ॥

वैद्यांत श्रेष्ठ आणि देव व सिद्ध यांनीं सेवित, असे जे आत्रेय मुनीन्द्र त्यांस त्यांचा शिष्य जो अग्निवेश त्यानें श्वयथु ह्मणजे सूज नांवाच्या महारोगाची कारणें, लक्षणें व चिकित्सा विचारिलीं असतां ते आयुर्वेद सागरतुल्य व विप्रकुलश्रेष्ठ असे आत्रेय ऋषि वातादि दोष भेदांनीं तीन प्रकारच्या आणि निज-आगन्तु भेदानें व एकांग-सर्वांग भेदानें दोन प्रकारच्या सुजेचें सविस्तर वर्णन करते झाले.

शुध्यामयाभक्तकृशाबलानां क्षाराम्लतीक्ष्णोष्णगुरूपसेवा ।
दध्याममृच्छाकविरोधिदुष्टगरोपसृष्टान्ननिषेवणञ्च ॥ ३ ॥
अर्शांस्यचेष्टा न च देहशुद्धिर्मर्मोपघातो विषमाप्रसूतिः ।
मिथ्योपचारः प्रतिकर्मणाञ्च निजस्य हेतुः श्वयथौ प्रदिष्टः ॥४॥
बाह्यास्त्वचोदूषयिताभिघातः काष्ठाश्मशस्त्राग्न्यशनीविषाद्यैः ।
आगन्तुहेतुस्त्रिविधो निजश्च सर्वार्धगात्रावयवाश्रितत्वात् ॥५॥
बाह्याः शिराः प्राप्य यदा कफासृक्पित्तानि सन्दूषयतीह वायुः ।
तैर्बद्धमार्गः स तदा विसर्पन्नुत्सेधलिंगं श्वयथुं करोति ॥ ६ ॥
उरः स्थितैरूर्ध्वमधस्तु वायोः स्थानास्थितैर्मध्यगतैस्तु मध्ये ।
सर्वांगगैः सर्वगते क्वचित्स्थैर्दोषैःक्वचित्स्याच्छ्वयथुस्तदाख्यः ॥७॥

वमन विरेचनादि द्वारा संशोधन, रोग किंवा उपवास या कारणांनीं कृश व अशक्त झालेल्या मनुष्यानें क्षार, आंबट, तीव्र, गरम व जड पदार्थ खाणें; दहीं, माती, शाका, कच्चें-परस्पर विरुद्ध, नासलेलें किंवा विषारी

सश्लेष्मा उरसि तिष्ठतीत्युरःस्थस्त्रिकस्य पृष्ठाधाराख्यस्य स्वप्रभावाद्यस्मा-द्वलंबनं करोति स्वकर्मणि तस्य सामर्थ्यमुत्पादयति। हृदयस्यान्नवीर्यादन्नवीर्येणा भ्यवहृतादन्नाद्रसरूपतापरिणतादवलंबनं बलेन वीर्येण करोति । च शब्दा-त्स्ववीर्येणाऽपि हृदयस्यावलंबनं करोति। किंत्वन्नवीर्यादतिशयेन यथावलंबनं हृदयस्य करोति न तथा स्ववीर्यतः॥ यतोऽन्नरसःपूर्वं हृदि स्थितिं कृत्वा ततो व्यानव्युक्षिप्तः सर्वं शरीरं याति तस्माद्विशेषेण हृदयस्यान्नवीर्यादवलंबनं युक्तम् । आगमोऽपि हृदयं मनसः स्थानमोजसश्चिततस्यच । मांसपेशीचयो रक्तपद्माकारमधोमुखम् । योगिनो यत्र पशान्ति सम्यग् ज्योतिः समाहिताः । रसो यः स्वच्छतां यातः स तत्रैवावतिष्ठते । ततो व्यानेन विक्षिप्तः कृत्स्नं देहं प्रपद्यते । तथा तत्स्थ एवोरःस्थ एवैष श्लेष्मा शेषाणां कफस्थानानामंबुकर्मणा क्लेदसंश्लेषादिलक्षणेन जलव्यापा-रेणावलंबनं करोत्यतोऽस्माद्यथोक्ताद्धेतोरवलंबकः श्लेष्मेत्युच्यते ।

झालें. येथपर्यंत अवलंबकाचें स्वरूप व स्थान यांचा यथातथा विचार झाला. आतां पुढें अवलंबकाचे ठायीं व्यानसाह्यानें अवलंबकत्व कसें येतें त्याचा विचार करावयाचा आहे. व्यानांचा प्रभावच असा विलक्षण आहे. याविषयीं ह्मटलें आहे कीं, " सन्धिस्कन्धमर्मदेशेषु विशेषेण प्राणापानवृत्त्योश्च मध्यउद्भूतवृत्तिर्वीर्यवत् कर्मकर्ता भवति " ह्मणजे प्राणापानादि वायूंत व्यापक-त्वगुणामुळें याची व्याप्ति आहे. कारण " व्यानः सर्वेषु देहेषु सदा व्यावृत्य तिष्ठति " याच पद्धतीनें व्यानव्याप्ति हृदयांत देखील संबंधपरंपरेनें संभवते. आणि तसेंच पूर्वतत्ववेत्त्यांनीं ह्मटलेंही आहे-" व्यानो हृदिस्थितःकृत्स्नदेह-चारी महाजवः ॥ अर्थात् 'हृदिप्राणो गुदेऽपान.' इ० श्लोकान्वयें झालेला प्राण-वायुप्रकरणीं खुलासा कांहीं अंशीं एकदेशी आहे हें सांगणें इष्ट आहे. ह्मणजे हृदयांत जशी प्राणवायुव्याप्ति संभवते तशीच व्यानव्याप्ति देखील आहे. यास अनुभव असा आहे कीं नुसत्या प्राणाकर्षणानें किंवा त्याच्या सम्यग्वह-नानें व्यान वायु ताब्यांत येतो, व शरीराचें जडत्व नाहींसें होतें. व तशा रीतीनें योग्यांच्या शरीरांतून येणाऱ्या लघुत्वाचे दाखले पातंजल योगशास्त्र

व ज्ञानेश्वरी यांतून आढळतात. त्यासंबंधीं विशेष विवेचन त्या त्या ग्रंथांतून पाहून घ्यावें. या प्रकरणांत त्यांचा फारसा संबंध नसल्यामुळें लेखनविस्तार-भयास्तव ते येथें घेतले नाहींत. आतां हा हलकेपणा शास्त्रीय पद्धतीनें समजून घेण्यास आपणाला व्यानवायुकार्यें व स्थानें स्पष्ट समजलीं पाहिजेत. असें मुद्दाम सांगण्याचें कारण हें कीं, व्यानवायुप्रकरणीं यासंबंधीं होणें तो उल्लेख चुकून राहिला आहे. तरी "व्यानो हृदि स्थितः कृत्स्न देहचारी महाजवः" याचें जरूरी पुरतें स्पष्टीकरण येथें करूं.—हल्लीं शहरांतून पाणी पुरविण्यासाठीं नळाची योजना केलेली असते. ती अशी, मूळ ठिकाणांतून पाणी उच्छ्वासांत (खजिन्यांत) येतें, तेथून मोठमोठ्या नळांत विभागिलें जातें. त्या मोठ्या नळांतून लहान नळांत जातें व त्यांतून पुन्हां निरनिराळ्या लहानमोठ्या शाखांत पसरतें. आतां हाच दृष्टांत आमच्या रक्तवहनास देखील पूर्णपणें लागू पडतो.

नळांतून पाण्याचा संचार होण्यास उच्छ्वासांतील पाण्यावर हवेच्या दाबाची जी शक्ति लागते, तीच पाण्याची प्रेरक शक्ति बनून पाण्याची वांटणी करिते. त्याप्रमाणेंच आमच्या हृदयांतून रक्तांत जी गति येते, तीच तद्द्वारा रक्ताची वांटणी करिते. आतां आधुनिक तत्ववेत्ते ही हृत्प्रेरक गति अगम्य व स्वतः-सिद्ध मानितात. हिच्यांतच आमच्या प्राणाचा व व्यानाचा समावेश होतो. त्यांतल्या त्यांत रक्तवहनादि कर्तृत्वासंबंधानें व्यानास महत्व येतें.

वातापित्तविवेचनांतून पचनकार्यव्यवस्थेचें वर्णन झालेलेंच आहे. खाल्लेलें अन्न आंतड्यांत पोंचल्यावर तेथें त्याचा परिपाचित रस ( पूर्वी पित्तविवेचनांत कळविल्याप्रमाणें रक्तजनकरसधातु ) तयार झाला ह्मणजे तो एयोर्ताद्वारें हृदयाशीं मिळून पुढें रक्ताशीं व तद्द्वारा (रक्तमार्गानें) निरनिराळ्या अवयवाशीं मिळतो. अशा रीतीनें त्या अवयवांशीं मिळाल्यावर त्यांचा पोषक बनतो, किंवा त्याच्या कार्यास उत्तेजक तरी होतो. आतां हें रसधातुवहन नाना नलिकाद्वारें आपाद मस्तक असें घडतें व तें घडवणारा आपादमस्तकव्यापी तर आमचा व्यान आहे. कारण "व्यानोभिवहति शरीरं धातुष्वाहारमनुपक्वं" तेव्हां त्याचा

मूलांश हृत्खजिन्यांतून असणार हें उघड आहे. एकूण हृदय, धमन्या,केशवाहिन्या, वगैरेतून व्यानाची व्याप्ति आहे. ह्मटलें आहे कीं,—हृदि ह्येष आत्मा। तत्रै- तदेकशतं नाडीनां तासां शतं शतमेकैकस्याम्। द्वासप्ततिर्द्वासप्ततिः प्रतिशाखा नाडीसहस्राणिभवन्त्यासु व्यानश्चरति। व्यानो व्यापनात्। आदित्यादिवरश्मयोः। हृदयात्सर्वगतो गामिनिभिर्नाडिभिर्व्याप्य व्यानो वर्तते ॥ अशा रीतीनें व्यान व प्राण या दोहोंची वस्ति आपल्या हृत्कमलांत आहे. ही व्याप्ति कोणत्या भागीं कमजास्त तें सूक्ष्मभेदानें जाणवितां येईल. परंतु त्याचा तादृश संबंध नसल्यामुळें तो संबंध गाळून टाकूं आणि व्यानप्रभावानें कफवांटणी सम्यक् घडून येणारा शरीरांतील हलकेपणा तो व्यक्त करूं.

योग कोणताही असो, हठयोग असो वा राजयोग असो,त्याचा परिणाम प्राण- तत्वावर होतो. प्राणायामानें प्राणवायूस स्तब्धता प्राप्त होते. कधीं तर तो संकुचित होतो. व देहव्यापि व्यानांत मुरतो. त्यायोगें शरीरांतील व्यानस्थानांतून वाय्वाधिक्य होतें व रक्तांतील फाजील अप्तत्व वा तद्विशिष्ट टाकाऊ पदार्थ अनायासें कमी होतात. मग सम्यग्वायुवहनानें नाडया शुद्ध होऊन देह हलका होतो. प्राणवायु- स्तंभनानें देखील अशीच क्रिया घडते. ह्मणजे प्राणवायुस्तंभनानें शरीरस्थ व्यानास विस्तृत होण्यास जागा सांपडते, अर्थात् त्यायोगें अप्तत्वविशिष्ट नाडया मोकळ्या होतात व त्या वायूचें सम्यक् अस्तित्व घडून ते अप्तत्वविशिष्ट पदार्थ बाहेर पडतात. असो. एकूण झालें काय तर शरीरास लघुत्व येण्याचीं जीं निरनिराळीं कारणें आहेत त्यांत अप्तत्वविशिष्ट पदार्थकोशांत वायुतत्वाचें सम्यग्वहन घडणें याचा समावेश होतो. आतां हें शक्य कसें याची सत्यता पक्षिदेहावरून प्रत्ये- कास समजेल.

पक्ष्यांचें शरीर हलकें असतें,याचें कारण त्यांना आपल्या शरीराच्या बहुतेक भागांतून वायु खेळवितां येतो हें आहे. त्यांच्या फुप्फुसाचा संबंध छाती व पोट ह्यांशीं विलक्षण रीतीनें घडतो. हें देहरचनेवरून समजतें. आतां पक्षिदेह ज्याप्रमाणें अप्तत्वविशिष्टपदार्थस्थलीं वायुतत्वविशिष्टपदार्थसंचारानें हलका

होतो, तद्वत् मनुष्यदेहही सदर रीतीनें हलका होणार हें उघड आहे. अप्तत्व-विशिष्टपदार्थ, शरीरांत रस, मांस, मेद, मज्जा, शुक्र, मूत्र, पुरीषादि आहेत. हींच कफस्थानें आहेत. या निरनिराळ्या पदार्थांतून असणाऱ्या कफाचें प्रमाण आढक ह्मणजे सरासरी ३। शेर सांगितलें आहे. आतां ही कफभूयिष्ठता वा. कफविकृति जाऊन जर तत्स्थलीं सम्यक् वायुवाहन करविण्याची शक्ति असली तर शरीर हलकें राहणार हें उघड आहे.

एव्हांपर्यंत झालेल्या वर्णनावरून रसवहन तसेंच तद्घटित रक्तवहनास व्यानाची आवश्यकता आहे हें समजलें. आतां रसधातु कफभूयिष्ठ असतो तेव्हां कफवहनास याची अर्थात् व्यानाची अवश्यकता आहे हें उघड झालें. तसेंच व्यानाचा सम्यक् संचार होत राहिल्यास देह प्रकृतींतील स्वास्थ्य तेंही अनुमानानें समजलें. त्याचप्रमाणें जर कफवैपुल्य किंवा कफविकृति वडून व्यानसंचारास प्रतिबंध झाला तर त्या कफामुळें शरीरास जडत्व कसें येतें हेंही कळलें. ह्मणजे धन्वंतरिसंहितेंत " अनिले मंदेस ति श्लेष्मविवर्द्धनम् " ह्या वाक्याचा विचार होऊन व्यानस्थानीं असणारा श्लेष्मा देहास जडपणा आणितो हेंही विचारानें ठरलें. निरनिराळ्या वायूंतून श्लेष्म्याची व्याप्ति झाली असतां घडणाऱ्या परिणामाचें विवेचन करितांना व्यानवायुस्थानीं श्लेष्मा जाऊन त्यानें तो आवृत झाला असतां—अडवून धरिला असतां—सदरील परिणाम घडतो असें स्पष्टपणें ह्मटलें आहे:— व्याने पर्वास्थिवाक्ग्रहः । गुरुतांगेषु सर्वेषु स्खलनंच गतौ भृशम् ॥

येथपर्यंत केलेल्या वर्णनावरून त्रिकस्थानीं अवलंबक व्याप्ति कशी असते, त्याचें स्वरूप काय? व इतरत्र श्लेष्म्यांस तो कसा पाळितो इ० गोष्टींचा खुलासा झाला. तसेंच तो व्यानसाह्यानें गमनशील बनून इतर श्लेष्म्यांस व शरीरावयवांस तुष्टिपुष्टिप्रद कसा बनतो हें समजलें. त्याप्रमाणेंच तो

१ तत्रास्थनिस्थितो वायुः पित्तंतुस्वेदरक्तयोः । श्लेष्मा शेषेषु तेनैकमाश्रया-श्रयिणंमिथः ॥

व्यानाच्या गमनास प्रतिबंधक झाला असतां जडत्व ( घातक–मृत्यु–चिन्ह ) कसें आणितो हें घ्यानीं आलें. तेव्हां याची जरूरीपुरती माहिती आटोपली.

आतां हा अवलंबक कुपित झाल्यास करितो काय ? तर –– " अपोषणंच सर्वेषां कुर्यात्क्रुद्धोऽवलंबकः " अर्थात् सर्वावयव शुष्क बनतात. हा प्रभाव त्याच्या सामर्थ्याचा कसा आहे, हें विचारी वाचकांस समजून येईल करितां तें वाचकांवरच सोंपवून हा विभाग विस्तारभयास्तव येथेंच आटोपून क्रमप्राप्त क्लेदकाविषयीं विचार करूं.––

# क्लेदक.

आपण जें अन्न खातों त्याचीं पांच रूपांतरें होतात. मुखांत चर्वण, कोठ्यांत पाक, आंतड्यांत धातुप, मग त्याचें व अपौष्टिकांशाचें पृथक्करण व शेवटीं धातुपवाहिन्यांत शोषण होतें. धातूपवाहिन्या व तत्संलग्न धातूपरस यांचा मागील अवलंबक विभागांत विचार झाला. येथें तत्पूर्वस्थित्युत्पादक ( अन्नद्रावक ) रसांचा विचार करावयाचा आहे.

पृथ्व्यादि पंचमहाभूतांचा गुणप्रकर्ष पाहूं गेल्यास असा आहे. पृथ्वी– ( धारणे ) आपः ( क्लेदने ) तेजः ( प्रकाशने ) वायु ( व्यूहने ) व आकाशम् ( अवकाशदाने ). यांवर बहुतेक कार्यांची तसेंच प्राणिजातांची घडामोड अवलंबून आहे. आतां प्रस्तुत कफभेदाचें जें क्लेदन कार्य तें अप्तत्वावलंबी कसें आहे हें यावरून ध्यानीं येईल. तेव्हां येथें क्लेदकाचा विचार करावयाचा ह्मणजे कोष्ठस्थ निरनिराळ्या जलरसांची माहिती घ्यावयाची हें उघड आहे. पण याच रसांचें विवेचन पूर्वीं पाचकपित्त–विवेचनांत झालें आहे. मग पुन्हां कफविभागांत त्यांची माहिती घेण्याचें कारण काय ? जे पदार्थ पूर्वीं पित्तविभागांत आले, तेच फिरून कफविभागांत कसे मोडतील ? अशी कोणास शंका येणार आहे. तरी त्यासंबंधानें एवढेंच सांगावयाचें कीं, तेथें त्या रसांतील तेजोद्रव्याचा व तद्गुणाचा विचार झाला.

येथें त्या रसांतील द्रवत्वाचा व त्याच्या गुणाचा विचार करावयाचा आहे. आतां या रसांची व त्यांच्यां कार्याची माहिती शरीरशास्त्रदृष्टीनें पूर्वीच पाचकपित्तप्रकरणीं सविस्तर आली आहे. तेव्हां विस्तारभयास्तव ती येथून गाळून केवळ तत्पुरता असा या रसांचा विचार चालू प्रकरणीं करूं.—

हे अन्नविद्रावक रस ४ प्रकारचे आहेत. ( १ ) पहिला, जो लालोत्पादक पिंडांतून निघतो, ज्याची व्याप्ति अन्नमार्गांत असते व जो अन्नाशीं मिळून आमाशयांत उतरतो तो. हा दररोज १॥ शेरापासून २–२॥ शेरापर्यंत निघतो ह्मणतात. ( २ ) दुसरा आमाशयाच्या कोथळ्यांतच निपजतो, हा नितळ व रंगहीन असतो. ह्यांत जलांश फार. ह्मणजे १००० भागांत ९९४ भाग पाणी असतें. हा तर दरएक जेवणास सुमारें १–१।. शेर उत्पन्न होतो. ( ३ ) तिसरा मांसरस(मांस वितळविणारा ) जो प्यांक्रियास पिंडापासून निघतो.तो. हा सरासरी पावशेर दीडपावशेर निघतो ह्मणतात. ( ४ ) चवथा अंत्ररस, म्यूकस् मेंब्रेन त्वचेंतून निघतो तो. आंतड्यांतील भाग या चिकट त्वचेनें आच्छादित असून तिच्यांत पुष्कळ लहान लहान पिंड आहेत. त्यांच्यांतून हा रस निपजतो. आतां येथें हेंही लक्ष्यांत ठेविलें पाहिजे कीं, हे सर्व रस एकाच कालीं सर्वत्र उत्पन्न होत नाहींत. क्रमाक्रमानें व जरूरीप्रमाणें त्यांची उत्पत्ति होते. यामुळें कफप्रमाणांत केव्हांही वदल होत नाहीं.

आतां हे रस त्या निरनिराळ्या अवयवांतून निघतात तरी कसे ? यांचा स्वत:सिद्ध सांठा तर तेथें नाहींच. मग येतात तरी कोठून ? अशी कोणास शंका येणार आहे. तरी तिचें समाधान पूर्वी अवलंबकवर्णनांत आलेल्या माहितीनें करूं.—रसधातुमिश्रित शुद्ध रक्तवहन या निरनिराळ्या अवयवांतून घडत असतां ते आपणांत पसरलेल्या केशाकार जालमार्गानें गरजेप्रमाणें रस घेतात. एवंच रक्ताशीं मिळणारा अवलंबक ह्या पद्धतीनें त्या त्या रसांच्या उत्पत्तीस साधनभूत होतो. तेव्हां ह्या रसांचें जनन व तत्परिणाम हीं आ.

मच्या अन्नपरिपाचित रसधातूंवर अवलंबून आहेत. आतां येथें हेंही लक्ष्यांत ठेविलें पाहिजे कीं, या रसविद्रावणजनित· अन्नपरिपाकावर रसधातु व अवलंकसामर्थ्य हीं अवलंबून आहेत. ह्मणजे " श्लेष्माशेषेषु तेनैकमाश्रयाश्रयिणं मिथः " या वाक्यांत असलेली ही परस्परांची सांगड विचारानें स्पष्ट होते.

या रसांनीं खाल्लेल्या अन्नाचें विद्रावण घडण्याचीं कारणें २ दोन आहेत. एक तर त्या त्या रसांतील रसमानत्व अर्थात् द्रवरूपत्व. व दुसरें त्यांतील क्षार (आसिडतत्व—तेजोभूतद्रव्य). आतां हें सर्वांस माहीत आहे कीं, नुसत्या क्षारांनीं विद्रावणशक्ति येत नसते. तर त्याचा क्षारधर्म अनुभूत होण्यास नेहमीं प्रमाणद्रवाची आवश्यकता असते. हा जो असा प्रमाणद्रव कोष्टस्थ रसांतून आहे तोच आमचा क्लेदक श्लेष्मा होय. यांत न्यूनत्व किंवा वैपुल्य झाल्यास किंवा अन्य रीतीनें बिघाड होऊन त्यांतील क्षारधारणशक्ति नष्ट झाल्यास हा क्लेदक निरुपयोगी होणार हें उघड आहे. ह्मणजे असा हा विकृत क्लेदक समान व पाचकपित्त यांच्या कार्यास विघातक बनतो. तेव्हां यांचीं कार्यें सुरळितपणें चालणें बंद होतें. अर्थात् पूर्ववत् अन्नद्रावण व त्याच्या पुढील अन्नपचन ह्या दोन्ही गोष्टी चालेनातशा होतात. तसेंच त्याच्या विकृतपणांतून घडतें असें सांगितलें ही आहे—" नान्नद्रावणं कुर्यात् न पाचयति क्लेदकः "

ह्मणजे विकृतक्लेदक समान वायु व पाचकपित्त यांच्या कृतींस अडथळा आणून त्यांस विकृत बनवितो. एकंदरींत त्रिदोषकोपजन्य अग्निमांद्य कायमचें पुढें जडतें. कां तर सामान्यपणें त्रिदोषकोपाचें प्रथम किंवा मुख्य लक्षण अग्निमांद्य हेंच आहे.

पूर्वी पित्तविवरण प्रसंगीं सौर पित्तांत हा श्लेष्मा मिळून कार्यकारी बनतो असें स्पष्ट केलें आहे. तेथें " सौरेण तेजसा पित्ताख्येन पाकाभिर्निवृत्तेन कफेनाल्पेन संपर्कात्पिंगलं भवति सौरं तेजः। तदेवच वातभूयस्त्वान्नीलं भवति " इत्यादि ह्मटलें आहे. त्यावरून पित्तकार्यें वा वातकार्यें उद्भूत होण्यास आवश्यक

काय ? तर हा आमचा क्लेदक. असें स्पष्ट होतें. असो. अशा रीतीनें अन्नरस बनविण्याचे कर्मी याची आवश्यकता ठाम ठरते.

आतां हा क्लेदकश्लेष्मा वृद्धि अथवा न्यूनत्व कशांनीं पावतो. तसेंच त्याच्या विकृतीचीं कारणें कोणतीं हा विचार सामान्यपणें थोडया कमजास्त फेरफारानें कफवृद्धि वगैरे विचारांत मोडत असल्यामुळें त्याच्याकरितां येथें निराळी जागा अडविणें बरें नाहीं.

हा क्लेदक श्लेष्मा बहुतेक स्थानांतून समान असल्यामुळें त्यानें जेव्हां समान आवृत होतो तेव्हां " समानेति हिमांगत्वमस्वेदा मंदवन्हिता " याचा अनुभव येतो. कधीं कधीं यांतील एकेका चिन्हाचा अनुभव येतो. हें निरनिराळ्या रोगप्रकारांखालीं येत असल्यामुळें तेंही येथून गाळून पुढें आपला तृतीय श्लेष्मभेद जो बोधक त्याकडे वळूं.

## बोधक.

अन्नाच्या पांच स्थित्यंतरांपैकीं धातूपरसशोषण, तसेंच धातूपरसपृथक्करण व धातूपरसोत्पादन यांचा विचार अवलंबक प्रकरणीं झाला. कोठयांतील पाकाचा विचार क्लेदक प्रकरणीं झाला. एकूण ४ स्थित्यंतरांचा विचार झाला. आतां अन्न कोठयांत जाण्यापूर्वी त्याच्याशीं घडणारें लालामिश्रण व तत्कालीं घडणारें चर्वण या क्रियांचा विचार चालू प्रकरणांत करावयाचा आहे. कारण आमचा बोधक ह्मणून जो कफविभाग आहे त्याचा ह्या स्थितीशींच पुष्कळ संबंध आहे. ह्या चर्वणावस्थेंत अनेक वेळां जी जिभेची हालचाल घडते, ती अन्नकण ह्या रसांत विद्रुत झाल्यावांचून सुखदायी होत नाहीं.जेव्हां अन्नकण रसविद्रुत होतात

---

१कफ वृद्धि वगैरेंचीं जीं कारणें आहेत तीं सर्व कफास सारखीं लागू असतात. त्यांनीं निरनिराळ्या कफांची कमजास्त वृद्धि वगैरे घडते हें सूक्ष्मभेदानें रोगविचारावरून वाचकांच्या ध्यानीं येईल.

२जे पदार्थ पाण्यांत किंवा मुखरसांत विरघळत नाहींत त्यांत चवीचा कांहीं अनुभव मिळत नाहीं. हें सामान्य मनुष्यांच्या ध्यानीं आणून देखील या रसाचें महत्व ध्यानीं भरवितां येतें,

तेव्हां अन्नरुचिग्राहकत्व जिभेंतल्या ज्ञानतंतूंस येतें. अशा रीतीनें अन्नरुचीच्या ज्ञानास या रसाची आवश्यकता असते,. ह्मणून यास बोधक अशी संज्ञा दिली आहे व यामुळेंच कोणी तर त्यास रसन अशीही संज्ञा देतात. हा कफविभाग जिव्हाप्रदेशीं (ज्या ज्या जागीं जीभ पोंचते तेथें) असल्यामुळें ह्यास "रसनास्थायी" असें ग्रंथकारांनीं ह्मटलें आहे.

हा कफविभाग ह्मणजे आमचा मुखरस (लाळच) असावा. तेव्हां त्याच्या उत्पत्तिप्रकाराविषयीं थोडा विचार करूं. याची उत्पत्ति निरनिराळ्या लालागोलांपासून होते. हे लालागोल निरनिराळ्या स्थलीं आहेत. त्यांत जे कानाजवळ असतात त्यांस अभिश्रोत्रगोल, दाढेच्या पलीकडील खळग्यांत आहेत त्यांस दंष्ट्रागोल ह्मणतात. याप्रमाणेंच जिभेस लागून जे आहेत, त्यांस जिव्हागोल अशी संज्ञा देतां येईल.

कानांच्या खालच्या बाजूस किंवा दाढांच्या मागच्या बाजूस मृदु व सच्छिद्र गोल आहेत. त्यांचा विक्षोभ झाल्यास किंवा गालफुगा रोगांत ते वर येतात. याप्रमाणेंच जिभेच्या खालीं देखील असेच पिंड आहेत. यांची छिद्रें काढून पाहिलीं असतां त्यांना एक स्नायूचा दोर दिसतो. हा दोर चामडीच्या आंत गालामधून तोंडापर्यंत पसरलेला असतो. तो दोर तोडल्यास असें दिसतें कीं, तो दोर नसून त्याच्या आंतून बारीक नळी आहे, व त्या नळीच्या मदरील छिद्राजवळ दोन शाखा होऊन त्यांच्या पुढें पुढें बारीक बारीक शाखा झालेल्या असतात, व प्रत्येक शाखेच्या शेवटीं बारीक गुठळी असते. या सर्व शाखांवरून बहिस्त्वचेचा वेढा असून त्यावरून रक्तवाहिन्यांचें वेष्टण असतें, व स्नायुबंधनांनीं सर्व अवयव एकत्र बांधले जाऊन त्यांचा एकच गोळा झालेला असतो. त्याला श्रीवेंद्रिय–लालागोल ह्मणतात. यालाच संयुक्त नळ ह्मणतात. या गोळ्यांतून तोंडाच्या पोकळीपर्यंत एक लांब नळी आलेली असते, तिला लालानळी ह्मणतात. अशा तऱ्हेच्या लालानळ्यांनीं बनलेले जे गोल कानाच्या पाळीखालीं असतात त्यांस अभिश्रोत्रगोल ह्मणतात, व

दाढांच्या पलीकडील खळग्यांत असतात त्यांस दंष्ट्रागोल म्हणतात. या गोलांचें फुप्फुसांशीं पुष्कळ साम्य आहे. या सर्व गोलांचा, छिद्रांचा व ष्ठीवनादि इंद्रियांचा संबंध रसवाहिनीशीं ( एयोर्ताशीं ) आहे. या एयोर्ताधमनीचा विचार अवलंबक प्रकरणीं झाला आहे. त्यावरून या मुखरसाचें अस्तित्व अवलंबकावर कसें अवलंबून आहे हें पुढें ध्यानीं येईल.

प्रथमतः ही एयोर्ता, व तिचा या लालागोलांशीं असणारा संबंध यांविषयीं विचार करूं. एयोर्ता (रक्ताशयाची मोठी धमनी) ही हृदयाच्या डाव्या खांचेतून निघते. ती मानेच्या मुळापर्यंत वर चढून गेल्यावर मागें जाऊन नंतर खालीं वांकून कमानदार झालेली आहे. हीच पोटाच्या समोरून खालीं दोन भागांनीं अधःशाखांतून उतरली आहे. हिच्यांतून कित्येक शाखा निघून त्या ऊर्ध्व-शाखा व डोकें यांतून गेल्या आहेत. आणि त्यांच्यांतूनही आरंभापासून तर शेवटापर्यंत असंख्य लहान लहान अति सूक्ष्म फांटे त्यांच्या लगतच्या भागांतून पसरले आहेत. तेव्हां सर्व लालागोल, मुखछिद्रें, व ष्ठीवनादि इंद्रियें यांचा संबंध एयोर्ताशीं आहे. व त्यांचें अस्तित्व व कार्यकर्तृत्व तिच्यांत प्रमुखत्वानें असणाऱ्या अवलंबकावर आहे.

हा मुखरस जेव्हां कफविकारी कारणांनीं कुपित होतो तेव्हां मुखमाधुर्य, मुखलेप, मुखप्रसेक, घोगरा आवाज इत्यादि रोग होतात. यांत मुखमाधुर्य होतें तेव्हां तर त्या रोग्याच्या तोंडाची चव जाते. जिभेस तिखट घांसलें तरी बोध होत नाहीं. असाच प्रकार सर्प वगैरेंचें विष आंगांत भिनल्यावर लालाप्रसेक वडून होतो. म्हणजे या बोधकाच्या विकृतीनें तिक्ताम्लादि रसानुभव घडत नाहीं. असें सांगितलेंही आहे “ बोधको न जनयेद्ज्ञानं रसानां रसनास्थितः ” लालास्रावातिस्रावौ वा लालादोषांश्च कारयेत् ॥

हा लालास्रावी असल्यामुळें उरःस्थ अंतरिंद्रिय व्यापार चांगला चालण्यास याची मदत होते. आपल्या छातीच्या बहुतेक अवयवांतून ( फुप्फुसें, श्वास-

नलिका वगैरेंतून ) पसरलेली जी म्युकस मेंब्रेन ( श्लेष्मल ) त्वचा तिच्यांतून त्या त्या अवयवांतून टाकाऊ स्निग्ध, रसात्मक भाग संचित झाल्यावर, या बोधक श्लेष्म्याच्या मदतीनेंच त्या मार्गांतील वायु किंवा तद्विशिष्ट जोरदार स्नायु त्यास बाहेर टाकितात. तेव्हां बोधकांतील द्रवत्वाचा हाही मोठा उपयोग आहे ह्मणावयाचा. याकरितांच कोरड्या खोकल्यांतून चिकित्सकांस आपल्या चिकित्सेची बहुतेक मदार यावर अवलंबून ठेवावी लागते.

असो. बोधकाचें स्वरूप व कार्य वगैरेंविषयीं तात्पुरती माहिती दिली. पुढें क्रमप्राप्त तर्पकाविषयीं विचार करूं.

## तर्पक.

एव्हांपर्यंत सामान्यपणें कफ व त्याचा मुख्यभेद अवलंबक यांचा विचार होऊन पुढें तदनुरोधानें असणाऱ्या क्लेदकाचा विचार झाला. नंतर त्याच्या वरील भागांतून ( तोंडांतून ) असणाऱ्या बोधकाचा विचार झाला. आतां येथें शिरःस्थानीं असणाऱ्या रसमानद्रवांचा विचार करावयाचा आहे. शिरःस्थायी जो रसविभाग त्यास तर्पकश्लेष्मा ह्मणतात. ह्याच्या योगानें नेत्रास गारवा वगैरे मिळतो. असेंच वाग्भटांत सांगितलें आहे:—शिरःसंस्थोऽक्षतर्पणात् । तर्पकः—पूर्वी आलोचक पित्त प्रकरणांत नेत्रांतून कांहीं विशेष जी तैजस शक्ति तिचा विचार झाला. येथें ती नेत्रस्थ तेजोग्राहकता सम प्रमाणांत व सुखावह होण्यास जे निरनिराळे रससंचय त्यांचा विचार कर्तव्य आहे. ह्या रसांतील कांहीं तर जलवत्, काचवत, व कांहीं स्फटिकवत् अशा निरनिराळ्या रसांचीं पटलें निरनिराळ्या स्थलीं आहेत.

ह्या रसांच्या योगानें हाडाच्या घरांत बसविलेला डोळा आपल्या ठिकाणांत फिरण्यास जशी मदत होते, तशीच तेजःकिरणसंचारास व त्यांचा नेत्रांतील ज्ञानतंतूंवर सुखावह परिणाम होण्यास फार मदत होते. हें नेत्रस्थ रसांची रचना व किरणवक्रीभवनादि संस्कार यांनीं सप्रमाण ठरतें. अशारीतीनें नेत्रव्यापारांस सुखदायी होणाऱ्या व सुलभत्व आणणाऱ्या रससमूहास तर्पक ही संज्ञा अन्वर्थक आहे असें ठरतें.

या रसांत विकृति अथवा हीनत्व वगैरे आल्यानें त्यांचे व्यापार मंदावतात. अशा वेळीं या रसांच्या सम्यक् प्रमाणाकरितां तर्पणादि क्रियांची आवश्यकता आहे हें नेत्ररोग चिकित्सेवरून ध्यानीं येतें. असो. तेव्हां "अक्षतर्पणात् तर्पकः" । या वाक्याचा सारतः विचार झाला. आतां याच तर्पकाचें वास्तव्य शिरःस्थानीं आहे ह्मणून ह्मटलें आहे (शिरःसंस्थोऽक्षतर्पणात्) त्याकडे थोडेंसें वळूं.

मागें अवलंबक व बोधक वर्णनांतून एयोर्ता नामक रसवाहिनींच्या ऊर्ध्व शाखा डोकें, मान, वगैरेंतून पसरल्या आहेत हें सांगितलें आहे. ह्यांच्या योगानें या शिरःस्थ तर्पकाचें अस्तित्व असतें. पण येथें हेंही सांगितलेंच पाहिजे कीं, शरीरांत जशी इतरत्र रसवाहिन्यांची व्यवस्था आहे तशी मस्तकांतून नाहीं. तसेंच मेंदूंतील रसरासितपणांतील द्रव्यें व अवलंबकादि द्रव यांतून द्रवत्वासंबंधानें साम्य असलें तरी पूर्णत्वानें ऐक्य नाहीं. याकरितांच या मेंदुस्थानीं असणाऱ्या द्रवास इतर रसांतून निराळें काढून ज्ञानरस अशी संज्ञा दिली आहे. यांच्या योगानें ज्ञानवहनास मदत होते. एकूण तर्पकाचा जसा नेत्रकार्यास उपयोग आहे तद्वत् बुद्ध्यादिकांच्या अस्तित्वासही उपयोग आहे; ह्मणजे पूर्वी प्राणवायुभेदांत कळविल्याप्रमाणें वायुलहरींचें स्पष्टत्वानें चलन घडण्यास या रसाची आवश्यकता असते.

ज्याप्रमाणें जलार्द्र धाग्याचा ओलावा कमी झाल्याबरोबर त्यांतून घडणारें विद्युद्वहन बंद होतें, तद्वत् या रसाचें प्रमाण कमी वगैरे झाल्यास मस्तिष्क आपल्या कर्तव्यास मुकतो—ज्ञानक्रिया मंदावते,–अर्थात् भ्रमादि विकार होतात. शिरोरोगाच्या अनंत पीडा जडतात, आपल्यांत ज्या शिरोरोगाच्या वातात्मक किंवा पित्तात्मक पीडा सांगितल्या आहेत त्या सर्व अशा वेळीं घडतात. असेंच सांगितलें आहे "तर्पणोऽस्नेहनं कुर्याच्छिरः शुष्कं भ्रमं तथा । नेत्ररोगांच्छिरस्तापं शिरोरोगाच्छिरोग्रहम्" या सर्व गोष्टी या रसाच्या कमतरतेंत घडतात, ह्मणून

अशा वेळीं निरनिराळ्या तर्पणादि क्रिया वृद्धीकरितां किंवा समावस्थेकरित सांगितल्या असतात. बहुधां मस्तक या रसानें पूर्ण असतां ज्ञानक्रिया सम्यक् स्थितींत असतात. हा रसपूर्णतेचा प्रकार योग्याच्या "नेति" क्रियेंत घडतो. त्याची सत्यता विचारी वाचकांस अनुभवांतीं समजेल. (यांत नाकानें पाणी घेतल्यावर त्याचा वहनमार्ग मेंदूद्वारा गलरध्रापर्यंत घडल्यामुळें पाण्याच्या आंगच्या स्वाभाविक अशा स्नेहत्व, शीतत्वादि गुणांचा तेथें अनुभव घडतो. तसेंच त्या मार्गांतील फाजील कफसंचय नाहींसा झाल्यामुळें नाड्या शुद्ध होतात. व अशा रीतीनें अवलंबकादिकांच्या शुद्धीनें एकंदर कार्यें सुरळीतपणें घडण्यास मदत होते.) ह्या तर्पकाचे साह्यानें जशी नेत्रेंद्रियांस मदत होते, तशीच कर्णेंद्रियास होत असावी. कर्णेंद्रियाच्या विवरांतून जे निरनिराळे रस आहेत त्यांचा चिरस्थायीपणा असण्यास तर्पकाचें साह्य लागत असावें. याच रसांच्या अनुकूलतेनें कर्णांतील मज्जातंतूंत ज्ञानग्राहकत्व येतें.

जागरण, अतिश्रम, वगैरे ज्या ज्या कारणांनीं नेत्रांस पीडा वगैरे होते त्या त्या कारणांनीं तर्पणाचें शोषण अगोदर होत असतें. तसेंच साधारणपणें कफक्षयाचीं जीं कारणें आहेत त्यांनीं देखील या तर्पणाच्या शोषणावर बराच लवकर परिणाम घडतो. यामुळेंच चिकित्सकांस तृप्तिपुष्टीचें साधन जो अवलंबक त्याच्यापेक्षां ह्याजकडे कांहीं रोगांतून जास्त लक्ष द्यावें लागतें.

## ५ संधिक.

श्लेष्मा स्थिरत्वास्निग्धत्वसंधिबंधक्षमादिभिः ।
अनुगृह्णात्यविकृतं सदा देहं च देहिनः ॥

शुद्ध श्लेष्मा स्थिरता, स्निग्धता, संधिबंधन इ० राखून देहपालक होतो. अशा पद्धतीनें देहपालक बनणारा श्लेष्मा पूर्वीं सांगितल्याप्रमाणें अप्-तत्वापासून मिळतो. अप् तत्वापासून देहास स्नेह-क्लेदादि गुणांचा लाभ होतो म्हणून सांगितलेंच आहे. तेव्हां येथें श्लेषक (स्नेहन) कफाचा विचार

करावयाचा ह्मणजे पाण्यांतील बुळबुळीतपणा जो त्याचा विचार करावयाचा आहे.

पाण्यांत बुळबुळितपणा दोन प्रकारानीं येतो. एक तर तें स्वतःच घर्षण-रोधक आहे. दुसऱ्या प्रकारानें पाहिलें तर तें अन्नरसांतील स्नेहादि पदार्थास त्यांतून बाहेर पाडण्यास साधनीभूत आहे. आतां यांत प्रथम प्रकाराचें जास्त स्पष्टीकरण करावयाचें ह्मणजे "पाण्याचे परमाणु अति गुळगुळीत आहेत" असें सांगत बसावयाचें. पण ह्याचा प्रत्येकास सहज अनुभव मिळणें शक्य आहे. तेव्हां त्यांत काळ न मोडतां दुसऱ्याविषयीं अनुभवदृष्टीनें विचार करूं: — कोणत्याही स्निग्ध पदार्थांतून तेल बाहेर काढणें झाल्यास त्या त्या पदार्थास अगोदर पाण्याचा संस्कार द्यावा लागतो. तेव्हां त्या त्या पदार्थांची पेंड धरून स्निग्ध पदार्थ बाहेर पडतो. तेव्हां अशा रीतीनें अन्नरसांतून हा आपला "स्नेहन" कफ बाहेर पडण्यास कारण त्या रसांतील पाणी असावें असेंही अनुमानानें ग्राह्य वाटतें. अशा रीतीनें तरी ह्या संधिस्थायी श्लेष्म्याचा पाण्याशीं संबंध मानणें भाग पडतें.

गतीच्या सुलभतेकरितां स्निग्ध द्रवाची आवश्यकता असते, हें साधारणपणें गतिविशिष्ट चक्रें वगैऱ्यांच्या स्थितीवरून अनुभवसिद्ध आहे. आपल्या शरीरांत जीवन असेपर्यंत कित्येक अवयवांची सारखी हालचाल घडत असते हें इंद्रियांच्या व्यापाराकडे लक्ष गेल्यास प्रत्येकाच्या ध्यानीं येईल. आतां अवयवांची अशी हालचाल नेहमीं होत असतांही त्यांच्या त्यांच्या संधिस्थानीं आपणास बिलकुल त्रास वाटत नाहीं, याचें कारण काय ? हें देखील मनांत येणें शक्य आहे. व त्यावरूनच संधिस्थलीं असा स्निग्ध पदार्थ विपुल असतो हें अनुमान ग्राह्य वाटतें. याप्रमाणेंच शस्त्रप्रयोग करीत असतां विद्वानांस अनुभवही मिळतो. तेव्हां असा जो हा स्निग्धपदार्थ हरएक संधींतून आहे, यासच आपण संधिक किंवा स्नेहन कफ ह्मणूं.

आपल्या शरीरांत शिरा, स्नायु, अस्थिपर्वें व मांसपेशी वगैरेंचे नाना

संधि त्याहेत. व हे सर्व संधि मांसपेशींतून आच्छादिलेले आहेत. ह्मटलेंच आहे कीं, " शिरास्नाय्वस्थिपर्वाणि संधयश्च शरीरिणां । पेशिभिःसंवृतान्यत्र बलवंती भवत्यतः ॥ " तसेंच आणखी पेशीविषयीं सांगितलें आहे कीं:— " बहुलपेलवस्थूलाणुपृथुवृत्तऱ्हस्वदीर्घस्थिरमृदुश्लक्ष्ण कर्कशभावा संध्यस्थि-शिरास्नायुप्रच्छादका भवंति ।

तेव्हां आमच्या ह्या श्लेषकाची विशेष व्याप्ति ह्या विचारसरणीनें पेशींतून आहे असें ठरतें. व ही याची व्याप्ति पेशींच्या परस्पर संबंधानें व केशाकर्ष-णानें देहभर आहे असेंही सूक्ष्म विचाराअंतीं ध्यानांत येतें. या स्निग्ध पेशीं-च्या साह्यानें व वेष्टणानें सर्व संधींचें सुखानें चलन घडतें. तसेंच पेशीगत कफविभागानें त्या त्या पेशींस स्निग्धपणा, पुष्टि वगैरे मिळून देहही तुष्ट पुष्ट होतो.

शिरा, स्नायु, अस्थि ह्यांच्या संधींपैकीं नुसत्या अस्थि संधींचे ९ प्रकार आहेत. ते:—" कोरोलूखलसामुद्गप्रतरातुन्न सेवनी । वायसतुंड मंडल शंखावर्ताः ।

ह्यांचें साग्र वर्णन शारीरकांतून आहे, तें जिज्ञासु ध्यानीं घेतील अशी आशा आहे. एकंदर ह्या अस्थिसंधींत दोन प्रकार आहेत ( १ ) अचल व ( २ ) चल. अशा ह्या दोहोंत कमीजास्त श्लेषकाची व्याप्ति आहे. ह्या अस्थिसंधींपैकीं शाखागत संधि ६८ आहेत, नुसत्या धडांत ५९ आहेत, व मानेवर ६१ आहेत, मिळून एकंदर हे संधि २०० आहेत, असें

१ पेशीस्वरूप—मांसावयवसंघातः परस्पर विभक्तः पेशीत्युच्यते=कातळे.

( २ ) कोर संधि—बोटें, मनगट, जानु, कोंपर वगैरे स्थळीं आहेत. ( २ ) उलूखलसंधि—कक्षा, वक्षण. दंतसंधि वगैरे. ( ३ ) सामुद्गसंधि—स्कंद, पीठ, गुद, मृग, नितंब ( ४ ) प्रतरसंधि—गीवा, पृष्टवंश, ( ५ ) तुन्नसेवनी संधि—शीर, कटि कपालास्थिसंधि ( ६ ) वायसतुंडसंधि—हनुवटी ( ७ ) मंडल, नेत्र, कंठ, हृदय वगैरे स्थळीं आहेत ( ८ ) शंख—कर्ण, ( ९ ) आवर्त संधि—शृंगाटक

शास्त्रसिद्ध आहे. तेव्हां या एकंदर संधींच्या मजबुतीकरितां व चलनाच्या सोईकरितां ह्या स्नेहनाचें किती मोठें प्रमाण शरीरांत असलें पाहिजे तें विचारी जनांस समजेल.

अस्थिसंधींविषयीं माहिती सांगून झाल्यावर स्नायुशिरा वगैरेंच्या संधींविषयीं थोडक्यांत ग्रंथकारांनीं सांगितलें आहे कीं:—" अस्थ्नां तु संधयो ह्येते केवला: परिकीर्तित: । पेशीस्नायुशिराणां तु संधिसंख्या न विद्यते "

तेव्हां अशा अगणित शिरास्नायुसंधिस्थलीं ह्या कफाच्या व्याप्तीचें केवढें मोठें प्रमाण असलें पाहिजे हें वाचकांच्या ध्यानीं येईल. एकूण एकंदर संधिस्थलीं ह्या कफाची व्याप्ति किती मोठी आहे. व त्याची आवश्यकता कशी आहे तें विचारी जनांस समजेल.

संधिस्थानें हीं समान्यपणें मर्मांत गणिलीं जातात. कारण " मांसशिरा स्नाय्वस्थिसंधिभिर्मर्माणि पंचात्मकानि " असें सांगितलें आहे. तेव्हां जर कां या स्थलांतून या कफाचें प्रमाण कमी झालें तर मनुष्य विकळ वगैरे होणें शक्य आहे.

तसेंच ह्या वेळीं संधिस्थलांतून वात वाढतो. कारण "कफक्षये वातविवर्द्धनं" अर्थात् संधिशोष घडतो. कधीं कधीं तर गतिनाश होतो.अशावेळीं कधीं कधीं संधिवात व्याधि जडतो. "श्लेषक: संधिशोषंतु गतिनाशंच वेदना " वातवृद्धीनें ज्या कळा लागतात त्याच ह्यांत सांगितलेल्या वेदना होत. शिरास्नायु संधिस्थानांतून कफकार्य प्रकट होण्यास साधन जो हा स्नेहन कफ त्याचीं तेथील मुख्य कार्यें " स्नेहगंधेषु संधीनां स्थैर्यं बलमुदीर्णतां । करोत्यन्यान् गुणांश्चापि बलास:स्वाशिराश्वरन् । अशीं सांगितलीं आहेत एकूण संधिस्थैर्य व बल वगैरे गोष्टी ह्या शिरास्थायी कफानें मिळतात. हाच शिरांतून राहून पेशी स्नायु शिरा, अस्थि वगैरेंस मजबुती आणितो. वृद्धावस्थेंत जेव्हां याचें प्रमाण कमी होऊन वात वाढतो तेव्हां गात्रें शिथिल बनून कांपरें सुटणें वगैरे लक्षणें होतात. झालें. स्नेहनाविषयीं आवश्यक अशी त्रोटक माहिती दिली गेली.

# २१ खुरासानी ओंवा.

**संस्कृत**—यवानी, पारसीकयवानी, यावनी, खुरसानी, खोरासानी यवानी, तीव्रा, तुरुष्का, मदकारिणी, दीप्य, श्याम, कुबेराख्य, मादक, मदकारक, अजगंधा, अजगंधिका, जंतुविनाशक, करभ, कृमिघ्ना, खरपुष्पा, गंधा, सुगंधा, बर्हि, बर्हिण. **गु०** खुरासानी अजमा. **हिं०** खुरासानी अजवायन. **बं०** खुराशानी योयान्. **तै** खुरसाणवामु. **ता०** खोरसनी ओनाम, शिड्डामुट्टि. **फा०** बंग. **अ०** बजरुलबंज, अवीद शीकरान्. **इं** Hen bane हेन् बेन्. **ला.** Hyoscyamus niger and H. Albus. हायोसायमस नायगर.

**वर्णन**--युरोप व मध्य एशिया खंडांत खुरासानी ओंव्याचीं लहान लहान झुडपें जंगलांतून व उकिरडयावर आपोआप उगवलेलीं असतात. हीं बहुशः द्विवार्षिक असतात. हल्लीं सहारनपुराजवळील व जुन्नराजवळ हिवरा येथील सरकारी बागेंत आणि आग्रा व अजमीराच्या आसपास मुद्दाम बीं पेरून या झुडपांची लागवड केली जाते. खुरासानी ओंव्याच्या झाडांचीं मुळें तंतुमय असतात. दांडा गोल, काष्ठमय व शाखायुक्त असतो. पानें मोठीं, लांब रुंद असून त्यांच्या किनारीस धोत्र्याच्या पानाप्रमाणें अनियमित व खोलगट खांचे असतात. पानांचा दांडा लांकडाप्रमाणें टणक असतो. पाने वृक्ष दंडाला चिकटून येतात. त्यांस देंठ नसतो. झाडाच्या शेंडयास फुलांचे झुबके लागतात. फुलें आकारानें तंबाकूच्या फुलांप्रमाणें व पिंवळया रंगाची पांच पांखडयांचीं असतात. व त्यांवर जांभळ्या रंगाच्या शिरा असतात. फळ अंडाकार बोंडासारखें असतें. त्यास दोन घरें असतात व या घरांतून पिंगट रंगाचें बारीक बीं असतें.

खुरासानी ओंव्याचीं झाडें युरोपखंडांत पोर्तुगाल, ग्रीस, मध्यनॉर्वे व फिनलंडमध्यें, मिसर देशांत, कॉकेशस पर्वतावर; आणि पर्शिया, सैबिरिया व अलीकडे लागवड केल्यामुळें उत्तर अमेरिका व ब्राझिल प्रांतांत सांपडतात. याच्या तीन जाति बलुचिस्थानांत सांपडतात. त्यांपैकीं २ द्विवार्षिकी

व एक वर्षायु आहे. वर्षायु जाति आपोआप उगवलेली आढळते, परंतु ती द्विवार्षिकीइतकी औषधीकल्प तयार करण्यास उपयोगी पडत नाहीं. कारण तींत तीव्र रस उत्पन्न होत नाहीं.

पारसीक, खुरासानी, तुरुष्क, यावनी हीं नांवें इराण, खुरासान, वगैरे प्रदेशांत हीं झुडपें अतोनात होतात असें दर्शवितात. आणि यावरूनच कित्येक लोक असें अनुमान काढितात कीं हा वृक्ष मूळचा परदेशीय आहे, प्राचीन काळच्या आर्यवैद्यांस तो माहित नव्हता व अलीकडे एक दोन शतकांत झालेल्या वैद्यांनीं त्याचा उपयोग अरबी हकीमांपासून समजून घेतला. परंतु हें अनुमान चतुरस्त्र नाहीं. कारण जशीं पारसीक, यावनी इत्यादिक देशांतरबोधक नांवें संस्कृतांत आहेत, त्याचप्रमाणें तीव्रा, मदकारिणी, कृमिघ्नी इत्यादि त्याचीं गुणद्योतक नांवें संस्कृतांत आहेत. 'कोहि—बंग' असें जें याचें पार्शी भाषेंतील नांव आहे त्याचा अर्थ 'पर्वतावरील भांग' असा होतो. त्याप्रमाणें ती हिमालयावर व बलुचिस्थानांतील पर्वतांवर अद्याप आढळते. शिवाय खुरासानी ओंवा तरी ओंव्याच्या अनेक जातींपैकींच एक जात आहे. इतर जातींचा ओंवा जर हिंदुस्थानांत होऊं शकतो व त्यांचा उल्लेख चरकासारख्या प्राचीन ग्रंथांत आढळतो तर हीच एक जात हिंदुस्थानांतील कोणत्याही प्रदेशांत होत नव्हती हें संभवत नाहीं. हिंदुस्थानच्या जमिनींत अमुक एक वनस्पति किंवा तिची अमुक एक जात उत्पन्न करण्याची पात्रता नाहीं असें मुळींच ह्मणतां यावयाचें नाहीं. हिंदुस्थानच्या जमिनींत हा लोकोत्तर चमत्कार आहे कीं, द्वीपान्तरीय ह्मणून जीं कित्येक झाडें लोक येथें आणून लावतात तीं बहुतकरून मूळ देशांतील झाडांपेक्षांही पुष्ट व प्रचंड होतात. ही शक्ति जगांतील कोणत्याही देशाच्या जमिनींत नाहीं. ह्मणूनच या देशास पुण्यभूमि असें ह्मणतात. सारांश, एखाद्या वनस्पतीच्या देशान्तरीय नांवावरून अथवा तिचा स्पष्ट उल्लेख एखाद्या वैद्यक ग्रंथांत न आढळल्यावरून ती वनस्पति हिंदुस्थानांतील नव्हे असें अनुमान काढणें समंजसपणाचें नाहीं. पर्वतराज हिमालय असंख्य दिव्य वनस्पतींनीं भरलेला आहे. त्याचा पुरता शोध कोणींही लावलेला नाहीं.

अशा स्थितींत कोणतीही वनस्पति हिंदुस्थानांत नव्हती किंवा नाहीं हें ह्मणणें युक्तियुक्त नाहीं. हां, ही गोष्ट कबूल करतां येईल कीं इराण, खुरासान वगैरे प्रदेशांत खुरासानी ओंव्याची उत्पत्ति, व्यापार किंवा उपयोग अधिक प्रमाणांत होत असेल किंवा कांहीं विशेष कारणांवरून या जिनसांसंबंधीं ते देश विशेष प्रसिद्धीस आले असतील.

खुरासानी ओंव्याचें झाड धोतरा, तंबाकू इत्यादिकांच्या जातीचें असून फार तीव्र विषारी आहे. डाक्टर लोकांनीं याच्या पानांची व बियांची परीक्षा व शोध अनेक प्रकारें केला आहे. आणि ते यापासून अनेक औषधें बनवितात. खुरासानी ओंव्याच्या झाडापासून निष्कर्ष व मद्यार्क ( टिंक्चर ) तयार करतात. त्यापैकीं निष्कर्ष काढण्यासाठीं पानांचा व फुलांच्या तुऱ्यांचा उपयोग करतात. वर्षायु रोप्यापेक्षां द्विवार्षिक रोप्यापासून हायोसायमिन नांवाचें सत्व अधिक निघतें असें रसायनशास्त्रज्ञांनीं प्रयोग करून ठरविलें आहे. खुरासानी ओंव्याच्या माडयांतून एक स्फटिकरूपी सत्व निघतें. त्यास 'हायोसायमिन' हें नांव दिलें आहे. त्याचेंच पृथक्करण केलें ह्मणजे त्यांतून 'हायोसीन' नांवाचें उडणारें तेल व अम्लधर्मी सत्व निघतें. उडणारें तेल फार तीव्र गुणाचें व पीडाशामक आहे. हें 'हायोसायमीन' पेक्षां पांचपट तीव्र आहे. ह्मणून जपून वापरलें पाहिजे. खुरासानी ओंव्याच्या पानांपेक्षां बियांत औषधी तीव्रता जास्त आहे. बीं मादक, व्यवायी व पीडाशामक आहे. त्याच्या सत्वांत हे गुण बियांपेक्षां अधिक प्रमाणानें आहेत. वातोन्माद ह्मणजे वेड, खंजवायु, कंपवायु, अपस्मारजन्य वायु या रोगांवर हायोसायमिन सत्व फारच चांगलें चालतें. हें सत्व ' ग्लिसरीन ' वाफेच्या पाण्याबरोबर मिसळून त्यांत अल्प प्रमाणानें त्याच्या द्रावणाला बुरी येऊं नये ह्मणून ' कार्बोलिक ' अम्मल हें त्या मिश्रणांत घालून मिश्रणाचे चार थेंब डॉक्टर लोक पिचकारीनें त्वचेमध्यें घुसवून देतात. सत्व देण्याचें प्रमाण फारच सूक्ष्म आहे. एक ग्रेनच्या शतांशापासून एक ग्रेनच्या पन्नासांशपर्यंत देणें ' हायोसायमीन' सत्व '

अल्कली (alkaloid) प्रकृतीचें आहे. त्याचे स्फटिक बनतात. आरंभीं हें सत्व खुरासानी ओंव्यांतूनच काढीत असत. परंतु हल्लीं Scopolia स्कोपोलिया, जातीच्या वनस्पतिपासूनही जर्मन रसायनज्ञ काढतात. हें धोतऱ्यांतही आहे असें ते ह्मणतात.

खुरासानी ओंवा १/२ ड्राम, १ ड्राम पोस्त, मध व पाण्याबरोबर घेतल्यानें सर्दी, वायु वगैरे रोग बरे होतात. बीं वाटून घेतलें असतां गुंगी येते. खुरासानी ओंव्याची क्रिया अफू व डॉक्टरांचें बेलाडोना नामक औषध या दोहोंच्या क्रियेच्या मध्यवर्ती आहे. खुरासानी ओंव्याच्या पानांपासून काढलेल्या मद्यार्काचा उपयोग लघ्वीची आग कमी करण्याकरितां देतात. झोंप येत नसली ह्मणजे ती आणण्याकरितां व मानसिक भ्रम झाला असतां खुरासानी ओंव्याच्या पानांचा अर्क चांगला उपयोगी पडतो. देण्याचें प्रमाण अर्ध्या ड्रामापासून एक ड्राम ( साठ थेंब ) पर्यंत आहे 'हायोसायमिन' सत्व देण्याचें प्रमाण फार अल्प ह्मणजे १/६० पासून १/८ ग्रेन आहे. वेड लागलेल्या मनुष्यास रात्रीच्या वेळीं या सत्वाचा पाण्यांत द्राव तयार करून त्याची पिचकारी द्यावी. युनानी हकीम खुरासानी ओंव्याचें बीं पातळ डामराबरोबर मिसळून त्यांत कापूस भिजवून दंतशूळावर लावितात. अथवा तें बिरोज्याच्या तेलाबरोबर मिसळून त्यांत कापूस भिजवून तो दांतांच्या फटींत ठेवितात, त्यानें शूळ बरा होतो. याच्या अर्काचा एक थेंब डोळ्यासभोंवतीं लावला असतां डोळे दुखणें बंद होतें. डोळ्यांतील बाहुली फैलावली असतां तिच्यावरही याच्या अर्काचा चांगला उपयोग होतो. याच्या पानांचा रस किंवा अर्क जवांच्या पिठांत मिळवून त्याचें पोटीस बांधल्यानें शूळ व दाह बंद होतो. खुरासानी ओंव्याचें बीं घोडीच्या दुधांत वाटून ह्मशीच्या कातड्यावर लेप करून तें गर्भार बायकोनें पोटावर बांधलें असतां गर्भ नाहींसा होतो अशी आल्या कावुलांत आजपर्यंत चालत आली आहे. यावरून खुरासानी ओंव्याच्या तीव्रतेची कल्पना करितां येते. यापासून बनणारीं औषधें

( मद्यार्क-सत्व वगैरे ) तयार करण्याकडे हिंदुस्थानांतील लोक विशेष लक्ष्य देत नसल्यामुळें त्यांची आयात युरोपाकडून पुष्कळ होते.

## २२ शतावरी.

**संस्कृत**—शतावरी, शतपदी, पीवरी, इंदीवरी, वरा, वृष्या, दिव्या, द्वीपशत्रु, द्वीपिका, अधरकंठिका, सूक्ष्मपत्रा, सुपुत्रा, बहुमूला, शताव्हया, नारायणी, स्वादुरसा, शताव्हा, लघुपर्णिका, आत्मशक्ति, जयमूला, शतवीर्या, महोदनी, मधुरा, शतमूला, केशिका, शतपत्रिका, विश्वाख्या, वैष्णवी, कार्ष्णि, वासुदेवी, वरीयसी, दुर्भरा, तैज ( ल ) वल्ली, बहुपत्री, भीरु, बहुसुता, अहेरु, अभीरु, अभीरुपत्री, महापुरुषदन्ता, रङ्गिणी, काञ्चनकारिणी, मदभञ्जिनी, शतपदी, आत्मगुप्ता, जटा, मूला, दुर्मना, वासुदेवप्रियंकरी, विश्वस्था. **महाशतावरी**—वीरा, तुंगिनी, बहुपत्रिका, सहस्त्रवीर्या, सुरसा, महापुरुषदान्तिका, ऊर्ध्वकंदा, महावीर्या, फणिजिव्हा, महाशना, ऊर्ध्वकण्ठी, हेतु, महोदरी, अहिजिव्हकसंज्ञा, ऋष्यप्रोक्ता. **गु०** शतावरी. **हिं.** सतावर. **बं.** शतमूली **क.** किरिय आसडी. **तै.** चल्ल, चल्लगड्डलु. **फा०** गुर्जेदस्ति. **अ.** शकाकुल मिस्री. **ला.** Asparagus racemosus एस्पेरेगस रेसिमोसस.

**वर्णन**—शतावरीचीं झुडपें वेलीसारखीं असतात. तीं साधारण २।३ फूट उंच वाढतात. हिंदुस्थानांत सर्वत्र होतात. याचीं पानें सुरूच्या किंवा शोपेच्या पानांसारखीं अथवा निराळ्या शब्दांनीं सुताच्या दोऱ्याप्रमाणें बारीक असतात. तीं फांदीच्या मुळापासून शेंड्यापर्यंत दोन्हीं बाजूंस सारखीं येतात. या पानास समुद्राच्या रेतीप्रमाणें खारा वास येतो. तयार लहान, सुवासिक व पांढऱ्या रंगाच्या फुलांचे झुबके येतात. यावर बोरांप्रमाणें लहान लहान फळें येतात. व तीं पिकल्यावर त्यांचा रंग तांबडा होतो. औषधांत याचीं मुळें वापरलीं जातात. एकेका झाडास शंभरपर्यंत मुळें असतात. आणि त्यावरूनच ईस शतमूली, शतपदी, इत्यादि नांवें पडलीं आहेत. पानें केंसाच्या आकारासारखीं. फार बारीक व पुष्कळ असल्यामुळें केशिका, सूक्ष्मपत्रा व बहुपत्रा हीं नांवें पडलीं आहेत. नुस्तीं पानें

पाहिलीं असतां साधारण शेपेसारखा भास होतो ह्मणूनच शताव्हा हें नांव पडलें असावें असें वाटतें. ज्याप्रमाणें चवरींत दांडयाकडे पुष्कळशा केंसाच्या लटा एकत्र बांधलेल्या असून पुढें टोंकाकडे त्या पसरलेल्या असतात, त्याचप्रमाणें खालीं पुष्कळशीं मुळें पसरलेलीं असून शेंड्याकडे तीं सर्व एकवटलेलीं असतात. या आकारसादृश्यावरूनच कोंकणांत शतावरीस ' सिताचवरी ' ह्मणूं लागले असावे असें वाटतें. सुताच्या पुष्कळशा चाव्या एके ठिकाणीं बांधून ठेविल्या असतां त्या जशा दिसतात तशाच प्रकारचा शतावरीच्या मुळ्यांचा झुबका दिसतो मुळ्यांवर फिकट तांबूस पिंवळट रंगाची पातळ साल असते. ती काढली असतां आंत शुभ्र रंगाचा गाभा असतो. व त्याच्या आंत मधोमध एक टणक दोरा असतो. मुळ्यांतील गाभा खावयास गोड लागतो.

**गुणदोष व औषधिप्रयोग**--व. गु. ५ व्या भागांत विस्तारानें दिले आहेत. त्याशिवाय आणखी कांहीं येथें देतों. **शतावरीघृत**—चार शेर शतावरीच्या गाभ्याचा कल्क, आणि एक मण दूध मिळवून चार शेर तूप सिद्ध करावें. आणि त्यांत साखर, मध आणि पिंपळी मिळवून सेवन करावें. हें वीर्यवर्धक, पौष्टिक, अम्लपित्तनाशक, व इतर पित्तविकारादिकांवर उत्कृष्ट गुणदायक आहे. **फलघृत**—शतावरीचा रस १६ शेर, सवत्स गाईचें दूध १६ शेर आणि मेदा, मञ्जिष्ठ, ज्येष्ठमध, कोष्ट, त्रिफळा, चिकणा, पांढरा भुइकोहळा, काकोली, क्षीरकाकोली, अस्कंध, ओंवा, हळद, दारुहळद, हिंग, कुटकी, निळीं कमळें, द्राक्षें, चंदन व रक्त [illegible]दन या औषधांचा प्रत्येकीं दोन दोन तोळे कल्क मिळवून, यांनीं सवत्स गाईच्या दुधाचें ४ शेर तूप सिद्ध करावें. हें उत्कृष्ट प्रकारचें वृष्य, स्त्रि[illegible]च्या योनिरोगांवर व उन्मादावर ( हिस्टिरिया ) रामबाण व त्यांचा वंध्यात्व दोष नाहींसा करणारें आहे. **शतावर्यादि क्वाथ,** पैत्तिक मूत्रकृच्छ्रावर—श[illegible]वरी, कसेरु, दर्भमूळ, गोखरू, भुइकोहळा, साळींचें मूळ, उंसाचें मूळ व [illegible] व [illegible]ड, यांचा काढा थंड करून मध व खडीसाखर घालून प्यावा. **प्रमेहावर**— [illegible]ता-

वरीचा रस दुधाबरोबर घ्यावा. **महाविष्णु तैल**—शतावरीचा रस १६ शेर, दूध १६ शेर, पाणी ३२ शेर आणि नागरमोथा, अस्कंध, जीवक, ऋषभक, कचोरा, काकोली, क्षीरकाकोली, जीवंती, ज्येष्ठमध, देवदार, पद्मकाष्ठ, सैंधव, जटामांसी, वेलची, दालचिनी, दगडफूल, कोष्ठ, वेखंड, रक्तचंदन, मञ्जिष्ठ, कस्तुरी, पांढरें चंदन, केशर, सालवण, पिठवण, रानमूग, रानउडीद, कवड्या ऊद, गंठोणा नखला, व वडीशोप यांचा प्रत्येकीं चार चार तोळे कल्क मिळवून १६ शेर तिळांचें तेल सिद्ध करावें. हें सर्व प्रकारच्या वातरोगांवर उत्तम गुणकारी आहे शतावरीच्या मुळ्यांचा काढा दिल्यानें देवीचा जोर कमी होतो. शतावरीचीं पानें तुपांत शिजवून, तें तूप गळवावर पिकवणासाठीं लावावें.

# २३ कुटकी.

**संस्कृत.**—कटुका, जननी, तिक्ता, रोहिणी, कटुरोहिणी, चक्रांगी, मत्स्यपित्ता, वहुला, शकुलादनी, शतपर्वा, मत्स्यभेदी, कृष्णभेदा, महौषधी, अशोकरोहिणी, कृष्णा, कटु, कांडरुहा, कट्वी, अंजनी, त्वरिष्टा, केदारकटुका, आमघ्नी, सादनी, विप्रांगी, मत्स्यशकला, जनी, द्विजांगी, सिंही, ब्राह्मणांगी, कटंभरा, अशोका, मत्स्यविन्ना, तिक्ता, अतिकटु, वामघ्नी, ज्वरहृत्, रेचनी, कामलाघ्नी, मलभेदिनी. **गु०** कडू. **हिं०** कुटकी. **बं०** कट्की. **क०** केदार कटुकी. **तै०** काटकरोहिणी. **कुमाऊन.** कुरुवा. **ता०** कटुकरोहिणी; **फा० अ०** खर्बके हिंदी. **ला०** Picorrhiza kurroa पिकोऱ्हिजा कुर्रोआ.

**वर्णन**—हें लहानसें झाडोर हिमालयावर काश्मीरपासून सिकिमपर्यंत ९००० पासून १५००० फुटीच्या उंचीवर सर्वत्र विपुल उत्पन्न होतें. अलीकडे ' गाँभा ' साहेबानें ' लाचुंग ' येथें याची वरीच उत्पत्ति होते असें पाहिल्याबद्दल लिहिलें आहे. ही बहुवर्षायु वनस्पति आहे. हिचीं मुळें अंशतः नरम व अंशतः काष्ठमय असतात. पानें अंडगोल, रुंदीपेक्षां लांबीनें जास्त, बुडख्याकडे बारीक असून टोंकाकडे रुंदावत जाणारीं व साधारण गुळगुळीत

असून त्यांचे कांठ कातरलेले असतात. यावर गहऱ्या निळ्या रंगाच्या फुलांचे दाट घोंस येतात. या वनस्पतीचीं मुळें औषधांत वापरलीं जातात. तीं लहान हंसाच्या पिसाच्या जाडीचीं असतात. त्यांवरील साल पिळवटलेली, खोचेदार, मळकट, पांढरी किंवा तांबुस धूसर रंगाची असते. आणि त्यांवर जागजागीं उपमूळकें लागल्याच्या खुणा अथवा खांचा दिसतात. वरील साल काढली असतां आंतील भाग काळया रंगाचा दिसतो. यावरूनच हीस काळीकुटकी हें नांव पडलें असावें. कुटकी फार कडू लागते. आणि तिच्या या कडूपणावरूनच हीस कटुका, तिक्ता इत्यादि नांवें दिलीं गेलीं असावीं असें वाटतें. हिच्या केदार कटुका नांवावरून असें वाटतें कीं, हिमालयांत गंगोत्रीच्या आसपास केदार पर्वतावर ही वनस्पति विशेष होत असावी. पूर्वी युनानी हकीम काळा 'हेलि-बोर' व काळी कुटकी हीं एकच मानीत असत. परंतु रॉयल साहेबानें हिमाल-यावरील वनस्पतींचा शोध लाविला त्यांत 'कडू' हें नांव जरी एका जातीच्या जेनशनास लावीत असत तरी मसूरीकडील पसारी ज्या वनस्पतीचीं मुळें कुटकी ह्मणून आणून सुकवितात तीं Scrophularinae स्क्र यनी, वर्गातील असून Picorrhiza Kurroa पिकोऱ्हिझा कुरोंआ नांवाच्या वनस्पतीचीं अर्थात् ज्याचें चित्र आह्मी येथें दिलें आहे त्याचींच आहेत असें माजी फॉर्बस—रॉयल साहेबानें ठरविलें आहे.

**रासायनिक घटना.**—कुटकीची बुकी करून ती ईथर द्रव्यांत पचन करावी. नंतर ती गाळून त्यांतील ईथर वाफेच्या रूपानें काढून टाकावा ह्मणजे भांडयांत तांबूस काळसर रंगाचें द्रव्य राहतें. त्यांत कांहीं वेळानें सूच्याकार स्फटिक बनतात. त्यांत पाणी घातलें अथवा तो द्रव उन्ह केला तर स्फटिक तयार होत नाहींत. ते राळेच्या धर्माचे असून त्यांस ( Picorrhizin ) पें-फोरेझिन, नांव दिलें आहे.

कुटकींतून जीं द्रव्यें पृथक् करितां येतात तीं येणेंप्रमाणें—मेण १.०६; कडू द्रव्य ( Picorrhizin ) १४.९६; त्या द्रव्याच्या पृथक्करणानें होणार

**विशेष माहिती.**—आर्यभिषक् मासिक पुस्तक, सन१८८९च्या जुलैपासून सुरू झालें असून, त्यास हल्लीं पंधरावें वर्ष सुरू आहे. या मा. पुस्तकांत जे विषय येतात, त्यांचीं पुस्तकें निरानिराळीं बांधतां यावीं अशी सोय प्रथम-पासूनच केली आहे. त्यामुळें जुन्या वर्षाचे अंक घेण्याची जरूर रहात नाहीं. त्यांतून निरनिराळ्या रीतीनें बांधलेल्या पुस्तकांची, किंमतवार यादी याखालीं देत आहों:—

| | |
|---|---|
| वनौषधीगुणादर्श भा. १ ला. १२ आ. | हल्लींचा वीर्यनाश व त्यावर उपाय. ३ आ. |
| ” भा. २ रा. १ रु. | औषधीक्रिया ... ८ आणे |
| ” भा. ३ रा. १। रु. | राजवैद्य...... १२ आ. |
| ” भा. ४ था १॥ रु. | औषधीमानपरिभाषा१॥ आ. |
| ” भा. ५ वा. १। रु. | गोवैद्यक......... २ आ. |
| ” भा. ६ वा. १२ आ. | प्राणिज औषधी. २ आ. |
| सुबोध वैद्यक. पूर्वार्ध व उत्तरार्ध१॥ रु. | अश्वरोगपरिज्ञान.८८॥ आ. |
| रसवैद्य... ... १२आ. | त्रिदोषविचार, भा.१ला.४ आ. |
| बृहन्निघंटु... १॥ रु | ” भा. २ रा. ४ आ. |
| | ” भा. ३ रा. ४ आ. |
| औषधिग[illegible] १॥ रु. | ग्रंथिकसान्निपात ... ६ आ. |
| गर्भार[illegible]पण १ रु. | सार्थ हारीतसंहिता भा. १ ला. १। रु. |
| सार्थयोगशतक.... ४ आ. | सार्थ श्रीचरकसंहिता निदानस्थान१४आ. |
| सार्थ वैद्यवल्लभ... ४ आ. | ” विमानस्थान १॥ आ. |
| बृहत्पाकसंग्रह ... १॥ रु | ” इंद्रियस्थान १२ आ. |
| नाडीपरीक्षेचें महत्व ३ आ. | ” कल्पस्थान १४ आ. |
| औषधीवाड ... २ रु | ” सिद्धिस्थान १॥ रु. |
| दीर्घायु कसें व्हावें? भाग१ ला.१०आ. | ”चिकित्सास्थान भा. १ ला. १॥। रु. |
| सार्थ श्रीचरकसंहिता | ”चिकित्सास्थान भा. २ रा. २ रु. |
| सूत्रस्थान, पूर्वार्ध. २ रु | नपुंसकमीमांसा-कामसंजविन १॥रु. |
| ”सूत्रस्थान उत्तरार्ध भा. १ ला १॥ रु. | निघंटशिरोमणी भा. १।२ २। रु. |
| ” ” भा. २ रा २ रु. | आयुर्वेदरहस्य भा. १ ला. १ रु. |

लोकमान्य ग्रंथ.

# मराठी वाग्भट व वृद्धवाग्भट

बक्षीस ! फुकट !

प्रत्येक कुटुंबांत अवश्य असाव

… झाली आहेत, त्या अनुरोधाने … आर्य … अष्टांगसंग्रह … तयार … यांप्रमाणे तीन भागांत हे दोन्ही ग्रंथ … पहिला भाग … १९०८ … भाग १९०९ … यांप्रमाणे बक्षीस मिळतील … तीन वर्षां वर्गणीदार … आर्यभिषक … जुलै १९०८ … दोन भाग … हरवर्षी … मिळतील … भागाचा टपाल … पहिले … फुकट मिळतील.

ध्यानांत … वर्गणीदार होणारांनी … नियम … पुस्तक … अखेरपर्यंत …

किंमतीस मिळतील.

… रविवार … दुकान. तारीख १३।४।१९०८

शास्त्री पदे, ( आर्यभिषक ) मुंबई … आर्य … विद्यालय